3455

0155mN44
G481

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

0155mN44 3455
G1.51
Tilak, Lokmanya
Kesharicha ekavn-
nava vaddivas.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

0155mN44
G1

3455

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

*****

Please return this volume on or before the date last stamped.
Overdue volume will be charged ten paise per day.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

किंमत २ आणे रजिस्टर्ड नं. B.60

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

लोकमान्य टिळकांसंबंधीं वाङ्मय

ग्रंथांची यादी

0155mN44
G1.3L

१ लो० टिळकांचे केसरींतील लेख भाग	१	पृष्ठसंख्या	६८७
२ लो० टिळकांचे केसरींतील लेख भाग	२	,,	६२६
३ लो० टिळकांचे केसरींतील लेख भाग	३	,,	४८२
४ लो० टिळकांचे केसरींतील लेख भाग	४	,,	५८१
५ लो० टिळक यांचें चरित्र खंड	१	,,	६८८
६ लो० टिळक यांचें चरित्र खंड	२	,,	५५२
७ लो० टिळक यांचें चरित्र खंड	३	,,	७०४
८ लो० टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका खंड	१	,,	५१८
९ लो० टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका खंड	२	,,	६६३
१० लो० टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका खंड	३	,,	५२९
११ लो० टिळक सूक्तिसंग्रह		,,	४००
१२ लो० टिळकांचीं धर्मविषयक मतें		,,	२२४

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 3499

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरी–'ज्युबिली' अंक



जन्म–१८५६]

लो० बाळ गंगाधर टिळक

[मृत्यु–१९२०

थ्री कलर प्रिंटिंग–'साहित्य सेवक छापखाना'
गणेश महादेव आणि कंपनी, पुणे शहर

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वर्ष ५१ वें]—[अंक १ ला] केसरीच्या एकावन्नाव्या वाढदिवसाचा [रजिस्टर नंबर बी ६०

ज्युबिली अंक

शनिवार-पौष शु. १३
शके १८५२
तारीख ३ जानेवारी
सन १९३१

केसरी

संस्थापक-लो. बा. गं. टिळक
ट्रस्टी व संचालक
नरसिंह चिंतामण केळकर
ट्रस्टी व व्यवस्थापक
धोंडो वासुदेव विद्वांस

स्थितिं नोरे दध्याः क्षणमपि मदांधेक्षणसखे।
गजश्रेणीनाथ त्वमिह जटिलायां वनभुवि।
असौ कुंभिभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा।
गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः॥

तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हा घडो।
त्वदीय गुणकीर्तनध्वनि सुरम्य कर्णीं पडो।
स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो।
तुझ्या समची आमुची तनुहि देशकार्यीं पडो॥

केसरीचा एकावन्नावा वाढदिवस

ईश्वरकृपेनें आज केसरीच्या आयुष्याचीं पहिलीं पन्नास वर्षें पूर्ण होऊन त्याच्या एकावन्नाव्या वर्षाला प्रारंभ होत आहे. याबद्दल आम्ही स्वतःचें व केसरीचा वाचकवर्ग :यांचें अभिनंदन करितों.

कोणाचा कोणताहि 'वाढदिवस' म्हटला म्हणजे तो एक आनंदाचाच प्रसंग. अभ्युदय किंवा निःश्रेयस् यांची एक सामान्य खूण म्हटली म्हणजे वाढ व क्रमिक परिणति होय. पण मनुष्यानें आपल्या अनुभवानें आयुष्याच्या मार्गावरच्या कांहीं कांहीं मुक्कामांना विशेष महत्त्व देऊन ठेवलें आहे.उदाहरणार्थ, बाळपणाचा पहिला वाढदिवसच समारंभानें पाळला जातो. पुढील वाढदिवस मामुली समजले जातात व त्यांचे समारंभ फारसे होत नाहींत. यानंतर दुसऱ्या टोकाला हिंदुधर्मशास्त्रानें महत्त्वाचा मानलेला वाढदिवस एकसष्ठावा होय. या दिवशीं उदकशांत, दानें इत्यादि धार्मिक विधी होतात, व ज्याच्या त्याच्या महत्त्वाप्रमाणें किंवा परिवाराप्रमाणें इतर लौकिक समारंभहि साजरे करण्यांत येतात.

मुलाचा पहिला वाढदिवस अर्थातच अपत्यवत्सलतेच्या कौतुकानें व प्रेमानें करण्यांत येत असला तरी, पहिल्या बारा महिन्यांत लहान मुलांच्या प्रकृतीला अपाय फार, यामुळें 'ती मुदत निभावली म्हणजे एक पहिलेंच गंडांतर निभावलें' अशी गुप्त जाणीवहि त्या प्रथम वाढदिवसाच्या समारंभांत असतेच. आयुर्दायाचें एक आधुनिक शास्त्रच बनलेलें आहे. त्याच्या अभ्यासकांनीं मृत्यु व अपमृत्यु यांच्या अंदाजाचे कांहीं नियम, हजारों उदाहरणांच्या अवलोकनानें, बनविले आहेत. त्यावरून पाहतां मनुष्याला पहिल्या बारा महिन्यांत व पुढें साठ ते पासष्ट या वयांत मृत्यूचें जितकें भय तितकें इतर वयांत नसतें. विमा कंपन्या देखील मनुष्य लहानपणीं कांहीं वयाचा होई-पर्यंत त्याच्या आयुष्याचा विमा उतरीत नाहींत, तसाच कांहीं एका वयानंतरहि तो उतरीत नाहींत. या दोन मर्यादेंतल्या मनुष्यांचेंच जीवित हिशेबांत धरलें जातें.

'शतायुर्वै पुरुषः' या वचनावरून असें दिसतें कीं वैदिक पद्धतीनें मनुष्याचा पूर्ण आयुर्दाय शंभर वर्षांचा मानला गेला आहे. आशीर्वाद मागणारा 'जीवेऽहं शरदः शतं' या शब्दांनीं तो मागेल; व देणाराहि 'जीव शरदः शतं' या शब्दांनीं तो देईल. अर्थात मनुष्य साठ वर्षांचा-झाला म्हणजे त्यांन निम्याहून अधिक एक दशक इतकी मजल मारली असा अर्थ असतो. म्हणून तो अभिनंदनाला पात्र होतो. षष्ठ्यब्दि विधीमध्यें उदकशांत, होमहवन हीं केलीं जातात त्यांचा अर्थ, एका दृष्टीनें, गंडांतर–परिहार असा घेतला, तर वानप्रस्थ नामक तृतीय आश्रमांत प्रवेश असाहि दुसऱ्या दृष्टीनें घेतां येईल.

असो. अशा रीतीनें धर्मविधींच्या दृष्टीनें एकसष्ठाव्या वाढदिवसाचें महत्त्व असतां, आम्ही केसरीच्या एकावन्नाव्या वाढदिवसाचा आनंदोत्सव करीत आहों हें अर्थात लौकिकच काय पण त्यांतूनहि परकीय आंग्लपद्धतीलाहि अनुसरून होय ही गोष्ट अगदीं उघड आहे, आणि ती आम्ही प्रांजलपणें कबूल करतों. कितीहि नाहीं म्हटलें तरी 'राजा कालस्य कारणं' ही म्हण खोटी कशी ठरेल! इंग्रज लोकांमध्यें कोणत्याहि जीवाच्या आयुष्याच्या सव्विसाव्या, त्यानंतर एकावन्नाव्या, व त्यानंतर एकसष्ठाव्या वाढदिवसाला क्रमानें अधिकाधिक महत्त्व दिलें जातें. त्यांच्यांत या वाढदिवसाकरितां कोणताहि धार्मिक विधि सांगितलेला नाहीं. परंतु या तीन वाढदिवसांच्या समारंभाला त्यांच्यामध्यें ज्युबिली (आनंदमहोत्सव) असें म्हणतात. आणि या तीन समारंभांचें क्रमानें वाढतें महत्त्व दर्शविण्याकरितां सव्विसाव्या वाढदिवसाच्या ज्युबिलीला 'रौप्य' एकावन्नाव्या वाढदिवसाच्या ज्युबिलीला 'सुवर्ण' व एकसष्ठाव्या वाढदिवसाच्या ज्युबिलीला 'हीरक' अशीं वाढतीं उज्वल नांवें त्यांनीं दिलेलीं आहेत. या पद्धतीप्रमाणें आज आम्ही हा केसरीचा विशिष्ट अंक काढून त्याची 'सुवर्ण–ज्युबिली' साजरी करीत आहों. आणि त्याबरोबरच अशी प्रार्थना करीत आहों कीं,आणखी दहा वर्षांनीं याच विदेशी पद्धतीप्रमाणें केसरीचा 'हीरक' ज्युबिलीचा उत्सव, आणि हिंदुधर्मशास्त्रपद्धतीप्रमाणें षष्ठ्यब्दिसमारंभ, यथाविधि व आनंदपूर्ण रीतीनें करण्याचा सुदिन उगवेल तेव्हां, त्यांत सामील होण्याकरितां, आज हयात असलेल्या केसरीच्या सर्व ऋणानुबंधी लोकांना अवश्य तें आयुष्य ईश्वरानें द्यावें.

पुढें दहा वर्षांनीं होणाऱ्या केसरीच्या समारंभाला आजच्यापैकीं कोण कोण आप्त प्रत्यक्ष हजर राहतील ते दैववान खरेच. पण केसरीच्या आजच्या समारंभाला जे हजर नाहींत त्यांचें स्मरण अवश्य केलें पाहिजे. या दृष्टीनें पाहतां प्रथमच एक ठळक गोष्ट दुर्दैवानें नमूद करावी लागते. ती ही कीं, 'केसरी' व 'मराठा' पत्रांच्या मूळच्या संस्थापकांपैकीं एकहि कोणी आज विद्यमान नाहीं. त्यांतले कोणी आज असते तर त्यांना किती आनंद वाटला असता हें सांगण्याचें कारणच नाहीं! पण ते आज हयात राहावयाचे तर त्यांतल्या कोणाचीं वयें किती असतीं हेंहि पाहिलें पाहिजे. या संस्थापकांच्या जन्ममृत्यूचीं वर्षें खालीं दिलीं आहेत.

	जन्म	मृत्यु	आयुर्दाय
१ विष्णुशास्त्री चिपळूणकर	१८५०	१८८२	३२
२ महादेव बल्लाळ नामजोशी	१८५३	१८९६	४३
३ बाळ गंगाधर टिळक	१८५६	१९२०	६४
४ गोपाळ गणेश आगरकर	१८५६	१८९५	३९
५ वामन शिवराम आपटे	१८५८	१८९२	३४
६ गणेश कृष्ण गर्दे	१८५५	१९१६	६१

यावरून हें दिसून येईल कीं, या संस्थापक मंडळींपैकीं सर्वांत जो लहान तो आज ७२ वर्षांचा व सर्वांत जो वडील तो ८० वर्षांचा असावयाचा. अर्थात् हे लोक केसरीच्या या ज्युबिलीच्या प्रसंगीं विद्यमान हवे होते असें म्हणणें हे ठीक आहे, पण या समारंभाच्या प्रसंगीं तें मनचे मांडे करून खाण्यासारखेंच होय. केसरीचे संस्थापकच काय पण केसरीच्या अगदीं पहिल्या वर्षाचे वर्गणीदार किंवा वाचक तरी आजमितीला किती हजर असतील याची शंकाच आहे. या संबंधानें आम्ही आजचा प्रसंग मनांत धरून कांहीं दिवसापूर्वीं केसरींत मुद्दाम एक जाहीर विनंति प्रसिद्ध केली होती. पण तिजवरून आमच्याकडे फारच थोडीं नांवें आलीं. १८८१ सालीं केसरीचा वर्गणीदार होणारा मनुष्य कर्तासवरता, शिकलेला, मिळविता असाच असणार. म्हणजे त्यावेळीं त्याचें वय जर सुमारें पंचवीस वर्षांचें असलें तर आज तो पाऊणशें वर्षांचा असला पाहिजे. इतकीं वृद्ध माणसें आज कितीशीं हयात असणार! त्यांतून कोणी असले तरी तेव्हां केसरीचे वाचक नसतील. वाचक असले तरी वर्गणीदार नसतील. नाहीं म्हणावयाला सुमारें पांच सहा गृहस्थांनीं आपण केसरीच्या पहिल्या वर्षाचे वर्गणीदार असल्याचें कळविलें आहे. अशा ऋणानुबंधी लोकांना आजचा वाढदिवसाचा अंक वाचून फार आनंद होईल यांत शंका नाहीं. सत्तराहून अधिक वयाचीं माणसें हिंडतीं, फिरतीं, वावरतीं आढळतच नाहींत असें नाहीं. मि. ग्लॅडस्टन, मिसेस बेझंट या इंग्रजांप्रमाणें म. दादाभाई नवरोजी, डॉ. भांडारकर; व आज ८३ वर्षांचे असतां एखाद्या तरुण मनुष्याप्रमाणें सार्वजनिक कामें दक्षतेनें करणारे दि. ब. गोडबोले यांच्यासारखे गृहस्थ आम्हा हिंदी लोकांनाहि झाले. पण या व्यक्ती अपवादादाखलच समजल्या पाहिजेत. हिंदी लोकांचा आयुर्दाय पाश्चात्यापेक्षां कमीच. त्यांतूनहि महाराष्ट्रीय लोकांत तो आणखी कमी.

आधुनिक सुशिक्षित महाराष्ट्रीयांत तर तो इतका कमी वाटतो कीं, पस्तीस–चाळीस वर्षांपूर्वीं एके काळीं आमच्यांतील विचारवंत पुढाऱ्यांना तो मोठ्या काळजीचा म्हणून मोठ्या चर्चेचाहि विषय होऊन राहिला होता. या विषयावर १८९४ सालीं मुंबई विद्यापीठाचे दोन धुरीण, म्हणजे डॉ. भांडारकर व न्या. रानडे, यांचीं उत्तरें–प्रत्युत्तरें मोठ्या जोराचीं झालीं होतीं. मात्र या वर्गाच्या अल्पायुषित्वाची मीमांसा दोघांची दोन प्रकारची असली तरी, तें अल्पायुषित्व त्या वेळीं तरी इतकें सिद्धप्राय होतें कीं दोघांनींहि तो नियमच मानिला होता. त्याला बाध आणणारीं उदाहरणें सुखाल अपवाद म्हणून ते समजत. वास्तविक त्यानंतर अलीकडे हा वाद पुनः कधीं उमटला नाहीं. याचें एक कारण

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

खरोखरच असें कीं, त्यानंतर महाराष्ट्रीय सुशिक्षितांत अल्पायुषित्व अनुभवास येण्याचें कमी होऊन ते मध्यम वयापर्यंत सामान्यतः जगतात असें दिसून आलें; व पूर्वी गृहीत धरलेली मृत्युकाळची ३५ वर्षांची मर्यादा जवळ जवळ पन्नास—पंचावन्नापर्यंत वाढलेली दिसून येऊं लागली. अर्थात् त्या जुन्या वादांत आतां फारसा अर्थ नाहीं, व पूर्वी केलेली मीमांसा ढळमळली असेंच सर्वांना वाटूं लागलें. कारण जुनी कोणतीहि स्थिति न बदलतां परिणामांत मात्र फरक दिसूं लागला. परंतु त्या जुन्या काळीं अल्पायुषित्वाच्या मीमांसेचा वाद निघण्याला कारण झालें तरी, न्यू. इं. स्कूल व केसरी—मराठा यांचे संस्थापक मंडळींपैकीं अनेक व्यक्ती अल्पवयांत मृत्यु पावल्या ही मनाला चटका लावणारी गोष्टच कारणीभूत झाली यांत शंका नाहीं. या वादांत टिळकांना रानड्यांची विचारसरणी भांडारकरांच्या विचारसरणीपेक्षां अधिक ग्राह्य वाटली होती. तें असो. पण महाराष्ट्रीय सुशिक्षित हे अल्पायुषी असतात खरे ही गोष्ट त्यांनींहि मान्य केली होती. आणि आपल्याबरोबरीचे व आपल्याच संस्थेतले सहकारी चिपळूणकर, आपटे, वासुदेवराव केळकर आगरकर हे अल्पवयी मेले हें पाहिल्यावर ते त्याहून वेगळें काय मानणार!

शिशिर ऋतु एकाएकीं उपस्थित होऊन, वृक्षाची पानें अकालीं पिकावीं व तीं आपल्याभोंवतीं पटापट गळून पडलेलीं दिसावीं, असें झालें असतां यदृच्छेनें उरलेल्या, पण बंधुविरहानें व्यथित झालेल्या, एकाद्या वृक्षपर्णाला आपण स्वतः जगलों कसें याचेंच आश्चर्य वाटतें! आणि त्याच्या प्राणाचा देठ अजून हिरवा व रसाळ असला, तरी त्याला मनानें वाटूंच लागतें कीं, "वाऱ्याची यापुढची झुळूक येईल ती मलाहि पतन न पाववील कशावरून"! लो. टिळकांची मनःस्थिति पस्तीस वर्षांपूर्वी एकदां अशीच झाली होती. स. १८९६ सालीं, म्हणजे केसरीला नुकतें सोळावें वर्ष लागलें असतां, केसरी स्वतः टिळकांच्या खास मालकीचा होऊन अवघीं पांचच वर्षें झालीं असतां, व टिळकांच्या वयाला पुरीं चाळीस वर्षेंहि झालीं नव्हतीं तेव्हां, "आपला आतां काय भरंवसा! आपल्या वर्तमानपत्रांचे कामीं मदतनीस घेऊन त्यांची कायमची कांहीं व्यवस्था करावी" असें टिळकांना वाटूं लागलें होतें. या सालीं मार्च महिन्यांत त्यांनीं रा. न. चिं. केळकरांना मदतनीस म्हणून घेतलें त्या वेळीं त्यांना लिहिलेल्या पहिल्याच पत्रांत टिळक लिहितातः—

"तुम्हाला मी बोलावीत आहे ते केवळ नोकर म्हणून नव्हे. तर मित्र, स्नेही, सहकार्यकर्ते म्हणून. कारण न जाणो माझेंहि आयुष्य लवकरच संपणार नाहीं व माझे हे दिवस शेवटचेच न ठरतील कशावरून!" (I want a friend for, as it may be, the last days of my life) टिळकांची प्रकृति सुदृढ व निकोप असतां, त्यांच्या दैदीप्यमान मनावर अशा प्रकारची उदास छाया पाडणारा ढग कोणता असावा! तर आपल्याच वयाचे इतर अनेक समव्यवसायी लोक मरण पावले हा विचार होय. असो. परंतु टिळकांचा या एका बाबतींत तरी अदमास सपशेल चुकला. कारण ते यापुढें आणखी पंचवीस वर्षें जगले. पूर्वी कधीं केले नाहींत असे श्रम सायास या अवधींत त्यांनीं केले. पूर्वी कधीं कोणी मिळविली नाहीं अशी कीर्ति त्यांनीं मिळविली. आणि प्रस्तुत विषयाला धरून बोलावयाचें तर, केसरी पूर्वी होता त्याच्या दसपट अधिक लोकप्रिय व परिणामकारक असा त्यांनीं याच अवधींत केला. टिळकांना स्वतःच्या देहाप्रमाणें पुढें पुढें केसरीचीहि अशाश्वतता वाटूं लागली होती. कारण खटले दंड शिक्षा होऊं लागल्या. राजकीय वातावरण प्रदीप्त होऊन सर्वांनाच चटके बसूं लागले. शेवटीं प्रेसअॅक्ट होऊन जामिनक्या मागण्यांत व जप्त करण्यात येऊं लागल्या. तेव्हां 'केसरी' आज आहे उद्यां नाहीं असें एक दिवस व्हावयाचें असें टिळकांना वाटे! परंतु त्यांचे व केसरीचें नशीब थोर. म्हणून स्वतः त्यांना पासष्टवर्षांइतकें भरपूर आयुष्य लाभलें,* व त्यांच्या मृत्यूपर्यंतच काय, पण त्यानंतर आज दहा वर्षें तरी, केसरी राहिला आहे. म्हणूनच त्याची 'सुवर्ण ज्युबिली' करण्याचा सुप्रसंग लाभत आहे.

पण संस्था म्हटली म्हणजे तीं व्यक्तिनिरपेक्ष असावयाची. आणि वर्तमानपत्र ही एक संस्था असल्यामुळें, वर्गणीदारच काय पण संपादकहि आले गेले, किंवा जुन्याचे नवे झाले, तरी टिकून चालू राहणें हा तिचा धर्म आहे. आणि हा धर्म अबाधितपणें जितके दिवस अधिक पाळला जाईल तितका त्या संस्थेचा गुण अधिक असें समजतात. नदीचा प्रवाह कवीला म्हणतो—

> कोणी येवो कोणी जावो मी वाहत राहीन।
> प्रवाह माझा अखंड. मजला ना खेद न वा शीण॥

वर्तमानपत्रासारखी व्यक्तिनिरपेक्ष संस्थाहि आपल्या वाचकांना हेंच सांगते. केसरी जन्मल्यापासून आजपर्यंत त्याचे सुमारें २५०० अंक निघाले. यांत केव्हां फक्त कांहीं तास अंक आगेमागे निघाला असेल. पण ठराविक दिवस कधींच चुकला नाहीं. मंगळवारीं सकाळीं टेबलावर केसरीचा ताजा अंक येऊन पडला व तो उचलून उघडून कोणी स्नेही वाचू लागला तर, एखादे वेळीं टिळक त्याला विनोदानें म्हणत "See my weekly miracle is performed!" (कां! आमचा साप्ताहिक चमत्कार घडून आला कीं नाहीं!) आणि एका अर्थानें वर्तमानपत्राचा अंक वेळेवर निघणें हें एखाद्या चमत्काराप्रमाणें कौतुकास्पद वाटावें अशीहि कित्येक वेळां स्थिति वर्तमानपत्राच्या कारखान्याची होऊन जाते. विद्यार्थ्यांच्या अनुभवाचा दाखला द्यावयाचा तर असें म्हणतां येईल कीं, वर्तमानपत्र छापून बाहेर पडलें म्हणजे, परीक्षा पास झाल्याचा नव्हे पण परीक्षेंतील उत्तरांचा कागद लिहून होऊन तो परीक्षकाच्यां हातांत दिल्याचा, जो आनंद किंवा सुटकेची जी भावना विद्यार्थ्याला प्रतीत होते तीच, आपल्या वर्तमान पत्राचा अंक छापून बाहेर पडला म्हणजे संपादकालाहि प्रतीत होते. पुढें परीक्षक तो कागद वाचून काय पास नापास म्हणावयाचें तें म्हणो, पण आज आपण तर आपलें काम करून टाकलें असें विद्यार्थ्याला वाटतें. तसेंच संपादकालाहि वाटतें कीं, पुढें वाचक तो अंक वाचून काय शाबासकी किंवा शिव्या देणार असेल त्या देवो, पण आपण तर आज आपलें काम करून टाकलें खरें! मग एका आठवड्याचा एक अंक पार पडला असतां जर इतके हायसें वाटतें, तर आपल्या संस्थेची पन्नास वर्षें अबाधित पार पडलीं, व तिच्या कार्यांत एक वेळहि खळ पडला नाहीं, हें पाहून कोणत्याहि संस्थेच्या चालकाला किती धन्यता वाटावी हें कोणीहि सांगेल. असो.

आजच्या या अंकांत केसरी—मराठा संस्थेसंबंधीं शक्यतितकी माहिती एकत्र करून वाचकांच्या हातीं देण्याचें योजिलें आहे. हेतु हा कीं, ती त्यांच्या संग्रहीं सुलभरीतीनें राहावी. वास्तविक यापूर्वी ही किंवा यांतील बरीचशी माहिती इतक्या निरनिराळ्या रूपांनीं प्रसिद्ध झाली आहे कीं, पुनरुक्ति केल्याशिवाय कांहींहि लिहिणें आतां कठीणच. लो० टिळक व केसरी यांची व्याप्ति इतकी व्यापक व सर्वांगपूर्ण आहे कीं, टिळकावेगळें केसरी संबंधानें व केसरीवेगळें टिळकांसंबंधानें लिहितां येणें फारसें शक्यच नाहीं. लोकमान्यांची छोटीं मोठीं चरित्रें सन १८९७ पासून प्रसिद्ध होत आहेत. त्यांच्यावर १८९७ व १९०८, सालीं झालेले राजद्रोहाचे खटले केसरी संबंधानेंच असल्यामुळें त्या त्या खटल्यांच्या हकीकतींतून व त्यांचीं समग्र पुस्तकें प्रसिद्ध झालीं त्यांतून टिळकांनीं केसरीची अभिवृद्धि कशी केली व लोकमत बनविण्याकडे त्याचा उपयोग कसा केला हें प्रसिद्ध झालेंच आहे. १९०८ सालीं रा. आप्पा कुळकर्णी यांचें 'टिळकांचीं गेलीं आठ वर्षें' हें पुस्तक प्रसिद्ध झालें. १९१६सालीं टिळकांचा व्यक्तिशः एकसष्ठावा वाढदिवस झाला त्याच्या समारंभप्रसंगीं एक पुस्तक [टिळक अंक] प्रसिद्ध झालें. त्यांत केसरीसंबंधीं तोंपर्यंतची हकीकत निरनिराळ्या लेखकांनीं व्यवस्थित लिहिली होती. पुढें प्रस्तुत लेखकानें लिहिलेलें टिळकचरित्राचे तीन खंड, केसरी संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या टिळकांच्या केसरींतील निवडक लेखांचे चार खंड, व रा. सदाशिव विनायक बापट यांनीं प्रसिद्ध केलेले टिळकांच्या आठवणींचे तीन खंड व टिळक सूक्तिसंग्रहाचा एक खंड, इतकीं पुस्तकें मिळून पांच सात हजार पाना इतका मजकूर टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्यासंबंधाचा गेल्या दहा वर्षांत प्रसिद्ध झाला आहे. टिळकांनीं केसरी सोडून दुसऱ्या कोणत्याहि पत्रांत मासिकांत कधीं कांहीं लिहिलें नाहीं. व त्यांनीं लेखनाशिवाय आणखी जे उद्योग व ज्या चळवळी केल्या त्याचें खरें व उत्कृष्ट प्रतिबिंब त्या त्या उद्योगांविषयीं व चळवळीविषयीं स्वतः टिळकांनींच केसरींत वेळोवेळीं लिहिलेल्या लेखांतून, किंवा त्यांच्या व्याख्यानांचे सारांश व सभांचीं वर्णनें इत्यादि दुसऱ्यांनीं लिहिलीं त्यांतून प्रगट झालेलेंच आहे. म्हणजे टिळकांच्या तीस वर्षांच्या ऐन उमेदीच्या, ऐन बहराच्या, ऐन यशस्वितेच्या, ऐन प्रगतिपर वैभवाच्या सार्वजनिक चरित्राचा जो इतिहास तोंच केसरीचा इतिहास असें स्थूलपणें म्हणतां येण्यासारखें आहे. यामुळें आतां तात्विक विवेचनापेक्षां किंवा विचारतरंग उठविण्यापेक्षां अधिक कांहीं करणें कोणासहि शिल्लक उरलें नाहीं. हा विषय इतका मोहक व व्यापक आहे कीं, पुढेंमागें अशीं विवेचनात्मक किंवा विचारतरंगात्मक पुस्तकें लिहिणारे उद्योगी किंवा प्रतिभासंपन्न लेखक निघतीलहि अशी आमची खात्री आहे. पण आजचा ज्युबिली अंक हें असलें विवेचन करण्याचें किंवा विचारतरंग खेळवित बसण्याचें स्थळ नव्हे. बरें जागाहि अगदीं मर्यादित. म्हणून शक्य तितकी केसरी—मराठा संस्थेसंबंधाची माहिती 'नवी व जुनीहि' एकत्र व सुसंगत करून देण्याकडेच त्या मर्यादित जागेचा उपयोग करणें आम्हाला इष्ट वाटतें.

दुसरीहि एक गोष्ट आहे ती सांगण्याला संकोच करण्याचें कारण नाहीं. ती ही. कोणत्याहि संस्थेचा ज्युबिली समारंभ होण्याचा सुप्रसंग येण्याला, म्हणजे तिचें कार्य पन्नास वर्षें अखंड चालू राहण्याला, किंवा त्याची सर्वांगीण प्रगति होण्याला, अनेक व्यक्तींची सेवा, श्रम, बुद्धि, चातुर्य इत्यादि अनेक उपजत किंवा कर्मार्जित गुण उपयोगी पडलेले असतात. तथापि अशा प्रसंगीं अशा व्यक्तींपैकीं मृतांचा, व तोहि त्यांच्या गुणांचाच, उल्लेख कृतज्ञता पूर्वक करणें हें अधिक उचित ठरतें. जित्यांचा उल्लेख होऊंच नये असें नाहीं! पण त्यांची ती वेळ येण्याला स्वाभाविक अवधि असते. निदान असें खरें कीं, त्यांनाहि आपण संस्थेला उपयोगी पडलों असें थोडेंबहुत वाटण्याला

---

*टीप—या प्रसंगानें थोडेसें विषयांतर करून मराठ्यांच्या इतिहासांतील अठराव्या शतकांतील कांहीं स्त्री—पुरुषांची आयुर्मर्यादा काय ठरली हें येथें सहज सांगावेसें वाटतें. या काळांत ७० ते ८० या मर्यादेपर्यंत जीं माणसें जगलीं तीं:—(१) दुसरा बाजीराव (२) मालोजी घोरपडे (३) मानाजी फाकडे (४) मल्हारराव होळकर (५) ताराबाई भोसली.

६० ते ७० (१) महादजी शिंदे (२) हरिपंत फडके (३) सखाराम बापू (४) अहिल्याबाई होळकर (५) मोरोबा दादा फडणीस.

५० ते ६० (१) दादासाहेब पेशवे (२) नाना फडणीस (३) गोपाळराव पटवर्धन (४) जिऊबादादा बक्षी.

४० ते ५० (१) पहिला बाजीराव (२) नानासाहेब पेशवे (३) परशुरामभाऊ पटवर्धन

३० ते ४० (१) चिमणाजीअप्पा (२) भाऊसाहेब पेशवे

२० ते ३० (१) सवाई माधवराव (२) पहिले माधवराव

अमरसिंग जाधवराव माळेगांवकर हा एकच पुरुष शंभर वर्षेंपर्यंत जगल्याचा मराठ्यांच्या इतिहासांत दाखला मिळतो. दुसऱ्या बाजीरावाखेरीज इतर सर्व पेशवे, स्वाऱ्या—शिकाऱ्या, मुलुखगिऱ्या इत्यादि प्रकारें उघड्या हवेंतील व्यायाम करीत असतांहि, पन्नाशीच्या आंतच निवर्तले. फक्त दुसऱ्या राव बाजींनीं सगळ्या पूर्वजांचें राज्य घालविलें आणि त्यांचे आयुष्य मात्र स्वतःला घेतलें!

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

किंबहुना थोडाबहुत तसा अभिमान वाळगण्यालाहि योग्य कारण असलें तरी, त्यांनीं स्वतःविषयीं एक शब्द उच्चारणेंहि अनुचित किंबहुना हास्यास्पद ठरेल. त्यांनीं खरो-खरच जर संस्थेची कांहीं सेवा केली असेल व लोकांना ती पटली असेल तर पुढची पिढी त्यांची आठवण का न ठेवील! किंवा यथाप्रसंग त्यांच्या-संबंधीं योग्य ते दोन शब्द कां न लिहील किंवा कां न बोलेल ! कृतज्ञता बुद्धीचा असा मक्ता कोणीहि आपणा एकट्याकडेच आहे असें मानूं नये. ती सर्व पिढ्यांना सारखीच वाटलेली असते. तसेंच एक पिढी जाऊन दुसरी तिच्या जागीं आली म्हणजेच, डोळे दिपविणारा संकुचित करणारा किंवा दृष्टि भ्रम उत्पन्न करणारा, फालतुक आडव्या तिडव्या ज्ञान किरणांचा व विकार किरणांचा, दोषी प्रकाश लुप्त होऊन, दुर्बिणींतून तेजोमय तारा किंवा शबल रूप ढग पाहावा व त्याचें यथार्थ वर्णन बिनचुक करतां यावें त्याप्रमाणें पुढच्या पिढीच्या विवेचक बुद्धींना व न्यायी मनांना गत पिढींतील मृत व्यक्तींच्या गुण दोषांची चर्चा बिनचूक, निदान निर्भ-यतेनें करितां येते. आम्ही तर असेंच समजतों कीं, हा ज्युबिलीचा अंक म्हणजे केसरीच्या हल्लींच्या सेवकांनीं कृतज्ञता बुद्धीच्या खांद्यावरून पूर्वीच्या सेवकांना वाह-ण्याची पालखी आहे. अर्थात् पालखी वाहावयाची ती वाहतांना पालखी वाहणारा स्वतःच पालखींत बसूं शकत नाहीं हें अगदीं उघड आहे.

ही दृष्टि चालवून आम्ही या अंकांत स्मृति–शेषभूत झालेल्या अशाच केसरी कार्यकर्त्यांचे विशेष उल्लेख केले आहेत. यामुळें वाचकांनीं, हे उल्लेख अपूर्ण वाटल्यास, त्याबद्दल सहृदयतेनें क्षमा करावी. विद्यमान सेवकांच्या यथार्थ असेल अशाहि स्तुतीला जर ही मर्यादा तर, पूर्वीं त्यांच्याबरोबर केसरीची सेवा केलेल्या पण पुढें त्यांच्याशीं मतभेद झालेल्या किंवा फुटून निघालेल्या किंवा त्याचे प्रतिपक्षी होऊन त्यांच्याशीं झगडणाऱ्या इतर गृहस्थांची निंदात्मक किंवा दोषात्मक चर्चा करून वाद उकरून काढण्याचें तर ज्युबिली अंक हें स्थळ नव्हेच नव्हे. तात्पर्य, हा विशेष आनंदाचा प्रसंग समजून, त्या आनंदाच्या दुधांत मिठाचा खडा पडेल असले कोणतेहि उल्लेख किंवा विधानें करणें योग्य नव्हे अशा बुद्धीनें, आम्ही त्यापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न केला आहे. केसरीसारख्या संस्थेचें चालकत्व टिळकांच्या पसंतीनें त्यांच्याच हयातींत आमच्या हातीं येणें व तें त्यांच्यानंतर दहा वर्षें टिकविणें या एका गोष्टीनेंच आमच्या टीकाकारांच्या सर्व टीकांचा सहज परिहार होणारा आहे. मग जीभ व्यर्थ विटाळण्याचें काय कारण ?

सन १९२० सालापर्यंत म्हणजे लो. टिळक हयात असेपर्यंत, त्यांचे मदतनीस किंवा सहकारी म्हणून ज्या इतर व्यक्तींनीं केसरी–मराठा संस्थेचें कांहीं कार्य केलें त्यांना त्याबद्दल स्वतंत्र श्रेय अर्थातच नाहीं. त्यांची स्फूर्ति स्वतंत्र नव्हती. पण त्यांच्या मृत्युनंतर दहा वर्षांनीं अजूनहि लो० टिळकांचीच स्मृति लोकांच्या मनांत असल्यामुळें, या दहावर्षांतील चालकांकडून केसरीचें जें कांहीं कार्य झालें असेल त्याबद्दलहि त्यांना फारसें श्रेय देतां येत नाहीं. सूर्य अस्ताला गेला व क्षितिजावर दिसेनासा झाला तरी, जो संध्याप्रकाश उरतो व ज्यांत माणसांना तोंडास तोंड दिसतें तो परिवर्तित असला तरी प्रकाश सूर्याचाच ! त्याप्रमाणें लोकांना टिळ-कांच्या केसरीची अद्यापि तोंडओळख उरली असली तरी ती टिळकांच्या स्मरणानें परिवर्तित केलेल्या त्याच तेजामुळें होय. ही गोष्ट निश्चित असल्यामुळें गेल्या दहा वर्षांतील केसरी संबंधानें स्वतः आम्हीं जसें कांहीं बोलूं शकत नाहीं, त्याप्रमाणेंच इतरांनीं त्याविषयीं कांहीं बोलण्यालाहि ती एक मर्यादाच आहे.

केसरी–मराठा यांची उत्पत्ति व वाढ

कै० चिपळूणकर, टिळक यांनीं न्यू इंग्लिश स्कूल स्थापून एक वर्ष होण्याच्या आंतच या संस्थेला दोन शाखा फोडण्याची कल्पना तिच्या चालकांच्या मनांत उत्पन्न झाली. पैकीं एक शाखा सरळ वर फुटणारी व एक बाजूस फुटणारी अशी होती. सरळ फुटणारी शाखा अर्थात शाळेचें कॉलेज होणें ही होय; व तेढी शाखा म्हणजे छापखाना व वर्तमानपत्रें ही होय. पैकीं पहिली कल्पना नैसर्गिक असली तरी तिला दृश्य स्वरूप येणें हें बऱ्याच अंशीं परावलंबी होतें. विद्यार्थी, शिक्षक, जागा यांपैकीं पुण्यास कोणत्याच गोष्टीची वाण पडण्याचें कारण नव्हतें. परंतु 'शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं' म्हणतात त्याप्रमाणें, कॉलेज काढणारे व त्यांत शिकणारे दोघेही तयार झाले तरी त्यांना परवानगी देणें हें युनिव्हर्सिटीच्या हातीं होतें. ती पुढें १८८४ सालीं मिळाली. दुसऱ्या कल्पनेच्या बाबतींत मात्र न्यू इंग्लिश स्कूलच्या तरुण चालकांना स्वतःच्या पायावर हवें तेव्हां उभें राहतां येण्यासारखें होतें. छापखाना किंवा वर्तमानपत्र या दोनहि गोष्टी त्या वेळीं महाराष्ट्रास अपरिचित नव्हत्या. खुद्द पुण्यास ज्ञानप्रकाश, किरण, शिवाजी, वगैरे छापखाने असून वरीलपैकींच दोन तीन नांवांचीं, व शिवाय ज्ञानचक्षु वगैरे इतर कांहीं वर्तमानपत्रें चालू होतीं. मुंबईसहि छापखाने वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें सुरूच होतीं. लिहिण्याची संवय व हौस यांच्या दृष्टीनें न्यू स्कूलच्या मंडळींत कांहीं कमतरता नव्हती.

स्वतः विष्णुशास्त्री हे यापूर्वी सहा वर्षें निबंधमाला मासिक पुस्तक काढीत असून, उत्कृष्ट वाङ्मयलेखक व मार्मिक टीकाकार या नात्यानें त्यांची कीर्ति कायमची प्रस्थापित होऊन राहिली होती. दुसरे नामजोशी, हे तर हौशी संपादक म्हणून यापूर्वी प्रसिद्धीस आल्यामुळेंच त्यांना या शाळेच्या संस्थेंत घेण्यांत आलें होतें. नामजोशी यांची हौस इतकी असे कीं, स्वतः ते आपलें वर्तमानपत्र तर लिहीतच, पण जरूर पडल्यास मजकूर कंपोज करून स्वतः वर्तमानपत्राच्या घड्या घालूनहि तयार करीत. कोणी असेंहि सांगतात कीं अंक वांटण्यास मनुष्य न मिळल्यास स्वतःच कित्येक वेळां पहाटें उठून पुण्यांतील वर्गणीदारांचे घरीं अंक टाकून सकाळीं उघडपणें मित्र-मंडळीच्या घरीं जाऊन "का आजचा अंक वाचलात कीं नाहीं !" असें म्हणण्या-पर्यंत त्यांची तयारी होती. पण ही प्रायः अतिशयोक्ति असावी. आगरकरांना लहानपणापासूनच लिहिण्याचा नाद असे. अगदीं लहानपणीं ते कऱ्हाडास असतां तेथील मुन्सफ, अमृत श्रीपत नागपूरकर, हे आपले घरीं रविवारच्या सभा भरवीत. त्यांत आगरकरांनीं एक दोन वेळ इतके चांगले निबंध वाचले होते कीं, ते या लहान मुलानें लिहिलेले असणें शक्य नाहीं, ते त्याला दुसऱ्या कोणा तरी प्रौढ विद्वानानें लिहून दिले असले पाहिजेत, अशी त्यांवर श्रोत्यांची टीका झाली म्हणतात. डेक्कन कॉलेजांत असतांना त्यांनीं मराठींत निबंध लिहून बक्षिसेंहि मिळविलीं होतीं. किंबहुना लिहिणें व शिकविणें या दोन व्यवसायांपैकीं लिहिण्याचा व्यवसायच त्यांना अधिक प्रिय होता असें म्हटलें तरी चालेल. पुढें वामनराव आपटे येऊन संस्थेस मिळाले त्यांना पुस्तकें लिहिण्याची हौस असल्यामुळें निदान छापखान्याच्या कल्पनेला तरी त्यांच्याकडून पूर्ण पाठिंबा मिळण्यासारखा होता. ते विद्वान् असल्याकारणानें वर्तमानपत्रें निघाल्यास त्यांत लिहिण्याची त्यांचें अंगीं पात्रता अर्थातच होती; आणि केसरी व मराठा सुरू झाल्याबरोबर मराठा पत्रांत लेख लिहिण्यास त्यांनीं सुरुवातहि केली. नाहीं म्हणावयास मांडी मोडून बसून हातांत लेखणी घेऊन लिहिण्याची मनांतून विशेष हौस नाहीं असें काय ते टिळकच. यामुळें छापखाना व वर्तमानपत्रें यांच्या कल्पनेचा उगम मूळ टिळकांच्या मनांत न होतां खरोखर तो नामजोशी व शास्त्रीबोवा यांच्या मनांतच झाला, व टिळकांनीं त्या कल्पनेला मागाहून संमति दिली हीच गोष्ट खरी आहे.

वामनराव आपटे शाळेस येऊन मिळाल्यानंतर दोन तीन महिन्यांनीं एक दिवस त्यांचे घरीं श्राद्धानिमित्त टिळक आगरकर वगैरे सर्व मंडळी भोजनास जमली असतां, त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत बराच खल होऊन केसरी व मराठा या नांवाचीं वर्तमानपत्रें जानेवारी १८८१ पासून काढण्याचें मुक्रर ठरलें. पण हीं दोन पत्रें नेहमीं कोणा दुसऱ्याच्या छापखान्यांत छापून काढणें शक्य नव्हतें. ज्यांचीं वर्तमानपत्रें त्यांचाच छापखाना असणें अधिक इष्ट, असा विचार ठरून ही मंडळी प्रथम छापखाना उभारण्याच्या प्रयत्नास लागली. छापखाना काढावयाचा म्हणजे भांडवल पाहिजे. पण याहि बाबतींत नामजोशांच्या कल्पनेचा धागाच उपयोगी पडला. तो असा. नामजोशांचें स्वतःचें वर्तमानपत्र ज्या 'किरण' छापखान्यांत निघत होतें, तो केशव बल्लाळ साठे नांवाच्या एका गृहस्थाकडे गहाण पडला होता. साठे यांनीं, त्यांच्या कबजांत आले-ल्या व त्यांना निरुपयोगी अशा, या छापखान्याचें सर्व अडगळ शनिवार पेठेंतील आप्पासाहेब मांडे यांच्या शिवाजी छापखान्यांत आणून टाकली होती. ही माहिती असल्यामुळें तेंच सामान विकत घ्यावें असें नामजोशी यांनीं सुचविलें व मंडळींतर्फे साठे यांच्याशीं बोलणें सुरू केलें. साठे यांचे चोवीसशें रुपये कर्ज देण्यास या तरुण मंडळीपैकीं कोणाजवळहि तेव्हां सामर्थ्य नव्हतें. पण उलट साठे हेहि धंदेवाईक छापखानेवाले नसल्यामुळें त्यांना देखील आपणाजवळ गहाण पडलेल्या लोखंडाचें ओझें जडच झालें होतें; व आपण परक्याच्या घरीं ठेविलेल्या छापखान्याच्या सामानाला हळु हळु पाय फुटूं लागले अशीहि शंका त्यांना आली होती. यामुळें हप्तेबंदीनें किंमतीची फेड पत्करून, साठे यांनीं तो छापखाना मंडळीकडून समाईक कर्जरोखा लिहून घेऊन त्यांना देऊं केला. हा सौदा ठरतांच मंडळीस मोठा आनंद झाला; व ही बातमी प्रसिद्ध होण्यापूर्वीच छापखान्याचें सामान एकदम त्याच्या नियोजित जागेंत म्हणजे मोरोबादादांचे वाड्यांत नेणें जरूर वाटल्यावरून, ही सर्व उलाढाल एका रात्रींत घडवून आणली गेली. या प्रसंगास उद्देशूनच लोकमान्य केव्हां केव्हां मौजेनें व अभिमानानें असें सांगत कीं " मी या खांद्यावरून आर्यभूषण प्रेसच्या टाइपांच्या पेट्या वाहून नेल्या आहेत. " आणि कारण पडलें असतां पुढेंहि स्वतः पायावर उभें राहून छापखा-न्यांतील यंत्र मोडण्याजोडण्याचें काम टिळक स्वतः करीत हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यांना वरील विधानांत अतिशयोक्ति असेल असा संशयहि येणार नाहीं.

अशा रीतीनें शाळेचें हें धाकटें पण अधिक प्रतापी भावंड, म्हणजे छापखाना' तिच्याच जोडीला मोरोबादादांचे वाड्यांत येऊन बसला, व 'आर्यभूषण' या नांवानें त्याचें डिक्लरेशन गणेश मोरेश्वर सोहोनी या गृहस्थाकडून करविण्यांत आलें. सोहोनी यांस मुंबईच्या जगदीश्वर छापखान्यांत असल्या कामाचा थोडाबहुत अनुभव आलेला होता व ते नामजोशांच्या पूर्वपरिचयाचेहि होते. म्हणून छापखान्याचे व्यवस्थापक या नात्यानें त्यांची नेमणूक करण्यांत आली. छापखान्यास पहिलेंच काम शास्त्रीबोवांच्या 'निबंधमाले'चें मिळालें. मालेचा साससटावा अंक हाच या छापखान्यांत छापलेला असा तिचा पहिला अंक असून, त्यांत केसरीचें उद्देश–पत्रक प्रसिद्ध झालें आहे. आर्यभूषण छापखान्यासंबंधानें निबंधमालेच्या ६ व्या वर्षांतील शेवटच्या अंकांत खालीलप्रमाणें उल्लेख आढळतो:—

"गेल्या वर्षीच्या उपसंहारांत सांगितलेला जो छापखाना तो हा होय. यांत पूर्वोक्त विद्यालयीन (न्यू इंग्लिश स्कूलची) मंडळीच भागीदार असून, त्यांच्या परि-श्रमांवर हेंहि आवाढव्य काम सुरू झालें आहे. आजपर्यंत इतर सर्व व्यापारांप्रमाणें छापखान्याचा उद्योगहि अविद्वान् व अडाणी लोकच प्रायः करीत आले आहेत. यामुळें अज्ञानध्वंसनाविषयीं केवळ वज्रच असें जें मुद्रणयंत्र त्याचा प्रभाव व्हावा तितका अद्याप प्रकट झाला नाहीं. तो झाला असतां, आज उघड माथ्यांनीं जे आपलें उन्नतत्व निर्भयपणें खुशाल मिरवीत आहेत अशा बिचाऱ्या कितीक मैनाकांस समुद्राच्या तळीं जाऊन दडून बसावें लागेल."

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शास्त्रीबोवांनीं दिलेला हा नडाखा व ही दहशत विचाऱ्या कोणत्या व्यक्तींस किंवा छापखानेवाल्यांस उद्देशून होती हें माहीत नाहीं. पण "आम्ही नव्या पिढीचे आंग्लविद्याविभूषित विद्वान लोक लाथ मारूं तेथें पाणी काढूं" अशी जी धमक शास्त्रीबुवांच्या प्रत्येक उद्गारांत व कृत्यांत असे तिचा मासला वरील उताऱ्यांत दिसून येतो. जॉनसन कांहीं बोलला किंवा त्यानें कांहीं लिहिलें तरी तें 'व्हेल माशाच्या हालचालीप्रमाणें जंगी प्रचंड प्रमाणांतच असावयाचें,' असें त्याच्या एका टीकाकारानें म्हटलें आहे. त्याचीच आठवण वरील उतारा वाचतांना आम्हांस झाली. नुसता एक नवा छापखाना सुरू केला हें सांगण्याचा प्रसंग, पण त्यांतहि समुद्र व मैनाक पर्वत असल्या उदात्त कल्पना! पण आर्यभूषण छापखाना हें अज्ञानध्वंसनाचें वज्र होणार अशी जी शास्त्रीबोवांची तेव्हां दृढ समजूत होती ती त्यांच्या कर्नेश्वारींनें खरी ठरली नाहीं असें कोण म्हणेल?

केसरीचें पहिलें प्रसिद्धीपत्रक

केसरीच्या पहिल्या प्रसिद्धी पत्रकासंबंधानें रा. सदाशिव विनायक बापट हे लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका या ग्रंथांत लिहितातः—

"लोकमान्यांच्या बरोबर आरंभापासून पुणें न्यू इंग्लिशस्कूलमध्यें शिक्षक असलेले लोकमान्यांचे स्नेही कै. हरिभाऊ आंबडेकर यांजकडे मी ता. २४ ऑगस्ट १९२० रोजीं लोकमान्यांच्या आठवणी मागण्याकरतां गेलों होतों. त्या वेळीं बोलतांबोलतां बऱ्याच जुन्या गोष्टी त्यांनीं सांगितल्या. नवीन काढावयाच्या वर्तमानपत्रांचीं नांवें काय ठेवावीं यासंबंधानें त्या वेळीं झालेला शास्त्रीबुवा टिळक वगैरे मंडळींचा मजेदार संवादहि त्यांनीं सांगितला. ते म्हणाले, "आपल्या मराठी पत्राचें नांव 'विक्रम' ठेवावें असें शास्त्रीबुवा म्हणाले. त्यावर 'केसरी' हें नांव अधिक बरें असें टिळकांनीं सुचविलें. व शास्त्रीबुवासहि तें पसंत पडलें. इंग्रजी पत्राचें नांव 'मराठा' च ठेवावयाचें असें मात्र शास्त्रीबुवानीं ठरविलें होतें. पुढें केसरीचें प्रसिद्धीपत्रक लिहिण्यास शास्त्रीबुवांनीं बळवंतरावास सांगितलें. पण टिळकांनीं आपण तें न लिहितां शास्त्रीबुवानींच लिहावें असा आग्रह धरला. नाहीं होय म्हणतां शेवटीं हें काम शास्त्रीबुवांनीं टिळकांचे गळ्यांत टाकलें. टिळकांनीं तें लिहिलें पण शास्त्रीबुवांनीं त्यांत बराच फरक केला. तें प्रथम मुंबईच्या 'नेटिव्ह ओपिनियन्' पत्रामध्यें प्रसिद्ध झालें."

केसरी

स्थितिं नो रे दध्याःक्षणमपि मदांधेक्षण सखे। गजश्रेणीनाथ त्वमिह जटिलायां वनभुवि।
असौ कुंभिभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा। गुरुग्रावग्रामःस्वपिति गिरिगर्भे हरिपतिः॥

जगन्नाथराय.

"वरील केसरी नांवाचें वर्तमानपत्र निव्वळ महाराष्ट्र भाषेंत येत्या १८८१ सालच्या आरंभापासून दर मंगळवारीं काढण्याचा विचार खालील मंडळींनें केला आहे. या पत्रांत इतरांच्या वर्तमानपत्राप्रमाणें बातम्या, राजकीय प्रकरणें, व्यापारासंबंधीं माहिती वगैरे नेहमीचे विषय तर येतीलच, पण याखेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथावर टीका वगैरे विषयांचाहि त्यांत समावेश केला जाईल. तसेंच विलायतेंत ज्या राज्य-प्रकरणांचा वाटाघाट होते ती इकडील लोकांस समजणें अवश्य असल्यामुळें त्यांचाहि सारांश रूपानें यांत संग्रह करण्याचा बेत केला आहे. आजपर्यंत वरील तीन विषयांवर म्हणजे देशस्थिति, देशभाषेंतील ग्रंथ, व विलायतेतील राजकारण, या विषयांच्यासंबंधानें जसें यथास्थित उद्घाटन व्हावयास पाहिजे होतें, तसें कोणत्याहि वर्तमानपत्रांतून झालें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. तर ही मोठी उणीव नाहींशी करून टाकण्याचें आम्हीं मनांत आणलें आहे.

वरील वर्तमानपत्रांत प्रत्येक विषयाचें विवेचन जें करावयाचें, तें केवळ निःपक्षपातबुद्धीनें व आम्हास जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें, असा आमचा कृतसंकल्प आहे. अलीकडे बादशाही अमलाच्या सुरवातीपासून तोंडपुजेपणाचा प्रकार बराच वाढत चालला आहे यांत संशय नाहीं. हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून देशाच्या हितास अपायकारक होय, हें कोणीहि प्रांजळ मनुष्य कबूल करील. तर सदरील पत्रांतील लेख त्यास ठेविलेल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें.

या पत्राचा सांचा 'सुबोध पत्रिके' सारखा धरण्यांत येईल. किंमतहि त्याच मानानें अगदीं थोडी ठेविली आहे. ती सालांना आगाऊ एक रुपाया दहा आणे इतकी आहे. मागाहूनचा दर मुदलींच ठेवला नाहीं. सरतेशेवटीं आमच्या आर्य बंधूंस एवढीच विज्ञापना करण्यांत येते कीं, त्यांनीं या लोकहिताच्या नवीन कृत्यास आपला उदार आश्रय द्यावा. तो जसजसा मिळेल तसतशी आम्हास उमेद येऊन, हें पत्करलेलें काम यथाशक्ति तडीस नेण्यास आम्हाकडून बिल्कुल कसूर होणार नाहीं.

विष्णु कृष्ण चिपळूणकर, बी. ए.,	बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल. एल. बी.
वामन शिवराम आपटे, एम्. ए.	गणेश कृष्ण गर्दे, एल्. एम्. अँड एस्.
गोपाळ गणेश आगरकर, बी. ए.	महादेव बल्लाळ नामजोशी.

या गृहस्थांपैकीं डॉ॰ गर्दे हे तेवढे केसरीच्या मालकांच्या भागीदारांत नव्हते. पण त्याऐवजीं छापखान्याचे म्यानेजर गणपतराव सोहोनी यांस भागीदारांत घेण्यांत आलें होतें. मालकांच्या कागदावर, म्हणजे त्यावेळीं अर्थात् साठे यांस दिलेल्या कर्जरोख्यावर, न्यू स्कूलच्या मंडळींच्या सह्या व्यक्तिशः होत्या; कारण तेव्हां शाळा ही सोसायटी म्हणून रजिस्टर केली नव्हती. पण वस्तुतः समाईकरीत्या न्यू इंग्लिश स्कूलकडेच हा छापखाना व हीं वर्तमानपत्रें यांची मालकी आहे अशी समजूत होती, व त्याप्रमाणें शाळेच्या उत्पन्नांतून या कारखान्यांना वेळोवेळीं पैसे दिले घेतले गेल्याचें आढळतें. किंबहुना या मालकीच्या जबाबदारीच्या कारणांमुळेंच पुढें इतर तंट्यांत भर पडून उभयतांची फारकत करावी लागली. डॉ. गर्दे हे भागीदारांत नसण्याचें कारण असें दिसतें कीं, त्यांना छापखान्याशीं कांहींएक संबंध ठेवावयाचा नव्हता; पण वर्तमानपत्रांत लिहिण्याला गर्दे यांचा उपयोग होईल अशी त्यांच्या बुद्धिमत्तेवरुन टिळक आगरकरांची समजूत झाली होती. उलट वर्तमानपत्रांचा आपणास उपयोग होईल असा गर्दे यांचा मात्र पक्का कयास असून त्याविषयींचा पुरावा जवळ जवळ केसरीच्या प्रारंभापासून मिळतो. गर्दे यांनीं केसरींत प्रारंभीं किंवा नंतर किती लेख लिहिले याची नक्की माहिती आम्हांस नाहीं. परंतु त्यांच्या औषधांच्या प्रशस्त जाहिराती जवळ जवळ पहिल्या अंकापासून केसरींत आढळतात. कित्येक वेळां तर खुद्द अंकाच्या आंतल्या बाजूस मजकुराच्या मागें पुढें या जाहिरातींना जागा न मिळाल्यामुळें, अकाएवढ्या पुरवणीवर केसरीचें मुख्य हेडिंग व त्या सालचा सर्व मायना घालून त्या जाहिरातींची प्रसिद्धी करण्यांत आलेली आढळते!

पहिल्या वर्षाच्या केसरीच्या अंकांत शास्त्रीबोवा, आगरकर व टिळक यांचे लेख सरमिसळ येत असत. वाङ्मयविषयक लेख चिपळूणकर लिहीत असत. इतिहास, अर्थशास्त्र व निवळ सामाजिक असल्या विषयांवरचे लेख आगरकर लिहीत. धर्मशास्त्र व कायदा या संबंधाचे लेख टिळकांचे असत. एखाद्या अग्रलेखाखेरीज शास्त्रीबोवा, व मुद्दाम आपणाकडे नेमून घेतलेल्या विषयाशिवाय टिळक, हे वर्तमानपत्राच्या इतर गोष्टींत फारसें मन घालीत नसत. किरकोळ लिहिणें आगरकरांकडे असावें असें दिसतें. कारण त्यांत त्यांचा विनोद, बिनसुर्वतखोरपणा व रोमँटिकपणाची लकेर, हीं दिसून येतात. नवनीतासंबंधांच्या लेखांत खालीलप्रमाणें वाक्य वाचलें कीं तो लेख शास्त्रीबोवांच्या हातचा हें कोणीहि सांगूं शकेल. उदाहरण, "ज्या बिचाऱ्या त्याच्या घोंगड्या कवीनें (तुकाराम) शिवाजीमहाराजांचा आदरसत्कार नाकारला त्याच्या कपाळीं दोन शतकांनंतर तीच संभावना द्वीपांतरवासी प्रभूंच्या हस्तें येऊन जयन्तीच्याप्रीत्यर्थ २४ तोंडे मोकळे करण्याचा संकल्प सुटला ही गोष्ट मनांत आली असतां, भर इंग्रजी राज्यांत किती मोंगलाई आहे, हें कोणाच्या मनांत बिंबल्यावांचून राहणार नाहीं"

केसरीच्या सातव्याच अंकांत 'बहिष्कार' या विषयावर लेख आलेला आहे. त्याच्या पांचपंचवीस ओळी वाचतांच तो लेख टिळकांचा असावा याविषयीं कोणाचीहि खात्री पटते. "बहिष्कार ही आपल्या शास्त्रकर्त्यांनीं कित्येक पातकांस शिक्षा म्हणून सांगितली असून, इंग्लिश ग्रंथकारांनीं शिक्षेचे जे दैविक, लौकिक व राजकीय असे त्रिविध भेद सांगितले आहेत त्यांतील मधल्यांत त्याचा अंतर्भाव होतो. त्यास जें धर्माचें स्वरूप आलें आहे तें केवळ आनुषंगिक होय, व आपल्यांत धर्म व कायदा यांचें धर्मग्रंथांतून एकाच ठिकाणीं विवेचन झाल्याकारणानें आपली अशी समजूत झाली आहे." असा हा आर्य व आंग्ल धर्मांचा आणि कायद्यांचा मेळ घातलेला पाहिला किंवा, "राजा कालस्य कारणम्" "स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः" असलीं संस्कृत वचनें आढळलीं, किंवा "पूर्वीच्या राजनीतींतहि फेरफार झाला पाहिजे," "भांडून घेतल्याखेरीज आतां कांहींएक मिळणार नाहीं," "राजकीय शिक्षा लोकमतावरच अवलंबून असते," "राजाज्ञेचा प्रभाव लोकमतावर कधींच पडत नाहीं"—असलीं तुटक व ठासलेलीं विधानें दृष्टीस पडलीं म्हणजे तो लेख टिळकांचा असें कोण म्हणणार नाहीं? "इंग्रजी पोप कवीनें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'कवितेचा ध्वनि कवितेच्या अर्थाचा प्रतिध्वनि असावा' म्हणजे अर्थाप्रमाणें भाषा चढत उतरत जावी,"—असला इंग्रजी कवितेचा हवाला लेखांत आला कीं हे टिळक खास नव्हेत, आगरकरच हें कोणीहि ओळखावें. "कुटुंबांत एकत्र राहणें चांगलें नाहीं" हा विचार शुद्ध आगरकरी. किंवा "पंधरा वर्षांपासून पोरें उत्पन्न करण्याचें काम सुरू होऊन चाळिसाव्या वर्षी देखील थांबेनासें झाल्यामुळें लोकसंख्या इतकी वाढली आहे कीं, एखाद्या पावसाळ्यांत वरुणमहाराजांनीं किंचित् करडी नजर केली कीं गरीब लोकांस पोटचीं पोरें किंवा आपलेच हातपाय चावून खाण्याचा प्रसंग येऊन ठेपतो, अशा वेळीं एकानें मर मर मरावें आणि बाकीच्यांनीं गले—लठ्ठाप्रमाणें बसून खावें हें ठीक दिसत नाहीं"—यांतील ग्राम्य शब्दरचना विष्णुशास्त्री किंवा टिळक यांचे लेखणींतून कधींहि निघणार नाहीं, तो विनोदी स्पष्टवक्तेपणा आगरकरांचाच असणार याविषयीं शंका कशाला!

याशिवाय वर्तमानसाराच्या सदराखालीं चमत्कारिक मथळे घालून अद्भुत किंवा शुष्क बातम्या दिल्या जात व त्यांत ग्राम्यपणाहि असे. यावरून मॅनेजर किंवा इतर कोणी अलबते-गलबते यांचाहि हात प्रारंभीं केसरींत शिरत असे असें दिसतें. "शाबास रामभटजी" "जर्मनींत रामभटजीबोवांचें उड्डाण" "हिंदुस्थानांत इंग्रजांची काय फें फें उडून गेली आहे" "एका माकडाच्या विलक्षण प्रेमाची गोष्ट" असले चुटके वाचून दुसरें अनुमानच निघत नाहीं. माधवराव नामजोशी हेहि "पुणें म्युनिसिपालिटी," "जकातीच्या तक्रारी" वगैरेंविषयीं लिहून स्थानिक राजकारण लोकांचे डोळ्यांपुढें ठेवीत असत. केसरीच्या चौथ्या अंकापासून कर्नाटकांतील बातमीपत्र छापण्यास सुरवात झाली होती. यावरून न्यू स्कूलच्या कीर्तीच्या डंक्यावरून भावी केसरी पत्राविषयीं परप्रांतांतीलहि लोक उत्सुक होऊन बसले होते असें दिसतें. पत्रें पाठविणारांस सूचना या सदराखालीं, मांत्रिकानें भुताशीं बोलावें त्याप्रमाणें, संपादक अदृश्य बातमीदाराशीं मनोरंजक संवाद करीत असल्याचेंहि मधून मधून आढळतें. नाट्य ललित वगैरे विषयांवर फार्सवजा संवाद एखादा दिसून येतो. हल्लीं टोचभर वाटणाऱ्या क्रीडाभुवनांतील ह्याविषयीं तेव्हां उत्तर-प्रत्युत्तर मोठ्या गंभीरपणानें चाललेलें पाहून मौज वाटते. नाटक विषयाला मज्जाव मुळींच नव्हता! उलट, 'आर्योद्धारक मंडळी'च्या

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नाट्यप्रयोगाविषयीं स्तुतिपर लेख आढळतात. या कंपनीच्या विरुद्ध, तसेंच शाळेंत होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाटक-प्रयोगाविरुध्द असणाऱ्या लेखांस "लिहून आलेला मजकूर" याहून अधिक मान्यतेची जागा दिलेली दिसत नाहीं. उलट प्रो. केरूनाना छत्रे, बाबा गोखले, दामोदर विद्याधर गोखले, शिवराम हरि साठे असल्या पुढारी लोकांच्या सहीवर आर्योद्धारक नाटक मंडळीचा अथेल्लोचा नाटकप्रयोग 'पुनः एकवार,' (हें थिएटरबाहेरील वन्स् मोअरच होय) होण्याविषयीं विनंतिपत्र पांचव्या पानावर केसरीच्या मथळ्याखालीं छापलेलें आढळतें. याच्या उलट आयर्लंडाची स्थिति वर्णन करतांना, "स्वातंत्र्यरूपी अमोलिक दक्षणा मिळण्यास नरमेध-यज्ञाशिवाय इतर लौकिक साधनें व्यर्थ होत, हा जो ऐतिहासिक सिद्धान्त त्यास बाध कोणी आणावा" असे स्पष्टोद्गार संपादकीय लेखांत आढळतात; त्यावरून या संपादक मंडळीचें मन ललितविषया-प्रमाणें गंभीर विचारांच्या विषयांतहि अनिरुद्धपणें वावरत होतें असें उघड दिसतें.

अशा प्रकारची 'संपादित' विषयांची, लेखनपद्धतींची व लेखक–स्वभावांची खिचडी या पहिल्या वर्षाच्या केसरींत दिसून येत असल्यामुळें, त्यावर निर्णायक असा कोणत्याहि विशिष्ट मताचा छाप अद्याप पडलेला नव्हता, व संपादकीय धोरणांत तर ती एक संयुक्त भांडवलाची कंपनी होती असेंच म्हणावें लागतें. अशा उद्योगात प्रारंभीं असें होणारच. पण दुसऱ्या–तिसऱ्या वर्षापासून हा प्रकार हळुहळु कमी होऊं लागला. १८८१ अखेर कोल्हापूरप्रकरणीं केसरींतून लेख येण्यास सुरुवात झाली होती व १८८२ च्या प्रारंभीं अब्रुनुकसानीचें प्रकरण कोर्टांतहि गेलें होतें. या प्रकरणीं टिळक व आगरकर यांजवर खटला झाल्यानें ते लेखकवर्गांतून कांहीं वेळ गळले. आपटे हे मराठ्यांतील अब्रुनुकसानकारक लेखांचे लेखक; पण टिळकांच्या डिक्लेरेशनमुळें ते निभावले. फक्त त्यांना अधिक लेख लिहून वरील दोघांची उणीव भरून काढावी लागली. खटला चालू असतां १८८२ च्या मार्चमध्यें विष्णुशास्त्रीहि वारले. यामुळें नामजोशी यांना केसरींत लिहिण्याचें काम अधिक पडूं लागलें.

केसरीचा आकार पहिल्या वर्षाच्या २६ अंकांपर्यंत बराच लहान म्हणजे डेमी चारपेजी होता, तो २७ व्यापासून रॉयल चारपेजी करण्यांत आला. या सालाचा केसरीचा ४० वा हा एकटाच अंक वरच्या प्रमाणाहून दुप्पट आकाराचा असा काढण्यांत आला. त्याच्या खुलाशादाखल संपादकांनीं वाचकांस स्फुटसूचनेंत असें कळविलें होतें कीं, "पुरवणी काढण्याऐवजी ऐनजिनसीं अंकच आम्हीं काढून पाहिला आहे." पण या स्फुट सूचनेची भाषा एखाद्या सुशिक्षित संपादकाच्या लेखणींतून उतरलेली नसून एखाद्या फाजील कारकुनानें लिहिलेली दिसते. या वर्षाच्या प्रारंभीं केसरीच्या प्रती सुमारें १८०० खपत होत्या, त्या कोल्हापूरप्रकरणाच्या दुमदुमीमुळें सप्टेंबरच्या सुमारास ३५०० जवळ जवळ खपूं लागल्या होत्या. हा खप पाहून व्यापारीहि जाहिराती घेऊन धावूं लागले. त्यांना नाहीं म्हणतां येईना, होय म्हणतां येईना! बातमीपत्रें लिहिणारे व मजकूर लिहून पाठविणारे 'पत्रांना कचऱ्याची टोपली दाखवूं नका' म्हणून विनवूं लागले. यामुळें केसरीचा आकार वाढवावा अशी इच्छा झाली. 'इंदुप्रकाशा'–एवढ्या आकाराचें निव्वळ मराठी पत्र अल्प म्हणजे अवघ्या एक रुपया किंमतींत देतां यावें अशी केसरीकारांची इच्छा. पण एकदम पुष्कळसा उदार आश्रय मिळाला तर तें होणार; व वाचक लोकांना तशी स्पष्ट सूचनाहि करण्यांत आली होती. पण एका आठवड्यांत हें सर्व स्वप्न एकदम अनुभवास कसें यावें! तात्पर्य हा धाडसी अंक नुसता नमुन्याचाच ठरून एकेचाळीसावा अंक फिरून जुन्या आकाराचा निघाला; व संपादकमहाराज, व्यवस्थापकमहाशय, तृषित वाचकमंडळ व जाहिरातेच्छु व्यापारी या सर्वांचे मनोरथ जागचे जागींच जिरले! यापुढें केसरीचा आकार १८८३ अखेरपर्यंत पूर्वींचाच राहिला, व १८८४ च्या जानेवारीपासून तो डबल क्राऊनइतका झाला. १८८४–८५ सालांत केसरीचा खप चार–साडेचार हजार प्रती इतका होऊं लागला, व आगरकर हे संपादक असत तोंपर्यंत ते हा आंकडा मोठ्या आढ्यतेनें केसरीच्या मुखपृष्ठावर छापीत!

परंतु या खपाच्या मानानें जमाखर्चाचीं तोंडें मिळून वर थोडा नफा उरावा तो मात्र उरत नसे. अगदीं प्रथम छापखान्यांत व वर्तमानपत्रांत तोटा येत असून न्यू स्कूलच्या पिशवींतून मधून मधून उसन्या रकमा आणाव्या लागत. 'मराठा' पत्र हें तेव्हां अर्थातच बुडींत खातें होतें; व संपादकांना मोबदल्याची अपेक्षा नव्हती तरी मराठ्याच्या कागदाचा खर्चच डोईजड वाटे. केसरीचा खप पुष्कळ परंतु वर्गणी थोडी. त्या वेळच्या ज्ञानप्रकाश, ज्ञानचक्षु, पुणेवैभव, शिवाजी यांसारख्या वर्तमानपत्रांचीहि वर्गणी केसरीच्या दुपटीहून अधिक होती. जाहिरातींचे दरहि तेव्हां म्हणण्यासारखे चढले नव्हते. सोळा ओळींपर्यंत एक रुपया व पुढें प्रत्येक ओळीस दीड आणा हा दर १८८३ च्या फेब्रुवारीपावेतों होता. येथून पुढें १० ओळींपावेतों रुपया हा दर करण्यांत आला. कोल्हापूरप्रकरणांतील खटल्यामुळें जास्त कमी खर्च येऊन कर्ज झालें होतें, व साठे यांच्या छापखान्यावरील कर्जाचे हप्ते वरेचसे थकत असत. शिवाय सोहोनी यांची व्यवस्था असावी तितकी काटकसरीची नव्हती. यामुळें टिळक आगरकर हे डोंगरी तुरुंगांतून १०१ दिवस कैद भोगून परत येऊन पाहतात तों, छापखाना व वर्तमानपत्रें यांचा कर्जबाजारीपणा हें एक नवीनच संकट त्यांच्यापुढें वाढून ठेवलेलें दिसलें. या संकटानें व कांहीं अंशीं खटल्याच्याहि दहशतीनें आपटे यांनीं आपण होऊन वर्तमानपत्रांचा संबंध सोडला. 'तीं तुमचीं तुम्हींच सांभाळा,' असें टिळकांना तुरुंगांतून येतांच पहिल्याच भेटींत त्यांनीं सांगितलें; व पुढें न्यू इंग्लिश स्कुलांतील भांडणांत वर्तमानपत्रांना संबंध येई तेव्हां, टिळक नामजोशी व केळकर यांविरुद्ध ते आगरकरांची बाजू घेत. तुरुंगांतून आल्यापासून टिळकांचें वर्तमानपत्रांतील लिहिणें होतें त्याहूनहि कमी झालें. त्यांच्या ऐवजीं वासुदेवराव केळकर लिहूं लागले; मराठ्यांत लिहिण्याचें काम नामजोशी यांनीं आपल्या हौसेनें आपणाकडे हळुहळु अधिकाधिक घेतलें; व आगरकरांचें केसरींतील लिहिणें अधिकाधिक फैलावल्यानें मुख्य संपादक तेच ठरले.

ता.२५ ऑक्टोबर१८८७ रोजीं टिळक हे आगरकरांऐवजीं केसरीचे प्रकाशक म्हणून जाहीर झाले. आगरकरांनीं केसरीचें प्रकाशकत्व सोडून दिलें तरी स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्याचा त्यांचा विचार एकदम ठरला नाहीं. पुढें कांहीं दिवस आगरकर हे लिहून आलेला मजकूर या सोयीच्या सदरांत केसरींत लेख लिहीत. अशा प्रकारची स्वतंत्रता लाभल्यावर त्यांच्या लेखांत निर्भीडपणा पूर्वींहूनहि अधिक विनटला यांत आश्चर्य नाहीं. पुढच्याच म्हणजे त्रेचाळिसाव्या अंकांत 'लिहून आलेला मजकूर' म्हणून "फीमेल हायस्कुलांतील शिक्षणक्रम" या मथळ्याखालीं केसरीच्या अग्रलेखाहूनहि मोठा असा आगरकरांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत सदर हायस्कुलांतील शिक्षणक्रमावर पूर्वी केसरींत ओळीनें जे चार टीकात्मक अग्रलेख आले होते, त्याला मोठें वक्तृत्वपूर्ण असें उत्तर दिलें आहे. या लेखांतील चारदोन वाक्यें कोठेंहि पाहिलीं कीं, 'अरे, नांव नसलें तरी ही आगरकरांची लेखणी' असें कोणीहि एकदम उद्गारल्यावांचून राहणार नाहीं. पुढील वर्षांत आगरकर यांनीं स्वतंत्रपणें 'सुधारक' हें वर्तमानपत्र काढलें. यापुढील त्यांचे वाद सुधारक व केसरी यांतून सुरू झाले. त्या वेळच्या छापखान्यांच्या कायद्याच्या उदासीन वृत्तीमुळें हल्लींप्रमाणें वर्तमान-पत्रांवर प्रकाशकाचें किंवा संपादकाचें नांव स्पष्टपणें लिहिण्याचें कारण नव्हतें. टिळक केसरीचे प्रकाशक झाले तरी पत्राच्या चौथ्या पानाच्या शेवटीं नेहमीं-प्रमाणें "आर्यभूषण छापखान्यांत मालकाकरितां छापून प्रसिद्ध केलें" एवढेच शब्द येत असत. ज्यानें ता. २५ चा अंक वाचला नाहीं त्याला टिळक हे केसरीचे प्रकाशक झाल्याची बातमी कर्णोपकर्णीं किंवा खुद्द केसरींतील अंतर्गत पुराव्यावरून मिळेपर्यंत अर्थातच थांबावें लागणार होतें. तथापि याच अंकापासून केसरीच्या दृश्य व जड स्वरूपांत एक फेरफार घडून आला. तो हा कीं, यापूर्वी अग्रलेख व स्फुट-सूचना यांपुरता ग्रेटप्रायमर म्हणजे किंचित् डगळ असा टाईप घालण्यांत येत होता; परंतु लिहावयाचें पुष्कळ व जागा थोडी असें भासूं लागल्यामुळें, वरील मजकुरालाहि पायका म्हणजे बारीक टाईप वापरण्यांत येऊं लागला. आर्यभूषण छापखान्याची स्वतःची टाईप फौंडरी होती; पण बारीक चांगल्या वळणाच्या टाइपाला लागणाऱ्या मेट्रिसा नव्हत्या. परंतु मुंबईच्या गणपत कृष्णाजी प्रेसच्या मालकांनीं आपल्याजवळील पायक्याच्या ठशांनीं, म्हणजे पंचांनीं नवीन मेट्रिसा तयार करून त्या आर्यभूषणला विकत दिल्या, व अशा रीतीनें आर्यभूषण छापखान्यांत लागेल तेव्हां हवा तितका पायका टाईप पाडण्याची व्यवस्था झाली. केसरीच्या वाचकांना ग्रेटप्रायमर टाईप वाचावयास अधिक सोयीचा असला तरी, बारीक टाईप घातल्यानें तेवढ्याच जागेंत थोडा अधिक मजकूर मावतो ही हौशी वाचक व हौशी लेखक या दोघांच्याहि दृष्टीनें सोयच झाली म्हणावयाची.

१८८७ सालीं टिळक हे केसरीचे कायदेशीर संपादक झाले तरी १८९१ पर्यंत केसरी त्यांच्या मालकीचा पूर्णपणें झाला नव्हता. आगरकर केसरींतून निघाल्यानंतर आर्यभूषण छापखाना आणि केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें मिळून संयुक्त कारखाना मानला जात असून वासुदेवराव केळकर, हरि नारायण गोखले, व स्वतः टिळक असे तीन संयुक्त भागीदार त्यांत होते. १८८८ ज्या सुमारास केसरीचे वर्गणीदार सुमारें पांच हजारांपर्यंत वाढले होते; व नुसत्या केसरीची प्राप्ति बरी होती. पण इंग्रजी पत्र मराठा हें प्रथमपासूनच आंतबट्ट्याचें मूळ होतें. शिवाय, छापखान्याचे टाईप व इतर सामान वरचेवर बाहेरून विकत आणण्यास खर्च पडे. याकरितां केसरीला स्वतःचें एक मशिन असावें, व स्वतःचे मालकीची टाईप फाउण्डरीहि असावी असें वाटूं लागलें. अर्थात् अधिक भांडवल म्हणजे अधिक कर्जाचा बोजा. शिवाय पूर्वी टिळक व वासुदेवराव केळकर यांचीं मतें जरी एक होतीं तरी १८९१ मध्यें 'रमाबाई' प्रकरणानें व इतर अनेक गोष्टींनीं उभयतांचीं मतें तंतोतंत जुळेनाशीं झालीं. आणि केसरींत मुख्यत्वेंकरून लिहिणार टिळक व मराठ्यांत मुख्यत्वेंकरून लिहिणार वासुदेवराव केळकर असें असल्यामुळें एकाच विषयावर केसरी व मराठा पत्रांत परस्पर विरुद्ध असेहि लेख मधून मधून येत असत. यामुळें हीं दोन पत्रें कोणाच्या तरी एकाच्याच मालकीचीं केलीं पाहिजेत हें उघड दिसून येऊं लागलें. इकडे हरिपंत गोखले हे निवळ छापखान्याच्या दृष्टीनें कारखान्याकडे पाहणारे. त्यांना मराठ्याच्या बुडित खात्याचें वैषम्य वाटूं लागलें. मिळून दोन्हि वर्तमानपत्रें कोणी तरी एकानें घ्यावीं व छापखाना एकानें किंवा इतर दोघांनीं मिळून घ्यावा असें ठरलें. गोखले वर्तमानपत्रें घेऊं शकतच नव्हते; व तो त्यांना छापखान्यावर बोजाच वाटे. तेव्हां ते छापखाना घेणार हें ठरलेंच. पण त्यांच्या जोडीला टिळक येणार किंवा प्रोफेसर केळकर येणार ही गोष्ट अद्यापि ठरावयाची होती. टिळकांप्रमाणेंच प्रो. केळकर हेहि राव्यसाची म्हणजे इंग्रजी व मराठी दोन्ही भाषा लिहिण्यांत वाकबगार आणि संपादकीय कामांत दर्दी व हौशी; यामुळें दोन्ही पत्रें घ्यावयाचीं तर टिळक व प्रो. केळकर हे दोघेहि तीं घेण्याला आपापल्या परीनें पुरे लायक! पण हाहि लढा सुटण्यास दोन कारणें होतीं. एक असें कीं, केळकर हे अद्यपि कॉलेजांत प्रोफेसरांचें काम करीत असून त्यांच्या संसारापुरता त्यांना पगार तिकडून मिळत होता. शिवाय कारखान्याचें धडेवांटप करण्यांत आलें तेव्हां, फायदेशीर, पण भांडवल वरचेवर थोडथोडें नवें घालावें लागणारा, छापखाना एका बाजूस, व आतबट्ट्यांत निघालेलें एकंदर तिसऱ्या हिस्स्याचें सात हजार कर्ज व दोनहि पत्रें मिळून दुसऱ्या बाजूस, अशी वांटणी झाली. शिवाय स्वमतप्रसाराची हौस ही जर स्वतंत्र गोष्ट म्हणून विचारांत घेतली तर वासुदेवराव केळकर यांच्यापेक्षां टिळकांच्या अंगीं ती अधिक होती ही गोष्ट निर्विवाद होय. तात्पर्य, वांटणी उचलतांना कर्जासह वर्तमानपत्रें उचलण्यास टिळकच पुढें आले; व १८९१ पासून तीं त्यांनीं आपल्या मालकीचीं केलीं. तथापि टिळकांना यापुढें कॉलेजाचा पगार चालू राहिला नाहीं; व कर्जफेडीकरितां न मराठ्याचा खर्च चालविण्या-

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करितां केसरींतील नफाहि कांहीं वर्षें परस्पर तोडून देणें भाग होतें. याकरितां दोन्ही वर्तमानपत्रांचा छपाईचा खर्च, मराठ्याच्या संपादकाचा पगार, केसरीच्या बटवड्याचा वगैरे सर्व खर्च, या गोष्टी या नफ्यांतून वजा करून कर्जफेड व्हावी म्हणून हें सर्व काम आर्यभूषण छापखान्याकडे म्हणजे गोखले यांजकडेच ठेवावें लागलें. कारण कर्ज फिटेपर्यंत टिळकांना स्वतंत्र छापखाना काढणें शक्य नव्हतें. उरला छापखाना, तो गोखले व केळकर यांनीं कर्जांच्या वांट्यासह समायिक मालकी हक्कानें घेतला; व टिळकांना आपल्या वर्तमानपत्रांचें कर्ज फेडण्यास पांच–सहा वर्षें तरी लागणारीं असल्यामुळें केसरीव्यतिरिक्त स्वतंत्र अशीं उपजीविकेचीं साधनें त्यांना अर्थातच पहावीं लागलीं.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीशीं वर्तमानपत्रांचा संबंध राहावा किंवा नाहीं हा वाद सुरु झाला तेव्हां आपटे हे हा संबंध तोडण्यास प्रथमच तयार झाले. व हा संबंध तोडूं नये असें म्हणणारांत टिळक, केळकर व नामजोशी हे प्रमुख होते. आगरकर हे वर्तमानपत्रांत लिहिण्याला हौशी, तथापि कारणपरत्वें सोसायटींतून वर्तमानपत्रांस पैसे देण्याला ते प्रतिकूल असत. तसेंच छापखाना व वर्तमानपत्रें चाललीं पाहिजेत खरीं पण तीं निदान निष्कर्जी तरी चाललीं पाहिजेत अशी त्यांची अपेक्षा असल्यामुळें, छापखान्यांत मंडळी बसून कर्जांच्या भानगडी निघाल्या म्हणजे त्यांचें पित्त खवळे. यामुळें, कांहींहि होवो पण वर्तमानपत्रें व छापखाना हीं जिवंत ठेवावींच अशा मताचे टिळक, केळकर व नामजोशी एवढेच उरले. आगरकरांनीं केसरींतून आपलें अंग काढून घेतल्यानंतर टिळक व वासुदेवराव केळकर यांची गट्टी वर्तमानपत्रांचे बाबतींत तरी पुढें तीनचार वर्षें कायम टिकली. सोसायटी व छापखाना–वर्तमानपत्रें यांची फारकत झाली तेव्हां छापखान्याला कर्ज होतें, व हें कर्ज टिळक व केळकर या दोघांनींहि पत्करून वर्तमानपत्रें चालू ठेवण्याचा निश्चय केला. ही फारकत होण्यापूर्वी सोसायटीतर्फे छापखान्यावर देखरेख ठेवण्याकरितां टिळकांचीच नेमणूक झाली व हें घडून आल्यावर अर्थात टिळकांची जबाबदारीहि अधिकच वाढली. केळकरांनीं पत्रें सांभाळावीं व टिळकांनीं छापखाना सांभाळावा असा एक प्रकरें आपसांतील समजुतीनें श्रमविभागच ठरल्यासारखा झाला होता; व ही वाढलेली जबाबदारी सांभाळण्याकरितां टिळकांना जुना व्यवस्थापक काढून नवा नेमावा लागला. जुनें व्यवस्थापक गणपतराव सोहोनी यांचा कारभार थोडा ढिला असे. त्यांनीं जमाखर्चांचीं तोंडें मिळतीं ठेवण्याची खबरदारी घ्यावयाची नाहीं, उधार वसुलीची हयगय करावयाची, खर्च मात्र हवा तसा चालू ठेवावयाचा, आणि कारखान्यांतील पगाराची तारीख आली म्हणजे टिळकांकडे जाऊन पैशाची कांहीं तरी सोय लावा म्हणून तगादा करावयाचा. अर्थात् ही जिकीर कोणासहि सोसण्यासारखी नव्हती. "आम्ही कोणी पैसा न घेतां वर्तमानपत्रांत लिहितों, व फुकट चालविलेल्या वर्तमानपत्रांसह एवढा छापखाना तुमच्या स्वाधीन केला असतां, फिरून पगाराकरितां लागणारें कर्ज उभारण्याची चिंता आम्हीच वहावी, ही कारभाराची रीत कोणती !" असें टिळक नेहमीं म्हणत. अखेर सोहोनी यांनीं व्यवस्थापकाचें काम सोडून दिलें व त्यांचे जागीं हरि नारायण गोखले यांची नेमणूक करण्यांत आली.

हरिपंत गोखले हे मूळ मुरुडगांवचे रहिवासी. त्यांनीं लहानपणापासून मुंबईस येऊन गणपत कृष्णाजी, नेटिव्ह ओपिनियन वगैरे छापखान्यांत कारकुनीचीं व इतर कामें केलेलीं होतीं. त्यांचा व टिळकांचा जुना स्नेहसंबंध, यामुळें टिळकांची त्यांना मदत असे. न्यू स्कूलांत आल्यावर वामनराव आपट्यांनीं आपलें संस्कृत गाईडचें पुस्तक बाहेर काढलें. तें मुंबईस हरिपंत गोखले यांनीं नेऊन आपल्या जबाबदारीवर छापलें. त्यावेळीं टिळकांनींच त्यांना सात आठशें रुपये कर्ज दिलें होतें व त्यांत गोखल्यांना फायदाहि झाला होता. गोखल्यांनीं इतर कांहीं पुस्तकेंहि अशींच छापविलीं होतीं. या माहितीमुळें, आर्यभूषण छापखान्याची व्यवस्था गोखले यांचे स्वाधीन केली असतां, आपल्या देखरेखीखालीं ती चांगली चालेल अशा समजुतीनें, टिळकांनीं गोखल्यांना पुण्यास आणून छापखाना त्यांचे स्वाधीन केला. गोखले यांचेजवळ घालण्यास भांडवल न क्तें, तथापि कर्जाचा हिस्सा पत्करण्यास ते तयार झाल्यामुळें त्यांना भागीदारींत घेण्यांत आलें; व टिळक, केळकर, गोखले असे तिघे मिळून छापखाना व दोन्हीं वर्तमानपत्रें यांचे मालक व त्याजवरील कर्जाला जबाबदार असें ठरून, छापखाना व वर्तमानपत्रें हीं निवळ खाजगी इस्टेट बनली. मात्र न्यू इंग्लिश स्कूलचा त्यांच्याशीं असलेला जुना परस्परसंबंध अगदींच तुटूं नये म्हणून तो वासुदेवराव केळकर यांच्या द्वारें शिल्लक ठेवण्यांत आला. तो असा कीं, केळकर हे मोबदल्याची अपेक्षा न ठेवतां दोन्ही वर्तमानपत्रें चालविणार त्याअर्थी कॉलेजांतील इतर प्रोफेसरांइतकाच त्यांनाहि पगार द्यावा, पण कॉलेजांत शिकविण्याचें काम त्यांना इतरांहून कमी ठेवावें. या व्यवस्थेस सोसायटीच्या सभासदांनीं संमति दिली. अशारीतीनें टिळक व वासुदेवराव केळकर यांची जूट सन १८९० पर्यंत टिकली. पण टिळकांनीं सोसायटीचा राजीनामा देऊन सार्वजनिक कार्यांत अधिक लक्ष घालण्याचें ठरविलें, तेव्हांपासून, छापखान्याप्रमाणें वर्तमानपत्राच्या अंतरंगाच्या व्यवस्थेंतहि अधिक लक्ष घालणें त्यांना प्राप्त झालें; व यामुळें या उभयतांच्या मतांमध्यें जी भेदरेषा लहानशी होती ती दिवसेंदिवस मोठी होऊं लागली किंवा निदान ती उभयतांना अधिकाधिक दृष्टोत्पत्तीस येऊं लागली.

त्याचा परिणाम असा झाला कीं, तीव्रमतभेदाचा पहिलाच प्रसंग आला त्याबरोबर उभयतांना व्यवहारांतील फारकत करून टाकावी असें वाटलें. हरिपंत गोखले आल्यानें छापखान्याची प्रगति झाली ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं; तथापि, छापखाना व पत्रें निष्कर्जी झालीं नाहींत. जुन्या फरफदीनें ओढत आलेलें कर्ज कांहीं शिल्लकच होतें. शिवाय हरिपंत गोखले यांना वर्तमानपत्रें हीं सावत्र मुलांप्रमाणें वाटत. आणि आढावा काढतां एकवीस हजार रुपयांचें कर्ज निघालें तें कोणी घ्यावें असा प्रश्न उपस्थित झाला. छापखाना व केसरी हीं दोन्हीं नफ्याचीं खातीं असल्यामुळें कर्ज दोघांवरहि वांटून जाण्यास हरकत नव्हती. त्याप्रमाणें छापखान्यावर चौदा हजार व वर्तमानपत्रांवर सात हजार याप्रमाणें कर्जाची वांटणी झाली. छापखाना व वर्तमानपत्रें यांची अशी वांटणी होण्याचें ठरल्यावर, एकानें वांटण्या केल्या म्हणजे हवी ती वांटणी उचलण्याचा हक्क दुसऱ्यास येतच असतो म्हणून प्रथम टिळक कर्जासह छापखाना घेण्यास तयार झाले. "वर्तमानपत्रें हींच जर निवळ नफ्याची बाजू असें तुम्ही म्हणतां तर तीं तुम्हीच घ्या व सातहजार रुपये कर्ज घ्या, मी छापखाना घेतों" असें टिळक म्हणूं लागले. पण गोखले व वासुदेवराव केळकर यांना पक्कें माहीत होतें कीं, टिळकांना निवळ छापखान्याची आवड नसून त्यांना खरी गोडी वर्तमानपत्रांची व या साध्याचें अवश्य साधन म्हणूनच त्यांना छापखाना हवा होता. तात्पर्य, टिळकांनीं छापखाना घेतला कीं ते स्वतःचीं वेगळीं वर्तमानपत्रें काढतील व ते तीं लोकप्रिय करतील याविषयीं शंका नसल्यामुळें, आपल्या हातचीं केसरी–मराठा वर्तमानपत्रें निस्तेज होतील व त्यामुळें त्यांचे उत्पन्नहि घटेल, असें पाहून गोखले व केळकर यांनीं एक नवीनच शर्त घातली कीं, छापखाना घेईल त्यानें स्वतःचीं वर्तमानपत्रें काढूं नयेत. या नव्या अटीनें पारडें एकदम फिरलें व टिळकांना सात हजार रुपयांच्या कर्जासह वर्तमानपत्रें स्वतःला घेऊन चौदा हजार कर्जासह छापखाना इतर भागीदारांस सोडून देणें प्राप्त झालें.

आर्यभूषण छापखाना व केसरी मराठा पत्र यांची फारकत

आर्यभूषण व केसरी-मराठा पत्रें यांच्या फारकतीची कल्पना वर सांगितल्याप्रमाणें नेटाला लागून फारकतीचा कागद तयार झाला. तारीख १३ सप्टेंबर १८९१ च्या मराठ्यांत वासुदेवराव केळकर यांनीं मराठा पत्राचें संपादकत्व सोडल्याचें जाहीर झालें, व केसरी व मराठा हीं पत्रें टिळकांच्या एकट्याच्या मालकीचीं झालीं. तथापि, हीं दोन पत्रें छापण्याला टिळकांच्याजवळ वेगळा छापखाना किंवा तो काढण्यास लागणारें भांडवलहि नव्हतें. यामुळें मालकीच्या दृष्टीनें आर्यभूषण छापखान्याचा संबंध सुटला तरी हीं पत्रें छापण्याचें काम या छापखान्यांत करणेंच प्राप्त होतें. या कामीं स्वतः टिळकांनीं घालून दिलेल्या व्यवस्थेच्या परंपरेचा फायदा पत्रें छापून निघण्याला, एक इकडची नवी काडी तिकडे न करितां, मिळण्यासारखा होता. दुसरें पक्षीं छापखान्यालाहि या दोन वर्तमानपत्रांचें काम भरपूर, कायमचें व टिकाऊ असें असल्यामुळें हवेंच होतें. गोखले व केळकर यांच्या कर्जाची फेड मुख्यतः वर्तमानपत्रांच्या नफ्यांतूनच व्हावयाची असल्यामुळें, या पत्रांचें काम व व्यवस्था ही गोखल्यांना देखील कर्जफेडीला एक प्रकारची आपल्या हातीं जामिनकी असेंच वाटण्यासारखें होतें. टिळकांनाहि वेगळें हर्पास मांडून केसरी-मराठ्याची व्यवस्था आपल्या हातीं घेणें सोईचें नव्हतें. ते घरचे एकटे, विश्वासु मदतगार कोणी नाहीं. भाचे धोंडोपंत विद्वांस हे शिक्षण अपुरें संपवून व्यवहारांत पडले, पण कर्ज काढून लातुरास कापूस वटण्याची गिरणी घातली त्या कामावर धोंडोपंतासारखा आपल्या विश्वासाचा मनुष्य नेमणें हें वर्तमानपत्राचे हिशेब ठेवण्यांत त्यांना गुंतविण्यापेक्षां अधिक इष्ट होतें. तात्पर्य, हीं सर्व कारणें एकवटल्यानें मामुलकीपुरती फारकत झाली तरी केसरी व मराठा हीं पत्रें पूर्वीप्रमाणेंच आर्यभूषण छापखान्यांत पुढेंहि छापत राहिलीं गेलीं. वर्तमानपत्रांच्या शेवटीं "हें पत्र पुणें येथें आर्यभूषण छापखान्याच्या मालकाकरितां छापून प्रसिद्ध केलें" या छापील ठशाच्या मायन्यांत एक अक्षरहि फेरबदल झाला नाहीं. मात्र हिशेबाच्या वह्यांतून फारकतीचा अंमल जमाखर्चांच्या रूपानें एकदां होऊन नवीन संबंधानुरूप कांहीं नवीन खातीं पडलीं इतकेंच कायतें. भावानें भावाच्या घरांत भाडें देऊन राहावें, तसा यापुढें आर्यभूषण छापखाना व हीं वर्तमानपत्रें यांचा संबंध उरला. हाहि संबंध पुढें सन १८९७ सालीं निम्माशिम्मा तुटला. १८८० सालीं केसरी व मराठा या पत्रांच्या उत्पत्तीची जी कल्पना न्यू इंग्लिश स्कूलच्या तरुण चालक मंडळींच्या मनांत झाली तिला दृश्य स्वरूप येऊन, तिच्या परिणतीबरोबरच तिजमध्यें विकार घडत आले, व इतर सर्व आद्य सहकारी लोकांचा संबंध सुटून या पत्रांचा संबंध अखेर एकट्या एका टिळकांकडे कसा आला हें येथवर संकलितपणानें सांगितलें. या पत्रांच्या संपादक वर्गांत पुढें अर्थातच नवे लोक आले. पण पैशाच्या दृष्टीनें मालकी, व धोरण ठरविण्याच्या दृष्टीनें पूर्ण अखत्यारी, ही टिळकांकडे १८९१ सालीं आली तेव्हांपासून ती त्यांच्या मृत्युकालापर्यंत तशीच अबाधित राहिली.

केसरी छापखान्याची व्यवस्था

आर्यभूषण प्रेस पुणें ता. १४-१०-१८९२

राजमान्य राजश्री बाळ गंगाधर टिळक केसरी व मराठा या पत्राचे मालक मुक्काम पुणें यांसीः—

सांष्टांग नमस्कार विनंति वि. आम्ही तुम्हापासून केसरी व मराठा हीं दोन वर्तमानपत्रें छापण्याचें व त्यांची व्यवस्था पाहाण्याचें काम ता. १-१-९२ पासून दोन वर्षें पावेतों खालील शर्तीवर मक्त्यानें घेतलें आहे.

१ दोन्हीं वर्तमानपत्रें छापणें, तीं वेळच्या वेळीं गांवांत वांटणें, बाहेर रवाना करणें, पत्ते वगैरे छापणें लावणें, वर्तमानपत्रास वगैरे कागदांचा पुरवठा करणें, वर्गणी व जाहिरातीबद्दल पत्रव्यवहार करणें, जाहिरातांचें ठराव करणें, व दर ठरविणें वगैरे, वर्गणीचा व जाहिरातींचा वसूल करणें, त्याचा हिशेब ठेवणें, आणि जाहिराती मिळविणें वगैरे सर्व कामें दोन्ही वर्तमानपत्रांबद्दलचीं आम्ही करूं. हिशेब स्वतंत्र ठेवूं पत्रकरार पुरा झाल्यावर तो आपल्या हवालीं करूं. मध्यंतरी हिशेब तुम्हास लागल्यास तुम्ही पाहावा.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

२. तुमच्याकडे दोन्ही पत्रांचा वेळच्या वेळीं मजकूर पुरविणें व त्यावद्दल ... करणें हें काम आहे, व त्याचा खर्च तुम्ही करावा. वाकी आजपर्यंत चालत आ... आहे तें सर्व काम व खर्च आम्ही करूं.

३ केसरी व मराठा पत्रांवर ७००० सात हजार रुपये कर्ज आहे त्याचें व्याज रक्कम रुपये ६००० सहा हजार रुपयांचें दरमहा दर शेंकडा ८८ आठ आणे-प्रमाणें व रक्कम रुपये १००० एक हजारचें दरमहा दर शेंकडा ८१० दहा आणेप्रमाणें मिळून एकूण व्याज ४३५ चारशें पस्तीस रुपये व कर्जापैकीं (मुद्दलापैकीं) १००० एक हजार आम्ही पहिले (सन १८९२ अखेर) वर्षी देऊं. व दुसरें वर्षी म्हणजे सन १८९३ अखेर रक्कम रुपये ६००० सहा हजारचें व्याज दरमहा दर शेंकडा ८८ आणेप्रमाणें तीनशेंसाठ रुपये व मुद्दलापैकीं एक हजार रुपये आम्ही देऊं. याशिवाय आगगांस दरवर्षी ९६० नऊशेंसाठ रुपये देणेचे ठरले आहेत ते दरमहा ८० रुपये-प्रमाणें देत जाऊं.

४ केसरीचा आकार डबल डेमीपर्यंत वाढला अगर ३०० तीनशेंपर्यंत वर्गणीदार कमी अथवा जास्त झाले तर हे करार कायम समजावे. आकार वाढला तर वर लिहिल्या शर्तींत दोघांच्या विचारें फेरफार करावा.

५. दोन वर्षांनंतर ह्या कराराप्रमाणें चालावयाचे नाहीं असें वाटल्यास त्याचा ठराव सन १८९३ सालीं आक्टोबर महिन्यांत करावा. म्हणजे सामान्यतः तीन महिन्यांच्या नोटिशीखेरीज एकमेकांनीं हा करार मोडूं नये.

६. करार मोडून कदाचित् हिशेब देणे घेणेचा प्रसंग आल्यास फक्त छपाई-बद्दल व टपाल रवाना करणेंबद्दल व गांवांत वांटणेंबद्दल १७५ एकशें पंचाहत्तर रुपये प्रमाणें आकार करावा.

७. वर्तमानपत्रांतील मजकुराबद्दल जबाबदारी आमच्यावर नाहीं. त्यासंबंधानें नुकसान व खर्च जो होईल तो तुम्ही सोसावा. मजकुराची कॉपी आम्ही तुम्हास परत करूं.

८. करार संपेल तेव्हां म्हणजे सन १८९३ डिसेंबर अखेर कराराचे दोन्ही सालांबद्दलची जी वर्गणी येणें राहील ती पुढील सहा महिन्यांत येईल. तेवढी तुम्ही आमची आम्हास वसूल करून द्यावी. करार संपण्यापूर्वी पुढील सालची जी वर्गणी येईल ती आम्ही तुम्हास देऊं. जाहिरातीबद्दल इनसरशनप्रमाणें तुटका हिशेब करून, करारापुढें जे पैसे आमचेकडे येतील ते आम्ही तुम्हास परत करूं. सदर कराराचे दोन वर्षांतील जाहिरातींच्या इनसरशनबद्दल जें आमचें येणें राहील तें करार संपल्यानंतर जें वसूल होईल तें आम्हास द्यावें.

येणेंप्रमाणें करारानें मक्ता घेतला आहे त्याप्रमाणें व्यवस्था ठेवूं. कळावें हे विनंति.

आपला

(सही) हरी नारायण गोखले

म्यानेजर, आर्यभूषण छापखाना.

१८९१ पासून १८९७ पर्यंत केसरी ऑफिस आर्यभूषण छापखान्यांतच असल्यामुळें टिळकांचे घरीं कारखाना असा कांहीं नव्हता. खटल्यानंतर केसरीचें ऑफीस स्वतंत्रपणें धोंडोपंत विद्वांस यांनीं प्रथम राहत्या घरीं म्हणजे विंचुरकरांच्या वाड्यांत सुरू केलें. पण विन्हाडांतील जागा या कामास अपुरी असल्यामुळें पुढें गायकवाड वाडा खरेदी होईपर्यंत सदाशिव पेठच्या हौदानजिक कोपऱ्यावरील राहत्या घरीं केसरीचें ऑफीस ठेवण्यांत आलें होतें. पण खुद्द केसरी छापण्याचें काम हातानेंच होत असल्या-मुळें केसरीची कचेरी लहानच होती संपादकमंडळापैकीं केळकर, खाडिलकर, मुख्य व्यवस्थापक धोंडोपंत विद्वांस व दोनतीन कारकून अशी लहानशीच ही कचेरी होती. कारणपरत्वें टिळक येथेंच येऊन केसरीचा मजकूर वगैरे सांगून लिहीत. पैशाअडक्याची व्यवस्था या वेळीं करण्यासारखी अशी फारशी नव्हती. यापूर्वी चित्रशाळा हीच टिळकांच्या बँकेचें म्हणजे बहुतेक सर्व देवघेवीचें काम करी. पण स्वतंत्र कचेरी व स्वतंत्र ऑफीस केल्यापासून हा व्यवहार इकडे सुरू झाला.

खटल्याचे वेळीं केसरीचे वर्गणीदार सुमारें सात हजार होते, ते खटल्यापासून वाढण्यास सुरवात झाली, व १८९९ अखेर हा आंकडा दहाअकरा हजारांपर्यंत गेला होता. मराठ्याचे वर्गणीदार एक हजाराच्या आंतबाहेर प्रथमपासूनच असत. ते कधीं फार वाढले नाहींत व कधीं फार कमीहि झाले नाहींत. केसरीची वर्गणी एक रुपया होती. मराठ्याची वर्गणी टपालहंशिलासह बाहेरगांवीं सवासात, शहरांत सहा रुपये सहा आणे व फुटकळ अंकास चार आणे अशी असल्यामुळें, आणि पत्र इंग्रजी असल्यामुळें, त्याचा प्रसार अर्थातच पुष्कळ कमी होता. पण केसरीचीं मतें परप्रांतांतून फैलावण्याकरितां केसरीचेंच एक बुडितखातें म्हणून टिळकांनीं केसरीला कर्ज असतांहि हें पत्र चालूं ठेविलें होतें, हें पूर्वी एका ठिकाणीं सांगितलेंच आहे. टिळकांच्या गैर-हजेरींत केळकर यांनीं मराठा, व केळकर आणि खाडिलकर यांनीं केसरी चालविला, टिकविला, व त्यांच्या लोकप्रियतेंत कमीपणा येऊं दिला नाहीं. यामुळें हे दोघेहि कायमचे मदतनीस म्हणून टिळकांनीं यापुढेंहि योजले. स्वतः टिळक व हे दोन मदतनीस एवढ्यांत मिळून हीं दोन्हीं पत्रें चालण्यासारखीं होतीं. १८९६ पासून १८९९ पर्यंत टिळकांना लॉ क्लासांत केळकर हे जोडीदार असत. पण १८९९ पासून पुढें लॉ क्लास प्लेगामुळें बंद झाला. तो फिरून उघडावयाचा नाहीं असें टिळकांनीं ठरविलें. नित्य नियमानें केसरीचें एखादें आर्टिकल लिहिणें व जरूरीप्रमाणें-मराठ्यांतहि एखादें आर्टिकल लिहिणें या गोष्टीला टिळकांना विशेष वेळ लागत नसे. त्यांचा अवांतर कामांतच यापेक्षां अधिक वेळ पुढें जाऊं लागला.

ता. ४ जुलै १८९९ पासून टिळकांनीं केसरी पुनः हातीं घेतला. १८९७ च्या सदतिसाव्या अंकापर्यंत केसरी टिळकांच्या नांवानें निघत होता. अडतिसाव्या अंका-पासून टिळक यांचें नांव त्यांच्या शिक्षेमुळें केसरीवरून निघालें होतें, तें १८९९ च्या सत्ताविसाव्या अंकावर फिरून केसरीवर दिसूं लागलें. दरम्यानचे केसरीचे ९१ अंक टिळकांच्या नांवाला अंतरले होते.

त्या वेळचा केसरी अवघ्या दहा कॉलमांचा असल्यामुळें व त्यांतच पत्रव्यव-हार, लिहून आलेला मजकूर, एखादा कारकुनानें काढून दिलेलें वर्तमानसार वगैरे मजकूर, व नव्या पुस्तकांच्या वगैरे महत्त्वाच्या जाहिराती समाविष्ट होत असल्यामुळें केसरी लिहिण्याचें काम टिळकांना एक दिवस-पुरे. रविवारीं आठ दिवसांच्या वर्तमान-पत्रांचा भारा घरीं येऊन पडला म्हणजे ते गरुड पक्ष्याच्या नजरेनें त्यांतील उपयुक्त मुद्दे तेवढे तेव्हांच निवडून काढीत, व काय चार कॉलम मजकूर लिहावयाचा असेल तो हाताशीं लेखक घेऊन एकदम लिहून टाकीत. प्रुफें वाचण्याचें कामहि रात्रीं अपरात्रीं उरकून जाई. अशा रीतीनें आठवड्यांतून कमींत कमी पांच दिवस त्यांना आपल्या इतर व्यवसायाला मोकळे मिळत. कधीं गांवीं जावयाचें असल्यास एखाद्या स्नेह्यावर किंवा वेळीं कारकुनावरहि केसरी सोंपवून जात. मग टेबलांत पडलेलें एखादें कोणाचें शिलकी आर्टिकल तो घाली, किंवा ठराविक स्नेह्यांपैकीं एखाद्याच्या खणपटीस बसून तें त्याजकडून लिहून घेववी. त्या काळीं बदली संपादकाचें काम बरेंच सोपें असे. आधीं वादग्रस्त काय तो एकच म्हणजे सामाजिक विषय. त्यावरहि कांहीं विशेष वाद चालू नसल्यास केसरींत सहसा लेख येत नसत, व तेवढा विषय वगळला म्हणजे राजकीय बाबतींत लिहिण्याला सगळें रान मोकळें. राजद्रोहाचें कलम तेव्हां बहुधा योगनिद्रेंत पडलेलें होतें. व आजकाल राजकीय चळवळींतील मतभेद सुईच्या अग्रासारखे तीक्ष्ण झालेले आहेत ते तेव्हां तसे झालेले नसल्यामुळें, कोणींहि कांहीं विषयावर लिहिलें तरी चाले. वाचकवर्गाची दृष्टि स्तिमित असल्यामुळें संपादकालाहि आपल्या अग्रलेखाची विशेष खारासुपी करण्याचें कारण नव्हतें. हेमंतव्याख्यान-मालेचे रिपोर्ट, स्पेन्सरमतप्रकाशन, विलायतचा किंवा उत्तर–हिंदुस्थानाचा प्रवास, तंट्या भिल्ल किंवा शहाजहान, बेगम यांचें चरित्र, असल्या अवांतर लेखांनीं केसरीच्या दहा कॉलमांतील निम्मी–अधिक जागा अडविली गेली तरी कोणास त्याचा विषाद वाटत नसे. तसेंच आजचा अग्रलेख आणि उद्यांचा अग्रलेख यांच्या भाषेंत महदंतर दिसून आलें तरी हल्लींप्रमाणें वाचकांत चिकित्साबुद्धि जागृत होत नसे. त्या वेळचा केसरी चालविणें हें टिळकांखेरीज इतरानांहि थोड्या मेहनतीचें काम असे; व एकाच वर्षांत आळीपाळीनें केसरीचे अनेक 'संपादक' होऊं शकत. तात्पर्य, टिळकांना तर हें काम फारच थोड्या वेळांत होण्यासारखें असून पूर्ण स्वतंत्रपणानेंहि करितां येण्यासारखें होतें. टिळक नेहमीं म्हणत कीं, मी केसरी आठवड्यांतून एक दिवस लिहितों खरा, पण त्या एका दिवशीं काय लिहावयाचें याचे विचार माझ्या डोक्यांत आठवडाभर घोळत असतात. अनेक उद्योग एकदम चालविण्याची पात्रता जरी त्यांच्या अंगीं असे, तरी त्यांचें बहुधा सगळें चित्त व्यग्र करून टाकणारा असा कांहीं तरी एखादा विशिष्ट उद्योग कोणत्याहि वेळीं त्यांच्या हातीं असे. यामुळें त्या वेळचा केसरी पाहिला असतां तो टिळकांनीं लिहिल्याची खूण म्हणजे एकादें चटक-दार आर्टिकल किंवा एकाच विषयावर लिहिलेलीं दोन तीन चरचरीत स्फुटें येवढच भाग त्यांत वाचनीय असावयाचा. लेख लिहिणें हें काम त्यांना न आवडणारें, असें तें प्रायः म्हणत. पण कोणत्याहि विषयावर त्यांचे विचार मनांत इतकी खळबळ करून सोडीत कीं, त्यांवर लेख लिहिणें हें श्रमाला कारणीभूत न होतां त्यापासून त्यांना उलट विरामच वाटत असे.

तारीख ७ जानेवारी १९०२ च्या केसरींत केसरीपत्राच्या स्वरूपात घडणाऱ्या क्रांतीची सूचना टिळकांनीं दिली होती. ही क्रांति म्हणजे केसरीचा आकार तोच ठेवावयाचा पण पानें दुप्पट करावयाचीं ही होय. या सालच्या पहिल्याच अंकापासून केसरी नव्या स्वरूपांत निघणार होता. परंतु छापखान्याच्या अडचणींमुळें ती गोष्ट घडूं शकली नाहीं. नवा केसरी प्रथम ता. ४ फेब्रुवारी रोजीं निघाला. आणि ११ फेब्रुवारीच्या अंकांत या क्रांतीला उद्देशून टिळकांनीं एक मोठा अग्रलेख लिहिला. त्यात ते म्हणतातः—" एकवीस वर्षांपूर्वी आम्ही दहा पाच मंडळी मिळून केसरीपत्र काढण्याचें ठरविलें. तेव्हांच्या व आतांच्या स्थितींत पुष्कळ फरक पडला आहे. एकविसाव्या वाढ दिवसाच्या प्रसंगीं आनंदापेक्षांहि जबाबदारीची जाणीवच अधिक होते. केसरी सुरू करण्याच्या वेळची सर्व सहकारी मंडळी नामशेष झाली. निवळ मराठी पत्र यशस्वी होईल कीं नाहीं याची १८८० च्या सुमारास लोकांना शंका वाटत असे. आणि दोन भाषेंत काढलेल्या पत्रांतील इंग्रजी मजकुराला लोक अधिक मान देत. वर्तमानपत्राची वर्गणीहि तेव्हां जास्त होती. केवळ मराठींतून पत्र चालविण्याचा प्रयत्नच तेव्हां व्हावा तितका झाला नव्हता. विष्णुशास्त्री यांनीं भाषेला विलक्षण तेज आणलें होतें. परंतु ते अद्याप मासिक पुस्तकच होतें. गेल्या वीस वर्षांत शिक्षण सर्वच बाजूंनीं वाढलें आहे. केसरीला प्रारंभीं ७०० पासून हजार वर्गणीदार होते. पुढच्या सालीं टपाल हंशील कमी झाल्यामुळें ती संख्या एकदम दुप्पट झाली. व १८८४ सालीं ही संख्या बेचाळीसशेवर येऊन ठेपली. यापुढें झालेल्या चळवळींमुळें १९०२ सालीं वर्गणीदारांची संख्या तेरा हजार झाली व वाचकांची संख्या सुमारें पाऊण लाखापर्यंत गेली. या काळांत केसरीबरोबर इतर कांहीं वर्तमानपत्रेंहि उदयाला आलीं. यावरून केसरीनें स्वतःची अभिवृद्धि केली इतकेंच नव्हे तर एकंदरीनें मराठी वर्तमान-पत्राच्या अभिवृद्धीला तो कारणीभूत झाला. वाचनाच्या अभिरुचीचा जो वृक्ष केसरीनें लावला त्याला अनेक फळें यावीं हें स्वाभाविक होतें. एकाच बागेंत निरनिराळीं फळझाडें व फुलझाडें होतात त्याचप्रमाणें ही गोष्ट आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

"केसरीची भूक वाढली त्याप्रमाणें त्याचे भक्ष्य पदार्थहि वाढले. १८८१ सालीं केसरींत मजकूर येत होता तो हल्लींच्या केसरीच्या पाव कालमाइतका असे. १८८४ सालीं आकार वाढला तेव्हांपासून त्यांतील मजकूर दुप्पट झाला. १८९१ सालीं केसरीची वर्गणी वाढवून आकार आणखी वाढवावा किंवा कसे हा प्रश्न उपस्थित झाला. पण वर्गणी तीच ठेवून टाईप लहान घालावा म्हणजे मजकूर अधिक वाढेल असें ठरलें. केसरीचें हें असें स्वरूप पुढें सुमारें अकरा वर्षें टिकलें. केसरीच्या स्वरूपांत क्रांति करण्याची जाहिरात दिली तेव्हां अनेकांनीं अनेक सूचना केल्या. त्यांत केसरी दररोजचा काढावा अशाहि सूचना होत्या. पण तो तसा केला असतां त्याची वर्गणी कमींत कमी बारा रुपयापासून पंधरा रुपयापर्यंत ठेवावी लागेल म्हणून ती सूचना केवळ अग्राह्य ठरली. किंमत वाढवून वर्गणीदार कमी झाले तरी नफा एकंदरीनें जास्ती होईल. पण खेडेगांवांतल्या लोकांनींहि केसरी घ्यावा व वाचावा अशी इच्छा व उद्देश असल्यामुळें वर्गणी वाढवून वाचकांची संख्या कमी करणें इष्ट नाहीं. वाचक तर कमी न व्हावे आणि केसरीची उपयुक्तता तर वाढावी या हेतूनेंच पूर्वीच्या सुधारणा झाल्या. केसरीची वर्गणी दीड रुपयाहि न ठेवतां एक रुपया ठेवावी अशाहि लोकांनीं सूचना केल्या. पण केसरी दुप्पट केल्यास नुसत्या कागदाचाच खर्च नऊ आणे येतो. बाकीचा खर्च सात आण्यांत झेपणें शक्य नाहीं. परदेशी गवताचा कागद केसरीला घालण्याचें कारण हेंच कीं त्याची किंमत कमी ठेवता यावी. बारीक टाईप ही गैरसोय देखील त्यांतल्यात्यांत वाचकाला अधिक मजकूर देण्याकरितां पत्करावी लागली. केसरीचा आकार मोठा करावा अशा काहींनीं सूचना केल्या. पण तसें करण्यांत छापखान्याची फार गैरसोय म्हणून मध्यम आकारच पसंत केला. केसरी छापण्याला यंत्र आणलें तें चार हजारावर वर्गणीदार झाले तेव्हां, पण वर्गणीदारांची संख्या हल्लीं वाढल्यामुळें त्या यंत्रानें भागत नाहीं. याकरितां एका दिवसांत वीसपासून चाळीस हजारपर्यंत प्रती ज्यावर निघतील असें एक नवीन यंत्र सध्यां आणविलें आहे व तें चालविण्याला तेलाचें एंजिन घेतलें आहे. याचे सहाय्यानें केसरीची एक बाजू दर तासीं तीन हजारप्रमाणें छापतां येते. ही व्यवस्था अपुरी पडेल तेव्हां आणखी नवें यंत्र आणूं. आंतील मजकुरासंबंधानें पाहतां जागेच्या अभावामुळें बातमी वर्तमान वगैरेसंबंधानें केसरीचें दुर्लक्ष झालें. पण यापुढें आकार दुप्पट वाढविल्यामुळें संपादकीय लेख वगैरेकिंचितहि कमी न करतां अवांतर पुष्कळशी माहिती केसरींत देता येईल. लायब्ररींतून वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वगैरे वाचून जी माहिती मिळेल ती वाढलेल्या दहा कॉलमांत देण्याचा विचार आहे. कांहीं ठिकाणीं बातमीदारहि ठेवण्याचा विचार आहे. केसरी हें कांहीं एका जिल्ह्याचें वर्तमानपत्र नव्हे. तरी सर्वसाधारण कोठेंहि गोष्टी घडतात त्या केसरींत देता याव्यात अशी योजना आहे. केसरींत मुळींच जाहिराती घालू नयेत अशा कांहींच्या सूचना होत्या. पण जाहिरात छापण्याचा खर्च भागून जी कसर उरते तिची मदत खर्चाला बरीच होते. जाहिरातींचे दर फार कमी नसले तरी जाहिरातवाल्यांना खर्चाचा मोबदला भरपूर मिळतो. कारण केसरीच्या प्रती खपतात इतक्या जाहिराती दर आठवड्याला काढून त्यांना इतक्या खर्चांत वाटता येणार नाहींत. जाहिरातींच्या उत्पन्नाच्या मदतीशिवाय केसरीचा आकार वाढविणें शक्य नव्हतें."

१८९८ सालीं तुरुंगांतून सुटून आल्यावर थोडी विश्रांति घेऊन ता. ३ जुलै १८९९ रोजीं टिळकांनीं केसरी आपल्या नांवानें हातीं घेतला. तो १९०८ सालीं त्यांना शिक्षा होईपर्यंत म्हणजे ता. २२ जुलै १९०८ पर्यंत त्यांचेच नांवावर सतत होता. ता. २८ जुलै १९०८ पासून केसरीवर संपादक कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचें नांव दाखल झालें. तें ता. ४ जानेवारी १९१० पर्यंत होतें. पुढील अंकापासून न. चिं. केळकर हे केसरीचे संपादक झाले. ते ता. १२ मार्च १९१८ पर्यंत संपादक होते. या सुमारास स्वराज्य-संघातर्फे शिष्टमंडळ विलायतेस जाण्याकरितां कोलंबोस निघालें तेव्हां ता. १९ मार्च १९१८ रोजीं फिरून केसरीचे संपादक म्हणून खाडिलकर यांचें नांव दाखल करण्यांत आलें. विलायतेची ही सफर पासपोर्ट न मिळाल्यामुळें कोलंबोहून परत फिरली व त्यानंतर केळकर १९१९ च्या एप्रिलअखेर विलायतेस जाईपर्यंत पुण्यासच होते. तथापि ते पुन्हा विलायतेस जाण्याकरितां निघण्याचा संभव होता, यामुळें खाडिलकर यांचेच हातीं केसरीचें संपादकत्व ठेवण्यांत आलें होतें. पण टिळक व केळकर हे विलायतेहून परत आल्यावर फिरून पूर्वीप्रमाणें तारीख २२ जून १९२० पासून केसरीचें संपादकत्व केळकरांकडे देण्यांत आलें. तात्पर्य, १९०८ सालीं टिळकांचें नांव केसरीवरून संपादक या नात्यानें निघालें तें कायमचेंच निघालें. तथापि पुढें अखेरपर्यंत टिळक केसरीवर देखरेख ठेवीत, इतकेंच नव्हे तर एखादे वेळीं केसरीकरितां लिहिलेले लेख तपासून देत, व त्यांनीं स्वतःहि वेळोवेळीं अनेक लेख केसरींत लिहिले आहेत. सन १९२० पासून १९२८ पर्यंत केळकर हे केसरीचे जबाबदार संपादक होते. या वर्षी केळकरांनीं कांहीं दिवस प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें व विश्रांतीच्या जरूरीमुळें रजा घेतली. तेव्हां त्यांचे जागीं रा. गजानन विश्वनाथ केतकर बी. ए. एलएल. बी. यांचें नांव केसरीचें डिक्लेरेशन करण्यांत आलें. पण फिरून १९२९ च्या पहिल्या आठवड्यांत केळकर यांनीं आपल्या नांवाचें डिक्लेरेशन केलें तें आजतागायतपर्यंत त्यांच्याच नांवचें आहे.

१८९१ च्या पूर्वी कांहीं वर्षें केसरीवर टिळकांचें नांव असलें तरी प्रत्यक्ष त्या पत्राची मालकी किंवा देखरेखहि त्यांच्याकडे नसे. पण १८९१ पासून १९२० पर्यंत, म्हणजे सुमारें २९ वर्षें, टिळकांचा केसरीशीं प्रत्यक्ष किंवा जिव्हाळ्याचा किंवा कर्मदृष्टीचा संबंध होता. या मुदतींत केसरीच्या स्वरूपांत अनेक स्थित्यंतरें झालीं. तशीच वर्गणी वगैरे इतर बाबतींतहि झालीं. १९०२ सालापासून टिळकांनीं केसरीचा आकार तोच ठेवून पानें दुप्पट केलीं. ही क्रांति पूर्वीच्या क्रांतीनंतर ११ वर्षांनीं घडून आली. १८९१ सालीं क्रांति झाली होती ती इतकीच कीं (वर्गणी तीच म्हणजे १ रु. १३ आ. ठेवून व पृष्ठसंख्या तीच म्हणजे बाहेरील दोन व आंतील दोन मिळून चार पानें इतकीच ठेवून) मोठ्या ऐवजीं लहान टाइप घातला, म्हणजे मजकूर वाढविला. पण १९०२ सालीं ही सुधारणाहि अपुरी ठरल्यानें, आकार व टाईप तोच ठेवून पानें दुप्पट वाढविलीं. त्यामुळें संपादकीय लेखाप्रमाणेंच लिहून आलेले लेख पत्रव्यवहार बातम्या बिनसंपादकीय लेख जाहिराती वगैरेंची पुष्कळच अधिक सोय झाली. पण इतका मजकूर वाढविल्यावर छपाईच्या व इतर खर्चाच्या दृष्टीनें वर्गणी वाढविणेंहि अवश्य होतें; म्हणून पूर्वीची वर्गणी १ रु. १३ आणे होती ती २ रु. ५ आ. करण्यात आली. १९०२ सालीं जो आकार व मजकुराची जी बांधणी टिळकांनीं निश्चित केली ती १९१२ पर्यंत तशीच चालू होती. या सुमारास प्रथम केळकर यांनीं केसरींत वाढत्या मजकुराच्या सोयीकरितां पुरवणी घालण्याला सुरुवात केली; व कर्मधर्मसंयोगानें ज्या वर्षी प्रेस ॲक्ट अमलांत आला त्याच वर्षी या पुरवणीलाहि सुरुवात झाली. मात्र ही पुरवणी कायमची किंवा वर्गणीदारांच्या हक्काची अशी समजली जात नसे. संपादकाच्या इच्छेप्रमाणें, म्हणजे मजकूर अधिक नसेल त्याप्रमाणें पुरवणी घालावी न घालावी असा क्रम सुरू होता. पण त्यांतल्यात्यांत पुरवणी न घालणें हा अपवाद होऊन बसला! महायुद्ध सुरू झाल्यानंतर बाजारकिंमती सर्वच बेसुमार वाढल्या. त्यांत कागदाची किंमतहि भडकली. त्यामुळें टिळकांना केसरीची वर्गणी पुन्हां वाढवावी लागली. ती ता. १ ऑक्टोबर १९१६ पासून २ रुपये १३ आणे करण्यांत आली. त्यानंतर तारीख १ जानेवारी १९१८ पासून ३ रुपये १३ आणे करण्यांत आली. आणि ती टिळकांच्या मृत्यूपर्यंत व त्यानंतरहि तशीच कायम राहिली. १३ आणे टपालहंशील हें केसरीच्या पहिल्या दिवसांपासून आजवर तसेंच कायम राहिलें आहे; पण वर्गणीच्या रकमेंत प्रथम एक रुपया, नंतर दीड रुपया, नंतर दोन रुपये, व नंतर तीन रुपये याप्रमाणें वाढ झाली. पण केसरींत मजकुराचीहि वाढ त्याच मानानें झाली म्हणून वाचकांनीं या तीनहि वाढीचें प्रमाण योग्य मानलें. याचें प्रत्यंतर हेंच कीं, वर्गणी वाढली असतांहि वर्गणीदारांची संख्या देखील वाढती राहिली. तारीख १ जानेवारी १९१८ पासून केसरीची वर्गणी ३ रुपये १३ आणे असतां, मध्यंतरीं प्रथम दोन पानांची, नंतर कांहीं दिवस चार पानांची पुरवणी घालण्यांत येऊन वाढत्या वर्गणीचा मोबदला वर्गणीदारांना देण्यांत आला. आणि त्यापुढें नुसती पुरवणीच नव्हे तर केसरीचीं पानेंहि बरोबर दुप्पट वाढवून, म्हणजे ८ चीं १६ करून, केसरी त्याच वर्गणींत ता. १ जानेवारी १९२५ पासून ग्राहकाना देण्यांत येऊं लागला. ही वाढ व सुधारणा टिळकांनाहि हवी होती, परंतु कागदाची भारी किंमत वगैरे अनेक कारणांनीं आपल्या हयातींत त्यांना ती करतां आली नाहीं.

१९०२ सालीं केसरीचा आकार वाढविला त्यापूर्वीच टिळकांनीं मोरोबा फडणिसांच्या वाड्यांत, आर्यभूषण प्रेसला लागून स्वतंत्र इमारत बांधून, नवें मोठें छापण्याचें यंत्र बसविलें होतें. पुढें १९०४ सालीं टिळकांनीं गायकवाडसरकाराकडून त्यांचा पुण्यांतील वाडा विकत घेतला. व १९०६ पासून छापखान्याचें काम, टाईप जुळविण्याचें काम, आणि केसरी-मराठ्याचे संपादक व व्यवस्थापक यांच्या कचेरीचें काम, तेथें सर्व एकत्र चालूं लागलें. टिळकांच्या हयातींत महायुद्धापासून केसरीच्या वर्गणीदारांची संख्या विशेष वाढूं लागली तेव्हां हें नवें यंत्रहि अपुरें पडूं लागलें. टिळक मंडालेहून परत आल्यापासूनच छापखान्याची अंतर्बाह्य सुधारणा करण्याचा विचार त्यांचे डोक्यांत एकसारखा घोळत होता. १९१४ च्या पत्रव्यवहारवरून असें दिसतें कीं या सालीं विलायतेंतील वॉकर कंपनीशीं पत्रव्यवहार करून टिळकांनीं आपल्या नव्या छापखान्याकरितां विजेचे दिवे लावण्याची योजना केली होती, व त्याकरितां मोटर डायनेमो बॅटरी ॲक्युम्युलेटर दिवे, तारा, लहानसे पंखे वगैरे सर्व आणविण्याचा बेत केला होता. फक्त इंजिन मात्र नवें न घेतां जुन्यावरच भागविण्याचा त्यांचा विचार होता. या सर्वाला सुमारें १५०० रुपये खर्च येणार होता. परंतु जुन्या इंजिननें काम पुरें पडणार नाहीं, आणि याकारणाकरितां जुने काढून टाकून नवें मोठें घ्यावयाचें तर आवांक्याबाहेर खर्च जाणार, असा एकंदर अंदाज झाल्यामुळें त्यावेळीं गायकवाडवाड्यांत व कारखान्यांत विजेचे दिवे लावण्याचा बेत रहित करण्यात आला. यानंतर चिरोल केसचा खर्च व वेळ खाणारे अनेक इतर उद्योग निघाल्यामुळें नवीन छपाईचें यंत्र घेऊन बसविण्याची टिळकांची कल्पना तशीच राहिली. पण टिळक विलायतेस गेल्यावर अनायासेंच ती त्याना फलद्रूप करतां आली. त्याप्रमाणें तेथें समक्ष पाहून त्यानीं नव्य प्रकारचें एक छपाईचें यंत्र सुमारें २०००० रु. किंमतीचें विकत घेतलें. या यंत्राचें वर्णन टिळकांनीं स्वदस्तुरचें पत्र धोंडोपंत विद्वांस यांना लिहून त्यांत दिलें आहे तें खालीलप्रमाणें:—

"आतां जें मशीन घेणार तें सुटे कागद छापखाण्याचें नाहीं. कागदाची वाटोळी गुंडाळी (रीळ) लावून दर तासांस ६००० कॉपी (८ पानें एकदम) छापून व घड्या पाडून तयार होतील असें मशीन आहे. तसेंच सुट्या टाइपाचा उपयोग न करता स्टिरिओ दर पेजास एक याप्रमाणें तयार करून, आठ स्टिरिओ करून छापावे लागेल. स्टिरिओची मशीनरी मशीन बरोबरच विकत घेतलेली आहे. मशीन रवाना झालें म्हणजे कागदाचे रोलरना ऑर्डर देतो. मशीन सेकंड हँड आहे. पण अगदीं नव्यासारखें असून ज्या कंपनीनें मशीन तयार केलें त्याच कंपनीनें तें सर्व तपासून नीट केलें आहे, करितां काळजी नाहीं.

"हल्लीं केसरीचा आकार ४५-३० आहे. पण या मशीनवर ४०-३० पासून ४०-६० पर्यंत (म्हणजे क्रॉड सब रॉयल किंवा क्रॉड रॉयल) कागद छापला जाईल.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

"मशीन सुमारें १२ फूट लांब ९ फूट रुंद व फक्त ६ फूट उंच आहे म्हणजे आटोपशीर आहे. खालीं खड्डा खणण्याची जरूर नाहीं.

"हें मशीन चालविण्यास ऑईल इंजिन दहा हॉर्स पॉवरचें लागेल. सध्याचें चालणार नाहीं. नवें घेतलें पाहिजे. रा. पारखी यास विचारून तिकडे दहा हॉर्स पॉवरचे इंजिन मिळेल कां नाहीं व केवढ्यास मिळेल तें उत्तरीं कळवावें. नसल्यास येथें विकत घेऊं.

"आतां फक्त एक लहान मशीन मराठ्याकरितां व लिनो अगर मोनो टाइप घेणें आहे. चौकशींत आहे.

"१९०१ सालीं ट्रूफीडर घेऊन त्याप्रमाणें आज १८-१९ वर्षें काम चाललें तद्वतच यापुढें वीसपंचवीस वर्षें पूर्ण उपयोगाला येईल असें हल्लींचें मशीन आहे. आठी पेज एकदम छापून व घड्या पाडून तासास ६ हजार प्रती डझनावर मोजून बाहेर पडतील. पुढें केसरी आठवड्यांतून दोनदां किंवा तीनदां निघाला तरी दुसरें मशीन घ्यावयास नको. हल्लींचा केसरी म्हणजे ३२००० प्रती ६ तासांत सर्व छापून होतील. रात्रीं बारा वाजतां सुरू केलें कीं, दोन्ही फर्में एकदम छापून व घड्या पडून सकाळला तयार !"

या पत्रांत उल्लेखिल्याप्रमाणें मराठ्याकरितां स्वतंत्र लहानसें छपाईचें यंत्र १९१९ सालीं घेण्यांत आलें व हल्लीं मराठा त्यावरच छापण्यांत येतो. १९१४ च्या संकल्पाप्रमाणें केसरी छापखाना व केसरी यांच्याकरतां ऑईलइंजिनला डायनेमो जोडून विजेचे दिवे लावण्याची व्यवस्था १९२२ पासून करण्यांत आलेली आहे. लायनो टाइपवर केसरीचे टाइप जुळविण्याची व्यवस्था ही मात्र परतंत्र असल्यामुळें ती टिळकांना आपल्या हयातींत अमलांत आणतां आली नाहीं. व त्यापुढेंहि ती आजवर अमलांत आलेली नाहीं. तथापि लायनो टाइपवर केसरी निघावयाचा तर त्याला आधीं त्या यंत्रांवर बसवितां येतील असें अखंड टाइप बनवावे लागणार; व असे टाइप आपण करून दिले तरच विलायतचे कारखानदार ते स्वीकारून लायनो टाइप बनवून देणार, म्हणून टिळकांनीच आपल्या कारखान्यांत हे अखंड टाइप तयार केले. ही योजना टिळकांच्या मनांत १९०६ सालापासून घोळत होती व त्यांच्या अखंड टाइपांचा एक संपूर्ण संच त्याच सालीं तयार झाला. फिरून त्याची सुधारणा १९१४ सालीं त्यांच्याच देखरेखीखालीं झाली. आणि त्यानंतर त्यांत आणखी सुधारणा १९२६ पासून सुरू आहे. या अखंड टाइपांत कंपोज केलेला मजकूर केसरींत वेळोवेळीं देण्यांत येत असतो ही गोष्ट त्या टाइपांचें वळण व इतर टाइपांचे वळण यांतील फरकावरून वाचकांच्या लक्षांत आलीच आहे. या टाइपांतील सुधारणा पूर्ण झाली म्हणजे पुढेंमागें कदाचित् तोच टाइप सर्वच केसरीकरतां वापरण्याचा विचार आहे. आणि वाचकांच्या दृष्टीनें तो रूढ झाला म्हणजे तोच लायनो टाइप यंत्रावर बसवून घेण्याची योजना होईल. वर दिलेल्या टिळकांच्या पत्रांत असें लिहिलें आहे कीं, "पुढें केसरी आठवड्यांतून दोनदां किंवा तीनदां निघाला तरी दुसरें मशीन घ्यावयास नको." वरील शब्दांत जी सुधारणा सुचविली आहे तिजपैकीं केसरी आठवड्यांतून दोनदां काढण्याची योजना फलद्रूप झालीच आहे.

केसरींतील मजकुराची मांडणी

केसरी हा १९२९ च्या ऑगस्ट महिन्यापासून आठवड्यांतून दोन वेळां निघूं लागला. त्यापूर्वी तो आठवड्यांतून एकच वेळ निघत असे. दोनवेळां निघणाऱ्या केसरीच्या प्रत्येक अंकांत कमींत कमी १२ पानें असतात. पण मधून मधून एखादा अंक १६ पानांहि निघतो. (१९२८–२९ सालीं १६ पानांचे अंक बरेच निघाले.) दर आठवड्यास जाहिराती सोडून इतर मजकूर ३०–४०कॉलम म्हटला तर तो एकदोघांकडून लिहून होणें मुळींच शक्य नाहीं. आणि हल्लींचा केसरी पाहिला तर त्यांत कमींत कमी दहा माणसांचे हात उपयोगांत आणलेले असतात. मग ते बातमीदार म्हणून, किंवा हौशी लेखक म्हणून, किंवा अर्धे कारकून अर्धे उपसंपादक म्हणून, किंवा पुरे उपसंपादक म्हणून, किंवा सहकारी संपादक म्हणून, किंवा मुख्य संपादक म्हणून असोत. केसरी-मराठा मिळून कायमच्या संपादक-उपसंपादकांत हल्लीं आठ दहा लोक आहेत. यामुळें त्या सर्वांना मिळून 'संपादकमंडळ' असें नांव देतां येण्यासारखें आहे. परंतु याच्यामागें गेलें असतां या मंडळांत तीन व त्यापूर्वी दोनच लोकांचा समावेश होत असे. आणि १८९८ च्यापूर्वी तर केसरीचें संपादकमंडळ म्हणजे तो फक्त एकखांबी तंबू होता. मुख्य मजकूर म्हणजे आर्टिकल व स्फुटें हा प्रायः एकटे लो. टिळक स्वतःच लिहीत. मदतनिसांचा उपयोग त्याजकडे ठराविक दिलेलें कायमचें काम करण्याकरितां नसे, फक्त अडीअडचणीच्या केळीं मुख्य संपादक हजर नसेल, किंवा हजर असून अधिक महत्वाच्या कामांत गुंतून गेला असेल, तरच त्याचा उपयोग व्हावयाचा.

विलायतेंतलें एखादें मोठें दैनिक वर्तमानपत्र घेतलें तर त्याचा कारखाना एखाद्या गिरणीसारखा म्हणजे शेंकडो मनुष्यांनीं गजबजलेला आढळतो. कित्येक वर्तमानपत्रें सर्वच गोष्टींत स्वावलंबी आहेत. म्हणजे त्यांच्या एकरोगणती कार्यक्षेत्राच्या एका टोंकाला त्यांचा कागद तयार करण्यास लागणारी गवताचीं कुरणें, तर दुसऱ्या टोंकास तिकिटांवर छाप मारून गठ्ठे बांधून तीं मोटारींत भरणारीं यंत्रें ! अशा रीतीनें वर्तमानपत्राला लागणाऱ्या सर्व अंगोपांगांचें कार्य एकाच कारखान्यांत होत असतें. हिंदुस्थानांत देशी काय, विदेशी काय, कोणत्याहि पत्राचा खप २५ किंवा जास्तींत जास्त ३५ हजारांवर सहसा जात नाहीं; यामुळें उपांगभूत असे अनेक कारखाने एकत्र चालविण्याचें कारण नाहीं. किंबहुना तें परवडणारहि नाहीं.

केसरी कचेरींत, किंवा केसरी कचेरीबाहेर पण केसरी कचेरीकरितां, काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या कामगारांची संख्या अजून केव्हांहि पन्नाससाठांवर गेली नाहीं. याचें कारण असें कीं, केसरीचा खप पुष्कळ असला तरी तें दैनिक पत्र नाहीं. केसरी—मराठा संस्थेचा स्वतःचा छापखाना असला तरी त्यांत वर्तमानपत्रांशिवाय छापखान्याचें इतर काम म्हणून कोणतेंहि केलें जात नाहीं. इतर कित्येक ठिकाणीं वर्तमानपत्रें हीं छापखान्याला गरज म्हणून काढलेलीं असतात; पण केसरी–संस्थेंतील छापखाना हा फक्त वर्तमानपत्रांना गरज म्हणूनच ठेविलेला आहे. दूरदृष्टीनें मनांत आणल्यास उपांगभूत म्हणून या छापखान्याचें काम वाटेल तितकें वाढवितां येईल. परंतु तूर्त वर्तमानपत्रें चालविण्यापेक्षां अधिक व्याप वाढविण्याचा दृष्टांचा विचार नाहीं. झालेंच तर टाईप फौंडरीचें काम कदाचित् अधिक वाढविण्यांत येईल. कारण या फौंडरींत तयार झालेला लो. टिळकांच्या योजनेचा अखंड टाइप आतां बहुतेक पूर्णावस्थेंत आलेला आहे. पुढेंमागें लवकर तोच टाईप केसरीकडे सर्रास उपयोगांत आणतां येईल. व तो हल्लींच्या टाइपापेक्षां थोडा अधिक ढगळ असल्यामुळें त्यांत वाचकांच्या डोळ्याची अधिक सोय होण्यासारखी आहे. आणि सर्व केसरी अखंड टाइपांत निघूं लागल्यावर हा टाईप अधिक प्रसृत व्हावा, म्हणून कदाचित् फौंडरींत तो अधिक पाडून विकावयासहि ठेवण्यांत येईल.

केसरीचीं हल्लींचीं अंगें सामान्यतः खालील आहेत—

१ अग्रलेख.	६ बातमीपत्रें.
२ संपादकीय स्फुट सूचना.	७ वर्तमानसार
३ स्फुट विचारात्मक प्रासंगिक बोल.	८ बाजारभाव.
४ विशिष्ट विषयावरील लिहून आलेले लेख.	९ किरकोळ.
५ उतारे सारांश इ० किंवा अवांतर मजकूर.	१० कविता.

अग्रलेख हे प्रायः संपादकमंडळापैकीं मुख्य संपादक किंवा सहकारी संपादक हेच लिहितात. या मंडळांत नसलेल्या गृहस्थानें लिहिलेला असा अग्रलेख शंभरांतहि एखादा मिळणार नाहीं. दैनिक पत्रांची गोष्ट थोडी वेगळी असते. मुंबईचा टाइम्स किंवा लंडनचीं मोठीं पत्रें घेतल्यास तेथें संपादक तर स्वतः कांहींच लिहीत नाहीं, फक्त देखरेख करतो, व हवें तें हवें तसें योग्य माणसांकडून लिहून घेतो. घरचे म्हणून केवळ अग्रलेख लिहिणारे ठराविक लेखक पगारी नेमलेलेच असतात. तथापि दैनिक पत्रांना उभ्या वर्षांत सुमारें पांचसातशें तरी विषयांवर संपादकीय मुख्य किंवा दुय्यम लेख लिहावे लागतात म्हणून, बाहेरच्या तज्ज्ञ लोकांकडूनहि लिहून घेतलेले लेख अग्रलेखांच्या सदराखालीं पुष्कळच येतात. आतां संपादक म्हटला म्हणजे त्यानें सर्वज्ञ असल्याचा आत्मविश्वास ठेवावा हें म्हणणें ठीक आहे. कारण आत्मविश्वासाशिवाय वर्तमानपत्राचें धोरण त्याला निश्चित किंवा टिकाऊ असें ठेवितां येणार नाहीं. तथापि धोरण एकच राहिलें तरी विषयपरत्वें विवेचन वेगवेगळ्या प्रकारें होऊं शकतें. आणि लोकांचें मनोरंजन व्हावें, त्यांना कांहीं नवीन माहिती व निश्चित बोध मिळावा, असें असेल तर तें काम त्याच विषयांत रंगलेल्या–दंगलेल्या माणसांकडून जसें होईल, तसें कोणाहि एकट्या लेखकाकडून तें होणार नाहीं. मग तो कितीहि बुद्धिमान् अष्टपैलू असो. विषय विविध असावे, आणि प्रत्येक विषयावरील लेख वाचतांना निष्णात वाचकांनाहि वाटावें कीं, आपल्यांतलाच कोणी जाणता विवेचक हें लिहीत आहे. असें असेल तर निरनिराळ्या माणसांकडून लेख लिहविल्याशिवाय गत्यंतर नसतें. परंतु केसरी हें पत्र मुख्यतः राजकारणाला वाहिलेलें असल्यामुळें इतर विषयांवरचे अग्रलेख त्यांत फार क्वचित येतात. यामुळें अग्रलेख लिहिण्याचें काम दोघांचौघांपलीकडे सहसा जात नाहीं, व जाण्याचें कारणहि नाहीं.

संपादकीय स्फुट सूचनांचीहि गोष्ट अशीच. अग्रलेखापेक्षां त्यांत विविधता अधिक असल्यामुळें लेखकांची क्षेत्रमर्यादा किंचित् अधिक वाढूं लागते. तथापि युरोपांतील वर्तमानपत्रांप्रमाणें स्फुटसूचनांच्या विषयांत यावी तितकी विविधता अद्यापि इकडे आलेली नाहीं. कारण लेखकांप्रमाणें वाचकहि वर्तमानपत्राचा मुख्य उपयोग राजकीय मतांच्या दृष्टीनेंच मानतात.

स्फुट विचारात्मक प्रासंगिक बोलामध्यें मात्र विषय हवे ते घालतां येतात. यामुळें येथें लेखकांचें क्षेत्र अर्थातच थोडें अधिक वाढतें.

विशिष्ट विषयावरील स्फुट लेख हे प्रायः बाहेरचे लोक लिहितात. कारण ते तज्ज्ञ असतात. किंवा त्यांना आपल्या विषयांच्या बाबतींत मतप्रसार करावयाचा असतो. तथापि ते अग्रलेख नसले तरी, संपादकाला मान्य असल्यास, त्यांवर 'लिहून आलेला मजकूर' असा मथळा घालण्यांत येत नाहीं, व अशा रीतीनें लेख व लेखक यांविषयीं आपलेपणाची भावना प्रगट करण्यांत येते. या सदरांतील लेख सहकारी संपादक किंवा उपसंपादक मंडळींपैकीं लोकहि एखादे वेळीं लिहितात. कारण मुख्य विषयाबरोबर खाजगी रीतीनें इतर विषयांचा अभ्यासहि ते आपापल्या हौसेमुळें करीत असतात. मात्र अशा लेखांवर त्यांनें नांव, त्यांच्या इच्छेप्रमाणें, केव्हां घालण्यांत येतें केव्हां घालण्यांत येत नाहीं. "लिहून आलेला मजकूर" या सदराखालील विषयांचें यथार्थ वर्णन त्या सदराच्या नांवावरूनच होतें. हे लेख प्रायः कोणी बाहेरील गृहस्थांनीं लिहिलेले असतात. परंतु संपादकवर्गाला ते सहजच स्वतःचे म्हणून घालावेसे वाटत नाहींत, व तें लिहिणारालाहि आपलें नांव प्रसिद्ध करण्याची इच्छा नसते. अवांतर मजकुरामध्यें कित्येक वेळां बाहेरील लेखकांनीं वादचर्चा करण्याकरितां, किंवा नवी माहिती देण्याकरितां, किंवा माहिती मिळविण्याकरितां लिहिलेलीं पत्रें असतात. तीं पत्रांच्या रूपानेंच उघड किंवा टोपण नांवांनीं छापलीं जातात, किंवा त्यांचे सारांश काढून दिले जातात.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वातमीपत्रांकरितां ठिकठिकाणीं बातमीदार लेखक कायमचे नेमलेले असतात; व त्यांच्याकडून ठराविक मुदतीनें आपापल्या प्रांतांतील हकीकतीची समालोचन करणारीं पत्रें येतात व तीं छापलीं जातात. या बातमीपत्रांचा उपयोग प्रायः निरनिराळ्या भागांतील प्रचलित लोकमत वाचकांना सुसंगत रीतीनें कळविण्याचा असतो.

वर्तमानसार हें प्रायः संपादकमंडळाच्या देखरेखीखालीं काम करणारे लेखक तयार करतात. संपादक किंवा उपसंपादक तें लिहीत नाहींत.

बाजारभाव हें सदर अलीकडे बरेच दिवस कायम करण्यांत आलें आहे. त्यांतील माहितीचा उपयोग सामान्य वाचकाला नसला तरी व्यापारी–उदमी वगैरे लोकांना पुष्कळच होतो, असें आम्हाकडे वेळोवेळीं बाहेरून येणाऱ्या पत्रांवरून दिसतें.

किरकोळ या सदराखालीं काय येईल हें मात्र कांहींच सांगतां येत नाहीं. या सदराची व केर सांठविणाऱ्या कोपऱ्याची जात एकच होय. म्हणजे त्यांत प्रायः टाकाऊ केरच असेल. पण प्रसंगविशेषीं त्यांत सोनें मोतीं किंवा इतर एखादा बारीकसा मौल्यवान पदार्थहि दैववशात् सांपडतो. तसेंच त्यांत हात घालणाऱ्याला एखादे वेळीं विंचूहि डसतो!

कवितांचें सदर कायमचें म्हणून 'केसरी' आठवड्यांतून दोन वेळ निघूं लागला तेव्हांपासून घालण्यांत येऊं लागलें. त्यापूर्वीही कविता अगदींच येत नसत असें नाहीं. पण अगदीं क्वचित् किंवा उत्सवाच्या किंवा सणाच्या वगैरे ठराविक प्रसंगीं. सन १८९७ सालीं केसरीवर जो खटला झाला त्यांत गुन्ह्याची एक बाब सरकारनें अशा एका कवितेंतूनच काढलेली होती, हें पुष्कळांच्या स्मरणांत असेलच.

याशिवाय बुद्धिबळांचे डाव वगैरे देण्याचा प्रयत्न पूर्वी लोकमान्यांनीं केला, व हल्लींच्या संपादकांनींहि ते केसरींतून प्रसिद्ध करण्याचा परिपाठ कांहीं दिवस ठेविला होता. परंतु तो कायम टिकला नाहीं. राजकीय व विद्याविषयक लेखांचीच इतकी गर्दी होते कीं, अशा विषयांना जागा आस्थेनें दिल्याशिवाय मिळत नाहीं. मर्दानी-मैदानी खेळ यांना इकडील व विलायतेंतील इंग्रज वर्तमानपत्रें किती महत्त्व देतात हें तीं वाचणाराला माहीतच आहे. अशा विषयांचा मजकूर केसरींतच काय, पण कोणत्याहि देशी वर्तमानपत्रांत क्वचितच येतो. याचें खरें कारण असल्या सामन्यांना सार्वजनिक महत्त्व अद्यापि याचें तितकें आलेलें नाहीं. मुंबई-पुण्यांत क्रिकेटचे सामने चालू असतां हजारों लोक मैदानाभोंवतीं ते पाहण्यास जमतात; व हिंदू विरुद्ध युरोपियन किंवा स्वजाती विरुद्ध परजाती अशा चुरशीच्या सामन्यांना लोकोत्तर यश मिळालें असतां अशा विषयांवर मुंबई बाहेरच्या वर्तमानपत्रांतून वर्णनात्मक किंवा अभिनंदनात्मक लेख येतात. पण क्वचितच. कारण जितके लोक एकट्या पुण्या–मुंबईंत हे खेळ पाहण्यास जमतात तितके वाचक सर्व बाहेरगांवीं मिळूनहि या खेळाविषयींची बातमी आस्थेनें वाचणारे आढळत नाहींत. कारण परदेशी खेळांना संघटनेनें चित्ताकर्षकता यावी तितकी या देशांत अद्यापि आणण्यांत आलेली नाहीं. या नित्यनैमित्तिक क्रीडांगणवार्तेशिवाय विलायती व युरोपियन वर्तमानपत्रें शास्त्रीय विषयासंबंधीं केव्हां केव्हां माहिती देतात. याचें कारण तिकडे सर्वसामान्य समाजांत शास्त्रीय ज्ञान आमच्या इकडल्यापेक्षां अधिक पसरतें व संचरतें. किंबहुना भौतिक शास्त्रांचा प्रत्यक्ष अनुभव हा तिकडील समाजाच्या व्यवहाराचें अधिष्ठान किंवा प्राण आहे. परंतु दुर्दैवानें आमच्याइकडे अद्यापि शास्त्रीय विषयांची आवड नाहीं, व शास्त्रीय ज्ञान वर्तमानपत्रांत लिहिलें असतां त्यापासून मनोरंजन किंवा बोध होणें याची पात्रताहि नाहीं. तिकडील वर्तमानपत्रांच्या नैमित्तिक खर्चांत अनेक वेळां बक्षिसांचाहि खर्च असतो. हीं बक्षिसें पुष्कळ वेळां कूट प्रश्नांच्या चढाओढीकरितां असतातच, पण मोठमोठीं वर्तमानपत्रेंहि विमानें मोटारी नौका वगैरे शास्त्रीय प्रगतीच्या साधनांच्या परीक्षा घेऊन, त्यांच्यांत चुरशीचे सामने करवून, यशस्वी उमेदवारांना तीं देतात. या ठिकाणीं त्यांचा हेतु वर्तमानपत्रांचे अंक खपविण्याचा नसून अधिक उदात्त असतो. ही पद्धति आपल्याकडे अद्यापि सुरू झालेली नाहीं. कारण शास्त्रविज्ञान व प्रगति हीं जशीं या देशांत मागसलेलीं आहेत तशीच वर्तमानपत्रकारांची द्रव्यसंपन्नताहि बेताचीच असते.

केसरी–मराठ्यावरील आपत्तींचे प्रसंग

मनुष्य व्यक्तीचें काय किंवा संस्थेचें काय, पन्नास वर्षांचें आयुष्य बिलकुल अपघाताशिवाय पार पडण्याची अपेक्षा करणें हें गैरच होय. मनुष्याला आजार अपघात होतो तसें संस्थेलाहि घडतें. त्याप्रमाणें केसरी–मराठ्यावर पन्नास वर्षांत आपत्ति आल्या त्या कांहीं अस्मानी व कांहीं सुलतानी होत्या. पैकीं अस्मानी आपत्ति आल्या त्या अशा. प्रथम केसरीशीं संबंध ठेवणें धोक्याचें असें वाटून आर्यभूषण छापखान्याचे मालक व मॅनेजर कै० हरि नारायण गोखले यांनीं आपल्या छापखान्यांत केसरी छापण्यास हरकत सांगितली त्यामुळें केसरी तेथून बाहेर काढून न्यावा लागला तो कांहीं दिवस विठ्ठल प्रेसमध्यें छापला जात असे. सदरहू छापखाना रविवार पेठेंतील फडके यांचे वाड्यांत होता. त्याला ता. १४मार्च १८९८ रोजीं अकस्मात् आग लागली, त्यामुळें केसरीचें थोडें नुकसान झालें. आगींतून निम्मा केसरीचा कंपोज झालेला टाईप बचावला; परंतु दुसरेच दिवशीं मंगळवार असल्यामुळें तो निमा केसरीच कसा तरी छापून घेऊन वांटावा लागला. केसरीच्या या पन्नास वर्षांत असला अपघात हा एकच घडला म्हणजे निमा केसरी वांटला गेला हा पन्नास वर्षांत एकच प्रसंग. तथापि सांगण्यासारखी अभिमानाची गोष्ट अशी कीं, त्याहि अपघातांत मंगळवारं केसरी प्रसिद्ध होण्याचा राहिला नाहीं.

दुसरी अशा प्रकारची अस्मानी आपत्ति म्हणजे केसरीच्या कागदांच्या गोदामाला लागलेली किंवा कोणी लावलेली आग. ही ता.१०मे१९२१रोजीं रात्रीं अकस्मात लागली. तींत केसरीच्या नव्या इमारतीचा कांहीं भाग व बहुतेक सर्व शिल्लक कागद जळून गेला. कागदाचा विमा उतरलेला होता, तथापि विमा कंपनीकडून मिळालेल्या रकमेनें सर्व नुकसान भरून आलें नाहीं.

व्यक्तिशः अपघात असा एकच झाला. तो असा कीं एकदां छापण्याचें यंत्र चालू असतां एका कामगाराचा पाय पट्ट्यांत सापडून तो मरावयाचाच पण थोडक्यावर निभावून पायमोडीवर मरण गेलें. त्याची सर्व प्रकारची निगा केसरीनें केली व सुदैवानें हा कामगार बरा होऊन हल्लीं तो मुख्य प्रिंटरचें काम करीत आहे.

तसेंच एका गणपति उत्सवांत एके रात्रीं मेळे आले असतां पुष्कळ लोक केसरीच्या आवारांतील एका इमारतीच्या पत्र्याच्या छपरावर मेळ्यांची गाणी ऐकत व रोषनाई पहात होते ते असतां छप्पर एकदम कोसळून पडलें. त्यांत लहान मोठीं बरींच माणसें खालीं पडून दुखावली. पण सुदैवानें कोणीहि दगावलें नाहीं.

अशा रीतीच्या अस्मानी आपत्ती केसरीवर फार थोड्या आल्या. पण सुलतानी आपत्तिमात्र बऱ्याच आल्या. पैकीं पहिली म्हटली म्हणजे सन १८८२ सालीं झालेला अब्रुनुकसानीचा खटला. त्या खटल्याची सविस्तर हकीकत लो. टिळकचरित्राच्या पहिल्या खंडाच्या ६ व्या भागांत वाचकांना वाचावयास मिळेल. त्याची थोडक्यांत हकीकत अशी कीं, "कोल्हापूरचे कै. शिवाजी महाराज यांना संस्थानचे दिवाण कै. माधवराव बर्वे यांनीं निष्ठुरपणानें वागविलें व त्यांत त्यांना महाराजांच्या सावत्र आईची फूस होती," अशा अर्थाचे लेख केसरींत व मराठ्यांत प्रसिद्ध झाले. त्यावरून कै. बर्वे यांनीं मुंबईस प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढें दोन्ही पत्रांच्या संपादकांवर फौजदारी फिर्याद केली. केसरीचें डिक्लेरशन आगरकर यांचें होतें म्हणून त्यांच्यावर व मराठ्याचें डिक्लेरेशन टिळकांचे होतें म्हणून त्यांच्यावर फिर्यादी झाल्या. मॅजिस्ट्रेट-कडून खटला हायकोर्टांत सेशन कमिट झाला व अखेर उभयतांना चार महिन्यांची साधी कैद झाली. हे कैदेचे दिवस त्यांनीं मुंबई येथील डोंगरीच्या तुरुंगांत काढले. एकंदर शिक्षा १२० दिवसांची; तथापि चांगल्या वर्तणुकीमुळें १९ दिवसांची सूट मिळून त्यांची बंधमुक्तता १०१ दिवसांनींच झाली. या मुदतींत टिळकांचें २४ पौंड व आगरकरांचें १६ पौंड वजन कमी झालें!

यानंतरचा दुसरा सुलतानी आघात म्हणजे १८९७ च्या केसरीवरील खटल्याचा. या खटल्याचा निकाल लो. टिळकांच्याविरुद्ध होऊन त्यांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्या निकालावर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यांत आलें होतें. पण त्यांत यश आलें नाहीं. तथापि विलायतेंतील प्रो. मॅक्समुलर वगैरेंनीं खुद्द राणीसरकाराकडे अर्ज केल्यामुळें टिळकांची ५१ आठ-वड्यांनंतर सुटका झाली.

यानंतर ताईमहाराज प्रकरणांत टिळकांना पुन्हां दीड वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व दंड झाला. परंतु हायकोर्टानें अखेर त्यांना दोषमुक्त करून सोडून दिलें. हा खटला व्यक्तिशः टिळकांवर होता केसरी पत्रावर नव्हता. केसरी पत्राचे संपादक या नात्यानें टिळकांचें धोरण सरकाराला अप्रिय होतें व त्यांच्या सार्वजनिक चारित्र्याला कमीपणा यावा अशा हेतूनें या खटल्यांत कांहीं कारवाई झाली. तथापि प्रत्यक्ष केसरीशीं त्याचा कांहीं संबंध नव्हता. मात्र इतर रीतीनें व अप्रत्यक्ष रीतीनें हा फौजदारी खटला, व एकंदरींनें हें ताईमहाराज प्रकरण, केसरीला अनेक रीतींनीं भोवलेंच. त्याचा एक प्रकार असा कीं, या खटल्यांतील कामकाज चालू असतांना टिळकांना तितक्यापुरतें केसरीकडे दुर्लक्ष करावें लागलें; व दुसरा प्रकार असा कीं, केसरीच्या उत्पन्नांतून हजारो रुपये जे केसरीच्या सुधारणेकडे अभिवृद्धीकडे, किंवा सार्वजनिक चळवळींकडे टिळकांना तेव्हांच खर्च करितां आले असते ते फौजदारी खटल्यांतील स्वतःचा बचाव व दिवाणी मुकदम्याचे अखेर प्रिव्ही कौन्सिलपर्यंतचें काम चालविण्याकडे त्यांना खर्च करावे लागले. सुदैवानें हे पैसे पुढें परत मिळाले, ही गोष्ट वेगळी. परंतु, केसरीला ते पैसे पुष्कळ वर्षें खर्ची घालून बसावें लागलें.

यानंतरचा केसरीवरील सुलतानी आघात सन १९०८ सालच्या खटल्याचा. या खटल्याची हकीकतहि लोकांना चांगली माहीत आहे. यामुळें ती विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. या खटल्यात तर लो. टिळकांना ६ वर्षें काळेपाण्याची म्हणजे हद्दपारीची शिक्षा व एक हजार रुपये दंड झाला. पैकीं दंड मात्र बेकायदेशीर ठरल्यामुळें परत मिळाला. परंतु टिळकांना सहा वर्षांची हद्दपारीची शिक्षा बहुतेक सर्व भरून द्यावी लागली. ही शिक्षा टिळकांनीं व्यक्तिशः भोगली असली तरी ती एक प्रकारें प्रत्यक्ष केसरीलाच शिक्षा झाली. कारण टिळकांसारख्या संपादकाचा संबंध सहा वर्षें तुटणें ही केसरीसारख्या वर्तमानपत्राला किती मोठी आपत्ति होय, याचें वर्णन करून सांगण्याचें कारण नाहीं. यानंतर १९१७ सालीं टिळकांवर राजद्रोहाच्या कलमाखालीं पुनः खटला झाला. मात्र तो फक्त जामीन घेण्यापुरता होता. याही खटल्याचा ताई-महाराज खटल्याप्रमाणें केसरीशीं प्रत्यक्ष संबंध नव्हता. म्हणजे खटला केसरीं-तील लेखामुळें झाला नव्हता. परंतु होमरूल लीगच्या चळवळीकरितां लो. टिळकांना केसरीद्वारा मिळणारा पाठिंबा हें एक कारण होतेंच. शिवाय या खटल्यांतील बचावाकरितां खर्च झाला तो केसरीच्या उत्पन्नांतून करावा लागला. त्याकरतां वेगळी तजवीज झालेली नव्हती. यानंतर फिरून १९२४ सालीं केसरीवर हायकोर्टाची बेअदबी करण्याचा खटला झाला. तो प्रत्यक्ष केसरींतील लेखा करितांच होता. व त्यांत संपादक न. चिं. केळकर यांना पांच हजार रुपये दंड व बाराशें रुपये कोर्टखर्च मिळून ६२००रुपये दंड झाला. तो अर्थातच केसरीला झाला. तसेंच १९०८ सालींहि टिळकांच्या खटल्यानंतर मराठा पत्रांत आलेल्या मजकुरावरून श्री. न. चिं. केळकर यांजवर असाच हायकोर्टाचा बेअदबीचा खटला झाला होता. व त्यांत त्यांना १४ दिवस साधी कैद व १२०० रुपये दंड झाला होता. हा दंड अर्थात् केसरीसंस्थेनेंच भरला. याशिवाय सुलतानी आपत्ति म्हटली म्हणजे १९१० च्या प्रेसअॅक्टानंतर केसरीकडून सरकारनें घेतलेली ५००० व मराठ्याकडून घेतलेली १००० रुपयांची जामिनकी ही होय. पण सुदैवानें ही जामिनकीची रक्कम सरकारजमा होण्याचा प्रसंग आला नाहीं. १९२२ सालच्या कमिटीच्या शिफारशीनंतर प्रेस अॅक्ट रद्द झाल्या-

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वर दोनहिं पत्रांच्या जामिनकीची रक्कम संस्थेला परत मिळाली. त्याचप्रमाणें १९३० सालीं प्रेस ऑर्डिनन्स निघाल्यावर केसरीकडून पत्र व छापखाना मिळून ३५०० रुपयांची व मराठ्याकडून २००० रुपयांची जामिनकी घेण्यांत आली. तीहि हल्लीं परत मिळाली आहे.

अशा निरनिराळ्या प्रकारच्या आपत्तींतून पार पडून केसरी–मराठा हे आजचा आनंदाचा दिवस पाहत आहेत. केसरीचा आजचा हा एकावन्नावा वाढदिवस टिळकांच्या हयातींत पडता तर त्याबद्दल त्यांनाच काय, पण केसरीशीं संबंध असलेल्या सर्वांना किती तरी आनंद झाला असता. कारण टिळकांचें सर्वच आयुष्य केसरीचें संगोपन व संवर्धन करण्याकडे गेलें. स्वराज्यसंपादन हें टिळकांचें साध्य होतें. आणि जसें ज्यांचें साध्य त्या मानानें त्यांचें साधनहि असावें लागतें. म्हणूनच टिळकांनीं केसरी पत्र हातीं घेऊन त्याची कार्यक्षमता निरनिराळ्या रीतींनी वाढविली. त्यांनीं त्याचा आकार वाढविला, पानें वाढविलीं, थोड्या वेळांत पुष्कळ प्रती निघाव्या म्हणून अवश्य ती यंत्रसामुग्री जुळविली, सोयीच्या इमारती बांधल्या, नवीन माणसें हाताशीं घेतलीं. तात्पर्य, केसरीचा वाचकवर्ग व त्याद्वारें पत्राचा लोकोपयोग वाढावा म्हणून जो जो प्रयत्न अवश्य तो तो सर्व त्यांनीं केला.

कोणत्याहि कारागिरीसंबंधानें इंग्रजींत ज्या दोन अर्थपूर्ण म्हणी प्रसिद्ध आहेत त्या टिळकांनीं स्वतःसंबंधानें खऱ्या करून दाखविल्या होत्या. Only a bad workman quarrels with his tools याला मराठींतील "नाचायला येईना तर म्हणे अंगण वांकडें" ही म्हण बरीच जवळ येते. नाचणारा कुशल असेल तर तो अंगणाचा वांकडेपणा किंवा कोस आपल्या कौशल्यानें काढून टाकतो. त्याप्रमाणें टिळकांनीं कोणत्याहि स्थितींत साधनांच्या कमतरतेबद्दल रडगाणें गाइलें नाहीं, तर आपल्या गुणांनीं त्यांजकडून त्यांच्या मगदुराबाहेर काम करून घेतलें. स्पार्टन इतिहासांत अशी गोष्ट आहे कीं, एकदां रणांगणावर निघतांना सेनापतीनें सैनिकांना जवळ बोलावून त्यांना आपल्या हातानें तलवारींची वांटणी करून दिली. पैकीं एकाच्या हातीं तलवार गेली ती दोन अंगुळें आंखूड होती. हें पाहून "मला तलवार आंखूड मिळाली" अशी तक्रार त्यानें केली. तेव्हां सेनापति हंसून म्हणाला "गड्या, तलवार दोन अंगुळें आंखूड असली म्हणून काय बिघडेल ? तूं इतरांपेक्षां केवळ एकच पाऊल पुढें अधिक उचलून टाक, म्हणजे पाहा तुझी हीच तलवार इतरांच्या बरोबरीची किंबहुना त्यांच्याहून थोडी लांबच होईल !"

अशाच रीतीनें टिळकांनीं साधनांचा उणेपणा आपल्या कौशल्यानें भरून काढला. कारकीर्दीच्या प्रारंभीं टिळकांची गरिबी होती. तेव्हां 'एडिटरी' चा थाट तर कोठला ! पण स्वतंत्र टेबलखुर्चीहि नव्हती ! अशा वेळीं अंथरुणाच्या वळकटीचेंच टेबल करून त्यांनीं केसरीकरितां लेख लिहिले. पण पुढें टेबलावर लिहिलेल्या लेखांपेक्षां ते खचित कमी प्रतीचे नव्हते. पदरीं कारकून नव्हता तेव्हां टिळकांनीं, कंटाळा करीत करीत कां होईना, स्वतः हातानें लेख लिहिले. पण पुढें कारकुनाकडून, किंवा एखादे वेळीं तावडींत सांपडल्यास एम. ए. किंवा एलएल. बी. अशा श्रेष्ठ पदवीधरांकडून, स्वतः तोंडानें सांगून लिहवून घेतलेल्या लेखांपेक्षां ते पूर्वीचे लेख खचित कमी सरस नव्हते. कारकीर्दीच्या सुरवातीला केसरी अवघ्या चार पानांचा होता म्हणून कांहीं तेव्हांचे लेख, पुढें तो ८ किंवा १२ पानांचा झाला तेव्हांच्या लेखांपेक्षां, कमी परिणामकारक होते असें नाहीं. केसरी किंवा तदनुषंगिक इतर साधनें आपल्या कार्याला केव्हां केव्हां अपुरीं पडतात असे मनांत वाटत असलें तरी त्यांना टिळकांनीं केव्हांहि उघडपणें नांवें ठेविलीं नाहींत. त्यांची सेवा घ्यावी, त्यांचा उपयोग करून घ्यावा, व वरती त्यांची निंदा करावी असला कृतघ्नपणा टिळकांनीं केव्हांहि केला नाहीं.

हें सर्व एका म्हणींसंबंधानें झालें. पण दुसरी जी एक इंग्रजी म्हण आहे तीहि टिळकांनीं लागू पडते. ती अशी A Good workman makes his own tools–"तोच खरा चांगला कारागीर कीं जो आपलीं हत्यारें आपणच तयार करतो." आतां एकेकट्या धंद्याला दहावीस यंत्रें लागावीं, आणि एकेकट्या यंत्राचे पांचपन्नास भाग वेगवेगळे तयार करावे लागावे, अशा हल्लींच्या काळीं वरील म्हण अर्थातच अक्षरशः लागू होणार नाहीं. कारण हेनरी फोर्डसारख्या स्वावलंबी व सर्वसंपन्न कारखानदारालाहि अजून कांहीं कांहीं वस्तूंकरितां परक्यावर अवलंबून राहावें लागतें. श्रमविभाग आणि विशेषीकरण हा आधुनिक अर्थशास्त्रातला एक नियमच होऊन राहिला आहे. तथापि हल्लीच्या काळांतसुद्धां कांहीं मर्यादेपर्यंत प्रत्येक धंदेवाला आपलीं हत्यारें व साधनें आपणच तयार करतो. आपण सुताराचेंच उदाहरण घेऊं. त्याच्या धंद्याला लागणारीं लोखंडी हत्यारें हीं कांहीं तो स्वतः बनवीत नाहीं. पण या हत्यारांच्या मुठी, रंध्याची चौकट, फूटपट्टी असले जिन्नस तो स्वतःचे स्वतः बनवितो. आपलीं हत्यारें सोयीप्रमाणें शक्य तितकीं ज्याचीं त्यानेंच बनवावीं लागतात, व सुतारापासून घड्याळजीपर्यंत पुष्कळसे देशी धंदेवाले तीं आज तयार करतातहि. टिळकांनीं आपल्या चळवळीचीं साधनें पुष्कळशीं आपणच निर्माण केलीं व त्यांत केसरी वर्तमानपत्र हें मुख्य होय.

साध्य किंवा ध्येय हें मात्र आपलें, आणि तें साधण्याला लागणारीं साधनें मात्र दुसऱ्याचीं, अशा स्थितींत कोणाचाहि उद्योग यशस्वी होऊं शकत नाहीं. आणि हा अनुभव टिळकांना प्रारंभापासूनच आला. डे. एज्यु. सोसायटी कायमची सोडून देऊन सार्वजनिक चळवळींत पडावयाचें व स्वमतप्रसार करावयाचा हें टिळकांनीं निश्चित केल्याबरोबर, त्यांनीं पहिलीं गोष्ट केली ती ही कीं, छापखाना व वर्तमानपत्रें यांच्या वांटणींत कर्जासकट वर्तमानपत्रें आपल्या वांटणीला घेतलीं, छापखाना दुसऱ्या भागीदाराला दिला, व स्वतः जबाबदार संपादक होऊन अखत्यारीनें मतप्रसार सुरूं केला. यानंतर १८९७ सालीं आर्यभूषण छापखान्यानें, टिळक तुरुंगांत असतां, केसरी छापीत नाहीं असें म्हणून दगा दिला, तेव्हां टिळकांना स्वतःचा छापखाना काढण्याची सहजच इच्छा झाली.

प्रथम केसरीच्या बटवड्याची व जमाखर्चाची व्यवस्थाहि आर्यभूषणाकडेच होती. पण उभयतांतील हितविरोधाचा परिणाम केसरीच्या उपयुक्ततेवर होतो असें दिसून येतांच त्यांनीं आपली स्वतंत्र कचेरी स्थापिली. केसरीच्या पुष्कळ प्रती काढाव्या लागू लागल्या, तेव्हां छपाईचें मोठें यंत्र त्यांनीं आणिलें. आणि असले धूड चालवयाचें म्हणून त्याला ऑईल इंजिनाची जोड द्यावी लागली. पुष्कळ प्रती निघावयाच्या म्हणजे अर्थात् टाईप वरचेवर झिजावयाचा, म्हणून टिळकांनीं स्वतःची टाईप फाउंडरी काढली. आणि पुढें त्यांनीं अखंड टाईपाची योजना केली तेव्हां तर घरची स्वतंत्र फाउंडरी असणें अवश्यकच झालें. महायुद्धानंतर स्वराज्याच्या चळवळींत केसरीची लोकप्रियता इतकी वाढलीं कीं, त्यांना पूर्वीचें 'डबल' फीडर यंत्रहि पुरेना. म्हणून तासाला सात–आठ हजार प्रती छापून घड्या घालून देईल असलें मोठें यंत्र आणावें लागलें. व या नव्या यंत्रावर चौकोनी रिमाचे कागद निरुपयोगी म्हणून वाटोळे रीळचे कागद आणावे लागले. आणि छपाईचें यंत्र 'रोटरी' पद्धतीचें म्हणून 'स्टीरिओ' करण्याचें यंत्र जोडावें लागलें.

पण याबरोबर सांगण्याची मुद्दयाची गोष्ट ही कीं, अशा रीतीनें टिळक छापखान्याच्या उपद्व्यापांत क्रमानें पायरीपायरीनें गुंतत गेले तरी, अखेरपर्यंत ते छापखानेवाले असें केव्हांहि बनले नाहींत. आणि केवळ चळवळीकरितां वर्तमानपत्र व केवळ वर्तमानपत्राकरितां छापखाना, ही विचारसरणी त्यांची केव्हांहि नाहींशी झाली नाहीं. एका संन्याशाची गोष्ट सांगतात कीं, उंदीर आपली वाळत घातलेली लंगोटी खातो म्हणून त्यानें मांजर पाळलें, मांजराला दूध पाहिजे म्हणून गाय ठेवली, गाईला चारा पाहिजे म्हणून शेत घेतलें, शेताला रखवाली पाहिजे म्हणून एक मुलगी नोकरीला ठेवली, आणि शेवटीं त्या मुलीच्या गुणावर मोहून त्यानें तिच्याशीं लग्न केलें व आश्रमधर्म दूषित केला. पण याच्या उलट टिळकांनीं घरचा छापखाना मोठा व समृद्ध केला तरी वर्तमानपत्राव्यतिरिक्त त्याचा कांहीं उपयोग कधींच केला नाहीं, व केसरी फाउंडरीचा साधा टाईप त्यांनीं कधींच विकावयास ठेवला नाहीं. त्यांच्या घरच्या लग्न–मुंजीच्या चिठ्ठ्याहि ते दुसऱ्या छापखान्यांतून छापवून आणीत. कारण या खासगी उपयोगाला लागणारें सामान, वास्तविक अगदीं थोडी किंमत पडणारें होतें तरी, त्यांनीं छापखान्यांत कधीं ठेवलेंच नाहीं. वर्तमानपत्राबरोबरच ते चार माणसे अधिक ठेवून छापखान्याचा धंदा करते तर तो अगदीं सहज होण्यासारखा होता. पण चळवळ हें ध्येय व वर्तमानपत्र हें जसें त्याचें साधन, त्याचप्रमाणें या साधनरूपी वर्तमानपत्राचें उपसाधन छापखाना इतकीच त्यांची दृष्टि होती. एरवीं छापखान्याचा दुय्यम धंदा करण्याला त्यांना काय कमी होतें !

असो. या नव्या मनूंत मतप्रसाराच्या दृष्टीनें पाहातां, स्वतंत्र वर्तमानपत्रासारखे दुसरें परिणामकारक साधन नाहीं ही गोष्ट सामान्य माणसालाहि जर कळते, तर ती टिळकांना उमगली नाहीं हें कसें होईल ! ती त्यांना तेव्हांच उमगली. आणि म्हणून पूर्वी सांगितल्यांप्रमाणें त्यांनीं केसरी पत्र घेऊनच सार्वजनिक कार्यांत प्रवेश केला. केसरीची लोकप्रियता यापूर्वींच सिद्ध झाली होती. पण त्यांनीं तें पत्र हातीं घेतल्यापासून ती श्रेढीनें एकसारखी वाढतच गेली. केसरीच्या या लोकप्रियतेंत टिळकांच्या चळवळीची लोकप्रियता व उपयुक्तता पूर्णपणें प्रतिबिंबित झाली होती.

इतर देशांची गोष्ट कशाला ! पण हिंदुस्थानांतहि नांव घेण्यासारख्या चळवळ्या; म्हणजे मतप्रसाराची आस्था बाळगणाऱ्या, प्रत्येक प्रसिद्ध पुढाऱ्यानें आजवर या दृष्टीनेंच वर्तमानपत्राचा अभिलाष केला होता. मतप्रसार धावावयाचा तर त्याला स्वार होण्याला हा कागदी घोडा अवश्य असतो. व ज्यांना हा घोडा पदरीं बाळगतां येत नाहीं ते निदान मधून मधून तो दुसऱ्याचा मागून घेतात. म्हणजे दुसऱ्याच्या वर्तमानपत्राचा आश्रय करून मतप्रसार करतात. मनुष्य कितीहि उद्योगी, चपळ, बोलताना न दमणारा व मोठ्या आवाजाचा असला, तरी व्याख्यानें प्रवचनें देऊन किंवा शाळा काढून शिष्य पढवून तो किती लोकांना शिकविणार ? तेंच केसरीसारखें वर्तमानपत्र हातीं असल्यास, दर आठवड्यास हजारों लाखों लोकांशीं मनमुराद अनेक विषयांवर बोलतां येतें. या गोष्टीचें स्वारस्य टिळकांनीं ओळखलें असल्यामुळें सर्व चळवळी करतांना त्यांनीं केसरीच्या संगोपनाकडचें व संवर्धनाकडचें लक्ष कधींहि ढळूं दिलें नाहीं.

आम्ही केसरी आठवड्यांतून दोन वेळा काढण्याचे ठरविल्यामुळें व केसरीचा आजचा हा एकावन्नावा वाढदिवस उजाडलेला पाहून ज्यांना विषाद वाटेल असे कित्येक लोक आहेत हें आम्ही जाणून आहों. कारण टिळक निवर्तल्यापासून त्यांची एकच अपेक्षा होती. ती ही कीं, आतां तरी केसरी बुडावा. टिळकांच्या हयातींत केळकर दहा वर्षे केसरीचे संपादक होते, तथापि त्याला तेव्हां टिळकांचाच आधार होता म्हणून तो चालला व उत्कर्ष पावला हें सरळच आहे. ते निवर्तल्यावरहि कांहीं दिवस लोकांनीं केवळ टिळकांच्या स्मरणार्थ आपला उदार आश्रय चालू ठेवला असेंहि कोणास म्हणतां येण्यासारखे होतें. कारण आकाशांतून तारका मूळ स्थानापासून भ्रष्ट व नष्ट झाल्या तरी त्यांचा पृथ्वीवरील प्रकाश कांहीं काळ टिकतोच. पण पुढें असहकारितेच्या धकाधकीचा मामला सुरू झाला तेव्हां टिळकांचा आधार तुटलेल्या केसरीच्या शत्रूंना सोन्याचीच संधि प्राप्त झाली असें वाटलें, व स्वतः त्यांनींहि त्याचा पाडाव करण्याला शक्य तितका हातभार लाविला. कोणी राजकारणांत केसरी मवाळ बनला असें म्हणून, कोणी त्याला म. गांधींचें शत्रुपद देऊन, कोणी तो खादीचा विरोधी असें म्हणून, कोणी प्रांतवार किंवा भाषावर विरोधी अभिमान जागृत करून, कोणी तो ब्राह्मणपक्षाचा असें ठरवून, तर कोणी उलटपक्षी तो सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करतो म्हणून–तात्पर्य, ज्याला जें कारण सुचलें तें त्यानें पुढें करून केसरीचा पाडाव करण्याचा प्रयत्न शिकस्तीनें केला. पण या खुळ्यांना हें कळेना कीं, एक अकालीं मेला तरी त्याचें उरलें आयुष्य दुसऱ्याला मिळत नाहीं ! मग केसरी जाग्यावर

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जिवंत आहे तोंपर्यंत त्याचें आयुष्य इतर कोणाच्या भरतींत कसें पडणार ! ज्याला त्याला आपल्या स्वतःच्या गुणाप्रमाणेंच या जगांत स्थान मिळतें. यामुळें केसरीची निंदा करकरून थिणन भागून ही मंडळी आतां हताश होऊन बसली आहेत !

केसरीचा खप कमी झाला, वर्गणीदार कमी झाले, अशा विविध-वार्ता कोणी व्यवसायबंधु उठवितो. केसरी अर्धसाप्ताहिक झाला तेव्हां तो मरणार, कारण दिवा मालवतांना मोठा होतो, असें अशुभ भविष्य वर्तवून कित्येक काशीकर पंडितांनीं आपल्या द्वेषाच्या लहरींचा उपशम केला. कोणीं 'केसरी' या नांवानें सहज सुचणाऱ्या बिचाऱ्या शब्दावर 'ग्राम्य' कोट्या करून स्वतःलाच लोकांकडून ग्राम्य ठरवून घेतलें. स्वतःच्या शीलाला व संस्कृतीला शोभण्यासारखीं कुरूप व वेडीं चित्रें काढून कित्येक कुडबुड्या जोशांनीं राजकारणांत नसती लुडबुड केली. या सर्वांच्या दाताओठांची किंबहुना ओठा-मनगटांची आम्हांला कींव येते. पण आम्हीं तरी काय करणार ? त्यांच्या इच्छेप्रमाणें टिळकांच्या मृत्यूनंतर केसरी हा एक दोन वर्षांत मृत्युपंथाला लागावयाचा तो न लागतां, अजून जिवंत आहे, नव्हे आपल्यापरी उत्कर्ष पावत आहे, शत्रूंच्या कंबरेंत लाथा घालीत आहे, व इतक्यानेंच न थांबतां अर्धसाप्ताहिक बनून एकावन्नाव्या वर्षांत पुढें पाऊल टाकीत आहे. याचें कारण, केसरीच्या शत्रूंचा द्वेष व मित्रांची सहानुभूति याच नुसत्या दोन शक्ती घेतल्या तरी, त्यांत ही दुसरी शक्तीच अधिक प्रभावी ठरली. व या सर्वांना फिरून टिळकांच्या पुण्याईचा पाठिंबा मागें आधार देतच आहे हें होय. आपले वर्गणीदार किंवा वाचक किती आहेत हें आंकडेबंद जाहीर करण्याचा शिरस्ता नाहीं म्हणून तो संभाळून आम्हीं इतकेंच सांगतों कीं, कित्येक चिल्लर निंदक वर्तमानपत्रांच्या दसपट वीसपटपर्यंत, आणि त्यांतल्या त्यांत ज्यांना आपण फार पुढारलों असें वाटत आहे त्यांच्या तिप्पट चौपट केसरीचा खप आज होत आहे. प्रसंग पडल्यास हें सहज सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे. सगळ्या हिंदुस्थानांत खपाच्या दृष्टीनें आजहि केसरीचा नंबर पहिल्या दोहोंतिहींत येईल.

पण प्रत्यंतरानेंच कित्येक वेळां यथार्थ ज्ञान होत असतें म्हणून दुसऱ्याहि एका रीतीनें हेंच सांगणें प्राप्त आहे. गेल्या दहा वर्षांत घडलेल्या गोष्टी पहिल्या म्हणजे टिळकांची पुण्याईच अलौकिक खरी असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं. द्वेष, विरोध व अडचणी यांना लोकमान्यांनीं जिवंतपणीं सतत तोंड दिलें, विरोधाला पत्रनीं पाडलें, द्वेषाची धार बोथट केली, व अडचणींना त्यांनीं बाजूस सारलें. मरणोत्तरहि त्यांच्या यशाला अशाच प्रकारें कमीपणा आणण्याचे प्रयत्न कित्येकांनीं झाले. पण टिळकांची पुण्याई अखेर त्यांना पुरून उरली असेंच गेल्या दहा वर्षांचा अनुभव सांगतो. पुणें, नागपूर, अहमदाबाद, कराची येथें स्वपर-विरोधाला बाजूस सारून त्यांचे पुतळे उभारले गेले. त्यांनीं शिक्षण घेतलेल्या संस्थेंत व त्यांनीं काढलेल्या शिक्षण-संस्थेंत त्यांचीं स्मारकें उभारलीं गेलीं. त्यांचीं लहान इंग्रजी मराठी चरित्रें प्रसिद्ध झालींच. पण विस्तृत असें त्यांचें चरित्र, आठवणी सारखे अपूर्व असे तीन ग्रंथ, त्यांचे अनेक लेख-संग्रह, सूक्तिसंग्रह, त्यांच्या धर्मविषयक मतांवरील निबंध, प्रस्तुत चरित्रग्रंथाचा इंग्रजी व हिंदी पहिला भाग, हीं प्रसिद्ध झालीं. याशिवाय त्यांनीं आपल्या हयातींत प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांच्या व त्यांच्या भाषांतरांच्याहि आवृत्त्या निघाल्या. पुण्यास त्यांचें स्मारकमंदिर स्थापन झालें, आणि मुंबईच्या चौपाटीवरील पुतळाहि लवकरच उभारला जाईल. धार्मिक दृष्ट्या त्यांच्या पुण्यतिथीच्या उत्सवाची स्थिरनिधीनें चिरकालिक व्यवस्थाहि जमत आली आहे. त्यांच्या गांवोगांवच्या लहानसहान स्मारकांची यादी तर फारच मोठी होईल. त्यांची रायगड स्मारकाची योजना पूर्ण झाली. त्यांनीं योजलेला 'करणग्रंथ' पुरा होऊन त्यांच्या योजनेनुसार पंचांगें काढण्याची व्यवस्था झाली. कर्मयोगाच्या तत्त्वज्ञानाच्या प्रसाराची व्यवस्था झाली. त्यांच्या सामाजिक व हिंदुसमाजविषयक मतांची परिणति आज हिंदुसंघटनेच्या रूपानें महाराष्ट्रांत दृग्गोचर झाली आहे. आणि राजकारणांतहि त्यांच्या अनेक धोरणांची उपयुक्तता लोकांना अनुभवानें पटली आहे. असें अलौकिक यश किंवा पुण्याई फारच थोड्या पुरुषांना लाभते.

याच न्यायानें गेल्या दहा वर्षांत अनेक अडचणींना, विरोधांना व उच्छेदक प्रयत्नांनाहि न जुमानतां केसरीची उन्नतीच होत गेली. आणि लो. टिळकांच्या संकल्पाप्रमाणें केसरी आठवड्यांतून दोनदां वाचकांच्या भेटीला जाण्याचा योग आला ही आम्ही टिळकांची पुण्याईच का मानूं नये ! महात्मा गांधींसारखा पुरुष अगदीं तावून सुलाखून योग्यता पाहून माणसांचा संग्रह करणारा; पण तो तुरुंगांत गेला असतां तेवढ्या अवधींत त्यांच्या वर्तमानपत्राचें तीन संपादक झाले, व त्याचा खप पंचवीस हजारांच्याहि वर होता तो तीन हजारांवर आला हें स्वतः म. गांधींनींच एकदां जाहीर केलें होतें ! हा तुलनात्मक विचार मांडण्याचें कारण हेंच कीं, टिळकांची पुण्याई आम्हीं कां व कोणत्या दृष्टीनें म्हणतों हें ध्यानांत यावें. आणि टिळकांचें स्मरण ठेवून, प्रामाणिक तत्त्वनिष्ठेनें, आपल्यांत असेल ती शक्ति व कर्तृत्व या कामांत वेंचून, टिळकांनीं निर्माण केलेल्या या 'केसरी' पत्राला व 'केसरी' संस्थेला चिरस्थायी, उपयुक्त व संग्राहक स्वरूप देण्याचा जसा गेलीं दहा वर्षें आमच्याकडून प्रयत्न होत आला आहे, तसाच तो पुढेंहि चालू राहील. केसरीच्या ज्युबिलीच्या आनंदांत आमच्याप्रमाणें आमचे हजारों हितचिंतक व टिळकांचे भक्त, अनुयायी, वगैरे तेहि सहभागी असल्यामुळें, आमच्या मनांत या प्रसंगीं आलेल्या विचारासारखेच विचार त्यांच्याहि मनांत उद्भवत होत असतील यांत शंकाच नाहीं. कित्येकांनीं ते आम्हांस मित्रभावानें लिहूनहि कळविले आहेत. अर्थात् " बोधयंतः परस्परम् " याच न्यायानें आम्हीं ते आजच्या प्रसंगास उचित व अनुरूप म्हणून व्यक्त केले आहेत.

मराठा पत्राची हकीकत

केसरीप्रमाणें मराठ्यालाहि एकावन्नावें वर्ष लागत असल्यामुळें हा प्रसंग त्याच्याहि ज्युबिलीचा आहे. म्हणून मराठ्याचा येत्या रविवारचा अंक हा केसरीप्रमाणेंच विशेष स्वरूपाचा म्हणजे ज्युबिली अंक म्हणून निघणार आहे. त्यांत मराठा पत्राविषयीं सर्व हकीकत येईल. म्हणून ती येथें सविस्तर देत नाहीं. तथापि जरूर तेवढी थोडी याखालीं देत आहों.

'मराठा' पत्राचा पहिला अंक रविवार ता. २ जानेवारी १८८१ रोजीं निघाला. त्याचा आकार डेमी असून पृष्ठसंख्या ८ होती. त्या काळीं मासिकांवर किंवा वर्तमानपत्रांवर व्यक्तिशः संपादक किंवा प्रकाशक यांचें नांव जबाबदारीच्या अर्थानें घालण्याची कायदेशीर सक्ती नसल्यामुळें, मराठ्याच्या अखेरीस " Printed and published for the proprietors at the Aryabhushan Press No 520, Budhawar Peth, Poona " एवढेच शब्द असत. दर्शनी पृष्ठावर " The Mahratta, with which is incorporated the Deccan Star " (यांतच " डेक्कन स्टार " हें पत्र सामील केलें आहे) असा उल्लेख आहे; व याला अनुलक्षूनच, मराठ्याचा पहिल्या वर्षाचा तो पहिला अंक असतांहि त्यावर " न्यू सीरीज " (नवी आवृत्ति) असे शब्द बाजूला घातलेले होते, मराठ्याच्या उद्देशपत्रिकेवर चिपळूणकर, गर्दे, आपटे, टिळक, आगरकर, नामजोशी अशा अनुक्रमानें सह्या आहेत.

'डेक्कन स्टार' हें वर्तमानपत्र नामजोशांच्या मालकीचें होतें. पण तें त्यांनीं हौसेनें चालविलें असलें तरी यशस्वितेनें चालविण्यास लागणारीं साधनें त्यांचेजवळ नव्हतीं. ' कुच रोटी कुच लंगोटी ' असें करून त्यांनीं तें चालविलें होतें. असें हें पत्र मराठ्यांत सामील करून घेतल्यानें मराठ्याच्या चालकांना " गुडवुइल " किंवा मालमत्ता यांच्या रूपानें कांहीं विशेष फायदा होणार होता असें नाहीं. मुख्य फायदा हाच होता कीं, एकाकी व अप्रसिद्ध असतांहि आपल्या पायावर उभा राहून इंग्रजी वर्तमानपत्र चालविणारा एक हौशी व हुषार लेखक मराठ्याच्या चालकवर्गांत सामील होत होता. व खरोखरच नामजोशी यांनीं मराठ्याला जरूरीच्या वेळीं मजकुराची वाण केव्हांहि पडूं दिली नाहीं. पुणें म्युनिसिपालिटीचा कारभार व घटना, मुंबईसरकारच्या दरबाराशीं होणारीं कारस्थानें व औद्योगिक चळवळ, या विषयांवर त्यांना नेहमीं कांहीं ना कांहीं तरी नवीन कल्पना सुचत, व ते नवीन चळवळी निर्माणहि करीत. यामुळें त्यांचा मराठ्याला उपयोग होत होता असें म्हणण्यापेक्षां मराठ्याचा त्यांना उपयोग होत होता असें म्हणणेंहि अधिक खरें ठरलें असतें. 'डेक्कन स्टार'चा संपादकच स्वतः सामील करून घेतला तर त्याचे मालकीचें पत्रहि त्याबरोबर सामील करून घ्यावें हें रीतीचेंच होतें. पण पहिल्याच वर्षाच्या अखेरीस 'सामील वर्तमानपत्र' म्हणून 'डेक्कन स्टार'चें नांव मराठ्याच्या मुखपृष्ठावरून काढून टाकण्यांत आलें !! बारा महिन्यांचें शरपंजरीं शयन पुरें झालें, पुढील वर्षापासून 'डेक्कन स्टार' अंतर्धान पावला तरी वाचकांना किंवा मूळ संपादकालाहि फारसें दुःख होण्याजोगें नव्हतें; यामुळें मराठ्याची जोड-नामाभिधानाची उपाधि टळली.

'मराठा' हा केसरीच्या आधीं दोन दिवस जन्मास आला. यामुळें वडील पणाचा मान या इंग्रजी भावंडाकडे सहजच येतो. (पण आज ज्युबिली अंकाच्या बाबतींत मात्र केसरीनें अघाडी मारली आहे. कारण मराठा आधीं दोन दिवस जन्मला तरी केसरी अर्ध साप्ताहिक झाल्यामुळें त्याचा ज्युबिली अंक एक दिवस आधीं निघत आहे. हल्लीं पुढें १८९१ चे सुमारास जेव्हां या दोन वर्तमानपत्रांत पंडिता रमाबाई वगैरे एक दोन विषयांवर परस्परविरोधी मतें प्रसिद्ध होऊं लागून एक प्रकारची भाऊबंदकी जुंपली, तेव्हां केसरीकार हे मराठ्याविषयीं लिहितांना कित्येक वेळां 'आमचे दादा' किंवा 'वडील बंधु मराठाकार' असा उल्लेख कुचेष्टेनें करीत तो, वर लिहिल्याप्रमाणें, मराठा हा केसरीच्या आधीं दोन दिवस जन्मला या गोष्टीस उद्देशून होता हें सांगावयास नकोच. दादा हे भोळे असावयाचे असा जगाचा नियम आहे तसा मराठाहि 'भोळा' आहे असें म्हणावयाचा केसरीचा हेतु. पण हा यदृच्छाप्राप्त ज्येष्ठकनिष्ठ भाव इतर रीतीनेंहि संपादला गेला होता असें. म्हणण्यास हरकत नाहीं. मराठ्याची भाषा इंग्रजी, (पुष्कळ परप्रांतीय किंवा परदेशीय लोकांना मराठ्याची भाषा मराठी नसून इंग्रजी, आहे हें समजावून सांगण्यास आम्हास अजूनहि बराच वेळ खर्चावा लागतो !) व केसरीची भाषा मराठी; येवढ्याच भेदामुळें खरोखर या दोन पत्रांच्या लेखनपद्धतींत पुष्कळ फरक नेहमींच पडलेला आहे. परकी भाषा आपण कितीहि शिकलों तरी तींत देशी भाषेइतकें जोरदार लिहितां येत नाहीं. पण ओजस्वितेच्या दृष्टीनें जो हा दोष तोच दाक्षिण्याच्या दृष्टीनें गुण दिसतो. सर्व हिंदुस्थानांत जें वर्तमानपत्र वाचलें जाणार त्यांतील विषय व विचार एखाद्या विवक्षित प्रांतांतच वाचल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रापेक्षां अधिक व्यापक स्वरूपाचें असणें अपरिहार्यच होय. यामुळें प्रांतिक विषयांवर स्वभाषेंत लिहितांना संपादक हवें तसें तोंडसुख घेऊं शकतो, व्यक्तिनिंदेनें स्वतःला मळवून घेतो, कुचाळी किंवा कुचेष्टा करतो, व क्वचित् ग्राम्य भाषाहि वापरतो. पण परभाषा ही असे गुन्हे न घडण्याची एक अप्रत्यक्ष जामिनकीच असते. बेडी घातलेल्या पायाची लाथ किंवा हातकड्या घातलेल्या हाताची बुक्की ही अर्थात् कमीच लागणार. त्यांतूनहि इंग्रजी शिकणारे आपण हिंदी लोक अभिजात इंग्रजी वाङ्मय वाचून पढिक बनलेले असतों. यामुळें बर्क किंवा शेक्सपिअर यांच्या प्रौढ आणि डौलदार भाषासरणीचें एखादें वाक्य स्वयंस्फूर्तीनें आमच्या तोंडून वेळीं निघूं

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शकेल; पण साधी, सोपी, ग्राम्य, खुमासदार अशी शिवी मात्र इंग्रजींतून आम्हास देतां येणार नाहीं. या बाबतींत कोणताहि गोरा सोजीर नेकनामदार शास्त्रीयांसारख्या पटाईत इंग्रजी वक्त्याचा पराभव करूं शकेल !

तात्पर्य, मराठा लिहिणाऱ्याच्या डोळ्यापुढें सर्व हिंदुस्थान किंवा विलायतेंतील इंग्रज वाचकवर्गहि असल्यामुळें, आणि त्याचें भाषाज्ञान एकांगी व मर्यादित असल्यामुळें, मराठ्यांतील लेख केसरींतील लेखांपेक्षां प्रायः अधिक प्रौढ, दमदार, नेमस्त व दाक्षिण्ययुक्त असे वाटतात. किंबहुना एकाच मनुष्यानें, एकाच विषयावर, एकाच आठवड्यांत मराठा व केसरी या पत्रांत लेख लिहिले तरीहि वरील भेद प्रत्ययास येतो असा इतरांप्रमाणें आम्हासहि अनेक वेळां अनुभव आलेला आहे. पण त्याची दुसरीहि एक बाजू अशी आहे कीं, केसरी स्वभावेंतून लिहिला गेल्यामुळेंच तो आपलें भक्ष्य अधिक अचूक हुडकून काढूं शकतो, व अधिक तडफेनें त्याचा संहार करूं शकतो. मराठीपेक्षां इंग्रजी वाचकवर्ग इतर प्रांतांप्रमाणें महाराष्ट्रांतहि पुष्कळ कमी हें तर झालेंच, परंतु महाराष्ट्रीय मनुष्यास खुद्द टिळकांनीं केसरींत लिहिलेला लेख जितका पटत असे किंवा त्याच्या मनांत तो भिनत असे तितका त्यांचाच मराठ्यांतील लेख कधीं पटला नाहीं व भिनला नाहीं. या कारणामुळें केसरीचा खप मराठ्याच्या खपाहून नेहमींच पुष्कळ अधिक असे. मराठ्याच्या जमाखर्चाचीं तोंडें, खुद्द टिळक संपादक असतांहि, मिळालीं नाहींत ही गोष्ट उघडपणें सांगण्यास कांहींच हरकत नाहीं. साप्ताहिक इंग्रजी पत्रांचें नशीबच खोटें. त्यांचा जमाखर्च हिंदुस्थानांत कोठेंच कधीं बसला नाहीं. खुद्द जातिवंत इंग्रजानें चालविलेला मुंबईचा "चँपियन," व खुद्द इंग्रजापेक्षांहि अधिक चांगली इंग्रजी भाषा लिहिणारा मलबारींचा "इंडियन स्पेक्टेटर" किंवा नटराजनचा "इंडियन सोशल रिफॉर्मर" यांनाहि हाच अनुभव आल्याविषयीं त्यांनीं जाहीर केल्याचें आमच्या वाचनांत आहे. म्हणून केसरीनें म्हणजे धाकट्या भावंडानें मिळवून वडील भावंडास म्हणजे मराठ्यास पोसावें असेंच आजवर घडत आलेलें आहे. मराठ्याची वर्गणी सुरुवातीस सालीना टपालखर्चासह आठ रुपये म्हणजे केसरीच्या त्या वेळच्या वर्गणीच्या जवळ जवळ आठपट होती. मराठ्याच्या आठ पानांची छपाई व कागदखर्चहि तसाच मोठा होता. जाहिरातीचा दर बारा ओळींस एक रुपया याप्रमाणें होता. परंतु मराठ्याचा प्रसार अल्प असल्याकारणानें जाहिरातींचें उत्पन्न मराठ्यास कधींच फारसें लाभलें नाहीं. तें इतकें कीं, मराठ्याच्या जमाखर्चाचा अंदाज करताना तें लक्षांत न घेतलें तरी चालण्याजोगें होतें; व प्रायः जाहिरातींची जागा जाहिरातींच्या दरांच्या जाहिरातींनेंच अडवलेली आढळते !

पण अशा रीतीनें खर्च अंगावर भरूनहि मराठा पत्र काढण्याचें काय कारण ! याचें उत्तर हेंच कीं त्या वेळच्या व त्या लोकांच्या राष्ट्रीय भावनेच्या उद्गारांना इंग्रजी तोंडहि फुटल्याशिवाय तिचें समाधान होणें शक्य नव्हतें. राजकीय विषयांवरील विचार स्वकीयांना समजवून सांगण्याला केसरीचा जो उपयोग, तोच ते विचार इंग्रज राज्यकर्ते किंवा परप्रांतीय हिंदी लोक यांना सांगण्याला मराठ्यासारख्या इंग्रजी पत्राचा उपयोग. इंग्रजी शिक्षण मिळविलेल्या विद्वानांना इंग्रजींत लेख लिहिण्याची आवड असणें अगदीं स्वाभाविक होय. ही नुसती आवड नव्हे तर संवयहि बनून जाते. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे निबंधमालेसारखें मासिक पुस्तक चालवून त्यांत आंग्लमय किंवा आंग्लप्राय बनलेल्या सुशिक्षितांवर कोरडे ओढीत असतां, स्वतः ते आपल्या बंधूला व स्नेह्यांना इंग्रजींत पत्रें लिहीत हा एक प्रकारचा "वदतोव्याघाता" यासारखाच दोषच नव्हे काय ! पण हा दोष अद्यापिहि आपणांतून गेलेला नाहीं. रानडे–गोखलेच काय पण चिपळूणकर–टिळकहि खाजगी पत्रव्यवहार मराठीपेक्षां इंग्रजींतूनच अधिक करीत हें प्रसिद्ध आहे. पण मराठा वर्तमानपत्र काढण्याचा हेतु इंग्रजी भाषेंत लिहिण्याच्या हौसेपेक्षां उपयोगाला अनुलक्षूनच अधिक होता. मराठींत पुष्कळ लिहिलें पण सरकारदरबारीं तें भाषांतर करून वाचणार कोण ! आपले हितचिंतक व मदतगार इंग्लंडांतहि आहेत, त्यांना आपल्या गोष्टी खुलासेवार व मार्मिकपणें कशा कळवितां येणार ! खरेंच बोलावयाचें तर त्या वेळच्या आम्हा सुशिक्षित लोकांत असा दृढ विश्वास होता कीं, 'सरकारी इंग्रज अधिकारी किंवा त्रयस्थ इंग्रज लोक यांच्या गळ्यांत कोणतेंहि गाऱ्हाणें बिनतोड बांधलें, किंवा त्याविषयींचा युक्तिवाद त्यांच्या गळीं उतरविला, म्हणजे आपला कार्यभाग बहुधा हटकून होणार. चळवळ हवी पण ती स्वकीयांपेक्षां परकीयांच्या शिक्षणाकरितांच अधिक हवी. चळवळ म्हणजे पुष्कळसें शिक्षण फारशी कृति नव्हे.'

सरकाराजवळ महाराष्ट्राचें मनोगत पदोपदीं व परोपरी कळवील असा दुभाष्या नाहीं व सरकार तो ठेवूंहि इच्छित नाहीं. ओरिएंटल ट्रॅन्स्लेटर आधीं वाचणार किती ! त्यांतून भाषांतर करणार किती ! अनुग्रहापेक्षां निग्रहाच्या दृष्टीनेंच तो देशी वर्तमानपत्रांकडे अधिक पाहणार. यामुळें त्याचे रिपोर्ट एकांगी, संक्षिप्त, तुटक, चुकीच्या भाषांतरानें किंवा खोडसाळपणानें दूषित झालेले असणार. याकरितां प्रजेनें थोडी झीजहि सोसावी. पण मध्यस्थाचे वरील सर्व दोष ज्यांत राहणार नाहींत असा कायमचा दुभाष्या आपण होऊन सरकारास सुलभ करून द्यावा, याकरितां मराठा हें पत्र काढलें गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. मराठ्याच्या पहिल्या अंकांतील आत्मनिवेदन रूप लेखांत त्याच्या संस्थापकांनीं पत्राचा हेतु खालीलप्रमाणें दिला आहे. "Our true primary duty will be to interpret, petition and instruct, and advocacy may be said to form the second part of our real work." हें दुभाष्याचें काम त्या काळीं दोन भाषेंत चालविल्या जाणाऱ्या इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका यांसारख्या अँग्लो–व्हर्नाक्युलर पत्रांकडून थोडेंबहुत केलें जात असे. पण या तरुण महाराष्ट्रीय मंडळीस हें काम धेडगुजरी व अपुरें वाटलें, म्हणून अँग्लो–व्हर्नाक्युलर पत्राऐवजीं त्यांनीं 'केसरी' हें निवळ मराठी व 'मराठा' हें निवळ इंग्रजी पत्र काढण्याचें ठरविलें. संपादकीय लेखांप्रमाणेंच मराठ्याचा दुसराहि एक भाग त्यांनीं योजिला होता. तो मात्र सरकारापेक्षां स्वकीयांच्या शिक्षणाकरितां होता. यांत नामांकित इंग्रजी वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वगैरेंतून उतारे किंवा मोठ्या लेखांचे सारांश देण्याचा हेतु होता. या भागास उद्देशून शास्त्रीबोवांनीं निबंधमालेंत मराठ्याचें वर्णन खालीलप्रमाणें केलें होतें:—

"(मराठा पत्र) वाचलें असतां बहुतेक मोठमोठीं इंग्रजी वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वाचण्याचें श्रेय येण्यासारखें आहे. व त्यामुळें दूरदूरच्या गांवीं सरकारी कामामुळें ज्यांस राहणें पडतें व जगांत काय चाललें आहे हें समजण्याचा ज्यांस चांगलासा मार्ग नसतो त्यांस तें विशेष उपयोगाचें आहे."

आपण घेतलेलें नांव 'मराठा' असें असलें तरी आपली दृष्टि संकुचित व आपला अभिमान केवळ प्रांतीय स्वरूपाचा नाहीं असें सांगून मराठ्यानें पहिल्याच लेखांत असें म्हटलें आहे कीं, "आमच्या इतिहासप्रसिद्ध नांवावरून कोणाला कदाचित अशी भीति वाटेल कीं, आम्ही इतरांच्या मुलुखांवर स्वाऱ्या व हल्ले लागूं करूं. पण ही भीति निराधार आहे. मराठा हें पत्र कांहीं थोड्या पुणेंकर ब्राह्मणांच्या हातीं राहिलें तरी तें कोणत्याहि विशिष्ट जातीचा अगर वर्गाचा बेसुमार अभिमान धरणार नाहीं; व या प्रतिज्ञेचें शक्य तितकें आजवर पालन झालें आहे असें आम्हास वाटतें." कोल्हापूरच्या खटल्यांत टिळकांना शिक्षा होऊन ते सुटून आल्यावर त्यांनीं फिरून मराठ्याचें डिक्लेरेशन केलें नाहीं. वासुदेवराव केळकर यांच्याकडेच टिळकांच्या गैरहजेरींत मराठ्याचें संपादकत्व आलें. तें त्यांजकडे ३ सप्टेंबर १८९१ पर्यंत होतें. या दिवशीं टिळकांनी केसरी व मराठा या दोनहि वर्तमानपत्रांचे जबाबदार संपादक म्हणून डिक्लेरेशन केलें.

केसरीबरोबरच मराठा पत्रहि टिळकांच्या मालकीचें होऊन त्यांच्या हातीं आलें. १८९७ सालीं सप्टेंबरच्या १२ तारखेपर्यंत टिळकांचे नांव मराठ्यावर संपादक म्हणून होतें. पण पुढील अंकापासून केळकरांचें नांव त्यांचे ठिकाणीं दाखल करण्यांत आलें व यानंतर पुढें केव्हांहि टिळकांनीं संपादक म्हणून आपलें नांव मराठ्यावर घातलेंच नाहीं. तरी केसरीप्रमाणें मराठ्यावरहि त्यांची सतत देखरेख असे. व त्यांचेंच धोरण म्हणजे केसरीचेंच धोरण केवळ भाषांतररूपानें नसलें तरी युक्तिवादाच्या व तत्त्वाच्या दृष्टीनें मराठ्यांतून प्रगट व्हावें अशी शिस्त होती. मराठ्याच्या स्वरूपांत व वर्गणींत या सर्व अवधींत एकदांच म्हणजे १९०३ सालीं फरक झाला. तो असा कीं, पूर्वी मराठ्याचा आकार मोठा होता तो लहान करण्यांत येऊन वर्गणी ७ रु. ४ आणे टपालहंशिलासह होती ती ४ रुपये करण्यांत आली. हा बदल झाला तेव्हां प्रथम मराठ्यांत आठच पानें घालण्यांत येत असत. पुढें तीं कायमचीं १२ करण्यांत आलीं व केव्हां सोळाहि काढलीं जातात.

मराठ्याचें हें स्वरूप अद्यापि आहे तसेंच आहे. मराठ्यासंबंधीं सांगण्याचा एक विशेष हा कीं, त्याचा आकार मामुली व त्याच्या प्रती फार थोड्या यामुळें केसरीसंबंधानें जी गोष्ट, म्हणजे स्वदेशी कागद वापरणें ही, कधीं करतां आली नाहीं ती मराठ्यासंबंधानें करतां येते. यामुळें आज पुष्कळ वर्षें मराठ्याला कागद पुणें येथील डेक्कन पेपर मिलचाच वापरण्यांत येत आहे. संपादकत्वाचे बाबतींत फरक झाला तो १९०८ सालीं झाला. तो असा. या सालीं केळकर यांजवर मराठा पत्राचे संपादक म्हणून मुंबई हायकोर्टाच्या बदनामीचा खटला होऊन त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. तेव्हां त्यांचेजागीं रा कृ. प्र. खाडिलकर यांचें नांव संपादक म्हणून मराठ्यावर घालण्यांत आलें. रा. खाडिलकर हे या वेळेस केसरीचे संपादक असल्यामुळें दोनही पत्रें त्यांच्याच नांवानें करणें सोयीचें होतें म्हणून तीं तशीं करण्यांत आलीं. पूर्वी १८९७च्या खटल्यानंतर केळकर हे केसरीपत्राचे कायदेशीर संपादक होते, पण केसरींतील लेख प्रायः खाडिलकर हेच लिहीत. त्याचप्रमाणें १९०८ च्या या खटल्यानंतर खाडिलकर हे मराठा पत्राचे कायदेशीर संपादक होते, पण मराठ्यांतील लेख प्रायः केळकर हेच लिहीत. अशी व्यवस्था एक वर्ष चालल्यावर केळकर यांनीं केसरी हातीं घेतला. त्याबरोबर मराठाहि हातीं घेतला व दोहोंचें डिक्लेरेशन त्यांनीं केलें. पुढें १९१८ सालीं केळकर विलायतेस जाणार म्हणून केसरी रा. खाडिलकर यांजकडे दिला त्याप्रमाणें मराठ्याचें डिक्लेरेशन रा. दामोदर विश्वनाथ गोखले बी. ए. एलएल्. बी. यांचे नांवें केलें. टिळकांनीं केसरीची प्रत्यक्ष जबाबदारी १९०८ पासून कायमची सोडली त्याप्रमाणें केळकरांनींहि मराठ्याची प्रत्यक्ष जबाबदारी १९१८ सालापासून सोडली. मराठा पत्राचें संपादकत्व पुढें १९३० पर्यंत रा. गोखले यांचेकडे सतत होतें. त्यासालीं त्यांना सत्याग्रहाच्या चळवळींत खटला होऊन तुरुंगवासाची शिक्षा झाली. तेव्हां त्यांच्या जागीं मराठ्याचे उपसंपादक म्हणून काम करीत असलेले गृहस्थ रा. दिनकर वासुदेव दिवेकर एम्. ए. यांच्या नांवें मराठ्याचें डिक्लेरेशन करण्यांत आलें.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरी टाईप फाउण्डरी

सन १८८८ च्या सुमारास केसरीचे वर्गणीदार सुमारें पांच हजारांपर्यंत वाढले होते. छापखान्यास लागणारे टाईप व इतर सामान वरचेवर बाहेरून विकत आणण्यास खर्च पडे. याकरितां केसरीला छापखान्याबरोबर स्वतःचे मालकीची टाईप फाउण्डरीहि असावी असें वाटूं लागलें. म्हणून आर्यभूषण छापखान्यांत कै. सहदेवराव पिंपळे, टाईप पंचमेकर, या अनुभवशीर व इमानी कामगारास ठेवून, त्यांस वेळोवेळीं टाईपसंबंधीं व फौउण्डरीसंबंधीं माहिती देऊन, लो. टिळकांनीं छापखान्याची फौउण्डरी सुरू करून चांगली नांवारूपास आणली. १८९१ सालीं केसरीच्या स्वरूपांत एक क्रांति झाली. ती म्हणजे पृष्ठसंख्या तित कीच कायम राहिली परंतु मोठ्या टाइपाऐवजीं लहान टाईप घातला. हाच लहान टाईप (म्हणजे गणपत कृष्णाजीचा पायका टाईप) केसरीकरितां प्रथम पाडला; व अजूनहि आर्यभूषण फौंडरीमध्यें 'केसरी पायका' या म्हटल्यास हाच गणपत कृष्णाजीचा टाईप पुढें करतील. पुढें कांहीं काळानें कारखान्याचें धडेवांटप होऊन आर्यभूषण छापखान्याची मालकी कै. वासुदेवराव केळकर व कै० हरिपंत गोखले यांचेकडे गेली; व केसरी—मराठा वर्तमानपत्रें व त्यावरील ७॥ हजार रुपयांचें कर्ज लो० टिळकांचे वांटणीस आले अशा रीतीनें टाईप फौंडरी वांटपांत दुसऱ्याच्य मालकीची झाल्या.मुळें, सन १९०५ सालीं, केसरी कचेरी गायकवाडवाड्यांत आल्यावर, टिळकांनीं खास केसरीकरितां फौंडरीची पुन्हा जुळवाजुळव करण्यास घेतली, व विलायतेस टाईप कास्टिंग मशीन व तदंगभूत लागणाऱ्या सामानाची ऑर्डर दिली. केसरी ज्या टाइपांत अगोदर छापत होता तोच पायका टाईप आपल्याला गणपत कृष्णाजी यांचेकडून आणावा असें ठरलें; व त्यांचेच हातचा ग्रेटप्रायमर, ग्रेटप्रायमर जत्रा, बर्भिक, थ्रीलाईन पायका अशा हेडिंग टाइपांकरितां मेट्रिसा ठोकून आणल्या. विलायतेहून टाईप कास्टिंग मशीन येईपर्यंत टिळकांनीं दुसरी एक गोष्ट केली. ती अशी. मुंबई येथील निर्णयसागर प्रेसमधील कै. राणोजी रावजी आरू, टाईप फाउंडर, यांचेसारखा वळणदार टाईप करणारा या हिंदुस्थानांत कोणी नव्हता असें म्हणतात. निर्णयसागरचा सर्व टाईप त्यांचेच हातचा आहे. तेव्हां निर्णयसागर छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांस 'आमचे फाउंड्रींत पाडण्याकरितां आपलेसारखा टाईप द्याल का' म्हणून विचारण्यास लोकमान्य मुंबईस गेले. वास्तविक निर्णयसागरचे मालक अशा मेट्रिसा दुसऱ्या कोणासच देत नाहींत. परंतु त्यांनीं केसरीकरितां म्हणून केसरी फाउंडरींत टाईप पाडण्यासाठीं त्यांचेच हातून मेट्रिसा ठोकून उदार मनानें दिल्या हें त्यांचे केसरीवर फार उपकार होत. सहा महिन्यांनीं कास्टिंग मशीन आल्यावर, आर्यभूषण टाईप फौंडरीचे मुख्य कामगार कै. महादेव दाजी पिंपळे यांस टिळकांनीं मागवून घेतलें. पहिल्या प्रथम त्यांनीं निर्णयसागरच्या पायका टाइपाच्या मेट्रिसा 'फिट' करून केसरीकरितां १००० पौंड टाईप १९०७च्या जुलै महिन्यांत दिला. त्यामुळें विक्रीचा पायका टाईप बाहेरून घेण्याचा त्यापुढें बंद करतां आला. नंतर हेडिंग टाइपांकरितां मोल्डही येथेंच तयार केले, व पहिल्याचप्रमाणें मेट्रिसा फिट करून एकेक बाहेरचा इतरहि टाईप घेण्याचें बंद केलें. पुढें पायका जत्रा याची अतिशय उणीव भासूं लागली तेव्हां, पंचाच्या मेट्रिसा ठोकून घेणें खर्चाच्या दृष्टीनें अधिक म्हणून टिळकांनीं बॅटरी व त्यास लागणारे इतर सामानाची तयारी केली, व आर्यभूषणचा पायका जत्रा नं. १ बॅटरीवर लावून केसरीकरितां पाडून घेतला.

मराठ्याकरितां इंग्रजी लॉंग प्रायमर हाही, बॅटरीवर मेट्रिसा काढून, १९११ ला टाईप पाडून घेतला. केसरीकरितां १९०१ सालीं आणलेल्या ट्रेडल मशिनवर सहा सहा महिन्यांनीं टाईप बदलावा लागत असे. तेव्हां आलटून पालटून एकदां गणपत कृष्णाजीचा पायका दिला तर दुसरे सहामाहीस निर्णयसागरचा टाईप दिला जाई. बाकी हेडिंग टाईप तोच नवीन पुनः पाडण्यांत येई. कै. सहदेवराव पिंपळे यांचेकडून केसरीकरितां त्यांचे घरगुती पंच लॉंग प्रायमर साधा नं. २ व बर्जेस साधा असे विकत घेऊन मेट्रिसा ठोकून टाईप तयार केले. विलायतेहून आणलेल्या एका मशीनवर २ पॉइंट-पासून २४ पॉइंटपर्यंत बरींच वर्षें टाइपाचें काम झालें. थ्रीलाईन व फोरलाईन हे हॅन्ड-मोल्डवर पाडून घेतले. फक्त पांच व सहालाईन तेवढे अजून बाहेरचा विक्रीचा घेतला जाई. परंतु १९२६ ला मोठी कास्टिंग मशीन विकत घेतली व हल्लीं त्यावर मोठे हेडिंग टाईप पाडले जातात. सध्या केसरीकरितां मराठी बर्जेस, बर्जेस जत्रा, लॉंगप्रायमर नं. १ व नं. २, लॉंगप्रायमर जत्रा नं. १ पायका निर्णयसागरचा, गणपत कृष्णाजीचा पायका, पायका जत्रा नं. १ व नं. २ चा, इंग्लिश बॉडी, ग्रेटप्रायमर, ग्रेटप्रायमर जत्रा, बर्भिक नं. १ व नं. २ चा, टूलाईन, थ्रीलाईन, फोरलाईन, पांचलाईन व सहालाईन म्हणजे एकंदर १९ निरनिराळे जातींचे फौंड तयार आहेत. मराठ्याकरितां इंग्रजी बर्जेस, लॉंगप्रायमर, लॉंगप्रायमर ब्लॉक, पायका, पायका ब्लॉक, टूलाईन वगैरे फौंड तयार आहेत. ह्याशिवाय जाहिरातींकरितां थोड्याफार बॉर्डरी व पंचांगाकरितां पंच करवुन मेट्रिसा ठोकून टाईप तयार केला आहे. टाईप फाउंडरींत तयार होणारें इतर सामान म्हणजे लेडा, कोटेशन्स, फर्नीचर वगैरे वगैरे सर्व येथेंच तयार करतों. सध्या फाउंडरी-मध्यें दोन लहान कास्टिंग मशीन्स म्हणजे २ पॉइंटपासून ते १८ पाडणारी, व एक मोठी २४ ते ७२ पॉइंटपर्यंत कोटेशनसह पाडणारी, अशा तीन कास्टिंग मशिन्स चालूं आहेत. आतां अजून मध्यम मशीनची म्हणजे १८ पॉइंटपासून थ्रीलाईन पडेल अशा मशीनची जरूरी भासूं लागली आहे. आज केसरीकरितां बाहेरील विक्रीचा टाईप आणण्याची गरज उरली नाहीं असें म्हणण्यास कांहींएक हरकत वाटत नाहीं!

लो० टिळकांचें ह्या टाईप फाउंडरीवर किती ममत्व होतें याचें एकच प्रत्यंतर म्हणून श्री. बाबासाहेब विद्वांस यांना मंडालेहून १९०९चे जानेवारींत लिहिलेल्या टिळकांच्या पत्रांतील उतारा देतों:—'आपली टाईप फाउंडरी वाड्याबाहेर कोठें तरी दुसऱ्या एखाद्या घरीं ठेवावी, तिचे हिशेब स्वतंत्र ठेवावे, प्रेस आक्टामुळें असें करणें अगदीं अवश्य आहे'! म्हणजे टाईप फाउंडरीकरितां केलेले परिश्रम, व गणपत कृष्णाजी व निर्णयसागरचे मालकांस आपण टाकलेले शब्द, हे फुकट जाऊं नयेत याविषयीं टिळकांना पराकाष्ठेची चिंता वाटे.

केसरी वर्तमानपत्राचा मजकूर थोड्या वेळांत लाइनो अगर मोनो टाइपाप्रमाणें कसा कंपोज करतां येईल, व या यंत्राचा मराठी टाइपाकडे उपयोग करण्यास टाइपांत काय फेरबदल करावा लागेल ह्या गोष्टींकडे लो० टिळकांचें लक्ष सन १९०४ मध्यें लागलें होतें. त्या वेळचे आर्यभूषण फाउंडरीचे मुख्य कै. सहदेवराव पिंपळे यांचेकडून अर्ध्या अक्षरांचें पंच करवून बरींच अक्षरें कान्यावर घेतलीं, व त्याचा टाईप पाडून तो केसरींत १९०४ डिसेंबरमध्यें घालूनहि पाहिला. मुंबईस निर्णयसागरचे मालकास सांगून कै. राणोजी आरु यांचेकडून हाच वळणदार टाईप तयार करविला. फिरून त्याची सुधारणा १९१४ सालीं लोकमान्यांच्याच देखरेखीखालीं झाली. मोनो मशीनवर केसरीचे टाईप जुळविण्याची व्यवस्था परतंत्र असल्यामुळें ती लोकमान्यांना आपल्या हयातींत अमलांत आणतां आली नाहीं! पण त्यानंतर आणखी त्यांत सुधारणा १९२६ पासून सुरू आहे. या अखंड टाइपाची १९२६ मध्यें सुधारणा केली त्याचे पंच कै. सहदेवराव पिंपळे यांचे चिरंजीव रा. नारायणराव पिंपळे यांनींच तयार करून दिले. तसेच इंग्लिश बॉडी हा सर्व फाउंड यांचेच हातचा आहे; व केव्हांहि किरकोळ लागणारे इतर पंच ते आपला जुना वडिलांचा संबंध लक्षांत ठेवून केसरीला उदार मनानें तयार करून देतात हें त्यांस भूषणावह आहे. सध्या ते आपल्या वडिलांचे जागेवर म्हणजे आर्यभूषण टाईप फाउंडरीमध्यें पंचमेकर म्हणूनच आहेत. असो; हल्लींच्या या प्रसंगीं, ज्यांनीं ज्यांनीं केसरी फौंडरीला हस्तेंपरहस्तें मदत केली त्यांना कृतज्ञता-बुद्धीनें प्रणाम करून ही माहिती संपवितों.

सदरील खालील मजकूर प्रथमच्या टिळक टाईपांतच तुलनात्मक दृष्टीनें देत आहों.

पं. दत्तात्रय कृष्ण देवधर—[चित्रकार, मूर्तिकार, चालक सहकारी उद्योग-शाळा सांगली.] हे आठवणी व आख्यायिका खंड ३ मध्यें टिळक टाइपाविषयीं म्हणतात:—

"लो० टिळकांचे मनांतून केसरी पत्र आठवड्यांतून दोनदां काढावयाचें होतें व त्याचा फैलाव लोकशिक्षणाकरितां जोरानें करावयाचा होता, त्यास साधन म्हणून यंत्रानें टाईप पाडणें व त्यावरून आपोआप मजकूर जुळेल असा करणें अवश्य होतें. म्हणून ते त्या प्रयत्नास हिंदुस्थानांत सर्वांच्या आधीं लागले. यावरून लोकमान्य हे मराठी टाइपाची सुधारणा करण्याविषयींचे आद्य कल्पक प्रेरक व प्रवर्तक होत.'

"हल्लीं मराठी टाईप तीन ओळींनीं जुळवावा लागतो तो असा. वरच्या मात्रा वेलांट्या, अनुस्वार, रफार व चंद्रमा इत्यादींची एक ओळ. मधल्या अक्षराची एक ओळ. खालच्या उकार, ऋकार, पायमोडचिन्ह इत्यादीची ओळ. याप्रमाणें तीन ओळी. पहिली ओळ अक्षराचा अंश असल्यामुळें तिला डिग्रीची ओळ म्हणतात. मराठी टाइपांत डिग्र्या जोडण्याचा त्रास फार. तो टाईप इंग्रजी स्पेलिंगप्रमाणें लागोपाठ सुटसुटीतपणें जुळवितां येत नाहीं. व हल्लीं विलायती यंत्रसाधनें उपलब्ध झाल्यामुळें व त्यांनीं मजकूर जुळविण्याचें काम फार जलद होतें. त्यायोगें वर्तमान-पत्रें लोकांच्या हातांत लवकर व नियमित पडूं लागून ज्ञानविषयक मजकूर पुष्कळ वाचण्यास मिळूं लागला व लोकशिक्षण लवकर देतां येऊं लागलें. विलायती साध-नांचा (टाइपिंग मशीनचा) उपयोग मराठी टाइपास करून घ्यावा असा उद्देश लोकमान्यांचा होता; व त्याप्रमाणें तो सर्व टाईप—सुधारकांचाहि आहे हें येथें सांगणें आवश्य आहे."

"लो० टिळकांनीं आपला टाईप विलायती मोनोटाइपांत बसेसा केलेला आहे. व त्यांनीं तो आपलें पूर्वापार वळण बिलकुल बिघडूं न देतां ठेविला आहे हें विशेष आहे. इतर सर्वांच्या व माझ्याहि टाइपांत हा मुद्दा सुटलेला आहे. याविषयींचे टिळकांचे म्हणणें असें असे —"लोकांच्या डोळ्यांत न खुपेल अशी आस्ते कदम सुधारणा असावी. मी याबाबतींत फार 'कॉन्झर्वेटिव्ह' असें म्हटल्यास चालेल. सर्वच सुधारणेचा मक्ता आपण केव्हांहि घेऊं नये. आज थोडी सुधारणा करावी. ती पचनीं पडली कीं उद्यां थोडी करावी. याप्रमाणें सर्व आस्ते आस्ते व लोकांच्या क्षोभास पात्र न होईल अशी ती असावी. केव्हांहि सुधारणा करण्यास पुढील पिढीस वाव ठेवावा म्हणजे आपल्यावर व लोकांवर बोजा न पडतां सर्व काम निमूटपणें होतें. आपण मागें रेंगाळतहि चालतां नये किंवा पुढेंहि धांवपळ करतां नये. मी या दृष्टीनेंच टाइपांत सुधारणा केली आहे."

"लो० टिळक विलायतेस गेले असतां तेथें त्यांनीं आपला टाईप नेलेला होता. मोनोटाइप यंत्रें बनविणाऱ्या कंपनीकडून आपल्या योजनेप्रमाणें कांहीं टाइपांचे नमुने पाडवून घेतले व त्यावरून सदरचे टाईप केसरींत नमुन्यादाखल आहेतहि. हल्लीं चालीत असलेला त्यांचा टाईप पूर्वींपेक्षां पुष्कळ सुवाच्य असून तो लोकांच्या डोळ्यांत खुपेसा नाहीं. याचें एकच प्रत्यंतर म्हणजे याविषयीं कोणाची ओरड नाहीं."

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

टिळक टाइपाच्या वर्णमालेचा नमुना

टिळक टाइप	निर्णयसागर टाइप	टिळक टाइप	निर्णयसागर टाइप	टिळक टाइप	निर्णयसागर टाइप
अ	अ	ध	ध	श्र	श्र
इ	इ	न	न	प्र	प्र
ई	ई	प	प	स्त	स्त
उ	उ	फ	फ	ख्र	ख्र
ऊ	ऊ	ब	ब	स्थ	स्थ
ए	ए	भ	भ	स्न	स्न
ऐ	ऐ	म	म	त्र	त्र
क	क	य	य	द्य	द्य
ख	ख	र	र	न्न	न्न
ग	ग	ल	ल	द्म	द्म
घ	घ	व	व	ष्य	ष्य
च	च	श	श	म्र	म्र
छ	छ	स	स	क्र	क्र
ज	ज	ष	ष	न्र	न्र
झ	झ	ह	ह	भ्र	भ्र
ञ	ञ	ळ	ळ	म्र	म्र
ट	ट	क्ष	क्ष	ग्र	ग्र
ठ	ठ	ज्ञ	ज्ञ	भ्र	भ्र
ड	ड	थ	थ	श्व	श्व
ढ	ढ	त्त	त्त	घ्र	घ्र
ण	ण	क्त	क्त	ज्र	ज्र
त	त	त्र	त्र	कृ	कृ
थ	थ	ऌ	ऌं		
द	द	श्च	श्च		

लो. टिळक टाइपाची वर्णमाला.

(१९०४ मध्यें प्रथम केलेला फौंड)

स्वरांचीं अक्षरें.

१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ १०

अ इ ई उ ऊ ऋ ए ऐ उं ऊं

कान्याचीं अर्धीं अक्षरें.

११ १२ १३ १४ १५ १६ १७ १८ १९ २० २१ २२ २३ २४

२५ २६ २७ २८ २९ ३० ३१ ३२ ३३ ३४

कान्याचीं मात्रेची अपूर्ण व्यंजनें-अर्धीं अक्षरें

३५ ३६ ३७ ३८ ३९ ४० ४१ ४२ ४३ ४४ ४५ ४६ ४७

४८ ४९ ५० ५१ ५२ ५३ ५४ ५५ ५६ ५७

कान्याच्या अर्ध्या व्यंजनास पूर्ण होणारीं स्वरचिन्हें

५८ ५९ ६० ६१ ६२ ६३ ६४ ६५ ६६ ६७ ६८ ६९

७० ७१ ७२ ७३ ७४ ७५ ७६ ७७ ७८ ७९

क आणि फ, यांच्या बाराखडीस लागणारीं स्वरचिन्हें.

८० ८१ ८२ ८३ ८४ ८५ ८६ ८७ ८८ ८९ ९० ९१ ९२ ९३ ९४

बिन कान्याचीं व्यंजनें.

९५ ९६ ९७ ९८ ९९ १०० १०१ १०२ १०३ १०४ १०५ १०६ १०७

१०८ १०९ ११० १११ ११२ ११३ ११४ ११५ ११६ ११७ ११८

११९ १२० १२१ १२२ १२३ १२४ १२५ १२६ १२७ १२८ १२९ १३०

१३१ १३२ १३३ १३४ १३५ १३६ १३७ १३८ १३९ १४०

१४१ १४२ १४३ १४४ १४५ १४६ १४७ १४८

वरील अक्षरांचें बाराखडीस लागणारीं स्वरचिन्हें.

१४९ १५० १५१ १५२ १५३ १५४ १५५ १५६ १५७ १५८ १५९ १६० १६१

अर्धीं जोडाक्षरें.

१६२ १६३ १६४ १६५ १६६ १६७ १६८ १६९ १७० १७१ १७२

१७३ १७४ १७५ १७६ १७७ १७८ १७९ १८० १८१ १८२

१८३ १८४ १८५ १८६ १८७ १८८ १८९

आकडे व विरामचिन्हें वगैरे.

१९० १९१ १९२ १९३ १९४ १९५ १९६ १९७ १९८ १९९ २०० २०१

१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ० ॰ –

२०२ २०३ २०४ २०५ २०६ २०७ २०८ २०९ २१० २११ २१२ २१३

! । : । (* ' ऽ ; . , -

(सन १९१४ मध्यें सुधारून केलेला फौंड)

स्वरांचीं अक्षरें.

१ २ ३ ४ ५

अ इ उ ऋ ए

कान्याचीं अपूर्ण व्यंजनें-अर्धीं अक्षरें.

६ ७ ८ ९ १० ११ १२ १३ १४ १५ १६ १७ १८ १९ २० २१

२२ २३ २४ २५ २६ २७ २८

कान्याच्या अर्ध्या व्यंजनास पूर्ण होणारीं स्वरचिन्हें.

२९ ३० ३१ ३२ ३३ ३४ ३५ ३६ ३७ ३८ ३९ ४० ४१ ४२ ४३ ४४

४५ ४६ ४७ ४८ ४९ ५० ५१ ५२ ५३ ५४ ५५ ५६

ल, क, फ यांच्या बाराखडीस लागणारीं स्वरचिन्हें.

५७ ५८ ५९ ६० ६१ ६२ ६३ ६४ ६५ ६६ ६७ ६८ ६९ ७० ७१

विनकान्याचीं व्यंजनें.

७२ ७३ ७४ ७५ ७६ ७७ ७८ ७९ ८० ८१ ८२ ८३ ८४ ८५ ८६ ८७

८८ ८९ ९० ९१ ९२ ९३ ९४ ९५ ९६ ९७ ९८ ९९ १०० १०१ १०२

१०३ १०४ १०५ १०६ १०७ १०८ १०९ ११० १११

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

र रू रूं ह हु हृ ळ ळु क्ष

वरील अक्षरांनीं बाराखडीस लागणारीं स्वरचिन्हें.

११२ ११३ ११४ ११५ ११६ ११७ ११८ ११९ १२० १२१

ं ा ॅ ः ु ु ू ू ु ू

१२२ १२३ १२४ १२५ १२६

ू ु ः ृ ॄ

अर्धी जोडाक्षरें.

१२७ १२८ १२९ १३० १३१ १३२ १३३ १३४ १३५ १३६ १३७ १३८

च्छ ळ = त्र क्त हृ ड्ड श्च × द्ध ड्ड ड्ड

१३९ १४० १४१ १४२ १४३ १४४ १४५ १४६ १४७ १४८ १४९ १५०

क्त ऋ क्त ड्ड द्द ड्ड हृ श्च ड्ड ड्ड ड्ड ड्ड

१५१ १५२ १५३ १५४ १५५ १५६ १५७

ड्ड ड्ड ड्ड ड्ड ड्ड ड्ड क्र

आकडे व विरामचिन्हे वगैरे.

१५८ १५९ १६० १६१ १६२ १६३ १६४ १६५ १६६ १६७ १६८ १६९

१ २ ३ [४ ५ ६ ७ ८ ९ ० — *

१७० १७१ १७२ १७३ १७४ १७५ १७६ १७७ १७८ १७९ १८० १८१

?) । : ! ! . , ; - ऽ ॰

(सन १९२६ मध्यें सुधारून केलेला फौंड)

स्वरांची अक्षरें.

१ २ ३ ४ ५

अ इ उ ऋ ए

कान्याची अपूर्ण व्यंजनें–अर्धी अक्षरें.

६ ७ ८ ९ १० ११ १२ १३ १४ १५ १६ १७ १८ १९ २० २१

२२ २३ २४ २५ २६ २७ २८

कान्याच्या अर्ध्या व्यंजनास पूर्ण होणारीं स्वरचिन्हें.

२९ ३० ३१ ३२ ३३ ३४ ३५ ३६ ३७ ३८ ३९ ४० ४१ ४२ ४३ ४४ ४५

ा ां ि िं ि ि ि ु ू ु ू ु ू ो ों ौ ौं

४६ ४७ ४८ ४९ ५० ५१ ५२ ५३ ५४ ५५ ५६

ो ों ौ ौं ि ि ु ू ु ों ौं

ल, क, फ यांच्या बाराखडीस लागणारी स्वरचिन्हें.

५७ ५८ ५९ ६० ६१ ६२ ६३ ६४ ६५ ६६ ६७ ६८ ६९ ७० ७१

७२ ७३ ७४ ७५ ७६

बिनकान्याचीं व्यंजनें.

७७ ७८ ७९ ८० ८१ ८२ ८३ ८४ ८५ ८६ ८७ ८८ ८९ ९० ९१ ९२ ९३ ९४

ङ्ग छ छु छू छ्र ट टु टू ट्ट ट्र ठ ठु ठू ड डु डू ड्र ढ

९५ ९६ ९७ ९८ ९९ १०० १०१ १०२ १०३ १०४ १०५ १०६ १०७ १०८

ढु द्म द दु दू द्व द्ध द्ध द्द द्भ द्य द्र द्ग द्

१०९ ११० १११ ११२ ११३ ११४ ११५ ११६ ११७

र रू रूं ह हु हृ ळ ळु क्ष

वरील अक्षराचें बाराखडीस लागणारीं स्वरचिन्हें.

११८ ११९ १२० १२१ १२२ १२३ १२४ १२५ १२६ १२७ १२८ १२९

१३० १३१ १३२ १३३ १३४

अर्धी जोडाक्षरें.

१३५ १३६ १३७ १३८ १३९ १४० १४१ १४२ १४३ १४४ १४५ १४६ १४७

१४८ १४९ १५० १५१ १५२ १५३ १५४ १५५ १५६ १५७ १५८ १५९ १६०

१६१ १६२ १६३ १६४ १६५ १६६

आकडे व विरामचिन्हे वगैरे.

१६७ १६८ १६९ १७० १७१ १७२ १७३ १७४ १७५ १७६ १७७ १७८ १७९

१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ० — * ,

१८० १८१ १८२ १८३ १८४ १८५ १८६ १८७ १८८ १८९ १९०

(। : ! ! . , ; - ऽ ॰

(सन १९१४ मध्यें सुधारून केलेला टिळक टाइपाचा मजकूर)

श्रीमद्भगवद्गीता हा आमच्या धर्मग्रंथांपैकीं एक अत्यंत तेजस्वी व निर्मल हिरा आहे. पिंडब्रम्हांडज्ञानपूर्वक आत्मविद्येचीं गूढ व पवित्र तत्त्वें थोडक्यांत पण असंदिग्ध रीतीनें सांगून त्यांच्या आधारें मनुष्यमात्रास आपल्या आध्यात्मिक पूर्णावस्थेची म्हणजे परम पुरुपार्थाची ओळख करून देणारा, आणि त्याबरोबरच भक्तीची ज्ञानाशीं व अखेर या दोहोंचीहि शाश्वतः प्राप्त होणाऱ्या व्यवहारांशीं सोपपत्तिक व सुंदर जोड घालून संसारांत भांबावून गेलेल्या मनास शांत आणि विशेषतः निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा, यासारखा दुसरा बालबोध ग्रंथ संस्कृतांतच काय पण जगांतील इतर वाङ्मयांतहि सांपडणें दुर्मिळ होय. केवळ काव्य या दृष्टीनें जरी याचें परीक्षण केलें, तरी आत्मज्ञानाचे अनेक गहन सिद्धान्त प्रासादिक भाषेनें आबालवृद्धांस सुगम करणारा आणि ज्ञानयुक्त भक्तिरसानें भरलेला हा ग्रंथ उत्तम काव्यांत गणिला जाईल. मग सकल वैदिक धर्माचें सार श्रीभगवंतांचे वाणीनें ज्यांत सांठविलें गेलें त्याची योग्यता काय वर्णावी! भारतीय युद्ध समाप्त होऊन कृष्ण व अर्जुन प्रेमानें गोष्टी बोलत बसले असतां श्रीभगवंतांचे मुखानें गीता पुनः ऐकण्याच्या इच्छेनें अर्जुनानें एक दिवस श्रीकृष्णांस अशी विनंति केली कीं, "युद्धारंभीं तुम्हीं केलेला उपदेश मी विसरलों; मला तो कृपा करून फिरून सांगा." तेव्हां, "सदर उपदेश त्या प्रसंगीं अत्यंत योगयुक्त चित्तानें केला असल्यामुळें तो पुनः तसाच सांगणें मलाहि अशक्य आहे!" असें भगवंतांनीं त्यास उत्तर दिलें, म्हणून अनुगीतेच्या आरंभीं म्हटलें आहे (म. भा. अश्वमेध, अ. १६ श्लो. १०–१३) वास्तविक पाहिलें तर, भगवंतांस अशक्य असें कांहींच नाहीं, पण त्यांनीं सुद्धां गीता पुनः सांगणें अशक्य म्हणावें, यावरून गीतेची थोरवी केवढी मोठी आहे हें मात्र चांगलें व्यक्त होतें. वैदिकधर्मांतील भिन्नभिन्न संप्रदायांस वेदाप्रमाणें हा ग्रंथ आज सुमारें अडीचहजार वर्षें,–सर्वांस एकसारखाच–मान्य व प्रमाणभूत होऊन बसला आहे, यांतील बीजहि हेंच असून, याच कारणास्तव—

(ओळी २५)

(सन १९२६ मध्यें सुधारून केलेला टिळक टाइपाचा मजकूर)

श्रीमद्भगवद्गीता हा आमच्या धर्मग्रंथांपैकीं एक अत्यंत तेजस्वी व निर्मल हिरा आहे पिंडब्रम्हांडज्ञानपूर्वक आत्मविद्येचीं गूढ व पवित्र तत्त्वें थोडक्यांत पण असंदिग्ध रीतीनें सांगून त्यांच्या आधारें मनुष्यमात्रास आपल्या आध्यात्मिक पूर्णावस्थेची म्हणजे परम पुरुपार्थाची ओळख करून देणारा, आणि त्याबरोबरच भक्तीची ज्ञानाशीं व अखेर या दोहोंचीहि शाश्वतः प्राप्त होणाऱ्या व्यवहारांशीं सोपपत्तिक व सुंदर जोड घालून संसारांत भांबावून गेलेल्या मनास शांत आणि विशेषतः निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा यासारखा दुसरा बालबोध ग्रंथ संस्कृतांतच काय पण जगांतील इतर वाङ्मयांतहि सांपडणें दुर्मिळ होय. केवळ काव्य व दृष्टीनें जरी याचें परीक्षण केलें, तरी आत्मज्ञानाचा अनेक गहन सिद्धान्त प्रासादिक भाषेनें आबालवृद्धांस सुगम करणारा आणि ज्ञानयुक्त भक्तिरसानें भरलेला हा ग्रंथ उत्तम काव्यांत गणिला जाईल. मग सकल वैदिक धर्मांचे सार श्रीभगवंतांचे वाणीनें ज्यांत सांठविलें गेलें त्याची योग्यता काय वर्णावी? भारतीयं युद्ध समाप्त होऊन श्रीकृष्ण व अर्जुन प्रेमानें गोष्टी बोलत बसलें असतां भगवंतांचे मुखानें गीता पुनः ऐकण्याच्या इच्छेनें अर्जुनानें एक दिवस श्रीकृष्णांस अशी विनंति केली कीं, 'युद्धारंभीं तुम्ही केलेला उपदेश मी विसरलों; मला तो कृपा करून फिरून सांगा." तेव्हां, "सदर उपदेश त्या प्रसंगीं अत्यंत योगयुक्त चित्तानें केला असल्यामुळें तो पुनः, तसाच सांगणें मलाहि अशक्य आहे!" असें भगवंतांनीं त्यांस उत्तर दिलें, म्हणून अनुगीतेच्या आरंभीं म्हटलें आहे. (म. भा. अश्वमेध, अ. श्लो. १०–१३) वास्तविक पाहिलें तर, भगवंतांस अशक्य असें कांहींच नाहीं, पण त्यांनीं सुद्धां गीता पुनः सांगणें अशक्य म्हणावें, यावरून गीतेची थोरवी केवढी मोठी आहे हें मात्र चांगलें व्यक्त होतें. वैदिकधर्मांतील भिन्नभिन्न संप्रदायांस वेदाप्रमाणें हा ग्रंथ आज सुमारें अडीच हजार वर्षें,–सर्वांस एकसारखाच-मान्य व प्रमाणभूत होऊन बसला आहे, यांतील बीजहि हेंच असून, याच कारणास्तव—

(ओळी २२)

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



गद्रे वाडा—:[वरील दिवाणखान्यांत न्यू इंग्लिश स्कूलच्या संस्थापकांची केसरी-मराठा वर्तमानपत्रें काढण्याची कल्पना जन्मास आली.]



होळकर वाडा [वरील वाड्यांत केसरी-मराठ्याचे संपादक उपसंपादक मंडळ वादविवाद करी.]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



मोरोबादादा वाडा.

[वरील इमारतींत केसरी व मराठा पत्रें आर्यभूषण छापखान्यांत प्रथम छापलीं गेलीं]



फडके वाडा (विठ्ठल प्रेस).

[लो० टिळकांवरील पहिल्या खटल्यानंतर केसरी कांहीं महिने या वाड्यांतील या छापखान्यांत छापला जात असे]



मोरोबादादा वाडा–पिछाडी (छापखाना)

[१९०२ सालीं केसरीकरितां 'डबलफीडर' यंत्र घेतलें तें प्रथम मोरोबादादा फडणीसवाड्याच्या पिछाडीच्या या भागांत उभें करून येथें कांहीं वर्षे केसरी छापण्यांत येत असे]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



विंचुरकर वाडा (दर्शनी)

[वरील वाड्यांत लो० टिळक पुष्कळ वर्षें राहत होते व केसरीची कचेरी प्रथम याच वाड्यांत कांहीं वर्षें होती]



विंचुरकर वाडा (लॉ क्लास)

[वरील इमारतींत टिळकांचा वकिली विद्यार्थ्यांचा वर्ग असून संपादक उपसंपादक मंडळ येथेंहि काम करीत]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



मंडाले येथील तुरुंग

[वरील इमारतभागांत लो० टिळक कांहीं दिवस राहत होते.]



गांधीवाडा (सदाशिव पेठ हौदाजवळ)

[विंचुरकरांचे घरांतून निघाल्यावर वरील इमारतींत कांहीं वर्षें केसरी कचेरी ठेविली होती]



विंचुरकर वाडा

[वरील इमारतभागात लो० टिळक १९०५ पर्यंत राहत होते]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड.

[महाराजांच्या कृपेमुळें केसरीला गायकवाडवाडा मिळाला]

गायकवाड वाडा—बाहेरून दिसणारा भाग

[या इमारतींत खालीं व वरच्या मजल्यांत व्यवस्थापक व संपादक यांच्या कचेऱ्या हल्लीं आहेत]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



गायकवाड वाडा

(आंतून दर्शनी भाग –उत्तराभिमुख)



लो० टिळकांचें राहतें घर.

[गायकवाडवाड्यांतील हा पश्चिमाभिमुखी अर्धभाग हें लो० टिळकांचें राहतें घर होतें. हा भाग हल्लीं त्यांचे चिरंजिवाकडे आहे.]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



यंत्रघर (गायकवाड वाडा)

[वरील इमारतींत केसरी-मराठ्याच्या छपाईचीं सर्व यंत्रें आहेत]



कंपोझिंगरूम

[वरील इमारतींत केसरीच्या कंपोझिंगचें (ठसे जुळण्याचें) काम केलें जातें]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



पेपर गोडाउन.
[वरील इमारतीच्या खालच्या भागांत केसरीच्या कोऱ्या कागदाचा संग्रह असतो.]



केसरीची कचेरी नं. २.
[ही इमारत गायकवाड वाड्यासमोर असून तींत केसरीकचेरीचा काांही भाग असतो.]

टिळक रोडवरील केसरीची जागा.
[टिळकरोडवरील ही विस्तीर्ण मोकळी जागा केसरीकारखाना वगैरे वाढविण्यांत आल्यास उपयोगी म्हणून विकत घेऊन ठेवली आहे.]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरी–मराठा संस्थेचे पितृगृह



(गायकवाडवाडा, नारायण पेठ पुणें.)

केसरी–ट्रस्टसंबंधीं कांहीं कागदपत्र

लो. टिळकांनीं सार्वजनिक हितबुद्धीनें स्वार्थत्यागपूर्वक केसरी–मराठा या वर्तमानपत्रांचा, तसेंच त्यांच्या छापखाना वगैरे मिळकतींचा, ट्रस्ट केला आणि त्यावरील खासगी स्वरूपाच्या स्वत्वाची निवृत्ति केली. हें टिळकांच्या मृत्यूनंतर लवकरच केसरी-मराठ्याच्या वाचकांना कळून आलें होतें. तारीख १७ ऑगस्ट १९२० च्या केसरींत आम्हा ट्रस्टींच्या सहीवर खालील जाहीर विनंति प्रसिद्ध झाली होती.

केसरी–मराठा पत्रांची व्यवस्था

लो० टिळक यांनीं राष्ट्रार्थपणें आजन्म चालविलेल्या केसरी–मराठा पत्रांची व्यवस्था त्यांचे पश्चात् काय होत आहे हें जाणण्याची त्यांच्या सर्व हितचिंतकांना सहजच उत्सुकता व चिंता असणार. पण सर्व गोष्टी त्यांच्या अपेक्षेप्रमाणेंच घडून आलेल्या आहेत. लो. टिळक यांनीं कोलंबो येथें ता. ५ एप्रिल १९१८ रोजीं जे मृत्युपत्र केलें त्यानंतर दुसरें कोणतेंहि मृत्युपत्र केलेलें नाहीं. व हें मृत्युपत्र काल रोजीं पुणें येथील सबरजिस्टर कचेरींत नोंदविण्यांत आलें आहे. सदर मृत्युपत्रानें केसरी–मराठा वर्तमानपत्रें व केसरी छापखाना या सर्वांचा मिळून 'सार्वजनिक ट्रस्ट' केला आहे. अर्थात् त्यावर यापुढें कोणाहि व्यक्तीचा खाजगी हितसंबंध राहणार नाहीं. "हा छापखाना व या वर्तमानपत्रांच्या कचेऱ्या वगैरे सर्व पूर्ववत् गायकवाडवाड्यांतच राहाव्या, तेथून केव्हांहि हलवूं नयेत, तसेंच केसरी–मराठा वर्तमानपत्रांचें धोरण आजवर होतें तसेंच यापुढेंहि राहावें, तें कोणत्याहि कारणानें बदलूं नये" अशी स्पष्ट आज्ञा लो. टिळक यांनीं आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेविली आहे. याशिवाय आपल्या वडिलांच्या इच्छा पूर्ण व्हाव्या या हेतूनें, व त्यांच्या मृत्युपत्रास दुजोरा देण्याकरितां, लो. टिळक यांच्या उभय चिरंजिवांनींहि काल रोजीं आमच्या उभयतांच्या नांवानें केसरी व मराठा या संस्थेचें (संस्थेकरितां मृत्युपत्रानें तोडून दिलेल्या सर्व मिळकती सुद्धां) ट्रस्टडीड रजिस्टर करून दिलें असून, यापुढील या संस्थेची सर्व व्यवस्था आम्हीं ट्रस्टी या नात्यानें करावयाची आहे. सदर संस्थेसंबंधीं कोणत्याहि बाबतींत मतभेद झाल्यास त्याचा निकाल खासगी रीतीनेंच लावण्याकरितां लो. टिळक यांनींच आपल्या मृत्युपत्रांत १ रा. न. चिं. केळकर, आणि टिळकांचे उभय जामात म्हणजे २ रा. विश्वनाथ गंगाधर केतकर, बी. ए. एलएल्. बी. वकील नाशिक व ३ डॉ. श्रीरंग मोरेश्वर साने बी. एससी. पी. एच्. डी. मुंबई, या तिघांस पंच म्हणून नेमून दिलें असून, लो. टिळक यांच्या चिरंजीवांनींहि त्यांसच आपलेहि पंच म्हणून मान्यता दिली आहे. उभय चिरंजिवांचे शिक्षणाकरितां व संसाराकरितां खर्चाची कायमची तजवीज स्वतंत्र रीतीनें करण्यांत आली असल्यामुळें, त्यांचा केसरी–मराठा संस्थेवर यापुढें प्रत्यक्ष बोजा असा कांहींच राहणार नाहीं. तथापि आपल्या वडिलांनीं निर्माण केलेली ही संस्था चालविण्यास ते आपलें शिक्षण पूर्ण करून लवकर पुढें येतील अशी लोकांची अपेक्षा आहे, व तसें पुढें येऊन वडिलार्जित राष्ट्रीय कार्याची धुरा ते स्वीकारतील तेव्हां दुधांत साखर पडली असें वाटून सर्वांसच आनंद होईल. असो. लो. टिळक यांचे इच्छेप्रमाणें आम्हीं उभयतां केवळ ट्रस्टी या नात्यानें सदर संस्थेचें काम यथाशक्ति चालवूं. त्यास सर्व हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय पक्षाची मदत व सहानुभूति असावी अशी प्रार्थना आहे.

पुणें
ता. १७।८।२०

न. चिं. केळकर,
धों. वा. विद्वांस,
ट्रस्टी 'केसरी व मराठा–संस्था'.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्यानंतर कांहीं वर्षेपर्यंत ट्रस्टचें काम निर्विवाद रीतानें चालू होतें. परंतु सन १९२४ सालापासून लो. टिळकांच्या चिरंजिवांनीं ट्रस्टसंबंधीं वाद उत्पन्न केला. या वादाला अनेक रीतांनीं तोंड फुटलें. दिवाणी फौजदारी कोर्टापर्यंतहि हें प्रकरण गेलें. अद्यापि त्यांतील एका दाव्यांतलें अपील (रा. रामभाऊ टिळक यांनीं केलेलें) मुंबई हायकोर्टापुढें निकालाची वाट पाहतच आहे. या अपिलाचा निकाल कसाहि होवो, परंतु या प्रकरणांतले कांहीं महत्त्वाचे कागदपत्र हे नित्य अबाधित स्वरूपाचेच राहणारे असल्यामुळें, त्यांना कायद्याप्रमाणें इतिहासाचेंहि स्वरूप आहे. म्हणून केसरीसंबंधीं अव्वल महत्त्वाच्या स्वरूपाचे कांहीं कांहीं कागदपत्र जसेच्या तसे या 'ज्युबिली अंकांत' छापण्याचें ठरविल्याप्रमाणें, ते खालीं देतों. यांपैकीं कांहींचा उल्लेख किंवा स्थूल दिग्दर्शन मधून मधून विशिष्ट प्रसंगीं (म्हणजे ट्रस्टच्या वादांतून निघालेल्या दिवाणी फौजदारी दाव्यांची माहिती किंवा त्यांच्या निकालांच्या बातम्या केसरी—मराठा वर्तमानपत्रांतून देतांना) झालेंच होतें. तथापि दाव्यांचें काम सुरू होतें म्हणून, वकिलांच्या सल्ल्यावरून, आम्ही कागदपत्र असे पूर्वी कोणतेच छापले नव्हते. परंतु हा ज्युबिलीचा प्रसंग फार महत्त्वाचा म्हणून त्या प्रसंगानें या अंकांत ते सर्व एकदांचे छापून मोकळे व्हावें, असा आतां वकिलांचाहि सल्ला मिळाल्यावरून, ते आम्ही प्रसिद्ध करीत आहों.

लो० टिळकांचें पहिलें मृत्युपत्र (१९०९)

[हें मृत्युपत्र पुढें, ता. ५ एप्रिल १९१८ रोजीं, टिळकांनीं कोलंबो येथें केलेल्या मृत्युपत्रानें रद्द झालें. तथापि पहिल्या मृत्युपत्राला कायदेशीर नसलें तरी ऐतिहासिक स्वरूप असल्यामुळें, किंबहुना तेथूनच या ट्रस्टच्या मूळ कल्पनेचा अस्पष्ट पण निश्चित असा उगम असल्यामुळें तें येथें दिलें आहे.]

मेकटिला येथील तुरुंग, उत्तरब्रह्मदेश
ता. २० ऑगस्ट १९०९.

१ माझें वयाला चोपन्नावें वर्ष सुरू आहे. सहा वर्षांच्या कैदेपैकीं फक्त एकच संपलें आहे. म्हणून आतां हें मृत्युपत्र करून ठेवतों. त्यापूर्वीचीं लेखी किंवा तोंडी सर्व प्रकारचीं असतील तीं मृत्युपत्रें या लेखानें मी रद्द करीत आहे.

२ माझी बहुतेक सर्वच मिळकत स्वार्जित आहे.

३ माझी एकंदर मिळकत खालीलप्रमाणें आहे—

१ कोंकणांतील चिखलगांव येथील लहानसें ठिकाण.
२ पुण्यांतील गायकवाडवाडा म्हणतात ती जागा व इमारत
३ सिंहगड येथील बंगला.
४ लातूर येथील जिनिंग फॅक्टरीपैकीं तिसरा हिस्सा.
५ छापखाना, यंत्रें, टाइप, फौंडरी इत्यादि.
६ कुटुंबाचे दागिने व इतर जिन्नस.
७ मुंबई स्वदेशी को-ऑपरेटिव्ह कंपनीचे १० शेअर्स व पोस्टल बँकेंतील लहानशी रकम.
८ ग्रंथसंग्रह.
९ घरांतील कपडालत्ता, सामानसुमान, भांडींकुंडीं इ.
१० केसरी व मराठा या दोन वर्तमानपत्रांचे मालकीचे हक्क गुडवुईल व त्यासंबंधीं मालमिळकत.
११ विम्याची पॉलिसी.
१२ वर उल्लेख झाला नाहीं अशी किरकोळ मिळकत.

४ माझें येणें (१) बाबामहाराज यांचे इस्टेटीकडून सुमारें रु. २० हजारावर हिशेबी निघेल तें, (२) कोंकणांत जमिनीच्या तारणावर कर्जाऊ दिलेली लहानशी रकम व (३) इतर लोकांकडून किरकोळ हिशेबी घेणें निघेल तें असें आहे.

मी लोकांचें देणें आहे त्या रकमा—

रु. ७००० चित्रशाळेचे रा. वासुदेवराव जोशी यांचे.

रु. १५०० कै. माधवराव नामजोशी यांच्या मुलीची मजजवळ असलेली ठेव व हिशेबी कांहीं इतर किरकोळ देणें निघेल तें.

५ मी बाबामहाराजांचे इस्टेटीचा एक ट्रस्टी आहे. तसेंच पुणें डेक्कन बँकेंत सरदार बाळासाहेब नातू यांचे नांवें जमा असलेली रकम रु. २५००० व आर्यभूषण प्रेसकडे असलेली लहानशी रकम—या दोहोंचा मी एक ट्रस्टी आहे, व या दोन रकमा रायगडस्मारक फंडाच्या आहेत.

६ बाबामहाराजांच्या इस्टेटीच्या ट्रस्टींतून माझें नांव काढून घ्यावें. इतर ट्रस्टींनीं रा. यशवंतराव कुलकर्णी, इस्टेटीचे कारकून, यांना त्यांच्या चांगल्या नोकरीबद्दल, श्री. जगन्नाथ—महाराज हे इस्टेटीचे मालक झाल्यावर, कांहीं बक्षीस देववावें अशी माझी शिफारस आहे.

७ रा. दाजी आबाजी खरे यांना मी कळविल्याप्रमाणें, त्यांनीं सरदार नातू यांजकडून रायगडफंडांतील रकम घेऊन रायगडावरील श्रीशिवाजीमहाराजांचे छत्रीचें कार्य ठरलें आहे तें करावें.

८ चित्रशाळेचें कर्ज लातूर फॅक्टरीच्या नफ्यांतून हळुहळू फेडावें. पण त्यांतून तें फिटत नसल्यास फॅक्टरींतील माझा हिस्सा योग्य किंमतीला रा. वासुदेवराव जोशी यांचे नांवें खरेदी करून द्यावा.

९ बाबामहाराज यांच्या इस्टेटीकडून माझें येण्याची रकम सर्व वसूल झाल्यास, त्यांतील अर्धी माझ्या मुलांना द्यावी व अर्धी रकम केसरी—मराठा प्रेस इन्स्टिट्यूटकरितां 'इन्शुअरन्स फंड' म्हणून, किंवा आकस्मिक कारणाकरितां खर्चाला, ट्रस्ट मिळकत म्हणून बाजूला काढून ठेवावी.

१० कुटुंबाचे दागिने तिचे तिला स्त्रीधीन म्हणून द्यावे.

११ माझ्या नांवें असलेल्या रु. १५०० च्या प्रॉमिसरी नोटांच्या व्याजांतून माझी विधवा भावजय बहिणाबाई हिला दरसाल रु. ७० पोटगी म्हणून आणि माझ्या इतर मिळकतींतून एकदां रु. ५०० काशीयात्रेचा खर्च म्हणून द्यावे.

१२ कोंकणांतील खोती इस्टेटीवर माझ्या चुलतीच्या अन्न—वस्त्राचा हक्क आहे. तिच्या मरणोत्तर माझ्या हिस्शाची वांटणी न करतां त्याच्या उत्पन्नाचा कायमचा ट्रस्ट करावा; व त्याचें उत्पन्न कुलस्वामी लक्ष्मी केशव यांचे पूजेअर्चेकडे खर्च करीत जावें. तसेंच रु. २०० रकमेवरील व्याज दरसाल देवळाच्या दुरुस्तीकरितां देत जावें. वाड्यांतील गणपत्युत्सव पूर्वीसारखाच चालू ठेवावा व त्याचा खर्च प्रेस इन्स्टिट्यूटनें सोसावा.

१३ हल्लीं नुकतेंच, माझा वाडा त्यांतील सामान व ग्रंथसंग्रह यांचें बक्षिसपत्र मुलांचे नावानें मी करून दिलें आहे. तथापि आमच्या राहत्या घरभागाखेरीज इतर इमारत ग्रंथसंग्रह व सामानसुमान वगैरे हें, प्रेस इन्स्टिट्यूटकरितां, माझे मुलांनीं ट्रस्ट मिळकत म्हणून संभाळावें. पुढेंमागें वाड्याची वाटणी करण्याचा प्रसंग आल्यास मुलांनीं पूर्वेकडील राहाता घरभाग, समोरील मोठा दिवाणखाना, पिंपळाचा पार वगैरे भाग स्वतःकडे घ्यावा.

१४ प्रेस इन्स्टिट्यूटशिवाय बाकीची सर्व मिळकत मुलांनीं घ्यावी. विम्याच्या पॉलिसीची रकमहि त्यांनाच मिळावी. प्रेस इन्स्टिट्यूटकडे वर सांगितल्याप्रमाणें लावून दिलेल्याशिवाय इतर सर्व मिळकत दोघां मुलांना द्यावी. त्यांना इकडे किंवा परदेशांत जाऊन मिळण्यासारखें असेल तें उत्तम उच्च प्रतीचें शिक्षण द्यावें. व श्री. जगन्नाथमहाराज यांजकडील कर्ज वसूल न झालें तरी दोघां मुलांना प्रत्येकीं दहा दहा हजार रुपये वरील शिक्षणाकरितां देतां यावे म्हणून वीस हजाराची रकम बाजूला काढून ठेवावी. ही रकम त्यांच्या परदेशांतील शिक्षणाला किंवा इकडे एखादा स्वतंत्र धंदा करण्याला सुरवातीचें भांडवल म्हणून उपयोगी पडेल.

१५ या मृत्युपत्राचे एक्झिक्यूटर म्हणून मी खालील गृहस्थ नेमीत आहे:—

१ रा. धोंडोपंत विद्वांस	४ „ पांडुरंग गोपाळ बाळ
२ „ विश्वनाथपंत केतकर	५ „ दादासाहेब खापर्डे
३ „ वासुदेवराव जोशी	६ „ दाजीसाहेब खरे

यांनीं रीतसर अधिकारपत्र मिळवून, किंवा माझ्या मुलांची पालनकर्त्री म्हणून माझ्या कुटुंबाचे सल्ल्यानें, सर्व व्यवस्था करावी.

१६ केसरी व मराठा या वर्तमानपत्रांची मी 'इन्स्टिट्यूट' करीत आहे. व त्याच्या उपयोगाकरितां, ट्रस्ट मिळकत म्हणून छापखाना, यंत्रें, टाईपफौंडरी, सामान, पुस्तकें व केसरी--मराठा पत्रांवरील स्वामित्वाचे हक्क इत्यादि मी लावून देत आहे. या ट्रस्टला 'प्रेस इन्स्टिट्यूट' किंवा इतर कोणतेंहि योग्यतें नांव द्यावें.

१७ या ट्रस्टकरितां दोन किंवा अधिक ट्रस्टी असावेत. त्यांच्या ताब्यांत वरील सर्व मिळकत राखीव रिझर्व्ह फंड म्हणून असावी. वाडा मुलांचेकडे राहावा. तथापि वर सांगितल्याप्रमाणें त्यांतील कांहीं भाग या इन्स्टिट्यूटकरितां ट्रस्ट मिळकत म्हणून त्यांनीं समजावा. माझ्या मुलांपैकीं जर कोणी एखादा सज्ञान व लायक असेल तर त्याला ट्रस्टींपैकीं एक ट्रस्टी नेमण्यांत यावा.

१८ केसरी—मराठा वर्तमानपत्रांची व्यवस्था, वरील ट्रस्टान्वयें, श्री. नरसिंह चिंतामण केळकर व श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांजकडे द्यावी. त्यांनीं ती नाकारल्यास मगच दुसऱ्या कोणाला द्यावी. श्री. केळकर खाडिलकर हे स्वतः, किंवा त्यांचे वंशज, यांचा इन्स्टिट्यूटच्या मिळकतीवर कोणत्याहि प्रकारचा खासगी हक्क राहणार नाहीं.

१९ श्री. धोंडोपंत विद्वांस यांना, वरीलप्रमाणेंच, मॅनेजर म्हणून त्यांजकडे व्यवस्थापकाचें काम द्यावें.

२० केसरी पत्र, मराठा पत्र, व फौंडरी हीं तीन स्वतंत्र खातीं करावीं. जरूर तर त्यांना स्वतंत्र नांवेंहि द्यावीत.

२१ हल्लींप्रमाणें महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाचीं मुखपत्रें या स्वरूपानेंच केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें चालविलीं जावींत. संपादकांना पत्रांचें धोरण बदलण्याचा अधिकार नाहीं. त्यांच्यामध्यें मतभेद झाल्यास खालीं दिलेल्या बोर्डानें निर्णय द्यावा व तो अखेरचा समजला जावा.

२२ या सल्लागारबोर्डांत किंवा मंडळांत सातापेक्षां कमी नाहींत व दहाहून अधिक नाहींत इतके प्रमुख राष्ट्रीय वृत्तीचे गृहस्थ नेमावे. ते मध्यमहाराष्ट्र, नागपूर प्रांत, वऱ्हाड या सर्वांतून मिळून नेमावे. संपादक हे एक्स ऑफिशिओ म्हणून राहावे. हें बोर्ड नेमण्याचा हक्क प्रथमतः मजकडे राहील. व या नेमणुकी मी न केल्यास खालीं दिलेल्या गृहस्थांच्या बोर्डानें त्यांची नेमणूक करावी.

२३ इन्स्टिट्यूटची व्यवस्था व पत्रांचें धोरण याविषयीं संपादकांनीं मागितल्यास, किंवा बोर्डाला आपण होऊनहि, सल्ला देण्याचा अधिकार राहील. तसेंच बोर्डाला लागेल ती माहिती मागण्याचा हक्क राहील.

२४ बोर्डाचे सभासदानें त्याला वाटल्यास आपल्या जागीं दुसरा मनुष्य नेमून घ्यावा किंवा तसें न झाल्यास इतरांनीं तो नेमावा:

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

२५ इन्स्टिटयूटची अंतर्गत सर्व व्यवस्था दोन संपादक व छापखान्याचे व्यवस्थापक यांचे हातीं राहील; व त्यांनीं हिशेब ठेवणें, स्वतःचे व इतर लोकांचे पगार ठरविणें, व सर्वसामान्य व्यवस्था चालणे या संबंधानें पद्धतशीर नियम करावे. यांत मतभेद झाल्यास किंवा झालेले नियम ट्रस्टच्या हेतूविरुद्ध आहेत असें वाटल्यास सल्लागार बोर्डानें त्यांत वाटेल ती योग्य ती दुरुस्ती करावी.

२६ कांहीं असलें तरी, प्रेस इन्स्टिटयूटच्या उत्पन्नांतून ट्रस्टींनी, माझे मुलगे २५ वर्षांचे होईपर्यंत, त्यांच्या शिक्षणाकरितां दरमहा ७५ रुपये घरीं पोहोचते करावे. त्यांचें वय २५ वर्षांचें झाल्यावर दरसाल ट्रस्ट इस्टेटींतून ५०० रुपये रिझर्व्ह फंडा-दाखल काढून ठेवावे.

२७ माझ्या एखाद्या मुलाची इच्छा इन्स्टिटयूटमध्यें काम करण्याची असल्यास, व तो कामाला लायक असल्यास, त्या कामावर त्याचा पहिला हक्क आहे असें समजावें. तथापि केव्हांहि संस्थेच्या इतर सभासदांहून खास किंवा खासगी असा कोणताही हक्क माझे मुलाचा इन्स्टिटयूटच्या मिळकतीवर राहणार नाहीं.

२८ ट्रस्ट इन्स्टिटयूटचें काम चालणें अशक्य झाल्यास त्याची मिळकत माझे मुलगे किंवा त्यांचे वंशज आणि खालील सभासदांचे बोर्ड यांजकडे परत जावी. मग ती त्यांनीं विकून येईल्त्या रकमेचा स्वतः उपयोग करावा. किंवा ती मिळकत वाटल्यास दुसऱ्या एखाद्या शिक्षणविषयक किंवा सार्वजनिक कार्याकडे लावावी.

२९ 'ट्रस्ट इन्स्टिटयूट' संबंधीं या मृत्युपत्रांत जो भाग आहे त्याची अम्मलबजावणी करण्याकरितां मी खालील गृहस्थ ट्रस्टी किंवा एक्झिक्यूटर नेमीत आहे.

१ रा. दादासाहेब खापर्डे	४ रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
२ „ दादासाहेब करंदीकर	५ „ वासुदेव गणेश जोशी
३ „ नरसिंह चिंतामण केळकर	६ „ वासुदेव सदाशिव बापट

या सर्वांनीं ट्रस्ट इस्टेट आपल्या ताब्यांत घेऊन तिची व्यवस्था करावी.

३० मला वाटल्यास या मृत्युपत्रांत फेरबदल करणें किंवा तें रद्द करणें याविषयीं सर्व अधिकार मी स्वतःकडे राखून ठेविले आहेत.

लो॰ टिळकांचें दुसरें व अखेरचें मृत्युपत्र (१९१८)

कोलंबो, ता. ५–४–१९१८.

मी बाळ गंगाधर टिळक, राहणार पुणें हल्लीं मुक्काम कोलंबो, या लेखानें शेवटची व्यवस्था किंवा मृत्युपत्र करून ठेवितो तें येणेंप्रमाणें—या मृत्युपत्रांत सामान्य दिग्दर्शन केलें आहे. विशेष बाबी निघाल्यास त्यांचा निकाल या सामान्य दिग्दर्शनाप्रमाणें करावा.

१ चि. गं. भा. वहिणाबाईस मी हयात आहेपर्यंत दरसाल रुपये शंभर देणें. माझेनंतर दोन हजार रुपयांच्या प्रॉमिसरी घेतलेल्या आहेत. त्याचें व्याज रुपये सत्तर येईल तें व भरतीस पांच रुपये घालून एकंदर पाऊणशें देणें; व तिला आगर व घर बांधून केळशी येथें दिलें आहे. त्याचा उपभोग तिनें हयात आहेपर्यंत घेणें. नंतर सदर आगर व घर चिरंजीव गंगाधर वासुदेव विद्वांस माझा भाचा यांस देणें. याचेवर दुसरा कोणाचा हक्क नाहीं.

२ चिखलगांवची सर्व इस्टेट तेथील देव श्रीलक्ष्मीकेशव यांस ट्रस्ट करून देणें व देवास १०००–१५०० (हजार ते पंधराशें) रुपयेपर्यंत निराळे देणें.

३ लातूर जिनिंग, सिंहगडचा बंगला ही इस्टेट मुलांस म्हणजे चिरंजीव रामभाऊ व बापूंस देणें. राहतें घर त्यांचे नांवें केलेलेंच आहे.

४ घरांतील दागिने व पॉलिसी मुलांस देणें.

५ दोनशें रुपये दरमहा चि. रामभाऊ व बापूस मिळतील अशी तजवीज करणें व चि. धोंडूस दहा हजार मिळतील (एकदम) अशी तजवीज करावी.

६ चि. गणपति व अंतू केतकर यांची बी. ए. अगर एलएल. बी. होईपर्यंत विद्या माझे खर्चानें करणें. यांत अंतर करूं नये.

७ चि. श्रीरंगराव साने यांस माझ्या घरची सर्व व्यवस्था करून झाल्यावर नंतर निदान पांच हजार रुपये तरी देणें. शिवाय मुंबई को. ऑ. स्टोअरचे दहा शेअर आहेत ते चि. सौ. मथुस तिची खाजगी रक्कम म्हणून तिला बक्षीस दिले आहेत.

८ श्री. जगन्नाथ महाराज यांचेकडील लवादाची रक्कम चि. रामभाऊ व बापूस देणें. दुसरे कोणी घेऊं नये. कलम ५ मध्यें त्यांस दिलेल्या रकमेच्या भरतींत ही रक्कम धरावी.

९ कै. प्रो. जिनसीवाले यांची लायब्ररी कोणते तरी संस्थेस त्यांचे नांवानें देणें.

१० आर्क्टिक होम, ओरायन, व सर्व भाषांतील गीता यांचा कॉपीहक्क चि. रामभाऊ व बापूचा आहे.

चिरोल केस

१ चिरोल केस जिंकल्यास यापेक्षां अधिक पैसे शिल्लक राहतील. ह्याचा विनियोग कसा करावयाचा तो मागाहून मी ठरवीन.

२ परंतु केस हरल्यास त्याचें कर्ज फेडणें आहे. तें खालीं लिहिल्याप्रमाणें फेडावें:—

१ सगळा ज्युबिली फंड या कर्जास देणें.

२ कै. रा. दाजीसाहेब खरे यांचेकडील रक्कम रुपये अडीच हजार व रा. एल. वी. बापट यवतमाळ यांचेकडील रक्कम ३००० व रा. सेटलूर यांचेकडील माझी असलेली रक्कम सदर कर्जाचे भरतीस देणें.

३ बाकी सर्व खर्च झालेला आहेच. करितां निराळी तजवीज करणें नको.

छापखाना

१ वर्तमानपत्रें, ऑफिस, छापखाना, व मशीन व फौंडरी, वर्तमानपत्राची लायब्ररी व वर्तमानपत्राचे जामिनकीचे पैसे ह्यांचा मी पब्लिक ट्रस्ट केला आहे.

२ छापखाना, पत्रें व ऑफिस हीं वाड्यांत असेपर्यंत भाड्याबद्दल मुलांस निदान ७५ रुपये दरमहा तरी भाड्याबद्दल देणें.

३ चि. धोंडूस तो असेपर्यंत छापखाना व ऑफिसचा मॅनेजर ठेवणें व त्यास पगार एडिटरइतका देणें; त्यांत कमी नसावा.

४ पेपरांची पॉलिसी (Editorial Policy) आहे तशीच ठेवणें. कांहीं झाले तरी बदलूं नये.

५ गायकवाडचे वाड्यापैकीं निमे भाग, म्हणजे पुलापासून छापखान्यापर्यंतचा भाग, छापखान्याकडे भाड्यानें असावा व त्याचें भाडें दरमहा निदान पाऊणशें तरी द्यावें, व तो म्हणजे छापखाना बाहेर काढूं नये.

६ वाड्याचे इन्शुअरन्सकरितां कांहीं रक्कम केसरी ऑफिसनें निराळी ठेवावी, व वाड्याची दुरुस्ती व सर्व पट्ट्या (म्युनिसिपल टॅक्स) ऑफिसनें भराव्या.

७ या लेखानें मागील केलेलीं सर्व मृत्युपत्रें व्यवस्थापत्रें रद्द समजावीं.

८ या व्यवस्थापत्रासंबंधानें कांहीं भानगड पडल्यास कोर्टांत न जातां रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर व चि. विश्वनाथ गंगाधर केतकर व श्रीरंग मोरेश्वर साने या तिघांनीं निकाल करणें व तो सर्वांनीं मान्य करावा.

घरव्यवस्थेच्या कलमांत एक व्यवस्था करणें राहिली होती. ती चि. रा. विश्वनाथ गंगाधर केतकर यांचेकडे घरासंबंधीं रक्कम येणें आहे ती मागूं नये; मी त्यांस ती बक्षीस दिली आहे.

वरील मृत्युपत्राप्रमाणें व्यवस्था करण्याचा अधिकार चि. धोंडो वासुदेव विद्वांस यांस दिला आहे. तो नसेल तर चि. रा. रामचंद्र बळवंत टिळक यांनीं करावा.

साक्ष

नरसिंह चिंतामण केळकर. (सही) बाळ गंगाधर टिळक.
कोलंबो, ता. ५ एप्रिल सन १९१८. कोलंबो, ता. ५-४-१८.

या खालील तीन गृहस्थांना लो॰ टिळकांनीं आपल्या मृत्युपत्रानें पंच नेमलेले आहे.

नरसिंह चिंतामण केळकर

विश्वनाथ गंगाधर केतकर

श्रीरंग मोरेश्वर साने

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

[या खालीं चित्रें दिलीं आहेत त्या तिघां गृहस्थांच्या सह्यांनीं केसरी–मराठा संस्थेचें ट्रस्टडीड लो० टिळकांच्या मृत्युपत्राच्या आधारें झालेलें आहे.]

श्री० रामचंद्र बळवंत टिळक



कै० श्रीधर बळवंत टिळक

श्री० धोंडो वासुदेव विद्वांस

श्री

केसरी मराठा संस्थेचें ट्रस्टडीट

ट्रस्टडीड शके १८४२ रौद्रनाम संवत्सरे माहे श्रावण शुद्ध २ रोज सोमवार ता. १६ आगस्ट सन १९२० इसवी ते दिवशीं—

१ रामचंद्र बळवंत टिळक जात ब्राह्मण, धंदा शिकण्याचा, उमर वर्षे २६, राहणार पुणें पेठ नारायण घ. नं. ५६८.
२ श्रीधर बळवंत टिळक जात ब्राह्मण, धंदा शिकण्याचा, उमर वर्षे २४, राहणार पुणें पेठ नारायण घ. नं. ५६८.
३ धोंडो वासुदेव विद्वांस जात ब्राह्मण, धंदा मॅनेजर केसरी ऑफिस, उमर वर्षे ५३, राहणार पुणें पेठ नारायण घ.नं.५६८
} लिहून ठेवणार

या लेखानें आम्ही ट्रस्टडीड लिहून ठेवतों ऐसाजे—

आम्हांपैकीं नं. १ व नं. २ यांचे वडील व नं. ३ चे मामा परमपूज्य लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे मुंबई येथें ता. १ आगस्ट सन १९२० इसवी रोजीं कैलासवासी झाले. त्यापूर्वी कोलंबो येथें ता. ५ एप्रिल सन १९१८ इसवी रोजीं त्यांनीं आपले स्वसंपादित मिळकतींचें एक मृत्युपत्र केलेलें आहे. त्यानंतर त्यांनीं दुसरें मृत्युपत्र केलेलें आहे. सदरचें कोलंबो येथें झालेलें मृत्युपत्रअलाहिदा आज रोजीं नोंदविलें आहे. सदर मृत्युपत्र आम्हा तिघांस सर्व प्रकारें मान्य आहे. आम्हांपैकीं नं. ३ यांस सदरचे मृत्युपत्रांत एक्झिक्युटर नेमिलें आहे. व आम्हांपैकीं नं. १ व नं. २ हे मयताचे वारसपुत्र आहोंत. त्या मृत्युपत्रांत केसरी छापखाना, वर्तमानपत्रें वगैरे संबंधाची जी व्यवस्था आमच्या वडिलांनीं व मामांनीं केली तिलाच संमति देऊन त्यांचे हेतू पूर्ण होण्याकरितां व मृत्युपत्राची पूर्तता होण्याकरितां आम्ही त्रिवर्ग हें ट्रस्टडीड लिहून ठेवीत आहोंत, त्याचीं कलमें येणेंप्रमाणें:—

१ कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं 'केसरी' व 'मराठा' वर्तमानपत्रें हातांत घेतल्यापासून त्या पत्रांचे द्वारें राजकीय शिक्षणाचा प्रसार करून लोकांत राजकीय हक्कांची जाणीव उत्पन्न करणें व राष्ट्रीय ध्येयास पोषक, अशा इतर अनेक अंगांच्या सार्वजनिक चळवळी करणें वगैरे सर्व कामें ज्या हेतूनें केलीं, तोच त्यांचा हेतु त्यांचे पश्चात् निरंतर व अबाधित अमलांत येण्याचें साधन म्हणून हें ट्रस्टडीड करण्यांत आलें आहे.

२ 'केसरी' व 'मराठा' ही एक संस्था असें यापुढें मानण्यांत यावें.

३ 'केसरी' व 'मराठा' हीं पत्रें व त्या संबंधाची सर्व मिळकत व हक्क म्हणजे वर्तमानपत्रें, पुस्तकसंग्रह, त्याचें सर्व सामान, टाईप–फौंड्री, टाईप, छापखाना, छापण्याचीं यंत्रें, ऑईल इंजिनें, शिल्लकी कागद, ऑफिस, छापखाना व कंपोझिंग रूम्स यांतील सर्व सामान व पुढें कलम ५ मध्यें वर्णन केलेली खुली जागा व इमारतीसुद्धां त्याच कलमांत नमूद केलेल्या शर्तीप्रमाणें वापरण्याच्या हक्कासह, हिशेबी वह्या व कागदपत्र, चालू तारखेची रोख शिल्लक, मागील सर्व देणें-घेणें, व पुढील देणें-घेणें, तात्पर्य छापखाना व वर्तमानपत्रें हीं स्वतः व त्यांस लागणारें (वर स्पष्ट लिहिलें नसलें तरी) सर्व प्रकारचें सामान, त्यांची गुडवुईल व मालकी हक्क या एकंदर सर्व मिळकतीचा ट्रस्ट करण्यांत आला आहे. या एकंदर सर्व मिळकतीची किंमत आज अजमासें रुपये १००००० एक लक्ष आहे.

४ या ट्रस्टडीडप्रमाणें व्यवस्था करण्याकरितां निदान दोन ट्रस्टी असावेत. या संस्थेचे पहिले ट्रस्टी रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर व आम्हांपैकीं नं. ३ चे धोंडो वासुदेव विद्वांस यांस या ट्रस्टडीडनें ट्रस्टी नेमिलें आहे. वर कलम ३ यांत नमूद केलेली सर्व मिळकत आजपासून या उभयतां ट्रस्टींच्या स्वाधीन करण्यांत आली आहे. ती मिळकत ट्रस्टचे कारणाकरितां त्या उभयतांनीं वरील संस्थेचे ट्रस्टी या नात्यानें आपल्या ताब्यांत ठेवून ट्रस्टी या नात्यानें सांभाळावी व तिची वहिवाट करावी. या संस्थेच्या व ट्रस्टच्या व्यवस्थेचे बाबतींत म्हणजे अंतर्व्यवस्था, वर्तमान-पत्राचें धोरण, छापखाना, वर्तमानपत्रें, व सार्वजनिक चळवळीबद्दल खर्च या बाबतींत आम्हांपैकीं नं. १ व नं. २ यांनीं यापुढें स्वतः आपणाकडे कोणताहि अधिकार राखून ठेविला नाहीं. सर्व अधिकार व हक्क ट्रस्टी या नात्यानें वर नमूद केलेले ट्रस्टी यांस दिले आहेत. त्यांनीं वर्तमानपत्राचे धोरणासंबंधानें कै० लोकमान्य टिळक यांचे मृत्युपत्रांतील 'छापखाना' या मथळ्याखालील कलम ४ यांत लिहिल्याप्रमाणें वर्तण्याचें आहे.

५ छापखाना, वर्तमानपत्रें, कचेऱ्या वगैरेंची जागा व इमारती खालीं लिहिल्या-प्रमाणें सदर संस्थेच्या उपयोगाच्या असल्यामुळें सदर ट्रस्टमध्येंच समाविष्ट केल्या आहेत व त्या जागा व इमारती सदरचे ट्रस्टी यांनीं ट्रस्टी या नात्यानें वहिवाटण्याच्या आहेत. या जागा व इमारती म्हणजे शहर पुणें येथील नारायण पेठेंत म्युनिसिपल कमिटी नंबर ५६८ तुकडी पुणें पोटतुकडी हवेली सब–रजिस्ट्रार यांचे हद्दींतील व सिटी सर्व्हेनंबर ५६८ चा वाडा ज्यास 'गायकवाडवाडा' म्हणतात त्या वाड्यांत आम्हांपैकीं नं. १ व नं. २ यांचे खासगी राहण्याचे जागेंत जाण्याच्या दरवाज्यावर जो पूल आहे त्याच्या पश्चिम अंगची सर्व जागा व त्यांतील सर्व जुन्या व नव्या इमारती व खुली जागा यासुद्धां (यांत आम्हांपैकीं नं. १ व नं. २ यांचे खाजगी जागेंत जाण्याचा जिना व शौचकूप आहेत त्या लाईनीचे आंतील जागा म्हणजे खाजगी इमारतीच्या भिंतीपासून पश्चिमेकडील बारा फूट रुंदीची व जिन्याजवळ आंत जाण्यास जें लोखंडी फाटक आहे तेथपासून दक्षिणेकडील वाड्याचे भिंतीपावेतोंच्या लांबीची जागा सोडून बाकीची पश्चिमेकडील जागा) याची लांबी पूर्व–पश्चिम फूट १४८ व दक्षिण–उत्तर फूट १८० ची जागा व त्यांतील नव्या व जुन्या इमारती व खुली जागा यांच्या उपयोगाबद्दल सदर ट्रस्टींनीं आम्हांपैकीं नं. १ व नं. २ यांस मिळून तारीख १ आगस्ट सन १९२० इसवीपासून दरमहा रुपये १०० (शंभर) भाडें द्यावें. व त्याबद्दल सदरचे ट्रस्टी यांनीं आम्हांपैकीं नं. १ व नं.२ यांस निरंतरची भाडेचिठी लिहून द्यावी. ही भाड्याची रकम कोणत्याहि सबबीवर कमी करण्याचा ट्रस्टींना अधिकार नाहीं व कोणत्याहि कारणाकरितां आम्हांपैकीं नं. १ व नं. २ यांस वाढविण्याचा अधिकार नाहीं. सदरची जागा व इमारती 'केसरी–मराठा' संस्था (छापखाना वर्तमानपत्रें वगैरे) अस्तित्वांत असेपर्यंत सदरचे ट्रस्टी अगर त्यांचे पश्चात् त्यांचे जागीं या ट्रस्टडीडप्रमाणें जे जे ट्रस्टी वेळोवेळीं काम करण्यास नेमिले जातील त्यांचे ताब्यांत निरंतर व अबाधित राहावयाच्या आहेत.

६ सर्व गायकवाडवाड्याची रिपेरी व शाकारणी करण्याचा व म्युनिसिपालिटी-चे सर्व कर देण्याचा बोजा वर लिहिलेल्या ट्रस्ट इस्टेटीनें सोसण्याचा आहे. त्याच-प्रमाणें सदरचे ट्रस्टी यांनीं सर्व वाड्याचें तावडतोब इन्शुअरन्स करून त्याचे हप्ते सदरचे ट्रस्ट इस्टेटींतून द्यावे. दुरुस्ती व शाकारणी आजपर्यंत ज्याप्रमाणें व जितक्या मुदतीचे अंतरानें करींत आले आहेत त्याप्रमाणेंच पुढें करावी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

७ आम्हापैकीं नं. १ व नं. २ पैकीं अगर त्यांचे वंशजापैकीं कोणीहि वरील संस्थेंत एडिटेरियल स्टाफमध्यें अगर इतर काम करण्यास तयार असेल व मुख्य एडिटर यांचे मतानें तो त्या कामास लायक असेल तर ट्रस्टी ठरवितील त्या पगारावर व त्यांना पसंत पडेल तोंपर्यंत त्यास त्या कामावर अवश्य घेतलें जावें. परंतु यामुळें त्यास वर्तमानपत्रें व कारखाना यासंबंधीं कोणताहि अधिक स्पेशल हक्क प्राप्त होणार नाहीं.

८ सदर ट्रस्टींपैकीं कोणीहि ट्रस्टचें काम करण्यास कोणतेहि कारणानें असमर्थ झाल्यास ही संस्था व ट्रस्ट कायम चालण्याकरितां उभयतां ट्रस्टींचे विचारें लो. टिळक यांच्या इच्छेप्रमाणें काम करण्यास जो लायक आहे असें वाटेल तो ट्रस्टी नेमावा. कदाचित् ही नेमणूक करण्यास एकच ट्रस्टी शिल्लक असेल तर त्यानें वरील धोरणास अनुसरून ट्रस्टी नेमावा. व त्याप्रमाणें नेमलेल्या ट्रस्टीस या ट्रस्टडीडअन्वयें सदर संस्थेच्या ट्रस्टींचे सर्व अधिकार प्राप्त होतील. कोणत्याहि कारणानें नवीन ट्रस्टी नेमिले गेले नाहींत, व पूर्वींचे ट्रस्टींपैकीं कोणीच उरला नाहीं तर लो. टिळक यांचे मृत्युपत्रांतील 'छापखाना' या मथळ्याखालील कलम ८ यांत लिहिलेलें पंचांनीं (नवीन ट्रस्टींची नेमणूक) अगर त्यांनीं आपल्या जागीं नेमून दिलेल्या पंचांनीं नवीन ट्रस्टींची नेमणूक करावी. परंतु वरील प्रकारें ही नवीन ट्रस्टींची नेमणूक केली गेली नाहीं तर ट्रस्टची मिळकत आम्हापैकीं नं. १ व नं. २ यांचेकडे अगर त्यांचे वारसांकडे Primarily (प्रथमतः) ट्रस्टी याच नात्यानें परत येईल. ही संस्था कांहीं कारणानें तात्पुरती बंद झाल्यास, पण फिरून ती संस्था सुरू करणें शक्य झाल्यास सदर ट्रस्टडीडअन्वयें ती संस्था चालविण्यास जे ट्रस्टी हजर व लायक असतील त्यांना ट्रस्टडीडअन्वयें ती संस्था फिरून चालविण्याचा अधिकार आहे. परंतु ही संस्था कोणतेहि कारणानें नष्ट झाल्यास व ती पुढें केव्हांहि सुरू करणें अशक्य आहे असें वाटल्यास ट्रस्टची मिळकत आम्हापैकीं नं. १ व नं. २ यांची अगर त्यांचे वारसांचे मालकीची होईल. संस्थेच्या ट्रस्टींना व्यक्तिशः अगर त्यांचे वारसास या मिळकतीवर कोणताहि खाजगी हक्क राहाणार नाहीं.

९ आजतारखेपासून 'गीतारहस्य' मराठी व त्याचीं सर्व भाषांतील भाषांतरें, 'ओरायन' व 'आर्टिक होम इन दी वेदाज' या पुस्तकांच्या व्यवहारांत वरील ट्रस्टींना कांहींहि हक्क नाहीं. परंतु पूर्वींच्या व्यवहारासंबंधीं जो वसूल सदर ट्रस्टीकडे येईल तो त्यांनीं आम्हापैकीं नं. १ व नं. २ यांचेकडे द्यावा. तसेंच पूर्वींच्या व्यवहारासंबंधानें जीं बिलें येतील अगर जो खर्च येईल तो आम्हापैकीं नं. १ व नं. २ यांजकडून घ्यावा. सदर पुस्तकांच्या कॉपी राईटसंबंधाच्या अगर इतर व्यवस्थेच्या संबंधानें सदरचे ट्रस्टी यांस कोणताहि अधिकार नाहीं. अगर त्यांजवर कोणतीहि जबाबदारी नाहीं.

१० आम्हापैकीं नं. १ व नं. २ यांचे वडील लो. टिळक यांस पूर्वी निरनिराळ्या ठिकाणीं मिळालेल्या व लोकांनीं नजर केलेल्या मौल्यवान अगर सन्मानाच्या वस्तू आम्हापैकीं नं. १ व नं. २ यांनीं आपल्या ताब्यांत ठेवलेल्या असून त्यांजवर सदरचे ट्रस्टी यांचा कोणताहि हक्क नाहीं अगर त्यासंबंधानें त्यांचेवर कोणतीहि जबाबदारी नाहीं.

११ आजपर्यंत गायकवाडवाड्यांत श्रीगणपत्युत्सव केसरी ऑफिसचे खर्चानें होत आला आहे त्याप्रमाणें तो उत्सव यापुढेंहि ही संस्था कायम आहे तोंपर्यंत ट्रस्टी यांनीं ट्रस्टमिळकतींतून खर्च करून साजरा करावा.

१२ सदरचे उभयतां ट्रस्टींमध्यें अगर पुढें त्यांचे जागीं नेमलेल्या ट्रस्टींमध्यें ट्रस्टचे मिळकतींतून ट्रस्टचे कामासाठीं कोणताहि खर्च करण्याच्या कामांत, अंतर्व्यवस्थेंत संस्थेच्या हितासाठीं फेरबदल करण्याच्या कामांत, अगर संस्थेच्या संबंधाचे दुसरे कोणत्याहि कामांत मतभेद अगर वाद उत्पन्न झाल्यास त्याचा निकाल कै. लो. टिळक यांनीं आपले मृत्युपत्रांतील 'छापखाना' या मथळ्याखालील कलम ८ यांत लिहून ठेविल्याप्रमाणें रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर राहणार पुणें, रा. रा. विश्वनाथ गंगाधर केतकर राहणार नाशिक व रा. रा. श्रीरंग मोरेश्वर साने राहणार मुंबई या त्रिवर्गांनीं अगर त्यांनीं नेमलेल्या पंचांनीं बहुमतानें करावा, व तो निकाल अखेरचा समजून सर्वांनीं वर्तावें. तसेंच आम्हापैकीं नं. १ व नं. २ व सदर संस्थेचे ट्रस्टी यामध्यें कांहीं वाद उत्पन्न झाल्यास त्याचाहि निकाल वरील त्रिवर्ग पंचांनीं अगर त्यांनीं नेमिलेल्या पंचांनीं बहुमतानें करावा व तो ट्रस्टींनीं मान्य करावा व आम्हींहि मान्य करूं.

१३ आमच्यापैकीं नं. १ व नं. २ यांचे वडील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे खाजगी स्वरूपाचें एक स्मारक खुद्द गायकवाडवाड्यांत होणें इष्ट आहे. या स्मारकाकरितां 'केसरी–मराठा' संस्थेच्या हद्दींतील वाड्याचे दक्षिण अंगास होत असलेल्या नव्या इमारतीच्या वरील दिवाणखान्याची जागा या कार्याकरितां ट्रस्टींनीं उपलब्ध करून देणें शक्य असल्यास तेथें कैलासवासी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचें त्या जागेस शोभेल असें कांहीं तरी चांगलें दृश्य स्मारक करण्याची जबाबदारी आम्हां उभयतां चिरंजीवांवर आहे.

हें ट्रस्टडीड आम्ही त्रिवर्गांनीं स्वसंतोषानें आज रोजीं लिहून ठेविलें आहे.

तारीख मजकूर दस्तुर कृष्णाजी पांडुरंग करंदीकर दस्तुर खुद्द.

साक्षी

१ कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
१ अनंत वासुदेव फडणीस

सह्या

(सही) रामचंद्र बळवंत टिळक
(सही) श्रीधर बळवंत टिळक
(सही) धोंडो वासुदेव विद्वांस दस्तुर खुद्द

लवादनामा नं. १

ता. १३ व १४ मार्च सन १९२१ रोजीं गायकवाडवाड्यांत कै. लो. टिळक यांच्या मृत्युपत्रानें नेमलेल्या आम्ही खाली सही करणार पंचांची सभा भरण्यांत आली व सदर सभेंत खालीं लिहिल्याप्रमाणें काम झालें:—

प्रथम रामचंद्र बळवंत व श्रीधर बळवंत टिळक यांनीं जे वादाचे म्हणून प्रश्न उपस्थित केले ते त्यांजकडून लेखी लिहून घेऊन व उभयतांच्या सह्या घेऊन दाखल करण्यांत आले. तसेंच सदर प्रश्नांस धोंडो वासुदेव विद्वांस यांनीं दिलेले जाब लेखी त्यांचे सहीनिशीं घेऊन तेहि दाखल करण्यांत आले. तसेंच पंचांचा निकाल आपणास मान्य आहे अशा अर्थाचा वरील त्रिवर्गांच्या सहीचा राजीनामा घेऊन तोहि दाखल करण्यांत आला.

वरील त्रिवर्गांचे लेखी म्हणणें वाचून व तोंडीं म्हणणेंहि ऐकून व जरूर ते कागदपत्र पाहून आम्ही निकाल देतों तो खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ केसरी ट्रस्टकडे दिलेल्या घरजागेची निरंतरची भाडेचिठी रा. रा. आप्पा साहेब केतकर हे मसुदा देतील त्याप्रमाणें उभयतां ट्रस्टींनीं तारीख १ एप्रिल १९२१ चे आंत रजिस्टर करून द्यावी.

२ मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें एकंदर गायकवाडवाड्याचे इन्शुअरन्सचा अर्ज ट्रस्टी यांनीं तारीख १ एप्रिल सन १९२१ चे आंत कोणत्याहि इन्शुअरन्स कंपनीकडे करावा. मात्र सोईकरितां केसरी ट्रस्टकडे असलेल्या इमारतींकरितां एक ट्रस्टींचे नांवें आणि श्रीधर व रामचंद्र बळवंत टिळक यांजकडे असलेल्या इमारतींकरितां त्यांचे उभयतांचें नांवें एक अशा दोन वेगवेगळ्या पॉलिसी कराव्या. पैकीं ट्रस्टकडे असलेल्या इमारतींची किंमत इन्शुअरन्सकरितां ट्रस्टींना योग्य वाटेल ती त्यांचे इच्छेनुरूप लावावी. व उभयतां चिरंजिवांकडे असलेल्या वाड्याची किंमत इन्शुअरन्सकरितां रक्कम रुपये तीस हजार (३००००) लावावी. व या दोनहि पॉलिसींच्या प्रीमियमचे हप्ते केसरी ट्रस्टनें सालोसाल देत जावे.

३ ट्रस्टकडे असलेल्या जागेचें भाडें उभयतां चिरंजिवांस द्यावयाचें त्याजबद्दल वेगळ्या कागदावर तिकीट लावून त्यांनीं पावती द्यावी. भाड्याची रक्कम उभयतांपैकीं कोणा एकाचेहि हातीं देऊन त्याच्या एकट्याच्या सहीची पावती असली तरी ती मानावी. मात्र उभयतांचें सहीनें ट्रस्टी यांस पत्र लिहून देऊन त्यांत कोणाहि एकानें घेतलेलें भाडें उभयतांस पोंचल्याचें उभयतांना मान्य होईल असें लिहावें.

४ उभयतां चिरंजिवांनीं लातूर येथील जिनिंग गिरणींतील आपला सर्व हितसंबंध विकण्याबद्दल धोंडो वासुदेव विद्वांस यांना एक कायदेशीर मुखत्यारपत्र तारीख १ एप्रिल सन १९२१ चे आंत रजिस्टर करून द्यावें. व त्यासोबत एक पत्र लिहून द्यावें कीं, सदर विक्रीनें जी रक्कम वसूल होईल तिच्यांतील दहा हजार (१००००) रुपये प्रथमतः त्यांनीं डॉ. साने यांस ता. १७।८।२० रोजीं केसरी ऑफिसनें दिलेल्या दहा हजार रुपये कर्जफेडीदाखल केसरी ऑफिसकडे भरावे. दहा हजार रुपयांहून अधिक रक्कम आल्यास ती रक्कम डॉ. साने यांस हिंदु एज्युकेशन फंडाच्या कर्जफेडीच्या मदतीदाखल द्यावी आणि दहा हजार रुपयांहून सदरहू रक्कम कमी आल्यास उरलेली रक्कम केसरी ऑफिसनें डॉ. साने यांचेकडे मागूं नये.

५ "केसरी–मराठा" ट्रस्टचें अस्सल ट्रस्टडीड तसेंच लोकमान्य टिळकांचें अस्सल मृत्युपत्र हे दोनहि कागद रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांचेकडे रहावेत व जरूरीप्रमाणें त्यांचा उपयोग इतरांस मिळावा.

६ लो. टिळक यांचें चरित्र ग्रंथास उपयोगी पडण्यासारखे अगर इतर रीतीनें राखून ठेवण्यासारखे जे कागदपत्र असतील ते त्रिवर्ग पंचाच्या ताब्यांत रहावेत. हल्लीं ते रा. रा. केळकर यांचे ताब्यांत देण्यांत आले आहेत. वरील कागदांपैकीं कांहीं कागदाचा नाश अगर त्यांची प्रसिद्धि करणें झाल्यास ती त्रिवर्ग पंचाच्या संमतीनें व्हावी. व निरंतर राखून ठेवण्याचे कागद त्रिवर्ग पंच ठरवितील तेथें व त्या पद्धतीनें सुरक्षित ठेवण्यांत यावेत.

७ तारीख १५ मार्च सन १९२१ पासून केसरी ऑफिस पुणें अगर मुंबई यांजकडून गीतारहस्य व त्याचीं भाषांतरें या पुस्तकांची विक्री होऊं नये व सदर दिवशीं केसरी ऑफिसकडे शिल्लक असलेल्या सदर ग्रंथांच्या सर्व प्रती उभयतां चिरंजिवांच्या स्वाधीन करण्यांत याव्या. व केसरी ऑफिसकडून सदर तारखेपर्यंतचे गीतारहस्याचे हिशेब रा. रा. आप्पासाहेब केतकर यांचे विद्यमानें उभयतां चिरंजिवांस समजावून देऊन सदर तारखेचा हिशेबावरून निघेल ती रक्कम ता. १ एप्रिल सन १९२१ चे आंत उभयतां चिरंजिवांस देऊन सदर खात्याचा हिशेब पूर्ण करावा. याहि उपर पूर्वींच्या व्यवहारांत कोणाकडे जांगड विक्रीस ठेवलेल्या अगर व्ही. पी. किंवा पार्सलनें पाठविलेल्या प्रतीसंबंधानें अपुरा राहिलेला असा हिशेब निघाल्यास तो रा. रा. अप्पासाहेब केतकर यांचे विद्यमानें फिरून शक्य तितकें लवकर वेळोवेळीं रुजू करून घेऊन परस्पर जें बाजवी देणें निघेल तें द्यावें व घेणें घ्यावें.

८ उभयतां चिरंजिवांकडे असलेल्या वाड्याचे आणि केसरी ट्रस्टकडे असलेल्या वाड्याचे भागांचे दरम्यान भिंत अगर कठडा घालण्याची उभयतां चिरंजिवांस इच्छा असल्यास त्यांनीं तो आपल्या खर्चानें आपल्यास हवा तसा घालून घ्यावा. तसेंच उभयतां चिरंजिवाकडे असलेल्या मुख्य उघड्या लांकडी जिन्यानें वाटेल त्याला परवानगीशिवाय येतां जातां येऊं नये. याकरितां सदर जिन्याचे लगतची उघडी अंगणांतील दोन खण जागा व त्या लगत उजव्या हाताच्या इमारतींत उत्तरेच्या रस्त्यापर्यंतची दोन खण जागा भिंत घालून अगर कठडा व दारें बसवून आपल्या पूर्वींच्या जागेंत सामील करण्यास ट्रस्टी यांनीं परवानगी द्यावी. मात्र सदर जागेचे उपयोगाबद्दल उभयतां चिरंजिवांनीं दरसाल एक रुपया भाडें कबूल करून निरंतरची भाडे-

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

चिटी ट्रस्टी यांना करून द्यावी. तसेंच सदर जागेवर असलेल्या ट्रस्टच्या इमारतीस कोणत्याहि रीतीनें धक्का वगैरे लावूं नये आणि सदर जागेवरची इमारत ट्रस्टी यांना केव्हां दुरुस्त करणें झाल्यास अगर नवीन बांधणें झाल्यास त्याला हरकत करूं नये.

९ उभयतां चिरंजिवांकडे असलेल्या जागेंतील पुढील मोठ्या दिवाणखान्यांत केसरी ऑफिसनें आपली लायब्ररी ठेवण्यास उभयतां चिरंजिवांनीं हरकत करूं नये. मात्र सदर दिवाणखान्याचा उपयोग केवळ लायब्ररी या नात्यानेंच किंवा खाजगी सभांपुरताच करावा. तेथें कायमची कचेरी ठेवूं नये अगर वर्ग भरवूं नयेत.

१० यवतमाळ येथील कै. एल. सी. बापट यांजकडून येणें असलेल्या तीन हजार रुपये कर्जाचे फेडीदाखल लो. टिळक यांचे नांवें यवतमाळ येथील स्थावर मिळकतीचें खरेदीपत्र पूर्वी करून घेण्यांत आलें आहे तें उभयतां चिरंजिवांस मिळण्याचें कामीं रा. रा. धोंडो वासुदेव विद्वांस यांनीं पूर्णपणें मदत करावी.

११ चिखलगांव येथील लक्ष्मी-केशव देवस्थानासंबंधीं मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें कोंकणांतील वडिलोपार्जित इस्टेटीचा ट्रस्ट करण्याची जबाबदारी उभयतां चिरंजिवांनीं पत्करून त्याप्रमाणें मृत्युपत्राची अंमलबजावणी झाली अशी बेदावा-पावती केसरीचे मॅनेजर रा. रा. धोंडोपंत विद्वांस यांस लिहून द्यावी.

१२ बंगलोर येथील रा. रा. सेटलूर यांजकडे अद्यापि येणें उरलेलें कर्ज केसरी ट्रस्ट अगर उभयतां चिरंजिव यांपैकीं कोणीहि कोर्टांत जाऊन वसूल करूं नये. मात्र सदर रुपये अगर त्यांपैकीं कांहीं भाग सेटलूर यांजकडून इतर मार्गानें वसूल झाल्यास ती सर्व रक्कम गायकवाडवाड्यांत होणाऱ्या लो. टिळक यांचे स्मारकाकडे लावावी.

१३ श्रीधर बळवंत टिळक यास त्याचे लग्नांत मिळालेला आहेर, रा. रा. यशवंत गणेश कुळकर्णी यांजकडे येणें असलेलें कर्ज, चिखलगांवचे देवस्थानास देण्याची रोख देणगी, वाड्याची स्पेशल दुरुस्ती, ड्रेनेज रिपेअर, पागेची बंदिस्ती वगैरे कलमें मिळून उभयतां चिरंजिवांनीं बऱ्याच रकमेची मागणी केली आहे व केसरी ट्रस्टतर्फे रा. रा. विद्वांस यांनीं वरीलपैकीं कोणतीहि रक्कम मागणें कायदेशीर व योग्य नाहीं अशी तक्रार केली आहे व कांहीं बाबतींत उभयतांच्या तक्रारी योग्य आहेत असें आमचें मत आहे. तथापि "केसरी-मराठा" संस्थेचे ट्रस्टी व उभयतां चिरंजीव यांमध्यें सदैव स्नेहसंबंध रहावा आणि उभयतां चिरंजिवास मनाप्रमाणें सोई करून घेणें वगैरे करितां रोख रक्कम मिळावी अशी त्यांनीं विशेष इच्छा दर्शविल्यावरून दोनहि बाजूंच्या सर्व गोष्टींचा विचार करून आम्ही असें ठरवितों कीं, केसरी ट्रस्टनें उभयतां चिरंजिवांना उक्ते रुपये सहा हजार (६०००) तारीख १ एप्रिल १९२१ चे आंत द्यावे. मात्र सदर रक्कम दिल्यानंतर उभयतां चिरंजिवांनीं केसरीचे ट्रस्टी यांस कुलबेदावा-पत्र (General Release Deed) लिहून द्यावें व त्यांतहि असें विशेष प्रकारें लिहून द्यावें कीं, लो. टिळक यांचे मृत्युपत्र अगर उभयतां चिरंजिवांनीं लिहून दिलेलें ट्रस्टडीड यासंबंधानें ट्रस्टीकडून अगर केसरी ऑफिसकडून अगर धोंडो वासुदेव विद्वांस म्हणजे व्यक्तिशः ते स्वतः व मृत्युपत्राचे एक्झिक्यूटर या नात्यानें उभयतां चिरंजिवांचें जें जें म्हणून आजतारखेपर्यंत येणें निघत असेल तें सर्व उभयतां चिरंजिवांना पोंहोचलें व त्यांचें यापुढें कांहींहि येणें राहिलें नाहीं. तसेंच केसरी ऑफिस अगर ट्रस्ट यांचे हिशेब अगर वह्या यांतून निघणारें आजतारखेपर्यंतचें कोणतेंहि कोणाकडेहि येणें असल्यास अगर देणें असल्यास तें देण्याची जबाबदारी, वसूल करण्याचा हक्क व वसुलाचे पैसे स्वतःकडे घेण्याचा सर्व अधिकार सदर ट्रस्टी यांचेकडेच राहील. व याहि बाबद रीलीज दिला असेंहि लिहिण्यांत यावें.

१४ लो. टिळक यांचे हयातींत त्यांचे व मुंबईचे रा. रा. यशवंत विष्णु नेने यांचे दरम्यान झालेल्या व्यवहाराचा केसरी–मराठा ट्रस्टशीं कांहींएक संबंध नाहीं.

१५ उभयतां चिरंजिवांकडे असलेल्या वाड्याच्या भागाची "रिपेअरी" केसरी ट्रस्टनें करण्याची आहे. यांतील "रिपेअरी" या शब्दाचा अर्थ वेळोवेळीं रंगसफेती लावणें आणि जरूरीप्रमाणें शाकारणी करणें अगर एकंदर वाड्याच्या कंपाउंडाच्या भिंतींची पडझड झाल्यास ती नीट करणें इतकाच केव्हांहि समजावयाचा आहे. याखेरीज इतर कोणतीहि पडझड अगर रिपेअरी अगर बंदोबस्त अगर सोई करून घेणें झाल्यास त्या उभयतां चिरंजिवांनीं आपले स्वतःचे खर्चानें करून घ्याव्या.

१६ गायकवाडवाड्याचे पुढील मोठ्या दरवाजावरील भय्या ठेवणें, काढणें, त्याचा पगार देणें या सर्व गोष्टी ट्रस्टींनीं आपले इच्छेप्रमाणें कराव्या. मात्र सदरहू भय्या हा एकंदर गायकवाडवाड्याचें संरक्षणार्थ आहे असें समजलें जावें.

१७ लोकमान्यांच्या उभयतां चिरंजिवांकडे असलेल्या जागेंतील कागदांचे रोल्स अगर इतर कांहीं केसरी ऑफिसचें सामान कोठें राहिलें असल्यास तें ता. १ एप्रिल सन १९२१ चे आंत काढून नेण्यांत यावें.

१८ तारीख १५ मार्च सन १९२१ चे अंकापासून पुढें एक महिनाभर केसरींत गीतारहस्याचे व्यवहारासंबंधानें पुढील जाहिरात प्रसिद्ध करण्यांत यावी.

"लो. टिळक यांचें गीतारहस्य (मराठी व इतर भाषांतील भाषांतरें) यासंबंधीं सर्व व्यवहार आजतारखेपासून लोकमान्यांचे चिरंजीव रामचंद्र व श्रीधर बळवंत टिळक यांजकडे मालकी हक्कानें स्वाधीन करण्यांत आला असून सदर ग्रंथासंबंधीं यापुढें कोणचेहि प्रकारचा कोणासहि पत्रव्यवहार करणें झाल्यास तो त्यांचेकडे घ. नं. ५६८ नारायण पेठ गायकवाडवाडा शहर पुणें या पत्त्यावर करावा. केसरी ऑफिसचे नांवें करूं नये."

गीतारहस्याच्या सदर तारखेच्या पूर्वीच्या व्यवहारासंबंधीं कोणाचे कांहीं देणें अगर कोणाकडून कांहीं येणें वगैरे निघाल्यास तें यापुढें उभयतां चिरंजिवांनीं भागविण्याचें आहे. त्यांनीं न भागविल्यामुळें त्याची जबाबदारी कायदेशीररीत्या केसरी ऑफिसवर लागू झाल्यास ती रक्कम उभयतां चिरंजिवांनीं केसरी ऑफिसला भरून द्यावी.

१९ गं. भा. वहिणाबाई टिळक यांच्या पोटगीसंबंधाची सर्व जबाबदारी उभयतां चिरंजिवांनीं पत्करून वहिणाबाईचे सहीची यासंबंधाची पावती शक्य तितकी लवकर मृत्युपत्राचे एक्झिक्यूटर रा. रा. धोंडो वासुदेव विद्वांस यांस द्यावी.

येणेंप्रमाणें कलमवार निकाल आम्ही त्रिवर्ग पंचांनीं एकमतानें दिला आहे. तारीख १४ माहे मार्च सन १९२१ इ.

(सही) नरसिंह चिंतामण केळकर.
(सही) विश्वनाथ गंगाधर केतकर मुक्काम पुणें दस्तुर खुद्द.
(सही) श्रीरंग मोरेश्वर साने.

वर कलम १३ यांत सांगितलेल्या रकमा कायदेशीर रीतीनें देण्याची जबाबदारी केसरी ट्रस्टवर नाहीं अशी माझी समजूत आहे. तथापि केवळ उभयतां चिरंजिवांचा संतोष रहावा एवढ्याच बुद्धीनें वरील निकालास मी मान्यता दिली आहे. तारीख १४ माहे मार्च सन १९२१ इसवी.

नरसिंह चिंतामण केळकर.

रिलीज डीड किंवा बेदावापत्र

रिलीज पत्र शकें १८४२ रौद्रनाम संवत्सरे माहे फाल्गुन शु. ६ रोज मंगळवार ता. १५ मार्च सन १९२१ इसवी ते दिवशीं—

१ रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर जात ब्राह्मण धंदा एडिटर 'केसरी' उमर वर्षे ४८ राहणार पुणें सदाशिव पेठ घ. नं. ५५४.
२ रा. रा. धोंडो वासुदेव विद्वांस जात ब्राह्मण धंदा मॅनेजर 'केसरी' उमर वर्षे ५३ राहणार पुणें नारायण पेठ घ. नं. ५६८.
} लिहून घेणार

हे उभयतां "केसरी व मराठा" या संस्थेचे ट्रस्टी यांस.

१ रामचंद्र बळवंत टिळक जात ब्राह्मण धंदा शिकण्याचा उमर वर्षे २७ राहणार पुणें नारायण पेठ घरनंबर ५६८.
२ श्रीधर बळवंत टिळक जात ब्राह्मण धंदा शिकण्याचा उमर वर्षे २५ राहणार पुणें नारायण पेठ घरनंबर ५६८.
} लिहून देणार

कारणें रिलीज पत्र लिहून देतो कीं:—आमचे वडील कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं तारीख ५ माहे एप्रिल सन १९१८ इसवी रोजीं कोलंबो मुक्कामीं अखेरचें मृत्युपत्र करून ठेविलें आहे. हें मृत्युपत्र तारीख १६ आगस्ट सन १९२० रोजीं हवेलीचे सब रजिस्ट्रार कचेरींत तिसरे नंबराचे बुकाचे ४४ कलमाचे १६१ ते १६४ पानावर ४४ नंबरी अलाहिदा नोंदविलें आहे. या मृत्युपत्रांत तुम्हापैकीं नंबर २ यास एक्झिक्यूटर नेमिलें आहे. सदरचें मृत्युपत्र करतेवेळीं आमचे वडिलांची जी सांपत्तिक स्थिति होती तिचा विचार करतां या मृत्युपत्राचें कलम ५ मध्यें लिहून ठेविल्याप्रमाणें आम्हां उभयतांस जी रक्कम प्रत्येकीं दरमहा मिळावयाची त्याचा कांहीं बोजा त्या वेळीं "केसरी व मराठा" या संस्थेचे ट्रस्ट मिळकतीवर पडला असता. परंतु आमचे वडील कैलासवासी झाले त्या वेळीं त्यांची सांपत्तिक स्थिति पूर्वीपेक्षां सुधारली होती. या कारणामुळें आम्हास प्रत्येकीं दरमहा जी रक्कम मृत्युपत्राप्रमाणें मिळावयाची आहे तिचा बोजा "केसरी व मराठा" संस्थेच्या ट्रस्ट मिळकतीवर आतां पडण्याचा नसून वरील रकमेची तजवीज सदरील ट्रस्ट मिळकतीव्यतिरिक्त होण्याजोगी आहे. अर्थात् "केसरी व मराठा" या संस्थेचा आमचे वडिलांनीं मृत्युपत्रांत जो ट्रस्ट केला व ज्याबद्दलचें ट्रस्टडीड आम्ही उभयतां व तुम्हापैकीं नंबर २ यांनीं पूर्वी तारीख १६ आगस्ट सन १९२० रोजीं अलाहिदा नोंदविलें आहे त्या संस्थेच्या ट्रस्ट मिळकतीवर (म्हणजे ट्रस्टडीड कलम ३ मध्यें वर्णन केलेल्या मिळकतीवर) अगर केसरी ऑफिसवर अगर व्यक्तिशः आपणा उभयतांवर अगर मृत्युपत्राचे एक्झिक्यूटर या नात्यानें आपल्यापैकीं धोंडो वासुदेव विद्वांस यांचेवर आम्हांस आमचे वडिलांचे मृत्युपत्रांतील कलम ५ प्रमाणें प्रत्येकीं दरमहा जी रक्कम मिळावयाची तिचा बोजा आतां यापुढें कांहींएक राहिला नाहीं. म्हणून सदरहू ट्रस्टडीड अन्वयें आपल्या ताब्यांत ट्रस्टी या नात्यानें आलेल्या "केसरी व मराठा" या संस्थेच्या ट्रस्ट मिळकतीवर आमचे वडिलांच्या मृत्युपत्रांतील कलम ५ प्रमाणें आम्हां उभयतांस प्रत्येकीं दरमाहा मिळावयाच्या रकमेचा जो बोजा एरवीं पडला असतां त्या बोजापासून आपणा उभयतां ट्रस्टींस व व्यक्तिशः उभयतांस व मृत्युपत्राचे एक्झिक्यूटर म्हणून आपणापैकीं धोंडो वासुदेव विद्वांस यांस या रिलीज पत्रानें आम्ही उभयतां स्वसंतोषानें मुक्त करीत आहोंत. इतःपर 'केसरी व मराठा' या संस्थेच्या ट्रस्ट मिळकतीवर हा बोजा राहात नाहीं. ही सर्व इस्टेट जंगम आहे.

"केसरी–मराठा" संस्थेचे ट्रस्टी या नात्यानें आपल्या उभयतांकडून आमचें जें जें म्हणून आजतारखेपर्यंत येणें निघत असेल तें सर्व आम्हां उभयतांस पोंचलें. आतां यापुढें आमचें आपणाकडे कांहीं एक येणें राहिलें नाहीं. तसेंच केसरी ऑफिस अगर ट्रस्ट यांचे हिशेब अगर वह्या यांतून गीता रहस्याचे हिशेबाखेरीज आजतारखेपर्यंतचें कोणतेंहि कोणाकडेहि येणें असल्यास अगर देणें असल्यास तें येणें वसूल करून वसुलाचे पैसे घेण्याचा हक्क व देणें देण्याची जबाबदारी सर्व प्रकारें आपणा उभयतां ट्रस्टीकडे यापुढें आहे. त्या संबंधाचा आमचा असलेला हरएक प्रकारचा सर्व हक्कसंबंध या लेखानें आम्ही उभयतांनीं स्वसंतोषानें सोडून दिला आहे. त्याची किंमत अदमासें साठ हजार रुपये आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हें रिलीज पत्र आम्ही उभयतांनीं आपले स्वसंतोषानें लिहून दिलें आहे. तारीख मजकूर दस्तुर कृष्णाजी पांडुरंग करंदीकर.

साक्षी	सह्या
१ विश्वनाथ गंगाधर केतकर द. खु.	(सही) रामचंद्र बळवंत टिळक द. खु.
२ यशवंत गणेश कुळकर्णी द. खु.	(सही) श्रीधर बळवंत टिळक द. खु.

भाडेचिठी नं. १

भाडेचिठी शके १८४२ रौद्रनाम संवत्सरे माहे फाल्गुन शु. ७ रोज बुधवार ता. १६ माहे मार्च सन १९२१ ते दिवशीं—

१ रामचंद्र बळवंत टिळक जात ब्राह्मण धंदा शिकण्याचा उमर वर्षे २७ राहणार पुणें पेठ नारायण घ. नं. ५६८
२ श्रीधर बळवंत टिळक जात ब्राह्मण धंदा शिकण्याचा उमर वर्षे २५ राहणार पुणें पेठ नारायण घ. नं. ५६८
} लिहून घेणार.

यांस

१ नरसिंह चिंतामण केळकर जात ब्राह्मण धंदा एडिटर 'केसरी' उमर वर्षे ४८ राहणार पुणें सदाशिव पेठ घ. नं. ५५४
२ धोंडो वासुदेव विद्वांस जात ब्राह्मण धंदा मॅनेजर 'केसरी' उमर वर्षे ५३ राहणार पुणें नारायण पेठ घ. नं. ५६८
} लिहून देणार.

कारणें भाडेचिठी लिहून देतों कीं:—

आम्ही उभयतां केसरी–मराठा या संस्थेचे ट्रस्टी आहोंत. कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं तारीख ५ एप्रिल सन १९१८ रोजीं कोलंबो येथें लिहून ठेवलेल्या मृत्युपत्राप्रमाणें व तारीख १६ ऑगस्ट सन १९२० रोजीं तुम्ही व आम्हांपैकीं नं. २ चे धोंडो वासुदेव विद्वांस यांनीं मिळून लिहून ठेवलेल्या ट्रस्टडीडप्रमाणें केसरी–मराठा संस्थेकडे जी मिळकत भाड्यानें राहावयाची आहे ती येणेंप्रमाणें:—

जिल्हा व तुकडी पुणें तालुका व पोटतुकडी हवेली सबरजिस्ट्रार यांचे हद्दींतील शहर पुणें येथील नारायण पेठेंतील म्युनिसिपल कमिटी नं. ५६८ व सिटी सर्व्हेनंबर ५६८ चा वाडा ज्यास गायकवाडवाडा म्हणतात त्या वाड्यांत आपले खासगी राहण्याचे जागेंत जाण्याच्या दरवाजावर जो पूल आहे त्याच्या पश्चिम अंगची सर्व जागा व त्यांतील सर्व जुन्या व नव्या इमारती व खुली जागा यासुद्धां (यांत आपले खाजगी जागेंत जाण्याचा जिना व शौचकूप आहेत त्या लाइनींचे आंतील जागा म्हणजे खाजगी इमारतीच्या भिंतीपासून पश्चिमेकडील बारा फूट रुंदीची व जिन्याजवळ आंत जाण्यास जें लोखंडी फाटक आहे तेथपासून दक्षिणेकडील वाड्याचे भिंतीपावेतोंच्या लांबीची जागा सोडून बाकीची पश्चिमेकडील जागा) यांची लांबी पूर्व–पश्चिम फूट १४८ व दक्षिणोत्तर फूट १८० ची जागा व त्यांतील नव्या व जुन्या इमारती व खुली जागा यांसह. यांस चतुःसीमा पूर्वेस गायकवाडवाड्यापैकीं तुमचा खासगत राहण्याचा भाग व खुली जागा वगैरे तुमच्या मालकीचा भाग, दक्षिणेस दामले, परांजपे व आठवले यांचे वाडे, पश्चिमेस महाजन व लेले यांचे वाडे व उत्तरेस रस्ता. येणेंप्रमाणें चतुःसीमेंतील नव्या व जुन्या इमारती व खुली जागा विहिरीसह.

सदरची मिळकत तुमचे मालकीची असून कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं तारीख ५ एप्रिल सन १९१८ रोजीं लिहून ठेवलेल्या मृत्युपत्राप्रमाणें व तुम्ही उभयतांनीं व आम्हांपैकीं नं. २ चे धोंडो वासुदेव विद्वांस यांनीं तारीख १६ ऑगस्ट सन १९२० रोजीं लिहून ठेवलेल्या केसरी–मराठा संस्थेच्या ट्रस्टडीडप्रमाणें ती मिळकत केसरी–मराठा ही संस्था अस्तित्वांत आहे तोंपर्यंत आमचेकडे रहावयाची आहे. सबब ही भाडेचिठी अनियमित मुदतीची तुम्हांस आम्ही उभयतां केसरी–मराठा या संस्थेचे ट्रस्टी या नात्यानें लिहून देत आहोंत. जोंपर्यंत केसरी–मराठा ही संस्था अस्तित्वांत राहील तोंपर्यंत वर लिहिलेली मिळकत आमचेकडे भाड्यानें राहावयाची आहे. या मिळकतीचे भाड्याबद्दल आम्ही तुम्हास दरमहा १०० शंभर रुपये भाडें दरमहाचे दरमहास देत जाऊं. भाडें देऊं त्याची पावती घेत जाऊं व पावतीशिवाय भाडें दिल्याची तक्रार सांगणार नाहीं. कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे मृत्युपत्राप्रमाणें तसेंच तुम्ही व आम्हांपैकीं नं. २ चे धोंडो वासुदेव विद्वांस यांनीं लिहून ठेविलेल्या ट्रस्टडीडप्रमाणें सबंध गायकवाडवाड्याचें म्हणजे या भाडेचिठींतील मिळकत व आपला खासगत भाग मिळून सबंध गायकवाडवाड्याचे सर्व प्रकारचे म्युनिसिपल कर आम्ही उभयतां केसरी–मराठा संस्थेंतून देत जाऊं त्याबद्दल तुम्हास कोणत्याही प्रकारची तोशीस लागू देणार नाहीं, तुम्हास द्यावी लागल्यास त्याची भरपाई आम्ही करून देऊं. त्याचप्रमाणें आपले खाजगत राहण्याच्या भागाची "रिपेअरी" म्हणजे वेळोवेळीं रंगसफेती लावणें आणि जरूरीप्रमाणें शाकारणी करणें व वाड्याच्या कांपाउंडच्या भिंतीची पडझड झाल्यास ती नीट करणें एवढ्याच गोष्टी आम्ही करीत जाऊं. या भाडेचिठी अन्वयें आम्हाकडे ट्रस्टी या नात्यानें जी मिळकत राहावयाची आहे त्याची सर्व प्रकारें दुरुस्ती आम्ही करीत जाऊं व सर्व मिळकत चांगल्या स्थितींत ठेवूं. आमचेकडे भाड्यानें असलेल्या जागेंतील हरजिनसी झाडांवरील तुमचा मालकी हक्क आम्हास कबूल आहे. तथापि यदाकदाचित् आम्हास आमचे सोईसाठीं झाडें तोडावीं लागल्यास त्यास तुम्ही हरकत करूं नये. झाडें तोडल्यास तोडलेलीं लांकडें आम्ही तुम्हास देऊं. आमच्याकडे असलेल्या मिळकतीपैकीं कांहीं भाग कायमचा पाडल्यास त्या पाडलेल्या भागाचा मालमसाला जो आम्हास उपयोगी पडणार नसेल व ज्याचा आम्हास पुढें केव्हांहि उपयोग करावयाचा नसेल तो आम्ही तुम्हास देऊं. आमच्याकडे भाड्यानें असलेल्या मिळकतीत वाड्याचा मुख्य येण्याजाण्याचा रस्ता आहे त्या रस्त्यानें तुम्ही वागत जावें. त्यास आम्ही हरकत करणार नाहीं. हल्लीं ज्या इमारती आमच्याकडे या भाडेचिठी अन्वयें आहेत त्या वाढविण्यास अगर त्यांत आमच्या सोईप्रमाणें फेरबदल करण्यास आम्हां पूर्ण मुखत्यार आहोंत. त्यास तुम्हीं हरकत करूं नये व अशा फेरबदलास लागणारा सर्व खर्च आम्ही करूं. त्याची जबाबदारी तुमचेवर नाहीं व अशा वाढविलेल्या या इमारतींचा या भाडेचिठींतील मिळकतींत समावेश होईल. परंतु या वाढाव्यामुळे भाड्याचे रकमेंत मात्र कोणत्याहि प्रकारें फेरबदल होणार नाहीं. आमचेकडे असलेल्या भागाचा व तुमचेकडील भागाचा विसा निरनिराळा आम्हीं करून ठेवूं. व त्या दोनांहि विम्यांचे हप्त्याचे पैसे आम्ही भरीत जाऊं; त्याबद्दल तुम्हास तोशीस लागू देणार नाहीं. ही भाडेचिठी आम्ही स्वसंतोषानें लिहून दिली. तारीख मजकूर दस्तुर कृष्णाजी पांडुरंग करंदीकर.

साक्षी	सह्या
(सही) विश्वनाथ गंगाधर केतकर द. खु.	(सही) नरसिंह चिंतामण केळकर.
(सही) यशवंत गणेश कुळकर्णी द. खु.	(सही) धोंडो वासुदेव विद्वांस द. खु.

भाडेचिठी नं. २

भाडेचिठी शके १८४२ माहे फाल्गुन शु. ७ रोज बुधवार तारीख १६ माहे मार्च सन १९२१ ते दिवशीं:—

१ रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर जात ब्राह्मण धंदा "एडीटर केसरी" उमर वर्षे ४८ राहणार पुणें पेठ सदाशिव घ. नं. ५५४
२ रा. रा. धोंडो वासुदेव विद्वांस जात ब्राह्मण धंदा म्यानेजर "केसरी" उमर वर्षे ५३ रा. पुणें पेठ नारायण घरनंबर ५६८
} लिहून घेणार

यांस

१ रामचंद्र बळवंत टिळक जात ब्राह्मण धंदा शिकण्याचा उमर वर्षे २७ राहणार पुणें पेठ नारायण घर नंबर ५६८
२ श्रीधर बळवंत टिळक जात ब्राह्मण धंदा शिकण्याचा उमर वर्षे २५ राहणार पुणें पेठ नारायण घरनंबर ५६८
} लिहून देणार

कारणें भाडेचिठी लिहून देतों कीं, आम्ही उभयतां व आपणापैकीं नंबर २ धोंडो वासुदेव विद्वांस असे त्रिवर्गांनीं तारीख १६ आगस्ट सन १९२० रोजीं लिहून व नोंदवून ठेवलेल्या ट्रस्टडीडप्रमाणें तुम्ही "केसरी–मराठा" संस्थेचे ट्रस्टी आहांत. सदर ट्रस्टडीडप्रमाणें व तुम्ही आज रोजीं लिहून दिलेल्या भाडेचिठीप्रमाणें शहर पुणें येथील नारायण पेठेंतील गायकवाडवाड्यापैकीं जो भाग तुमचेकडे आहे त्या भागापैकीं आम्ही या भाडेचिठीनें तुम्हापासून जो भाग भाड्यानें घेत आहोंत त्याचें वर्णन येणेंप्रमाणें.

जिल्हा व तुकडी पुणें पोटतुकडी व तालुका हवेली पैकीं हवेली सबरजिस्ट्रार कचेरीचे हद्दींतील शहर पुणें येथील नारायण पेठेंत म्युनिसिपल कमिटी नंबर ५६८ व सिटी सर्व्हे नं. ५६८चा वाडा ज्यास गायकवाडवाडा म्हणतात त्यापैकीं तुमचेकडे भाड्यानें असलेल्या जागेंतील पूर्व–उत्तर म्हणजे ईशान्य कोपऱ्यांतील तळमजल्यावरील दोन खणांची खोली व त्यास लागून असलेला उत्तरेकडील रस्त्यापर्यंतचा तळमजल्याचा भाग यांसह याची रुंदी पूर्वपश्चिम फूट १०$\frac{३}{४}$ व लांबी दक्षिणउत्तर फूट २८$\frac{३}{४}$ यांसी चतुःसीमा-पूर्वेस—गायकवाडवाड्याचा आमचे मालकीचा व आमचे ताब्यांत असलेला भाग, दक्षिणेस—गायकवाडवाड्यापैकीं आमचे ताब्यांत असलेली खुली जागा, पश्चिमेस—गायकवाडवाड्यापैकीं तुमचे ताब्यांत भाड्यानें असलेली जागा व उत्तरेस रस्ता येणेंप्रमाणें चतुःसीमेंतील फक्त तळमजल्यावरील जागा.

वर वर्णन केलेली तळमजल्यावरील दोन खणांची खोली व त्यास लागून असलेली दोन खण रुंदीची तळमजल्यावरील जागा रस्त्यापर्यंतची या भाडेचिठीनें तुम्हापासून आम्ही उभयतांनीं अनियमित मुदतीचे करारानें तुम्हापासून भाड्यानें घेतली आहे. या जागेचे भाड्याबद्दल आम्ही तुम्हास दरसाल एक रुपयाप्रमाणें दरसालचे दरसाल भाडें देत जाऊं. त्याची पावती तुम्हा उभयतांचे सहीनें अगर तुम्हापैकीं कोणाच्याहि एकाचे सहीनें घेत जाऊं. पावतीखेरीज भाडें दिल्याची तक्रार सांगणार नाहीं. सदर जागेची दुरुस्ती करणें व त्या जागेबद्दल म्युनिसिपल कर देणें याची सर्व जबाबदारी तुम्हावर आहे आमचेवर ती जबाबदारी नाहीं. सदर जागेचा उपयोग सदर जागेवरील व बाजूचे इमारतीस कोणताहि प्रकारचा धक्का लागणार नाहीं अगर अपाय होणार नाहीं अशा रीतीनें आम्ही करूं.

वर वर्णन केलेल्या जागेपैकीं आंतील दोन खणांचे खोलीस पश्चिम बाजूल भिंत आहे. परंतु या खोलीचे उत्तरेकडील बाजूस रस्त्यापर्यंत जी तळमजल्याची जागा आहे त्या जागेस पश्चिम बाजूस भिंत नाहीं. तरी तशी भिंत दोन खणांपुरती घालून मागील जागाहि आजपासून दोन महिन्यांचे आंत तुम्ही आमचे ताब्यांत द्यावी.

सदरचे जागेचा उपयोग आम्ही चांगल्या रीतीनें करून जागा स्वच्छ व चांगल्या स्थितींत ठेवूं. ही भाडेचिठी आम्ही उभयतांनीं स्वसंतोषानें लिहून दिली तारीख मजकूर दस्तुर कृष्णाजी पांडुरंग करंदीकर.

साक्षी	सह्या
१ विश्वनाथ गंगाधर केतकर द. खु.	१ रामचंद्र बळवंत टिळक द. खु.
२ यशवंत गणेश कुळकर्णी द. खु.	२ श्रीधर बळवंत टिळक द. खु.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

॥ श्री ॥

पावती नं. (१)

आम्ही खाली सही करणार हे रा. केळकर व विद्वांस, केसरी–मराठा संस्थेचे ट्रस्टी, यांना पावती लिहून देतो कीं, ता. १४ मार्च १९२१ रोजीं लो. टिळकांच्या मृत्युपत्रांत नेमलेल्या पंचांनीं व लवादांनीं आपल्या ठरावाचे कलम १३ मध्यें लिहिल्या-प्रमाणें आम्हाला रु. ६००० मिळाले. त्याचा चेक नं. ३८४०६९ असून त्याची ता. १६ मार्च १९२१ ही आहे.

सह्या रामचंद्र बळवंत टिळक
श्रीधर बळवंत टिळक

पावती नं. (२)

ती. रा. रा. धोंडो वासुदेव विद्वांस, मॅनेजर 'केसरी' मु॰ पुणें यांसीः—

पावती लिहून देणार रामचंद्र बळवंत व श्रीधर बळवंत टिळक, राहणार पुणें, पावती लिहून देतों कीः—तुम्ही ता. १५ माहे मार्च सन १९२१ रोजीं खालीं लिहिल्याप्रमाणें आपलेकडे हिशेबानें शिल्लक असलेल्या गीतारहस्याच्या प्रती मोजून दिल्या, त्या आम्हास पोहोचल्याः—

१	मराठी गीतारहस्य प्रती	४३८
२	हिंदी गीतारहस्य प्रती	६०५
३	गुजराथी गीतारहस्य प्रती	६१२
४	कानडी गीतारहस्य प्रती	१२९८
		२९५३

एकूण २९५३ येवढ्या प्रती तुम्हीं आमचे ताब्यांत दिल्या त्या आम्हास पोहोचल्या. त्याबद्दल ही पावती आज तारीख २५ माहे मार्च सन १९२१ रोजीं लिहून दिली असे. आतां आपलेकडे व्ही. पी. च्या परत येणाऱ्या प्रतीखेरीज गीता रहस्याच्या प्रती येणें राहिल्या नाहींत. ही पावती लिहून दिली. ता. २५ माहे मार्च सन १९२१ इसवी.

(सही) रामचंद्र बळवंत टिळक
(सही) श्रीधर बळवंत टिळक.

पावती नं. (३)

ती. रा. रा. धोंडो वासुदेव विद्वांस, मॅनेजर 'केसरी' मु॰ पुणें यांसीः—

पावती लिहून देणार रामचंद्र बळवंत व श्रीधर बळवंत टिळक, राहणार पुणें, पावती लिहून देतों कीं—गीतारहस्याच्या मराठी, हिंदी, गुजराथी व कानडी प्रतींची विक्री ता. १ ऑगस्ट सन १९२० पासून ता. १४ मार्च सन १९२१ अखेरपर्यंत आपलेमार्फत झाली व त्या बाबतींत–आपलेमार्फत खर्च झाला तो वजा जाऊन बाकी शिल्लक आपलेकडे रोख रुपये ८२९१–१–६ पै अक्षरीं आठ हजार दोनशें एक्याण्णव रुपये एक आणा सहा पै येवढे येणें हिशेबावरून निघालें. ते रुपये तुम्ही आम्हास आज रोजी दिले ते आम्हा उभयतांस पोहोचले.

वरील रकमेखेरीज आपण दिलेल्या नक्त्याप्रमाणें २१४ प्रतींच्या व्ही. पी. ची रकम रु. ५०३–४–० ऐवढी रकम आपलेकडे येणें आहे. त्या व्ही. पी. स्वीकारून आल्यास आपण ती रकम आम्हास द्यावी. व्ही. पी. परत आल्यास परत आलेल्या प्रती द्याव्यात.

बंगाली, तामील व तेलगू या भाषांतील गीतारहस्याकरितां कागदाचे रुपानें व रोख रकम मिळून आगाऊ रुपये १४२१९–०–९ पै येवढी रकम दिलेली आहे, त्याबद्दल आम्ही अलाहिदा पत्रव्यवहार परभारें करूं.

हिशेबाचे उतारे तुम्हीं आम्हास पूर्वी दिलेच आहेत. आतां गीतारहस्यासंबंधांत तुमचेकडे आम्हां उभयतांचें कांहींएक घेणें राहिलें नाहीं. ही पावती आम्ही उभयतांनीं स्वसंतोषानें लिहून दिली. तारीख २५ माहे मार्च १९२१ इसवी.

(सही) रामचंद्र बळवंत टिळक,
(सही) श्रीधर बळवंत टिळक.

पावती नं. (४)

पावती ता. ३१ डिसेंबर सन १९२१ शनिवार रोजीं लिहून घेणार 'केसरी व मराठा' संस्थेचे ट्रस्टी यांस लिहून देणार रामचंद्र बळवंत व श्रीधर बळवंत टिळक, राहाणार पुणें, पावती लिहून देतों कीः—

तुमचेकडून गीतारहस्याचा हिशेब ता. १४-३-१९२१ रोजीं घेतला, त्या वेळीं सन १९२० सालांतील व्ही. पी. ९ व सन १९२१ सालांतील व्ही. पी. ६२ यांचा हिशेब राहिलेला होता त्यांपैकीं सहा व्ही. पी. च्या गीतारहस्याच्या प्रती (५ हिंदी व १ मराठी) परत आल्या त्या आम्हांस मिळाल्या व ३ व्ही. पी. च्या प्रती वरच्या यादींत नमूद असून त्या पूर्वीच आम्हास मिळाल्या आहेत. १ व्ही. पी. चुकून डबल मांडली गेली. (नं. ३१४३) व ४ व्ही. पी. अजून परत यावयाच्या आहेत. मिळून १४ व्ही. पी. वजा जातां बाकीच्या ५७ व्ही. पी. ची रकम म्हणून तुमचेकडे एकंदर रुपये ४४९-२-० आले. त्यांत नाईक भोलानाथ, बगदाद यांस रु. ९ परत पाठविले व रु. ३० चित्रशाळेचे फोटोचे बिलाचे तुम्ही दिले व रुपये ६–३ किन-तानाचें बिल चित्रशाळेचें तुम्ही दिले. मिळून रकम रु. ४५–३–० वजा जातां बाकी रु. ४०३–१५–० तुमचेकडे येणें राहिलें त्याबद्दल आज रोजीं रोख रु. ३–१५–० व रकम रु. ४०० (चारशें) चा चेक नं. A 460275 आजचे तारखेचा दिला. मिळून रकम रु. ४०३–१५–० आज आम्हांस पोहोचली.

(सही) रामचंद्र बळवंत टिळक.
(सही) श्रीधर बळवंत टिळक.

तारीख ३१ डिसेंबर १९२१

लवादनामा नं. २

कै. लोकमान्य टिळक यांनीं आपल्या मृत्युपत्रांत नेमिलेल्या पंचांची सभा पुणें येथें ता. २४–६–१९२३ रविवारीं भरली त्याचें 'प्रोसीडिंग'—

पुणें येथें आज तारीख २४ जून १९२३, रविवारीं, आम्हां खालीं सह्या करणार त्रिवर्ग पंचांची सभा भरली. सभा भरण्याचें कारण असें कीं, आम्हांपैकीं श्रीरंग मोरेश्वर साने यांचे मतें, कै. लो. टिळक यांचे उभयतां चिरंजिवांकडून रीतसर रिलीज डीड लिहून घेतलें आहे तरी, मृत्युपत्राचें अंमलबजावणीसंबंधानें उभयतां चिरंजिवास असमाधान वाटत असल्यानें सुमारें वर्षभर दिसत आहे; या कारणामुळें मृत्युपत्रासंबंधीं सर्व बाबींचा पुनः एकवार बसून विचार करावा, व तिघां पंचांच्या दृष्टीनें मृत्युपत्रां-प्रमाणें सर्व योग्य व्यवस्था झाली आहे कीं नाहीं हें पाहून अद्यापि कांहीं होण्यासारखें राहिलें असेल असें वाटल्यास तेंहि करावें, यासाठीं रा. साने हे सुट्टींत इकडे आल्या-कारणानें याच वेळीं, सभा भरवावी असें त्यांनीं सुचविल्यावरून आज सभा भरविण्यांत आली. त्या वेळीं एक्झीक्यूटर रा. धोंडो वासुदेव विद्वांस यांस माहिती घेण्यासाठीं बोलावून आणल्यामुळें तेहि हजर आहेत. या सभेंत सर्वानुमतें खालील ठराव केले आहेत;—

१ गं. भा. बहिणाबाई यांचे अन्नवस्त्राबद्दलची वगैरे जबाबदारी उभयतां चिरंजिवांनीं आपणाकडे घेतली आहे. तरी उभयतां चिरंजिवांनीं गं. भा. बहिणाबाई यांचेकडून एक्झिक्यूटर यांस रीतसर रिलीज डीड करवून द्यावें, व तोंपर्यंत गं. भा. बहिणाबाईंस अन्नवस्त्राबद्दल दिलेल्या रकमांच्या पावत्या एक्झिक्यूटर यांस द्याव्या.

२ मृत्युपत्रांतील कलम २ प्रमाणें चिखलगांवची इस्टेट व शिवाय हजार पंधराशें १०००–१५०० रुपये तेथील देवाचे नांवानें करून देण्याची जबाबदारी उभयतां चिरंजिवांनीं पत्करली होती त्याप्रमाणें त्यांनीं ट्रस्टडीड करून दिलें कीं नाहीं तें एक्झिक्यूटर यांस कळवावें, व अद्यापि ट्रस्टडीड केलें नसल्यास तें लवकर करावें.

३ मृत्युपत्रांतील कलम ३ यांत लातूर येथील जिनिंग उभयतां चिरंजिवांस द्यावी असें लिहिलें आहे. परंतु रा. साने यांस दहा हजार रुपये देणगीदाखल दिले त्या वेळीं उभयतां चिरंजिवांनीं सदरची दहा हजार रुपयांची रकम देण्याची जबाबदारी त्यांचेवर आहे अशा समजुतीनें लातूरच्या जिनिंगचें साटेंखत व विक्री करण्याकरितां मुखत्यारपत्र एक्झिक्यूटर यांचें नांवानें करून दिलें होतें. परंतु सदरचे दहा हजार रुपये देण्याची जबाबदारी अखेर एक्झिक्यूटरवरच आहे असें आमचें मत असल्यामुळें, हें साटेंखत व मुखत्यारपत्र रद्द केल्याचा शेरा त्यावर मारून उभयतां चिरंजिवांचे स्वाधीन एक्झिक्यूटर यांनीं करावें, व लातूर जिनिंगचा कै. लोकमान्य टिळक यांचे हिस्सापुरता कबजा उभयतां चिरंजिवांस एक्झिक्यूटर यांनीं द्यावा व दहा हजार रुपयांचा जमाखर्च वरील व्यवस्थेस अनुसरून करून घ्यावा.

४—मृत्युपत्राचें कलम ६ यांत लिहिल्याप्रमाणें रा. विश्वनाथ गंगाधर केतकर यांचे चिरंजिवांचे शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी एक्झीक्यूटरवर आहे. परंतु कै. लोकमान्य टिळक यांनीं आपले मृत्युपूर्वी सुमारें एक महिना सात हजार रुपये केतकर यांस कर्जाऊ दिले होते. या सात हजारांपैकीं सहा हजार रुपये रा. अण्णासाहेब नेने यांनीं केलेल्या ज्युबिली फंडाचे ट्रस्टडीडमध्यें केतकर यांचेकडे येणें आहे असें दाखविलें आहे असें समजतें. व बाकी राहिलेले एक हजार रुपये केसरीचे जमाखर्चांत केतकर यांचें नांवें पडलेले आहेत. केतकर यांचे चिरंजिवांचे शिक्षणाच्या खर्चाची जी जबाबदारी एक्झिक्यूटरवर आहे ती जबाबदारी व वरील सात हजार रुपये यांचा पर-स्पर मोबदला करण्याबद्दल एक्झिक्यूटर व केतकर यांची संमति असल्यामुळें एक्झि-क्यूटर यांनीं केसरीचे जमाखर्चांत केतकरांच्या नांवें पडलेले एक हजार रुपये जमा करून घ्यावे व पावती द्यावी; व ज्युबिली फंडाचे ट्रस्टचें केतकर यांचेकडचें जें घेणें आजपावेतों निघत असेल तें सर्व देऊन टाकून त्याची पावती केतकर यांस आणवून द्यावी, व केतकर यांचेकडून रिलीज पत्र लिहून घ्यावें.

५ मृत्युपत्रांतील "छापखाना" या सदराखालील कलम ६ प्रमाणें गायकवाडवाड्याची दुरुस्ती करण्याची जबाबदारी एक्झिक्यूटरवर आहे व त्यांत उभयतां चिरंजिवांकडे गायकवाडवाड्याचा जो भाग आहे त्याची दुरुस्ती करण्याचीहि जबाबदारी येते. या दुरुस्तीबद्दल सालिना ठराविक रकम एक्झिक्यूटर यांनीं उभयतां चिरंजिवास द्यावी असें आम्हांस वाटतें. तरी ही रकम ठरविण्याकरितां दिवाणबहादुर दादासाहेब गोडबोले व रावबहादुर विनायक त्रिंबक आगाशे या उभयतांचा सल्ला घेऊन ते जी रकम योग्य म्हणून ठरवितील ती रकम दरसाल उभयतां चिरंजीवांस एक्झिक्यूटर यांनीं द्यावी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

६ मृत्युपत्रांतील "चिरोल केस" या सदराखालील कलम १ मध्यें शिल्लक असलेल्या पैशाच्या विनियोगाचा उल्लेख आहे. कै. लोकमान्य टिळक यांचे मृत्यूचे तारखेस एक्झिक्यूटर यांच्याजवळ बँकेंत व रोख मिळून असलेली शिल्लक व त्याचा केलेला विनियोग एक्झिक्यूटर यांनीं पंचासमोर सांगितला तो येणेंप्रमाणें—

शिल्लक

रु. ४२००० सुमारें, बँकेंत व रोख मिळून.

खर्च

रु. ३७०० सुमारें, लोकमान्य टिळक यांचे घरखर्चाबद्दल ता. १-८-२० रोजीं असलेलें देणें देऊन टाकलें तें.

रु. २१८०० सुमारें, नव्या इमारतीसाठीं केलेला खर्च.

रु. ४००० सुमारें, मशिनरीच्या खर्चाचीं दिलेलीं बिलें.

रु. २००० सुमारें, मुंबई मुक्कामच्या आजारीपणाबद्दल व और्ध्वदेहिकाबद्दल झालेला खर्च.

रु. १२००० केसरीचे एडिटर यांस देणग्या दिल्या त्याः—

५००० रु. न. चिं. केळकर.
५००० रु. कृ. प्र. खाडिलकर.
१००० रु. दा. वि. गोखले,
१००० ज. स. करंदीकर.

———

१२००० रु.

रु. २६००० सुमारें, कागदाचें देणें राहिलेलें दिलें ते

रु. १०००० साने यांस दिले ते.

रु. ६००० पंचांच्या पूर्वीच्या निवाड्याप्रमाणें उभयतां चिरंजिवांस दिले ते.

रु. ५०० अण्णासाहेब पटवर्धन स्मारकफंडाचे दिले ते.

रु. ८०० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे वस्टकरितां कबूल केलेली रक्कम दिली.

रु. ३०० चि. रामभाऊस अलाहाबाद येथें जाण्याकरितां रोख दिले ते.

रु. ४०० साने प्रयागला जाऊन आले त्याबद्दलचा खर्च.

———

रु. ८७५०० सुमारें.

सदरहू जमाखर्चांचे आंकडे पाहतां कै. लोकमान्य टिळक यांच्या मृत्युपत्रांतील वर उल्लेखिलेल्या कलमासंबंधानें स्वतः कै. लो. टिळक यांच्या ज्या इच्छा होत्या त्या लक्षांत घेतां त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांचे मृत्यूचे तारखेची शिल्लक योग्य रीतीनें सर्व खर्ची पडली गेली आहे अशी आमची खात्री झाली आहे. कै. लोकमान्य टिळक यांचे मृत्युपत्राप्रमाणें व त्यांच्या इच्छा होत्या त्याप्रमाणें मृत्युपत्रांतील सर्व बाबींची योग्य व्यवस्था झाली आहे व आतां उभयतां चिरंजिवांचें पूर्ण समाधान झालें पाहिजे असा आमचा अभिप्राय आहे.

पुणें ता. २४-६-१९२३.
न. चिं. केळकर.
विश्वनाथ गंगाधर केतकर.
श्रीरंग मोरेश्वर साने.

वरील ठराव मला मान्य आहे.

धोंडो वासुदेव विद्वांस एक्झिक्यूटर.
ता. २४-६-१९२३.

रामभाऊ टिळकांचा कोर्टास अर्ज (दाव्याचें काम पुढें न चालविण्याबाबद)

मूळ प्रतिवादी नं. २ म्हणजे प्रतिवादी नं. १ चे धाकटे बंधु कै. श्रीधर बळवंत टिळक यांचे आत्महत्येमुळें प्रतिवादी नं. १ च्या मनःस्थितींत जो फरक झाला आहे, त्यामुळें स्वतः प्रतिवादी नं. १ तर्फे, सदरहू दाव्याचें काम पुढें चालविणें प्रतिवादी नं. १ यांस अशक्य झालें आहे. तसेंच प्रतिवादी नं. १ च्या सदरहू कै. बंधूनीं प्रतिवादी नं. १ यांस आपल्या अज्ञान मुलांचा पालन करणार नेमल्यामुळें व अज्ञानांचे आईनें व मे. कोर्टानेंहि त्यांस संमति दिल्यामुळें प्रतिवादी नं. १ वर अज्ञानांचे पालनपोषणाची वगैरे जी जबाबदारी आली आहे, त्यामुळें हल्लींच्या परिस्थितींत तरी अज्ञानांच्या हिताचा एकटा खरा व पूर्ण माहितगार (The only best judge) या दृष्टीनेंहि प्रतिवादी नं. १ यांस सदरहू दाव्यांतून अंग काढून घेऊन प्रतिवादी नं. २ विरुद्धहि सदरहू दाव्याचे कामीं एकतर्फे निकाल (Exparte decision) होऊं देणें योग्य वाटत आहे. वास्तविक प्रतिवादी नं. १ यानें उभयतां प्रतिवादींकरितां ही गोष्ट पूर्वींच करावयास पाहिजे होती. परंतु मध्यंतरीं तडजोडीचें घाटत असल्यामुळें त्याप्रमाणें करतां आलें नाहीं. परंतु आतां तडजोड फिसकटल्यामुळें मे. कोर्टास चालू अर्ज करणें प्रतिवादी यास भाग झाले आहे. तरी प्रतिवादीतर्फे विनंति कीं, वरील एकंदर परिस्थितींत सदरहू दाव्याचें काम वादी यांस पुढें चालवावयाचेंच असल्यास, दाव्याचे कामीं आतांपर्यंत जो काय एकंदर पुरावा व कागदपत्र हजर झाले असतील त्यावरून मे. कोर्टानें एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन व अज्ञानाचे हिताचे दृष्टीनें योग्य तो निकाल खर्चाचे व इतर सर्व बाबतींत द्यावा. ता. ५ माहे जानेवारी सन १९२९.

(सही) रामचंद्र बळवंत टिळक स्वतःकरितां व अज्ञान
जयंत श्रीधर टिळक याचा पालन करणार म्हणून.

हुकुमनामा

पुणें येथील जॉइंट फ. क्ला, सब-जज्ज यांचे कोर्टांत

मुक्काम पुणें येथें.

दि. मु. नंबर १२६४/१९२७ पैकीं.

फिर्याद दाखल तारीख १६ माहे ऑगस्ट सन १९२७.
फिर्याद फाईल तारीख २६ माहे ऑगस्ट सन १९२७.

१ नरसिंह चिंतामण केळकर, ब्राह्मण उमर वर्षें ५५ धंदा संपादक 'केसरी,' राहणार पुणें पेठ सदाशिव घरनंबर ५५४. २ धोंडो वासुदेव विद्वांस, ब्राह्मण उमर वर्षें ६० धंदा मॅनेजर 'केसरी,' राहणार पुणें पेठ नारायण घरनंबर ६.	वादी

विरुद्ध

१ रामचंद्र बळवंत टिळक ब्राह्मण उमर वर्षें ३३, धंदा सुखवस्तु, राहणार पुणें पेठ नारायण घरनंबर ५६८ २ श्रीधर बळवंत टिळक ब्राह्मण उमर वर्षें ३१, धंदा जात व रा. सदर. फिर्यादीनंतर मयत वारस बंधू प्रतिवादी नं. १ व पुत्र जयंत श्रीधर टिळक ब्राह्मण उ. व. ७ विद्यार्थी अ.पा.क.प्रतिवादी नं. १	प्रतिवादी

दावा रुपये ५००५

आम्ही वादी कळवितों तें येणेंप्रमाणें:—

१ जिल्हा व तुकडी पुणें व पोटतुकडी हवेली सब-रजिस्ट्रार यांचे हद्दींतील शहर पुणें येथील नारायण पेठेंतील म्युनिसिपल कमिटी नंबर ५६८ व सिटी सर्व्हे नंबर ५६८ ज्यास गायकवाडवाडा म्हणतात त्या वाड्यांत प्रतिवादींचे खासगी राहण्याचे जागेंत, जाण्याच्या दरवाजावर जो पूल आहे त्याच्या पश्चिम आंगची सर्व जागा व त्यांतील सर्व जुन्या व नव्या इमारती व खुली जागा यासुद्धां—(यांत प्रतिवादींचे खाजगी जागेंत जाण्याचा जिना व शौचकूप आहेत त्या लाइनींचे आंतील जागा म्हणजे खासगी इमारतीच्या भिंतीपासून पश्चिमेकडील बारा फूट रुंदीची व जिन्याजवळ आंत जाण्यास जें लोखंडी फाटक आहे तेथपासून दक्षिणेकडील वाड्याचे भिंतीपावेतोंच्या लांबीची जागा सोडून बाकीची पश्चिमेकडील जागा) याची लांबी पूर्व-पश्चिम फूट १४८ व दक्षिणोत्तर फूट १८० ची जागा व त्यांतील नव्या व जुन्या इमारती व खुली जागा यांसह. यास चतुःसीमा—पूर्वेस गायकवाडवाड्यापैकीं प्रतिवादींचा खासगत राहण्याचा भाग व खुली जागा वगैरे प्रतिवादींच्या मालकीचा भाग, दक्षिणेस दामले, परांजपे व आठवले यांचे वाडे, पश्चिमेस महाजन व लेले यांचे वाडे, उत्तरेस रस्ता. येणेंप्रमाणें चतुःसीमेंतील नव्या व जुन्या इमारती व खुली जागा विहिरीसह.

२ कलम १ यांतील मिळकत मूळ कैलासवासी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्वसंपादित मालकीची व वहिवाटीची होती. लोकमान्य टिळक यांनीं आपल्या सर्व मिळकतीसंबंधाचें वुईल कोलंबो येथें ता. ५ एप्रिल सन १९१८ रोजीं केलें. नंतर ते ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं मुंबई येथें कैलासवासी झाले. प्रतिवादी १-२ हे लोकमान्य टिळकांचे चिरंजिव आहेत. लोकमान्यांच्या मृत्युपत्राप्रमाणें व्यवस्था करण्याचा अधिकार वादी नं. २ यांस एक्झिक्यूटर म्हणून दिलेला होता व त्यांचे पश्चात् प्रतिवादी नं. १ यांस दिलेला होता.

३ लोकमान्य टिळकांच्या पूर्वोक्त मृत्युपत्रांत केसरी छापखाना, वर्तमानपत्रें इत्यादिसंबंधानें व्यवस्था केली होती. सदर व्यवस्थेंत संमति देऊन लोकमान्यांचे या बाबतींत हेतु पूर्ण करण्याकरितां व मृत्युपत्राची पूर्तता करण्याकरितां प्रतिवादी १-२ व वादी २ यांनीं ता. १६ ऑगस्ट सन १९२० रोजीं ट्रस्टडीड केलें. या ट्रस्टडीडप्रमाणें वादी १-२ यांना पहिले ट्रस्टी म्हणून नेमण्यांत आलेलें आहे.

४ वरीलप्रमाणें ट्रस्टडीड झाल्यावर प्रतिवादी १-२ यांनीं वादी १-२ यांना केसरी व मराठा या संस्थेचे ट्रस्टी म्हणून ता. १५ मार्च सन १९२१ रोजीं रिलीज पत्र करून दिलें आहे. व वादींनीं प्रतिवादींस कलम १ यांतील मिळकतीसंबंधानें ता. १६ मार्च १९२१ रोजीं अनियमित मुदतीची भाडेचिठ्ठी करून दिलेली आहे. वरील चार दस्तान्वयें दाव्यांतील मिळकतीसंबंधाचे वादी-प्रतिवादींचे हक्कसंबंध निश्चित करण्यांत आलेले आहेत. व ट्रस्टी व भाडेकरी या नात्यानें कलम १ यांतील मिळकत वादींच्या ताब्यांत व वहिवाटीस आहे. असें असतां प्रतिवादींनीं दांडगाईनें, बिगरहक्कानें वादींच्या हरकतीस न जुमानतां व वादींस शारीरिक इजा करण्याच्या धमक्या देऊनहि आतांपर्यंत जीं जीं अपकृत्यें केलीं तीं येणेंप्रमाणें:—

(अ) दाव्यांतील मिळकतीच्या पश्चिमबाजूच्या उत्तरेकडील कोपऱ्यांत वादींनीं आपल्यासाठीं व आपल्या हाताखालील नोकरांसाठीं दोन फ्लशिंगचे शौचकूप बांधलेले आहेत. सदर शौचकुपांचा उपयोग व वहिवाट करण्याचा प्रतिवादींना अगर त्याच्या नोकराचाकरांना बिलकुल हक्क नाहीं. प्रतिवादींनां आपल्या घराचें बांधकाम चालविलें असून त्यासाठीं कामगार लोक नेमलेले आहेत. प्रतिवादींच्या चिथावणीवरून सदर कामगार लोक वरील शौचकुपांचा उपयोग करून त्यांची नासाडी करूं लागले, म्हणून वादी २ यानें त्याच्या पुढील दारास कुलूप लावलें तें प्रतिवादी १ नें बिगरहक्क तोडलें व सदर दारास आपलें कुलूप लावून त्याची एक किल्ली वादी २ यांच्या ऑफिसांत येऊन टेबलावर फेंकून दिली. ती वादी २ नें घेण्याचें नाकारलें. प्रतिवादींचें कुलूप दारास चार-पांच दिवस होतें. परंतु नंतर तें त्यांनीं काढून घेतलें. हा प्रकार गेल्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत झाला.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(आ) सन १९२४ च्या जानेवारी महिन्यांत (ता. २।१।२४) केसरीच्या मशीनचें जुनें ऑईल इंजीन विकण्यासाठीं काढलें असतांना प्रतिवादींनीं वादीस तें करण्यास बिगरहक्क अडथळा केला. इतकेंच नव्हे तर वादींविरुद्ध पोलिसांकडे फिर्यादहि दिली. परंतु पोलिसांनीं ती काढून टाकली. पण या कृत्यामुळें वादींस अडथळा होऊन व विनाकारण खर्च करावा लागून विक्रीचें काम लांबणीवर पडलें.

(इ) सुमारें तीन वर्षांपूर्वीं म्हणजे २०-१-२३ रोजीं दाव्यांतील मिळकतीच्या खुल्या जागेंत केसरी व मराठा पत्रांच्या संपादकांच्या उपयोगासाठीं वादींनीं दुमजली इमारत बांधण्याचें कामाचें प्लॅन व एस्टिमेटस् तयार केलीं व त्याप्रमाणें कॉन्ट्रॅक्टर पाया खोदण्यास नोकरांसह आले असतां प्रतिवादींनीं सदर कामास बिगरहक्क हरकत केली. यामुळें वादींस इमारत करतां आली नाहीं व संपादकवर्गांची अद्याप अडचण कायम आहे.

(ई) दाव्यांतील मिळकतीच्या खुल्या जागेंत वास्तविकपणें प्रतिवादींचा कोणताहि हक्कसंबंध नाहीं. असें असतां प्रतिवादींनीं सदर जागेंत सन १९२७ च्या एप्रिल महिन्यापासून दगड, माती विटा, चिखल, चुना वगैरे टाकले असून, दांडगाईनें व बिगरहक्कानें चुन्याची घाणी बांधून चालविली आहे. यामुळें सर्व खुली जागा घाणेरडी झालेली असून तिची नासाडी झालेली आहे. शिवाय वादींच्या दक्षिणेकडील इमारतींत जाण्यायेण्यास व तिजमध्यें सामानसुमान ठेवण्यास व तिजमधून तें काढण्यास अत्यंत गैरसोय झालेली आहे. शिवाय, सदर खुल्या जागेंत दरवर्षी होणाऱ्या श्रीगणेशोत्सवास त्यामुळें अडचण होणार आहे.

(उ) केसरी पत्रांत प्रसिद्ध होणारी लोकमान्यांच्या रंगीत तसबिरींची जाहिरात केवळ सिंगल कॉलमांत कंपोज केल्यामुळें प्रतिवादी १ नें प्रतिवादी २ च्या संमतीनें तारीख २०-९-२६ रोजीं दांडगाईनें मेट्रांसचा तयार झालेला कागद फाडून टाकला व वादींचें नुकसान करून केसरी पत्राच्या त्या अंकाच्या प्रसिद्धीकरणास खोळंबा केला.

(ऊ) तारीख २८-५-२७ रोजीं प्रतिवादी १ नें भय्याजवळून किल्ल्या घेऊन बिगरहक्क दिंडीचें कुलूप काढून कुलूपकिल्ली नेली व तारीख १-६-२७ रोजीं प्रतिवादी १ नें दिंडीचा कडी-कोयंडा काढून टाकला.

(ए) सन १९२७च्या जुलै महिन्यांत प्रतिवादींनीं वाड्याच्या मुख्य दरवाजाची फरशी वादींना व वादींच्या नोकर-माणसांना त्रास देण्याच्या इरादानें काढली व नंतर कांहीं दिवसांनीं ती बसविली. यामुळें वादींस व त्यांच्या नोकरांस दाव्यांतील मिळकतींत जाण्यायेण्यास फारच गैरसोय झाली.

(ऐ) शिवाय, प्रतिवादी, वादींची परवानगी न घेतां छापखान्याच्या व ऑफिसच्या इमारतींत जाऊन नोकर-माणसांना कामांत खोटी करतात.

(ओ) प्रतिवादी वादींस भाड्याबद्दल पूर्वी रीतसर पावती देत आलेले आहेत. परंतु अलीकडे ते अंडर-प्रोटेस्ट पावती देऊं लागले आहेत.

५ वरील कृत्यें करण्याचा प्रतिवादी १।२ यांना बिलकुल हक्क किंवा अधिकार नाहीं. दाव्यांतील मिळकतीसंबंधाचे यांचे हक्कसंबंध पूर्वोक्त दस्तऐवजांतून स्पष्टपणें नमूद व निश्चित केलेले आहेत. प्रतिवादी १।२ हे लोकमान्यांचे चिरंजीव असल्यामुळें, खासगी रीतीनें वादींनीं प्रतिवादींना तसें न करण्याबद्दल अनेकदां सांगितलें. शिवाय वादी-प्रतिवादींमधील कोणताहि वाद कोर्टांत जाऊं नये म्हणून तारीख १६।८।१९२७ च्या ट्रस्टडीड अन्वयें वादी नं. १ आणि लोकमान्यांचे दोघे जांवई म्हणजे विश्वनाथ गंगाधर केतकर व श्रीरंग मोरेश्वर साने यांस पंच नेमलेले असून त्यांचेमार्फत वादग्रस्त बाबींचा निकाल करून घेण्याची योजना सदर दस्तामध्यें करण्यांत आलेली आहे. तिला अनुसरून वादी २ यांनीं वरील पंचांकडे तारीख १३।५।२७ रोजीं तक्रारी-अर्ज गुदरून पंच-कयास होण्यासाठीं आपली तयारी दर्शविली. परंतु प्रतिवादींनीं ट्रस्टडीडमधील योजनेस न जुमानतां पंचांसमोर हजर होण्याचें व आपलें म्हणणें मांडण्याचें नाकबूल केलें. अशा प्रकारें सर्व मार्ग खुंटल्याकारणानें वादींस ट्रस्टी व भाडेकरी या नात्यानें हा दावा करणें भाग झालें आहे.

६ दाव्यास कारण या कोर्टाच्या हद्दींत शहर पुणें येथें फिर्यादींचें कलम ४ पोटकलमें अ ते ए यासंबंधानें सदर पोटकलमांतून दिलेल्या त्या त्या तारखेस अगर महिन्यांत अगर त्या त्या सुमारास घडलें व शिवाय सन १९२७ च्या मे महिन्यांत अगर त्या सुमारास घडलें.

७ फिर्यादींसोबत सिटी सर्व्हेचा उतारा हजर केला आहे.

८ कोर्टाचें हुकमनाम्याकरितां व वकील-फीकरितां दावा रुपये ५००५ चा केला असून कोर्ट-फी स्टॅपासाठीं दावा रुपये ५००५ चा केला आहे.

९ वादींची विनंति कीं,

(अ) प्रतिवादींनीं वरील कलम २ यांत वर्णन केलेल्या मिळकतींत असलेल्या कोणत्याहि इमारतींत व चौकांत जाऊं नये व तेथील किंवा बाहेर पडलेल्या कोणत्याहि सामान-सुमानास हात लावूं नये अशी निरंतरची ताकीद द्यावी. त्याबद्दल दावा रुपये १००० चा केला आहे.

(ब) कलम १ यांतील मिळकतींत प्रतिवादींनीं दगड, माती, विटा, चुना वगैरे जिन्नस जे जे टाकलेले आहेत व चुन्याची घाणी चालविली आहे, ते जिन्नस व घाणी त्यांनीं काढून टाकावी अशी त्यांस निरंतरची ताकीद देण्यांत यावी. वरील कृत्यें प्रतिवादींनीं न केल्यास वादी तीं करतील किंवा करवितील त्यास प्रतिवादींनीं हरकत करूं नये, अशी त्यांना निरंतरची ताकीद देण्यांत यावी. त्याबद्दल दावा रुपये १००० चा केला आहे. वरील कामें करण्यासाठीं वादींस जो खर्च येईल तो प्रतिवादींनीं वादींस देण्याचा हुकूम व्हावा.

(क) वरील कलम १ यांतील खुल्या जागेंत प्रतिवादींनीं येऊं जाऊं नये अगर दगड, धोंडा, माती वगैरे पदार्थ टाकून अगर अन्य प्रकारें वहिवाट करूं नये किंवा सदर जागेची नासधूस करूं नये, अशी त्यांना निरंतरची ताकीद द्यावी. त्याबद्दल दावा रुपये १०००चा केला आहे.

(ड) कलम १ यांत सध्या असलेल्या इमारती वादी नव्या जुन्या करतील किंवा वाढवितील त्यांस प्रतिवादींनीं हरकत करूं नये अशी त्यांना निरंतरची ताकीद देण्यांत यावी. त्याबद्दल दावा रुपये १००० चा केला आहे.

(ढ) कलम १ यांतील मिळकतींत वाड्याचा जो मुख्य दरवाजा आहे त्या वाटें सकाळीं सात ते रात्रीं ९ वाजेपर्यंत फक्त जाण्यायेण्याचाच प्रतिवादींचा हक्क असल्यामुळें प्रतिवादींनीं सदर दरवाज्याचे अगर दिंडीचे कडीकोयंडे काढूं नयेत किंवा त्यासंबंधानें दुसरें कोणतेंहि अपकृत्य करूं नये अशी प्रतिवादींना निरंतरची ताकीद देण्यांत यावी. त्याबद्दल दावा रुपये १००० चा केला आहे.

(ण) वरील कलमें १ ते ४ यांत निर्दिष्ट केलेल्या दस्तान्वयें वादींचे जे जे हक्क निश्चित झालेले आहेत त्यांस बाध येईल असें कोणतेंहि कृत्य करूं नये अशी त्यांना निरंतरची ताकीद देण्यांत यावी. त्याबद्दल दावा रुपये ५ चा केला आहे.

(त) या दाव्याचा वादींचा सर्व खर्च प्रतिवादींकडून वादींस देण्यांत यावा.

(थ) आणखी योग्य व न्यायाचे ठराव कोर्टानें करावेत.

तारीख ७ माहे मार्च सन १९२९ रोजीं मे. सी. पी. पारख जॉ. फ. स. जज्ज यांचेसमोर वादींतर्फे वकील मि. भोपटकर एल्‌एल्. बी. व मि. केळकर के. व्ही. हजर व प्रतिवादी १-२ तर्फे मि. डांगे एन. डी. व मि. देशमुख वी. व्ही. गैरहजर यांचे समक्ष अखेरनिकालासाठीं मुकदमा निघाल्यावरून असा हुकूम होत आहे कीं, प्रतिवादी १ व २ यांनीं दाव्यांतील वाड्याचा भाग व त्यांत असलेले व फिर्यादींत वर्णन केलेले चौकरूप वापरूं नयेत व सदर मिळकतीच्या वादींच्या उपभोगास अडथळा करूं नये अशी त्यांना निरंतरची ताकीद देण्यांत येत आहे. वादींना भाड्यानें दिलेल्या दाव्यांतील मोकळ्या जागेंत ठेविलेले माती, चुना, विटा वगैरे जिन्नस त्यांनीं काढून न्यावेत असा प्रतिवादींना हुकूम करण्यांत येत आहे; व तशा प्रकारच्या वस्तु यापुढें कधींहि सदर जागेंत ठेवूं नयेत किंवा तशा वस्तु ठेवून कोणत्याहि प्रकारची घाण करूं नये अशी त्यांना निरंतरची ताकीद देण्यांत येत आहे. प्रतिवादींनीं जर सदरच्या वस्तु उचलून नेल्या नाहींत तर त्या प्रतिवादींच्या खर्चानें कोर्टामार्फत काढून टाकण्याचा वादींस हक्क आहे.

वादी हे सध्यां असलेल्या इमारती वाढविण्यासाठीं त्यांना जोडून मोकळ्या असलेल्या जागेवर योग्य प्रमाणांत नवीन इमारती बांधतील अगर त्यांत फेरफार करतील तर त्यांना तसें करण्यास प्रतिवादींनीं हरकत करूं नये अशी त्यांस निरंतरची ताकीद देण्यांत येत आहे. प्रतिवादींनीं वाड्याचा मुख्य दरवाजा व दिंडी यांचे कडीकोयंडे काढूं नयेत आणि वादी हे दररोज साधारणपणें रात्रीं ९ ते सकाळीं ६ वाजेपर्यंत दरवाजा व दिंडी यांस कुलूप घालतील त्यांस हरकत करूं नये अशी त्यांना निरंतरची ताकीद देण्यांत येत आहे. प्रतिवादींना अगर त्यांचेकडे येणाऱ्या इसमांना प्रसंगविशेषीं रात्रीचे वेळीं दरवाजा उघडून मिळण्याचा जो हक्क आहे त्यास या हुकूमनाम्यानें बाध येत नाहीं. वादी हे वाड्यांत नेहमींचा वार्षिक गणेशोत्सव साजरा करतील त्यास प्रतिवादींनीं हरकत करूं नये अशीहि त्यांस ताकीद देण्यांत येत आहे. ट्रॅन्स्फर ऑफ प्रॉपर्टी आक्टाचें कलम १०८ अन्वयें प्रतिवादींना मालक या नात्यानें दाव्यांतील वाड्याचे भागासंबंधीं जे कायदेशीर हक्क आहेत त्यांना व सदर जागेंत जाऊन जागेची स्थिती पाहण्याला व वाड्याचा थोरला दरवाजा व दिंडी यांचा साधारणपणें सकाळीं ६ ते रात्रीं ९ पर्यंत अगर वर दर्शविल्याप्रमाणें रात्रीचे वेळीं जाण्यायेण्याकरितां उपयोग करण्याचा जो प्रतिवादींचा हक्क आहे त्यांस वरील दिलेल्या ताकिदीमुळें बाध येत नाहीं.

वादींनीं आपला खर्च प्रतिवादींकडून वसूल करून घ्यावा. प्रतिवादींनीं आपला खर्च सोसावा.

केसरीट्रस्टच्या दाव्याचा निकाल

न्यायाधीशांच्या निकालाचीं कारणें

प्रथम वादींची फिर्याद, प्रतिवादींची कैफीयत व त्यावरून निघणारे मुद्दे यांचा रीतसर निर्देश करून कोर्ट म्हणतें:—"चालू दावा खूप जोरानें लढविण्याचा प्रयत्न रामभाऊ व श्रीधरपंत यांनीं केला. पुढें श्रीधरपंत यांनीं ता. २५ मे १९२८ रोजीं आत्महत्या केली. त्यामुळें त्यांच्या अज्ञान मुलाचें नांव त्यांचे जागीं प्रतिवादी पक्षकार म्हणून दाखल करण्यांत आलें व रामभाऊ यांस सदर दाव्यापुरता मुलांचा पालनकर्ता म्हणून नेमण्यांत आलें, रामभाऊ यांनीं श्रीधरपंत यांच्या मृत्युनंतरहि उभय प्रतिवादीतर्फे अतिशय चुरशीनें दावा लढविला. गणपत्युत्सवासंबंधानें वादींचा वहिवाटीचा हक्क शाबीत धरून, त्यांना प्रतिवादींनीं हरकत करूं नये अशी कोर्टानें प्रतिवादींना ताकीद दिली. त्याविरुद्ध रामभाऊ यांनीं हायकोर्टाकडे अपीलहि केलें पण तें फुकट गेलें. नंतर समेटाची बोलणीं सुरू झालीं. परंतु अखेर समेट झालाच नाहीं. शेवटीं रामभाऊ यांनीं अकस्मात् कोर्टाला अर्ज देऊन कळविलें कीं, आपणाला प्रतिवादी म्हणून हा दावा चालवावयाचा नाहीं. वाटल्यास त्याचा एकतर्फी निकाल व्हावा. आपल्या बंधूच्या मृत्युमुळें आपल्या मनःस्थितींत फरक पडला, असें कारण रामभाऊ यांनीं आपल्या अर्जांत लिहिलें खरें, पण तें कारण कितपत खरें आहे याविषयीं मला जबर-

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

दस्त शंका आहे. कसेंहि असो. प्रतिवादींनीं पुरावा दिला नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट होय. कारण यांत अज्ञानाचा हितसंबंध येत होता. परंतु आहे त्या पुराव्यावरून निकाल देणें मला भाग आहे.

दाव्याची आकारणी बरोबर केलेली नाहीं या प्रतिवादींच्या प्राथमिक तक्रारींत अर्थ नाहीं. किंबहुना दाव्यांतील मूळ मिळकतीच्या किंमतीला अनुसरून वकीलफी-करितां तरी, वादींना चढी आकारणी करतां आली असती; व ज्याअर्थी फिर्यादीचा निकाल त्यांना आपल्या सारखा होईल असें वाटत होतें. व तसा तो झालाहि. त्याअर्थी ही आकारणी कमी लावण्यांत त्यांना आपलें नुकसान आहे असें दिसत असतांहि, त्यांनीं ती उलट कमीच लावली, हें खरोखर लक्षांत घेण्यासारखें आहे. दाव्यांची कारणें वेगवेगळ्या स्वरूपाची असतां तीं फिर्यादींत एकत्र मांडलीं या प्रतिवादींच्या तक्रारींतहि अर्थ नाहीं. ट्रस्टडीड, भाडेचिठी व कै. टिळकांचें मृत्युपत्र या दस्तऐवजां-वरच वादीचे विवादित हक्क व त्यांनीं मागितलेल्या ताकिदी अवलंबून होत्या, व हे कागद शाबीत झाले आहेत

प्रतिवादींची मुख्य तक्रार अशी कीं, ट्रस्टडीड भाडेचिठी वगैरे कागद वादींनीं प्रतिवादींपासून, त्यांची भलती समजूत करून देऊन व त्यांच्यावर गैरशिस्त वजन पाडून, करून घेतले. परंतु स्वतः टिळकांचेच जांवई नाशिकचे वकील विश्वनाथपंत केतकर यांच्यासमक्ष हे सर्व कागदपत्र झाले; व त्यांत गैरसमजुतीचा किंवा गैरशिस्त वजनाचा कांहींहि भाग नव्हता असें त्यांच्या साक्षीवरून व वादी नं. २ विद्वांस यांच्या साक्षीवरून दिसून येतें. टिळकांच्या मृत्यूनंतर सोळाव्या दिवशीं कांहीं कागद झाले ही गोष्ट खरी. परंतु ट्रस्टडीड व भाडेचिठी हे दोनहि कागद प्रतिवादींनीं स्वतः रजिस्ट्रार-पुढें जाऊन कबूल करून नोंदवून दिले! भाडेचिठी तर टिळकांच्या मृत्यूनंतर पुष्कळ महिन्यांनीं झाली व रामभाऊ टिळक यांनींच स्वतः ती रजिस्ट्रारपुढें नोंदण्याकरितां दाखल केली. शिवाय अनेक वर्षेपर्यंत वादी हे भाडेकरी या नात्यानें त्यांजकडे अस-लेल्या वाड्याचें भाडें रीतसर देत असून, प्रतिवादी तें भाडें आजवर विनतक्रार घेत आले आहेत. तसेंच प्रतिवादींनीं करून दिलेल्या ट्रस्टडीडनंतर, बऱ्याच काळपर्यंत व बऱ्याच काळानंतरहि ट्रस्टडीड अन्वयें प्रतिवादींना मिळणाऱ्या रकमा प्रतिवादी खुशाल घेत आले आहेत. म्हणून या मुद्द्याचा निकाल प्रतिवादींविरुद्धच केला पाहिजे. ही भाडेचिठी अनियमित मुदतीची आहे. आणि आजचे वादी व त्यांचे जागीं पुढें येणारे इतर ट्रस्टी यांना भाडेचिठींत नमूद केलेला वाड्याचा भाग सर्वस्वी आपल्या ताब्यांत ठेवण्याचा हक्क आहे. त्यांनीं फक्त प्रतिवादींना महिना शंभर–रु. भाडें दिलें म्हणजे संपलें. ट्रस्टींनीं आपल्या ताब्यांतील इमारतींत नवें जुनें केलें किंवा त्याचें स्वरूप बद-ललें किंवा त्या वाढविल्या तरी भाड्याची रक्कम वाढवावयाची नाहीं. घरपट्टी वगैरे सर्व देणें, दुरुस्ती ठेवणें हीं सर्व कामें ट्रस्टींच्या जबाबदारीचींच आहेत. वादी यांनीं गाय-कवाडवाड्याच्या मुख्य दरवाजांतून आपल्या घरांत सरळ वाटेनें जावें. ट्रॅन्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टाच्या १०८ व्या कलमाप्रमाणें ट्रस्टींकडे भाड्यानें असलेल्या जागेंत मालक या नात्यानें प्रतिवादींना कांहीं ठराविक पद्धतीनें व योग्य वेळींच जातां येईल. परंतु वादी ट्रस्टी यांच्या ताब्याला वहिवाटीला, भोगवट्याला प्रतिवादींना हरकत करतां येणार नाहीं, अडथळा करतां येणार नाहीं, किंवा ट्रस्टी आपल्या जागेंत करीत अस-लेल्या कामाला किंवा त्यांच्या नोकरांना कोणत्याहि प्रकारें व्यत्यय करण्याचा अधिकार प्रतिवादींना नाहीं. या जागेंत काम करणारे नोकर हे वादी ट्रस्टी यांचे नोकर आहेत, प्रतिवादींचे नाहींत. प्रतिवादींना वादींकडून भाडें घेण्यापलीकडे यासंबंधानें दुसरा कोणताहि हक्क नाहीं.

वादी ट्रस्टी यांच्या वहिवाटीला प्रतिवादी टिळकबंधु यांनीं ज्या हरकती व आगळिकी केल्या असे फिर्यादअर्जांत लिहिलें आहे त्या सर्व पुराव्यानें रीतसर शाबीत झाल्या आहेत. "नवीन इमारत बांधण्याचें काम ट्रस्टींनीं काढलें त्याला आपण हरकत केली त्याचें कारण वादी यांना इमारत बांधण्याचा हक्क नव्हता." अशी तक्रार प्रति-वादींनीं सांगितली आहे. परंतु तींत कांहीं अर्थ नाहीं. कारण विद्यमान इमारतींना जोडून नव्या इमारती बांधण्याचा अधिकार भाडेचिठीनें वादी ट्रस्टी यांना दिलेला आहे. आतां वाड्यांतील मोकळी जागा नवीन इमारतीनें किती अडवावी, हा काय तो प्रश्न असूं शकेल. म्हणजे सगळी मोकळी जागा इमारतींनीं अडवितां येणार नाहीं, तर कांहीं वाजवी मोकळी जागा वादींनीं सोडली पाहिजे. इतकेंच फार तर प्रतिवादींना म्हणतां येईल, याहून अधिक म्हणतां येणार नाहीं. मोकळ्या जागेंत वादी यांनीं पूर्वीं कागद ठेवण्याकरितां एक पत्र्याची इमारत बांधली, ती काढून टाकण्या-विषयीं प्रतिवादींनीं वादींवर उलट फिर्याद केली होती, पण ती फिर्याद त्यांची त्यांनींच पुढें काढून घेतली!

वादी ट्रस्टी यांच्या आवारांतील पायखान्यासंबंधानें प्रतिवादी यांस कोणत्याहि प्रकारचे हक्क नाहींत. ट्रस्टींकडील मोकळ्या जागेंत आपलें कोणतेंहि सामान टाकण्याचा किंवा ठेवण्याचा अधिकार प्रतिवादींना नाहीं. म्हणून हल्लीं त्यांनीं सदर जागेंत जें आपलें सामान ठेवलें असेल तें त्यांचें त्यांनीं काढून न्यावें. किंवा तसें न झाल्यास वादी यांनीं कोर्टामार्फत तें काढवून त्याचा खर्च प्रतिवादींकडून घ्यावा. वादी-ट्रस्टींच्या भय्याच्या हातून रामभाऊ टिळक यांनीं किल्ल्या काढून घेतल्या, वाटेंतील फरशी काढली, वगैरे गोष्टी त्यांनीं स्वतःच कबूल केल्या आहेत. पण तसें करण्याचा त्यांना अधिकार नव्हता. वाड्याचा मुख्य दरवाजा ट्रस्टींकडे असलेल्या भागांत आहे. यामुळें तो दरवाजा लावणें, कुलूप घालणें, वगैरे गोष्टी ट्रस्टींना करणें अवश्य आहे. दारावरील भय्या हाहि त्यांचाच नोकर आहे. म्हणून प्रतिवादींना या दरवाजांतून स्वतः-च्या हक्कानें असे सकाळीं ६ वाजण्यापासून रात्रीं ९ वाजेपर्यंत वावरतां येईल. त्यानंतर जरूर पडल्यास क्वचित् प्रसंगी भय्याला हाक मारून त्यानें दरवाजा उघडल्यास प्रतिवादींनीं आंत जावें. तात्पर्य, ट्रस्टींचे हक्क व अधिकार वर दर्शविल्याप्रमाणें असल्यामुळें, त्यांना कोणत्याहि तऱ्हेनें बाध करूं नये अशी निरंतरची ताकीद कोर्ट प्रतिवादींना देत आहे. प्रतिवादी रामभाऊ टिळक यांना तर ती ताकीद सहजच देतां येते. परंतु हल्लीं प्रतिवादी नं. २ श्रीधरपंत यांचे जागीं त्यांचा अज्ञान मुलगा आहे तरी अज्ञानाविरुद्धहि अशी ताकीद देतां येते. शिवाय अशी ताकीद देऊन हें प्रकरण निकालांत न काढलें, तर अज्ञानाचे पालनकर्ते म्हणून उद्यां स्वतः रामभाऊ टिळक हेच किंवा दुसरें कोणी पुढें येऊन वादींना हरकत करूं लाग-तील; व मग ट्रस्टींना फिरून पहिल्यापासून हें भांडण कोर्टांत भांडावें लागेल. परंतु तसें होऊं देणें योग्य नाहीं. यांतल्या यांतच हें कायमचें ठरवून घेतलें पाहिजे. म्हणून रामभाऊ टिळक व श्रीधरपंतांचा अज्ञान मुलगा या दोघांच्या विरुद्ध ही ताकीद समजावी. गणपत्युत्सवासंबंधानें या कोर्टानें रामभाऊ टिळक यांना गतवर्षीं ताकीद दिली होती. ती हायकोर्टापर्यंत जाऊनहि कायम झाली आहे. शिवाय हा उत्सव-प्रसंग दरवर्षी येणारा आहे म्हणून आतां ताकीद कायम स्वरूपांत देण्यांत येत आहे. तसेंच वाड्याच्या दरवाज्याला लावलेला कडी–कोयंडा काढणें, दिंडी उघडणें वगैरे कोणत्याहि गोष्टी प्रतिवादींनीं करूं नयेत."

टिळक पर्स–फंडाची परतफेड

केसरीची तीन लक्ष रुपयांची देणगी

ट्रस्टडीड शके १८५५ प्रमोदनाम संवत्सरे मिति श्रावण शुध्द अष्टमी रोज शुक्रवार तारीख १ माहे ऑगस्ट सन १९३० इसवी ते दिवशीं ट्रस्टडीड लिहून ठेव-णार खालीं सही करणारः—

(१) नरसिंह चिंतामण केळकर जात ब्राम्हण, वय ५८, ट्रस्टी केसरी–मराठा संस्था, राहणार पुणें, पेठ सदाशिव

आणि

(२) धोंडो वासुदेव विद्वांस जात ब्राम्हण, वय ६३, ट्रस्टी केसरी–मराठा संस्था, राहणार पुणें, पेठ नारायण.

कारणें ट्रस्टडीड लिहून ठेवतों ऐसाजेः—

१ आम्ही उभयतां केसरी–मराठा संस्थेचे पहिले व विद्यमान ट्रस्टी आहों. सदर संस्थेचें ट्रस्टडीड मूळ तारीख १६ माहे ऑगस्ट सन १९२० रोजीं झालें आहे. त्यांत लिहिल्याप्रमाणें आजतागायत आम्ही सदर संस्थेची व्यवस्था व वहिवाट ट्रस्टी या नात्यानें करीत आलों आहों. आणि त्या ट्रस्टच्या एका उद्देशाला अनुसरूनच हल्लीं हें प्रस्तुतचें ट्रस्टडीड आम्ही करून ठेवीत आहों. मूळ ट्रस्टला हल्लींचा ट्रस्ट आनुषंगिक आहे.

२ आम्ही करून ठेवीत आहों त्या प्रस्तुतच्या ट्रस्टडीडचें कारण खालीं लिहिल्याप्रमाणेंः—

सन १९१४ सालीं लोकमान्य टिळक मंडाले येथील तुरुंगांतून परत आले. त्यांच्या गैरहजेरींत सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनीं लोकमान्यांना बदनामीकारक असा मजकूर घातलेले लेख प्रसिद्ध केले. त्यावरून सन १९१६ सालीं त्यांनीं विलायतेंतील न्यायकोर्टांत सदर सर व्हॅलेंटाईन चिरोल यांजवर बेअब्रुकरितां नुकसानभरपाईचा दिवाणी दावा केला. त्याचा निकाल अखेर ता. २१ फेब्रुवारी १९१९ रोजीं लोकमान्य टिळकांच्या विरुद्ध झाला. या दाव्याचे कामीं लोकमान्य टिळकांना एकंदर सुमारें तीन लक्ष रुपये इतका खर्च आला. यांपैकीं कांहीं थोड्या रकमेची तजवीज लोकमान्य टिळकांनीं स्वतः खाजगी म्हणजे केसरीच्या पैशांतून प्रथम केली होती. परंतु हा दावा वस्तुतः सार्वजनिक स्वरूपाचा असल्यामुळें त्याचा कोणताहि खर्च व्यक्तिशः लो. टिळकांना सोसावा लागूं नये असें लोकमान्य टिळकांच्या मित्रांनीं व अनुयायांनीं ठरविलें व जाहीर रीतीनें फंड–वर्गणी जमा केली. या फंडाला शेवटीं 'पर्स–फंड' असें नांव देण्यांत आलें. त्या फंडाची रक्कम रुपये २,८६,३५७८७८२ ही तारीख २२ माहे मे सन १९२० रोजीं जाहीर समारंभ करून, 'लोकमान्य टिळकांना अर्पण करण्यांत आली. हा फंड जमविण्याची कल्पना लोकमान्य टिळक हे विलायतेस असतांना तारीख ४ माहे मार्च सन १९१९ रोजीं, म्हणजे चिरोल खटल्याचा निकाल लोकमान्य टिळकांविरुद्ध जाहीर झाल्यानंतर ताबडतोब निघाली.

परंतु तत्पूर्वीं म्हणजे विलायतेस जाण्याचे आधीं कोलंबो येथें लोकमान्य टिळकांनीं ता. ५ एप्रिल १९१८ रोजीं मृत्युपत्र केलें त्यांत या खटल्याच्या खर्चा-संबंधानें खालील कलमें लिहून ठेविलीं होतीं. (उतारा).

"चिरोल केस जिंकल्यास यापेक्षां अधिक पैसे शिल्लक राहतील, त्यांचा विनियोग कसा करावयाचा तो मागाहून मी ठरवीन. परंतु केस हरल्यास त्याचें कर्ज फेडणें आहे तें खालीं लिहिल्याप्रमाणें फेडावें.

(१) सगळा ज्युबिली फंड या कर्जास देणें.

(२) कै० रा. दाजीसाहेब खरे यांचेकडील रक्कम रुपये अडीच हजार व रा. एल. सी. बापट यवतमाळ यांचेकडील रक्कम व रा. सेटलूर यांचेकडील माझी असलेली रक्कम सदर कर्जाचे भरतीस देणें.

बाकी खर्च जाहलेला आहेच. करितां निराळी तजवीज करणें नको."

पण अखेर खर्च झाला तो एकंदरीनें यावरील अदमासापलीकडे बराच गेला.

वरील कलमांवरून स्पष्टच होत आहे कीं, चिरोल खटल्याचा निकाल प्रतिकूल झाल्यास त्यामुळें येणाऱ्या खर्चाची तजवीज करणें त्यांत प्रथम ज्युबिली फंडाची रक्कम

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सर्व खर्चां घालून उरेल ती लो. टिळकांच्या खाजगी मिळकतींतून, म्हणजे केसरीच्या शिलकेंतून व उत्पन्नांतून भागवावी असा लो. टिळकांचा हेतु होता. आणि त्याप्रमाणेंच घडतें तर १९१६ सालीं टिळकांना अर्पण केलेला सर्वच्या सर्व ज्युबिली फंड खर्ची पडून, शिवाय उरलेली रकम म्हणजे सुमारें दीड दोन लक्ष रुपयांची रकम आणखी उभारावयास पाहिजे होती. परंतु लो. टिळकांच्या मृत्युपत्राच्या वेळची, किंबहुना त्यांच्या मृत्यूच्या वेळचीहि, केसरीची सांपत्तिक स्थिति लक्षांत घेतली असतां असें दिसून येईल कीं, बहुतेकच सर्व रकम केसरीला कर्जाऊच उभारावी लागली असती. एवढें कर्ज लो. टिळकांच्या मृत्युनंतर मिळणें केसरीला केव्हांहि शक्य नव्हतें. फार काय स्वतः लोकमान्यांच्या हयातींतच या चिरोल प्रकरणीं जें एक लक्ष रुपये कर्ज त्यांनीं काढलें त्याकरितां त्यांना प्रॉमिसरी नोट लिहून देऊन, त्याशिवाय इतर मिळकतीवर त्यांना बोजा उत्पन्न करावा लागला. तात्पर्य पर्स-फंडाची रकम परस्पर व अभावितपणें सार्वजनिक वर्गणीनें जमा झाली नसती तर, न जाणों, कदाचित आजमितीलाहि केसरी-मराठा संस्थेला न फिटण्याइतक्या कर्जांत राहावें लागलें असतें; व व्याजमुद्दलाच्या फेडींत दरसाल बहुतेक उत्पन्न घालवावें लागल्यानें, केसरी-मराठा संस्थेची सांपत्तिक उपयुक्तता अगदींच कमी होऊन, सांपत्तिकदृष्ट्या ती जगते किंवा मरते अशी स्थिति आली असती.

लोकमान्य टिळकांच्या डोळ्यापुढें ही स्थिति ढळढळीत दिसत असल्यानें, 'पर्स–फंड' त्यांना नजर करण्यांत आला त्या वेळीं त्यांना गहिंवर आला; व त्यांच्या तोंडून असे शब्द निघाले (उतारा) "या खटल्याचा निमित्तानें माझ्या खिशांत तीन लाख रुपये पडले अशी आपली समजूत करून घेऊन Mr. Tilak will chuckle over the three lacs असें एकानें म्हटलें आहे. पण Chuckle over करण्यासारखी ही आनंदाची गोष्ट नाहीं. दुसऱ्या जवळून पैसे घेणें ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. या खटल्यांत मी बुडालों तर माझ्या आयुष्यांतलीं जीं काय दोन–चार वर्षें राहिलीं असतील त्यांत थोडी जास्त खटपट करून मी पैसे फेडीन, अशा हिंमतीनें हा खटला केला होता. पण खर्चाचे पैसे मला देऊन तो वेळ, तें काम व ती हिम्मत आपण विकत घेतली आहे. आतां हें सारे आयुष्य मला तुमच्याकडे लावलें पाहिजे. त्यांत मला 'वकल' होण्यासारखें, कांहींच नाहीं. तुम्हाला आयतें गिऱ्हाईक सांपडलें आणि मींहि मला विकून घेतलें. हा व्यवहार माझ्या स्मरणांतून जाणें शक्य नाहीं. चिरोल केसमध्यें जय मिळून जरी माझा खर्च मला मिळाला असता तरीहि ते पैसे मी तुम्हालाच दिलें असतें." याचा अर्थ आम्ही ट्रस्टी असा समजतों, व लोकहि तेव्हां असाच समजले कीं, टिळकांनीं पर्स–फंडाची रकम स्वतःला व केसरीलाहि कर्जासारखी मानली, तें कर्ज फेडण्याची इच्छा त्यांच्या मनांत होती, व ते हयात असते तर त्यांनीं हरप्रयत्नानें तें फेडलेंहि असतें. परंतु पुढें दोन सव्वादोन महिन्यांतच त्यांना मृत्यु आला व ती त्यांची इच्छा तशीच राहून गेली. म्हणून त्यांची ही इच्छा शक्य तर आपण पूर्ण करावी हा हेतु, आम्हां उभयताकडे केसरी–मराठा संस्थेच्या ट्रस्टींचें काम आलें तेव्हांपासून, आम्ही नेहमीं उराशीं बाळगून ठेवला होता. रकम लहान नव्हती. आम्ही संस्थेच्या जबाबदारीला नवीन होतों. आणि देशांतील परिस्थिति दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत चालली होती. यामुळें आम्हाला या गोष्टीचा आजपर्यंत उघडपणें उच्चार करतां आला नाहीं. पण ती मनांत दृढ ठेवून, संस्थेचा खर्च होईल तितका कमी ठेवून, काटकसर करून आम्हीं पर्स–फंडाची ही रकम हळुहळु जुळवून संग्रहीं ठेवण्याचा प्रयत्न चालविला होता. आणि या दहा वर्षांच्या अखेर आज तो हेतु सिद्धीस नेण्यासारखी स्थिति ईश्वरकृपेनें व लो. टिळकांच्या आशीर्वादानें आम्हांस प्राप्त झाली याबद्दल आनंद वाटतो. लोकमान्य टिळकांच्या आशीर्वादानेंच केसरी–मराठा ही संस्था अनेक संकटें आलीं असतां आजपर्यंत जिवंत राहून तिची आर्थिक स्थिति बरी टिकली. आणि येत्या जानेवारींत केसरी व मराठा या पत्रांना पन्नास वर्षें पुरीं होऊन त्यांची 'ज्युबिली' करण्याचा प्रसंग येत आहे, अशा वेळेपूर्वी लो॰ टिळकांना वर सांगितल्याप्रमाणें, आम्हांस ऋणमुक्त करतां आलें तर त्यांच्या आत्म्याला बरें वाटेल अशी आमची प्रामाणिक समजूत असल्यानें तसें करणें हें आम्ही ट्रस्टी या नात्यानें आमचें पवित्र कर्तव्य समजतों.

या रकमेसंबंधानें लो॰ टिळकांना ऋणमुक्त करणें म्हणजे पर्सफंडाकरितां ज्या ज्या लोकांनीं वर्गणी दिली त्याच सर्वांना किंवा त्यांच्या वारसांना व्यक्तिशः ती परत देणें असा मात्र अर्थ आम्ही समजत नाहीं. कारण ज्यांनीं ती वर्गणी दिली त्यांनीं ती सार्वजनिक हितबुद्धि मनांत ठेवूनच दिली. स्वतःला परत घेण्याच्या आशेनें दिली नाहीं. शिवाय परत द्यावयाची म्हटली तरी, ती देणारांची नांवनिशीवार यादी कांहीं मिळाली तरी, पुष्कळ लोकांनीं आपलें नांव प्रगट न करतां गुप्त रूपानेंच वर्गणी देऊन पावती–निशीटें घेतलीं आहेत. अर्थात ही रकम परत देणें म्हणजे ती बाजूला काढून ठेवून तिचा सर्वस्वीं सार्वजनिक हितबुद्धीनें उपयोग करणें हेंच होय. आणि या रकमेचा अशा रीतीनें कायमचा निश्चितपणें उपयोग आम्ही केला असें जाहीर झाल्यास, पर्सफंडाच्या सर्व वर्गणीदारांना लो॰ टिळक हे आपल्या ऋणांतून मुक्त झाले असेंच वाटेल यांत शंका नाहीं. पर्सफंडाची वर्गणी जमली इतकी मोठी जमली नसती, तर केसरी–मराठा संस्था आजपावेतों ऋणांत बुडून राहिली असती. ज्युबिली फंड सर्व खर्चून गेला असता. आज त्याच्या व्याजांतून जो लोकोपयोग होतो तो झाला नसता. आणि लोकमान्यांच्या चिरंजिवांना जी खाजगी म्हणून मिळकत राहिली तीहि मुळींच राहिली नसती. अशा रीतीनें तीन मार्गांनीं तिघांवर येणारी संकटें पर्सफंडाच्या द्वारें लोकांनीं उदारपणानें वारविलीं. यामुळें आम्हीं योजल्याप्रमाणें, लो. टिळकांना ऋणमुक्त करून पर्सफंडाची रकम सर्व आज ट्रस्ट करून, वेगळी लोकोपयोगाकरितां काढून ठेवल्यास, व तिच्या व्याजांतून लो॰ टिळकांच्या इच्छेनुसार किंवा धोरणानुसार, आणि मूळच्या ट्रस्टडीडमध्येंहि सांगितल्याप्रमाणें, सालोसाल सत्कारणीं व सार्वजनिक कार्यांत तिचा खर्च करीत गेल्यास, तें लोकमान्य टिळकांचें एक मोठें कायमचें स्मारक होईल, व ज्यांनीं पर्सफंडाची वर्गणी दिली ते व इतर लोकहि अत्यंत संतुष्ट होतील असा आम्हांस दृढ भरंवसा वाटतो. मूळ ट्रस्टडीमध्यें कलम (१) यांत खालील शब्द आहेत. "कै॰ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं केसरी व मराठा वर्तमानपत्रें हातांत घेतल्यापासून त्या पत्रांचें द्वारें राजकीय शिक्षणाचा प्रसार करून,—लोकांत राजकीय हक्कांची जाणीव तत्पन्न करणें व राष्ट्रीय ध्येयास पोषक अशा इतर अनेक अंगांच्या सार्वजनिक चळवळी करणें वगैरे सर्व कामें ज्या हेतूनें केलीं तोच त्यांचा हेतु त्यांचे पश्चात् निरंतर व अबाधित अमलांत येण्याचें साधन म्हणून हें ट्रस्टडीड करण्यांत आलें आहे." ही गोष्ट लक्षांत घेऊन, वरील कलमांतील उद्देश तडीस नेण्याकरितां, प्रस्तुतच्या या नव्या ट्रस्टडीडमधील योजना आम्ही केली आहे. आणि एवढ्याचकरितां ही सर्व विस्तृत हकीकत देऊन आमचा या ट्रस्टचा हेतुनिर्देश मुद्दाम केला आहे. तो मूळचा म्हणजे ता. १६ आगस्ट १९२० चा ट्रस्ट दस्त जॉ. सब–रजिस्ट्रार हवेली नं. २ चे कचेरींत पहिले नंबराचे बुकाचे ११३६ व्हॉल्युमाचे ३३२ ते ३३४ पानावर ३०३७ नंबरीं तारीख १९।८।१९२० रोजीं नोंदला आहे.

३ वरील हेतुप्रमाणें आम्ही आज रोजीं केसरी–मराठा संस्थेच्या शिलकेंतून इष्टांकी रकम रुपये तीन लक्ष (पर्स–फंडाच्या रकमइतकी रकम व त्यांत संस्थेच्या पदरचे १३६४२०८०१० रुपये घालून निर्देश होण्याकरितां सोयीची म्हणजे तीन लक्ष करून) वेगळी काढून त्या रकमेचा ट्रस्ट निर्माण करीत आहों व ती रकम स्वतंत्र अशी ठेवीत आहों. म्हणजे मूळचे ट्रस्ट मिळकतीपैकीं कांहींची Appointment of property या ट्रस्टनें करीत आहों.

४ सदरहु रकम, या ट्रस्टडीडच्या पोटीं, ट्रस्ट-फंड व कायमनिधि या स्वरूपानेंच राहावयाची असून, त्यांतील मुद्दल न खर्चतां फक्त व्याजांतून खालीं लिहिल्याप्रमाणें वेळोवेळीं खर्च होण्याचा आहे.

५ या ट्रस्ट-फंडाची रकम राहणें ती केसरी–मराठा संस्थेचे जे विद्यमान ट्रस्टी वेळोवेळीं असतील त्या सर्वांच्या मिळून नांवें राहावी. म्हणजे त्या सर्वांनीं मिळून संयुक्त रीतीनें ती धारण करून आपल्या ताब्यांत ठेवावी. तिजवरील व्याज वगैरे वसूल करणें तें त्यांपैकीं कोणाहि एकास अधिकारपत्र देऊन वसूल करण्यास हरकत नाहीं. परंतु ऐनजिनसी नोटांची देवघेव, विक्री, अगर इतर कोणताहि व्यवहार विद्यमान सर्व ट्रस्टींच्या मिळून सह्यांनिशींच झाला पाहिजे.

६ सदरहु ट्रस्ट-फंडाचे पहिले ट्रस्टी केसरी-मराठा संस्थेचे विद्यमान ट्रस्टी म्हणून आम्ही खालीं सही करणार हेच राहतील. आमच्या मागून आमच्या या जागीं मूळ ट्रस्टडीडमधील नियमानुसार, वेळोवेळीं जे दुसरे कोणी ट्रस्टी येतील, किंवा त्यांचे जागीं फिरून जे कोणी येतील ते आपोआप, म्हणजे नवीन मुद्दाम नेमणूक न करतांहि (Ex-officio) या ट्रस्ट मिळकतीचे ट्रस्टी नेमले गेले असें समजण्यांत येईल.

७ या ट्रस्ट–फंडाच्या मुद्दलावर सर सालांत जें व्याज प्रत्यक्ष वसूल होईल त्यांतील शेंकडा पांच इतकी रकम त्या खात्यांतील कामगिरी (कचेरी) खर्चाकरितां बाजूस ठेवून कामगिरीखातीं जमा करावी. व कामगिरीसंबंधानें नेमण्यांत येणाऱ्या ऑफिस एस्टॅब्लिशमेंटवर व कामगिरीसंबंधानें जरूर त्या इतर साधनांवर खर्च करावी. आणि उरलेली पंचाण्णव टक्के रकम ही कार्योपयोगी समजून तींतून खर्च करावा.

८ लो. टिळकांना पर्सफंडाची जी रकम अर्पण करण्यांत आली, तींत निरनिराळ्या प्रांतांतील अनेक लोकांच्या देणग्या समाविष्ट होत्या. म्हणून हल्लीं ती रकम जर ऋणविमोचनाकरितां सार्वजनिक खर्चासाठीं परत द्यावयाची तर त्या त्या प्रांतांतील कोणाहि व्यक्तीला नव्हे पण जनतेला किंवा समाजाला, या परत दिलेल्या रकमांचा कांहीं तरी सामुदायिक रीतीनें व राष्ट्रीय कार्याकरितां उपयोग होईल अशी व्यवस्था होणें इष्ट आहे. पूर्वीच्या हिशेबावरून पाहातां पर्सफंडाच्या वर्गणीच्या रकमेपैकीं उत्तर महाराष्ट्र, म्हणजे वऱ्हाड व नागपूर प्रांत, यांनीं मिळून सुमारें नव्वद हजार रुपये वर्गणी दिली. तशीच कर्नाटक प्रांतानें सुमारें बावीस हजार रुपये वर्गणी दिली. अर्थात पर्स–फंडाच्या परत फेडीचा जो उपयोग व्हावयाचा तो या प्रांतांना त्यांच्या मूळच्या देणगीच्या रकमेच्या प्रमाणानें करून देणें योग्य होय म्हणून आम्ही असें ठरविलें आहे कीं, परत कर्ज फेडीच्या रकमेवरील वार्षिक व्याजांतून सुमारें एक लक्षावरील व्याज म्हणजे हल्लीच्या दरानें रु. पांच हजार इतकी रकम नागपूर–वऱ्हाड प्रांतांच्या उपयोगाकरितां दरसाल मिळावी. तसेंच कर्नाटक प्रांताच्या उपयोगाकरितां सुमारें पंचवीस हजारावरील व्याज म्हणजे दरसाल साडेबाराशें रुपयांची रकम दिली जावी. या रकमा आम्हा ट्रस्टींकडून घेऊन त्या आपल्या प्रांतांत योग्य कामीं खर्च करण्याकरितां नागपूर–वऱ्हाडकरितां एक व कर्नाटक प्रांतांकरितां एक अशी कायमची अधिकारी मंडळें स्थापण्यांत आलीं पाहिजेत; मग तीं ट्रस्टडीडनें निर्माण होवोत किंवा रजिस्ट्रेशन ऑफ सोसायटीजच्या कायद्याच्या आधारें निर्माण होवोत. परंतु हीं मंडळें अशा रीतीनें स्थापण्याच्या कामीं पुढें होऊन अधिकारयुक्त रीतीनें उपक्रम करण्यास, निश्चित नामनिर्देश पाहिजे म्हणून, आम्हीं तीं नांवें खालीलप्रमाणें ठरवितों—

९. नागपूर–वऱ्हाड प्रांताकरितां वरील योजना करून ती अमलांत आणण्याचा अधिकार आम्ही खालील गृहस्थांस विनंतिपूर्वक दिला आहे—

१ रा. माधव श्रीहरी अणे, यवतमाळ
२ डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे, नागपूर
३ रा. चिंतामण विश्वनाथ गर्दे, बुलढाणा
४ रा. रामराव देशमुख (मिनिस्टर), उमरावती
५ रा. गोपाळ अनंत ओगले संपादक–महाराष्ट्र, नागपूर

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वरील गृहस्थांनीं ट्रस्टडीड करून किंवा सोसायटी रजिस्टर करून कार्यकारी मंडळ नेमावें; व तसें झाल्यावर प्रस्तुत ट्रस्टच्या ट्रस्टींनीं या कार्यकारी मंडळाला दरसाल पांच हजार रुपयांची रकम (खर्चाचे पांच टक्के वजा करून) देत जावी. त्याचप्रमाणें कर्नाटक प्रांताकरितां अशाच प्रकारची व्यवस्था करण्यासाठीं आम्ही खालील गृहस्थांना विनंतिपूर्वक अधिकार देत आहों:—

१ रा. गंगाधरराव बाळकृष्ण देशपांडे, बेळगांव
२ रा. दत्तात्रय व्यंकटेश बेळवी वकील, बेळगांव
३ रा. श्रीनिवास व्यंकटेश कौजलगी वकील, विजापूर
४ रा. विठ्ठल व्यंकटेश जोशी वकील, धारवाड
५ रा. विश्वनाथ नारायण जोग वकील, धारवाड

वरील गृहस्थांनीं ट्रस्टडीड करून किंवा सोसायटी रजिस्टर करून कार्यकारी मंडळ नेमावें; व तसें झाल्यावर प्रस्तुत ट्रस्टच्या ट्रस्टींनीं या कार्यकारी मंडळाला दरसाल साडेबाराशें रुपयांची रकम (खर्चाचे पांच टक्के वजा करून) देत जावी.

वर लिहिलेल्या रकमा नागपूर–वऱ्हाडप्रांत व कर्नाटक प्रांत यांतील जनतेच्या उपयोगाकरितां खर्चण्यासंबंधीं तपशिलाची निश्चित योजना करण्याचा सर्व अधिकार वरील गृहस्थांस राहील.

तथापि नागपूर–वऱ्हाड प्रांत व कर्नाटक या प्रांतांत वरील रकमांचा खर्च खालील तीन हेतूंना अनुसरूनच व्हावा.

(१) वरील क्षेत्रांतील संघटनात्मक राजकारण.
(२) वरील क्षेत्रांतील प्रत्यक्ष राजकारणाशिवाय राष्ट्रोपयोगी अशा इतर चळवळी.
(३) परराष्ट्रीय राजकारण.

१० नागपूर–वऱ्हाडप्रांत व कर्नाटकप्रांत याजकरितां वरीलप्रमाणें खर्च होणारी रकम वगळून उरणारी, ट्रस्ट–फंडच्या वार्षिक व्याजाची, रकम मध्य व दक्षिण महाराष्ट्र मिळून दहा मराठी जिल्हे व त्यांतील संस्थानें येवढ्या क्षेत्रांत दरसाल खर्चण्याची आहे. ती खर्चण्याचा अधिकार या प्रस्तुत ट्रस्टच्या ट्रस्टींना राहील.या रकमेंतूनहि खालील गोष्टींवरच खर्च करावा.

(१) वरील क्षेत्रांतील संघटनात्मक राजकारण.
(२) वरील क्षेत्रांतील प्रत्यक्ष राजकारणाशिवाय राष्ट्रोपयोगी अशा इतर चळवळी.
(३) परराष्ट्रीय राजकारण.

वरील रकम खर्चण्यासंबंधीं खालील योजना निश्चित केली आहे. ही रकम सालोसाल खर्चण्याची ती वार्षिक अंदाजपत्रक करून,–होतांहोईतों त्या पत्रकाप्रमाणें खर्च करण्यांत यावी. हें पत्रक एका अधिकृत मंडळानें दरसाल ता. १ ऑगस्ट रोजीं प्रसिद्ध करावें. या मंडळाचे पांच सभासद असावे. पैकीं दोन प्रस्तुत ट्रस्टचे ट्रस्टी हे असावे. व या दोघांनीं दरवर्षी निरनिराळ्या जिल्ह्यांतील कोणी तरी तीन पुढारी आपल्या मदतीला विनंतिपूर्वक नेमून घेऊन पांच सभासदांचें त्या वर्षापुरतें मंडळ बनवावें. व या मंडळानें वर सांगितलेलें अंदाजपत्रक तयार करावें.

११ लो० टिळकांच्या स्मरणार्थ पर्सफंडाचें ऋण कृतज्ञतापूर्वक फेडून ती रकम राष्ट्रकार्याकडे लावून देण्यापूर्वी आम्हीं ही खबरदारी घेतली आहे कीं, ट्रस्टरूपानें केसरी व मराठा आमच्याहातीं येतांना त्याची मालमत्ता गुड वुइल इत्यादींची जी किंमत इष्टांक रुपानें संकल्पिली किंवा अदमासें धरली गेली होती ती सर्व तशीच्या तशी अबाधित राहिली आहे. तिला कोणत्याहि रीतीनें कमीपणा आलेला नाहीं. किंबहुना कांहीं अंशीं त्या ट्रस्ट मिळकतीची किंमत व तिचें उत्पन्न हें पूर्वीहून अधिकच झालें आहे. ही खबरदारी घेऊनच ही कर्ज–फेडीची व्यवस्था, व उपयोगाच्या दृष्टीनें ती कायम बांधली जाण्याकरितां, मूळ ट्रस्टला आनुषंगिक असा हा ट्रस्ट आम्हीं केला आहे. त्याचा सर्व व्यवहार 'लोकमान्य पर्सफंड ट्रस्ट' या नांवानें होण्याचा आहे.

येणेंप्रमाणें ट्रस्ट डीड लिहून ठेवलें आहे. तारीख १ माहे आगस्ट सन १९३० इ०

साक्ष

१ जनार्दन सखाराम करंदीकर — (सही) नरसिंह चिंतामण केळकर
२ यशवंत गणेश कुळकर्णी — (सही) धोंडो वासुदेव विद्वांस
ट्रस्टी केसरी–मराठा संस्था. पुणें.

केसरी संस्थेची सांपत्तिक स्थिति

गेल्या दहा वर्षांत केसरी–मराठा संस्थेचा जमाखर्च काय झाला हें तपशील वार प्रसिध्द करणें अनिविस्ताराचें काम असून शिवाय तसें करण्याचें कारणहि नाहीं टिळकांनीं संस्थेचा 'पब्लिक ट्रस्ट' केला असला तरी पब्लिक ट्रस्टांचे जमाखर्च व हिशेब, आणि खासगी ट्रस्टांचें जमाखर्च व हिशेब यांच्या स्वरूपांत वस्तुतः कांहींच फरक नसतो. दोहों ट्रस्टांतील ट्रस्टींना सर्वाधिकार बहुधा सारखेच दिलेले असतात व त्यांच्यावरील जबाबदारीहि बहुधा सारखीच असते. कोणत्याहि प्रकारच्या ट्रस्टीला ट्रस्ट मिळकत आपल्या खासगी कामाकरितां वापरतां येत नाहीं. पण ट्रस्टच्या या दोन प्रकारांत मुख्य फरक असा आहे कीं, खासगी ट्रस्टची मिळकत किंवा उत्पन्न हें खासगी व्यक्तींच्या उपयोगाकडे म्हणजे त्यांची उपजीविका, सांभाळ, संरक्षण, अभ्युदय इत्यादिकांकडे लावून दिलेलें असतें. आणि सार्वजनिक ट्रस्ट करण्याचा हेतु ट्रस्टची मिळकत व उत्पन्न यांचा उपयोग मुख्यतः खासगी व्यक्तींच्या हितसंवर्धनाकडे करण्याचा नसून, सार्वजनिक, निम-सार्वजनिक अशा संस्था व कार्यें यांच्याकडे करण्याचाच असतो. मात्र सार्वजनिक ट्रस्ट करतांनाहि त्यावर खासगी स्वरूपाचे असलेले किंवा निर्माण केलेले बोजे व खर्च आधीं भागवावे, व मग उरलेल्या निव्वळ उत्पन्नांतून किंवा मिळकतींतून सार्वजनिक खर्च करावा, असा निर्बंध मूळ मालकाला घालतां येतो. म्हणजे फिरून याहि दृष्टीनें खासगी व सार्वजनिक ट्रस्ट यांचें मिश्र स्वरूप सिध्द होतें. 'सार्वजनिक ट्रस्ट' या शब्दाची व्याख्या करणें कठिण आहे, परंतु तशी व्याख्या नसली तरी ट्रस्ट निर्माण करणारे, ट्रस्टची वहिवाट करणारे, व न्यायाधिकारी यांना तारतम्यानें त्या शब्दाची व्याप्ति निश्चित करतां येते. त्यांत अवघड असें कांहीं नाहीं.

असो. या अंकांत केसरी–मराठा संस्थेचें मुळचें ट्रस्ट–डीड आम्ही समग्र छापिलें आहे. त्यावरून हा ट्रस्टहि मिश्र स्वरूपाचा कसा आहे, म्हणजे त्याचा उपयोग खासगी व्यक्तींच्या हिताकडे कोणत्या बाबतींत किती व्हावा व सार्वजनिक कार्याकडे किती व कसा व्हावा, हें वाचकांना सहजच समजण्यासारखें आहे. हा ट्रस्ट लोकमान्यांच्या चिरंजिवांनींच प्रथम तपशीलवार लिहून निर्माण केला असला तरी, तो लो. टिळकांच्या कोलंबो येथील मृत्युपत्रावर अधिष्ठित किंवा रचना केलेला आहे ही गोष्ट या अंकांत दिलेलें टिळकांचें शेवटचें मृत्युपत्र वाचणाराच्या लक्षांत येईल; व लेखी ट्रस्ट निर्माण करणारांनीं ती गोष्ट स्पष्ट लिहिलेलीहि आहे. लो. टिळकांच्या मृत्युपर्यंत त्यांची केसरी–मराठा ही मिळकत सर्वस्वी खासगी स्वरूपाची होती; तथापि तिलाहि एक प्रकारें निमसार्वजनिक स्वरूप आहे असेंच ते मनानें मानीत व तें त्यांच्या कृतीवरूनहि दिसून येई. १९०८ च्या खटल्यापासून, किंवा १९०९ सालीं ब्रह्मदेशांत केलेल्या मृत्युपत्रापासून, आपल्या या विशिष्ट मिळकतीचें स्वरूप टिळकांनीं एखाद्या ट्रस्टप्रमाणें मानलें होतें. म्हणजे त्या मिळकतीच्या उत्पन्नाच्या कांहीं भागावर मनानें त्यांनीं स्वत्वनिवृत्ति केल्यासारखी होती. अर्थात् ते मालक असल्यामुळें जो कांहीं सार्वजनिक खर्च करणें तो ते आपल्या एकट्याच्या इच्छेनें व अखत्यारीनेंच करीत. पण प्रवास, देणगी, धर्मादाय, मतप्रसार, सत्कार्योत्तेजन व राजकीय चळवळी इत्यादिकांवर जो खर्च ते करीत त्यावरून त्यांनीं आपल्या मिळकतीच्या साधनाचें, म्हणजे केसरी-पत्राचें, उत्पन्न हें कसें व किती सार्वजनिक स्वरूपाचें मानिलें होतें हें दिसून येतें. वरील बाबींवर टिळक खर्च कसकसा करीत हें त्यांच्या चिरंजिवांना, इष्टमित्रांना व निकट परिचितांना नेहमीं माहीत असे. म्हणूनच वरील अनेक बाबींसंबंधानें कोणतेहि खर्च ट्रस्टडीडमध्यें निश्चित रकमांनीं किंवा हिस्सेरशीनें बांधून दिलेले नसून, त्यांचें तारतम्य ट्रस्टींवरच सोंपविण्यांत आलेलें आहे. आणि म्हणूनच ट्रस्टडीडमध्यें त्या अर्थाचे शब्द योजण्यांत आलेले आहेत.

असो. केसरी–मराठा संस्थेला वर दर्शविल्याप्रमाणें मिश्रट्रस्टचें स्वरूप आहे, व म्हणून ट्रस्ट ॲक्टाप्रमाणें या संस्थेचे हिशेब पद्धतशीर ठेवण्यांत आलेले असून, योग्य अधिकृत हिशेबनिसांकडून त्यांची कायदेशीर तपासणी करून त्याचें सर्टिफिकिट घेण्यांत आलेलें आहे. हे हिशेब पाहण्याचा ज्यांना 'कायदेशीर अधिकार' आहे त्यांना ते केव्हांहि पाहावयास मिळतीलच.

केसरी संस्थेच्या सांपत्तिक स्थितिसंबंधानें प्रारंभींच एक दोन गोष्टी समजुतीकरितां स्पष्ट केल्या पाहिजेत.१९१६सालाचा 'ज्युबिली फंड' केसरी ट्रस्टपासून अगदीं स्वतंत्र आहे व तो सर्वच्या सर्व शिल्लकहि आहे.होमरूलीग फंडापैकीं खर्च झाला तो कांहीं दहा वर्षांपूर्वी सर्वस्वी त्याच कार्याला झाला, व उरलेल्या शिलकेचा ट्रस्ट करण्यांत आला असून तोहि स्वतंत्र आहे. केसरी–संस्थेशीं त्याचाहि संबंध कांहीं नाहीं. कांहीं नैमित्तिक प्रसंगीं, म्हणजे टिळकांवरील खटले वगैरे झाले त्यावेळीं वर्गण्या झाल्या त्यांचा खर्च त्याच विशिष्ट कामांवर झाला.आणि१९१९सालीं चिरोल केसकरितां सुमारें तीन लक्षांचा जो फंड लोकांनीं टिळकांसाठीं उभारला त्याची परतफेड गेल्या ता. १ ऑगस्ट सन १९३० रोजीं स्वतंत्र ट्रस्टडीडनें करण्यांत आलेलीच आहे. म्हणजे त्या ट्रस्ट फंडाच्या रकमेचाहि आतां केसरी संस्थेशीं कांहीं संबंध उरलेला नाहीं. अशा रीतीनें टिळकांच्या हयातींत त्यांना उद्देशून किंवा त्यांच्या मदतीनें उत्तेजनानें उभारलेल्या फंडांचा परस्पर विनियोग झालेला असून, त्यांतील एक पै देखील स्वतः टिळकांच्या किंवा केसरी–मराठा पत्रांच्या खास उपयोगाकडे केव्हांहि खर्च झालेली नाहीं. याहि दृष्टीनें पाहतां केसरी–मराठा संस्थेचे हिशेब छापून प्रसिद्ध करण्याचें कारण नाहीं.

केसरी–मराठा मिळून एकच संस्था असली तरी तिच्या खऱ्या उत्पन्नाची बाब म्हटली म्हणजे केसरीपत्र हीच होय. 'मराठा' पत्र हें उत्पन्नाचें म्हणजे 'फायद्याचें' कलम आज पन्नास वर्षांत कधींहि नव्हतें. मग वेळोवेळीं संपादक कोणीहि असोत. निरनिराळे लेखक व कालमान यांना अनुसरून मराठ्याच्या वर्गणीच्या उत्पन्नांत वटवट कांहीं प्रमाणांत होत आली आहे; परंतु एकंदरीनें कोणत्याहि सालीं मराठा पत्राच्या जमाखर्चाचा वाजवी हिशेब केला असतां त्याजवर दरसाल कांहीं तरी रकम उलट केसरीच्या उत्पन्नांतूनच घालावी लागते. मात्र ती घालण्यांत हेतु हाच असतो कीं, मराठा पत्राची भाषा इंग्रजी असल्यामुळें त्याच्याद्वारें केसरीच्या धोरणाचा व मतांचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर व्हावा; व तसा तो यथाशक्ति गेल्या पन्नास वर्षांत होत आलेला आहे. म्हणून संस्थेच्या जमाखर्चांतून, निदान जमेच्या बाजूला तरी, मराठा वर्तमानपत्र ही बाब वाचकांनीं मनानें प्रथमपासूनच वगळून चालावें.

उरला केसरी. त्याच्या उत्पन्नाच्या मुख्य दोन बाबी. किंबहुना अवघ्या दोनच बाबी म्हटलें तरी चालेल. म्हणजे वर्गणीदारांची वर्गणी व जाहिरातींचें उत्पन्न. केसरीला कोणी कधीं देणगी उचलून देत नाहीं, व केसरी घेतहि नाहीं. केसरी स्वतःच्या छापखान्यांत दाहिरचें छापाईचें कामहि करीत नाहीं. आपल्या फौंड्रींतील टाईपहि बाहेर

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

विकांत नाहीं. मग अर्थात् कोणाची एजन्सी दलाली करीत नाहींच नाहीं. वर्गणीदार व जाहिरातदार हेंच काय ते केसरीच्या उत्पन्नाचे मुख्य आधारस्तंभ. वर्गणीदार पोस्टेज देतात तें परस्पर पोस्टालाच जातें. यामुळें केसरीच्या वार्षिक 'निवळ' म्हणजे तीन रुपये वर्गणीची रकम जमा धरून, त्यासमोर वर्गणीदारांस मिळणाऱ्या पूर्वीच्या ५१ व हल्लींच्या १०२ अंकांवर होणारा खर्च हिसेबदृष्टीनें मांडला तर असें दिसून येईल कीं, निवळ वर्गणीच्या पैशातून केसरीला बचत अशी फारच थोडी होते.

हल्लीं वर्षांतून केसरीचे १०२ अंक आम्ही केसरीच्या वर्गणीदारांना देतों. या प्रत्येक अंकाचीं पानें कमींत कमी १२ असतातच. पण केव्हां १६ हि असतात. नेहमीच्या एका अंकाचीं १२ पानें घेतलीं तरी त्यांच्या नुसत्या कागदाचें वजन ७ तोळे होतें. या मानानें १०२ अंकाच्या कागदाचें वजन ७१४ तोळे म्हणजे १८ पौंड भरतें. आणि दर पौंडास सुमारें २ आणे किंमत धरली तर १८ पौंडाला ३६ आणे म्हणजे २। रुपये तरी पडतात. अशा रीतीनें वर्गणीच्या ३ रुपयांपैकीं, २। रुपये आम्ही वर्गणीदाराला कागदाच्याच रूपानें परत देतों. या १०२ अंकांचें फाइल कोणी नीट बांधून ठेवल्यास पुढें कालांतरानें वर्गणीदाराला व त्याच्या पुढच्या पिढीला राजकारण व वाङ्मय यांच्या दृष्टीनें किती मौल्यवान माहिती ठेवीदाखल लाभेल हें सांगण्याचें कारण नाहीं. परंतु १०२ अंकांचीं नुसती रद्दी विकली तरी वर्गणीदाराला ८–१२ आणे येण्याला हरकत पडणार नाहीं. असो. वर्गणीदार आपल्या १०२ अंकांचें काय वाटेल तें करो. पण वरील हिशेबानें एवढी गोष्ट निश्चित ठरते कीं, वर्गणीच्या तीन रुपयांतून उरलेल्या १२ आण्यांत केसरी लिहून, छापून, तयार होण्याच्या अनेक खात्यांचा सर्व खर्च करावा लागतो. हा हिशेब अशाप्रकारें स्पष्ट करून लिहिण्याचा हेतु इतकाच कीं, केसरी काढताना उत्पादकांचा जो मूळ हेतु होता व पुढें जो लोकमान्य टिळकांनीं चालविला तो हेतु, म्हणजे केसरी वर्तमानपत्र शक्य तितक्या कमी किंमतींत वाचकांना मिळावें हा हेतु, ट्रस्टच्याद्वारानें केसरीची व्यवस्था आमचे हातीं आल्यापासून, आम्हीहि अबाधित ठेवला आहे. इतकेंच नव्हे तर यथाशक्ति अधिक सफलहि केला आहे. कारण तारीख १ ऑगस्ट १९२९ पर्यंत जेवढ्या म्हणजे ३ रुपये वर्गणींत वाचकांना आम्ही दर आठवड्यास फार तर १६ पानें मजकूर देत होतों, तेथें सदर तारखेपासून आम्ही दर आठवड्यास कमींत कमी २४ पानें इतका, व मधून मधून जास्तीहि पानें मजकूर वाचकांस देऊं लागलों आहों. १८८१ सालीं केसरीची वर्गणी १ रुपया होती व आज ३ रुपये आहे ही गोष्ट खरी असली तरी, वाचकांना एकंदरीनें तेव्हांपेक्षां तिपटीहून पुष्कळच अधिक मोबदला, व तोहि आठवड्यांतून एका ऐवजीं दोन हप्त्यांनीं म्हणजे सात दिवसांऐवजीं ३–३॥ दिवसाच्या अंतरानें, देत आहों. वाचकांना केसरी स्वस्त करण्याचा दुसराहि एक प्रकार संभवेल तो असा कीं, 'केसरी साप्ताहीकच ठेवावा. पण केसरीची वर्गणी १॥ रुपया करावी, म्हणजे मूळचें ध्येय अधिक गाठल्यासारखें होईल!' पण ही विचारसरणी विपरीत असून, ती आम्हालाच काय पण शेंकडा ९९ वाचकांनाहि ती पटणार नाहीं. वर्तमानपत्रांच्या प्रगतीचें सामान्य धोरण लक्ष्यांत घेतलें असतां, आठवड्यांतून दोन वेळां मिळणारा केसरी एक वेळ मिळाला तरी चालेल असें तर कोणी म्हणतच नाहीं. पण केसरी दैनिक करावा अशा सूचनाच आमचेकडे पुष्कळ येतात. परंतु केसरी दैनिक केल्यास वाचकाला वार्षिक खर्च कमींत कमी किती येईल याचा हिशेब करितां, हा खर्च खेडे गावांतील गरीब लोकांना झेपणार नाहीं. म्हणून केसरी दैनिक करण्याची कल्पना आम्ही अजून स्वीकारली नाहीं. याविषयीं केसरी अर्धसाप्ताहिक करितांना आम्ही जें म्हटलें होतें तेंच म्हणणें आमचें आजहि कायम आहे. केसरी दैनिक करावयाचा झाल्यास त्याला लागणारीं सर्व साधनें आमचे जवळ आहेत. एकहि कमी नाहीं. तथापि वरील विचारसरणी मुळेंच आम्ही अद्यापि ती मजल मारलेली नाहीं.

केसरीच्या मुख्य उत्पन्नाचा भाग जाहिरातींचा असतो. आतां जाहिरातींना लागणारा कागद, छपाई, टपाल या नात्यानें होणारा खर्च जाहिरातींच्या उत्पन्नाच्या मानानें थोडा कमी असतो हें खरें; तथापि वर्गणीदारांप्रमाणें जाहिरातदारांनाहि मोबदला भरपूर मिळतोच. मात्र तो वेगळ्या स्वरूपानें मिळतो इतकेंच. वर्गणीदारांना मोबदला मिळतो तो बातमी व इतर वाचनीय मजकूर हा होय. आणि जाहिरातदारांना जो मोबदला मिळतो तो व्यापारी मालाची प्रसिद्धि हा होय. केसरीचा कोणताहि अंक सुमारें एक लक्ष वाचक तरी वाचतात असें मानण्यास हरकत नाहीं. या दृष्टीनें पाहिल्यास जाहिरातींच्या आकाराचीच, व त्या छपाईचीच का होईना, पण एक लक्ष हँडबिलें किंवा निदान पाउण लक्ष हँडबिलें छापून तीं महाराष्ट्रभर गांवगन्ना वांटण्यास इतर कोणत्याही रीतीनें किंवा एजन्सीनें काय खर्च लागेल, याचा स्वतः जाहिरातदारच जर कागदावर हिशेब मांडून पाहतील तर त्यांचें त्यांनाच असें आढळून येईल कीं, जाहिरातींचें उत्पन्न एकंदरीनें वर्गणीपेक्षां अधिक असलें तरी, केवळ आपल्याच बळावर केसरी चालतो अथवा आपल्याच जिवावर वाचकवर्ग जगतो व त्याचा मोबदला मात्र आपणास कांहीं मिळत नाहीं असें सुद्धां जाहिरातदारांना मुळींच वाटावयाचें नाहीं. केसरींतील जाहिरातींच्या पैशाचा मोबदला किती मिळतो हें दुकानाच्या वहींतील मालविक्रीचें खातेंच त्यांचें त्यांना सांगूं शकेल.

स्थूलरूपानें बोलावयाचें तर गेल्या दहा अकरा वर्षांत, म्हणजे केसरी संस्थेचा ट्रस्ट झाल्यापासून, वर्गणी व जाहिरात या रूपानें या संस्थेला झालेल्या एकंदर उत्पन्नांतून संस्थेवर आलेला एकंदर खर्च वजा जातां दहा वर्षांत संस्थेची जी रकम शिल्लक राहली तिचा विनियोग मुख्यतः दोन नव्हेनें करण्यांत आलेला आहे.

(१) वर (पृष्ट ११–१३) सांगितल्याप्रमाणें नवीन ट्रस्टची रकम रुपये तीन लक्ष व खालीं दिलेल्या तपशिलाप्रमाणें निरनिराळ्या संस्था व सार्वजनिक कार्यें वगैरेकरितां देणगीरूपानें आजपर्यंत खर्च केलेली रकम

(२) केसरी ट्रस्टच्या मूळच्या 'गुडविल'ची किंमत म्हणून, आणि आडिटर यांनीं सुचविल्याप्रमाणें शास्त्रीयपद्धतीनें घसारा किंवा खातेवार मजबुती बंदिस्तीकरितां वेगळ्या काढून ठेवलेल्या रकमा

गेल्या दहा वर्षांत केसरी–मराठा संस्थेच्या नित्यखर्चाशिवाय नैमित्तिक स्वरूपाचा असाहि खर्च संस्थेला बराच करावा लागला. त्याचें एक मुख्य कारण हें कीं, लो. टिळकांच्या मृत्युपत्रांत सुचविल्याप्रमाणें केसरी ट्रस्ट जरी ट्रस्टडीड होऊन ता. १६ ऑगस्ट १९२० पासून कायदेशीर रीतीनें सुरू झाला, तरी मृत्युपत्रांत सांगितल्याप्रमाणें चालत्या व्यवहारांतून खासगी मिळकत व ट्रस्टची मिळकत यांचा गुंता सोडवून त्या कायमच्या पृथक करणें याला नुसता वेळच नव्हे तर खर्चहि लागला. मृत्युपत्रानें सांगितलेलीं देणीं, कर्जें, देणग्या वगैरे देऊन् टाकल्यावरच उरेल ती मिळकत ट्रस्टची; शिवाय मृत्युपत्रांत प्रत्यक्ष रकमा न सांगितलेले परंतु वहीखात्यांतून हिशेबी निघणारें असेंहि देणें कांहीं होतें. तेंहि ट्रस्टींना ट्रस्टचा कारभार सुरू केल्यावर कांहीं दिवस देत राहावें लागलें. वर सांगितल्या प्रकारचा नैमित्तिक खर्च संस्थेच्या पैशांतून प्रारंभीं ट्रस्टींना किती करावा लागला हें नं. २ चा लवाद निवाडा दुसरीकडे यांच कागदपत्रांत छापला आहे त्यावरून दिसून येईल.

ता. १ ऑगस्ट सन १९३० रोजीं ट्रस्ट करून बाजूला काढून ठेवलेल्या तीन लक्ष रुपयाशिवाय, गेल्या दहा वर्षांत केसरी ट्रस्ट संस्थेनें सार्वजनिक स्वरूपाचा असाहि बराच खर्च केला आहे. म्हणजे मतप्रसारार्थ इतर विशिष्ट प्रकारच्या वर्तमानपत्रांना व छापखान्यांना मदत दिली. मतप्रसारार्थ व्याख्याते बाहेर पाठविले. प्रचारकांना प्रवासखर्च वगैरेची मदत केली. लेखकांना मोबदला किंवा मेहनताना म्हणून मदत केली. राष्ट्रीय पक्षातर्फे निवडणुकीस उभे राहाणाऱ्या उमेदवारांना द्रव्यसहाय्य केलें. तसेंच शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, व्यायामविषयक, धर्मविषयक वगैरे संस्थांना व कार्यांना निरनिराळ्या वेळीं देणग्या देऊन उत्तेजन दिलें. त्या संबंधाची सर्व यादीच्या यादी देत न बसतां नमुन्यादाखल किंवा उदाहरणादाखल कांहीं नांवनिशी व कांहीं तपशील याखालीं दिला आहे—

मतप्रसार देणगी धर्मादाय वगैरेची यादी

(रुपये)

३००३९२ टिळक पर्सफंड (खर्चासह)
५२६७ लो. टिळक पुण्यतिथीनिधि
४००० गुजराथी केसरी
३३०६ राष्ट्रीय ब्राह्मणेतरपक्षाचा मतप्रसार
२५०० सी. आर. दास, कलकत्ता ('फॉरवर्ड'पत्र काढण्याकरितां)
३५०० लोकमान्य पब्लिशिंग कंपनी,
२००१ पुणें आयुर्वेदिक रुग्णालय
१८०० दहा वर्षांतील किरकोळ धर्मादाय
१००१ रत्नागिरी लोकमान्य जन्मभूमि
७९२ कॉंग्रेसप्रचार व सभांचा खर्च
६७६ कै. आण्णासाहेब पटवर्धन स्मारक
५०० टिळक स्वराज्य फंड
५०० गोवा शुद्धी फंड (मसूर आश्रम)
५०० कलकत्ता महाराष्ट्र मंडळ
५०० धोंडो केशव कर्वे ज्युबिलीफंड
५०० श्रद्धानंद प्रेस व पत्र, मुंबई
५०० बंदिवान सत्याग्रह फंड, पुणें
५०० धर्मग्रंथप्रसारक-मंडळ, पुणें
४५० शिवण्याच्या देशी मंत्राच्या पेटंटकरितां
४३५ ग्रामसंस्था कार्य
३२५ मिरत डिफेन्स फंड
३२४ डेक्कन कॉलेज टिळक–स्मारक
३०० संयुक्तप्रांतांत मतप्रसार
३०० विजापूरकर स्मारक फंड
३०० राजवाडे मेमोरिअल फंड, धुळें
३०० श्रीशिवचरित्र कार्यास
२५१ ज्ञानप्रकाश अग्निप्रलय फंड
२५० लोकशिक्षण संस्था चिंचवड
२५० लोकसंग्रह पुणें
२५० फ्री प्रेस ऑफ इंडिया, मुंबई
२५० गुलेंदसूर टिळक पुण्यतिथि
२१२ लो. टिळकस्मारक, पुणें
२०० विलायतेंतील चळवळींकरितां
२०० हिंदुसंघटन कार्य
२०० सेवादलाचे कार्य(डॉ.हर्डीकर यांस)
२०० मावळांतील सोमवडी निराश्रित
२०० (वावी) अस्पृश्यांची शाळा
१९५ पुणें येथील संस्कृत कॉलेज
१७५ भारत इ. सं. मंडळ पुणें
१५० हिंदुमहासभाप्रचार (डॉ. मुंजे)
१५१ हनुमान व्या: प्र. मंडळ, उमरावती
१५० महाराष्ट्र सत्याग्रहमंडळ
१५१ गुजराथ संकटनिवारण फंड
१५० मुळशी पेटा सहाय्यक मंडळ, पुणें
१५० मद्यपान निषेधाची चळवळ
१२० टिळक महाविद्यालय, पुणें
१२० सत्याग्रही बंदीवानकुटुंबास मदत
१०५ श्रीशिवाजी उत्सव, पुणें
१०१ पुणें सार्वजनिक सभा
१०१ इंडियन अलेंबिक असोसिएशन
१०० म. गांधीच्या फोटोकरितां
१०० इसलामपूर ब्राह्मणसंघाचे कार्यार्थ
१०० सासवणें येथील राष्ट्रीय विद्यालय
१०१ स्वराज्यपक्षाचे कार्य
१०२ सातारा राष्ट्रीय शाळा
१०१ मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें
१०० स्वराज्यसंघ, पुणें
१०० रायगड धर्मशाळा फंड
१०० ब्राह्मण कार्यालय इमारत फंड, पुणें
१०० पुणें स्वयंसेवक कार्य
१०१ मुंबई शंकरवाडी फंड
१०० बार्डोली फंड
१०० शेतकी प्रदर्शन, पुणें
१०१ गोवर्धन संस्था, पुणें
१०० दक्षिणी ब्राह्मण-शिक्षण संस्था,मुंबई
१०० दक्षिणी प्रजापरिषद
१०१ भारतीय वैद्य संमेलन
१०० संस्थानी स्वराज्य पुणें
१०० चरित्रकोश मंडळ पुणें
१०१ अस्पृश्यनिवारणकार्य

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शंभर रुपयाखालच्या देणग्या दिलेल्या संस्था, कार्यालयें
यांच्यापैकीं फक्त कांहींची यादी

शुद्धीकार्यालय (पांचलेगांवकर)	मडगांव गोवा शाळेस मदत
विलायतेंतील हिंदी विद्यार्थी	अंबाबाई तालीम, मिरज
प्रॉ. कॉ. कमिटीस मदत	चाळिसगांव एज्युकेशन सोसायटी
पर्वती संस्थान पुणें	पैसा फंड मेळा
येवलें यजुर्वेद शास्त्रोत्तेजक सभा	ऑल इंडिया स्टेट कॉन्फरन्स
रा. करंदीकर अमेरिकेला जाण्यास	श्रीशिवाजी हायस्कूल इमारत फंड
लो. सेवासदन, विलेपार्ले	संस्कृत कॉलेज, पुणें
थिऑ. लॉज इमारत फंड, पुणें	खडकी सहकारी-फंड, पुणें
श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम, मुंबई	महाराष्ट्र-मंडळ, मद्रास
संस्कृत पाठशाळा, राजापुर	सायमन कमिशन बहिष्कार
एस. डी. उजगरे (डिप्रेस्ड) कार्य	सन्मार्गोपदेक पुस्तक
वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें	अनाथ-विद्यार्थीगृह, सांगली
लोकमान्यांच्या पोवाड्याबद्दल	वैदिक संशोधक मंडळ, पुणें
टिळक विद्यालय, येवलें	अस्पृश्यतानिवारक मंडळ, पुणें
टिळक महा विद्यालय, पुणें	अनाथविद्यार्थीगृह, सोलापूर
वांईचे प्रचारक पोवाडेवाले	मराठी साहित्य संमेलन
बालचर मंडळ, पुणें	बहिऱ्या मुक्यांची शाळा, पुणें
आलेगांवकर शाळा खडकी	इत्यादि इत्यादि इत्यादि

अशा रीतीनें केसरीच्या उत्पन्नांतून हे नित्य–नैमित्तिक खर्च वजा जाऊन जेव्हां तीन लक्षांवर शिल्लक उरली तेव्हां, ट्रस्टींनीं पूर्वीपासून मनांत योजना करून ठेवलेली, पर्स-फंडाची रक्कम परत करण्याची कल्पना हातीं घेऊन ती त्यांनीं गेल्या ता. १ ऑगस्ट सन १९३० सेजीं स्वतंत्र ट्रस्टडीड करून पार पाडली. हें ट्रस्टडीड पूर्वी केसरींत प्रसिद्ध झालेंच आहे. परंतु इतर महत्वाच्या कागदपत्रांबरोबर तेंहि वाचकांच्या संग्रहीं कायमचें राहावें म्हणून दुसरीकडे या अंकांत दिलें आहे.

लो॰ टिळकांच्या वारसांची सांपत्तिक स्थिति

केसरी संस्थेच्या सांपत्तिक स्थितीसंबंधानें वर कांहीं माहिती दिली आहे. म्हणून त्यावरोबर लो॰ टिळकांनीं हा ट्रस्ट करतांना आपल्या चिरंजिवांकरितां काय तरतूद केली याचीहि थोडीशी माहिती देणें अप्रस्तुत होणार नाहीं. किंबहुना ती माहिती देणें हें अपरिहार्यहि झालें आहे. कारण ट्रस्टसंबधीं वाद उत्पन्न होऊन प्रकरण हाय-कोर्टापर्यंत गेलें यामुळें, आणि विशेषतः लो. टिळकांचे चिरंजिवांनीं मतप्रसाराचे अनेक बरेवाईट मार्ग स्वीकारून "ट्रस्टींनीं आपणास बुडविलें, आपल्या वडिलांनींहि आपली व्यवस्था करावी तशी केली नाहीं, ट्रस्टींच्या हातीं उत्पन्नाचें साधन गेल्या-मुळें आपण निर्धन बनलों" असें लोकांना भासविण्याचा प्रयत्न चालविला होता, यामुळें भोळ्या लोकांनाहि सकृद्दर्शनीं असें प्रथम प्रथम वाटलें कीं, "केसरीचा ट्रस्ट केल्या-मुळें मुलें खरोंच नाडलीं ! ट्रस्टी हे काय बोलूनचालून उपरे. पण अशा उपऱ्या लोकांच्या हातीं उत्पन्नाचें सर्व साधन देऊन, मुलांना परावलंबी बनवून, टिळकांनीं त्यांना मोठा अन्याय केला." कोणत्याहि दोन पक्षांत वाद सुरू झाला असतां प्रथमच, म्हणजे पुरावा वगैरे कांहीं पाहण्यास न थांबतां, आपल्या कांहीं पूर्वग्रहावरून त्यांतल्या एखाद्या पक्षाला पडता मानून, त्याला सहानुभूति देऊन, उपकृत करावयाचें अशी जगाची रीतच आहे. आणि त्याप्रमाणें येथेंहि प्रथम झालें. पण जसजशा खऱ्या गोष्टी बाहेर आल्या तसतसा लोकांचा हा ग्रह बदलला. ट्रस्टी हे कोणी उपरे परके लोक होते किंवा त्यांच्या पूर्वीच्या अखंड संबंधानें ते केसरीपुरते लोकमान्यांच्या चिरं-जिवांइतके, किंबहुना त्यांच्याहून अधिक जवळचे व उपयुक्त होते, याबद्दल आम्हीं वगळें कांहीं सांगत नाहीं. तें वर छापलेल्या कागदपत्रांवरूनहि दिसून येईलच. पण आम्हाला येथें प्रस्तुत म्हणून इतकेंच सांगावयाचें आहे कीं, लो. टिळकांनीं केसरी पत्राची व आपल्या चिरंजिवांची जी व्यवस्था मृत्युपत्रानें केली तींत त्यांच्याकडे कोणतेंहि दुर्लक्ष केलें नाहीं. स्थूल मानानें असे म्हणतां येईल कीं, लो. टिळकांना दोन औरसपुत्र व दोन मानसपुत्र असे चार पुत्र होते. यांपैकीं केसरीरूप पुत्राची व्यवस्था त्यांनीं काय कशी केली हें वरील कागदपत्रांवरून दिसून येतें. श्री. जगन्नाथमहाराज यांच्याकरितां टिळकांनीं श्रमसायास खर्च किती कसे केले याची सविस्तर हकीकत लो. टिळक यांच्या चरित्रग्रंथांत (खंड २) कोणालाहि वाचावयास मिळेल. त्यांना टिळकांनीं पुणें येथील भाऊमहाराज घराण्याच्या शाखेवर सुप्रतिष्ठित केलें, शिक्षण दिलें, व दरसाल सुमारें पंचवीस हजार रुपये उत्पन्न येईल एवढी मिळकत मिळवून दिली. पण त्याचप्रमाणें लोकमान्यांची स्वतःची म्हणून जी मिळकत होती तिच्यांतून आपल्या औरस पुत्रांचा योगक्षेम, आपल्या बरोबरीच्या इतर चार लोकांच्या मुलासारखा, चालावा अशीहि व्यवस्था त्यांनीं केली होती. १९०९ सालीं टिळकांनीं ब्रम्हदेशांत मृत्युपत्र केलें त्या वेळीं केसरीचें उत्पन्न थोडें व त्याच्या डोक्यावर थोडेंसें कर्जहि होतें. अशाहि वेळीं त्यांनीं मुलांच्या शिक्षणाकरितां व अभ्युदयाकरितां २०००० रुपयांची तरतूद करून ठेवली; घर वगैरे इतर मिळकतीहि त्यांना दिली, व केसरीनें आपलें आपण मिळवन चरि-तार्थ चालवावा असें स्वतंत्र 'गोइंग कन्सर्न' म्हणून संपादक व व्यवस्थापक यांचे हातीं सोंपविलें. सुदैवानें, पुढें ९ वर्षांनीं फिरून लोकमान्यांनीं मृत्युपत्र केलें तेव्हां केसरीची सांपत्तिक स्थिति पूर्वीहून पुष्कळ सुधारली होती. पण उलट चिरोलकेसमुळें बरेंच कर्ज होणार होतें. तथापि त्यांनीं मुलांचा योगक्षेम चालण्याला कांहीं कमी ठेवलें नाहीं; व ती त्यांची व्यवस्था पसंत पडूनच टिळकांच्या चिरंजिवांनींहि त्यांच्या मृत्यूनंतर, दोन वांटण्यांपैकीं आपल्याला हवी ती वांटणी घेऊन केसरी–संस्थेचें ट्रस्टडीड करून दिलें. पुढें कालांतरानें, कोणाच्या शिकवणीनें किंवा स्वतःच्या बुध्दीनें, त्यांना ही झालेली व्यवस्था अप्रिय किंवा अमान्य वाटूं लागली तर त्यांना कोण काय करणार ! व या बदललेल्या मनःस्थितींत टिळकांचें सर्वच्या सर्व मृत्युपत्र अमान्य करून केसरी सर्वस्वीं आपल्या मालकीचा करावा अशी इच्छा होण्यापर्यंत त्यांची मजल गेली. पण त्यासंबंधानें लिहिलें इतकेंच पुष्कळ झालें व लिहिलें हेंहि नाखुषीनें नाइलाज म्हणून लिहिलें. परंतु प्रस्तुत मुद्दा इतकाच कीं, टिळकांनीं केसरी- संस्था निर्माण करतांना मुलांच्या हिताकडे दुर्लक्ष केलें कीं काय ? व तसें केलें नाहीं हें दाखविण्याचा एक मार्ग म्हणून टिळकांच्या चिरंजिवांना या व्यवस्थेंत किती मिळकत शिल्लक राहिली याचे कांहीं आंकडे खालीं देत आहोंत.

रु. ५०००० जगन्नाथ महाराज यांनीं टिळकांच्या कर्जफेडीकरितां मुलांना दिलेली व मुलांनीं कुलकर्जफेड म्हणून स्वीकारलेली रक्कम. (ही पन्नास हजारांची रक्कम एक लक्ष रुपयांच्या साडेतीन टक्के व्याजाच्या प्रॉ. नोटा होत्या. त्यांची किंमत तेव्हां बाजारभावाप्रमाणें शेंकडा ५० इतकी हिशेबी धरली होती. पण पुढें ती किंमत वाढण्याचा संभव होता. त्याप्रमाणें ती हल्लीं सुमारें बारा-पंधरा टक्यांनीं वाढली आहे, व यापूर्वी मध्यंतरीं एक वेळ ती शेंकडा ७४ इतकी वाढली होती. केसरी–संस्थे-कडून दरमहा जी रक्कम टिळकांच्या चिरंजिवांना मिळा-वयाची त्याऐवजीं जगन्नाथ महाराजाकडून कर्जफेडीदाखल येण्याचा ऐवज एक रकमेनें मिळणार म्हणून ही रक्कम त्यांनीं घेतली व केसरीकडील सर्व येणें पोंचलें असा बेदावा लिहून दिला.)

३०००० लो. टिळकांच्या मृत्यूच्या वेळीं त्यांची रक्कम, त्यांची म्हणजे अर्थात् केसरीच्या उत्पन्नांतील जी रक्कम, कै. आण्णासाहेब नेने, मुंबई, यांचेजवळ ठेवीदाखल होती. त्यांपैकीं ३०००० रुपये नेने यांचे हयातींत ठेवी-वरील व्याजासह टिळकांच्या चिरंजिवांना देण्यांत आले ते.

१५००० लातूर येथील गिरणीचा टिळकांच्या मालकीचा एक–तृतीयांश भाग विकून टिळकांच्या चिरंजीवांनीं रक्कम वसूल केली ती.

१०००० टिळकांच्या विमा पॉलिसीचे रुपये मृत्यूनंतर वसूल झाले ते.

१५००० केसरी ट्रस्टनें गीतारहस्य वगैरे ग्रंथांचें आपणाकडे जमा असलेले रुपये टिळकांच्या मुलांना रोख दिले ते.

६००० सिंहगड येथील बंगल्याची किंमत.

५००० खासगी दागिने वगैरे किरकोळ.

६००० ट्रस्टडीड झाल्यानंतर पहिल्या लवादनिवाड्यांत पंचांनीं देवविल्या-प्रमाणें केसरी ट्रस्टनें टिळकांच्या मुलांना दिले ते.

३००० यवतमाळ येथील वकील रा. बापट यांजकडील टिळकांच्या वेळचे येणें वसूल झाले ते. (शिवाय व्याज)

२५००० केसरी–संस्थेकडे भाड्यानें असलेल्या गायकवाडवाड्याच्या भागाकरितां दरमहा केसरी-संस्थेनें १०० रु. भाडें द्यावयाचें आहे. ही व्यवस्था बिन-मुदतीची म्हणजे कायम आहे. हें वर्षाचें भाडें १२०० रु. होतें. अर्थात इतकें व्याज देणारी रक्कम म्हणून हे २५ हजार हिशेबीं धरले पाहिजेत.

२५००० टिळकांच्या चिरंजिवांच्या ताब्यांत असलेला गायकवाडवाड्याचा त्यांचा खासगी मालकीचा भाग याची किमान अंदाजी किंमत. या खासगी घराचे म्यु.कर, रिपेरी व विमा यांचा बोजा केसरीवरच परस्पर आहे.

१०००० याशिवाय गीतारहस्य वगैरे ग्रंथांचे कॉपी राइटसचे हक्क त्यांच्या चिरं-जिवाकडे खासगी मालकीनें आहेत. त्यांची व इतर मिळकतीची किंमत

वर दिलेल्या रकमांची बेरीज केली असतां ती सुमारें २ लक्ष भरते; व ही मिळकत दोघां मुलांना मिळून दिली असें म्हटलें तरी प्रत्येकास मिळालेल्या हिश्शाचा अंदाज सुमारें एक लक्षाचा होतो. यांपैकीं जगन्नाथ महाराजाकडील टिळकांचें येणें मुलांनीं आपल्याकडे घेतले नसते तर त्याऐवजीं केसरी–संस्थेकडून मृत्युपत्रांत सांगितल्याप्रमाणें दरमहा दोनशे रुपये केसरी संस्थेनें मुलांना द्यावयाचे होते ते अबाधित दिले असते. वरील हिशेबावरून टिळकांनीं आपल्या मुलांना निर्धन व असहाय ठेवण्याचा अन्याय केला होता कीं काय हें कोणासहि कळून येईल.

केसरी–मराठा संस्थेचा निर्लोभीपणा

केसरीच्या गुणदोषांची चर्चा अर्थातच तिऱ्हाइताकडून होणें योग्य. तथापि एक गोष्ट अशी आहे कीं, तिची माहिती बाहेरच्या लोकांना फारशी असण्याचा संभव नसतो. आणि तिच्याविषयीं काढलेल्या यथार्थ उद्गारांत जर आत्मस्तुति किंवा प्रौढी यांची थोडीशी झाक उमटली तर ती क्षम्य मानतां येईल. ही गोष्ट म्हटली म्हणजे केसरी–मराठा संस्थेची निरपेक्षता.

सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनीं आपल्या सुप्रसिद्ध पुस्तकांत टिळक व केसरी यांच्यासंबंधानें पुष्कळ खोटीं विधानें केलीं आहेत. पण त्यांतल्यात्यांत खोटेपणांत व खोडसाळपणांत पहिला नंबर पटकावणारें जर एखादें विधान असेल तर तें लोकांकडून

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

धाक दाखवून पैसे व वर्गण्या काढण्यासंबंधाचें होय. चिरोलसाहेबांना आपल्या देशांतील पुष्कळ वर्तमानपत्रांचा व हिंदुस्थानांतील कांहीं वर्तमानपत्रांचा अनुभव असेल. त्यावरून त्यांनीं हें विधान अनुमान-धपक्यानें केलें असलें पाहिजे हें उघड आहे. केसरी-मराठा संस्थेचा निकट परिचय असणारा कोणताहि मनुष्य वरील आरोप खोटा असल्याचें कबूल करीलच करील.

हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रें सामान्यतः द्रव्यवश नसतात ही गोष्ट प्रसिद्ध व मान्य आहे. तथापि विलायतेप्रमाणें इकडेहि थोडथोडे अनुभव येतात, नाहीं असें नाहीं. कित्येक वर्तमानपत्रकार प्रत्यक्ष पैसा घेत नसतील. परंतु त्या पत्राच्या प्रती पुष्कळशा विनाकारण विकत घेणें व आपल्या कचेऱ्यांतून लोकांना फुकट वाचावयास देणें, त्यांच्याशीं संलग्न असलेल्या छापखान्यांचीं बेसुमार बिलें भरून आपले रिपोर्ट वगैरे छापवून घेणें, व रिपोर्टांचें समालोचन वगैरे लिहविण्याकरितां दरबारखर्चें करणें अशा निरनिराळ्या प्रकारांनीं कांहीं दरबारांतून कांहीं अँग्लो-इंडियन पत्रांना मदत होत असते असें लोक बोलतात. शिवाय हॉर्निमनसाहेबांचा डेली हेरल्ड व नाभाचे पदच्युत महाराज यांच्यांतील पैशाच्या देवघेवीचा व मतप्रसाराचा संबंध काय होता हें सुप्रसिद्धच आहे.

याच्या उलट १८८२ च्या कोल्हापूर खटल्यांत करवीरकर छत्रपतींचा पक्ष उचलून धरून त्यांच्याशीं सहानुभूति दाखविली याबद्दल केसरी-मराठा पत्रांच्या संपादकांना तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली, माफी मागावी लागली, व खर्चहि सोसावा लागला. या खर्चाला थोडीशी मदत त्या वेळीं लोकांनीं उभारलेल्या डिफेन्स फंडांतून झाली. पण ज्या दरबारी लोकांनीं टिळक-आगरकरांना या प्रकरणाविषयीं वर्तमानपत्रांतून लिहिण्याच्या भरीस घातलें त्यांनीं व्यक्तिशः टिळक-आगरकरांची नुकसानभरपाई कांहीं केली नाहींच, पण त्यांच्या वर्तमानपत्रांना कांहीं थोडेफार द्रव्य-साहाय्य केलें असेल अशी कोणाची समजूत असल्यास तीहि चुकीची आहे. कोणी फार तर इतकें म्हणावें कीं, "या खटल्यामुळें, केसरी-मराठ्याची प्रसिद्धि झाली, अन्न वाढली यामुळें वर्गणीदार वाढले असतील !" तर तेवढीमात्र गोष्ट थोडीशी खरी म्हणतां येईल. पण वाढत्या 'वर्गणीदारां'कडून परस्पर मिळणारा आश्रय हा सर्वस्वी रीतसर न्याय्य असाच आहे.

संस्थानांपैकीं इंदूरसंबंधानें केसरी-मराठा पत्रांचें धोरण संस्थानिकांना अनुकूल म्हणजे होईल तितकें त्यांच्या हक्कांचें समर्थन करणारें व त्याकरितां सरकारावर टीका करणारें असेंच नेहमीं होतें. कै. सर शिवाजीराव होळकर व विद्यमान सर तुकोजीराव होळकर या दोघांवर पदच्युतीचे प्रसंग आले, त्या वेळीं केसरी मराठा पत्रांनीं त्यांची बाजू कोणाहि अत्यंत राजनिष्ठ प्रजाजनांइतकी उचलून धरली. परंतु या दरबारापासून या पत्रांनीं कधीं एका पैचाहि अभिलाष केला नाहीं. एवढेंच नव्हे तर हस्तें किंवा परहस्तें-हि एक पैचाहि फायदा या दरबाराकडून केसरी-मराठा पत्रांना झालेला नाहीं. जेथें महाराष्ट्रांतील हरदास, कथेकरी, पुराणिक, ग्रंथप्रकाशक इत्यादिकांना या दरबारांतून हजारों रुपये आपापल्या कामाकरितां मिळवितां आले, तेथें केसरी-मराठा पत्रांच्या चालकांनीं आपल्या संस्थेला कांहीं मदत मिळविण्याची इच्छा धरली असती तर ती निष्फळ झाली असती असें नाहीं. परंतु या संस्थेच्या कोणत्याहि चालकांची आजपर्यंत तशी दृष्टि केव्हांहि नव्हती. केसरी मराठ्यांच्या चालकांप्रमाणेंच या संस्थानिकांचाहि गुण घेतला पाहिजे. कारण सुदैवानें या संस्थानांच्या अधिपतींनींहि या चालकांना द्रव्याचें आमिष दाखवून, आपलें काम करून घेण्याची बुद्धि कधीं ठेवली नाहीं. हा त्यांचाहि थोरपणाच होय!

केसरी-मराठा पत्रें व ग्वाल्हेर दरबार यांचा कधींच कोणताहि संबंध इंदूरइतकाहि आलेला नाहीं. या दोनहि संस्थानांत केसरी-मराठा पत्रांना एका काळीं बंदी होती. ती कालांतरानें निघाली इतकेंच काय तें ! तशी बंदी इतर पुष्कळ पत्रांचीहि निघाली. त्यांत केसरी-मराठा पत्रांवर कांहीं विशेष कृपा झाली असें नाहीं. कारण देशी संस्थानें झालीं म्हणून त्यांत इकडील वर्तमानपत्रांना बंदी झालीच पाहिजे असा कांहीं नियम नव्हता. फाजील भित्रे किंवा तोंडपुजे अधिकारी संस्थानांत निघाले त्यांनीं बंदी केली व समंजस अधिकारी आले तेव्हां त्यांनीं बंदी खुली केली ! मोंगलाईंत या पत्रांना १९०९ सालीं जी एकदां बंदी झाली ती अजूनहि निघत नाहीं. उलट कित्येक ब्राह्मणेतर पक्षाच्या संस्थानिकांचा या पत्रांशीं पुरा बेबनाव असतांहि त्यांनीं या पत्रांना आपल्या राज्यांत कधींहि बंदी केली नाहीं !

लो. टिळकांकरितां १८९७, १९०८, १९१६ व १९१९ या सालीं जे कांहीं फंड उभारण्यांत आले त्यांची मूळ कल्पना, त्यांचा हेतु, त्यांच्या एकूण रकमा, त्यांचा विनियोग व त्यांची हल्लींची स्थिति व हिशेब या सर्व गोष्टी महाराष्ट्रांत लोकांना विदितच आहेत. यापैकीं कोणत्याहि फंडाचा उपयोग लो. टिळकांनीं व्यक्तिशः खासगी रीतीनें, किंवा केसरीकडेहि केला नाहीं. १८९७ सालाचा फंड त्या वेळच्या खटल्यांत बहुतेक संपून गेला व जो थोडा उरला त्याचा उपयोग केसरी-मराठा संस्थेकडे करण्यांत आला नाहीं. 'फक्त पर्स फंडा'चा उपयोग मात्र लो. टिळकांना व्यक्तिशः व केसरी-मराठा संस्थेलाही झाला असें म्हणतां येईल. कारण चिरोल केसवर टिळकांचे म्हणजे केसरीचे जे रुपये खर्च झाले होते त्यांची फेड यांतून झाली, व हा फंड जमला नसता तर केसरीला जें कर्जांत राहावें लागलें असतें तें राहावें लागलें नाहीं. अशा रीतीनें या फंडाचा उपयोग टिळकांच्या वारसांना कायमचा झाला व केसरीला सुमारें दहा वर्षें झाला. पण केसरीच्या ट्रस्टींनीं दहा वर्षें आपल्या उपयोगी पडलेली ही रकम थोडेंबहुत व्याजहि देऊन सर्वच्या सर्व परत केली, ही गोष्ट ता. २ ऑगस्ट १९३० च्या केसरीच्या अंकांत वाचकांना सविस्तर कळून आलीच आहे. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, केसरी-मराठा संस्था सर्वस्वी स्वावलंबनाच्याच तत्त्वावर आजपर्यंत उभी आहे व जगली आहे.

केसरी-मराठा व आर्यभूषण छापखाना यांचे उत्पत्तीचे वेळीं लागणारी रकम उत्पादकांपैकीं कांहींनीं खासगींच उभारली होती. त्याकरितां सार्वजनिक वर्गणी झाली नव्हती. पुढें १८९७ सालीं छापखाना व वर्तमानपत्रें यांची फारकत होऊन टिळकांनी फक्त वर्तमानपत्रें आपल्या हिश्शादाखल उचललीं. पण तीही बरोबर सात हजार रुपये कर्ज घेऊन ! (या संबंधाची हकीकत लो. टिळक चरित्रांत (खंड १ पृ.) येथें कोणा-सही वाचावयास मिळेल.) सन १८९७ नंतर टिळकांच्या हयातींत प्रथमप्रथम जें कर्ज काढावें लागलें तें सर्व त्यांचे त्यांनीं केसरीच्या उत्पन्नांतून फेडलें, व आपल्या मृत्यु-पत्राच्या वेळीं केसरी मराठा पत्रें मागें निष्काळजी करून ठेविलीं. देणगीच्या रूपानें केसरी-मराठा संस्थेकडे पन्नास वर्षांत एक पैहि कोणाची आलेली नाहीं असें आम्हांस स्वच्छ म्हणतां येईल. वर्गणीदार व जाहिरातदार व किरकोळ अंकाचे खरेदीदार यांच्याच आश्रयावर केसरी डोक्यावर कर्ज घेऊन निघाला व त्यानें कर्जफेड केली. कायदेशीर कर्ज तर फेडलेंच पण नैतिक कर्जही फेडलें. व सुमारें एक लक्ष रुपये किंमतीची मिळकत स्वामित्व व गुडविल यासुद्धां मिळून आज या संस्थेची म्हणून केसरीला अबाधित राखतां आली आहे. तात्पर्य, वरील रीतसर उदाराश्रयाशिवाय केसरी कोणाच्या एक पैलाहि ओशाळा झालेला नाहीं. १९२१ सालीं केसरी-कचेरींतील कागदांच्या गोदामाला आग लागली व कित्येक हजारांचें नुकसान झालें. तेव्हां कित्येक स्नेह्यांनीं मदतीदाखल फंड उभारण्याकरितां, आधीं न विचारतां, मनीऑर्डरी केसरीकडे पाठविल्या; परंतु त्या केसरी ट्रस्टनें साभार परत केल्या. तसेंच १९०८ सालीं व १९२४ सालीं असे केसरीवर कोर्टाची बेअदबी केल्याचे दोन खटले होऊन दोनहीं मिळून दंड व खर्चरूपानें सुमारें पंधरावीस हजार रुपये खर्च आले. ती रकमही सर्व केसरीच्या पैशां-तूनच खर्चली गेली, त्याकरितां बाहेरून कोणाची एक पैहि घेण्यांत आली नाही, व लोकांची मदत करण्याची इच्छा असतां तीहि यावेळीं आभारपूर्वक नाकारण्यांत आली. केसरीच्या चालकांची अशी मनःस्थिति असल्यामुळें, चिरोलसाहेबांनीं कितीहि म्हटलें तरी केसरींतून टीकेचे कोरडे ओढून टिळकांनी पैसे मिळविले या गोष्टीवर या देशांतील एक पोरहि कधीं विश्वास ठेवणार नाहीं; मग जाणत्या लोकांची गोष्टच बोलावयास नको. रायगडस्मारक फंड, पैसाफंड, वगैरे सारख्या अनेक वर्गण्या जमविण्यास केसरीच्या द्वारें पुष्कळच मदत झाली. या वर्गण्यांची पोंच देण्यांत येई व मधूनमधून उत्तेजनपर शब्द वर्गणी देणार व गोळा करणार यांना उद्देशून लिहिण्यांत येत. हे लेख अर्थात् सहानुभूतीपर व सर्वस्वीं मित्रभावाचेच होत. पण विशेष सांगण्याची गोष्ट ही कीं, वर्गणी न देणाऱ्या विरोधी कुत्सित किंवा कंजूष लोकांवरहि टीकेचे कोरडे कधींहि ओढण्यांत आले नाहींत. म्हणून या दृष्टीनेंहि चिरोल साहेबांच्या टीकेला कांहीं आधार नाहीं.

लो. टिळकांची वृत्ति किंवा केसरीचें धोरण लोभी असतें तर पूर्वी सांगितल्याप्रमाणें इंग्लंडांतील किंवा इकडीलहि एखाददुसऱ्या वर्तमानपत्राप्रमाणें ब्लॅकमेलिंगनें किंवा कुचेष्टेनें किंवा साध्या स्नेहभावाच्या मदतीनेंहि केसरीला द्रव्यलाभ होणें अशक्य नव्हतें. पण केसरीनें कोणाचीहि बाजू कधीं उचलून धरली तर ती फक्त कर्तव्य म्हणून किंवा आपलेपणानें. अशा कार्यांत मतप्रसारार्थ झाले तर उलट केसरीचेच चार पैसे केव्हां केव्हां खर्च झाले असतील. आपल्या कामाला मदत झाली म्हणून पैशानें उपकाराची फेड करणारा सधन वर्ग तरी महाराष्ट्रांत कोणता ? संस्थानिक, उमरावमराव, सरदार, जहागीरदार. हे १८९७ पासून लो. टिळकांच्या वाऱ्यालाही उभे राहत नसत. मग ते केसरीला द्रव्यसाहाय्य करणार ही गोष्ट दूरच ! १८८२ सालीं कोल्हापूर महाराजांचा पक्ष उचलून धरून लो.टिळकांनीं व आगरकरांनीं स्वतः तुरुंगवास सोसला. पण केसरी-मराठा पत्रांच्या डिफेन्सला कै. शिवाजी महाराजांच्याविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्या संस्थानिकांनीं मदत केली नाहीं. त्या खटल्याला वर्गणी मिळाली ती इकडच्या सामान्य लोकांकडूनच. केसरींतून नेहमीं संस्थानिकांची तरफदारी ब्रिटिश सरकाराविरुद्ध केली जाई. पण त्या कामीं एक पैदेखील इकडे तिकडे आला नाहीं हें आम्ही निश्चयात्मक जाहीर रीतीनें सांगतों. शिवाजीराव होळकरांनी आपले ठिकाणीं लो. टिळकांच्या गुणांची पुष्कळ चहा केली असेल; कारण महाराजांच्यामध्येंहि एक प्रकारचा देशाभिमान होता हें प्रसिद्ध आहे. तथापि त्यांनीं केसरीला कधीं एक पैचाहि आश्रय दिलेला नाहीं. १८९३-९४ च्या बडोदें प्रकरणांत केसरीनें सयाजीराव महाराजांची बाजू चांगलीच उचलून धरली होती. पण त्याचा मोबदला फक्त परस्पर आदरबुद्धींतच होता. कदाचित् कोणाला एकाच गोष्टीचा या संबंधांत उल्लेख करतां येईल. ती म्हटली म्हणजे महाराजसरकारांनीं लो. टिळकांना, म्हणजे पर्यायानें केसरीला, हल्लींचा गायकवाडवाडा दिला. परंतु तोहि खरेदीच दिला ही गोष्ट कित्येकांना खरी वाटत नसली तरी अगदीं अक्षरशः खरी आहे. कारण केसरीच्या प्रस्तुत संपादकांनीच स्वतः बडोद्यास जाऊन या वाड्याच्या पावतीची किंमत पटविली होती. या विषयीं सरकारी पोलिटिकल खात्यालाहि प्रथम संशय होता. पण तो पूर्ण चवकशीअंतीं फिटून गेला. वाडा विकण्या-पूर्वी सरकारी इंजीनियरांनीं त्याची किंमत केली तीत गवलन म्हणून कदाचित हजारपांचशें रुपयें महाराजांनीं मनानें सोडले असले तर ते त्यांच्या मनालाच टाऊक. पण त्या वेळीं पुण्यांत जागा व इमारती यांना फारशी किंमतच नव्हती. प्लेगमुळें शेकडों घरें ओस किंवा बिनवारशीं राहिलीं होतीं. ती अशीं कीं, घरपट्टी वगैरे म्युनिसिपल कर भरण्यास कुळ जागेवर नाहीं म्हणून दिवाणी हुकूमनामे मिळवून म्युनिसिपालिटीला घरांचे लिलाव करावे लागले. आज गायकवाडवाड्याची किंमत अर्थात् त्या वेळेपेक्षां पुष्कळ अधिक आहे. परंतु तो घेतल्यापासून आजतागायतपर्यंत, पूर्वी टिळकांचे व त्यानंतर टिळकांच्या चिरंजीवांचे व केसरी-मराठा ट्रस्टचे मिळून कमीत कमी लाख-पन्नास हजार रुपये—त्यांतल्या नव्या इमारती किंवा रिपेरी वगैरेसाठीं खर्ची—पडले आहेत हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सहदेवराव पिंपळे

नारायणराव पिंपळे

पितापुत्र टाईपपंच मेकर

कृष्णा सकपाळ

केसरीचे मूळपासूनचे प्रिंटर



फाउंडरी कामगार

[हें फाउंडरी खातें रा. महादवा मांडवकर यांचे देखरेखीखालीं आहे]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



टाईप फाउंडरी नं. १

[केसरी मराठ्याला लागणारा टाईप या यंत्रावर पाडण्यांत येतो]



टाईप फाउंडरी नं. २

[हे कामगार टाईप जुळवून कापीत आहेत]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



येथें पेपर मोल्ड (मेट्रिस) तयार होत आहेत



केसरी छपाईचे नवें यंत्र (रोटरी)



केसरीचें रोटरी यंत्र चालविणारें ऑइल इंजिन

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative





करेक्टर मंडळी (प्रुफं तपासणार)



येथें मोल्डमध्यें स्टिरिओ मेट्रिस लावीत आहेत.

राजगुरु प्रेस, पुणें.
CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



येथें स्टीरिओ ओतण्याचें काम चालू आहे.



येथें चिपिंग (स्टीरिओच्या कडा तासून साफ) करण्यात येत आहेत.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हे कामगार टाईप घाशीत आहेत



केसरी मराठा—कंपॉझिटर्स

ही खातीं रा. ग्यानबा चादगुडे व रा. विष्णुपंत जोग याचे देखरेखीखालीं आहेत

राजगुरु प्रेस, पुणें.]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



येथें केसरीचे कोऱ्या कागदाचे गठ्ठे (रीळ) साठविले आहेत



येथें रोटरी यंत्रावर केसरीचा कागद लाविला जात आहे

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



रोटरी यंत्र सुरु असून छापून घड्या पडत आहेत.



मशीनचें वर्णन.



लोकमान्य टिळकांनीं विलायतेस असतांना तेथून लिहून पाठविलेलें यंत्राचें वर्णन (त्यांचे हस्ताक्षरात)

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



केसरीचें जुनें डबल फिडर यंत्र.

मराठा छापण्याचें यंत्र.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

येथें केसरीवर पत्ते लावून डाक तयार होत आहे



पोष्टाच्या लॉरींतून केसरीच्या अंकांची पोतीं नेत आहेत

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरी--मराठा संस्थेचे नियम

केसरी–मराठा ही आतां एक संस्था झाली आहे. ती कोणाची खासगी मालकीची मिळकत नाहीं. अर्थात मुख्य संपादकापासून सामान्य कामगारापर्यंत सर्वच संस्थेचे नोकर होत. यामुळें, तारतम्यानें कां होईना, त्यांचें परस्पर बंधुत्वाचें नातें आहे असें समजलें पाहिजे. आणि तसें समजून वागण्याचा प्रयत्न या संस्थेतील सर्व लोक करीत असतात. आतां या सर्व सेवक–बंधूंत सर्वच बाबतींत समता तंतोतंत असणें शक्य नाहीं. पात्रता, कर्तव्य विशेष, मुदतीच्या व कामाच्या दृष्टीनें जेष्ठ–कनिष्ठच काय, पण श्रेष्ठ–कनिष्ठ भाव हा थोडा असणारच. तथापि नोकरीच्या नियमांची सामान्य तत्त्वें सर्वांना सारखींच लागू करण्यासाठीं या संस्थेंत नोकर वर्गाकरितां कांहीं नियम करण्यांत आले आहेत ते खालीं देत आहों. त्यांवरून या संस्थेत नोकर लोकांना कसें काय वागविण्यांत येतें हें कळून येईल.

खालील नियम १९२८ सालीं प्रथम लिहिण्यांत आले. तथापि त्या सालापूर्वीहि दाखल झालेल्या सर्व कायम नोकरांना त्यांचा फायदा देण्यांत आला आहे.

(१) नोकरीचे नियम

नोकरांच्या नोकरीबाबत म्हणजे पगार, काम, बढती, बडतर्फी वगैरेबाबत हुकूम करण्याचा व कायम निकाल देण्याचा अधिकार ट्रस्टींनाच आहे. नोकरीच्या नियमांचा फायदा फक्त कायम नोकरांनाच मागण्याचा हक्क आहे. नोकर नालायक ठरल्यास त्याला नोकरीची मुदत भरण्यापूर्वीहि कमी करतां येईल, किंवा कमी करण्यापूर्वी दुसरें एखादें काम करण्याची संधि व त्या कामाप्रमाणें योग्य तो पगार देण्यांत येईल. संपादकीय खात्यांत पूर्ण नोकरीची मुदत २५ वर्षे व इतर खात्यांत ३० वर्षे ठरविली आहे. या मुदतीनंतर नोकराला स्वतःच्या इच्छेनें वाटेल तेव्हां नोकरी सोडतां येईल. तसेंच या मुदतीनंतर ट्रस्टींनाहि नोकराला नोकरीवरून जाण्यास सांगतां येईल. नोकरीची मुदत पुरी झाली असल्यास, किंवा नोकरीची पुरी ठराविक मुदत संपण्यापूर्वी ट्रस्टींच्या संमतीनें नोकरी सोडल्यास, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी वगैरे बाबतींतले सर्व फायदे नोकराला हक्कानें यथाप्रमाण मिळतील. संपादकीय शाखेकडील नोकरांना ट्रस्टीस योग्य वाटेल त्याप्रमाणें निवडणुकी, सार्वजनिक वर्गण्या, किंवा मतप्रसारार्थ गांवगन्नां प्रवास वगैरे बाबतींतला खर्च देण्यांत येईल. नोकरांच्या पगारावर इन्कम्-टॅक्स बसल्यास तो संस्थेच्या पैशांतूनच देण्यांत येईल.

(२) रजेचे नियम

कायम नोकरांना सामान्यतः वर्षांतून एक महिना हक्काची रजा व वीस दिवस पर्यंत किरकोळ रजा ही पगारी दिली जाईल. तसेंच तीन वर्षांत मिळून तीन महिनेपर्यंत, योग्य सर्टिफिकेट असेल तर, आजारीपणाकरितां निंमे पगारी रजा देतां येईल. याहून अधिक रजा लागेल ती बिनपगारी घ्यावी; पण केव्हांहि ती एक वर्षाहून अधिक देतां येणार नाहीं. कोणतीहि रजा देणें ती कामकाजाची सोय पाहूनच देण्यांत येईल.

(३) प्रॉव्हिडंट फंडाचे नियम

प्रत्येक कायम नोकराकडून त्याच्या पगारांतून दररुपयास १ आणा इतकी रक्कम कापून घेतली जाईल व तितकीच भर दरमहा संस्थेच्या पैशांतून घालण्यांत येईल. त्या दोनहि प्रकारची मिळून रक्कम दरमहिन्यास नोकर व मॅनेजर यांचे नांवें संयुक्त खातें घालून बँकेंत ठेवण्यांत येईल; व त्यावरील आदा होणारें व्याज त्याच खात्यांत जमा करण्यांत येईल. नोकराच्या खातीं जमलेल्या प्रॉव्हिडंट फंडाच्या रकमेवर नोकरास स्वतंत्र रीतीनें कोणताहि बोजा उत्पन्न करतां येणार नाहीं. व तसा केल्यास तो संस्थेकडून मानला जाणार नाहीं. निदान ५ वर्षे नोकरी केल्यानंतर केव्हांहि नोकरानें नोकरी सोडल्यास त्याला प्रॉव्हिडंट फंडाची जमलेली सर्व रक्कम मिळेल. दुर्वर्तनादि विशेष कारण घडल्यास नोकराला त्याचे पगारांतून कापून घेतलेली सर्व रक्कम अर्थातच मिळेल. पण भरीस घातलेली संस्थेची रक्कम देणें न देणें हें ट्रस्टींच्या मर्जीवर राहील. प्रॉव्हिडंट फंडाच्या रकमेवर योग्य कारणास्तव नोकराला कांहीं प्रमाणांत कर्ज देण्यांत येईल. नोकरीची मुदत पुरी झाल्यावर प्रॉव्हिडंट फंडाची सर्व रक्कम नोकराला मिळेल. किंवा आधींच नोकर मयत झाल्यास, यांच्या हिशेबीं निघेल ती रक्कम त्याच्या अधिकृत वारसास देण्यांत येईल.

(४) ग्रॅच्युइटीचे नियम

कायम नोकरांना नोकरीवरून जातांना ग्रॅच्युइटीची म्हणून आणखी कांहीं वेगळी रक्कम मिळेल. म्हणजे नोकरीचीं जितकीं पुरीं वर्षे झालीं असतील त्या प्रत्येक वर्षाला, नोकरास नोकरी सोडून जातांना मिळत असलेल्या पगाराच्या अर्ध्याइतकी रक्कम जमेस धरून एकंदर हिशेब केला जाईल. प्रॉव्हिडंट फंडाप्रमाणें ग्रॅच्युइटीची रक्कम स्वतः नोकराला अगर त्याच्या अधिकृत वारसासहि देण्यांत येईल.

एजन्सी खातें

दोन वर्षांपासून केसरीनें बाहेरगांवीं आपले एजंट नेमून त्यांच्याद्वारें केसरीचे अंक वर्गणीदारांना व इतरांना वाटण्याची व्यवस्था केली आहे. ही नवी व्यवस्था करण्याचे दोन हेतु आहेत. (१) जेथें रेल्वेपार्सल किंवा मोटारपार्सल पाठवितां येतें तेथें किरकोळ अंक विकत घेणारास ते मिळूं शकतात. आणि (२) टपालानें अंक जाण्यास जो उशीर होतो तो शक्य तितका वांचतो. एजन्सी दिल्यापासून एकंदरीनें स्वल्प कां होईना पण केसरीचा थोडासा तोटाच होतो व खटपट वाढते. पण अंक लवकर वाचावयास मिळणें हा बाहेरगांवच्या लोकांना जसा एक मोठा लाभ तसाच तो त्या दृष्टीपुरता केसरीलाहि लाभच आहे. म्हणून किंचित कसर सोसूनहि ही व्यवस्था आम्हीं सुरु केली. तसेंच आगगाड्यांच्या वेळा सांभाळून पार्सलें पाठवितां यावीं याकरितां केसरीचा मजकूर पूर्वीहून अधिक लवकर तयार करून छापून घेण्याची व्यवस्था केली आहे. यामुळें पुण्याप्रमाणें बाहेर अनेक व दूरदूरच्या गांवींहि केसरी मंगळवारचा मंगळवारीं व शनिवारचा शनिवारीं वाचकांच्या हातीं पडतो. आणि ही व्यवस्था लोकांना पसंत पडून त्यांची सोय झाल्यांचीं अनेक पत्रें आमचेकडे आलीं आहेत.

महाराष्ट्र, कर्नाटक, वऱ्हाड, मध्यप्रांत यांतील शहरीं व संस्थानांतील मोठमोठ्या गांवीं केसरी रेल्वे पार्सलनें पाठवून तेथें वर्गणीदारांस अंक वांटण्याची व शिवाय किरकोळीनें अंकविकण्याची व्यवस्था जुलै १९२८ पासून करण्यांत आली. त्या पूर्वी फक्त मुंबई व आणखी दोनतीन ठिकाणींच रेल्वेनें अंक पाठविले जात असत. सदर व्यवस्थेमुळें पुणें ते बेळगांव, पुणें ते सोलापूर, विजापूर, गदग, पुणें ते मुंबई, बडोदा, नाशिक, धुळें, जळगांव, भुसावळ वगैरे ठिकाणीं ज्या दिवसाचा केसरी त्याच दिवशीं मिळतो व हुबळी, धारवाड, गोवा, वऱ्हाड, नागपूर, इंदोर व ग्वाल्हेर येथें दुसऱ्या दिवशीं सकाळीं मिळतो. ह्या व्यवस्थेला आरंभ केला तेव्हां एजंटांची संख्या १७।१८ होती. आज ती संख्या जवळ जवळ ६० पर्यंत गेली आहे. सर्व ठिकाणच्या एजन्सी चांगल्या चालल्या आहेत.

एजंटांकडे जाणाऱ्या अंकांचीं रेल्वे--पार्सलें फक्त पुण्याहून रवाना होतात. बाकी एजन्सीचे बाबतींतील सर्व व्यवस्था, म्हणजे पत्रव्यवहार करणें, बिलें करणें, पैसे वसूल करणें वगैरे सर्व कामें श्री. प. वि. महाजन, कल्याण यांजकडे सोंपविण्यांत आलीं आहेत, व गेलीं अडीच वर्षे त्यांनीं हें काम उत्तम प्रकारें केलें आहे.

केसरीचे ठिकठिकाणचे एजंट

मुंबई व महाराष्ट्र

मुंबई ते विरार—बागवे आणि मंडळी
कुर्ला—रा. अ. डोंगरे, आनंदभुवन.
ठाणें—गो.ग. जोशी, उल्हास ट्रेडिंग कं.
कल्याण-सबनीस, सार्वजनिक वाचनालय.
भिवंडी—गो. चिं जोशी.
पनवेल—द. म. नवरे.
डोंबिवली—शं. र. केतकर.
सातारा—गोडशे, प्रकाश कचेरी.
कऱ्हाड—म. भा. थोत्री.
वांई—गं. के. सोहोनी, वैराज स्टोअर्स.
बेळगांव—वि. दा. केळकर.
धारवाड—हुकेरी, स्टूडंट बुकडेपो.
हुबळी—अ. मं. दळवी.
बारामती—बा. स. नगरकर.
अहमदनगर—ऊ. ग. निसरगंड
संगमनेर–राहुरी—म. ल. जोशी.
पुणतांबें—ल. द. सहस्त्रबुद्धे.
कोपरगांव—द. वा. जोशी.
येवला—भाटवडेकर, राष्ट्रीय शाळा.
मालेगांव—कि. श्री. जुन्नरकर.
नाशिक—मिठसागरकर, किताबखाना.
चाळिसगांव—न. ज. फासे.
जळगांव—बा. ग. भावे.
भुसावळ—जोशी, C/o भागवत मंडळी.
अमळनेर—पुं. दा. पाठक.
धुळें—वि. आ. किल्लेदार.
नंदुरबार—उपासनी ब्रदर्स.
पंढरपूर—करकरे, भाटवडेकर कं.
बार्शी—द. वि. मुळाखे.
सोलापूर—भागवत, हनुमान स्टोअर्स.
विजापूर—आपटे, विजापूर स्टोअर्स.
बागलकोट—पर्वतीकर, कर्नाटक इंक कं.
गदग—आर. के. असुंडी.
गोवा—दत्ताराम के. मंत्रवादी, म्हापसें.

वऱ्हाड व मध्यप्रांत

खामगांव—वा. बा. नेरकर, सराफा.
अकोला—गो. कृ. चितळे.
मूर्तिजापूर—न. मो. पंडित.
उमरावती—द. रा. सरदेशपांडे.
यवतमाळ—ल. गो. काशीकर.
वर्धा—चिं. म. काळे सन्स.
नागपूर—मारुळकर, वॉकर रोड.
हिंगणघाट—तय्यबअल्ली बर्यावाले.
बऱ्हाणपूर—जोखीलाल, बाबाशेठ
कारंजा—वा. न. मोरे.
मलकापूर—वाय. व्ही. सावजी.

संस्थानें

सांगली–मिरज—स. आ. कुलकर्णी.
कोल्हापूर—ब. त्र्यं. लुकतुके.
अक्कलकोट—ऊ. म. श्रीगोंदेकर.
बडोदा—सरदेसाई कं., रावपुरा.
इंदोर—पसरणीकर सें. इं. मॉ. बुकडेपो
ग्वाल्हेर—मे. कुंटे ब्रदर्स, जनकगंज.
उज्जैन—अं. वा. वेडेकर.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरीसंस्थेचे अवांतर उद्योग

केसरी संस्थेनें आजवर वर्तमानपत्रें चालविण्यापेक्षां अवांतर उद्योग, कारखानदारीच्या स्वरूपाचे असे, विशेष केले नाहींत. तिनें स्वत:चे असे ग्रंथ फारच थोडे प्रसिद्ध केले, व केलेल्यांपैकीं स्वत:च्या छापखान्यांत कंपोज करून छापले असे त्याहून थोडे. गेल्या दहा वर्षांत केसरीसंस्थेनें टिळकांच्या केसरींतील लेखांचे चार खंड प्रसिद्ध केले. पण ते सर्व बाहेर छापून घेतले. केसरीसारसंग्रह (केसरीचें छोटें फाईल) हें पुस्तक केसरींतीलच कांहीं निवडक लेखांचें पुनर्मुद्रणात्मक असल्यामुळें तेथेंच तें केसरीच्या छापखान्यांत छापणें अर्थातच सुलभ असतें. तें आज तीन वर्षें छापलें जात आहे.पुस्तकछपाईचा एक प्रयोग म्हणून रा.स.वि. बापट यांच्या 'टिळकांच्या आठवणी व आख्यायिका' या ग्रंथांचा एक खंड केसरी छापखान्यानें, रीतसर छपाईचा आकार घेऊन, छापून दिला. पण मतप्रसाराच्या दृष्टीनें केसरी छापखान्यांत शुद्ध पंचांग मात्र छापून दिलें जातें. त्यांची हकीकत थोडक्यांत अशी:—

शुद्धपंचांग

सांप्रत बहुतेक सर्वच रूढ असलेल्या ग्रहलाघवीय पंचांगांतील गणित स्थूलमानाचें असतें. त्यामुळें अयनाशांत वाजवीहून सुमारें पावणेचार अंश अंतर अधिक पडलें आहे. आणि इतर बाबतींतहि पंचांगांचा दृक्प्रत्यय येत नाहीं. यास्तव पंचांगगणित सूक्ष्म व शुद्ध करावें असा विचार कै. केरुनाना छत्रे यांच्या वेळेपासून पुढें येऊं लागला. कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं त्यासंबंधीं कांहीं विचार आपल्या भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांत प्रकट केले; पण ते सायनवादी असल्यानें त्यांनीं ग्रहलाघवीय पंचांग सुधारणेच्या बाबतींत विशेष लक्ष घातलें नाहीं. कै. व्यंकटेश बापूजी केतकर यांनीं शके १८०० च्या वेळच्या अयनांशाला जुळणारें असें चित्रारंभस्थान घेऊन तेथून पुढें सूक्ष्म गणित करण्यासाठीं केतकी ग्रहगणितादि केलें आणि केतकी पंचांग शके १८२२ पासून चालू केलें. त्यानंतर मुंबईंत १९०४ सालीं राष्ट्रीय सभेच्या वेळीं कै. डॉ. भा. कृ. भाटवडेकर यांनीं पंचांगपरिषद भरविली; आणि त्या परिषदेंतून कांहींच निष्पन्न होणार नाहीं असें जेव्हां डॉ. भाटवडेकर यांना वाटूं लागलें त्या वेळीं त्यांनीं टिळकांना त्या परिषदेच्या कामांत लक्ष घालून पंचांग शुद्धीच्या कार्याला चालना देण्याविषयीं विनंति केली. त्या वेळेपासून लो. टिळकांचें लक्ष पंचांग शुद्धीच्या कार्याकडे वेधलें. परंतु त्यानंतरच्या राजकीय चळवळीच्या दंगलींत त्यांना या कार्याकडे लक्ष देण्यास फुरसतच मिळाली नाहीं.

पुढें टिळक मंडालेहून आल्यावर पं. रघुनाथशास्त्री बाबा पटवर्धन प्रभृति मंडळींनीं पुण्यास पंचांग परिषद भरविण्याचा बेत केला, आणि शके १८३९ च्या आश्विनांत पंचांग प्रवर्तन कमिटी स्थापन झाली. त्या कमिटीच्या विद्यमानें पुण्यास दुसरी पंचांग परिषद भरली, आणि तींत अयनगती शुद्ध घ्यावयाची, पण अयनांश पूर्वींचेच चालू ठेवावयाचे, असा ठराव झाला. त्या ठरावास अनुसरून शके १८४० पासून केसरी संस्थेमार्फत शुद्ध–निरयण पंचांगें छापवून प्रसिद्ध करण्यास सुरुवात झाली. शके १८४०, १८४१ व १८४२ या तीन सालचीं पंचांगें केसरी संस्थेच्या खर्चानें जगदीश्वर प्रेसमध्यें छापवून प्रसिद्ध करण्यांत आलीं. शके १८४१ च्या अखेरीस सांगलीस तिसरी पंचांग परिषद होऊन त्या परिषदेंत; जशी अयनगति शुद्ध घ्यावयाची त्याप्रमाणेंच त्या अयनगतीवरून येणारे शुद्ध अयनांशहि स्वीकारावयाचे असा ठराव झाला; आणि कै० केरुनाना छत्रे यांच्या वेळेपासून जो शुद्ध पंचांग चालू करण्याचा विचार उद्भूत झाला होता त्याला परिषदेची संमती मिळाली. या करितांच सांगली परिषदेहून पुण्यास परत येतांच लो० टिळकांनीं केरुनाना छत्रे यांचे चिरंजीव कोंडोपंत छत्रे यांना स्वदस्तुरचें पत्र लिहून कै० केरुनाना यांनीं आरंभिलेलें कार्य आज तडीस गेलें असें कळविलें. सांगलीच्या परिषदेंत झालेल्या ठरावास अनुसरून शुद्ध पंचांग तयार करण्यास करणग्रंथ पाहिजे म्हणून लगेच टिळकांनीं एक हजार रु. बक्षीस देऊं करून करणग्रंथ मागविला. आणि नागपूरचे श्री. के. ल. दप्तरी यांनीं तो ग्रंथ करून देण्याचें कबूल केल्यावरून त्यांच्याकडे तें काम सोपविलें. रा. दप्तरी यांचा ग्रंथ तयार झालेला पाहण्यास टिळक जगले नाहींत; तथापि त्यांच्या इच्छेस अनुसरून दप्तरी यांना त्यांच्या ग्रंथाबद्दलचें पारितोषिक केसरी संस्थेंतून देण्यांत आलें, आणि दप्तरी यांनीं तयार केलेला करणग्रंथ सुमारें तीन हजार रुपये खर्च करून केसरीसंस्थेंतून छापून प्रसिद्ध केला, सांगली–परिषद शके १८४१ मध्यें झाली तरी तत्पूर्वीच शके १८४२ चें पंचांग तयार होऊन गेलें होतें. यास्तव सांगलीच्या ठरावानुसार पंचांगें छापण्यास सुरुवात शके १८४३ पासून झाली. शके १८४३ ते १८४७ अखेर पांच वर्षें हीं पंचांगें जगद्धितेच्छु छापखान्यांतून छापून घेतलीं जात. पण शके १८४८ पासूनचीं पंचांगें केसरी छापखान्यांतूनच छापून घेण्याची व्यवस्था करण्यांत आली. पंचांगें कोठेंहि छापलीं तरी शके १८४० पासून पंचांग तयार करविण्याच्या व पंचांग छपाईच्या खर्चाची जबाबदारी केसरी संस्थेनें आपल्याकडेच घेतलेली आहे. हें पंचांग तयार करण्याला सुलभ साधन मिळावें म्हणून तिथिनक्षत्रादिकांच्या सुलभ सारण्या तयार करण्याचें काम सध्यां चालूं असून त्या सारण्या छापण्याचें कामहि केसरी संस्थेमार्फतच होईल. अशा रीतीनें पंचांग प्रवर्तन कमिटीच्या स्थापनेपासून शुद्ध पंचांगप्रसाराच्या कामाच्या खर्चाची जबाबदारी केसरी संस्थेनें आपल्याकडे घेतली आहे, व त्या कामीं आतांपर्यंत हजारों रुपये खर्च केलें आहेत.

गुजराथी केसरी

मतप्रसाराच्या दृष्टीनें केसरीनें दासबाबूंना 'फॉरवर्ड' पत्र काढण्याकरितां पंचवीसशें रुपये दिले. तसेंच 'गुजराथी केसरी' काढण्याचें कामीं चार-पांच हजार रुपये खर्चले. याचा हेतु गुजराथी भाषेतून प्रचलित विषयांवरील केसरींतील निवडक लेखांचें भाषांतर किंवा सारांश दर आठवड्यास प्रसिद्ध करावा असा होता. यासंबंधानें गुजराथी केसरीच्या पहिल्या अंकांत खालील आत्मनिवेदन आलें होतें—

एकराष्ट्रीयत्वाची वृद्धि होणें म्हणजे उपराष्ट्रीय सर्व भाषांचा एस्पेरेंटोप्रमाणें निर्गुण असा रांधा बनणें नव्हे. तर मग व्यष्टींची वृद्धि होऊन शिवाय समष्टीचीहि वृद्धि होणें ही गोष्ट कशानें घडते तर तोच जीवनरस वृक्षांच्या अनेक खांद्यांतून किंवा मनुष्यदेहाच्या अनेक अवयवांतून खेळत राहून अखेरच्या टोंकापर्यंत पोंचल्यामुळें. तोच दाखला घेऊन आम्ही असें म्हणतों कीं, नैसर्गिक रीतीनें हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची वाढ व्हावयाची तर आकांक्षारूपी एकच जीवनरस, पण तो निरनिराळ्या भाषांच्या धमन्यांतून, सर्व देशभर पसरला पाहिजे. सर्व हिंदुस्थानांत एकट्या हिंदी भाषेंतीलच वर्तमानपत्रें छापलीं व वाचलीं जातील तेव्हां तो सोन्याचा दिवस असेंहि आपण वाटेल तर म्हणूं! पण त्याच्या खालोखाल म्हणजे आजच्या स्थितीहून वरच्या दर्जाची सुधारणा म्हटली म्हणजे, तीच भावना व तेच विचार ज्या त्या प्रांतांतील भाषांच्या द्वारें प्रस्तृत होणें ही होय. हें कसें घडेल याची उदाहरणें द्यावयाचीं तर आम्ही असें म्हणूं कीं, मनोगताच्या दृष्टीनें स्वदेशमित्रम् हा तामीळप्रमाणेंच बंगालींतहि निघाला पाहिजे. आनंदबझार पत्रिका ही बंगालीप्रमाणें केरळ भाषेंतहि निघाली पाहिजे. मुंबईचा गुजराथी हा शिखांच्या गुरुमुखींतहि निघाली पाहिजे. तेज व वंदेमातरम् हीं पत्रें उर्दूप्रमाणेंच मराठींत निघालीं पाहिजेत. अभ्युदय व आज हीं पत्रें हिंदीप्रमाणें तामिलमध्येंहि निघालीं पाहिजेत. आंध्रपत्रिका ही उरीया भाषेंतहि निघाली पाहिजे. कानडींतील स्वदेशाभिमानी हा कानडीप्रमाणें सिंधींतहि निघाला पाहिजे. सिंधु, समाचार हा सिंधीप्रमाणें तेलगु भाषेंतहि निघाला पाहिजे. आणि ही अद्भुतरम्य कल्पना जर अप्रशस्त नसेल तर केसरी हा गुजराथींत आणि हिंदींत निघावा यांत लोकविलक्षण तें काय!

वरील इतर कल्पना अद्यापि गर्भकोषांतच गुरफटून राहिल्या असतील. केसरीनें मात्र हें कवच विदारण करून पूर्वीं हिंदी भाषेंत आपलें स्वरूप प्रगट केलें तसेंच तो आज गुजराथींत करीत आहे इतकाच काय तो फरक! यांत भाषावर्चस्वाची बुद्धि नाहीं, उपप्रांतीय स्पर्धा नाहीं, द्रव्यलोभाची बुद्धि नाहीं, तर स्वस्वरूप विस्ताराची सात्त्विक इच्छाच मुळाशीं असणार. पाणीदार घोड्याला कांटेलगामाचा जसा राग येतो, तसेंच तेजस्वी विचारांना भाषाबंधन दुःसह वाटतें. हें बंधन दूर होण्याला दुसऱ्यांना आपली भाषा शिकविणें हा एक मार्ग कल्पनागम्य असला तरी त्याहून अधिक सोपा व तूर्तातूर्तचा असा दुसराहि एक मार्ग आहे, व तो आत्म्यानें परकायाप्रवेश करावा त्याप्रमाणें एका भाषेंतील विचारांनीं दुसऱ्या भाषेंत शिरून तिचें रूप धारणहि करून तेथें आपला खेळ मांडणें हा होय. कोणत्याहि सरहद्दीवरील लोकांना लगतच्या दोन भाषा येत असल्यामुळें दोन–दोन प्रांतांतील वर्तमानपत्रें व मासिकें वाचण्याचें सुख त्यांना लाभतें. पण वर दर्शविल्याप्रमाणें अनेकविध वर्तमानपत्रें निघालीं असतां सरहद्दीवरील लोकांना मिळणारें हें सुख प्रांताच्या कोनाकोपऱ्यांत राहाणाऱ्या लोकांनाहि सहज मिळेल. केसरी गुजराथींत निघणें यांत स्वतःकेसरीची किंवा तो काढणारांची कोणत्याहि प्रकारें स्पर्धेची बुद्धि नाहीं हें आम्ही एकदांच सांगून ठेवतों; तर "बहुस्यां प्रजायेय" ही जी परब्रह्माची सात्त्विक इच्छा तीच, म्हणजे आपण अनेकविध व्हावें, अशीच सात्त्विक इच्छा या कामीं केसरीची आहे.

अशा प्रकारचे प्रयत्न वाङ्मयांत पूर्वीं होत आलेच आहेत. पण वाङ्मयांतील विषय चालू वादासंबंधानें नसल्यामुळें एका ग्रंथाचीं अनेक भाषांत रूपांतरें झाल्यास त्याचें कोणास वैषम्य वाटत नाहीं. पण वर्तमानपत्रांत चालू राजकारणाचा संबंध येत असल्यामुळें अविचारी मनाला अहंकारी स्पर्धेचा भास होण्याचा संभव. म्हणूनच हा इषारा आम्ही मुद्दाम देत आहों. कितीतरी बंगाली वाङ्मय ग्रंथांचीं भाषांतरें नित्य मराठींत होतात, व मराठी वाचक तीं आनंदानें वाचतात. त्यांत त्यांना आपल्या प्रांतावर दुसऱ्या कोणी स्वारी किंवा चढाई केली असें वाटत नाहीं. उलट रामदास किंवा तुकाराम यांचें भाषांतर हिंदींत झाल्यास हिंदी लोकांना वाईट वाटूं शकत नाहीं. लो. टिळकांच्या गीतारहस्याचीं भाषांतरें निरनिराळ्या देशभाषांतून होऊन त्यांना मागणी एकसारखी सुरू असते. येथेंहि 'टिळकांनीं अतिक्रमण केलें किंवा लुटारू मराठ्यांनीं आपल्या प्रांतावर स्वारी केली' असें कोणास वाटत नाहीं व वाटून या ग्रंथाचे आड कोणी खंदक खणीत नाहीं. तर असलेल्या खंदकावर उलट सोईसवलतींचे पूल बांधून हातानें त्याचा आदर करून त्याला आपल्याकडे घेतात. आणि परप्रांतीय लोकांची जी भावना टिळकांच्या गीतारहस्याविषयीं, तीच लोकमान्यांच्या केसरीविषयींहि त्यांनीं उदारपणें ठेवावी अशी आमची त्यांना सविनय विज्ञप्ति आहे. बाजारांत एकाच जिनसाचीं दुकानें होतां होईतों एकाच ठिकाणीं बसावीं असेंच व्यवहारचतुर दुकानदारांना वाटत असतें. याहि दृष्टीनें गुजराथी केसरीला व्यवहारज्ञ असे त्याचे गुजराथी व्यवसायबंधु शेजारी बसवून घेण्याची इच्छा कां न धरतील? महात्माजींनीं नवजीवन हें सुंदर पत्र प्रथम गुजराथींत काढलें. नंतर तें हिंदींत चालू लागलें. त्यानंतर त्याचा प्रवेश मराठी भाषेच्या द्वारेंहि थोडा वेळ झाला. पण पुढें मराठी नवजीवन बंद पडलें ही गोष्ट वेगळी. नवजीवनाचा प्रचार अनेक भाषांतून करण्यांत जी सात्त्विक बुद्धि दिसून येते तीच गुजराथी केसरी काढण्यामध्येंहि त्याच्या चालकांची आहे, व या प्रतियोगी सहकारितेच्या प्रेमळ दृष्टीनेंच गुजराथी वाचकवर्ग गुजराथी केसरीकडे पाहील अशी आशा करितों.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरीची मालकी व संपादकीय धोरण

१८९१ सालीं टिळक हे केसरी व मराठा पत्रांचे एकटेएक मालक होईपर्यंत तीं समाईक भांडवल कंपनीच्या मालकीचीं होतीं. ही कंपनी प्रत्यक्ष रजिस्टर झाली नव्हती. खासगी भागिदारीची होती. पण आर्थिक भांडवलाप्रमाणें बुद्धीचें भांडवलहि समाईक होतें यामुळें या वर्तमानपत्रांच्या कामांत भांडणें झालीं. या भांडणांत राजकारणांतील मतभेद हें मुख्य नसून खरें भांडण सामाजिक सुधारणेच्या तत्त्वांविषयीं होतें. या मतभेदाचा इतिहास व त्यापासून मिळणारा बोध हे महत्त्वाचे असल्यामुळें त्याची हकीकत प्रथम देतों, व नंतर त्यापासून मिळणाऱ्या बोधाविषयीं लिहितों.

टिळक-आगरकर हे न्यू इंग्लिश स्कूलांत आले ते येतांना सामाजिक बाबतींतला आपला मतभेद आपल्याबरोबरच घेऊन आले. प्रथम हे मतभेद विकोपास गेले नाहींत. 'केसरी' हें एकच पत्र असलें तरी त्यांत लिहिणारे लोक अनेक आहेत हें सर्वांना कळून चुकलें होतें. वाचकवर्गाप्रमाणें लेखकवर्गहि सहिष्णु असून परस्परांच्या मताविरुद्ध कांहीं लेख केसरी—मराठ्यांत आल्यास त्याबद्दल त्यांना कागाळी करतां येत नसे, व ते करीतहि नसत. या सहिष्णुतेस एका शहाणपणाच्या योजनेनें चांगला वाव मिळाला होता. ती योजना अशी कीं, एखाद्या लेखकास एखाद्या विषयावर सर्वसामान्य अशा मतास सोडून जाणारे, किंवा अत्युत्कट, विचार व्यक्त करावयाचे असल्यास त्यानें ते आपल्या सहीवर लिहावे. किंवा सही न घातल्यास 'लिहून आलेला मजकूर' या व्यापक सदराखालीं ते छापावे. म्हणजे भाषा विचारसरणी यावरून लेख कोणाचा हें प्रायः वाचकांस उमजून येऊन स्वमतप्रकाशनाचें श्रेय व्यक्तिमात्रास मिळेल. शिवाय संपादकीय धोरणाला चित्रविचित्रत्वाचें किंवा चंचलतेचें दूषण लागणार नाहीं. माधवराव गोळे वगैरे गृहस्थ असे प्रच्छन्न लेख मोठ्या आवडीनें लिहीत. प्रायः केसरीशीं त्यांचीं मतें जुळणारी होतीं व न जुळत तेव्हां ते उपरिनिर्दिष्ट सवलतीचा फायदा घेत. पण गोळे हे केसरीचे संपादक केव्हांहि नसल्यानें त्यांना आपल्या मताचा हेका चालविण्याचा हक्कहि नव्हता.

पण आगरकरांची गोष्ट वेगळी होती. ते स्वतः संपादक असल्यामुळें, मतभेदाची अडचण त्यांना फार भासली. आपलीं मतें लिहावीं तर न्यू स्कूलांतील आपले समान अधिकारी लोक नाखुष होणार. त्यांचीं मतें लिहावीं तर ती गोष्ट स्वतःच्या विवेकबुद्धीला नापसंत. लिहून आलेला मजकूर म्हणून आपला लेख घालावा तर आपल्याच घरांत हवें तसें बसण्या-उठण्याच्या चोरीची लाज वाटावी. आणि स्वतःच्या सहीवर लेख प्रसिद्ध करावा तर स्वतः घरधनी असतां आपण आपल्यालाच भाडेकऱ्याप्रमाणें भाडेचिठी लिहून देण्याचा प्रसंग! न्यू स्कूलच्या मंडळींत सामाजिक बाबतींत प्रायः टिळकांच्याच बाजूचें बहुमत असे, आणि आगरकर हे केसरीचे संपादक होते तरी त्यांच्या एककली विचारांचा जाच इतरांना दुःसह होत असे, यामुळें आगरकरांना लवकरच पडतें घ्यावें लागलें.

१८८१ साल केसरीचें पहिलें व कौतुकाचें म्हणून निभावलें. शिवाय विष्णुशास्त्री हे सर्वांत वडील व प्रौढ असल्यानें त्यांचेंच धोरण चाललें. शास्त्रीबुवा व टिळक यांच्या दरम्यान सामाजिक बाबतींतहि फारसा मतभेद नव्हता. १८८२ साल कोल्हापूरप्रकरणाच्या धामधुमींत गेलें. परराज्याशीं लढाई सुरू असतां स्वराज्यांतील लोकांत बहुतकरून एकी नांदते ही गोष्ट अनुभवसिद्धच आहे. १८८३ साल कांहींसें स्वास्थ्याचें गेलें, व या सालीं 'न्हाणवलीचा शास्त्रदृष्ट्या विचार' 'धर्माज्ञा पाळण्याची मर्यादा' वगैरे विषय केसरींत आले तरी, रिपनशाहीचा ऐन अम्मल चालू असल्यामुळें, प्रातिनिधिक राजसत्ता, स्थानिक स्वराज्य, इल्बर्ट तिबिल, आयर्लंड वगैरे राजकीय विषयांनाच अधिक महत्त्व आलें होतें. 'न्हाणवली' या विषयावरील निबंधांत एवढेंच प्रतिपादन केलें गेलें होतें कीं, गर्भदानसंस्कार हा वैकल्पिक आहे, सूत्रांत प्रचलित पद्धतीचा गर्भदानसंस्कार दिलेला नाहीं, म्हणून तो संस्कार कमी केला तरी वैदिकधर्माविरुद्ध आचरण होत नाहीं. निदान पुण्यांत चालू असलेली न्हाणवलीची मिरवणूक बंद करण्यास तरी कांहींच प्रत्यवाय नाहीं. हा लेख टिळकांचा होता असें समजतें.

पण अशा विचारसरणीनें सुशिक्षितांत तट पडण्याचा संभव नव्हता. या विषयांवरील शेवटल्या लेखाच्या शेवटीं लेखकानें स्पष्ट सांगितलें आहे कीं, केसरीचें सामाजिक धोरण मध्यम प्रतीच्या उदारमतवादित्वाचें राहणार. केसरी लिहितो—"उगाच धर्माची उठाठेव करून लोकांचीं मनें दुखविण्याचा केसरीचा इरादा नाहीं. ब्रम्हसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरे भानगडींत तो आपण होऊन पडूं इच्छित नाहीं. तथापि व्यवहारावर लिहिणें आपलें कर्तव्य आहे असें त्यास वाटतें. म्हणून जेव्हां एखादी चाल निरर्थक व ग्राम्य असून तिचा धर्माशीं अज्ञानानें उगाच संबंध जोडलेला असतो (अशा चाली बऱ्याच आहेत व त्यांचा सवडीनुसार विचार करण्याचा आमचा मानसहि आहे.) तेव्हां त्यांतील बिंग बाहेर काढण्यास तो कधींहि मार्गे पुढें पाहणार नाहीं. मग तेवढ्याकरितां धर्मावर लिहावयास लागलें तरी हरकत नाहीं. गर्भदानासारखी शुष्क, निरर्थक, ग्राम्य व आपल्या हातांतील चाल जर आम्हास सोडवत नाहीं तर बालविवाह वगैरे घोर चाली कशा सुटणार! असल्या विषयावर निबंध लिहून त्याचें खरें स्वरूप लोकांपुढें आणणें हें केसरी आपल्या कर्तव्यांपैकींच समजतो. व मग त्यावर मनमुराद तोंड सोडण्यांतच ज्यांस पुरुषार्थ वाटतो ते आपली मनीषा यथावकाश, यथाशक्ति सुखेनैव पूर्ण करोत. केसरी आपले समजाप्रमाणें आपलें काम बजावील. " अनुहुंकुरुते घनध्वनिम् नहि गोमायुरुतानि केसरी।"

आमच्या मतें वरील लहानसा उतारा केसरीच्या सामाजिक व धार्मिक विषयांतील अनादि धोरणासंबंधानें फारच समर्पक आहे. तो असा कीं, सामान्य सुशिक्षित वर्गाच्या धोरणाप्रमाणेंच केसरीलाहि धर्मशास्त्र, रूढ अशा चालीरीति, आणि व्यवहार या सर्वांविषयीं तात्विक चर्चा करून व धर्मशास्त्राचें खरें शिक्षण देऊन उचित व्यवहाराची दिशा दाखविण्याची इच्छा होती; पण सुधारणेचें हें सर्व काम उपदेश व शिक्षण यांच्या सहाय्यानेंच केसरीला साधावयाचें होतें. हें कार्य करीत असतां एकांतिक मताच्या जुन्या पिढीशीं जरी केसरीला वाद घालावा लागला व टीका सहन करावी लागली तरी त्याला केसरीची तयारी होती; पण दुसरे पक्षीं ज्या कोणत्या गोष्टी केसरीस करावयाच्या नव्हत्या त्याहि स्पष्टपणें सांगणें जरूर आहे. उदाहरणार्थः— शिक्षण देऊन लोकांचीं मनें केसरीला उदार बनवावयाचीं होतीं. याचाच अर्थ, केसरीला उदारमतवादित्वाच्या सिध्यर्थ परक्यांची, विशेषतः सरकारी कायद्यांची वगैरे, मदत घ्यावयाची नव्हती. तसेंच धर्मचर्चा करून रूढी व शास्त्र यांच्यांतील मतभेद दर्शवून, सारासार विचार प्रवर्तित करण्याचा जरी केसरीचा इरादा होता तरी केसरीला नवीन धर्म किंवा धर्मपंथ स्थापन करावयाचे नव्हते, तर सनातन धर्माविषयींचा अभिमानच दृढ करावयाचा होता.

हीं मतें एकट्या टिळकांचींच होतीं असें नसून, न्यू स्कुलांतील बहुमत त्यांच्या बाजूचें होतें. पण आगरकर हे मात्र एकान्तिक मताचे अभिमानी आणि मनास रुचेल तें बोलणार अशा विनतोडीच्या मार्गाचे असल्यामुळें तेच तेवढे फुटून वेगळे पडत. १८८३ सालचें केसरीचें फाईल चाळलें असतां, सामाजिक किंवा ज्याला सुधारकी म्हणतां येईल अशा, अनेक विषयांवर निबंध प्रसिद्ध झालेले त्यांत आढळतील. परंतु १८८४ सालीं न्यू स्कूलच्या मंडळींतील सामाजिक मतभेदाची कुरबूर प्रथम बाहेर उमटूं लागली. त्याचें निमित्तकारण बालविवाहाच्या प्रतिबंधास सरकारी कायद्याची मदत घ्यावी कीं नाहीं, हा प्रश्न पुढें आला हें होय. मुंबईचे मलबारीशेट यांनीं अस्तिपक्षीं वाद सुरू केला; व सरकारदरबारीं त्यांचा प्रवेश असल्याळें सरकार कायदा करतें कीं काय अशी भीति खरोखरच लोकांना पडली; तेव्हां या वादास विशेष जोर आला. मलबारीशेटजींचें असें म्हणणें होतें कीं, "बालविवाह बंद होण्यास अल्पवयांत लग्न झालेल्या मुलाला युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस बसूं देऊं नये, तसेंच कोणत्याहि सरकारी खात्यांत त्याला नोकरी देऊं नये, व याच्याहि उपर सरकारनें कायदा करून ही चाल थांबवावी." या विषयावर केसरीला लिहिण्याची वेळ आली तेव्हां पंचाईत पडली. सुधारकवर्गांतहि एका बाजूस रानडे, कुंटे, मोडक तर दुसऱ्या बाजूस तेलंगप्रभृति मंडळी अशी दुही माजली.

सामाजिक मतांच्या दृष्टीनें पाहतां टिळक व आगरकर हे दोघे दोन टोकांस होते. आपटे हे आत्यंतिक समाजसुधारणेचे भोक्ते नव्हते. स्त्रियांच्या शिक्षणांत नृत्यकलेचाहि समावेश व्हावा, किंवा "रजसा शुध्यते नारी" असले विचार प्रदर्शित व्हावेत याविरुध्द उघड जाण्याइतके ते पुराणमताभिमानी, पण संमतिवयाचें बिल सरकारानें केल्यास त्यांत वावगें कांहीं नाहीं असें मानण्याइतके सुधारक होते. यामुळें केव्हां आगरकरांच्या बाजूला तर केव्हां टिळकांच्या बाजूला असे ते राहत. केळकर हे पुराणमतवादी मुळींच नव्हते, तथापि वर्तमानपत्रांतून मत प्रगट व्हावयाचें तें जुन्या मतांना धिक्कारून प्रगट होऊं नये, व सरकारानें तर धार्मिक सामाजिक बाबतींत हात घालूं नये असा त्यांचा उघड आग्रह होता. यामुळें सामाजिक मतभेदांत सोसायटीमध्यें आगरकर यांचा गट अल्पसंख्याक व टिळकांचा गट बहुसंख्याक असे.

हा सर्व प्रकार पाहून पुष्कळ लोक मोठ्या बुचकळ्यांत पडले. आगरकरांचीं मतें पाहावीं तर अशीं, टिळकांचीं अशीं, आपट्यांचीं अशीं. सोसायटींतील पक्षभेद पाहावे तों एका प्रकारचे, बाहेरचे पाहावे तों दुसऱ्या प्रकारचे. लोकांची समजूत अशी कीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या तहाहयात सभासदांच्या मालकीचीं किंवा मतांचीं केसरी व मराठा हीं पत्रें, आणि सोसायटींत तर रानड्यांचें वजन अधिक. आपटे देखील टिळकांचे पक्षपाती! तेव्हां हें सर्व गौडबंगाल आहे तरी काय! या शंकेला उद्देशून ता० २८ जून १८८७ च्या केसरींत संपादकांनीं खालील खुलासा केलेला आढळतो. "हल्लींच्या लाईफ मेंबरांत केसरी—मराठ्यांशीं संबंध नाहीं असे लोक आले (गोखले भानू वगैरे कीं काय!) त्या दिवशींच हीं दोन्ही पत्रें लाईफ मेम्बरांचें ऑर्गन (मत दर्शविणारीं) नाहींत असें झालें. लाईफ मेम्बरांपैकीं कांहींचा संबंध या पत्रांशीं आहे. एवढ्यावरून त्यांत येणाऱ्या लेखांची जबाबदारी सर्वांच्या माथ्यावर मारतां येत नाहीं." हा खुलासा आगरकरपक्षाच्या लोकांची कुचंबणा दूर करण्याकरितां घातला असावा हें उघड दिसतें. कारण अद्यापि केसरीचे प्रकाशक व एडिटर आगरकर अशी लोकांची बाहेर समजूत, व आंतील लेख तर सुधारकांविरुद्ध! शेवटीं ही कुचंबणा १८८७ च्या ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस एकदांची संपली. ता. २५ ऑक्टोबरच्या केसरीच्या अंकांत पाहिलेंच पांच ओळींचें स्फुट महत्त्वाचें आलें, तें असें "आजपासून रा० बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल्एल्. बी. हे केसरी पत्राचे प्रकाशक झाल्यामुळें, प्रकाशकत्वाची जबाबदारी त्यांच्याच शिरावर आहे. रा. गोपाळ गणेश आगरकर एम्. ए. यांच्यावर ती जबाबदारी राहिली नाहीं."

Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अशा रीतीनें आगरकर यांचा केसरीशीं ६।७ वर्षें असलेला संबंध कायमचा तुटला, व पुढें एक वर्षानें गोपाळराव गोखले यांच्या साह्यानें आगरकरांनीं 'सुधारक' हें पत्र काढलें. अजूनहि पूर्वीचे संबंध लक्षांत घेऊन, आगरकरांनीं स्वतंत्र वर्तमानपत्र काढून आधींच पण आंतल्या आंत असलेल्या दुहीला जाहीर रीतीनें जोर आणूं नये, वाटल्यास आपली सही घालून केसरींत मजकूर लिहावा, असें टिळकांचें म्हणणें होतें. पण तें म्हणणें आगरकरांना रुचलें नाहीं. एका अर्थानें आगरकरांचें म्हणणें बरोबर होतें. केवळ सामाजिक विषयावर मनाप्रमाणें निखालस एकान्तिक मतें लिहून, सुधारणाप्रवर्तन करणें हेंच जर आगरकरांनीं आपलें ध्येय ठरविलें असतें, तर स्वतःच्या सहीनें केसरींत एखादा–दुसरा लेख लिहून त्यांची हौस कशी भागणार? केसरींतील जागा स्वतः केसरीच्या संपादकासच आपल्या कामाला पुरेशी पडण्यासारखी नव्हती. फार तर दर अंकांत त्यांना आगरकरांच्या लेखास एकदोन कॉलमच जागा देतां आली असती; व कित्येक वेळां लेख मागें ठेवावा लागला तर आगरकरांचा त्याबद्दल गैरसमज होऊन त्यांना वैषम्यहि वाटलें असतें. शिवाय केसरी–मराठा हीं पत्रें जर डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्थेचीं म्हणून चाललीं असतीं तर, एखाद्या कॉलेज मॅगझिनमध्यें जसे अनेक लेखक आपल्या सहीवर निरनिराळे लेख लिहितात त्याचप्रमाणें, केसरी–मराठ्यांतहि सोसायटींतील निरनिराळ्या सभासदांचे लेख आपआपल्या सहीवर प्रसिद्ध होत राहिले असते. त्यांत कांहीं वावगें झालें नसतें. पण सोसायटीनें या पत्रांची मालकी व जबाबदारी केव्हांच झिडकारून टाकली होती. बरें, खुद्द सोसायटीच्या कामाच्या बाबतींत जरी सर्व सभासदांचें एकमत व रहस्य असतें, आणि वर्तमानपत्रांतील मजकुरापुरताच वाद असता, तरी टिळकांच्या सूचनेंत कांहीं स्वारस्य असतें. पण मतभेदामुळें आंत व बाहेर दोनहि ठिकाणीं सभासदांच्या मनाचें आभाळ फाटलें असल्यामुळें, टिळकांच्या सूचनेप्रमाणें आगरकरांनीं आपल्या सहीवर केसरींत लेख लिहिण्याचें कबूल करून एक एक ठिगळ जोडून कांहीं फारसा फायदा नव्हता. शिवाय टिळक आगरकर हीं दोनहि नांवें केसरीच्या वाचकांना प्रमाण व प्रिय वाटत असलीं तरी, एकाच अंकांतील शेजारशेजारच्या रकान्यांत अगदीं परस्परविरोधी सामाजिक मतें प्रतिपादन केलेलीं नित्य वाचून उडणारा घोंटाळा वाचकांनीं तरी किती दिवस सोसला असता ह्याचाहि संशयच आहे!

सामाजिक मतभेदामुळें प्रथम आगरकर हे केसरी सोडून गेले तसेच पुढें प्रो० वासुदेवराव केळकर हे मराठा सोडून गेले. रमाबाईसंबंधाचा वाद १८९१ च्या जून महिन्यामध्यें जाहीर रीतीनें सुरू झाला व या विषयावर टिळकांनीं केसरींत पांचचार लेख झणझणीत लिहिले. सुधारक, सुबोधपत्रिका वगैरे पत्रें सहजच पंडिता रमाबाईच्या बाजूचीं, किंवा विशेष सूक्ष्म रीतीनें बोलावयाचें तर रमाबाईशीं सहानुभूति दाखविणाऱ्या भांडारकर, रानडे प्रभृतींच्या बाजूचीं होतीं. पण त्यांत अकस्मात 'मराठा' पत्राचीहि भर पडली. सरकार व सामाजिक सुधारणा यांच्यासंबंधापुरते वासुदेवराव केळकर हे टिळकांच्याच मताचे होते; पण निवळ भांडारकर-रानडे यांच्यापुरता वाद उत्पन्न झाला तेव्हां, वासुदेवराव केळकर यांची सहानुभूति त्यांच्याकडे वळली, व मराठ्यांतून केसरीच्या धोरणाविरुद्ध लेख येऊं लागले. याचा फायदा प्रतिपक्षीयांनीं सहजच घेतला. ते म्हणूं लागले कीं, पहा मराठेकर्ते देखील केसरीकारांविरुद्ध! या मुद्यावर टिळकांनीं केसरींत खालीलप्रमाणें उत्तर दिलें, "आमच्या लिहिण्यावर पहिला आक्षेप असा आहे कीं, आमचीं मतें आमचे मित्र व बंधु यांच्याहून भिन्न आहेत. जणूं काय सर्व बंधूंचीं व मित्रांचीं मतें एक असावींत असा ईश्वरी संकेतच आहे! आमच्या बंधूचें मत निराळें होऊं नये अगर त्यांस कोणी गणेशटोपी घालूं नये याचा आम्ही कधींहि जिम्मा घेतला नाहीं. असुक एका मनुष्याचें मत भिन्न असलें म्हणजे तो आपला मित्र किंवा बंधु होत नाहीं, अशी ज्यांची कल्पना असेल त्यांनीं या गोष्टीस पाहिजे तितकें महत्त्व द्यावें. आमचें कुलव्रतच असें आहे कीं, हायकोर्टाच्या जज्जापासून तों (सुबोध) पत्रिकेच्या एडिटरांपर्यंत कोणाचीहि भीडमुर्वत न धरितां किंवा माझा बाप, काका, मामा, भाऊ, बायको, मुलगे यांचें अमुक मत आहे याचा विचार न करितां जें आपणांस खरें दिसेल तें सकारण लोकांपुढें मांडावें. आणि ईश्वराच्या कृपेनें केसरीकारांची प्रस्तुत अशी स्थिति आहे कीं, त्यास कोणाहि रावबहादुराची पर्वा न ठेवितां किंवा त्यापासून आपल्या अमुक एक संस्थेचें नुकसान होईल ही गोष्ट मनांत न आणतां लिहिण्यास मोकळीक आहे. अशा स्थितींत आम्ही आमच्या बंधूंप्रमाणें या विषयाचें गुळमुळीत केलें नाहीं हें साहजिक आहे."

मतभेदाची कंड इतकी पोचल्यावर कोणी तरी एकजण दोन्ही पत्रांचा मालक निदान संचालक व्हावा ही गोष्ट आवश्यकच झाली. केसरीच्या संपादक मंडळापैकीं क्रमानें टिळक व आगरकर व नंतर टिळक व वासुदेवराव केळकर यांच्यामध्यें तीव्र मतभेद कसे झाले, आणि केसरी–मराठा पत्रें आणि आर्यभूषण छापखाना यांची फारकत कशी झाली हें इतक्या विस्तारानें सांगण्यांत आमचा मुख्य हेतु एकच आहे. तो हा कीं, संयुक्त भांडवलाची पद्धति व्यापार व उद्योगधंदे यांना जरी अवश्य किंवा उपयोगी आहे, तशीच वर्तमानपत्रांच्या बाबतींतहि ती आवश्यक व उपयोगी ठरते. पण आवश्यकता व उपयोग कितीहि असला तरी ती हटकून यशस्वी होतेच असें मात्र नाहीं. जॉइंट स्टॉक कंपन्यांचा इतिहास लोकांना आतां विदितच आहे. तो थोडक्यांत असा. कोणी तरी एक कल्पक मनुष्य एखादी फायदेशीर व्यापाराची किंवा उद्योगधंद्याची कल्पना मनांत घेऊन निघतो, व प्रथम समान उत्साही अशा मित्रांची मदत घेतो. हे सर्व स्वतःचें थोडथोडें भांडवल घालतात. मग आपण हातीं घेतलेला उद्योग कल्पनेबाहेर फायदेशीर आहे असें लोकांना भासवून त्यांचें भांडवल ओढतात. पण लाभाच्या मोहाला बळी पडलेले हे इतर लोक मूळ कराराचे कागदपत्र वगैरे नीट पाहात नाहींत. मग कल्पनेप्रमाणें नफा न झाला म्हणजे भागांची किंमत कमी होते. बुडत्या जहाजांतून उंदरांनीं तोंडांत सांपडतील ते चार दाणे घेऊन पळून जावें त्याप्रमाणें, आपले भाग मिळेल त्या किंमतीला विकून कांहींजण मोकळे होतात, व उरलेले म्हणजे आळशी किंवा हताश झालेले उंदीर भागीदार जहाजाबरोबर समुद्राच्या तळाशीं जातात. मात्र जहाजांत कोठें काय सांठविलें आहे याची माहिती असणारे व पोहतां येणारे खलाशी हातीं लागेल तें घेऊन एखाद्या होडीवर चढून किनारा गांठतात त्याप्रमाणें जॉइंट स्टॉक कंपन्यांचे उत्पादक किंवा व्यवस्थापक हेच तेवढे अखेर बचावले जातात. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, भांडवलाचा संयुक्तपणा प्रारंभीं असतो तसा पुढें टिकत नाहीं. तीच गोष्ट संयुक्त बुद्धिभांडवलानें उभारलेल्या वर्तमानपत्रांची होय. विलायतेंत संयुक्त भांडवलाची पद्धति अधिक परिचित म्हणून तिकडे कदाचित् आपल्या इतके तंटे होत नसतील. याचें कारण, भांडवल संयुक्त असलें तरी कारभार एकतंत्री एका हातीं राहावा यांत कारखान्याचें यश सांठविलें असतें ही गोष्ट त्यांना पुरी माहीत असते. पण हें ज्ञान जेथें कमी पडलें तेथें वर्तमानपत्रांचे कारखाने नीट चालले नाहींत.

या सर्व भानगडीपासून बोध काय घ्यावयाचा हें सामान्य वाचकालाहि सुचेल. मग तो टिळकांसारख्या गृहस्थाला सुचला यांत नवल नाहीं. म्हणून त्यांनीं मतभेद होऊं लागतांच केसरी–मराठा पत्रें एका कोणाची तरी व्हावी असें ठरविलें, व इतरांपेक्षां मतप्रसाराची हौस अधिक म्हणून टिळकांनींच तीं आपल्या मालकीची करून घेतली. परंतु मालक एक असला नसला तरी, संपादकाला सल्लागार मंडळ नेमून देणें व त्याच्या सल्ल्यानें वर्तमानपत्र चालविणें ही गोष्ट शक्य नाहीं हें अजून टिळकांच्या अनुभवाला आलें नव्हतें. म्हणून त्यांनीं १९०९ सालच्या ब्रह्मदेशांत केलेल्या मृत्युपत्रांत, आपल्या गैरहजेरींत केसरी–मराठा पत्रांचें धोरण सुरळीत राहण्याकरितां म्हणून एक पांचसहा गृहस्थांचें सल्लागार मंडळ नेमून दिलें होतें ही गोष्ट तें मृत्युपत्र वाचणारांच्या लक्षांत येईलच. (पृष्ठ पहा) पण याहि गोष्टीचें वैयर्थ्य पुढें त्यांच्या लक्षांत आलें. तुरुंगांतून सुटून आपण परत जाऊं, व तोंपर्यंत वरील व्यवस्थेनें कांहीं घोटाळा झाला तर तो आपण यथावकाश दुरुस्त करूं असें टिळकांना कदाचित् वाटलें असावें. परंतु ते तुरुंगांतून परत आल्यावर या बाबतींत त्यांच्या मनानें सर्वस्वी उलट खाल्ली. ती अशी कीं, संपादकाला सल्लागार मंडळ नेमून देणें व त्यांचा सल्ला ऐकण्याचें बंधन त्याजवर घालणें ही सर्वस्वी चूक होय, ही गोष्ट त्यांनीं प्रस्तुत लेखकाजवळ एकदां स्पष्टच कबूल केली. ते म्हणाले, 'जहाजाच्या सुकाणूप्रमाणें वर्तमानपत्रांचें धोरण कोणा तरी एकाच व्यक्तीच्या हातीं जबाबदारीनें ठेवलें पाहिजे. मग तो तारो मारो बुडवो कांहींहि करो. तशी भीति दिसूं लागली तर लगेच मालकानें त्या संपादकाच्या हातून वर्तमानपत्र काढून घ्यावें, व आपल्याला योग्य वाटेल तो दुसरा कोणी संपादक नेमावा. पण जबाबदार संपादक एक आणि बेजबाबदार सल्लागारमंडळ दुसरें, अशी पायांत पाय घालण्याची योजना झाल्यास वर्तमानपत्र हटकून बुडालेंच पाहिजे. आणि या बदललेल्या मताचा पुरावा, विलायतेहून परत आल्यावर केसरी-मराठा पत्रांची जी व्यवस्था टिळकांनीं केली तींत दिसून येते. ब्रह्मदेशाहून परत आल्यावर त्यांनीं केसरीचें डिक्लेरेशन पुन्हां स्वतः केलें नाहींच, पण विलायतेहून परत आल्यावर केसरीसंबंधीं इतर जबाबदारीची व्यवस्था त्यांनीं सर्वस्वीं प्रस्तुत लेखकावर सोंपविली. कोणतीहि महत्त्वाची गोष्ट उपस्थित झाली असतां ते म्हणत कीं, "मला वाटल्यास सल्ला विचारा, सुचेल तो सांगेन. पण यापुढें जी व्यवस्था व्हावयाची ती माझ्या पश्चात् तुम्हांलाच अमलांत आणावयाची, म्हणून तुम्हींच काय वाटेल तें जबाबदारीनें व दूरवर विचार करून ठरवा." म्हणून त्यांनीं केसरीचें डिक्लेरेशन आपल्या हयातींतच समक्ष सांगून प्रस्तुत लेखकाकडून करविलें, व बेजबाबदार सल्लागारांचें कडें त्याच्या गळ्यांत अडकविलें नाहीं. आणि त्याप्रमाणें खुद्द टिळकांच्या हयातींत जे एक दोन नवीन तरुण उपसंपादक नेमले गेले ते प्रस्तुत लेखकानेंच आपल्या माहितीनें व जबाबदारीवर नेमले. आपल्या मागें आपलीं पत्रें किती दिवस जगतील किंवा चांगलीं चालतील या बाबतींत टिळकांचें मत काय असेल याविषयीं कोणीहि खुशाल आपलें मत हवेतसें चालवावें. परंतु वर्तमानपत्रें आपल्या पश्चात् चालावयाचीं तीं सर्वस्वीं एकाच्याच तंत्रानें चालावीं, मग तीं तो बुडवो किंवा टिकवो. तें पत्रांचें नशीब, हें टिळकांचे मत मत ठाम निश्चित होतें येवढें आम्ही सांगूं शकतों.

सन १९०२ नंतर टिळकांनीं केसरीच्या धोरणासंबंधानें जाहीर विवेचन केसरींतून फारसें केलेलें आढळत नाहीं. कारण १९०२ नंतर तसा प्रसंग कधीं आला नाहीं, व १९०८ पासून पुढें ते केसरीचे जबाबदार संपादक नव्हतेच. पण १९०२ सालीं केसरीच्या चार पानांचीं आठ पानें झालीं त्या महत्त्वाच्या प्रसंगीं टिळकांनीं केसरीच्या धोरणाचा कांहीं खुलासा केला होता त्यांतील उतारा मुद्दाम खालीं दिला आहे. एकतंत्री व्यवस्था व निश्चित धोरण यांचा लाभ केसरीला झाला व या दोन गोष्टींमुळें (अर्थात इतर कारणेंहि होतींच) केसरीच्या प्रगतीला फार मदत झाली.

"केसरीनें मराठी वर्तमानपत्रांच्या व वाचकांच्या अभिरुचीला वेगळी दिशा लावली. ही दिशा कोणती याबद्दल थोडेसें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. २० वर्षांपूर्वी इंग्रजी शिकलेल्या लोकांस वर्तमानपत्रांत एखादा लेख लिहिणें असल्यास तो इंग्रजींतच लिहावा वाटत असे. कोठेंहि उत्कृष्ट इंग्रजी लेख आले म्हणजे त्यांचें मराठींत भाषांतर करावें अशी त्या वेळची पद्धति होती. इंग्रजींतील लेख प्रधान व मराठींतील गौण अशी स्थिति असल्यावर, सदर लेखांच्या वाचकवर्गाची व्याप्तीहि इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या पलीकडे फारशी गेली नाहीं यात कांहीं नवल नाहीं. त्या वेळच्या व हल्लींच्या काळांत मोठा फरक म्हटला म्हणजे हा कीं, वीस वर्षांपूर्वी मराठी वर्तमानपत्रांतून लेख लिहिणारे प्रसिद्ध गृहस्थ आपले लेख मुख्यत्वेंकरून

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

इंग्रजी शिकलेल्या लोकांकरिताच आहेत असें समजत. आणि त्या वर्गास ते पसंत पडले म्हणजे आपलें काम झालें असें मानीत. पण त्याखेरीज त्या वर्गापलीकडेहि निवळ मराठी लिहितां वाचतां येणारांचा एक मोठा वर्ग आहे, व त्यांच्या हिताहिताची चर्चा आपणांस कर्तव्य आहे असा अलीकडे लेखकांच्या समजुतींत स्पष्ट बदल होत चालला. नुसत्या इंग्रजी शिक्षणानें हरएक बाबतींत एक प्रकारचा पूर्वापार परिस्थितीशीं विसंगत असा परकेपणा उत्पन्न होऊन इंग्रजी शिकलेल्या लोकांस त्याबद्दल थोडा अभिमानहि वाटत असतो. पण हा अभिमान पुष्कळ वेळां, इंग्रजी न शिकलेले पण समजूतदार असे जे लोक असतात त्यांच्यामध्यें व इंग्रजी शिकलेल्या लोकांमध्यें पूर्ण ऐक्य होण्यास आड येतो. ह्या अडचणी काढून टाकून पूर्ण इंग्रजी शिकलेल्या लोकांखेरीज इतर वर्गांचे म्हणणें काय आहे, त्यांचे कांहीं आक्षेप असल्यास ते संयुक्तिक आहेत कीं नाहींत हें, त्यांच्यापैकींच एक आपण आहोंत व आपणांस जो कांहीं उद्योग करावयाचा आहे तो त्यांच्या हिताकरितांच आहे आणि तो त्यांस बरोबर घेऊनच केला पाहिजे, अशा समजुतीनें पाहाण्याची किंवा त्याबद्दल चर्चा करण्याची केसरीनें सुरवात केली. निदान तसाच सरोस प्रघात पाडला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

"नवे विचार आणि नव्या गोष्टी लोकांस सांगतांना, त्यांना केवळ मूर्ख न मानतां युक्तीनें व धोरणानें नव्या जुन्याचा मेळ घातला पाहिजे, असेंच केसरीकारांचें स्पष्ट मत आहे. केवळ इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या विचारावर भिस्त न ठेवतां, समाजाचे हिताहित ठरवितांना मोठ्या वाचक वर्गाच्याहि समजुती जमेस धरल्या पाहिजेत. इतकेंच नव्हे तर योग्य असतील त्यांचें समर्थन केलें पाहिजे. अशा रीतीनें वागण्याचा केसरीकारांचा संकल्प आहे. मग कोणी निंदा करो कीं स्तुति करो!"

"राजकीय बाबतींत केसरीच्या धोरणासंबंधानें लिहितांना टिळकांनीं असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, "आम्हास कोणाचें राज्य घ्यावयाचें नाहीं. तर आमच्या लोकांची स्थिति सुधारण्याकरितां ह्यांच्या राज्यछत्राखालींच त्यांना तयार करावयाचें आहे; व हा जोंपर्यंत आमचा हेतु आहे तोंपर्यंत आम्हास कोणासहि भिण्याचें कारण नाहीं. केसरीचा जन्म झाला तो लिटनसाहेबांच्या कारकीर्दींत. मुद्रणस्वातंत्र्याचा कायदा झाला त्या वेळीं, राजकर्त्यांस गोड गोड न वाटली तरी कडू न वाटेल अशा तऱ्हेनें लेख लिहिण्याची पूर्वी पद्धति होती. पण तिची वेळ आतां गेली. लोकांत जागृति कळकळ व संघशक्ति उत्पन्न करणें हेंच वर्तमानपत्रकार या दृष्टीनें आमचें मुख्य कर्तव्य आम्ही समजतों. आम्ही केसरींत जे लेख लिहितों ते केवळ राज्यकर्त्यांकरितां नसून आमच्या मनांतले विचार, आमच्या मनांतील तळमळ, किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनांत उतरावी येवढ्याकरितांच आहे; व आमच्या लेखांचा जर असा परिणाम होत नसला तर आमचे श्रम फुकट गेले असें आम्ही समजूं, "किं कवेस्तेन काव्येन किं कांडेन धनुष्मतः। परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिरः" अशी जी एक संस्कृत उक्ति आहे तीच वर्तमानपत्रासहि लागू आहे."

केसरीचा व तुरुंगाचा ऋणानुबंध

केसरी–मराठा पत्रांशीं निरनिराळ्या वेळीं कमी–अधिक संबंध आलेल्या लोकांपैकीं बहुतेकांस राजकीय गुन्हेगार म्हणून तुरुंगवास घडलेला आहे. किंवा त्यांजवर खटले झालेले आहेत. ते कसें हें खालील यादीवरून दिसून येईल.

१ लो. टिळक–१८८२ चार महिने कैद, १८९७ दीड वर्ष सक्तमजुरी, १९०८ सहा वर्षें काळेंपाणी.

२ प्रो. आगरकर–१८८२ चार महिने कैद.

३ न. चिं. केळकर–१९०८ चौदा दिवस कैद व १२०० रु. दंड. १९२५ बासष्टशें रुपये दंड.

४ कृ. प्र. खाडिलकर–१९२८ तीन हजार रु. दंड. १९२९ एक वर्ष कैद.

५ ज. स. करंदीकर–१९२२ तीन महिने सक्तमजुरी.

६ दा. वि. गोखले–१९३० आठ महिने कैद.

७ ग. वि. केतकर–१९३० नऊ महिने कैद.

८ वा. कृ. भावे–१९०८ एकशेपस्तीस रु. दंड.

९ वामन मल्हार जोशी–१९०९ तीन वर्षें सक्तमजुरी.

१० पांडुरंग महादेव बापट–१९२३ सात वर्षें सक्तमजुरी.

११ डॉ. वि. म. भट–१९१० पांच वर्षें सक्तमजुरी.

या बाबतींत लो. टिळकांच्या मनाच्या मोठेपणाची म्हणून एक गोष्ट सांगण्याची ती अशी कीं, पूर्वी तुरुंगांतून सुटका होऊन बाहेर आलेल्या मनुष्यांचा म्हणजे राजकीय गुन्हेगारांचा, छळ सरकार फार करीत असे. त्याचा प्रकार असा कीं, त्यांच्यामागें पोलिसांचा ससेमिरा लावून द्यावयाचा. यामुळें कोणास त्याना मनांतून थारा द्यावासा वाटला तरी तसें करण्यास ते सहजच भीत. या कारणानें आधींच तुरुंगवासांतून यावें. व नंतर बेकार व्हावें, अशी आपत्ति पुष्कळांवर तेव्हां येई. म्हणून टिळकांनीं साधारणपणें असा क्रम ठेवला होता कीं राजकारणाच्या चळवळींत शिक्षा भोगून आलेला मनुष्य आपल्या साहाय्यक उपसंपादक मंडळांत घेऊन, त्याला कांहीं तरी काम मिळेपर्यंत असा इतर उद्योग लागेपर्यंत, त्याचा चरितार्थ चालवावयाचा. डॉ. भट, पांडुरंग महादेव बापट, वामन मल्हार जोशी हे गृहस्थ वरील प्रकाराचीं उदाहरणें होत.

संपादकीय शिक्षण

१९२१ सालीं असहकारितेची चळवळ सुरू झाली तेव्हां शाळा व कॉलेजें यांतील विद्यार्थ्यांनीं बाहेर पडण्यासंबंधीं कांहीं प्रयत्न झाला. ह्याप्रमाणें बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचा टिळक विद्यालयांतील शिक्षणक्रम संपून त्यांना टिळक विद्यापीठाच्या पदव्या दिल्यावर, त्यांना स्वतंत्र धंद्याचें शिक्षण देण्याकरितां, केसरी–मराठा संस्थेनें गायकवाडवाड्यांत संपादकीय शिक्षणाचा एक वर्ग काढून एक वर्ष चालविला व त्या कामीं पुष्कळ खर्च केला. परंतु असा वर्ग सतत आपल्या खर्चानें चालविणें ही गोष्ट केसरीच्या आवाक्याबाहेरची व तिची आवश्यकताहि तूर्त महाराष्ट्रांत नाहीं म्हणून तो वर्ग पुढें बंद करण्यांत आला. या वर्गांतून शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनीं पुढें वर्तमानपत्राचा धंदा केला व हैदराबाद सोलापूर जळगांव सातारा वगैरे ठिकाणीं त्यांनीं वर्तमान पत्रें चालविलीं.

कोणताहि गुण घेतला तरी त्याचें बीज उपजतच मनुष्याच्या अंगीं थोडेंबहुत असावें लागतें. तथापि पेरलेल्या बियाला जसें बाहेरून मुद्दाम खतपाणी दिल्यास त्याचा वृक्ष लवकर तयार होतो; किंवा त्याची छाटणी कापणी वेळचेवेळीं केल्यास त्याची वाढ सर्वांगीण होऊन शिवाय त्याला हवा तसा आकार देतां येतो, त्याप्रमाणें वर्तमानपत्राच्या धंद्यांत लागणाऱ्या गुणांचें आहे. जुन्या काळीं हा धंदा शिकविण्याच्या शाळा नव्हत्या. त्यांत जी माणसें उदयास आलीं तीं अंगच्या गुणांच्या जोरावरच आलीं. तथापि युरोप अमेरिका वगैरे खंडांत लोक शिक्षणावर भर देतात व त्याप्रमाणें वर्तमानपत्रांचा धंदा शिकविण्याच्या शाळा व कॉलेजें निघालेलीं आहेत. लंडन येथें हा धंदा शिकविणारें स्वतंत्र कॉलेज असून तेथें शिक्षणक्रम संपल्यावर परीक्षा घेऊन पदवी किंवा सनद देण्यांत येते. अमेरिकेंत तर या शिक्षणाचीं ३०-३२ कॉलेजें किंवा विद्यापीठेंच आहेत. शिवाय खासगी वर्ग अनेक असतात तें वेगळेंच. हें वर्ग सगळेच चांगल्या शिक्षकांनीं चालविलेले असतात असें नाहीं; तर त्यांत फसवेगिरी व भोंदूगिरी बरीच असते. बाहेर पाट्यांवर शिक्षणक्रमाचीं भडक वर्णनें असावयाचीं. उदाहरणार्थ, "या, आणि चारच महिन्यांत संपादक होऊन जा!" "वर्तमानपत्रांत चुसचुरु लिहा आणि आठवड्याला पांच पौंड मिळवा." इ. या वर्गांतून जाणारे उतावळे विद्यार्थी शेवटीं पैसे गमावून हात हलवीत डोकें खाजवीत बाहेर येतात. पण नामांकित संस्थांतून मिळणारें वर्तमानपत्री धंद्याचें शिक्षण चांगल्या दर्जाचें असतें: कोणचीही विद्या कितीहि मिळविली तरी तिला अखेर खरा कस अनुभवानेंच येतो ही गोष्ट खरी. पण अनुभव घेतां घेतां बनेल तसें किंवा काम पडेल तसें निरनिराळें साधन हाताळणें यांत पुढें जो वेळ जातो तो या संस्थांतून शिक्षण मिळविलें असतां वांचतो. म्हणजे जे विषय पुढें शिकावयाचे ते आधीं स्वस्थपणें व गुरुमुखानें शिकतां येतात. या संस्थांतील शिक्षण अर्थात् तात्विक स्वरूपाचें असतें. तथापि व्यवहारिक शिक्षणाचाहि भाग त्यांत थोडाबहुत ठेवलेला असतोच. धंदेशिक्षणाच्या शाळेंत विद्यार्थ्यांनीं शिकतां शिकतां तयार केलेलें जिन्नस बाजारांत विकले जाऊं शकतात व त्याला थोडीबहुत किंमतहि येते. वर्तमानपत्री धंदा शिकविण्याच्या शाळेंतील विद्यार्थ्यांकडून लिहून घेतलेले लेख, अग्रलेख, बातमीपत्रें ही प्रायः काल्पनिक विषयावरच असावयाचीं. म्हणून भातुकलींत केलेला स्वयंपाक मुलींचा मुलींनाच खावून टाकावा लागतो, प्रौढांच्या पंक्तीला तो वाढतां येत नाहीं, त्याचप्रमाणें या शाळेंतील विद्यार्थ्यांनीं लिहिलेले लेख स्वतः त्यांच्या किंवा शिक्षकांच्या करमणुकीनेंच परिसमाप्त होतात. तथापि हें व्यवहारिक शिक्षण सर्वस्वी फुकट जात नाहीं. तोंडचे हिशेब शाळेंत शिकतांना त्यावरून सौदे होत नसले तरी, पुढें प्रत्यक्ष बाजारांत त्याच हिशेबांचा उपयोग व्यवहारांत होतो. असो. लंडन येथील विद्यापीठांत वर्तमानपत्री धंदा शिकविण्याची शाखा आहे. तींत मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या १७ वर्षांवरच्या विद्यार्थ्यांना घेतलें जातें. शिक्षणक्रम दोन वर्षांचा असून त्यांत खालील विषय शिकवले जातातः—

(अ) निबंधलेखन.

(ब) टीका, तात्विक राजकारणाचा इतिहास, शास्त्रीय प्रगतीचा इतिहास,.

(क) इंग्रजी वाङ्मय, इतिहास, राजकारणशास्त्र, अर्थशास्त्र, प्रचलित युरोपियन भाषा, पदार्थ विज्ञानशास्त्र, मानसशास्त्र इ.

याशिवाय तोंडीही एक परीक्षा असते. व शास्त्रीय विषयांत प्रयोग करून दाखवावयाचे असतात. शिक्षण पुरें झाल्यावर परीक्षेंत पास होतील त्यांना दाखला किंवा डिप्लोमा देण्यांत येतो. अर्थात् हा स्वतंत्र विशिष्ट प्रकारचा धंदा असल्यामुळें सर्वसामान्य युनिव्हर्सिटीचें शिक्षण घेण्याला जितकीं मुलें जातात तितकीं इकडे येत नाहींत. कारण विद्यापीठांत मिळणारें शिक्षण वृक्षासारखें असून त्याला अनेक शाखा फुटतात व वर्तमानपत्री धंदा ही त्यांतलीच एक शाखा होय. पण दिवसेंदिवस इतर धंदे टाकून या धंद्याकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. गेल्या १०० वर्षांत वर्तमानपत्रांची वाढ विलायतेंत किती झाली हें लक्षांत घेतलें म्हणजे या धंद्याला वाढती बरकत कशी आहे, व त्यामुळें या धंद्याकडे लक्ष घालणाऱ्या तरुण लोकांची संख्या दिवसेंदिवस कशी व कां वाढत आहे हें कळून येईल. सन १७५३ सालीं एकंदर इंग्लंडमध्यें १२ महिन्यांत मिळून एकंदर वर्तमानपत्रांच्या अंकांची संख्या सुमारें ७५ लक्ष होती. पण आज एकटें 'लंडन डेली मेल' हें वर्तमानपत्र सुमारें चार दिवसांत इतके अंक काढून विकतें.

१८५४ सालीं 'लंडन टाईम्स्' या दैनिकाच्या प्रती सुमारें ५० हजार निघत. याहून अधिक नव्हत्या. इतर वर्तमानपत्रांतहि 'मॉर्निंग ॲडव्हरटायझर' ८ हजार,

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नॉर्निंग [illegible] ४ हजार, 'मॉर्निंग क्रॉनिकल' ३ हजार इतक्या थोड्या प्रती निघत. १९२६ मध्यें कोणत्याहि एका दैनिक वर्तमानपत्राच्या प्रती ७ हजारांहून अधिक खपत नव्हत्या. व सकाळीं निघणाऱ्या एकंदर आठ वर्तमानपत्रांच्या मिळून २० हजारांवर प्रती निघत नव्हत्या. तसेंच संध्याकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या पांच वर्तमानपत्रांच्या मिळून फार तर १५ हजार प्रती निघत.

१९२१ सालीं इंग्लंड व वेल्स मिळून १४५८, स्कॉटलंड २५४, आयर्लंड ५८६, व एकटें लंडन ४५१ इतकीं वर्तमानपत्रें चालू होतीं. म्हणजे विलायतेंत एकंदर वर्तमानपत्रांची संख्या सुमारें २५०० इतकी होती. व त्यांत फिरुन 'डेली मेल,' 'लंडन टाईम्स' अशासारखीं पत्रें आहेत. यावरुन एकंदर वर्तमानपत्रांच्या प्रती किती निघत असतील व वाचकांची केवढी मोठी संख्या ती वाचीत असेल याची कल्पना होईल. राजकारणाला वाहिलेल्यांपत्रांपैकीं सुमारें ८०, स्वतंत्र ६०, कॉन्झरव्हेटिव्ह ५० व नॅशलॅलिस्ट ८–१० अशी वर्गवारी पडते. शिवाय विशिष्ट विषयांना वाहिलेल्या वर्तमानपत्रांची संख्या अदमासें खालीलप्रमाणें आहेः--

धर्मविषयक	१२०
वैद्यक	८४
व्यापारविषयक...	८०
अर्थशास्त्रीय	८०
शिक्षणविषयक...	७८
एन्जीनियरिंग	७४
वाङ्मयात्मक	७०
सैन्य, आरमार मिळून	६२
संगीत	६०
मद्यपाननिषेध	६०
दर्या, वर्दी, व्यापार, वाहतूक	५७
खेळ व सामने...	५१
कायदा व आदलत	४६
सामाजिक छानछोकी	४०
मजूरवर्गविषयक	३९
शेतकी	३६
वास्तुविज्ञान	३४

यापुढील दहा वर्षांतील आंकडे पुढच्या वर्षी प्रसिद्ध होतील. पण वरील संख्येंत या अवधींत वाढच झाली असेल असें अनुमान सहजच काढतां येतें.

'वर्तमान–पत्र' मीमांसा

'वर्तमानपत्र' या नांवावरुनच त्यांतील मुख्य व अवश्य अंग कोणतें याचा बोध आपोआपच होतो. वर्तमान म्हणजे चालू स्थिती. वर्तमान याला 'वृत्त' हाहि एक समानार्थक शब्द आहे. वृत्त म्हणजे जें घडलेलें तें. पण वृत्त शब्दावरुन जसा मुख्यतः भूतकाळाचा बोध होतो, तसाच वर्तमान या शब्दावरुन मुख्यतः चालू काळाचा बोध होतो. अर्थात् या दोहोंपैकीं जें 'वर्तमान' त्यालाच ताजेपणा असल्यामुळें, वृत्तपत्र यापेक्षां वर्तमानपत्र हेंच नांव अधिक सार्थ ठरतें. पण हें अर्थांतच केवळ तात्त्विक विवेचन झालें. प्रत्यक्ष व्यवहारांत गतगोष्टी व भूतकालीन वृत्त यांचाहि समावेश होतोच, किंबहुना तो करावाच लागतो. कारण खरा खरा वर्तमानकाळ हा सुईच्या अग्राहूनहि निरुंद व बारीक असा आहे. एका सेकंदाचेहि जर १०० भाग पाडतां आले, तर एक शतांश सेकंद हाच कदाचित् खरा वर्तमानकाळ होईल. पण मनुष्याची आकलन शक्ती ही त्याच्या इंद्रियव्यापारावर अवलंबून असते; व मानवी इंद्रियव्यापारच इतका वेळ घेतातच कीं, गोष्ट घडणें आणि इंद्रिय व्यापारानें तिचें आकलन करणें यांत एक शतांश सेकंदच काय पण सेकंद दोन सेकंदहि जातात. म्हणजे गोष्ट घडली भूतकालांत व तिचें आकलन झालें वर्तमानकालांत असेंच केव्हांहि होणार. आणि मनुष्याच्या इंद्रियांसमोर प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टींची जर ही स्थिति, तर त्याच्यापासून जितक्या दूर दूर कोणत्याहि गोष्टी घडतील तितका अधिकाधिक काल त्या त्याला कळण्याला लागणार. आणि स्वतः त्यालाच कळण्याला जर कांहीं काळ लागणार, तर तीच गोष्ट तो कोण्या दुसऱ्याला कळवणार झाला तर आणखीहि अधिक वेळ लागणार हें उघडच आहे. मग भूतकालांत घडलेल्या गोष्टीला वर्तमान कसें म्हणावयाचें!

याचें उत्तर हेंच कीं, वर्तमान हा शब्द, ज्या कालीं गोष्ट 'घडलीं' त्या कालाचा खरोखर दर्शक नसून, गोष्ट ज्या कालीं 'समजली' त्या कालाचा वाचक होय. या दोहोंतील सूक्ष्म भेद समजून सांगण्याकरितां आपण एक प्रसिद्ध उदाहरण घेऊं! इजिप्तमधील राजघराण्याच्या थडग्यांत प्रेतें पुरलीं त्याला हजारों वर्षे लोटलीं. पण त्या प्रेतांबरोबर पुरलेल्या वस्तूंचीं कांहीं वर्णनें आपणाला प्रथम १९३० सालीं वर्तमानपत्रांत वाचावयास सांपडलीं असें समजूं या. उदाहरणांत, थडग्यांत पुरल्या जाण्याचा या वस्तूंचा काळ जरी हजारो वर्षांइतका जुना असला तरी आपल्याला त्या जोंपर्यंत अज्ञात होत्या, तोंपर्यंत त्या होत्या नव्हत्या या दोनहि गोष्टी आपणास सारख्याच नव्हत्या काय? पण ज्या दिवशीं त्यांचीं वर्णनें आपणाला वाचावयाला सांपडलीं त्या दिवशींच त्या आपल्याला ज्ञानगम्य झाल्या. पुरलेल्या वस्तु हजारों वर्षांच्या जुन्या, पण आज झालेलें त्यांचें ज्ञान हेंच आम्हाला ताजें! आतां या वस्तु सांपडल्याची बातमी इंग्लंडांतील लोकांना आमच्या आधीं दोन दिवस, व त्याच्याहि पूर्वी खुद्द इजिप्तमधील लोकांना आणखी दोन दिवस आधीं कळली असेल. या दृष्टीनें, म्हणजे दोन देशांतील लोकांच्या तुलनेनें, त्या बातमीचा ताजे शिळेपणा वाटेल तर मोजावा. पण ज्याला जेव्हां ही बातमी प्रथम कळली, तेव्हां ती त्याला ताजीच होती. एकाच मनुष्या संबंधानें बातमीचा ताजेपणा शिळेपणा मोजावयाचा तर मात्र असें म्हणता येईल कीं, ज्याला जी एकादि बातमी प्रथम कळली त्याला तीच फिरुन मागाहून कळली तर ती मात्र त्याच्या पुरती शिळी. अर्थात् 'वर्तमान' या शब्दाचा अर्थ प्रथम कळलेली म्हणून ताजी 'अशी जी बातमी' ती असाच केला पाहिजे.

बातमीचा मुख्य गुण गोष्ट घडण्याचा ताजेपणा नसून गोष्ट घडलेली कळण्याचा ताजेपणा होय. हा ताजेपणा म्हणजेच नवेपणा. नवेपणा हेंच नवलाईचें बीज होय. जुनी किंवा शिळी बातमी नवल उत्पन्न करूं शकत नाहीं. जशी एकादी कोटी तशीच बातमी. म्हणजे ती प्रथम ऐकावी तेव्हांच नवल वाटतें. पण फिरुन तीच ऐकली म्हणजे तिचें नवल वाटत नाहीं. नवल या शब्दांत नव म्हणजे नवीन हा मुख्य शब्द असून ल हा एक प्रकारचा प्रत्यय आहे; व तो प्रत्यय कार्यकारणभावदर्शक आहे. दुर्दैवानें बातमी या उर्दू शब्दाला समानार्थक असा एकादा संस्कृत शब्द रूढ नाहीं कीं, ज्यांत नव हा शब्द गर्भित किंवा बीजभूत आहे. रूढीनें नवल या शब्दाचा अर्थ मूळ कारणापासून सुटून कार्याकडे अधिक झुकलेला आहे. यामुळें नवल हा शब्द उच्चारला म्हणजे, घडणाऱ्या गोष्टीच्या नवीनतेचा बोध होत नाहीं असें नाहीं पण ती नवी गोष्ट ऐकून मनाला वाटणाऱ्या आश्चर्याचाच बोध त्या शब्दापासून अधिक होतो.

पण इंग्रजी भाषेंत News हा शब्द असा आहे कीं, बातमीच्या नवीनपणाचा बोध उत्पन्न करणारा New हा शब्दच News या शब्दात ग्रथित झालेला आहे. इंग्रजी New व संस्कृत नव हे शब्द एकच होत. नव हा संस्कृत शब्द लॅटिन व फ्रेंच या भाषांच्या द्वारें इंग्रजींत प्रविष्ट झाला आहे. आणि इकडे नव या शब्दाला परिणामार्थी 'ल' हा प्रत्यय लावण्यात येऊन नवल हा शब्द बनला त्याचप्रमाणें तिकडे New या शब्दाला S हा अनेक वचनार्थक प्रत्यय लागून त्यापासून विविधतेचा वैचित्र्याचा अर्थ उत्पन्न होतो.

News या शब्दाची अर्थव्युत्पत्ती दुसऱ्याहि एका रीतीनें केलेली पाहण्यांत येते. पण ती केवळ मौजेच्या दृष्टीनें, खऱ्या व्युत्पत्तीच्या दृष्टीनें नव्हे! ती मौजेची व्युत्पत्ती अशी कीं, News हा चार अक्षरीं शब्द असून त्यातील प्रत्येक अक्षर एकेक निरनिराळ्या दिशेचा वाचक आहे. म्हणजे N=North= उत्तर. E=East पूर्व. W West=पश्चिम. S=South. दक्षिण=अर्थात् News म्हणजे या चारीहि दिशांनीं म्हणजे चोहोंकडून आलेली बातमी यात बातमीच्या उगमांच्या क्षेत्र विस्ताराचें गमक आहे. व हल्लीं जगाच्या सर्व भागांतून आलेली बातमी. वाचावयास सांपडतेहि या दृष्टीनें पाहतां या मौजेच्या व्युत्पत्तींत खरेपणा नसला तरी मार्मिकपणा खास आहे. पण त्यांत बातमीचा नवेपणा व त्या नवेपणापासून उत्पन्न होणारी नवलाई किंवा आश्चर्य प्रतीती याचें गमक नाहीं. म्हणून व हेंच गमक वस्तुतः पहिल्या गमकाहून अधिक मार्मिक आहे हें कोणीहि कबूल करील.

असो. अशा रीतीनें 'वर्तमान' या शब्दांत भूतकालवाचक गोष्टी कशा येऊं शकतात हें सांगितलें. पण या गोष्टींबरोबरच भविष्यकालीन गोष्टींचाहि वर्तमान या शब्दांत समावेश होऊं शकतो. हें सांगितलें पाहिजे अमुक एक गोष्ट घडली असें ऐकल्यास तिच्यावर आपला जितका विश्वास बसतो तितका अमुक एक गोष्ट घडणार किंवा घडेल असें म्हटल्यास तिजवर विश्वास बसत नाहीं. कारण इतिहास हा निश्चित, व भविष्य हें अनिश्चित. जे घडल तें घडलें नाहीं असें करणें हें ईश्वराच्याहि हातीं नाहीं. पण जे पुढें घडणार म्हणजे आज घडलेले नाहीं, अजून घडावयाचे आहे, तें फसविणें म्हणजे घडूं न देणें ही गोष्ट जशी देवाधीन किंवा दैवाधीन, तशी कांहीं अंशीं मनुष्याधीनहि आहे. अर्थात् या अनिश्चितपणामुळें त्याची नवलाई मनाला तितकी वाटत नाहीं. तथापि मागें भूतकालीन गोष्टींबद्दल जें सांगितलें तें भविष्यकालीन गोष्टींविषयींहि समजावें. म्हणजे भविष्यकाळीं घडणारी गोष्ट हाहि बातमीचा (वर्तमानाचा) विषय होऊं शकेल. पण ती गोष्ट घडण्याच्या संबंधापेक्षां ती गोष्ट घडणार अशा आज होणाऱ्या ज्ञानाचाच संबंध त्यांत अधिक येतो. व या दृष्टीनें जगाच्या उत्पत्तीपासून जगाच्या अंतापर्यंत कोठेंहि केव्हांहि घडणारी गोष्ट ही देखील आपणाला प्रथमच नव्यानें कळते तेव्हां त्याला वर्तमान हें नांव यथार्थतेनें देतां येईल.

वर्तमान म्हणजे नवी बातमी हा वर्तमानपत्राचा मुख्य विषय ठरला. पण वर्तमान किंवा नवी बातमी ऐकावी अशी जी बुद्धि किंवा वासना मनुष्याला होते ती कां! याचें विवेचन वेगळेंच करावें लागतें. व तें विवेचन करतांनाहि थोडेंबहुत तत्त्वज्ञानांत शिरावें लागतें. आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेंच बोलावयाचें तर, मनुष्याला नव्या बातम्या वाचण्या ऐकण्याची जी इतकी उत्कट किंवा अनिवार वासना होते, तिचें कारण, मनुष्य हा सर्वज्ञ ईश्वराशीं स्पर्धा करण्याची इच्छा करतो; किंवा 'स्पर्धा' सोडली तरी दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र हेतूनें आपण सर्वज्ञ होण्याची तो इच्छा करीत असतो, असाच सिद्धांत मांडावा लागतो. "नव्या बातम्या ऐकण्याची चटक" येथपासून "सर्वज्ञ ईश्वराशीं स्पर्धा" येथपर्यंत फारच मोठी मजल असल्या कारणानें, वरील सिद्धांत मांडणें म्हणजे मनाला येईल तें बोलणें किंवा जीभ उचलून टाळ्याला लावणें असें सकृद्दर्शनी सहजच वाटतें. परंतु तें जितकें आश्चर्यकारक आहे तितकेंच तें खरेंहि आहे. या सिद्धांताच्या विवेचनाचा प्रारंभ म्हणून आपण इतर कांहीं गोष्टी पाहूं व तपासूं, त्या अशा. मनुष्य हा सर्वज्ञ ईश्वराशीं स्पर्धा करण्याची इच्छा धरो किंवा न धरो, पण तो आपल्या संग्रहीं असणाऱ्या ज्ञानावर केव्हांहि संतुष्ट नसतो ही गोष्ट मात्र कोणीहि नाकबूल

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

करणार नाहीं. आणि असंतोष हा 'श्रियोमूलं' हा सिद्धांत सर्वसंमतच आहे. अर्थात आहे त्याहून अधिकाधिक ज्ञान मिळविणें ही गोष्ट मनुष्य प्रयत्नसाध्य मानतो, व त्या प्रयत्नाला लागतो. पण कोणताहि प्रयत्न साधनावरच अवलंबून, आणि मनुष्याचीं ज्ञानसाधनें म्हणजे त्याचीं इंद्रियें हींच होत. अर्थात् या इंद्रियांच्या उपयोगानें प्रत्यक्ष अनुमान उपमान इत्यादि रीतींनीं तो आपल्या ज्ञानाची वाढ करतो. नसेल तें नवें मिळवितो. एकांगी असेल तें अनेकांगी करतो. असंस्कृत असेल ते संस्कार देऊन कमावतो. या गोष्टी प्रत्यक्ष व अनुमान यांच्या योगानें होतात. आणि उपमानाच्या रीतीचा त्याला हा उपयोग होतो कीं, स्वतःची भमिका न सोडतां तो कल्पनेनें क्षणभर परवस्तुकायाप्रवेश करितो; व आत्मौपम्यानें तेथें मिळालेला काल्पनिक अनुभव व स्वतःच्या भूमिकेंत मिळालेला प्रत्यक्ष अनुभव यांची तो जोड घालतो.

तसेंच इंद्रियांच्या उपयोगांतहि तो शक्य तेथवर अनेक इंद्रियें एकदम कामाला लावून संकीर्णज्ञान अनुभविण्याचा प्रयत्न करितो. याची फोड थोड्याश्या उदाहरणांनीं होईल. रसनेंद्रियाचें काम जीभ करते. पण तिला जसा एकेरी रसाचा स्वाद घेतां येतो, तसाच अनेक रसांच्या मिश्रणाचाहि स्वाद ती घेऊं शकते. म्हणून मनुष्य रसनेच्या द्वारें रसज्ञान होईल तितकें अधिक वाढवितो. मनुष्याच्या खाण्यांत अगदीं एकेरी रस थोडे असतात. त्याच्या मिश्रणाशिवाय तो बहुधा पदार्थ खातच नाहीं. म्हणून तो निरनिराळ्या प्रकारचे मसाले किंवा पंचामृतासारखीं पक्वान्नें बनावितो. पण खाण्याचा पदार्थ नुसत्या रसनेला रुचकर लागणारी असल्यानें त्याचें समाधान होत नाहीं. म्हणून तो रुचकर पदार्थांनाहि शक्य तितका नयनमनोहर आकार देतो. विलायती टेबलावरील गोड 'पुडिंगा'ना सुंदर आकार कारण देतात. किंवा 'केक्स'ना 'मनोऱ्याचा आकार देतात. साखरेचीं चित्रें नुसत्या साखरेपेक्षां मुलांना अधिक आवडतात. साखरेच्या नुसत्या पुडीला सौंदर्य नाहीं. मेणबत्ती हा खाण्याचा पदार्थ नाहीं. पण शुभ्र साखरेची कांडी मेणबत्तीसारखी गोल व तुकतुकीत करतां आली तर, साखर खाण्यांत तोंडाला व मेणबत्ती पाहाण्यांत डोळ्याला जें एकेरी सुख मिळतें तें साखरेची मेणबत्ती खाण्यानें दुणावणार नाहीं काय! पक्वान्नांत केशर घातल्यानें रसना घ्राण व नेत्र या तिन्ही इंद्रियांचें समाधान एकदम होतें. केशराची रुची फारशी चांगली नसते पण त्याचा रंग व स्वाद हीं दोन्ही उंची दर्जाचीं आहेत खास! फोनोग्राफनें कर्णेंद्रियाचा संतोष होतो, पण 'टॉकीज'चा नवा प्रकार घेतला तर त्यांत मनुष्याची हालचाल पाहून डोळ्यांना व भाषणें गाणीं ऐकून कानांना असा उभयविध आनंद एकाच क्षणीं होतो, मेजवानीच्या वेळीं गाणें किंवा बँड चालू ठेवण्यांत एका रसनेंद्रियानें किंवा एका कर्णेंद्रियानें कधीं न होणारा असा सजोड दुहेरी आनंद मिळवून देणें हाच खरा हेतु नसतो काय! पाठीशीं तक्या ठेवावयाचा तो नुसता मऊ असला म्हणजे स्पर्शेंद्रियांना सुख भरपूर मिळेलच. तर मग तक्यावर चित्रें व वेलबुट्टी कां काढावयाची? तर त्वगिंद्रियाबरोबर चक्षुरिंद्रियालाहि समाधान व्हावें म्हणून!

या सर्व उदाहरणांवरून ज्ञान व अनुभव अधिकाधिक मिळविण्याविषयीं मनुष्याचे प्रयत्न, कसे सुरू आहेत हें लक्षांत येईल. तेच तत्त्व नवीनवी बातमी ऐकण्याविषयींच्या मनुष्याच्या लालसेला लावावें म्हणजे झालें. बसल्या बैठकीस एकाच क्षणीं जगांतील जितकी अधिकांत अधिक बातमी मिळेल, तितका मनुष्याला अधिकच आनंद होतो. व हा आनंद वाढविण्याच्या भरांत सर्वज्ञ ईश्वराशीं मनुष्य नकळत स्पर्धा करतो असें म्हटलें तर त्यांत वावगें तें काय आहे! आज रेडिओच्या व वायरलेसच्या सहाय्यानें तो हजारो मैल दूर असलेल्या पदार्थांचे रंग रूप व त्यांनीं उत्पन्न केलेला आवाज यांचा अनुभव घेतो. तेच पुढें जाऊन अशी कल्पना करूं कीं, पुराणांतील अंतर्ज्ञानी योग्याप्रमाणें, मनुष्याला बसल्या बैठकीस स्वतःच्या इंद्रियांना व मनाला रेडिओचे किंवा वायरलेसच्या यंत्राचें रूप देतां आलें, व हव्या त्या ठिकाणच्या हव्या त्या वस्तूंचें ज्ञान मिळवितां आलें, तर तें त्याला इष्ट वाटणार नाहीं काय? किंबहुना, शास्त्रज्ञ मनुष्याचा तसा प्रयत्नहि आजहि सुरू नाहीं काय! वर्तमानपत्रें वाचण्याच्या आवडीची मीमांसा करतांना इतक्या खोल पाण्यांत शिरल्याशिवाय खरोखरच गत्यंतर नाहीं.

अज्ञात असलेल्या गोष्टींचें ज्ञान होणें हा मनुष्याचा एक शाश्वत आनंदच आहे. पण या ज्ञानांतहि दोन प्रकार असतात. एक आत्मनिरपेक्ष व दुसरा आत्मसापेक्ष. प्रायः यच्चयावत् निर्जीव सृष्टीचें ज्ञान हें सामान्यतः आत्मनिरपेक्ष, व सजीव सृष्टीपैकीं मनुष्यसमाजासंबंधानें ज्ञान हें आत्म-सापेक्ष, असा भेद करितां येईल. याचें कारण असें कीं, मनुष्यसमाजाविषयीं म्हणजे त्यांतील व्यक्तींविषयीं जें ज्ञान मनुष्याला मिळतें यावरून तो स्वतः आपली व या इतर व्यक्तींची मनांत तुलना करीत असतो. व या तुलनेनें त्याच्या निरनिराळ्या भावना प्रदीप्त होतात.

समजा, आफ्रिकेंतल्या रानटी मनुष्याविषयीं म्हणजे त्यांच्या रानटीपणाविषयीं नवी माहिती कळली म्हणजे हा मनुष्य मनांत म्हणतो, "वा: मी अशा लोकांपेक्षां किती श्रेष्ठ आहे!" म्हणजे त्याची अहंकारभावना येथें प्रदीप्त झाली. याच्या उलट अमेरिकेंतील अत्यंत सुधारलेल्या लोकांचें व्यवहाराची कांहीं अपूर्व बातमी कळून तो चकीत झाला म्हणजे त्याच्या तुलनेनें आपण कितीं मागसलेले आहों असें वाटून तो खजील होतो. आपल्यांसारखे गुण किंवा दोष ज्यांच्यांत आहेत अशा लोकांचे गुण प्रगट करणारें वर्तमान त्याच्या कानावर आलें म्हणजे त्याला बरें वाटतें. कारण त्याला जोडीदार मिळतात, आणि त्यांचें आत्मसमर्थन होतें.

मनुष्यस्वभावाचा हा एक प्रकार झाला. पण दुसरा व याहून अधिक चांगला असाहि प्रकार असूं शकतो. म्हणजे आपल्या-पेक्षां कमी सुधारलेल्या किंवा अधिक दुःखी माणसांचें वर्तमान ऐकल्यानें याच्या मनांत अहंकारबुद्धि किंवा श्रेष्ठत्वाची भावना न उद्भवतां, दयेची किंवा अनुकंपेचीच भावना उत्पन्न होईल. तसेंच आपणांपेक्षां अधिक सुधारलेल्या किंवा अधिक सुखी समाजाची बातमी त्याला समजली असतां तो खजील होणार नाहीं किंवा त्याला त्याच्याविषयीं मत्सर वाटणार नाहीं. तर स्वतःची सुधारणा करण्याविषयीं त्याच्या मनांत उमेद व आशाच उत्पन्न होईल. असो ही केवळ कांहीं उदाहरणें होते, व अशींच आणखीहि उलटसुलट उदाहरणें देऊन, नवीन बातमी ऐकल्यानें मनुष्याच्या कोणकोणच्या भावनांवर कसकसा परिणाम किंवा प्रतिक्रिया होते हें सहज सांगतां येईल. परंतु येथें इतका विस्तार करण्याचें कारण नाहीं. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, नवीन बातमी कळणें, म्हणजे नवें ज्ञान होणें, यापासून मनुष्याची बुद्धि व त्याच्या भावना या जागृत होतात. आणि आपणाला सर्वज्ञत्व किंवा सर्वशक्तिमत्व लाभावें अशी जी गुप्त आकांक्षा त्याला असते ती क्षणमात्र किंवा कणमात्र तृप्त झाल्यासारखी त्याला वाटते.

निर्जीव सृष्टीचें ज्ञान हें देखील मनुष्याला कुतूहलकारक असतें. पण त्यांत कोणच्याहि प्रकारची सामाजिक तुलना नसून फक्त भय, चिंता, लोभ, बुद्धि इ. त्याचे विकार जागृत होतात. स्पष्ट पदार्थांचे नवे गुणधर्म कळले तर शास्त्रज्ञ मनुष्याला आणखी नवीन शोध लावण्याची उमेद वाटते. लोभी कारखानदाराला आपल्याला द्रव्यलाभाचें एक नवीन साधन मिळालें असें वाटतें. अशाच रीतीनें नव्या खाणीचा शोध लावणें हें एकाला आनंदकारक तर दुसऱ्याला दुःखकारक होऊं शकतें. देशावर पाऊस एकंदरीनें कमी पडला हें ऐकून जी चिंता वाटते तिच्यापेक्षां कालांतरानें जळाऊ सरपणाचीं जंगलें किंवा कोळशाच्या खाणी संपून जाणार या बातमीनें वाटणारी चिंता कमी असते. आणि त्याच्याहि फार पलीकडे गेलें असतां, सूर्य हाहि एका काळीं विझून जाईल ही बातमी ऐकून ज्याला चिंता वाटेल असा मनुष्य सहसा आढळणार नाहीं. तथापि त्यांतल्या त्यांत विचारी शास्त्रज्ञाला असली बातमीहि चिंतेचा झटका देऊन गेल्याशिवाय राहाणार नाहीं.

वर्तमानपत्रांच्या वाचकांनीं वरील विचारसरणी लक्ष्यांत ठेवून जर मधून मधून स्वतःच्या मनाला प्रश्न करून विचारलें कीं, "मला ही विवक्षित बातमी वाचून ऐकून काय वाटलें! माझी कोणती भावना जागृत झाली!" तर त्याचें मन त्याला त्या प्रश्नाचें उत्तर देईल. परिप्रश्नाची पद्धत अंगिकारिली असतां, स्वतःच्या मनासारखा गुरु दुसरा कोणताच भेटणार नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां, वर्तमानपत्र हें केवळ एक उपलक्षण ठरेल. आणि मासिकें व पुस्तकें हीं त्याच दृष्टीनें उपयोगी ठरतील.

अशा रीतीनें बातमीचें म्हणजे नव्या ज्ञानाचें महत्त्व वर्णन करण्यांत आलें खरें. पण ही बातमी मनुष्याला कशी कळते? याचीं उत्तरें दोनच होऊं शकतात. एक, स्वतः मनुष्य बसल्या जागचा उठून हलेल, चालेल, हिंडेल, प्रवास करील व स्वतःच्या इंद्रियांनींच ती मिळवील, किंवा हें त्याचें काम त्याच्याकरितां दुसरा कोणी तरी करील, तरच होणार. या दृष्टीनें पाहतां, शेंपन्नास वर्षांमागें ज्ञान मिळण्याचें व बातमी कळण्याचें हे दोन्ही प्रकार फारच मर्यादित होते. मनुष्य पायानें चालला तर रोज फार तर १०-५ कोस चालेल. व तो घोड्यावरून किंवा उंटावरून गेला तरीहि १५–२० कोसांपेक्षां अधिक जाणार नाहीं. व ही जी मर्यादा एकाला तीच इतर सर्वांना. तसेंच मनुष्यानें मनुष्याला भेटून बातमी सांगावयाची असें म्हटलें तर एका दिवसांत किंवा एका वर्षांतहि किती माणसें एकमेकाला भेटणार! आणि जीं भेटणारी तींहि वरीलसारख्या मर्यादेनेंच बांधलेलीं. यामुळें नवी बातमी किंवा नवें ज्ञान असें कितीसें मिळणार? बसल्या जागेवरून जगाचें ज्ञान व्हावयाचें तें पूर्वी अर्थात् संकुचितच असे. गेल्या शतकापर्यंत आमच्या इकडील पंडीत व विद्वान् हे हिंदुस्थानांत नऊ खंड पृथ्वी व दहावें खंड काशी असें मानीत असत. त्याचप्रमाणें उलट इंग्लंडांतल्या लोकांना हिंदुस्थानांतील अंतरांची कल्पना नसल्यामुळें, मुंबई व कलकत्ता हीं शहरें जवळ जवळ एकमेकाला लागून असावीं अशा विचारानें, मुंबईस जाणाऱ्या प्रवाशाजवळ सहज कलकत्त्याच्या स्नेह्याला पोंचविण्याकरितां ते पत्रें देत. आणि लंडनहून असें निघालेलें पत्र मुंबईस पोंचावयाला सहा महिने व पुढें कलकत्त्यास पोंचावयाला आणखी दोन महिने मिळून लिहिणारा व वाचणारा यांतलें अंतर तुटण्याला ८ महिने लागत. पण ही स्थिति आतां पूर्णपणें पालटली आहे. आणि स्वतः प्रत्यक्ष हिंडून-फिरून बातमी ऐकण्यासांगण्याची त्याची शक्ति जशी मोटारी, जहाजें व विमानें यांच्यायोगानें बेसुमार वाढली, तशी तारायंत्र विद्युत्संदेश, 'यांच्यायोगानें बसल्या जागेवरून विचारविनिमय करण्याचीहि त्याची शक्ति बेसुमार वाढली आहे. किंबहुना असें वाटतें कीं, तरफांच्या तारामुळें वादी संवादी सुस्वरांच्या उत्तर प्रत्युत्तरानें किंवा अनुसंधानें बीन व सतार यांच्या ध्वनिमर्यादेंतली जागा शब्दमय बनते, तशीच या नव्या रणतांनीं सर्व जग बसल्या बैठकीला ज्ञानमय बनत चाललें आहे व त्याची प्रतीति होण्याचें एक मुख्य साधन वर्तमानपत्र हें होऊन राहिलें आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

विलायती वर्तमानपत्रांचा इतिहास

बातमी व टीका हा वर्तमानपत्रांचा मुख्य विषय म्हटला तर वर्तमानपत्रांचें आद्यस्थान ग्रीक देशांतील जुन्या रंगभूमीला द्यावें लागेल. कारण त्या वेळीं प्रयोग होणाऱ्या नाटकांतून पुष्कळ वेळां ताजी बातमी व त्यावरील चुरचुरीत टीका यांचा समावेश केला जात असे. युरोपायडीज, सोफाक्लीस, एस्किलस, ॲरिस्टोफेनिस यांच्या नाटकांतील विषय प्रचलित चळवळींचेच पुष्कळसे असत. नाटकगृहाबाहेर घडणाऱ्या चालू गोष्टी नाटकगृहांत पात्रांच्या तोंडून वदविणें व त्यांवर इतर पात्रांच्या तोंडून टीका करवणें हा लेखी वर्तमानपत्रांच्या ऐवजीं बोलक्या वर्तमानपत्रांचाच प्रकार झाला. झेनोफान वगैरे इतिहासकार हे अर्धे शाहिरी बाण्याचे व अर्धे वर्तमानपत्रांच्या खास बातमीदारांच्या पेशाचे होते. सीझरनें 'अॅक्टा डायरना' नांवाचें वृत्तपत्र सन ६१ सालीं सुरू केलें. त्यांत राजधानींत घडणाऱ्या गोष्टींची रोजची ताजी खबर असे.

विलायती वर्तमानपत्रांचा पूर्वज म्हटला म्हणजे तें एक दुमडलेलें चौकोनी हँडबिल असे. व तें कारणपरत्वें प्रगट होई. रस्त्यांतून फेरीवाले तें विकीत व आजच्यासारखेंच तोंडानें त्यांतील चटकदार बातम्यांचें बीजयंत्र ओरडून सांगत. त्यांत मुख्यतः परदेशांतील लढाया, देशांतील खून अत्याचार म्हणजे एकंदरीनें अद्‌भुत गोष्टीच असत. सामान्य माणसाकरितां ही तजवीज झाली. पण त्या वेळचे अमीर-उमराव, मुत्सद्दी व अर्थातच राजेलोकही आपापले दूत व वृत्त-लेखक परदेशीं ठेवून ताजी बातमी आणवीत असत. हे या पत्रांचे लेखक मोठेसे विद्वान नसत. पण मोठे चौकस व गुप्त बातम्या काढविणारे, व त्या रंगवून सांगणारे असत. किंबहुना हे गुण अंगीं असणाऱ्या लेखकांचीच योजना या कामीं होई. कांहीं कांहीं जुनीं वृत्तपत्रें इतकीं रसभरीत व यथार्थ वर्णनाचीं वाचावयास मिळतात कीं, त्यांचे लेखक आजच्या पुढारी वर्तमानपत्रांचेहि खास बातमीदार होऊं शकले असते.

वर्तमानपत्र या अर्थाचे मूळचे इंग्रजी शब्द कोरंट व गॅझेट हे होत. कोरंट म्हणजे संकलित वर्तमान किंवा वृत्त. त्याहि पूर्वीचा शब्द गॅझेट हा असून तो गॅझेटा—'गॅझा' या इटालियन शब्दांपासून बनला आहे. इटाली देशांत व्हेनिसच्या उपराष्ट्रांत सोळाव्या शतकांमध्यें गॅझा नामक वृत्तपत्रें प्रचलित होतीं. युरोपांत व इंग्लंडांत त्यांचा प्रवेश पूर्वी सांगितलेल्या वृत्तलेखांच्या किंवा बातमीपत्रांच्या द्वारें झाला. ही बातमी पत्रें प्रायः मंगळवारीं व शनिवारीं परदेशांतून येत. पण त्यांचा सुकाळ झाल्याबरोबर सरकारची त्यांवर वक्रदृष्टि झाली. छापील वृत्तपत्रें ही सरकारच्या मालकी हक्काची बाब असून ज्याला तें खासगी मालकीचें काढावयाचें असेल त्यानें सरकारी परवाना काढावा असा कायदा होता. आणि असा परवाना काढल्याशिवाय जे दडपून वृत्तपत्रें छापीत त्यांच्यावर खटले होत, व स्टार चेंबर नांवानें प्रसिद्ध असलेलें जुलमी न्यायकोर्ट (१६३७) त्यांना कडक शासन करी. पण राजाच काय, ब्रिटिश पार्लमेंटालाहि हा हक्क मोठा मौल्यवान वाटे. म्हणूनच पार्लमेंटच्या बैठकीला सभासदांशिवाय इतर परकी मनुष्यांनीं हजर राहूं नये, व पार्लमेंटाच्या खास रिपोर्टाशिवाय दुसऱ्यांनीं पार्लमेंटांतील वादविवादाचे रिपोर्ट प्रसिद्ध करूं नये, असें ठरविण्यांत आलें होतें. सॅम्युअल जॉन्सन हा विद्वान् लेखक म्हणून पार्लमेंटचें वाद-विवादाचे रिपोर्ट तयार करण्याचें काम त्याच्याकडे देण्यांत आलें होतें. पण तो निवळ बातमीवरून घरीं बसल्याच ते रिपोर्ट आपल्या मनानें कल्पनेनें तयार करी! सन १७७४ पासून खरे रिपोर्ट असे प्रसिद्ध होऊं लागले. आणि आतां तर काय, पार्लमेंटाचे खास रिपोर्टर समग्र भाषणें शब्दा न शब्द छापतातच, पण वर्तमानपत्रांचे रिपोर्टरांना सभागृहांत मोठ्या मनानें प्रवेश मिळून असून दोनप्रहरचीं भाषणें संध्याकाळीं व संध्याकाळचीं रात्रींचीं भाषणें सकाळीं प्रसिद्ध होतात. तथापि अजूनसुद्धां सभागृहांत येऊन बसणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकावर व रिपोर्टावर पार्लमेंटाच्या स्पीकरची हुकमत बिन-तक्रार चालते. १९२९ सालीं व गतवर्षाच्या प्रारंभीं दिल्ली येथील कायदेमंडळाचे अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांनीं टाइम्स ऑफ इंडियाच्या बातमीदाराला याच मुद्द्यावर माफी मागण्यास भाग पाडलें; आणि होममेंबर सर जे. क्रेरार यांच्याशीं त्यांचा सुप्रसिद्ध झगडा झाला तोच याच मुद्द्यावर

विलायतेंत पुष्कळ दिवसपर्यंत छापील वृत्तपत्रांना सरकारी परवाना काढावा लागे. त्यासंबंधाचा कायदा १६९२ त रद्द झाला. पण पूर्वी त्यांना जबर स्टांपड्यूटीहि द्यावी लागे. १६८८ ची राज्यक्रांति होऊन प्रजास्वातंत्र्य प्रस्थापित झाल्यावरहि, सन १७१२ सालीं इंग्लंडमध्यें स्टँप अॅक्टानें वर्तमानपत्रांच्या प्रत्येक पानामागें एक पेनी कर बसविला. त्याबरोबर पुष्कळ लहानमोठीं वर्तमानपत्रें बंद पडलीं. याला उद्देशून स्विफ्ट लिहितो—"झालें! ग्रब स्ट्रीटचें वाटोळें झालें. स्वतः वृत्तपत्रेंच मेल्यानें आतां खून भुताटक्या यांच्या गोष्टी वाचकांना कोठून वाचावयास मिळणार! किती पडतीं किति दडतीं किती एकांचीं धृतायुधें गळतीं' अशी स्थिति झाली आहे. कांहीं वर्तमानपत्रें दुसऱ्यांत घुसून गेलीं. कांहींच्या नाकाला सूत धरलें आहे. कांहीं धैर्य धरून राहिलीं त्यांना वर्गणी वाढवावी लागली. वर्तमानपत्रांच्या कागदांवर स्टांप मारून आणलेला पाहा. केवढा तो अगडबंब नांवडा चांद. तो तयार करून कापून चिकट-वावयलाच अर्धापेनी खर्च येईल!" पण स्टांप ड्यूटीबरोबर जाहिरातींवरहि कर असे. आणि कागदांच्या कारखान्यांवरहि स्थानिक एक्साइज जकात असे. स्टांप ड्यूटी चार पेन्सापर्यंत वाढली होती. पण १८१५ पासून हे कर कमी होण्यास प्रारंभ झाला. १८५३सालीं जाहिरातीवरचा कर उठला, व १८५५त एकंदर स्टांप ड्यूटी वर्त-मानपत्रांवरून उठली. १८६१ त कागदांच्या कारखान्यांवरचा कर उठला. त्याच-प्रमाणें टपालाचे दर जे प्रथम भारी होते तेहि पुढें कमी झाले. इतर कर कमी झाल्याचा फायदा लंडन शहरांतील वर्तमानपत्रांना झाला तसाच पोस्टाचे दर कमी झाल्याचा फायदा बाहेरगांवच्या वर्तमानपत्रांना झाला. यामुळें आज विलायतेंत वर्तमानपत्रांचा इतका सुकाळ झाला आहे कीं, साधारण दोनतीन हजार वस्तीच्या गावांत सुद्धां खास त्या गावचीं अशीं एक किंवा अनेक वर्तमानपत्रें चालतात.

वर्तमानपत्रांत प्रतिष्ठित व गचाळ हा भेद चोहोंकडे सनातनच आहे. विलाय-तेंतील पहिलें वृत्तपत्र सन १६२२ सालीं नॅथेनियल बटर या नांवाच्या बातमीविक्यानें काढलें. त्यांत तत्कालीन जर्मन युद्धाच्या बातम्या असत, व तें बऱ्यापैकीं होतें म्हणतात. पण त्या पुढील कित्येक वृत्तपत्रांचें वर्णन सॅम्युअल नांवाच्या गृहस्थानें खालील मासलेवाईक शब्दांत केलेलें आढळतें.

"या विषारी खाजट सुरवंटांना आग कां नाहीं लागत? काय पण एकेकाचीं सोज्वळ नांवें. पण तीन ओळी तरी ओळीनें नीट सभ्य समंजस लिहितील तर शपथ! आंत पाहावें तर कोणाच्या धर्मभावना दुखाव, कोणाला गंडा घाल हे त्यांचे उद्योग, त्यांनीं छापखानेवाल्याला बुडवावें, छापखानेवाल्यांनीं स्टॉलवाल्यांना, स्टॉलवाल्यांनीं फेरीवाल्यांना, आणि फेरीवाल्यांनीं गिऱ्हाइकांना व इतरांना बुडवावें हा यांचा क्रम! इतकें करून सर्पांसारखे फूसफूस करावयाला तयार! आठवड्यांतला एकहि दिवस सुनका जात नाहीं. एकामागून एक येत असतात. जसा कांहीं खोखोचा खेळच खेळतात"!

यानंतर या वृत्तपत्रांतून येणाऱ्या बातमीसंबंधानें या टीकाकारानें जें वर्णन केलें आहे तें इतकें सुश्लिष्ट आहे कीं, तें जसेंच्या तसें मूळच्या इंग्रजींतच दिलेलें अधिक बरें. तो म्हणतो—

"No rest day or night with these cursed caterpillars, Perfect Passages, Weekly Occurrences, Scout, Spye, Politicus, Diurnal, the Devil and his dam. If the states have occasion for soldiers they my no doubt press a whole regiment of these paper vermine....To see men grossly abused in their beliefs, the whole Nation deceived and gulled out of their money, by a company of impudent snakes, of whome (one only excepted) I dare aver none of them was ever guilty of writing three lines of sense. They prey upon the Printer or Stationer, the Stationer on the Hawker and the Hawker on everybody. But the cream of the jest is, how they take their times and rises, one upon Monday, t'other on Tuesday, a third on Wednesday, and so come over one another's backs as if they were playing at leapfrog....It would much refresh a man with laughter to consider how these Rakeshames piece and patch up that above said account which they weakly diffuse amongst the people. 'News' and this weak's News. For they have more tricks in their Rotations than a Cook of a three penny ordinary has with his cold meat. First he boils it, it he miss a good custom he roasts it, if that will not serve, he stews it, and if he miss then too he minces it, but if in case of hot weather he be prevented of performing all his pleasure upon it, he casts it stinking and full of maggots into the Prisoners basket, beseeaching God to mistake that necessity which he had to rid himself of stinking meat for pure charity.'

इतर बातमीविक्के व छापखानेवाले यांना त्या वेळीं एक प्रतिस्पर्धी होता. तो म्हणजे चहाकॉफीचा दुकानवाला. चहा हा अलीकडचा. त्याच्यापूर्वी विलायतेंत कॉफीचें राज्य होतें. आणि आजहि युरोपांतील इतर देशांत कॉफीचेंच चहावर वर्चस्व आहे. चहा पिणारे असें राष्ट्र इंग्लंडच! असो. विलायतेंत दारूच्या दुकानाबरोबर कॉफीचीं दुकानें तेव्हां रस्तोरस्तीं असत. पण या दोन दुकानांत फरक हा कीं, प्रतिष्ठित लोक जरी दारू पीत तरी दारूचें दुकान हें किती झालें तरी अप्रतिष्ठितच मानलें जाई! उलट कॉफीचें दुकान (याला 'कॉफी हाऊस' अशी लोकप्रिय संज्ञा असे) हें अत्यंत प्रतिष्ठित मानलें जाई. इतकेंच नव्हे तर एका काळीं 'म्हणजे अठराव्या शतकांत' कॉफी हाऊसेसचा उपयोग प्रतिष्ठित लोकांच्या 'क्लब' सारखा होत असून त्यांना विद्वच्चर्चेचीं मुख्य केंद्रें सम-जलीं जात. कोणी कोणाच्या घरीं जाणें हें अर्थात् गैरसोयीचें यजमानाला खर्च व उठाठेव. एकच मनुष्य ती किती सोशील!

त्याऐवजीं कॉफी हाऊसची खाणावळ केव्हांहि अधिक सोयीची. हवें त्यानें हवें तेव्हां जावें. कॉफी आयती तयार. वाटेल त्यानें वाटेल तितकी घ्यावी व आपल्या पुरते पैसे द्यावे. फार तर बरोबर कोणी स्नेहीसोबती बोलावून नेला तर त्याचेंहि बिल द्यावें. पण यदृच्छेनें चार लोक एकत्र जमले तर ज्याचें बिल तोच भागवी. अशा रीतीनें अडचण न होतां चार लोक एकत्र जमण्याची ती जागा होती. शिवाय कॉफी पिण्याच्या वेळाहि सामान्यतः ठरल्या सारख्याच असतात. आणि कॉफी एकदम पिऊन टाकणें ही रीत नसून ती थोडथोडकी घुटक्यांत बसणें ही रीत असल्यानें मध्यंतरीं बोलणें चालणें हें हवेंच असतें. कॉफीपानाला त्यानें रंग येतो. आणि हें बोलणें चालणें समवयस्क, समव्यवसायी, व समसंस्कृत अशा लोकांमध्यें होत असल्यास त्या संभाषणाला व त्या कॉफीला फारच गोडी येते. पण सुसंस्कृत माणसें जमून संभाषण व्हावयाचें असतां नुसती विद्वच्चर्चाच होत नाहीं, तर हास्यविनोद, थट्टामस्करी, आणि खरें बोलावयाचें तर थोडी कुटाळकीहि होते. आणि अशा या मिश्र संभाषणाला ताजी बातमी हा

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

मुख्य आधार असतो. अर्थात् आपली कॉफी पुष्कळ खपावी तर गिऱ्हाइकांनीं पेल्यावर पेले मागून घ्यावें, पेले अधिक खपाचे तर गिऱ्हाईक अधिक वेळ दुकानांत बसून राहावें, तें अधिक वेळ बसून राहावयाचें तर संभाषण अधिक वेळ चाललें पाहिजे, आणि संभाषण अधिक वेळ चालण्याला ताज्यावातमीचा पुरवठा अधिक पाहिजे हें ओघानेंच येतें! अर्थात् ही बातमी वर्तमानपत्रांतूनच मिळवयाची. म्हणून कॉफीहाऊसवालें आपल्या खर्चानें मिळतील तितकीं ताजीं वर्तमानपत्रें विकत घेऊन कॉफीच्या टेबलांवर ठेवीत. पण धंद्यातून धंदा सुचावा त्याप्रमाणें या दुकानदारांना स्वतःचीं वर्तमानपत्रेंच काढावीं असें एक वेळ वाटूं लागलें व ती टूम सुरु झाली. स. १७२८ सालीं लंडनच्या कॉफीहाऊसवाल्यांनीं सहकारी भांडवलानें कंपनी काढून सर्वांचें मिळून एक वर्तमान (दैनिक व अनेक आवृत्त्यांचे) पत्र काढावें असें ठरविलें. आणि तें खपावें म्हणून इतर वर्तमानपत्रांवर कॉफीहाऊसमध्यें बहिष्कार घातला. पण याला उत्तर म्हणून लंडनच्या वर्तमानपत्रकारांनीं असा धाक घातला कीं, " ठीक आहे. आम्ही ही समाईक भांडवलाची कंपनी काढून तुमच्या दुकानांसमोर आमचीं कॉफीचीं दुकानें घालूं आणि मग तुमचा तमाशा पाहूं." या धमकीचा उपयोग झाला, व कॉफीहाऊस वाल्यांच्या मालकीची वर्तमानपत्रें निघण्याचें रहित झालें.

अठराव्या शतकापर्यंत संपादक(एडिटर)हा शब्द प्रचारांत नव्हता. स्वतः बातमीविक्या हा मालक, हाच मुद्रक, व हाच संपादक असे. तो प्रतिष्ठित शब्द १७०९ सालीं सुप्रसिद्धग्रंथकार ॲडिसन यानें टॅटलर पत्राच्या संबंधात, त्याचा सुप्रसिद्ध मित्र व समव्यवसायी जो स्टील त्याला प्रथम लावून उपयोगांत आणला असें म्हणतात. 'टॅटलर' हें वृतपत्र असें समजलें जाई. परंतु त्यांत वृत्त म्हणजे बातमी अशी नसे. तर प्रचलित बातमीवर व त्याहीपेक्षां प्रचलित समाजस्थितीवर टीकात्मक निबंध पत्रव्यवहार किंवा टीकात्मक गोष्टी किंवा रूपकें असत. हें पत्र ॲडिसन, स्विफ्ट, स्टील, ॲटरबरी, गार्थ वगैरे सुप्रसिद्ध लेखकांनीं चालविलें होतें. आणि त्यांतील लेख हा १८ व्या शतकांतील उत्तम इंग्रजी वाङ्मयाचा नमुना म्हणून अद्यापि समजला जातो. विलायतेंत 'टॅटलर' मागून निघालेलें 'स्पेक्टेटर' हें पत्र पहिल्याहून अधिक प्रसिद्ध आहे व त्याचा मुख्य संपादक ॲडिसन् हा होता. त्यानंतर 'गार्डियन' 'लव्हर' 'लीडर' या नांवाचीं अशीच इतर अनेक पत्रें निघालीं. त्याचें कारण प्रतिष्ठित वाङ्मय भक्तांना वर्तमानपत्रांसारखे कांहींतरी काढाव लिहावे असें वाटे, तत्कालीन बातमीविक्या वर्तमानपत्रांच्या अप्रतिष्ठित परिवारांतून मोकळे होऊन स्वतःचें कांहीं वैशिष्ट्य दाखवावें अशी इच्छा त्यांना झाली होती. व तशी होणें स्वाभाविक होतें. विलायतेंत प्रथम स्टँप ॲक्ट सुरू होऊन वर्तमानपत्र चालविणें ही गोष्ट खर्चाची झाली. यामुळें बरींच वर्तमानपत्रें बंद झालीं. त्याला उद्देशून ॲडिसन लिहितो—"स्टँप ड्यूटी आज सुरूं झाली. पण दैव असें कीं, त्याबरोबर चालूं युद्धेंहि थांबली. तेव्हां आतां आमच्या या बातमीविक्या पत्रांचें काय होणार? युद्धाची रम्यकथा खरी, पण ती वर्तमानपत्रांतून काल्पनिक द्यावी तर युद्धच थांबलें व रम्यकथेचा आधार तुटला. बरें, घरगुती बातम्या तिखटमीठ लावून सजवून लिहाव्या म्हटलें तर स्टँप ड्यूटी उरावर बसली. तेव्हां पातळ पतंगासारखीं किंवा झाडपाल्यासारखीं प्रसिद्ध होणारीं बातमीपत्रकें आतां नाहींशीं होणार. बोलूनचालून आतां हा शरद् ऋतूच आहे. आणि शरद ऋतूंत पत्रें गळून पडणें हा नियमच आहे. मग तीं वृक्षपत्रें असोत किंवा वृत्तपत्रें असोत."

विलायतेंत टॅटलर, स्पेक्टेटर वगैरे केवळ टीकात्मक व निबंधात्मक वृत्तपत्रांच्यानंतर लंडन मॅगेझिनसारखीं प्रतिष्ठित मासिकें आणि लंडन टाईम्ससारखीं प्रतिष्ठित वर्तमानपत्रें यांचें युग सुरू झालें. मासिकांचे अंक महिन्या-महिन्यांनीं निघत तरी त्यांत युरोप खंडांतल्या व जगांतल्या बातम्या बातमीपत्रांच्या रूपानें दिल्या जात. व त्या तेव्हां ताज्याच असत. कारण तारायंत्र तेव्हां अस्तित्वांत आलें नव्हतें. आणि जोंपर्यंत तारेनें बातमी येत नाहीं तोंपर्यंत पत्रानें येईल तीच बातमी ताजी. त्यांतहि चढाओढीला जागा होती. ती अशी कीं, सरकारी टपाल व्यवस्थितपणें दरआठवड्यास किंवा रोज यावयाचेंच. पण सरकारी व्यवस्था विश्वसनीय असली तरी कांहींशी धिमी असते. म्हणून सरकारी टपालपेटींत पत्र न टाकतां किंवा सरकारी टपालगाडींत न बसतां खास बातमीदारानें स्वतःचें वेगळें वाहन भाड्यानें घेऊन प्रवास केला असतां तो किंवा त्याचें पत्र सरकारी टपालापेक्षां बरेंच आधीं मिळण्याचा संभव असे. आणि लंडन टाईम्ससारख्या दैनिक पत्रांनीं हा क्रम ठेविलाहि होता. म्हणून ताज्या बातमीकरितां महिनाभर थांबणें हें लोकांना आवडेनासें होऊन मासिकांच्या अंकांतून बातमी वाचणें मागें पडून, वाचकांचा भर दैनिक वर्तमानपत्रावर पडला. हलुहळू मासिकांनीं टीका, निबंध वगैरे, विचार करून स्वस्थपणानें लिहिण्याचे लेख प्रसिद्ध करण्याचें कामच तेवढें आपणाकडे ठेवून घेतलें. पण वर्तमानपत्रांनीं दोनहि कामें चालूं ठेविलीं. म्हणजे ताज्या बातम्या देण्याबरोबर ते टीकात्मक किंवा लहान निबंधात्मक वर्णनात्मक असे लेखहि घालूं लागले. आज लंडनमधील 'स्पेक्टेटर,' 'सॅटरडे रिव्ह्यु' यांनींच काय ती जुन्या 'टॅटलर,' स्पेक्टेटर ' वगैरेंचा थोडीशी ओळख शिल्लक ठेविली आहे. एका बाजूला 'पिअरसन, लंडन, वगैरे मासिकें व दुसऱ्या बाजूला निवळ वर्तमानपत्रें यांचा सांधा जोडण्याचें काम 'स्पेक्टेटर,' 'सॅटरडे रेव्ह्यू ' वगैरे पत्रें करतात.

हिंदीं वर्तमानपत्रांचा इतिहास

वर्तमानपत्राचा धंदा इतर कित्येक धंद्यांप्रमाणें हिंदुस्थानांत बाहेरूनच आलेला आहे. याचें कारण, एक तर छापखान्याची विद्या इकडे इंग्रजांपूर्वी एतद्देशीय लोकांना अवगत नव्हती. आणि दुसरें कारण असें कीं, वर्तमानपत्रांचा प्राण म्हणजे सार्वजनिक विशेषतः राजकीय चळवळ तीही पूर्वी इकडे नव्हती. इंग्रजांपूर्वी इकडे देशी राज्यें होतीं परंतु तीं एकतंत्री राज्यें होतीं. युरोपाप्रमाणें लोकांना म्हणून प्रजा या नात्यानें कांहीं हक्क आहेत अशी कल्पना राजे लोकांनीं नव्या पद्धतीनें मान्य केलेली नव्हती व राज्यवैभव म्हणजे राजाचें वैभव असा होता! ज्याच्या मनगटांत जितका जोर असेल तितकें त्यानें आपलें राज्य वाढवावें. मात्र राज्य म्हटलें म्हणजे त्यांत अठरा खार्ती येतातच. आणि म्हणूनच त्यांच्या अनुषंगानें लोकांनाही नोकरी उद्योग पैसा वैभव प्राप्त होत असे. युरोपप्रमाणें इकडे स्वदेशी लोकांचीं राज्यें होतीं व तीं स्वतंत्रहि होतीं. पण त्यांत राजे हेच फार स्वतंत्र होते. राज्यांत ज्याला मानमान्यता पैसा वगैरे मिळाला त्याला मिळाला. उद्योगानें व पराक्रमानें मिळवितांहि येई. परंतु प्रजेच्या हक्कांना उद्देशून राजाविरुद्ध चळवळ अशी कांहीं होत नसे. युरोपांतहि झाला तरी सतराव्या शतकांत जुल्मी पद्धतीचा पुरा नायनाट झाला होता असें नव्हे. परंतु प्रजास्वातंत्र्याच्या चळवळीला प्रारंभ झाला होता इतकी गोष्ट निर्विवाद आहे. आणि या चळवळीला मुख्यतः मदत छापखाने व वर्तमानपत्रें यांचीच होती. ती झाली तरी जुलमी राज्यांच्या जुलमांतून सर्वस्वी सुटलीं होतीं असें नाहीं. किंबहुना त्यांच्यावरच राजे लोकांचा पुष्कळच दांत होता. पण त्यांनींच अखेर जिंकलीं. व जनतेच्या हातीं जर खरें शस्त्र म्हणून कोणतें यशस्वी झालें असेल तर तें छापखाने व वर्तमानपत्रें हेंच होय.

कोणत्याही राज्यक्रांतीच्या पूर्वी युरोपांत छापखाने व वर्तमानपत्रें यांचाच सुळसुळाट झालेला आढळून येतो. विशेषतः फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वी ही गोष्ट चांगलीच दिसून आली. व यालाच उद्देशून कार्लाइल यानें फ्रेंच राज्यक्रांतीवरील आपल्या ग्रंथांत वर्तमानपत्रकारांचा बहुमानपुरसर उल्लेख केला आहे. तो म्हणतोः—

" Great is journalism. Is not an able Editor ruler of the world? Being a persuader of it? Though self-elected yet sanctioned by the sale of his numbers whom indeed the world has the readiest method of :disposing if need be, that of mearly doing nothing to him; which ends in starvation." तसेंच "Speculative philosophism once an ornament and wealth of the saloon will now coin itself into mere practical propositions and circulate on street and high-way universally with result that a fourth estate of the able Editor springs up increases and multiplies, irrepressible, incalculable new printers and new journals."

हिंदुस्थानांत अद्याप आजहि राज्यक्रांति अशी सुरु झालेली नाहीं. तथापि राजकीय चळवळ जी आज इतक्या सुस्थितीला आलेली आहे तिचें पुष्कळसें श्रेय छापखाने व वर्तमानपत्रें यांनाच द्यावें लागेल. देशी राज्यांत लिहिण्याची कला लोकांना माहीत नव्हती असें नाहीं. सुंदर हस्ताक्षराला त्या काळीं मान होता. इतकेंच नव्हे तर मजकूर चांगला जुळवून चटकदार लिहिणारे लोकही तेव्हां असत. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें तर छापील ऐतिहासिक कागदपत्रांत वाचकांना अशीं पुष्कळ घरगुती व राजकारणी पत्रें वाचावयास सांपडतील कीं, त्यांना वाङ्मयाचें स्वरूप आहे असें म्हणतां येईल. चटकदार चित्ताकर्षक लिहिण्याची कला त्या काळीं बातमीपत्रें लिहिणाऱ्या लोकांना चांगलीच साधली होती. त्या काळची दरबारी अखबरनिवासांनीं लिहिलेली, वकिलांनीं लिहिलेलीं अशीं कांहीं बातमीपत्रें इतकीं चांगलीं आहेत कीं, आजचे कसलेले वर्तमानपत्राचें बातमीदार तीं वाचून त्यांचें कौतुक करतील.

घरगुती पत्रांत अर्थात् घरगुतीच मजकूर असणार. परदरबारच्या वकिलांच्या पत्रांत मुख्यतः राजकारणाच्या बातम्या, डावपेंच व तदंगभूत इतर राजदरबारची माहिती हीं असतच. परंतु कांहीं बातमीदार असे सुरस गोष्टीवेल्हाळ आढळतात कीं, अवांतर निवळ बाजारी गप्पाहि ते लिहीत, पण त्याच इतक्या चांगल्या लिहित कीं, त्या वेळीं त्या वाचणाराप्रमाणें आजहि त्या वाचणाऱ्यांना मोठी मौज वाटते व आनंद होतो.

अखबार नवीस

अखबार या शब्दाचा अर्थ बातमीपत्र किंवा खबर. ही लिहिण्याची चाल मुसलमानी दरबारांत पुष्कळ दिवसांपासून चालत आली आहे. ह्या कामावर स्वतंत्र लोक नेमलेले असत. त्यास अखबरनवीस असें म्हणत. त्यांचें मुख्य काम म्हणजे राजदरबारांत झालेल्या महत्त्वाच्या गोष्टी, राजकारणें, मुत्सद्यांचे वादविवाद, लढायांचीं वर्णनें वगैरे सर्व प्रकारच्या बातम्या हुबेहुब लिहून ठेवणें हें असे. असल्या बातमीपत्रांचा संग्रह फक्त श्रीमान् लोकच [illegible]. शिकल्यासवरलेल्या लोकांना यांच्या [illegible]मुळें अशीं पत्रें पहाण्यास मिळत असत. गांवाच्या धर्मशाळेंत उतरणारा प्रवाशी हा त्या काळचा मध्यमवर्गीयांचा व गरीबांचा बातमीदार. धर्मशाळेंत उगम पावून या बातम्या बाजारांत पसरत. [illegible] पेठांतून अगर बड्या अमीरउमरावांकडे ज्यांचें जाणेंयेणें असे तेही तेथें ऐकलेल्या चार दोन गोष्टी आपल्या मित्रमंडळींत सांगत. तेथून त्या आणखी प्रसृत होत. या दोन मार्गांशिवाय साधारण लोकांना बातम्या कळण्याचे आणखी मार्ग नव्हते.

जें राजदरबारांत तेंच मोठाल्या व्यापारी पेढ्यांतूनही चाले. यांचे गुमास्ते किंवा शाखा मोठमोठाल्या शहरांतून असावयाच्या. त्यांचेकडूनहि हें वार्ताहरणाचें काम होत असें. हे जे " अखबार " येत ते राजदरबारचे असोत अगर अमीरउमरावांचे असोत,

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

त्यांतशी बातमी गुप्त राहत नसे. एकाच्या तोंडून दुसऱ्याला या रीतीनें ती सर्व शहरभर थोडक्याच वेळांत पसरे. हीं पत्रें जरी बातम्यांनीं युक्त असत तरी त्यांच्यांत व आजच्या वृत्तपत्रांत फार फरक आहे. या 'अखबारां'मधून फक्त काय "काय घडलें" एवढेंच कळे. पण कसल्याहि विषयाची चर्चा अगर राजकारण व समाजकारण यांविषयीं उहापोह यांचें त्यांत नांवहि नसे. हीं चाल मराठी राज्यांतहि होती, व नानाफडणविसांच्या कारकीर्दींत तिचा फारच प्रसार झाला. सर्व हिंदुस्थानामध्यें मराठ्यांची राज्यसत्ता जसजशी संस्थापित होऊं लागली तसतसे तिजबरोबर अखबारनवीस देखील सर्वत्र पसरूं लागले. चोहोंकडच्या राजकीय उलाढालींच्या गुप्त बातम्या राखणें हें चतुर मुत्सद्यांचें पहिलें कर्तव्य होय. नानाफडणविसांनीं किती उत्कृष्ट रीतीनें सिद्धीस नेलें, हें दाखविण्यास त्यांच्या कारकीर्दींतील अखबरा पुऱ्या आहेत. इंग्रज, निजाम, पाटीलबाबा, हैदर, टिपू, नागपूरकरकर भोसले, होळकर, दिल्लीचे बादशाहा, लखनौचे वजीरप्रभृती सर्व बड्या प्रकरणाजवळ नानांचे गुप्त हेर असत. ते तेथील आखबार लिहून पाठवीत असत. श्रीमंत पेशवे व नाना यांस रीतीप्रमाणें दरबारी पत्रें त्या त्या संस्थानिकांकडून, सरदारांकडून किंवा वकिलांकडून येत असत ती वेगळी. परंतु त्याशिवाय गुप्त रीतीनें ह्या अखबार येत असत. त्यामध्यें कच्ची हकीगत सविस्तर लिहिली जात असे. अशा अखबारा दिल्ली, लखनौ, भागानगर, श्रीरंगपट्टण, कलकत्ता, मद्रास व पांडेचरी येथील परराज्यांतील वकीलहि परस्परांस पाठवीत असत, व त्यावरून पुनः पुण्यास बातमी जात असे. त्यामुळें एकाच गोष्टीचे सर्व ठिकाणांहून प्रत्यंतर पुरावे मिळत असत. उदाहरणार्थ महादजी शिंद्यांनीं गुलाम कादराचा वध करून शहाअमल बादशहास तख्तनशीन केलें ही बातमी दिल्लीहून सविस्तर पुण्यास येत असे, व पुन्हा तीच भागानगराहूनहि कळत असे. कित्येक ठिकाणच्या आखबारा सावकार लोकांकडूनहि जात असत. नानाफडणविसांनीं ह्या कामावर अति शोधक व मतभेदतत्पर अशीं माणसें ठेविलीं होतीं. निजामच्या दरबारीं निंबाजी माणकोजी म्हणून एक फार प्रख्यात आखबारनवीस होता. दिल्लीच्या दरबारीं गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव हे वकील असत. ते बादशाही आखबार लिहून पाठवीत असत. महादजी शिंदे यांजकडील आपाजी राम हे दरबारी पत्रें लिहित असत. जोधपूर जयपुराकडील वकील कृष्णाजी जगन्नाथ हे रजपुतांचीं राजकारणें कळवीत असत. होळकराकडील नारो हरि हे सर्व तिकडील वर्तमानपत्रें लिहीत असत. नागपूरकर भोसल्याकडील दिनचर्या श्रीराम सदाशिव हे लिहीत. तात्पर्य, सर्व हिंदुस्थानमध्यें प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणीं नानांचे आखबारनवीस होते. ह्यांची बातमी देण्याची अगदीं कमाल असे. ह्यांच्याकडून कित्येक सरदारांच्या दिनचर्या देखील लिहिल्या जात असत.

हिंदी अखबारांचे नमुने

इंग्रज लोक हिंदुस्थानांत आपल्या आतषबाजीचें कौशल्य दाखवून एतद्देशीय संस्थानिकांस संतुष्ट करीत असल्याचें दाखले सांपडतात. लखनौच्या नबाबाच्या दरबारीं, इ. स. १७९० चे सुमारास इंग्रजांनीं आतषबाजीचा म्हणजे दारूकामाचा एक अपूर्व तमाशा दाखविला होता. त्याच्या वर्णनाचें बातमीपत्र लखनौच्या वकिलानें नानाफडणविसांना पाठविलें आहे. ते मनोरंजक असून त्यांत त्या वेळच्या इंग्रजी दारूकामाचें मजेदार वर्णन आहे, म्हणून मासल्याकरितां येथें दिलें आहेः—

[१]

"करारनामे इंग्रज आतशबाज विलायतेहून कलकत्त्यास येऊन, आतशबाजीच्या हुनरांत आपलें हातचें कौशल्य कलकत्तेकर साहेबाला कस दाखवून, दोन वेळ मातबर इनामें कडोन सरफराज झाला होता. ही गोष्ट चहूंकडे बाजट व दुनियांत महशूर झाली. मिस्तर इडोर व अलपूसाहेब बहादर लखनौकर यांनीं त्याची उत्तम विद्या पाहून कीं ते या मुलखाच्या सदरांस अपूर्वतर आहे सबब आतशबाज पाठवून देण्याकरितां कलकत्यास लिहिलें सहा महिने झाले कलकत्तेकराच्या बमोजीब आतशबाज मजकूर लखनौत येऊन आतशबाजी तयार करीत होते. त्यास आतशबाजी तयार झाल्यावर इडोर व अलपूसाहेब यांनीं चंद्र १९ मोहरमी हरकाराच्या जमातदाराच्या हातीं मिर्जा आमानी यांस सांगून पाठविलें. संध्याकाळीं ऐन तयारीच्या समयीं तुकडा आकाशीं प्रगट झाला म्हणजे ढग आला. सबब, ते दिवशीं महकूफ ठेऊन, चंद्र २० विसावीचे रात्रीं तमाशा पहावयाचे ठरावांत आले ते दिवशीं मिर्जा आमानी वाटेंतून फिरून आपल्या घरीं दाखल झाले. आज चंद्र २० विसावीच्या रात्रीं तमाशा पाहावयाचें ठरावांत आले. ते दिवशीं मिर्जा आमानी वाटेंतून फिरून आपल्या घरीं दाखल झाले. आज चंद्र २० विसावीच्या रात्रीं आभाळ स्वच्छ होते. दुसऱ्यानें तयारी झाली. मिर्जा आमानी हसनरजाखा व हैदरबेगखा व राजे मंगतराव व सर्व कारभाऱ्यांच्यासहित मिस्तर इडोर व अल्पूसाहेब यांच्या मकानीं बिबिपुरास गेले. करार अतीशबाज यांनीं प्रथम अतशबाजी.........तयार केली, व एका चौकोन्या खांबावर पुतळा [उभा केला]. निश्चय केला होता कीं, बंदूक लागतांच हाच पुतळा आतशबाजीस सुरू होईल. त्यास कितीएक इंग्रजांनीं बंदुका मारल्या, निशाण लागलें नाहीं. राजे जवानसिंग यांनींही बरकंदाजी चांगली केली. गोळी निशाणास न लागली. शेवटीं मिर्जा अमानी यांनीं खाशीबंदूक घेऊन आपल्या स्वहस्तें सोडली, तथापि निशाण चुकलें. या घालमेलींत रात्र प्रहराहून अधीक होऊन गेली. करार मजकूर यानें पुतळ्याचा तमाशा तहकूब ठेऊन, आपल्या हातानें एका आतशबाजीच्या झाडास बत्ती दिली. त्या झाडांतून अपूर्व फुलें निघाली, कीं, कधींहि कोणी पाहिली नसावी. एका नळाच्या कुलाब्यांतून भडका निघाला. त्यांतून हे दृष्टीस येत होते कीं, दाऊदीचीं फुलें व केशराच्या कपाऱ्या व हिरवी फुलें लवलवीत व सुरुची झाडें प्रफुल्लित व लसलशीत जशी बागांत उत्पन्न होतात तशी प्रगट झालीं. हा तमाशा एक घटकापर्यंत राहिला तों एकाएकीं दुसऱ्या नळ्यांतून भडका निघोन असमानांत गेला. त्यांतून सितारे आकाशांत उंच जाऊन फिरते समयीं रंग दुसरा म्हणजे सहस्त्रावधी सर्प फणा, काढून पृथ्वीवर पडत होते. त्याचप्रमाणें आणखी आतशबाजींतून शतावधी मासे मोठे आतशबाजीच्या रोशनीतून निघोन, सिताऱ्याप्रमाणें आकाशांतून पृथ्वीवर पडत होते. त्याचप्रमाणें त्यानंतर एका क्षणांत आतश–बाजीतून पर्जन्याचा मोसम पैदा झाला. पर्जन्याची वृष्टि झिरमिर नजरेस पडूं लागली, व दुसऱ्या आतशबाजीच्या झाडांतून अपूर्व नक्षा दृष्टीस आला. म्हणजे एक मशीद ती गजांची, बहुतच अपूर्व तर प्रगट झाली. कांहीं वेळ हाच नक्षा कायम राहिला. तो त्यांतून एकाएकी बंदुकींच्या व तोफेच्या शलकेचे आवाज सुरू झाले. आवाज येथवर उंच होऊं लागले कीं, बिबिपुराहून लखनौच्या लोकांनीं ऐकले. हा तमाशा समाप्त झाला कीं, एका आतश बाजीच्या नळाच्या भडक्यांतून सूर्य बाहेर येऊन आकाशीं चालला, व आरल्या प्रकाशेंकडून त्या मैदानास प्रकाशित केले. असाच चंद्राचाही तमाशा नजरेस आला. शेवटीं एका आतशबाजींतुन सूर्यमुखीच्या फुलाप्रमाणें फूल भ्रमण करीत निघाले व अपूर्व कारागिरी केली होती कीं, त्या फुलाच्या फिरण्यांत ही बात स्वच्छ अक्षरे काढून सर्व लोक तमाशा पाहाणारांच्या दृष्टीस आली. करारानें सफदौला बहादूर यांच्या एकवळेकडोन आपली कामगिरी नादर केली. सारांश, अशी आतशबाजी होती कीं, मागेही कधीं कोणी ऐकली नाहीं व पाहिली नसावी. सर्व लोकांनीं इंग्रजांस बहुत शाबासकी दिधली, व दीडप्रहर जालियावर मिर्जा आमानी तेथून स्वार होऊन आपल्या घरीं दाखल झाले. चंद्र २१ एकवीसचे प्रातःकाळीं सर्व कारभाऱ्यांनीं खिलत दिलें. मिर्ज़ा गुलामहुसेनखानास पांच पारचाचा खिलत पश्चिमेच्या रुखसतेबाबत देऊन, दोन घटका दिवस चढल्यावर कूच करून सैरजुमाडेऱ्यांत दाखल झाले".

[२]

अपत्यें गंगाधरानें कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध २ पावेतो मुक्काम पुणें येथें वडिलांचे आशीर्वाद क्षेम असो विशेष. राजकी वर्तमान लोहगडावरील गृहस्थाची फारच घालमेल पडली. राजश्री त्रिंबक विनायक यांस दिवाणगिरी जामिनी दाखल कबूल केली. पंधरा हजार फौज़ पदरची ठेवावी. [असा ठराव झाल्याची] बाजारी वदंता आहे. कांहीं दरबारीं बोलतात. सत्यमिथ्या भगवान जाणे. इकडे इष्ट चिन्हें याप्रमाणें जाहलीं खरीं.

मौजे निंबगांव टांकळी, घोडनदीतीर, येथें ज्येष्ठ वद्य एकदशीचे दिवशीं सायंकाळीं दिवस दोन घटका ते समयीं गांवचें दहा पांच माणूस गांवकरी तीरास गेले होते. तेथील कौतुक—मेघडंबर आलेसें जाहलें. आणि अकस्मात् एक मोठा घागरी एवढा वाटोळा दगड एक पडला आकाशावरून. तो भूमिगत होता. तो तेथून धूर निघाला तो आभाळास लागला. तेव्हां वर गर्जना जाहली. वृष्टी एक त्रिघा पावेतों दगडाचीं जाहली. हें कौतुक जवळील पाहात आहे तों तो दगड घोड्याएवढा जाहला. गडबडत नदींत गेला. हे भयभीत तोंपर्यंत होते. मग सावध होऊन जागा बघितला तों हातभर खोल मात्र आहे. आणि बिघाभर दगड पडले आहेत. त्याणी गांवांत जाऊन सांगितलें. मग सर्वभोंवर गांवांमधील (लोक) पाहण्यासीं आले. तेथून ही फडणिसानीं कारकून पाठविला. तो देखील पाहून आला.

पुरंदर घेतला आणि नीलकंठ महादेव तेथें गेले तेव्हां तेथून बाळोबा मांडवगणे सासवडास गेले. होते. तेव्हां गांवाजवळ संगमेश्वरदेव आहे. तेथील नदीमध्यें विहिरा होता. त्यांतील झऱ्यास रक्त येऊं लागलें. ते समयीं हे स्वतः गेले आणि त्यांत अंगवस्त्र टाकलें. तें भिजलें तों रक्ताप्रमाणें पाणी, आणि पिळिलें तों रक्त पडलें. असें तीन दिवस होत होतें. त्यास एक महिना जाहला.

(हें पत्र राजश्री गंगाधर बापूजी ओक फडणीस यांणीं पुण्याहून आम्हांस पाठविलें. त्याची नक्कल करून वडिलांस पाहावयास पाठविली आहे.)

[३]

सेवेशी. विसाजी नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १२ जमादिलावलपर्यंत यथास्थित असे विशेष. स्वामीकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

नाहीं. तरी सविस्तर लिहावया आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व अप्पासाहेब लिहितात त्याजवरून विदित होतच आहे. काशीयात्रेचा मजकूर तूर्त सालमजकुरीं दमलासा दिसतो. कारण राजश्री हरिपंततात्यांची पोटदुखी बरी होत नाहीं, यास्तव उपाय नाहीं. याजमुळें राहण्याचा विचार दिसतो. राजश्री गोविंदराव गायकवाड यांस वस्त्रें दिलीं; परंतु त्यांस कोणी धनवान दिवाण मिळत नाहीं. सरकारचीं फौज द्यावयाची त्यांजसमागमें रास्ते यांनीं जावें असें घाटत आहे. सात हजार फौज व तीन हजार गाडद सरकारची द्यावी असें ठरविलें आहे. मानाजी गायकवाड यांचेंहि बोलणें लागलें आहे. पन्नास लाख रुपये देतो, व याखेरीज दरबार-खर्च व गोविंदराव यांचे समजुतीबद्दल कांहीं मुलूखहि देईन म्हणतो. परंतु यांणीं वस्त्रें दिलीं याजमुळें अवघड पडलें आहे. मग काय घडतें पहावें. शिंदे यांचा हिशेब तूर्त पहात आहेत. शिंदे याणीं कर्ज सरकारवर सात कोटी काढलें आहे! 'कर्ज मागत नाहीं, परंतु हिशेबांवर मखलासी करून द्यावी. कर्ज महाल मुलूख आहे. त्या ऐवजीं फेडून घेऊं;' असें बोलतात. आम्हाकडील हिशोबाचे वगैरे अद्यापि कांहीं जबाबसाल नाहींत. मामलती हुजूर विल्हे लावणें. तरी लावाव्या; परंतु आमचे स्वारीचा फडशा झाडून करून द्यावा; अशी बोलणीं पडलीं आहेत. सरंजामाचे महाल तूर्त सोडीत नाहीं म्हणतात. काय ठरतें पाहावें. भाऊसाहेबांचें म्हणणें आणखी पंधरा रोज वाट पाहीन. नाहींतर मुलाचा व्रतबंध करावयास निघून जाईन यांचें म्हणणें व्रतबंध येथेंच करावा. भाऊसाहेबांचें म्हणणें येथें करीत नाहीं. ऐशीं बोलणीं पडलीं आहेत. नानांचे तो रहाणें जाल्याचा भाव दिसतो. माघ मासांत निश्चय होईल. शिंदे नेहमीं तळ धरून बसले आहेत. जाण्यायेण्याची वार्ता देखील बोलत नाहींत. तात्या सिद्धटेकाहून जाऊन आले. परंतु पोटदुखीस गुण येत नाहीं. पोट दुखतच आहे. तात्यांचे स्त्रीस देवी आल्या आहेत. पुण्यांत महागाईचा कडाड भारी. चार साडेचार शेर धारण जाली आहे. राजश्री आनंदराव व हरबाजीराव धुपळ यांस आरमारचा सुभा सांगितला आहे. पुण्यांत गल्ला आणावयाचा उद्योग केला आहे. गुजराथेंत पीक जालें आहे. तिकडून जलमार्गे आणावा ऐसें केलें आहे. शिंदे याजकडील फौजा हिंदुस्थानांत आहेत. त्यापैकीं अंबोनी इंगळे उदेपूरच्या बंदोबस्तास ठेविले होते. उदेपूरकरांचा कारभारी होता. त्यानें कुंभळनेर किल्ला पहाडी होता तो बदलून होता. त्याजवर उदेपूरकर यांचा खजिना बहुत होता ऐशी वदंता आहे. तो किल्ला इंगळे याणीं घेतला, म्हणोन पत्रें आलीं, त्याजवरून खुशीच्या तोफा सरकारच्या पंचवीस व शिंदे यांच्या जाहल्या. फत्ते जाली. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब काल श्रीमंताकडे दादांस नातू जाला याची साखर घेऊन गेले होते. शृंगेरीकर स्वामी येथें आले आहेत. त्यांचा खटला पडला आहे कृपा लोभ असावा हे विज्ञापना.

[४]

"अपत्यें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीमतांचे लग्नांचा निंच्छय जाल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. फाल्गुन शु॥ ८ भौमवारीं प्रहर दिवसास देवक प्रतिष्ठा जाली. उपरांतील श्रीमंत दुसरे मजल्यावर दिवाणखान्यांत बसले. तेथें अहेर जाले. आम्ही त्रिवर्गांनीं अहेर केला. पागोटी बांधुनच नेली तीं श्रीमंतांनीं डोईस घातली. वरकड पुढें चवरंगावर ठेवीत आणि नमस्कार करीत. याप्रमाणें तीनचार घटका बैठक झाली. उपरांतिक श्रीमंत भोजनास गेले. संध्याकाळीं सीमंतपूजन जाले. उपरांतीक वाग्निश्चय करावयास नाना गेले. वाग्निश्चय जाला फाल्गुन वद्य ९ सौम्यवारीं चार घटका दिवसास प्रस्थांनास बोलावयास आले. सात घटका दिवसास श्रीमंतांची स्वारी निघाली. राजश्री महादजी शिंदे आले होते. अकरा घटका दिवसास स्वारी राजश्री गणेशपंत गोखले खासगीवाले यांचे वाड्यांत आहेत तेथें दाखल जाली. खासगीवाले यांचे वाड्याचे पाठीमागील बागेंत वाड्यालगत सरकारचा दलबादल डेरा दिला आहे तेथें झाडून मुत्सद्दी व सरदार यांची बैठक झाली होती. चवदा घटका दिवसास लग्न जालें. तोफांच्या सरबत्या जाल्या. राजश्री महादजी शिंदे याणीं अहेराचें जवाहीर दिलें. कडी जडावाचीं सिंहाचे तोंडाचीं दोन, कंठी मोत्यांची एक, शिरपेंच एक, याप्रमाणें व वस्त्रें, येणेंप्रमाणें दिलीं. जवाहीर किंमत अजमासें पंचवीस हजारांचे होतें. तिसरे प्रहरीं इंग्रजाकडील मालीट अहेर घेऊन आला. त्याणीं वस्त्रें व जवाहीर कंठी मोत्यांची एक जेगा एक व पोंच्या नवरत्नांच्या दोन व शिरपेंच एक व श्रीमंत सौ॥ बाईसाहेबांस पोंच्या दोन येणेंप्रमाणें दिलें. राजश्री नाना फडणीस याणीं वस्त्रें व जेगा व शिरपेंच येणेंप्रमाणें दिले. राजश्री मानाजी गाइकवाड यांजकडील वस्त्रें व कंठी व बुंदेलें यांजकडील वस्त्रें व कंठी व बुंदेले यांजकडील वस्त्रें व कंठी येणेंप्रमाणें आहेर जाले. आम्ही व तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबानी व दादानी वस्त्रें व कंठी एक एक दिली. रात्रीं श्रीमंताजवळील चौकीस आम्हाकडील फौज तीर्थस्वरूप राजश्री दादा घेऊन राहिले होते. दशमीस श्रीमंतांचे पंक्तीस भोजनास आम्हांस मंडळीसह त्रिवर्गांस बोलाविले होते. आणखी मुत्सद्दी वगैरे पांचशे असामी भोजनास सांगितले होते. राजश्री शिंदे यांचे नातू दौलतराव यांसही बोलाविले होतें. दहा घटका दिवसास भोजन जाहलें. श्रीमंत मजलसीस डेऱ्यांतच आले होते. दोन तीन घटका मजलस जाली. तेव्हां शिंदे यांच्या नातवानी श्रीमंतास बादली पोशाख व श्रीमंत सौभाग्यवती बाईसाहेबास बादली चोळी पातळ व बोढणी व जवाहीर तनमणी पाचेचा एक व जडावाच्या कंगण्या जोड एक छंद जोड एक व गळेसरी पाचेची व हिऱ्याचे ताइताची एक येणेंप्रमाणें दिली. उपरांतीक श्रीमंत निजावयास गेले. शिलेदार वगैरे यांजकडील अहेर समय पाहून तीन दिवस नेहमीं होत होते. एकादशी गुरुवारीं श्रीमंत रुसून सरकारच्या वाड्यांत प्रातःकाळीं आले. प्रहर दिवसास फिरोन स्वारी खासगीवाले यांचे वाड्यास गेली. ते दिवशीं शास्त्री व पंडित यांस फराळास बोलाविलें होतें. रात्रीं आठ घटका रात्रीस सारी मंडळी सरकारचे वाड्यांत जमा जाली. आणि खासगीवाले यांचे वाड्यास चवदा घटका रात्रीस गेले-सोळा घटका रात्रीस ऐरणीपूजा जाहल्यानंतर स्वारी निघाली. शिंदेही आले होते. श्रीमंत उभयतां अंबारींत बसले होते. खवाशींत राजश्री आप्पा बळवंत होते. अतस-बाजी बहुत जाली. व चिराखदान केलें होतें. स्वारी बराबर नेहमीं जातां येतां माही-मरातब व तमनतोगा हत्तींवर होते, व नालकी स्वारींत जिलबीस होती. स्वारी साडेवीस घटका रात्रीस वाड्यांत दाखल जाली. तोफांची सरबत्ती जाली. लक्ष्मीपूजन जालें. श्रीमंत सौ॥चे नांव यशोदाबाई ठेविलें. पहांटेची चार घटका रात्र राहिली. तेव्हां श्रीमंत निजावयास गेले. काल द्वादशीस रा॥ गणेशपंत गोखले मंडळीसह वाड्यांत भोजनास आले होते शंभर सव्वाशे असामी भोजनास आली होती. त्यांस वस्त्रें दिलीं. आज त्रयोदशीस श्रीमंत मांडवपरतणीस भोजनास गेले होते. मला व ती॥ रा. भाऊसाहेब व दादांस श्रीमंतांनीं बराबर भोजनांस जावयास बोलाविलें होतें. वडिलांस कळावें. आम्हाकडील पाण्याचे कारखान्यांवर ती. रा॥ श्रीपतराव व वासुदेव काका होते. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

[५]

१ श्री॥ राजश्री बाजीराव बाबासाहेब यांस व अमृतराव जुन्नरास आहेत त्यांस सहकुटुंब बऱ्हाणपुरास ठेवावें. उभयतांस एकी जागा पांच सात लक्षांची जहागीर द्यावी. बाबासाहेब याणीं दौलतीस राज्यास अधिकार नाहीं ऐसें पत्र श्री॥ राजश्री अपासाहेब प्रधान यांचे नांवें लिहून द्यावें (असें ठरलें)

१ दौलतराव बावा शिंदे अलिजा बहादूर याणीं वानवडीवर छावणीस येऊन राहावें, (हा बेत केला). बारामतीची कहीं जाहली. चिंधीबोळा गेला.

१ राजश्री नानाकडील कारकून टिपूकडे गेला आहे.

१ श्री॥ राजश्री बापूसाहेब यांचें लग्न शु. पंचमी भृगुवारीं चोवीस घटका दिवसास जाहलें. चार रोज समारंभ बराच जाहला. आज साडे होणार.

१ मीर जुमला नबाबाकडील येथें येऊन गुदस्तां राहिले. त्यांस शिद्यांनीं धरून नेलें. पांचसातशे करोल येऊन घेऊन गेले.

१ रायगडच्या रोखे चार पलटणें रवाना जाहलीं. घाटमाथा राहावें ऐसा हुकूम आहे. - श्रुत होय. पत्र दुसऱ्यांनीं पाहूं नये. हे विज्ञापना.

[६]

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ. सफर मु॥ पुणें येथें वडिलांचे आशिर्वादें करून सुखरूप असो विशेष. वडिलीं छ. ३ सफरचे आशिर्वाद पत्र पाठविलें तें छ. ६ मिनहून पावलें. लिहिला मजकूर कळला. सुंदर गज हत्ती कालच येऊन पावला. घोरपडे यांजकडील स्वार पाठवून देतों म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान तर छ. ५ सफरीं बारा घटका दिवस आल्यानंतर रमण्यांत दक्षणेस प्रारंभ करावयास श्रीमंताची स्वारी निघाली. मला बरोबर येणेविशीं सरकारचें बोलावणें आलें होतें. स्वारीबरोबर गेलों. स्वारी पर्वतीस जाऊन पर्वतेश्वराचें दर्शन घेऊन रमण्याचे दरवाज्यांत गेले. बारा घटका दिवसानंतर प्रारंभ जाला. मग मला आज्ञा केली जे तुम्ही दुसरे दरवाज्यावर दक्षणा द्यावयास जावें. त्यावरून मी व चि॥ रा॥ महादेवराव दाजी येणे प्रों॥ जाऊन दक्षणेस प्रारंभ केला. नेमणुके प्रों॥ शास्त्री वैदिक पंडित वगैरे आले होते. नेमणुकीची याद व ब्राह्मणांस दक्षणा द्यावयाचे प्रतीची याद होती त्या प्रो॥ द्यावयास प्रारंभ केला. दोन तीन घटका दक्षणा दिली. उपरांतीक श्रीमंतांची स्वारी आली. अर्ध घटका बसोन दक्षणा दिली. उपरांतिक तिसरे दरवाज्यास स्वारी गेली. मला आज्ञा झाली जे दक्षणेस बसावे. उपरांतिक चार घटकेनें ती॥ रा॥ भाऊसाहेब आले. बरोबर सारे मुत्सद्दी होते. एक दोन घटका दक्षणा देत होते. उपरांतिक अप्पाशास्त्री यांचें बंधु वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री यज्ञेश्वरशास्त्री आले. नंतर शास्त्रीबाबा दक्षणा द्यावयास संध्याकाळीं बसले. आम्ही संध्येस गोटास गेलों. संध्या करून चार घटका रात्रीस दरवाज्यावर आलों. पहाटेच्या चार घटका रात्र राहील तव पावेतों शास्त्रीबावाच दक्षणा देत होते. उपरांतिक वेदमूर्ति राजमान्य राजश्री भास्कर दीक्षित यास दक्षणा द्यावयास बसविलें, आणि पहाटेस स्नानाकरितां मी गोटांत गेलों. स्नान संध्याकरून फिरोन चार घटका दिवसास गेलों. तेव्हां चि॥ रा॥ दाजी दक्षणा देत होते. ते फराळास आपल्या गोटांत गेले. मग मी दक्षणा द्यावयास बसलों. दहा बारा घटका दिवसास श्रीमंत आले. अर्ध घटका बसले होते. उपरांतिक स्वारी गेली. रात्रौ श्रीमंत रमण्यांतच राहिले होते. भोंवतालच्या फौजा चौकीस होत्या. आम्हाकडील फौज सुद्धां राजश्री गणेश गोविंद आमचे दक्षणेच्या दरवाज्याबाहेर उभे होते. संध्याकाळीं दिवसास राजश्री दौलतराव शिंदे आले, व राजश्री बापू होळकर व भोसले यांजकडील वकील आले होते. शिंदे याणीं घोड्यावर बसून रमण्यांतूनच ब्राह्मणास प्रदक्षिणा केली. श्रीमंतानीं रमण्यांतून पायउतारा एक व बाहेरून पायउतारा अनवाणी एक येणे प्रमाणें दोन प्रदक्षिणा केल्या आणि पर्वतीवर डेरा दिला होता तेथें ब्राह्मणांचा तमाशा पहात बसले. अस्मानीं ब्राह्मण सारे झाले. उपरांतिक तोफांचे बार करविले. ब्राह्मण जाण्याचे वाटेवर हिलाल लाविले होते व चंद्रजोतींहि बहुत लाविल्या. दोन तीन घटका रात्रीं ब्राह्मण सारे

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

रमण्यांतून निघाल्यानंतर श्रीमंताची स्वारी निघाली. मद्दतापा लावीत बुधवारांतून वाड्यांत आली. दक्षणा देणाऱ्याच्या नेमणुकीची व द्यावयाचे नेमणुकीची याद सरकारांतून जाली होती तिच्या नकला पाठविल्या आहेत.

[७]

विज्ञापना. पर्जन्य इकडे चांगला होऊन पाणी जाहलें नाहीं. पर्वतीचे तलावास पाण्याचा बिंदु नाहीं ! विहिरींस मोटा लावून रमण्यांत तळें आहे त्यांत पाण्याचा पाट आणून सोडला होता. पुण्यापासून चार कोसांवर मावळांत पर्जन्य चांगला लागतो. नगराकडील वर्तमान तर संन्यासग्रहण केलें. हें खरें किंवा खोटें याचे चौकशीस राजश्री मोरो त्रिंबक गोडबोले गेले आहेत. नगरच्या किल्यावर शिंदे यांजकडील निशाण चढलें. विसाजीपंत वाडदेकर यांस (आपण) पत्र पाठविलें होतें त्यास ते पूर्वीच देवाज्ञा जाहले. नगराकडील गृहस्थांनीं संन्यास घेतला नाहीं. शिखासूत्र मात्र टाकिलें होतें, व वस्त्रेंही भगवीं केलीं होतीं म्हणोन बाजारवदंता फार आहे. परंतु संन्यास घेतला नाहींसें वाटतें. इकडे येण्याचें स्तब्ध आहे. पुढें काय होतें पहावें. बाजारांत अवाया भारी उठतात, त्या कागदोपत्रीं देखील लिहावयास येत नाहीं. इतक्यास्तव जोतीस जवानी विनंति करावयास सांगितली आहे. विनंति केल्यानंतर सर्व विदित होईल. श्रीमंत बाजीरावसाहेब यांणी उत्कृष्ट दक्षणा दिली. श्रीमंत कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब ज्याप्रमाणें देत होते त्याप्रमाणें दिली. (असे-) जुने मनुष्य आहेत ते बोलतात. पंचमेळ खिचडी केली. त्यांत मोहरा व पुतळ्या व होन व मौक्तिक व रुपये, याप्रमाणें दिली म्हणोन गोविंदराव निलकंठ खाजगीवाले बोलिले. वडिलांस कळावे करितां विनंती लिहिली आहे. शेरा दक्षणेचा मागाहून लिहून पाठवितों. व जें आढळेल तें लिहून पाठवितों. कळावें. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना. शेरा आणून पाठविला आहे हे विज्ञापना.

[८]

१ कैं॥ श्रीमंत दादासाहेबांच्या वेळचीं मनुष्यें दोनशें पावेतों होतीं तीं सर्व आलीं. हजिरी होऊन खर्चास पावलें.

१ जुनरास श्री॥ राजश्री अमृतराव साहेबांकडे दोन अंबाऱ्या विझोल हत्ती व पांच घोडे बहुत शिरा ऐसे रवाना केले.

१ राजश्री मानाजी फांकडे व केसो कृष्ण व आणखी एक गृहस्थास मिळोन पांच सहा हजार फौज ठेवण्यास आज्ञा जाहली. फांकडे बाजीराव बर्वे ऐसे खलबतांत नेहमीं.

*कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें बाळसाहेबास पत्र.

१ बळवंतराव नागनाथ यांस सुटका जाहली. मशार निल्हेचे पागेचे फडणीसराव यांस आणावयास गेले. दोन रोजांत येतील.

१ कै॥ रावसाहेबांचें वाळेबंदी शिरपेंच वगैरे सर्व जवाहीर आणोन (बाजीरावसाहेबांनीं) खुद्द पाहिलें. सुवर्णाची उपकरणीं वगैरे पाहिलें. वडिलांस विचारून आणवावीं तें न घडलें.

१ छ० १९ रोज बुधवारीं श्रीमंतांची स्वारी श्रीचिंतामणीस जाऊन अकस्मात वडिलांचे डेऱ्यास आली. वडिलांनीं श्री॥ राजश्री बावासाहेबांस आपले गळ्यांतील नवरत्नाची माळ्य आपासाहेबास शिंदे यांणीं दिलेली कंठी व दोन पोषाख दिले. येक घटका स्वारी बसली होती.

१ हिंदुस्थानांत इंग्रजांनीं व अली गोहर यांचे चिरंजीव यांणीं मसलत करावी हा उद्योग केला. त्याजमुळें शिंदेकडील डभई व फौज दिल्लीस गेली. डभई याचा फितवा ऐसेही आवई आहे. एकंदरांत हें खरें असेल तर पायबंद भारी बसला. बहुत करून खरें आहे,

१ शिंदे यांचें म्हणणें राजश्री नाना कारभार करीत नाहींत ही गोष्ट सिद्ध जाहली. परंतु टिपू, नवाब, इंग्रज वगैरे रजवाडे यांस पत्र लिहून आम्हाजवळ द्यावीं कीं, 'बाळाजी जनार्दन यांचा कारभार काढिला. त्यांचें पत्र आलें असतां मंजूर नाहीं.' एशीं पत्रें लिहून द्यावीं.

१ सरकारांतून बोलणें पडलें आहे कीं (नानानीं) कारभार सोडिला, परंतु फडणिशी त्यांजकडेच असावी. तेव्हां (शिंद्याचें) उत्तर आलें कीं, गुमास्ता ठेवावा. खाशांनीं परिच्छिन्न येऊं नये.

१ राजश्री नाना फौज पायदळ रुकसन करीत आहेत.

येणेंप्रमाणें बाजारी वार्ता हे विज्ञप्ति (खरे पत्र नं. ३७७८ पा. ४९५५.)

हिंदी पत्रांचे समालोचन

हिंदुस्थानांत ज्या लोकांनीं वर्तमानपत्राच्या धंद्याला प्रथमच हात घातला त्यांतील अग्रेसर राममोहनरॉय यासारखा गृहस्थ होता. येवढें सांगितलें असतां इकडील वर्तमानपत्रांच्या मूळ उत्पत्तीवर चांगलाच प्रकाश पडतो. कोणत्याहि नव्या युगाचा असा धर्मच आहे कीं, त्याचें आगमन नव्या विचारांच्या ललकाऱ्यांनीं सूचित होत असतें. विद्यमान स्थितीविषयीं समाजांत असंतोष असणें ही गोष्ट सर्व देशांत व सर्व समाजाला सारखीच लागू आहे. म्हणजे त्या त्या देशांत निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या साधनांनीं नवयुगाची द्वाही फिरविणारे पुरुष सारखेच निर्माण झाले. पण छापखाने निघण्यापूर्वीची हीं साधनें इतकीं गुणकारी नव्हतीं. इतकेंच काय तें ! मतप्रसार हा एक प्रकारचा भांडवली धंदा आहे असें मानलें तर असें दिसून येईल कीं, इतर धंद्यांत भांडवलाची उलाढाल जितक्या वेगानें होणें कधींहि शक्य नाहीं तितक्या वेगानें ती या मतप्रसाराच्या धंद्यांत होते. या व्यापारांत होणारी ही चक्रवाढ इतर कोणत्याहि धंद्यापेक्षां अधिक तीव्र गतीनें होते. या धंद्यांतलें भांडवल म्हणजे पैशाचें भांडवल नव्हे, तर विचारांचें भांडवल. लिहिणाराचे विचार समाजांत जाऊन पोहोंचणें, समाजांतील विचार परत लेखकाकडे येऊन पोहोंचणें, हींच ती भांडवलाची उलाढाल. समाजांतील जे पुढारी मतप्रसाराविषयीं उत्सुक असतात तेच फक्त या धंद्यांत शिरतात. राममोहन रॉय हे त्यांतलेच एक होत. त्यांची विद्वत्ता, त्यांचा दर्जा ही लक्षांत घेता बंगालसारख्या जमीनदारांच्या संपन्न देशांत त्यांना इतर रीतीनें उदरनिर्वाहाचा धंदा करतां आला नसतां असें नाहीं. किंबहुना त्यांनीं वर्तमापत्रकारांच्या धंद्यांत पैसा मिळविलाहि नाहीं. परंतु धंद्यावरून मनुष्याचें नांव पडत असतें त्या दृष्टीनें पाहिलें असतां 'संपादक' या शब्दापेक्षां इतर कोणत्याहि शब्दानें राममोहन रॉय यांचें वर्णन यथार्थतेनें होऊं शकत नाहीं. ते पुढें आले त्या वेळीं वर्तमानपत्रें छापखाने यांच्यासंबंधानें कंपनी सरकारची दृष्टी थोडी निवळली होती. व छापखाना किंवा वर्तमानपत्र काढणाऱ्याला पूर्वी अटी लिहून देऊनच जे परवाने घ्यावे लागत ते त्या सुमारास बंद झाले, व मुद्रणस्वातंत्र्याचें युग सुरू झालें. परवान्याची पद्धत बंद झाली त्यामुळें वाटेल तसें तोंडसुख घेणारीं गचाळ वर्तमानपत्रें वाटेल तितकीं निर्माण होऊं लागलीं असा मात्र त्याचा अर्थ नाहीं. तथापि उलट मुद्रणस्वातंत्र्य मिळालें म्हणून वर्तमानपत्रकारांचा जो दर्जा पूर्वी होता तो एकदम सुधारला असेंहि घडलें नाहीं. सर्व गोष्टी हळूहळूंच वृद्धिंगत व्हाव्या लागतात. एरवीं ताशीं ३ मैल चालणारा मनुष्य पायांत बेड्या घातल्या असतां ताशीं अर्धा मैल चालूं शकणार नाहीं हें खरें; पण केवळ बेड्या निघाल्यामुळें तो ताशीं १० मैल चालू लागतो असेंहि घडत नाहीं. पायांतील बेड्या ही उपाधी खरी; पण मनुष्याची गती मुख्यतः त्याच्या पायांच्या खंबीरीवर व त्याच्या सांध्याच्या स्नायूंच्या सकसपणावर अवलंबून असते. १८३३ सालीं छापखाने वर्तमानपत्रें यांजवरील नियंत्रण निघाल्यानें पूर्वीच्या आपत्ती टळल्या इतकेंच काय तें ! पण हिंदी लोकांना अजून नवी विद्या पुष्कळ शिकावयाची होती; आणि जुन्या विद्येचाहि नव्या रीतीनें उपयोग करण्याचें शिकावयाचें होतें.

शिवाय वर्तमानपत्रकार मोठा फर्डा लिहिणारा झाला तरी त्याचें चीज करण्याला वाचकवर्गहि वाढावा लागतो. तो वाढावयाचा म्हणजे सामान्य शिक्षणाचा फैलाव समाजांत व्हावा लागतो. १०० वर्षांपूर्वी इकडील समाजांत शिक्षण किती व कशा प्रकारचें होतें हें प्रसिद्धच आहे. अर्थात् त्या काळीं एकादुसरा मनुष्यच पुढें यावा, व त्याच्या वर्तमानपत्राला वाचकवर्ग मूठभरच मिळावा, यात आश्चर्य नाहीं! आणि राजा राजमोहन रॉय यांच्या लेखांचे वाचक किती होते व त्यांची विद्वत्ता कोणत्या दर्जाची होती याची तुलना तत्सदृश आजच्या गोष्टींशीं कोणी केली असतां, वर्तमानपत्रकारांच्या यशाच्या गमकाविषयीं पूर्वी जें सांगितलें तें वाचकांना पटेल. त्या कारणाचीं तीं कार्यें चहूंकडे दिसून येणारच! बंगाल्यांत राजा राममोहन रॉय यांनी ज्या कारणानें वर्तमानपत्र सुरू केलें त्याच कारणांनीं इकडे मुंबईस भाऊ महाजन यांनीं 'प्रभाकर' वर्तमानपत्र सुरू केलें. तथापि राममोहन रॉय यांनीं इंग्रजी भाषेचा स्वीकार केल्यामुळें व ते विलायतेंतहि जाऊन आल्यामुळें वर्तमानपत्रकार या नात्यानें त्यांना जी प्रसिद्धी मिळाली ती एका प्रांतिक भाषेंत, म्हणजे मराठी वर्तमानपत्र चालविणाऱ्या भाऊ महाजन यांना मिळाली नाहीं. पण हिंदुस्थानांतील वर्तमानपत्राचा इतिहास लिहिणाऱ्याला समकालीन अशा या दोन संपादकांचा उल्लेख बरोबरच करावा लागेल. असो.

या देशांतील प्रत्येक प्रांतागणिक वर्तमानपत्रांचा इतिहास येथें सांगत बसण्याचें कारण नाहीं. पण गेल्या शतकांत कोटेंकोटें कोणतीं वर्तमानपत्रें व कोणते संपादक नांवारूपास आले हें थोडक्यांत सांगतो. बंगाल्यांत 'रीस अँड रयत' 'हिंदू पेट्रियट' 'इंडियन मिरर' 'अमृत बझार पत्रिका' 'बंगाली' 'इंडियन नेशन' वंदेमातरम्' 'फॉरवर्ड' 'लिबर्टी' 'अॅडव्हान्स' वगैरे इंग्रजी वर्तमानपत्रें प्रसिद्धच आहेत. यातील कांहींचा भाग्यसूर्य अस्तंगत झालेला आहे. तथापि या सर्वांनीं आपल्या परीनें आपल्या काळीं उत्तम लोककार्य केलें. त्यांपैकीं बहुतेक पत्रांचे संपादक नामांकित युरोपियन संपादकांच्या तोडीचे होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. फक्त वाचकवर्ग मर्यादित असल्यामुळें त्याच्या व यांच्या वर्तमानपत्रांच्या खपाची तुलना करतां येणार नाहीं.

राजाराम मोहनरॉय, हरिश्चंद्र मुकरजी, क्रिस्तोदास पाल, राजकुमार सर्वाधिकारी, कृष्णकमल भट्टाचार्य, शंभूचंद्र मुकरजी, शिशिरकुमार घोष, मोतिलाल घोष, नरेंद्रनाथ सेन, एन्. एन्. घोष, सुरेंद्रनाथ बानर्जी, अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल इत्यादि नामांकित संपादक बंगाल्यात होऊन गेले.

मद्रासेकडे हिंदी वर्तमानपत्र सुमारें ५२ वर्षांपूर्वी निघालें. त्याच्या आधीं तिकडे वर्तमानपत्रें विशेष नांवारूपाला आलीं नाहींत. 'हिंदू' हें प्रथम साप्ताहिक होतें

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ते हल्लीं दैनिक असून त्याचा दर्जा, त्याचा आकार, त्याचा वाचकवर्ग व त्याचे वजन ही हिंदुस्थानांतील पहिल्या प्रतींत मोडतात. या पत्रानें आपल्या डोळ्यापुढें ' लंडन टाइम्स ' हें ध्येय ठेविले असून त्यानें त्याचें यशस्वी रीतीनें अनुकरण चालविलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ' हिंदू' पत्र मि. जी. सुब्रह्मण्य अय्य व वीर राघवाचारी यांनीं सुरू केलें! त्यानंतर त्या इलाख्यांत जीं वर्तमानपत्रें निघालीं व पुढें आलीं त्यांत 'मद्रास स्टँडर्ड 'जन्मभूमी' इ. विशेष प्रसिद्ध आहेत.

तामिल भाषेंत ' स्वदेश मित्रम् ' हें एकटेंच प्रसिद्ध पत्र आहे. व तेंहि मि. जी. सुब्रह्मण्य अयर यांनीं सुरू केलें. मद्रासेकडील वर्तमानपत्रकारांत खालील नांवें प्रमुख आहेत—मि. जी. सुब्रह्मण्य अय्य, वीर राघवाचारी, शंकर नायर, नटराजन, करुणाकर मेनॉन, परमेश्वरम् पिले, कस्तूररंग अय्यंगार, श्रीनिवासम, रंगस्वामी अय्यंगार, पट्टा भीसितारामय्या, टी. प्रकाशम् इ. आंध्र प्रांतांमध्यें ' जन्मभूमी ' शिवाय विशेष नामांकित अशीं वर्तमानपत्रें फारशीं नाहींत. नागपूर प्रांतांत पूर्वी रा. पंडीत, पाध्ये, वगैरे वर्तमानपत्रकार झाले वायव्य प्रांतांत पूर्वी पं. विशन् नारायण धार व गंगाप्रसाद वर्मा, हीं दोनच नांवें प्रमुख होती. 'लखनौ ॲडव्होकेट' हें एकच जुनें पत्र प्रसिद्ध आहे. हल्लीं अलहाबाद येथील 'लीडर' पत्र व त्यांचे संपादक मि. सी. वाय. चिंतामणी यांचें नांव प्रसिद्ध असून इतर पत्रांत व लेखकांत खालील नांवें प्रसिद्ध आहेत—

पंजाब प्रांतांत 'ट्रायब्यून', पंजाबी' व 'पीपल' हीं तीनच नांवें प्रसिद्ध आहेत. 'ट्रायब्यून' पत्रांशीं गुप्त बाबू यांचें नांव फार दिवस जोडलें गेलें. ते बंगाली होते. पंजाबी लोकांपैकीं लाला लजपतराय यांनाच प्रमुख संपादक हें नांव देतां येईल. त्यांचे शिष्य हल्लींचे 'पीपल' पत्रांचें संपादक हे तरुण व होतकरू असून त्यांनीं तें पत्र चांगलें चालविलें आहे. स्वदेशी चळवळीचे वेळीं 'दी पंजाबी' या नावांचे वर्तमानपत्र लाला लजपतराय यांच्या प्रोत्साहनानें मि. जसवंतराय यांनीं काढले. पण तें चालविणाऱ्या लाला लजपतराय यांना एकहि चांगला पंजाबी लेखक न मिळाल्यामुळें इकडून लो॰ टिळकांच्या शिफारशीनें रा. रा. के. के. आठवले नांवाचे गृहस्थ तिकडे नेम्यांत आले होते.

हिंदुस्थानांतील छापखाने व वर्तमानपत्रें

[या खालीं दिलेल्या कोष्टकावरून हिंदुस्थानांतील छापखाने, वर्तमानपत्रें इत्यादिकांच्या प्रसाराविषयीं कल्पना येईल.]

सन	छापखाने	वर्तमानपत्रें	मासिकें	इंग्रजी	देशी भाषा
१९२५—२६	५३६	१३७८	३०८९	२११७	१४२७६
१९२४—२५	५३१२	१४०१	३१४६	२३०२	१४७२८
१९२३—२४	४९०९	१३६३	२८८८	२२३७	१३८०२
१९२२—२३	४५०९	१२८२	२५५९	१९५१	१२८०४
१९२१—२२	४०८३	१०९४	२२५२	१८५६	११८०७
१९२०—२१	३७९५	१०१७	२२९७	१६९०	१०१०५
१९१९—२०	३३७१	९४१	२१५२	२०१९	९१६२
१९१८—१९	३१४८	८८३	२०४९	२०९२	९६८७
१९१७—१८	३१५५	८३८	१९९७	१९१६	१०७७२

प्रांत	छापखाने	वर्तमानपत्रें	मासिकें	पुस्तकें	
				इंग्रजी	देशी भाषा
मद्रास	१४८७	३०२	८४७	६१७	२९४१
मुंबई	९३३	३४१	१३४४	२३७	२३५१
बंगाल	११३८	२३९	४२२	६६३	२६६७
संयुक्त प्रांत... ...	७९२	२०३	२९०	२५८	२५१८
पंजाब	४१७	१७५	२८७	२१७	२२१२
बर्मा	३३५	६२	१७१	९	१४५
बिहार, ओरिसा ...	२१०	५४	६१	९४	१७९८
मध्यप्रांत, वऱ्हाड ...	१७०	५४	३७	१६	१६६
आसाम	५५	१८	२६	२	३१
वायव्य सरहद्दीवरील प्रांत	२१	....	५	५	७
अजमीर, मारवाड ...	२६	७	१७	१२	११३
कुर्ग	६	२	२	....	....
दिल्ली	१३४	६०	९८	१७	२९७
एकंदर १९२६--२७ सालीं	५७२४	१५१७	३६२७	२१४७	१५२४६

सन १९२९ सालीं हिंदुस्थानांत जीं वर्तमानपत्रें सुरू होतीं त्यांची एकंदर नांवनिशी वांचकांना उपयोगी पडेल म्हणून आम्ही खालीं देत आहों—

ठिकाण	वर्तमानपत्रांचें नांव
आग्रा	आग्रा अकबर, जैनपथप्रदर्शक, नवयुग, सनध्यापकारक
अहमदाबाद	गुजराथी पंच, नवजीवन, पोलिटिकल मोमियो, प्रजाबंधू, यंग इंडिया
अकोला	प्रजापक्ष
अकयब	अरकान न्यूज
अलीगढ	अलीगड इन्स्टिटयूट गॅझेट
अलाहाबाद	अभ्युदय, भविष्य डेमोक्रॅट, हिंदुस्थान रेव्ह्यू, लीडर, नवयुग, पायोनिअर
अलाहाबाद (कत्रारोड)	स्त्रीधर्मशिक्षक
अलेप्पी	त्रावणकोर पब्लिसिटी ब्यूरो
उमरावती	भारत, उदय
अमृतसर	अकाली टी परदेसी, डेली वकील, गुरुमुखी डेली खाल्सा, पंजाबप्रेस ब्यूरो, कामीदर्द, तंझीम
अमरोहा	इत्तिहाद
असानसोल	रत्नाकर
बागलकोट	कन्नडिग, नवीन भारत
बागेरहाट	जागरण
बंगलोर	डेली पोस्ट, कासीम—उल्—अकबर, दूथ
बारीसाल	बारीसालहितैषी
बडोदा	जागृति, श्री सयाजी विजय
बसई, बरमा	बसई न्यूज
बेळगांव	बेळगांवसमाचार, पारिक्षक, चिकित्सक
बनारस	आज, अवझाई खाल्क, भारतजीवन, हिंदी केसरी, काशी टेंपरन्स समाचार, महामंडळ मॅगेझिन, त्रिशूळ, वर्णाश्रम
भावनगर	डेली मार्केट रिपोर्ट, जैन, जैनहसन, मार्केट न्यूज
भिवणी	संदेश
विजापूर	कर्नाटकवैभव
मुंबई	अकबर—इ—इस्लाम आणि अकबर—इ—सौदागर, मुंबई क्रॉनिकल, मुंबई-समाचार, बुएल कंपनीचा मार्केट रिपोर्ट, कॅथोलिक एॅक्झॅमिनर (Examiner), कमर्शियल स्पोर्टिंग न्यूज, ज्ञानप्रकाश, इव्हिनिंग न्यूज ऑफ इंडिया, गोवा वर्ल्ड, गुजराथी, गुजराथी केसरी, इंडियन डेली मेल, इंडियन इंडस्ट्रीज अँड पॉवर, इंडियन नॅशनल हेरल्ड, इंडियन सोशल रिफॉर्मर, इस्माइली, जाम—ए—जमशेद, केसरी—इ—हिंद, कच्छप, खिलाफत डेली, खिलाफत बुलेटिन, मुफिड रोझगार, मुस्लीम हेरल्ड, नवा काळ, न्यायदर्शक, नझरत, ओ—ॲमिगो—डो-गोवानो, ओ—अँग्लो—लुसिटॅनो, पार्शी—प्रजामित्र, हिंदुस्थान, रेल्वे टाइम्स, ऋषिमुख, संदेश, सांज वर्तमान, श्रीव्यंकटेश्वरसमाचार, टाइम्स ऑफ इंडिया, इलस्ट्रेटेड वुइकली ऑफ इंडिया, वहदत, यंग मेसेंजर ऑफ इंडिया,
बोरिंगपेट	कोलार गोल्ड फील्डस न्यूज
बुडान	अकबर झुल्कार नाइन्
कालांगुटे (गोवा)	एवोझ डो पोव्हो
कलकत्ता	अलकामाल, अमृतबझार पत्रिका आनंद—बझार, पत्रिका, अन्नीज डॉड, बंगवासी, बसुमती, बंगाली, भगवान गांधी, भारतमित्र, बिझिनेस वर्ल्ड, कॅपिटल, कॉलेजियन्, कॉमर्स, कमर्शियल न्यूज्, दोवेजदाद, इंग्लिशमन, फॉवर्ड, गंडीया, गार्डियन्, हिंदु पेट्रियट्, हिंदुस्थान, हितवादी, इंडियन् अँड ईस्टर्न एंजीनियर, इंडियन एंजीनियरिंग, इंडियन मिरर, इंडियन न्यूज् एजन्सी, इंडस्ट्री, इन्किलाब-इ-झमाना, जैन गॅझेट, लिबर्टी, माहेश्वरी, मार्केट इंन्टिलिजन्स, मुस्लीम स्टॅंडर्ड, मुसलमान, नायक, प्लँटर्स जर्नल आणि अॅग्रीकल्चरिस्ट, प्रकाश, रयतबंधू, संजिवनी, समय, समयवादी, सर्व्हंट, स्टेटस्मन्, सुलतान, श्रीकृष्ण, स्वतंत्र, स्वराज्य, टेलीग्राफ, युनायटेड प्रेस सिंडिकेट्, विश्वामित्र, व्यापार, यंग मेन ऑफ इंडिया, वर्ल्ड पीस,
कालिकत	अलेमीन, केरलसंचारी, मनोरमा, मातृभूमि, मितवादी, वेस्टकोस्ट रिफॉर्मर, वेस्ट कोस्ट स्पेक्टेटर,

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कानपूर	आझद, कानपूर जर्नल, डेली वर्तमान, हरीयत, प्रभा, प्रताप, हिंदी डेली आणि वुइक्ली पेपर स्टर्स टेलिग्राम कंपनी लि., झमाना
चंद्रनगर	प्रवर्तक
चिंदवार	लोकमित्र
चिनसुरा	एज्युकेशन गॅझेट
चितगांव	ज्योति
कोचीन्	कोचीन अर्ग्यूज, कोचीन न्यु एजन्सी, मलबार हेरल्ड
कोचीन–मट्टंचरी	मलबार इस्लाम
कोकोनाडा	रवी
कोलंबो	सिलोन् कॅथोलिक मेसेंजर, सिलोन डेली न्यूज, सिलोनीज, सिलोन इन्डिपेंडन्ट, सिलोन मॉर्निंग लीडर, सिलोन ऑब्झर्व्हर, दिनकरप्रकाश, दिनामिना, द्रविडमित्रन्, ज्ञानार्थप्रदीप, इस्लाम मिटिरन्, लकमिना, पीपल, सरसवी सांडरसी, टाइम्स ऑफ सीलोन
कोंताई	निहार
कटक	उत्कलदीपिका, इंडियन संडे स्कूल जर्नल
डाका	डाका गॅझेट, डाकाप्रकाश
दार्जलिंग	दार्जलिंग टाइम्स आणि प्लँटर्स गॅझेट
दिल्ली	अलमान, अर्जुन, एशिया, कॉमरेड, डेली हमदर्द, एडविन होवर्ड, जनरल् न्यूज एजन्सी आणि बुकडेपो, जनरल् न्यूज बिलिमारन्, हिंदु संसार, हिंदुस्थान टाइम्स, इंडियन न्यूज् एजन्सी, माहेश्वरी, मेल ट्रेडिंग, नॅशनल न्यूज एजन्सी, क्राम, राजस्थान, रियासत, सभा, स्वराज्य, तेज, तमादन्, विजय, वीकली हिंदी पेपर, वीकली मोबेलिग, वीकली भारतसेवक
धारवाड	धारवाडवृत्त, कर्नाटकवृत्त आणि धनजंय, कर्मवीर, राज हंस, विजयी
धुळें	खानदेशवैभव, प्रबोध
दिब्रूगड	टाइम्स ऑफ आसाम
गोहत्ती	आसामीय
गोरखपुर	स्वदेश
गंतूर	देशाभिमानी
हौरा	विश्वदूत
हैद्राबाद (दक्षिण)	मूशीर-इ-डेकन, साहिफा-इ-रोझाना, उस्मान गॅझेट, निजाम विजय,
हैद्राबाद (सिंध)	भारतवासी, हिंद, मुशाफर, प्रकाश, सिंध मेल, सिंध जर्नल सिंधवासी
जाफना	सिलोन पेट्रिअट आणि वुइकली, ॲडव्हार्टायझर, जाफना कॅथोलिक गार्डियन, सिथियावेद पथुकवलन, वासाविलन जॅफना, नेटिव्ह ओपीनियन
जाफना (वानरपोआई)	हिंदु ऑर्गन
जळगांव (खानदेश)	प्रागतिक
जारामोआला	डेली व्यापारपत्र
झांशी	फ्री इंडिया, साहस
झांशी (शहर)	न्याय
जबलपूर	इंडिया संडे स्कूल, स्कूल जर्नल, कर्मवीर
कराची	अल्वहीद, भारत, चौकीदार, डेली गॅझेट, केसरी, न्यू टाइम्स, पार्शीसंसार, रोझना व्यापार, रोझना समाचार, सिंध ऑब्झरवर सिंध सुधार, वुकली मेमन् समाचार
कुराई कुडी	Dhana Vysia, Bootran, कुमारन,
खुल्ना	खुल्नवासी
कोल्हापूर (शहर)	विद्याविलास ज्ञानसागर, हंटर,
कोटायम	केरळ वर्ती, मलायल मनोरमा, मलायाल्म, डेली न्यूज, नझराणी दीपिका, पौरप्रभा
कुमटा	कानडा न्यूज, कानडा लीडर
लाहोर	अकाली, अकबर–इ–आम, वंदेमातरम, सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट, कॉंग्रेस पब्लिसिटी ब्यूरो, डेली कर्मवीर, डेली मिलाप, डेली उपदेशक, डेली उर्दू इत्तेफाक, डेली जमीनदार, देश, दर्पण, हाक, केसरी, मुस्लीम औटलुक, पैगम–इ–मुलाह, पांथ, प्रताप, रजपुत गॅझेट, सायंटिफिक वर्ल्ड, सियासत, सुदर्शन, संडे टाइम्स, दी पीपल, ट्रिब्यून N. W. रेल्वे यूनियन गॅझेट, वतन

लारखाना	खैरखाह लारफाना गॅझेट.
लखनौ	ॲडव्होकेट, आनंद, डेली हमडम, हकीकत, हिंदुस्थानी, इंडियन डेली टेलिग्राफ, इंडियन विटनेस, कौकाब–इ–हिंद, लखनौ टाइम्स, मुस्लिम गॅझेट, औध अकबार, पेट्रियट, दी हक.
ल्यालपूर	डेली कमर्शियल न्यूज, डेली मार्केट रिपोर्ट,
मद्रास	अल–मझमन, आंध्रपत्रिका, अँग्लो इंडियन, अझादहिंद, कॅथोलिक लीडर, ख्रिच्छन पेट्रियट, डेली एक्सप्रेस, देशभक्तन, ज्ञान ज्योती, हिंदू, इंडियन रेल्वे जरनल, इंडियन रिव्ह्यू, जनरथमणी, जरिंदा–इ–रोझगार, जस्टीस, लॉ टाइम्स, मद्रास मेल महॉमेडन, मुखबर–इ–डेकन, न्यायदीपिका, न्यू इंडिया, शमशूल अकबार स्वदेश मित्रन्, स्वराज्य, टुं–डे.
मदुरा	साउथ इंडियन मेल,
मंडाले	अपर बर्मा गॅझेट,
मार्मागोवा (गोवा)	ए टेरा, नोटीशिआस, आल्ट्रामार,
मातंचरी	चक्रवर्ती
मीरत	रोझनामा क्राम
महू	सत्यार्थपत्रिका,
मिरपुरखास	मिरपुरखास गॅझेट,
मिरपूरसिटी	खिचरी समाचार.
मूलमन	मूलमेन ॲडवरटायझर,
माउंटरोड (मद्रास)	हिंदू.
मसूरी	मसुरी टाइम्स.
मथुरा	जैन गॅझेट.
मुवातपूझा	केरळदीपिका,
मुझाफरनगर	वुइकली सेवक.
मैमनसिंग	चारु मिहीर,
म्हैसूर	साध्वी, संपदभ्युदय, वेल्थ ऑफ म्हैसूर,
नागरकॉइल	त्रावणकोर टाइम्स,
नागपूर	देशसेवक, हितवाद, महाराष्ट्र, खबर, मारवाडी, प्रणवीर, समाजसेवक, संकल्प, संकल्पमहाल, स्वातंत्र्य, यंगपेट्रियट,
नैनीताल	नैनीताल गॅझेट.
नाशीक	लोकसत्ता.
नौशाहरो	शक्ती.
नोव्हा गोवा	डायरियो दी नाइट, हेरल्डो, ओ डिबेट, ओ हेलेंडो.
उटकमंड	साउथ ऑफ इंडिया ऑब्झर्वर आणि निलगिरी न्यूज, निलगिरी टाइम्स.
ओराय	उत्साह.
पंढरपूर	पंढरीमित्र.
पांगशा	कंगाल
पणजीम (गोवा)	ओ–कैंटे.
पारुर	उत्तर तारक
पाटणा	विहार हेरल्ड, एक्सप्रेस, सर्चलाइट.
पेण	कुलाबा समाचार.
पुणें	डेक्कन हेरल्ड, ज्ञानप्रकाश, 'केसरी' मराठा, वार क्राय, सत्याग्रही, सरव्हंट ऑफ इंडिया. विजय मराठा, दीनबंधु, स्वालंबन, संग्राम, भाला, स्वराज्य.
क्वादियन	अलफझल्, अल्हाकाम्, अलफरुक, नुर, रेव्ह्यू ऑफ रिलिजन्स (इंग्रजी), रेव्ह्यू ऑफ रिलीजन्.
केट्टा	बलुचिस्थान गॅझेट, बलुचिस्थान हेरल्ड, डेली बुलेटिन्
क्विलोन	देशाभिमानी, मलयाली.
राजकोट	काठेवाड ओपीनियन्, काठेवाड टाईम्स, लोहनाहितेच्छु,
राणपुर (काठेवाड)	सौराष्ट्र.
रंगून	बरमा संडे टाइम्स, बर्मा एक्सचेंज गॅझेट अँड् डेली ॲडव्हरटायझर, चायनीज डेली न्यूज्, फ्री बर्मा, न्यू बर्मा, न्यू लाइट ऑफ बर्मा, रंगून डेली न्यूज्, रंगून ईव्हिनिंग पोस्ट, रंगून गॅझेट, रंगून टाइम्स, रंगून मेल दी सन्.
रत्नागिरी	बकूल, बलवंत, सत्यशोधक.
रावळपिंडी	डेली प्रेम, फ्रॉंटिअर बुलेटिन्, शांति.
समस्तीपूर	व्हिजिलंट
सातारा	शुभसूचक श्रीशाहू, समर्थ, प्रकाश, ऐक्य,
शिकंदराबाद	हैद्राबाद बुलेटिन, नोटीस शीट,
शहाजानपूर	सरपंच,
सोलापुर	कल्पतरु, कर्मयोगी, सोलापूरसमाचार.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

सिलचार	नवजग, सुर्मा.
सिमला	संडे टाइम्स, सिमला एडिशन.
सक्कर	सिंधी.
सुरत	देशबंधु देशीमित्र, देशोदय, गुजराथ मित्र अँड गुजराथ, दर्पण, जैन मित्र, नवयुग वुइकली, पीपल्स् बिझिनेस
अखबार	गिफ्ट, प्रजापुकार समाचार, सुरत अखबार.
सिल्हेट	पारिदर्शक.
तिरुवेली	कल्पक.
त्रिचनापल्ली	वेन्सडे रेव्हयू.
त्रिचूर	लोकप्रशाशस्
तिरुपुर	कमर्शिअल् न्यूज़.
तिरुवला	केरल, कहालम्, केरलतारक,
त्रिवेंद्रम्	भारत केसरी, समदर्शी, त्रावणकोर प्रेस-सर्व्हिस, त्रिवेंद्रम डेली न्यूज, वेस्टर्न स्टार.
उडापी	सत्याग्रही.
विजयमपटम्	आंध्र अॅडव्होकेट,
वांई	मोदवृत्त, वृत्तसार.
वर्धा	महाराष्ट्र धर्म, राजस्थान केसरी,
यवतमाळ	लोकमत,

अँग्लो इंडियन पत्रांची हकीकत

इंग्रजांनीं छापखाना व वर्तमानपत्रें आपल्याबरोबर इकडे आणलीं. १७५७ त प्लासीची लढाई झाली. १७७३ सालीं रेग्युलेटिंग् अॅक्टानें गव्हर्नर-जनरल आणि सर अदालत यांची स्थापना होऊन राज्यकारभार सुयंत्रित सुरू झाला. तेथून पुढें सातच वर्षांत सन १७८० च्या जानेवारींत कलकत्ता येथें एका इंग्रजानें हिंदुस्थानांत पहिलें वर्तमानपत्र सुरू केलें. लंडनचा सुप्रसिद्ध टाइम्स त्यानंतर ५ वर्षांनीं जन्माला आला व अजून तो अबाधित सुरू आहे. परंतु हिंदुस्थानांत निघालेल्या या इंग्रजी वर्तमानपत्रासारखीं अप्रसिद्ध व क्षणभंगुर अशीं पुष्कळ वर्तमानपत्रें विलायतेस यापूर्वी निघत होतीं. हिंदुस्थानांत १७८७ सालीं उपटलेला हा तशाच प्रकारचा एक संपादक होय. १७८९ सालीं मुंबईस 'दी बॉम्बे हेरल्ड' नांवानें पहिलें वर्तमानपत्र निघूं लागलें. पुढच्या सालीं (१७९०) 'दी बॉम्बे कूरिअर' या नांवाचें आणखी एक पत्र निघालें. त्यांतूनच पुढें हल्लींचा 'टाइम्स ऑफ इंडिया' निघाला व सन १८६१ सालीं या दोन पत्रांच्या नांवाच्या संगमांत 'कूरिअर' हें नांव बुडून, 'टाइम्स' येवढेंच नांव शिल्लक राहिलें. कलकत्त्यास १७८० सालीं निघालेल्या पहिल्या पत्राचें नांव 'हिकीज् गॅझेट किंवा जर्नल्' असें होतें. व त्यांत विलायतेंतील पत्राप्रमाणें बहुतेक सर्व गप्पा, भाकडकथा, शिविगाळ, बदनामी असाच मजकूर असे. हें पत्र दोन वर्षांतच नाहींसें झालें; त्यामागून 'इंडियन गॅझेट' नांवाचें पत्र निघूं लागलें. तें यापेक्षां अधिक चांगलें होतें व तें ५० वर्षें चालून १८३३ सालीं 'बंगाल हरकारा' नांवाच्या पत्रांत सामील झालें व ही दोनही मिळून १८६६ सालीं 'इंडियन डेली न्यूज' नांवाच्या पत्रांत सामील झालीं. सन १८२१ त कलकत्त्यास एका युरोपियन व्यापाऱ्यानें एक सिंडिकेट बनवून 'जॉन बुल इन् दी ईस्ट' नांवाचें एक दैनिक वर्तमानपत्र काढलें होतें, त्यांतूनच पुढें हल्लींचा 'इंग्लिशमन्' १८३६ त निघाला. मुंबई इलाख्यांत 'मुंबई कूरिअर' नंतर १७९१ मध्यें 'बॉंबे गॅझेट' निघालें. तें सन १९१४ पर्यंत चालू होतें. व एके काळीं 'टाइम्स' पेक्षां याच वर्तमानपत्राला विशेष महत्त्व होतें. या जुन्या काळीं मद्रासकडे निघालेल्या वर्तमानपत्रांचीं नांवें फारशीं प्रसिद्ध माहीत. इतर इलाख्यांतून इंग्रजांनीं वर्तमानपत्रें काढलीं अशीं फक्त मद्रास व पंजाब येथेंच. त्यांत 'मद्रास टाइम्स' व लाहोरचें 'सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट' व अलाहाबादचा 'पायोनिअर' हीं काय तीं विशेष प्रसिद्ध आहेत.

सन १८३५ पर्यंतचा काळ अँग्लोइंडियन लोकांनीं चालविलेल्या इंग्रजी पत्रांचाच होता. पण इंग्रजच राज्यकर्ते व इंग्रजच वर्तमानपत्रकार असा मेळ सकृत दर्शनी दिसत असला तरी, त्या काळच्या इंग्रज वर्तमानपत्रकारांना कायद्याच्या रूपानें सरकारी अवकृपा बरीच सोसावी लागली. कांहीं बाबतींतला जुलूम कायद्याशिवायहि होई; म्हणजे वर्तमानपत्रकर्ता सरकारला नाठाळ व त्रासदायक असा वाटला तर त्याला उचलून जहाजावर घालून हद्दपार करण्यांत येत असे. 'मुंबई क्रॉनिकल'चे संपादक मि. बी. जी. हॉर्निमन यांना अशाच रीतीनें पकडून हद्दपार करण्यांत आलें तेव्हां ती गोष्ट अपूर्व वाटली. ती अपरिचित नव्हती. पण १८३५ नंतर काळ बदलला. व देशी वर्तमानकार पुढें येऊं लागले; तसा सरकारचा राग 'अँग्लो-इंडियन' पत्रांवरून कमी झाला. राष्ट्राच्या वतीनें बोलण्याचें व सरकारावर टीका करण्याचें काम देशी पत्रकारांनीं उचललें, व 'अँग्लो-इंडियन' वर्तमानपत्रकार हे इंग्रज सरकारचे ऋणानुबंधी बनले. हल्लीं जरी पिनल कोड किंवा प्रेस अॅक्ट हे कायदे नावानें सर्वांकरितां सारखे आहेत तरी त्यांची अंमलबजावणी मात्र निःपक्षपातीपणाची नाहीं. १८७९ मध्यें तर बोलूनचालून देशी भाषेंतील वर्तमानपत्रांकरितांच वेगळा कायदा करण्यांत आला होता. कंपनीसरकाराकडून राणीसरकाराकडे हिंदुस्थानाचें राज्य गेलें त्या वेळीं हिंदुस्थानांत १९ 'अँग्लो-इंडियन' व २५ देशीभाषेंतून निघणारीं वर्तमानपत्रें होतीं. परंतु या सालीं म्हणजे १८५८ तच विद्यापीठें स्थापण्यास इकडे सुरुवात झाली; मिळून ४४ व इंग्रजी शिक्षण सुरू झालें. त्यानंतर जसजसे दिवस गेले व सुशिक्षित हिंदी लोकांची संख्या वाढूं लागली, तसतसें 'अँग्लो-इंडियन' व हिंदी लोकांनीं चालविलेलीं (देशी किंवा इंग्रजीहि) वर्तमानपत्रें यांचें प्रमाण बदलूं लागलें. हल्लीं तर 'अँग्लो-इंडियन' पत्रें हीं देशी पत्रांच्या मानानें खंडीस रती इतकींच भरतील.

हिंदुस्थानांत प्रथम ज्या इंग्रजांनीं वर्तमानपत्रांचा धंदा सुरू केला त्यांच्याविषयीं स्वतः इंग्रजांनींच जे शेरे लिहुन ठेविले ते फारसे भूषणास्पद नाहींत. त्यांतील एक शेरा असा.

"Found unfit to engage in any creditable method of subsistence "दुसरा कांहीं धंदा चालेनासा झाला म्हणून हे लोक संपादक झाले!" हिंदी वर्तमानपत्रांचे कांहीं हितशत्रू इकडील संपादक वर्गाविषयींहि पुष्कळ वेळां अशा प्रकारचे उद्गार काढतात. पण वास्तविक असे शेरे कोणी कोणत्याहि धंद्यासंबंधानें देणें बरें नव्हे. कारण पुष्कळ धंद्यांची अशी गोष्ट आहे कीं, आधीं धंदा म्हटला म्हणजे त्यांत पडणाऱ्याला त्या धंद्याला लागणारे सर्व शिक्षण आगाऊ मिळालेलेंच असतें असें नाहीं. कांहीं कांहीं धंद्यांत लोक पडतात ते तो धंदा वंशपरंपरागत घरीं चालत आला म्हणून. घरीं किंवा धंद्याच्या दुकानांत जें कांहीं चालतें तें पाहून मिळणारें शिक्षण त्या धंद्याला प्रारंभाला पुरें होतें. आणि मनुष्य एकदां काम करूं लागला म्हणजे अनुभवानें तो सर्वच हळूहळू शिकतो. इतर कित्येक धंद्यांत कांहीं लोक शिरतात ते त्यांत आपली बुद्धि चालेल असें वाटून शिरतात. मग तो मूळचा घरचा नसेना का ! मनुष्य यदृच्छेनें एखाद्या धंद्यांत पडतो, आणि ज्या गोष्टीला मूळ केवळ गरजेनें हात घातला त्यांतच पुढें त्याचा भाग्योदय होऊं शकतो. वर्तमानपत्राप्रमाणें वैद्यकीच्या धंद्यासंबंधानेंहि सर्व देशांतून असाच अपवाद आहे. दुसरें कांहीं हातून करतां आलें नाहीं तर वैद्याचें दुकान काढून बसावें. कारण तेथें भांडवल लागत नाहीं, आणि रोग्याला गुण येण्यासंबंधानें कलिविडंबनांतील श्लोक प्रसिद्धच आहेत. पण या धंद्यांत पडणारे लोकहि कालांतरानें अनुभवानें मोठे निष्णात वैद्य बनल्याचा पुरावा आहे. असो.

हिंदुस्थानांतील ज्या इंग्रजांनीं मूळ वर्तमानपत्रें सुरू केलीं ते विद्येने किंवा अन्नानें कसेंहि असोत, त्यांनीं त्या वेळच्या नोकरशाहीला सतावून सोडलें होतें यांत कांहीं शंका नाहीं. म्हणूनच, त्यांना वेळीं जहाजांत घालून हद्दपारहि करण्यांत येत असे. या लोकांच्या ठिकाणीं चांगलें चुरचुरीत लिहिण्याचा तरी गुण होता यांत शंका नाहीं. व वर्तमानपत्रकाराच्या धंद्यांत हाच गुण प्रमुख मानण्यांत येतो. अंगीं हा गुण असून फिरून त्या गुणाचा उपयोग करण्याचें धाडस लागतें तेंहि या लोकांच्या ठिकाणीं होतें असें दिसतें. कारण इंग्रजासारखा इंग्रज इकडे आलेला तो सुखासुखी आपली मान फासावर काय म्हणून लटकवील ! इंग्रज मनुष्य लफंगा व बेअब्रूचा असला तरी त्याला त्या वेळींहि या हिंदुस्थानाच्या 'कुरणांत' पोटापुरतें गवत कोठेंहि खुडून खावयास मिळालें असतें. त्या वेळच्या इंग्रज वर्तमानपत्रकारांचें वकीलपत्र कांहीं आम्ही घेतलेलें नाहीं; परंतु त्याच्याविषयीं हे दोन शब्द लिहिण्याचें कारण असें कीं, हिंदी संपादकावर कित्येक वेळां जे आक्षेप घेण्यांत येतात त्यालाहि तेंच उत्तर देतां येईल. संपादकाचें यश केवळ त्याच्या पत्राचा खप किती होतो किंवा त्याला दरसाल किती शिल्लक बाजूला टाकतां येते यावरूनच करावयाची नसते. हिंदुस्थानांतील प्रमुख म्हणजे राजधानीचीं शहरें सोडलीं असतां जिल्हानिहाय अशीं पुष्कळ वर्तमानपत्रें दाखवितां येतील कीं; त्यांची बुद्धिमत्ता, देशाविषयीं त्यांची कळकळ, व त्यांचें मनोधैर्य हीं राजधान्यांतून चाललेल्या, भरभराटलेल्या व यशस्वी म्हटल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांच्या संपादकाहून कांहीं कमी नसते. याचा अर्थ हाच कीं, यश हें पुष्कळ अंशीं बाह्य परिस्थितीवर अवलंबून असतें. केवळ यशापयशावर मनुष्याच्या गुणाची परीक्षा करणें नेहमींच योग्य ठरत नाहीं. असो.

१८ व्या शतकांत विलायतेंतील वर्तमानपत्रें हीं ज्याला 'यलो जर्नालिझम' म्हणतात त्याचाच पुष्कळसा मासला होता. यलो म्हणजे रोगट दुष्ट, हलकट हीन शीलाचें. अर्थात् त्या विलायतेंतलेच लोक तोच म्हणजे वर्तमानपत्राचा धंदा इकडे हिंदुस्थानांत करूं लागले तरी, तोच नमुना वठावयाचा. शिवाय हिंदुस्थानांत आज इंग्रजाला 'मी जेता व हिंदी लोक जित' या भावनेमुळें आढ्यता आलेली आहे. या आढ्यतेचे दोन परिणाम होतात. एक मनमोकळे करून खुलासेवार लिहिणें बोलणें अशा लोकांच्या हातून होत नाहीं. स्तिमितवृत्ति हा आढ्यतेचा एक स्वभावगुण आहे. या गुणामुळेंच श्रीमंत लोक इतरांशीं बोलतांना आपला शब्द महाग विकतात. इंग्रज समाजाच्या आढ्यतेचा दुसरा एक परिणाम असा झाला आहे कीं, या समाजांतील लोक आपल्यांतली भांडणें बाहेर पडूं देत नाहीत. ज्याप्रमाणें कुटुंबकलह गुप्त ठेवण्याची समंजस माणसाची प्रवृत्ति असते त्याप्रमाणें आपापसांतलें कांहीं बिंग बाहेर फुटूं नये अशी हा इंग्रज समाज खबरदारी घेतो. वास्तविक या समाजांतील लोकांत स्पर्धा, चढाओढ, द्वेष, टीका, निंदा, सामाजिक दुर्गुणामुळें होणारे कलह किंबहुना घातपात नसतात असें नाहीं, पण त्यांचा मागमूस बाहेर येत नाहीं. १८ व्या शतकांत गोष्ट वेगळी होती. तेव्हां राज्याची घडी बसत होती. कारस्थान, कपट, स्पर्धा, द्वेष यांना तेव्हां पुष्कळ वाव होता. शिस्तीचें लगाम हल्लींइतके तंग आवळलेले नसत. आणि सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं, त्या वेळचीं इंग्रजांनीं इकडे चालविलेलीं वर्तमानपत्रें हीं धंद्यापेक्षां खेळासारखींच अधिक असत. यामुळें खाजगी इंग्रज एकमेकांच्या कुचाळ्या वर्तमानपत्रांतून करीत. इतकेंच काय, पण वॉरन हेस्टिंग्ज व फिलिप फ्रँसिस यांच्यासारख्या गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांच्या भांडणांचाहि प्रतिध्वनी या वर्तमानपत्रांतून उमटे. इंग्रज समाजांतल्या घाणेरड्या गोष्टी निरनिराळ्या प्रसंगांनीं व रूपकांनीं हे संपादक बाहेर काढीत. हल्लीं फाटक्यांतला फाटका इंग्रज हा हिंदुस्थानांत पैसाच मिळविण्याला आलेला असला तरी, मी एक राज्यकर्ता आहें अशी त्याची भावना असते. म्हणून कोणाहि इंग्रज अधि-

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

कान्याचा अभिमानच तो बाळगतो, व ज्याच्या योगानें त्याचा कमीपणा बाहेर दिसेल अशी कोणतीहि गोष्ट कृत्य करीत नाहीं. केव्हांहि पाहावें तों हें सगळें सुष्ट दुष्ट इंग्रज आपले बाहेरच्या जगाला दिसावला एक. चित्रसेन गंधर्वाशीं लढणाऱ्या कौरवपांडवाप्रमाणें १०५च असावयाचे. शंभर व पांच असें वेगळे दिसावयाचें नाहींत. यामुळें हल्लींच्या इंग्रजांनीं चालविलेल्या वर्तमानपत्रांच्या प्रतिष्ठितपणांत जर थोडासा थिल्लरपणा मनुष्यस्वभावानुसार आला तर त्याचा उपसर्ग कोणा इंग्रजाला लागावयाचा नाहीं. तर त्याचा मारा हिंदी लोकांवरच व्हावयाचा. हल्लीं बारानुबारा चोवीस वर्षें वर्तमानपत्रें वाचणाराला एका इंग्रजानें दुसऱ्या इंग्रजाला, हास्यास्पद केलें असें आढळणार नाहीं. मुंबईचा ' टाइम्स ' किंवा कलकत्त्याचा 'स्टेटस्मन हीं सामान्यतः संभावित,प्रतिष्ठित अशींच पत्रें आहेत. तथापि त्यांत 'मॅट्रिक फेल' झालेल्या बंगाली बाबूपासून जगविख्यात म. गांधींपर्यंत हिंदी लोकांची खोडी केल्याशिवाय फार दिवस सुनके जात नाहींत. मग ती खोडी गद्य लिहिणारा एक गद्धा करो, किंवा कविस्वरूपी एखादा कपी करो. या पत्रांत यलो म्हणजे रोगट जर्न्यालिझमचा भाग असेल तितका सर्व हिंदी लोकांची कुचेष्टा करण्याकडे खर्च झालेला असावयाचा.

असो. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, वरील कारणामुळें हल्लींच्या काळांत इंग्रजांनीं चालविलेल्या वर्तमानपत्रांना कायद्याचा उपसर्ग लागत नाहीं, व सरकारची अवकृपा त्यांजवर होत नाहीं. पण १८ व्या शतकांत गोष्ट अगदीं उलटी होती. जीं वर्तमानपत्रें होतीं तीं इंग्रजांचींच. हिंदी लोकांना इंग्रजी शिक्षण नव्हतें, व वर्तमापत्रांची ओळखहि नव्हती. मग राष्ट्रीय भावना, कडक टीका, राजद्रोह या गोष्टी कोठून येणार ? म्हणून कायद्याच्या किंवा सरकारच्या अवकृपेचा उपसर्ग लागावयाचा तो इंग्रज वर्तमानपत्रकारांनाच लागे. व असला एखादा संपादक पायांतील काट्यासारखा खुपूं लागला म्हणजे तो उपटून काढून फेकून द्यावा त्याप्रमाणें त्याला उचलून जहाजावर घालून परत स्वदेशीं पाठवीत. १७९८ पर्यंत हिंदुस्थानांत इंग्रजाला कायमची वस्ती किंवा धंदा करून राहाण्याला स्पेशल परवानगी लागे. म्हणून ती परवानगी काढून घेणें हें संपादकाला शिक्षा करण्याचें सुलभ साधन होतें. या बंधनाचें रूपांतर होऊन, धंदेवार परवाने सुरू झाले त्यांत वर्तमानपत्राला लागणारा परवाना हा एक येऊन बसला. पण पुढें पुढें या संपादकवर्गावरील हीं बंधनें हळूं हळूं आपोआप शिथिल होऊं लागलीं. कारण इकडील इंग्रज संपादक विलायतेहून आलेल्या वर्तमानपत्रांतल्या बातम्या लेख किंवा बातमीपत्रें छापीत. व विलायतची बातमी तेव्हां पुष्कळ दिवसांनीं मिळे यामुळें तिच्याविषयीं उत्सुकता फार म्हणून हीं इकडील पत्रें जगूं द्यावीं असेंहि कंपनी सरकारास वाटे. वेलस्ली मिंटो या गव्हर्नर जनरलांच्या कारकीर्दीपर्यंत वर्तमानपत्रांवर वरींच नियंत्रणें होतीं. व १८२३ पर्यंत इंग्रज संपादकांना विलायतेस हद्दपार केल्याचीं उदाहरणें घडलेलीं आढळतात. पण या सुमारास बंगाल्याकडे हिंदी वर्तमानपत्रें सुरू झालीं तेव्हां सरकाराला प्रश्न असा येऊन पडला कीं, इंग्रजाला बोटीवर घालून इंग्लंडांत परत पाठवितां येईल, पण हिंदी संपादकाचें काय करावयाचें ! तो हिंदुस्थानालाच पाय चिकटवून राहाणार. तेव्हां नियंत्रण हवें पण कांहीं वेगळे हवें. म्हणून वेगळ्या प्रकारचे नियम करण्यांत आले. पण लॉर्ड बेंटिंग यांच्या कारकीर्दीत हीं नवीन बंधनेंहि बहुतेक गळून पडलीं. व ज्याला मुद्रण–स्वातंत्र्य म्हणतात त्याचा उदय झाला.

महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें

छापखानें, वर्तमानपत्रें देशांत असणें हें वैभवाचें किंवा भरभराटीचें अवश्य आनवांध लक्षण असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्याशिवायहि देश सुखीसंमृद्ध, संपन्न असूं शकतो, सुधारणेचीं साधनें हीं इतकीं अगणित आहेत कीं, तीं कधींच पुरीं वाटत नाहींत. आज लोकांना आगगाडी व तारायंत्रें हीं सुधारणेची मुख्य खूण असें वाटतें. पण इंग्लंडचे लोक ज्या एलिझाबेथ राणीच्या कारकिर्दीला वैभवशाली असें म्हणतात त्या काळीं आगगाडी व तारायंत्र नव्हते. व वर्तमानपत्रेंहि नव्हतीं. अशाच रीतीनें हिंदुस्थानांतील जुन्या देशी रजांच्या काळीं आगगाड्या, तारायंत्र किंवा वर्तमानपत्रें यांपैकीं कांहींच नव्हतें तथापि तेव्हां देशांत वैभव नव्हते असें म्हणतां येत नाहीं. काळ हा जसा एकच टिकून राहात नाहीं, त्याप्रमाणें निरनिराळ्या काळाला सुधारणेचीं उत्कर्षाची साधनें आणि वैभवाच्या खुणा याहि एकच एक प्रकारच्या नसतात. आज कोणी हिंदुस्थानच्या लोकांना जर म्हटलें कीं, "तुम्हांला तुमचीं जुनीं राज्यें देतो, पण आजचीं आगगाड्या, तारायंत्रें व वर्तमानपत्रें काढून घेतों" तर लोक कबूल होणार नाहींत काय ? आम्हाला वाटतें खचित् कबूल होतील, व ते म्हणतील कीं, "परकी राज्यसत्ता तरी देशांतून नष्ट होऊं द्या, मग जें काय वैभव, सत्ता, संपत्ती, देशांत असेल तिची अधिक चांगल्या रीतीनें वांटणी कशी करतां येईल हें आपण पाहूं ! व पाहूंच लागलों म्हणजे वाटतें कीं तिकडे जशीं वर्तमानपत्रें जन्माला आलीं व परिणती पावलीं त्याचप्रमाणें इकडेहि कां झाले नसते ! प्रजास्वातंत्र्याचें हें एक प्रकारचे वारें आहे. ते एकदा वाहूं लागलें म्हणजे एकाचें पाहून दुसऱ्या देशावर व दुसऱ्याचे पाहून तिसऱ्या देशावर तें वाहूं लागतें. एका टोंकाला झारशाही सारखी जुल्मी राज्यसत्ता जर नष्ट झाली व दुसरीकडे चीनजपानसारखे एशिॲटिक देश प्रजास्वातंत्र्याचा उपभोग घेऊं लागले तर मध्यें हिंदुस्थानच काय असा मोकळा राहिला असता ! आज ब्रिटिश मुलखांतील राज्याप्रमाणें संस्थानिकांच्या राज्यांतहि नवीन राज्यघटना होऊं लागल्याच आहेत कीं नाहींत ! असो. कोणत्या स्थितींत काय झालें असतें याचा खल करीत बसण्यांत व तर्क चालविण्यांत फारसें स्वारस्य नाहीं. प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे हें आपण आतां पाहूं !

आतां आपण महाराष्ट्राकडे वळूं ! १८१० सालीं मिशनरी लोकांनीं मराठी पुस्तकें छापण्याला या इलाख्यांत सुरुवात केली. त्यांचें पहिलें पुस्तक ' सिंहासन बत्तिशी ' हें होय. अर्थात् मराठ्यांचें सिंहासन इंग्रजांच्या हातीं लागण्यापूर्वींच त्यांच्या मुद्रणकलेनें मराठी ' सिंहासनबत्तिशी ' हस्तगत केली. १८२१ सालीं पुण्यास विश्रामबागेंत संस्कृत पाठशाळा सुरू झाली. १८२२ मध्यें मुंबईस ' बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली, व तिला मिळालेल्या रु. ५०,००० तून ग्रंथप्रसिद्धीचें काम सुरू झालें. १८३७ त वे. शा. सं. बाळशास्त्री जांभेकर यांनीं ' दिगदर्शन ' व १८४० त रा. भाऊ महाजन यांनीं साप्ताहिक ' प्रभाकर ' वर्तमानपत्र सुरू केलें. १८४२ त पुण्यास इंग्रजी शाळा सुरू झाली. १८४८ सालीं पुण्यास खासगी मराठी शाळा मराठे लोकांकरितां निघाली. १८४९ मध्यें पुण्यास ' ज्ञानप्रकाश ' सुरू झाला. १८५१ त पुण्यांतील संस्कृत व इंग्रजी वर्गांना मिळून 'पूना कॉलेज' हें नांव प्राप्त झालें. १८५५ सालीं ' मुंबई एज्युकेशन सोसायटी ' मोडली व सरकारी शाळाखातें सुरू झालें. १८५७सालीं 'मुंबई युनिव्हर्सिटी निघून मॅट्रिक्युलेशन परीक्षा सुरू झाली. १८६२सालीं पहिला बी. ए. झाला व त्याच वर्षी हिंदुप्रकाश' वर्तमानपत्र सुरू झालें. १८६५ सालीं पहिली वकिली परीक्षा सुरू झाली. १८६६ सालीं पहिला एल.एल. बी. झाला. १८७३ सालीं ' सत्यशोधक समाज ' स्थापन झाला. १८७७ सालीं 'दीनबंधु 'हें ब्राम्हणेतरांचें वर्तमानपत्र सुरू झालें. १८८१ सालीं ' केसरी व मराठा ' हीं वर्तमानपत्रें सुरूझालीं. केसरीच्या आधीं निघालेलीं अशीं कांहीं वर्तमानपत्रें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं होतीं. त्यांपैकीं कांहींचीं नांवें खालीं दिलीं आहेत:—

प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, सुबोध पत्रिका, ज्ञानोदय, वर्तमानदीपिका, शुभसूचक, बोधसुधाकर, पूर्णचंद्रोदय, वैण्णवपंच, धूमकेतू, जगन्मित्र, दी नेटिव्ह ओपीनियन, बेळगांवसमाचार, वृत्तवैभव. इ०

१८८० सालांतील मुंबई इलाख्यांतील शिक्षणसंस्थांचे आंकडे खालीलप्रमाणें होते—मुंबई इलाख्यांत एकंदर शाळा पांच हजारांच्या आंत व एकंदर विद्यार्थी पावणेतीन लक्ष होते. सर्व प्रकारचीं मिळून ८ कॉलेजें, १ आर्टस्कूल, ४८ हायस्कूलें, १७७ मिडिल स्कूल्स्, २ वैद्यकवर्ग, ५ धंदेशिक्षणाचें वर्ग व बाकी प्राथमिक शाळा, मुलींच्या शाळांची संख्या २८४ होती व ट्रेनिंगचे वर्ग ९ होते. एकंदर विद्यार्थ्यांत ब्राह्मण शेंकडा २३, इतर ५९ व मुसलमान शेंकडा १० असत. शिक्षणाप्रमाणें वाङ्मयाची वांटणी अर्थात् बेताचीच होती. त्या सालच्या सरकारी रिपोर्टांत एकंदर मुंबई इलाख्यांत छापखान्यांची व ग्रंथादिकांची संख्या खालीलप्रमाणें होती—

छापखाने मुंबईंत ४८, महाराष्ट्रांत २३, गुजराथेंत १५. पुस्तकें मुंबईस ५३१. महाराष्ट्रांत ४६५, गुजराथेंत ९४. भाषेच्या दृष्टीनें १०७ इंग्रजी, २०८ मराठी, २०५ गुजराथी अशी वर्गवारी होते. मासिक वगैरे पुस्तकें १५१. एकंदर वर्तमानपत्रें ८३. पैकीं २ इंग्रजी, १० अँग्लो–मराठी, व निवळ देशी भाषेंतील वर्तमानपत्रें ७१. देशी भषेंतील वर्तमानपत्रांपैकीं ३४ मराठी, ३१ गुजराथी. एकंदर पुस्तकसंग्रहालयांची संख्या ८७ होती, शिळा–छापखाने सुमारें २५ होते. वर्तमानपत्रामध्यें अधिक खप एका गुजराथी वर्तमानपत्राचा होत असून, त्याच्या जास्तींत जास्त १६५० प्रती निघत असत. हजार प्रतींवर निघणारीं वर्तमानपत्रें ६ व पांचशें प्रतींवर खपणारीं वर्तमानपत्रें १४ होतीं.

शुद्ध तूप मिळण्याचें एकच ठिकाण:—रघुनाथ अच्युत बापट, संकेश्वर यांचें शुद्ध तूप. भावाबद्दल चौकशी करा. रामचंद्र गोपाळ कवठेकर, भवानी पेठ, पुणें.

अमोलिक वैद्यकीय सल्ला. कोणताहि जुनाट रोग, किंवा संवय असो. रोग्यांनीं ८२ आण्यांचीं तिकिटें पाठवून प्रकृतिमान पत्रानें कळविल्यास उपयुक्त इलाज व पथ्य वगैरे कळवूं. डॉ. सि. ग. नेने, आरोग्यभुवन, कल्याण जि. ठाणें.

श्रीसरस्वती—सर्वोपयोगी, सर्वांगसुंदर मासिक लौकरच सुरू होणार. विशेष खुलासा कचेरीकडे. C/o गणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पुणें २.

ज्यांना शाई पुड्यांचा व्यापार करून पैसा व लौकिक मिळविण्याची इच्छा असेल त्यांनीं प्रथम आम्हांस लिहावें. उत्तराकरितां पो. पाकीट अगर ८१ चें तिकिट पाठवावें. कृ. मा. शाईवाले, मु. पो. कर्जत, जि. कुलाबा.

सत्त्व शिलाजीताच्या सेवनानें वीर्यासंबंधीं सर्व विकार नाहींसे होऊन शरीर तेजःपुंज होतें. ५ तो. ३॥ रु. आजच मागवा. हिमालयांतील वनौषधींहि मिळतात. ठि.—ब्राह्मी बुटी भंडार, हरिद्वार.

विजय—सांगलीचें साप्ताहिक मुखपत्र; वाढता खप, प्रत्येक अंक वाचनीय. मालाचा खप वाढविणारास जाहिरातींचा उत्तम सोय, माफक दर. वा. व. ट. हं. सह २८४ रु.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर.

(२) कै. लो. बाळ गंगाधर टिळक.

(३) कै. गोपाळ गणेश आगरकर.

(४) कै. वामन शिवराम आपटे.

(५) कै. महादेव बल्लाळ नामजोशी.

(६) कै. गणेश कृष्ण गर्दे.

(७) कै. वासुदेव बाळकृष्ण केळकर.

(८) कै. महादेव शिवराम गोळे.

(९) कै. चिंतामण गंगाधर भानू.

केसरीमराठा सं[illegible] मंडळाची पहिली पिढी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१०) महादेव राजाराम बोडस.

(११) नरसिंह चिंतामण केळकर.

(१२) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर.

(१३) कै० दत्तात्रय गोपाळ लिमये.

(१४) कै० सदाशिव हरी भावे.

(१५) शंकर गणेश लवाटे.

(१६) दामोदर विश्वनाथ गोखले.

(१७) कै० रामचंद्र कृष्ण जोशी.

(१८) डॉ. विष्णु महादेव भट.

केसरी मराठा संपादक उपसंपादक मंडळ.—दुसरी पिढी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Varanasi. An eGangotri Initiative

(१९) जनार्दन सखाराम करंदीकर.

(२०) वामन मल्हार जोशी.

(२१) पांडुरंग महादेव बापट.

(२२) दिनकर वासुदेव दिवेकर.

(२३) गजानन विश्वनाथ केतकर.

(२४) वासुदेव कृष्ण भावे.



(२५) रामकृष्ण गोपाळ भिडे.

(२६) शंकर नरहर आगाशे.

(२७) आत्माराम रावजी भट.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(२८) दामोदर नरहर शिखरे,

(२९) रामचंद्र शिवराम सहस्रबुद्धे.

(३०) राघोपंत वाकणकर.

(३१) शि. बा. गुर्जर.

(३२) अनंत नीळकंठ पिटकर.

(३३) गजानन भास्कर वैद्य.

(३४) सुंदरराव भास्कर वैद्य.

(३१) त्रिविक्रमपंत पिंवे.

(३६) भुजंगराव मानकर.

चित्रशाला प्रेस, पुणें.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



[हें छापखान्याकामगार खातें रा. चंद्रभान भोंगळे यांचे हाताखालीं आहे.]

[ही केसरी कचेरींतील गडी वगैरे हरकामी मंडळी रा. रामभाऊ घाटे यांचे हाताखालीं आहे.]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



व्यवस्थापक कचेरी.

[हें खातें रा. धोंडोपंत विद्वांस यांचे हाताखालीं आहे.]

श्री

~~[illegible]~~

~~[illegible]~~

~~[illegible]~~

~~[illegible]~~

स्वराज्य संघास सभासद मिळविण्याचें काम सुरू झालें आहे व लवकरच तें अधिक जोरानें सुरू होईल.

बाळ गंगाधर टिळक

२३-११-१६

The work of collecting subscriptions for the Home Rule League has been commenced & will be soon vigorously carried on

Bal Gangadhar Tilak

23-11-16

लोकमान्यांचे हस्ताक्षर.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरी

CIRCULATES MORE THAN 4,700 COPIES EVERY WEEK.

वर्ष ७ वें. पुणें:–मंगळवार, तारीख ११ जानेवारी सन १८८७ अंक २

हरी केशव गोखले नवीन घड्याळें विकणार व नीट करणार.

हरी केशव गोखले.

किंमत सवा रुपया.

नव्या जाहिराती.

THE CHEAPEST AND ONE OF THE BEST

इंग्रजी व मराठी वर्तमानपत्र.

F. C. DAUKES,
Secretary, Public Service Commission.
January 3rd 1887.

KUMĀRA-SAMBHAVA.

EXERCISES

केसरी

केसरी.

पुर्वणीचे दर.

जाहिरातीचे दर.

स्थिरनि नो रे द्विपाः क्षणमपि मदांधेक्षणक्षेत्र गजश्रेणीनाथ त्वमिह मटिकांयां गजभुवि ।
असौ कुंभिभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा–गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः ॥

वर्ष १. पुणें:–मंगळवार तारीख ४ जानेवारी १८८१. अंक १.

आज मुंबई इलाख्यांत उत्तर्या मराठी वर्तमानपत्रें निघत असतां व या शहरांत ही तीन चार चालत असतां, आणखी वर्तमानपत्राची काय जरूर आहे हा विचार आमच्या वाचकांच्या सकृद्दर्शनीं मनांत येणारा आहे. यास्तव प्रथमतः या पत्राचा उद्देश लोकांस कळविणें अवश्य आहे.

वर्तमानपत्रांचा प्रघात पडल्यास आज पंचवीस वर्षे झालीं होऊन गेलीं, व मध्यंतरीं दहा पंधरा वर्षांत तर त्यांच्यांत जरी पुष्कळ सुधारणा झाली, तरी अद्याप वर्तमानपत्रकर्त्यांस आपणांवरची जबाबदारी पुरतेपणी कळूं लागली आहे, किंवा लोकसुधारणेस आपल्या परिश्रमांनीं केवढें साहाय्य होणारें आहे याविषयीं त्यांचा पक्का समज झाला आहे, असें सामान्यतः पाहतां आढळणार नाहीं. दोन चार नामांकित वर्तमानपत्रांखेरीज बाकीच्यांची जर स्थिति पाहिली, तर वर्तमानपत्र म्हणजे गांवांतल्या बातम्या प्रसिद्ध करण्याचें साधन याच्या पलीकडे वरील शब्दाचा अर्थ पत्रकर्त्यांच्या मनांत कधीं ही येत असेलसें वाटत नाहीं. आलीकडे तर लहानसान गांवांतून सुद्धां वर्तमानपत्रें निघूं लागलीं आहेत. छापखाना घालणें व पत्र काढणें हा एक व्यापारच बनल्यानें त्यास विशेषा विशेष सत्कार नाहीं अशा मंडळींच्या हातीं वरील दोन अमोलिक साधनें पडलेलीं बहुधा आढळतात. आतां येवढें खरें आहे कीं, कोणत्याही नजरेनें का होईना, वरील दोन साधनांची वृद्धि ही एकंदर देशास श्रेयस्करच आहे. निदानपक्षीं लोकांत वाचण्याचा प्रघात तरी होण्यास वरील साधनांचा उपयोग आहे. पण याच उद्योगांत बरच्या पेक्षां चांगली मंडळी पडली असतां लोककल्याणाचा मार्ग त्यास खुला होणार आहे हें उघड आहे.

वर्तमानपत्राचा मुख्यतः दोन प्रकारांनीं मोठा उपयोग आहे. एक हा कीं, त्यांनीं आपलें काम निःपक्षपातपणें व निर्भयपणानें बजावलें असतां सरकारी अधिकाऱ्यांवर मोठा दबदबा राहतो. इंग्लंडांतील राज्य व्यवस्था ... लागलेले असल्यानें व पोलिसांची गस्त माफी फिरत असल्यानें जो उपयोग होत असतो, तोच त्या त्या जागीं वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी सर्वदा घालत असल्यानें होत असतो. सरकारी अधिकाऱ्यांनीं आपापलीं कामें चोख रीतीनें चालविलीं असतां त्यांत प्रजेचें किती कल्याण असतें हें कोणास सांगावयास नकोच. पण वरील चोखपणा राहण्यास त्यांचा सर्व कारभार जेव्हां लोकांच्या नजरेसमोर सदैव येत जाईल तेव्हां राहणार. सर्व गोष्टी सर्वांच्या समक्ष होत असल्या म्हणजे अर्थातच लांचलुचपत वगैरे जे अन्यायाचे प्रकार एरवीं होण्याचा संभव असतो तो पुष्कळ अंशीं नाहींसा होतो. जुन्या एतद्देशीय संस्थानांतून वरील प्रकार किती चालत असे, व अद्याप किती चालतो, हें ध्यानांत आणलें असतां पत्रकर्त्यांची गरज लोकांस किती हितावह आहे हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. विलायतेंत खुद्द महाराणी साहेबांपासून व मुख्य प्रधानापासून तों अगदीं छोट्या सरकारी कामगारापर्यंत सर्वांच्या कारभाराकडे लोकांची नजर वर्तमानपत्रांच्या द्वारें सारखी लागून राहिलेली असते, यामुळें कोणता ही अन्याय प्रायः छपला जात नाहीं, व यामुळें तेथील लोक युरोपांतील इतर राष्ट्रांहून सुखी आहेत ही गोष्ट सर्व प्रसिद्धच आहे.

वर सरकारी अधिकारी आपापलीं कामें कोणकोणत्या तऱ्हेनें बजावतात यांविषयीं केवळ निःपक्षपातबुद्धीनें व कोणाची भीड न बाळगतां मजकूर लिहिण्याचा आमचा इरादा आहे. अमुक अमुक गोष्ट आहे तेव्हां त्याच्या विरुद्ध कां करावें, किंवा सरकारानें अमुक अमुक गोष्ट केली तर विचार घ्यावा केली



CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

जुना ज्ञानप्रकाश

विलायतेंतील व इकडील छापखाने आणि वर्तमानपत्रें यांची तुलना करीत मागें गेलों असतां, ती मोठी मनोरंजक वाटते. या बाबतींत आमच्या हातांशीं दोन साधनें आहेत. त्यांचा थोडासा उपयोग येथें करण्याचें आम्ही योजिलें आहे. हीं दोन साधनें अशीं. (१) आजच्या पूर्वी ८१ वर्षांपूर्वी म्हणजे १८४९ सालचें ज्ञानप्रकाशाचें 'फाईल.' ज्ञानप्रकाश यात्र सालीं प्रथम अवतीर्ण झाला व हें फाईल त्याच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षाचें आहे. या फायलीचीं पहिलींच १२ पानें उपलब्ध नाहींत. परंतु ता. २६ फेब्रुवारी १८४९ रोजच्या ज्ञानप्रकाशाचें, म्हणजे पहिल्या वर्षाच्या तिसऱ्या अंकाच्या मुखपृष्ठाचें फोटो ब्लॉकचें चित्र याखालीं आम्ही दिलें आहे. त्यावरून त्याच्या दर्शनी स्वरूपाची थोडीशी कल्पना येईल. हा अंक अवघ्या आठ पानांचा आहे. य एकेका पानाची लांबी सुमारें दहा इंच व रुंदी सुमारें साडेसात इंच आहे. अशा या वर्तमानपत्राची वार्षिक वर्गणी दहा रुपये व दरमहिन्याची वर्गणी एक रुपया होती! (२) दुसरें साधन विलायतच्या 'लंडन मॅगेझिन' सन १७६८ सालाचें बांधीव पुस्तक हें होय. सन १९३०सालापूर्वी म्हणजे ८१वर्षांचा काळ वजा घातला असतां जसें १८४९ हें साल येतें, तसेंच कर्मधर्मसंयोगानें १८४९ च्या पूर्वी ८१ वर्षांचा काळ वजा घातला असतां १७६८ हें साल येतें. म्हणजे ८० वर्षांच्या दोन टप्प्यांनीं मागें जातां जातां काय दिसतें? आजचा केसरी ज्ञानप्रकाश किंवा यासारखीं अन्य देशीं मराठी वर्तमानपत्रें, अथवा आजच्या 'हिंदू' सारखीं देशी इंग्रजी वर्तमानपत्रें; तसेंच 'टाइम्स ऑफ इंडिया' 'स्टेट्स्मन्' यासारखीं आजचीं 'अँग्लोइंडियन' वर्तमानपत्रें व 'लंडन टाइम्स' 'डेली मेल' या सारखीं विलायती पत्रें घेऊन त्यांच्याशीं १८४९ चा ज्ञानप्रकाश व १७६८ चें 'लंडन मॅगेझिन' यांची तुलना केली असतां त्यांचीं स्वरूपें, किती वेगवेगळीं आहेत हें पाहून मनाला पुष्कळ बोध होतो. तो हा कीं, छापखाने वर्तमानपत्रें यांच्या दृष्टीनें पाहतां आम्ही विलायतच्या लोकांपेक्षां निदान एक शतक तरी मागें आहोंत.

असो. प्रथम १८४९ च्या ज्ञानप्रकाशाची कांहीं कल्पना यावी म्हणून त्याचें दर्शनी चित्र वर दिलेंच आहे. पण आंतील मजकुराचे कांहीं नमुने देतों. या पत्रांचें त्या वेळचें महत्त्व लक्षांत येण्याकरितां ज्ञानप्रकाशाच्या दुसऱ्या म्हणजे १९ फेब्रुवारी १८४९ च्या अंकांत आढळलेला खालील मजकूर कोणतीहि चूक दुरुस्त न करतां दिला आहेः—


ज्ञानप्रकाश

पुस्तक १ कागद २ — सत्य — शीरस्त — ज्ञान — शहर पुणे

तारीख २६ फेब्रुआरी सन १८४९ इसवी मीती फाल्गुन शुद्ध ४ शके १७७०

ज्ञानप्रकाश नामक वर्तमान पत्राची

कीमत	रूपये
दरसाल १०	अर्धसाल ६
तीन महिने	दरमहिना १

आठवड्याचें पंचांग

ति०	तारीख	वार	विशेष
४ फाल्गुनशुद्ध	२६ फेब्रुआरी	सोमवार	वि० ४ दि० २९
५	२७	मंगळवार	अमृ०
६	२८	बुधवार	
७	२९	गुरुवार	
८	१ मार्च	शुक्रवार	दग्ध०
९	२	शनवार	दग्ध०
१०	३	रविवार	सुदी

हा तेरा दिवसाचा पंधरवाडा आहे क्षय आहे

तीरख
मागील कागद प्रमाणेंच आहे

कोणास ग्रंथ छापावयाचा असेल तर ज्ञानप्रकाश छापखान्यांत थोडे किमतीत तयार करून देतील

हवा
ऊष्ण अंश ८०

विकावयाचे जीनसाची जाहीरखबर

पुण्याचे लष्करात आगामहमद मीरज्याफर यांचा खाली लिहीलेला माल विकावयाचा आहे

नंबर
१ कर्नेल कांबेल साहेब याचे घराजवळ्या बंगला क्रीकेट मैदानजवळ.
२ बंगला सदरहू जवळ.
३ घर दुमजला पके बांधलेले सदर बाजारात
४ सदर बाजाराजवळ फीलाडू घर
५ बंगला कौलारी मजबुत बांधलेला—दुसरे दुरीपी अन् रजीमेन्टचे जैसेनेत.
६ बंगला पक्का बांधलेला सदरहू ठीकाणी लास जनराल दीलदार साहेबाचा बंगल्याचे जवळ
७-८-९ तीन बंगले आठवे पलटणीचे लैनेत
१० घोरपडीचे लाईनेन बंगला १
यांपैकी माल ज्यास घ्यावयाचा असेल त्याणे पहिले नंबरचे बंगल्यात आगामहमद मीरजाफर राहतात त्यास भेटून पाहावे.

सरकारी कामदाराच्या नेमणुका
मीस्तर शासाहेब उत्तर भागाचे रिविन्यु कमीशनर नेमले
मीस्तर हन्टर साहेब पुण्याचे अगरीगंज नेमले

[हें ज्ञानप्रकाश वर्तमानपत्राचें पहिल्या वर्षाच्या तिसऱ्या अंकाचें दर्शनी चित्र आहे.]

"लेम्बरीची वार्षिक सभा भरली त्यात मेहेरबान वोनसाहेब व मिस्तर रीविससाहेब व न्यूटनसाहेब व टरक्वीनसाहेब वगैरे साहेब लोक व पुरंधरे व आवासाहेब वमडेरे प्रमुख गृहस्त जमले होते, त्यासमई पहिले नंबरचे वर्तमानपत्र सदहु साहेब लोक याणी लोकास त्यांचा लाभ समजाउन घेत जावें म्हणून शिफार केली. त्याजवरून सरकारी चाकर व ग्रहस्त व सरदार व वकील लोक यांनीं घेण्याचें कबूल करून सद्या घातल्या आज आमच्या वर्तमानपत्र विकत घेणारे याद्रीवर सह्या पनास ५० आहेत व आणखी ५० मिळतील अशी उमेद आहे म्हणजे या वर्तमानपत्राचा कारखाना नीट चालेल आम्ही मेहेरबान ब्रोन साहेब प्रद्यीदनूर याचे फार उपकारी आहो कारण कीं सरदार लोक वगैरे याणी समजुत दिल्यावरून सह्या केल्या असे त्या साहेबानीं या देशच लोकांचे ही तास्तव केलें ही गोष्ट त्याचे स्मरण फार दिवस या लोकामध्ये राह्याजोगे आहे. आम्हास आता खातरी वाटते. कीं, सरदार व सरकारी कामगार हे या वर्तमानपत्रास उछावाने आश्र देतील."

वर्तमानपत्रांचा उपयोग

[ज्ञानप्रकाश, ता. ५ मार्च सन १८४९ इसवी पुस्तक १ कागद ४ पृष्ठ २६]

ज्ञानप्रकाशकर्ते यांस—

विनंती विशेष तुम्ही पत्र काढतां परंतु त्याचा उपयोग बहुतास अजून कळत नाहीं. जे मोठे मोठे म्हणवितात व आपले ठिकाणीं गर्व करून आहेत त्यांस देखील असें वाटतें हा रिकामा उद्योग आहे. परंतु तुमच्याबाटचे मीन्त बोलतो. बातमीपत्राचे उपयोग फार आहेत आपले लोकामध्यें तर कोणास बातमी मुळीच कळत नाही. ज्यास त्यास आपला आपला विचार दिसतो ज्याची त्याची नजर आपले घरापुरती असते पुढे काही कळत नाही. याजमुळे हे लोक पुढे सरकत नाहीत. मजुरी करणे हे काही फारसे शहाणपण नाहीं शहाणपण म्हणजे कोठे काय आहे हें पाहणें सर्व देशावर व जगावर नजर ठेवणे माहितगारी करणें यांचें नांव शहाणपण याजकरतां आम्ही या लोकाची प्रार्थना करतो कीं तुम्ही दिवस गुस्ती न राहिलेत त्याची फळे ही भोगता परंतु अजुन तरी तुमची नजर दूरवर जाऊं या विद्या करा वर्तमानपत्रादिक वाचीत जा म्हणजे तुम्हास बहुतकरून माहित्ती होईल जेन समजेल ते पुसा आणि खातरी करा वाद विवाद करीत जा म्हणजे तुमची बुद्धी वाढेल वियेचे शत्रुत्व कराल व कुबुद्धिचा आश्रय कराल तर फजीत पावाल जवळ तुमच्या दोन पैसे असले म्हणून सर्व मुलखात आहेत असे नाहीं आपलेसारखा दुसऱ्याचा विचार करावा. हे विनंती. एक विद्यावृद्धेच्छू.

सरकारवर टीका करण्याचा अधिकार

[पृष्ठ ४६-४७ ता. १९ मार्च १८४९ पुस्तक ३ कागद ६]

"आलीकडे कांहीं गृहस्थानी आम्हास असे सुचविले कीं, आमचे नांव पत्रात दाखल होऊ नये. असे कितीएक उद्गार आमचे कानी आले. त्यास महाराज आपण असें समजावे की कमांडर चीफ व गव्हर्नर जनरल याचे आजचे काळी नानासाहेब भाऊसाहेबासारखे पराकम त्यांचीहि नावे कारण परत्वे निघतात व त्यांचे वर्तुणुकेचा

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

विचार होतो कारण कीं जो सरकारची चाकरी करितो त्यांचें वर्तुणुकेविषयीं छापणारें यानीं जें संभवेल तें लिहिण्यास अधिकार आहे कारण कीं जो सरकारचा चाकर तो लोकाचा चाकर आणि. छापणारा लोकाचे डोळे आहेत आणि दुसरे असे आहे की बहुधा आधारावाचून आम्ही लिहीत नाही. त्यास-आमचे पत्र वाचणारांपैकी कोणाचे नाव दाइरचे पत्रात पाहाण्यात आले ते आम्ही जर तुम्हास कळवावे तर मग छापावे कशास व तुमची चाकरी कशास करावी जे जे कोणी तुम्हास म्हणतील ते आम्ही तुमचे कानावर घालू तुमचे उत्तर असेल तें आम्ही छापु म्हणजे त्याचे निवारण जाहले. छापखाने सुधारणेचे द्वार आहे."

INDIANISATION

[पृष्ठ ५४ कागद ७]

काळे पल्टणीतील साहेबलोक इतर कामावर नेमले जातात याजमुळे पल्टणीत अंमलदार कमी होतात असा बोभाट सरकारात गेल्यावरून असा ठराव जाहला कीं, हली पोस्टमास्तर जे आहेत ते पल्टणीत पाठवून तेथे काळे लोक नेमावे. सबब दरएक पोस्ट ऑफिसांत हेडक्लार्क पोस्टमास्तर नेमले.

आम्हास वाटते कीं अशा जागा नेटीव लोकास देतील तर बरे होईल व जसे पोस्टमास्तर तसेच कित्येक पल्टणांतील साहेबलोक असि॰ मास्तर नेमले आहेत व त्यांच्या जागा अन्कविनांडेल म्हणजे विलायतची सनद नाहीं अशा आहेत त्या जागा काळे लोकास दिल्या असता चांगले आहे शास्त्रात सरकारी कामगाराचे गुण कोणते असावे ते असे लिहिले आहेत."

व्यवहारान्नृपः पश्येतविद्वाद्भिर्ब्राह्मणैः सह ॥ धर्मशास्त्रानुसारेण क्रोध लोभ विवर्जितः १ श्रुताध्ययनसंपन्नाधर्मज्ञः सत्यवादिनः॥ राज्ञासभासदः कार्यारिपौमित्रेच येसमः २ या प्रकारचे असावे.

संस्थानिकावर टीका

(पृष्ठ ७६ पुस्तक १ कागद १० ता. १६ एप्रिल १८४९)

"संपूर्ण जगात पाहिले तरी राजे हे बहुधा मूर्खच असतात तेणें करून राजद्वारी अनाचारादि अनर्थ फार असतात परंतु सर्व जगांत राज्याचे मूर्खपणाविषयीं प्रमुख देश हिंदुस्थान आहे येथें बहुधा राजा हा शब्द मूर्ख वाचक झाला आहे राजास गरीब लोका इतकी जरी अक्कल असती तरी राज्ये नीट चालली असती परंतु जेथें पहावे तेथें राज्ये मूर्खशिरोमणी असतात मग राज्याची व्यवस्था कशास पुसावी अस्तु असें आहे खरें परंतु अलीकडे होळकरांचा मुलगा गादीवर आहे त्यांस शिक्षक उमेरसिंग ठेवला आहे तो गुरुही योग्य आणि तदनुसार होळकर यांस विद्याभ्यास चांगला झाला आहे. जर आमचे स्वदेशीच राजे असें कांहीं शाहणें झालें आणि त्यांस कोठें काय आहे हें दिसूं लागलें तर फार चांगलें आहे त्यांचें हातूनच कांहीं या देशचे लोकांचें कल्याण होईल तर होईल, नाहीं तर अक्षरशत्रूपासून काय होणार ! आणि आजपर्यंत काय झालें हें दिसतच आहे. कारभाऱ्यानें खरें भाषण केलें म्हणजे यजमान मूर्ख होत नाहीं. याचकरितां कारभारी स्पष्टवक्ता असावा. बहुधा कारभारी मुखरंजक भाषण करणारे फार. ते असे कीं, रेडा गाभणा आहे कीं काय ! असा प्रश्न यजमानांनीं केला म्हणजे त्यांजवर कारभारी उत्तर देतात कीं, महाराज रेडा ५, ५ शेर दूध देतो असें आंजेवी उत्तर करितात. परंतु कोणी असें म्हणत नाहीं कीं हे मूर्खा, रेडा कधीं गाभणा होत असतो काय !

The London Magazine.



Or, GENTLEMAN's *Monthly Intelligencer*;

For JANUARY, 1768.

Caveat against Enthusiasm	3	Description of Holkam House	50—53
Lecture on Eph. ii. 3.	4	Convenient Apartments	52
Address to the Livery of London	5	Paintings at Holkam	53
Short Account of *False Delicacy*	6	A base and barbarous Stratagem	34
Ill Fortune of Marcellus	7	Address to the Electors of Norfolk and Norwich	35—37
The Coluber Cerastes described	8	Scheme to prevent the begging of servants at Public Inns	38
The History of the last Session of Parliament, &c. &c.	9—14	A curious Query	39
Proceedings on East-India Affairs 13 *& seq.*		Addresses of the Manufacturers	ibid.
Late Changes in the Ministry accounted for	14	Of the double Horns of the Rhinoceros	40
Another Letter from Rousseau	15	Anecdotes of Luca Jordano	41
Case of a fractured Rib and a remarkable Emphysema	17	An impartial Review of new Publications	42—48
Letter from Huxham on emphysematous Cases	18	Makarony Fables	43
Account of the late Eruption of Mount Vesuvius	ib.—20	Macpherson's critical Dissertations	44
Vanity and Folly of the French satirized	21	An Essay upon Prints	45
Curious Particulars in Regard to the striking Likenesses of Persons	22	Warner on the Gout	47
Humourous Proposal for new Improvem.	23	Ingram on the same	ibid.
Character of the Parliament of 1641,	24	POETICAL ESSAYS	48
Account of the Attempt for seizing the five Members	ibid.	A new Song set to Music	
An interesting Letter	25	Story of False Delicacy, a Comedy	
Self-made modern Philosophers	26	THE MONTHLY CHRONOLOGER	650
Over-bearing of Infidelity	27	Marriages and Births; Deaths	652
The Friends of Religion pointed Out	28	Ecclesiastical Preferments	ibid.
Rules for the Clergy to Temporize	29	Promotions Civil and Military	ibid.
		Bankrupts; Course of Exchange	ibid.
		FOREIGN AFFAIRS	653
		Monthly Catalogue of Books	ibid.
		Stocks, Grain; Wind and Weather	600

With a fine representation of the
COLUBER CERASTES, another of the DOUBLE HORNS of the RHINOCEROS,
AND
The Fourth Part of the Plan of the Road from LONDON to BERWICK,
All beautifully engraved on Copper.

LONDON: Printed for R. BALDWIN, at No. 47, in Pater-noster Row; Of whom may be had, compleat Sets, from the Year 1732, to this Time, neatly bound or stitched, or any single Month to compleat Sets.

[लंडनमध्यें १७५० च्या सुमारास निघालेल्या व अखंड चालू असलेल्या लंडन मॅगझिनचें दर्शनी पान.]

पेनसिन (पेन्शन)

[पृष्ठ ८७ पुस्तक १ कागद ११ ता. २६ एप्रिल सन १८४९ इसवी]

सरकारांतून चाकरास पेनसिन व्हावयाचें मान हलकें आहे. तथापि शिविल खात्यात कांहीं तरी देतात. परंतु जे विद्याशिखविण्याचे पंतोजी वगैरे आहेत त्यास पेनसिन कितीहि चाकरी केली किंवा कितीहि योग्यता असली तरी देत नाहीं; हें, फार आश्चर्य आहे. या सरकारची चाल अशी आहे कीं, जेथें जाईल तेथें हत्ती जाईल. नाहीं तेथें सुई जाणार नाहीं. एकादे वेळेस मोठा उदारपणा करतात, दुसरे वेळेस पराकाष्ठेचा लोभाविष्टपणा करतात. विद्येचे खात्यांतील लोकांस प्रथम पगार थोडे, आणि वृद्धापकाळी पेनसिनें नाहींत. याजमुळें कितेकास आधार नाहींसा होतो. किंवा शक्ती नसली तरी बळेंच चाकरी करावी लागते. आम्हास वाटतें कीं, विद्येचे खात्यांतील लोकांचा दावा जबरदस्त आहे. त्यांस पेनसिनें अवश्य असावी व येविशीं सरकारानें कद्रुपणा करूं नये. कारण. कीं, हे लोक फार उपयोगी व विद्या शिखविणें हा सरकारचा मोठा धर्म आहे. लढाई झाहली म्हणजे लाखो रुपये खर्च होतात. आणि फळ कांहीं विशेष होत नाहीं. दुसरें मुलूख मिळतात. परंतु उपयोग काय ? जे मिळाले आहेत, त्यांतील लोकांचें कल्याण करावयाचें टाकून आणखी मुलूख घेऊन कर्तव्य काय ? याजकरतां विद्येचे कामांत सरकारनें उदारपणा करावा, अमेरिकेंत इंग्लंडांत पाहा किती खर्च विद्येकरतां देत आहे ? कितीयेक मोठाले विद्वान समुद्रासारखे वहुन त्या देशांत आहेत. तशीच विद्या या देशांत जाहली पाहिजे. कर्नाटकांतील जाहागीरदारास पुसा कीं इंग्रज हिंदुस्थानात आहेत? तर तो म्हणेल कीं वेळगांवास आहेत. आणखी कोठें आहेत, कोणास ठाऊक ? या प्रमाणें सर्वच गोष्टींची गैर माहिती आहे. वास्तव छापी कागदावर जसा धारा आहे. त्यासारखा धारा या कामाकडे अजि जाऊं द्यावा.

तक्रारी—रस्त्यानें जोरानें तट्टू हांकणें

[पृष्ठ ९९ कागद १२ ता. ७ मे १८४९]

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—.

विशेष. मी परवाचे दिवशीं रस्त्यांत जात असतांना एक गोष्ट पाहिली. ती आपणांस कळविण्यासारखी आहे म्हणून लिहितों."

एक गृहस्थ घोड्यावर बसून येत होता. त्याचें घोडें लहान तट्टूसारखें होतें. आणि पुढें पोरगा धावत होता आणि रस्ता पैस होता. तरी मोठ्यानें हाका मारून पैस, बाजूला व्हा म्हणून दूरदूरचे लोक होते त्यांत घाबरें करीत असे.

ज्यास घोडें इत्यादि वाहान अनुकूल आहे त्यांनीं रस्त्यावरचें माणसांस सावध करावें ही गोष्ट चांगली. परंतु सांप्रत लोकांस चोपदार, भालदार नाहींत. याजकरितां त्याचें फळ तें वीतभर घोड्यावर आणि वीतभर पोरावर काढतात, आणि विनाकारण रस्त्यावरचे लोकांस उपद्रव करितात. रस्त्यांत माणसें वांटेवर नसली तर ओरडण्याची काय गरज आहे! परंतु पुढें माणूस धावडून गलबा करावा हें मोठें महत्त्व वाटतें. म्हणून लोक असें करतात असें वाटतें. ही विनंति.

—पादचारी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 3455

बंगाल्यांतील वर्तमानपत्रें

इ. स. १७७८ च्या पूर्वी हिंदुस्थानांत मुद्रणयंत्र आलें नव्हतें. हिंदुस्थानांतला पहिला छापखाना कलकत्त्याजवळील श्रीरामपूर येथें करे (Carey) या पाद्रीसाहेबानें स्थापिला. त्याचा उद्देश अर्थातच 'पवित्र ज्ञानाचा' प्रसार करणें हाच होता. बंगाली बायबल हेंच बहुधा हिंदुस्थानांतलें देशी भाषेंत छापलेलें पहिलें पुस्तक असावें.

हिकीचें 'बेंगाल गॅझेट' हेंच हिंदुस्थानांतलें पहिलें छापील वृत्तपत्र. हें इंग्रजींत २९ जानेवारी १७८० या दिवशीं निघालें. पहिला गव्हर्नर वॉरन हेस्टिंग्ज याची पत्नी व इतर अधिकारी यांचेसंबंधानें कांहीं अपमानकारक मजकूर छापल्यामुळें दोन वर्षें पुरीं होतात तोंच हें पत्र बंद करावें लागलें. हिकीचें 'Bengal Gazette' नंतर 'India Gazette' 'Calcutta Gazette' व आणखी किती तरी इंग्रजी वर्तमानपत्रें बाहेर पडलीं. त्या वेळच्या वर्तमानपत्रांचें बाह्यस्वरूप जसें ओबडधोबड, त्यांची भाषासरणी जशी असभ्य तसेच त्यांचे इतर व्यवहारहि बरा दांडगेपणाचे असत. लॉर्ड वेलस्लीनें थोडे नियम करून वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य संकुचित केलें. (१३ मे १७९९) लॉर्ड मिंटो हाहि वर्तमानपत्रकर्त्यांचे बाबतींत कमी निष्ठुर नव्हता. उलट त्यानें संपादक वर्गावर अधिकच कडक बंधनें घालण्याचा आक्टोबर १८१३ त प्रयत्न केला.

'बांगाला गॅझेट'—बंगाली भाषेंत प्रथम कोणतें वर्तमानपत्र निघालें या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें एकमत नाहीं. लॉंग नांवाचा पाद्री १८५५ या सालीं लिहितो कीं, "२३ मे १८१८ या दिवशीं श्रीरामपूरच्या मिशनरी लोकांनीं 'समाचारदर्पण' या नांवाचें बंगाली भाषेंतलें पहिलें वृत्तपत्र काढलें." पण पुढें पांचच वर्षांनीं हें मत बदलून तो म्हणतो कीं, १८१६ सालीं गंगाधर भट्टाचार्य यानें संपादित केलेलें 'बांगाला गॅझेट' हेंच पहिलें बंगाली वर्तमानपत्र होय. मुंबई समाचार त्यानंतर सहा वर्षांनीं म्हणजे १८२२ मध्यें निघालें असें वाटतें.

समाचारदर्पण—तत्कालीन इंग्रजी वर्तमानपत्रांवर सरकारचा राग असूनहि १८१८ च्या एप्रील महिन्यांत श्रीरामपूरच्या मिशनकडून 'दिग्दर्शन' नांवाचें मासिक प्रसिद्ध झालें. लगेच एक महिन्याचे आंत 'मिशन समाचारदर्पण' नांवाचें बंगाली साप्ताहिक बाहेर पडलें. समाचारदर्पण पत्र अनेक वर्षें चाललें या पत्राचें हिंदुधर्मविषयक लेख सोडून दिले तरी एकंदरींत त्याची कामगिरी लोकोपयोगी झाली यांत शंका नाहीं. या पत्राचा सरकारी अधिकाऱ्यांवर चांगला वचक असे. निरनिराळ्या प्रश्नांवर लोकांकडून आलेला पत्रव्यवहार त्यांत छापीत असत. म्हणजे वर्तमानपत्रांचा सार्वजनिक कामीं उपयोग करून घेण्याचें शिक्षण या पत्रानें देण्यास सुरुवात केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इ. स. १८४१ मध्यें २५ डिसेंबरला तें बंद पडलें. पण १८५१ च्या ३ मेला तें पुनः उदित झाल्याचा उल्लेख आहे.

राम मोहनराय यांनीं कंपनी सरकारची सेवा सोडली व कलकत्त्याला येऊन देशसेवा करण्याचें ठरविलें. 'ज्ञानाच्या प्रकाशानें स्वदेशाला उज्वल करणें' हें त्यांचें व्रत होतें. देशबांधवांच्या शिक्षणासाठीं त्यांनीं पुष्कळ विचार व प्रयत्न केले होते. त्यांनीं ओळखलें कीं, वर्तमानपत्रें ही लोकांना शिक्षण देण्याचे कामीं चांगलीं साधनें आहेत. वळ आलेली होती. तेव्हां देशी वर्तमानपत्रांची स्थापना व उन्नति इकडे त्यांनीं आपलें मन घातलें. 'संवाद कौमुदी' नांवाचें बंगाली साप्ताहिक पत्र ४ एप्रील १८२१ ला प्रथम प्रसिद्ध झालें. ह्या पत्राची मालकी व व्यवस्था सर्वस्वी हिंदी लोकांच्या हातीं होती. याची वर्गणी मासिक दोन रुपये होती.

संवादकौमुदी हें पत्र काढून राम मोहनरायांनीं एका नव्याच प्रघातास सुरुवात केली. आतांपर्यंत लोकांना बंगालीभाषा ही फक्त बोलण्याची भाषा असें वाटे. हा काळपर्यंत बंगालींत जें लिखाण झालें तें बहुधा कवितारूप होतें. त्यांत संस्कृत शब्दांचा भरणा खूप असावयाचा. यामुळें गद्यलेखनाला बंगाली भाषा अयोग्य असें लोक समजत. ही गोष्ट राम मोहनांच्या पहिल्या पहिल्या लेखांवरून पटतेहि. त्यांचें हें गद्यलेखन इतकें बोजड वाटतें कीं, त्याचे मानानें त्यांनीं लिहिलेले इंग्रजी व संस्कृत लेख फारच सफाईदार दिसतात! लेखन अधिकाधिक होऊं लागलें तसतसा बंगाली भाषेचा बोजडपणा जाऊन इतरहि दोष कमी होऊं लागले.

संवादकौमुदी हें पत्र १८४० पर्यंत म्हणजे २१ वर्षें टिकलें. मिशनरी लोकांना उत्तर देण्यासाठीं म्हणून प्रथम या पत्राचा जन्म झाला खरा. पण राम मोहन यांचीं मतें सुधारकी थाटाचीं असल्यामुळें पुराणमतवादी लोकांचें ह्यांचेबरोबर जमेना. तेव्हां त्यांनीं ब्रह्मसमाज स्थापन केला. व 'संवादकौमुदी' त्यांचें मुखपत्र बनलें. ब्रह्मसमाजाच्या कार्याला तोड म्हणून पुराणमतवादी लोकांची धर्मसभा जन्म पावली व तिच्या मुखपत्राचा मान 'समाचारचंद्रिके'ला मिळाला.

वृत्तपत्रांच्या स्वतंत्रतेचा संकोच व वर्तमानपत्रांची स्वतंत्रता फार दिवस टिकली नाहीं. इंग्रजी पत्रांतून विशेषतः सिल्क बकिंगहॅमचें 'कलकत्ता जर्नल' या पत्रांत आक्षेपार्ह व अनिष्टकारक वाटणारे लेख प्रसिद्ध होऊं लागले. लॉर्ड हेस्टिंग्जनें केलेल्या नियमांचें उल्लंघन होत असलेलें सरकारनें पाहिलें. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याला आळा घालण्याकरितां नवीन कायदा प्रसृत करण्यासाठीं पुनः वाटाघाट सुरू झाली. १० आक्टोबर १८२२ या दिवशीं William butterworth व Baily यांनीं कलकत्त्याच्या मंत्रिमंडळापुढें देशी भाषेंतील फारशी व बंगाली वृत्तपत्रांसंबधानें एक लांबलचक वृत्तांत (Minute) मांडला.

सन १८२३ ते १८३५ या कालांत, संवाद तिमिरनाशक, बंगदूत आणि बंगाला हेरल्ड, शास्त्र प्रकाश, संवाद प्रभाकर, संवाद सुधाकर, समाचार-सुधा-राजेंद्र, ज्ञानान्वेषण, संवाद नित्यप्रकाश, संवाद रत्नाकर' अनुवादिका, संवाद मयूख, संवाद सारसंग्रह, संवाद सौदामिनी, सत्यवादी वगैरे नियतकालीकं प्रसिद्ध होऊं लागलीं व बहुधा पुष्कळशीं अल्पायुषींच ठरलीं. त्यापैकीं कांहीं महत्त्वाचीं म्हणजे संवाद प्रभाकर, सत्यवादी हीं होत.

सन १८३० हें वर्ष बंगाली इतिहासाच्या इतिहासांत फार महत्त्वाचें समजलें पाहिजे. कारण या एकाच वर्षी संवादसुधाकर आणि संवादप्रभाकर प्रभाकर अशीं दोन वृत्तपत्रें चंद्रसूर्याप्रमाणें बंगालवर ज्ञानाचा प्रकाश पाडूं लागलीं. संपादक ईश्वरचंद्र गुप्त यांनीं सरकारला केलेल्या इंग्रजी अर्जांत सही मात्र बंगालींत केली होती. २८ जानेवारी १८३० ला याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. याच्या छापखान्याचें नांव संवादप्रभाकर छापखाना असेंच होतें. तें दर शुक्रवारीं निघे. थोड्याच दिवसांत हें पत्र लोकप्रिय झाल्याचें त्या वेळच्या पत्रांतून उल्लेख आहेत.

सुप्रसिद्ध कादंबरीकार बंकिमचंद्र ईश्वरचंद्र गुप्त याचे हाताखालींच वाढला. प्रथम तो पद्यरचनाच करी. पण गुरूच्या सांगीवरून त्यानें गद्याला हात घातला आणि पुढें याच मार्गानें तो कसा नांवलौकिकाला चढला हें सर्वांना माहीतच आहे. यावरून ईश्वरचंद्र हा मोठा योजक पुरुष असाव हें सिद्ध होतें.

बातम्यांखेरीज प्रभाकरामध्यें धर्म, समाज व साहित्य इत्यादि विषयांवर विचार मांडले जात. मोठमोठाल्या व्यक्ती प्रभाकरामध्यें लिहीत. उदाहरणार्थ, राजा राधाकांत देव, प्रेमचंद्र तर्कवागीश, जयगोपाल तर्कालंकार, प्रसन्नकुमार ठाकूर आणि रामकमल सेन. अक्षयकुमार दत्त यांचेप्रमाणें कविश्रेष्ठ रंगलाल, साहित्यसम्राट बंकिमचंद्र, नाट्याचार्य दीनबंधु आणि मनमोहन, कांगाल हरिनाथ, सोमप्रकाशचे द्वारकानाथ–प्रभृति प्रभाकराच्या कचेरींत उमेदवार आणि ईश्वरचंद्र गुप्त यांचे शिष्य म्हणून कामें करीत.

१ सत्यवादी २ संवादसिंधु आणि ३ संवादपूर्ण चंद्रोदय (१८३५) पहिलें इंग्रजी व बंगाली अशा दोन भाषांत प्रसिद्ध होई. दुसरें फक्त बंगाली असे. सत्यवादी इतर पुण्यवान प्राण्यांप्रमाणें फार अल्पायुषी ठरला. संवादसिंधूलाहि लौकरच ओहोटी लागून पांच वर्षांत तो आटून गेला! तिसरें पत्र श्रीमान लोकांच्या हौशीमुळें जन्मास आलें. तें पाक्षिक होतें.

१८६८ च्या वेळीं जन्माला आलेल्या पत्रांत अमृतबाजारपत्रिकेचा प्रामुख्यानें नामनिर्देश केला पाहिजे. शिवाय बंगालप्रांताबाहेर अव्याहतपणें जर कोणतें इकडील पत्र वाचलें जात असेल तर तें हेंच होय. बाबू मोतिलाल (वास्तविक मतिलाल) घोष हें या पत्राचे संपादक म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. पण हिला जन्म देण्याचें कामींहि त्यांचा हात होताच. मूळ कल्पना त्यांचे ज्येष्ठबंधु महात्मा शिशिर कुमार घोष यांची. हे लहानपणापासूनच सार्वजनिक कार्याचे भोक्ते. त्यांचें लक्ष इकडे वेधलें. त्यांनीं पुष्कळ खटपटी केल्या; बरीच चळवळ केली. पण तिकडे एका कोपऱ्यांत चाललेल्या त्यांच्या कार्याचा इकडे कोणाला पत्ताहि नसे. आणि त्यामुळें त्यांची चळवळ जोर धरीना. आपलें वर्तमानपत्र असल्याशिवाय भागणार नाहीं हें त्यांनीं ताडलें. पण संन्याशाच्या संसाराला शेंडीपासून सुरवात अशी स्थिति होती. घरची गरिबी, मुद्रणाचें काम कशाशीं खातात तें माहीत नाहीं. पण त्यांचा निश्चय अढळ होता. शिशिरकुमार ४।६ महिने कलकत्त्याला आले व खिळे जुळविण्याचें काम शिकले. छापण्यांच्या कामाचीहि त्यांनीं सर्व माहिती करून घेतली. परत अमृत बाजारला गेले. एक लाकडी प्रेस करविला व थोडासा टाईप बरोबर नेलाच होता. पैशाच्या टंचाईमुळें कंपॉझिटर, प्रिंटर व संपादक अशीं तीनहि कामें शिशिरबाबू जातीनें करीत. प्रथम साप्ताहिक म्हणूनच पत्रिका सुरू झाली. पहिले ४।५ महिने काम सुरळीत चाललें. वर्गणीदार ५०० पर्यंत वाढले. लोकांचीं गाऱ्हाणीं चांगल्या तऱ्हेनें उजेडांत येऊं लागलीं. सरकारला हें इष्ट नव्हतें. तेव्हां त्यांना त्रास देण्यास सुरवात झाली. त्यांच्यावर एक अब्रुनुकसानीचा खटला करण्यांत आला. तो ८ महिने रेंगाळला. पण निकाल त्यांना अनुकूल लागला. थोड्याच दिवसांत त्यांचेवर फौजदारी खटला उभारण्यांत आला. त्यांतूनहि त्यांची सुटका झाली. पण आर्थिक नुकसान फार झालें. शिवाय मलेरिया तापानें शिशिरबाबू वरचेवर आजारी पडूं लागले. म्हणून त्यांनीं १८७१ मध्यें कलकत्त्याला बिऱ्हाड हलविलें. पैशाची पंचाईत होतीच. पण एका मित्राजवळचे १०० रु. काढून त्यांनीं एक हातप्रेस घेतला. कलकत्त्याला पहिला अंक १८७२ च्या फेब्रुवारींत बाहेर पडला. कांहीं दिवसांनीं मात्र पत्रिकेचा चांगला जम बसला. तिची भाषासरणी लोकांना पसंत पडली. पत्रिकेचें लिहिणें असें चतुरपणाचें असें कीं, टीका तर सरकाराला झोंबावी पण कायद्याच्या कचाट्यांत सांपडूच नये. ही करामत आजवरहि संपादकांनीं चालू ठेवली आहे. या नाहीं त्या कारणानें सर्व वर्तमानपत्रें सरकारच्या दोषाला बळी पडलेलीं आहेत. पण पत्रिकेला सरकार स्पर्श करूं शकलें नाहीं. पत्रिकेचें लिहिणें निर्भीड, पण समतोल गंभीर आणि विनोदपूर्ण असतें.

कलकत्त्याला आल्यावर Hindu Patriot या पत्राशीं नेहमीं पत्रिकेचा सामना झडे. हिंदू पेट्रिअट हें British Indian Association या संस्थेतर्फे निघत असें. त्याचे संपादक क्रिस्तोदास (कृष्णदास) पाल होते. दोघांचीं मतें अगदीं उलट्या दिशांना धावणारीं. पत्रिकेंत सरकारी मुख्य अधिकारी व दुय्यम अधिकारी यांचेंवर व्यंग्य चित्रेंहि या वेळीं येत. ज्यूरीचा अधिकार, कार्पोरेशनमध्यें लोकांचा मतदानाचा हक्क, नवीन कर इत्यादि बाबतींत पत्रिकेची कामगिरी बाखाणण्यासारखी झाली. आणि तींतच तिच्या लोकप्रियतेचें बीज होतें.

पत्रिका इंग्रजी व बंगाली निघे. सरकारच्या डोळ्यांत पत्रिका खुपत होती. यावेळीं देशी भाषांमध्यें निघणाऱ्या वर्तमानपत्रांचेभोंवती गळफांस टाकण्याचा सरकारनें विचार केला. हा कायदा व्हर्नाक्युलर प्रेसॲक्ट म्हणून प्रसिद्ध आहे. कायदा तर पास झाला व तो अंमलांत आला कीं, पत्रिकेची शंभर वर्षें भरलेलींच होतीं. पण शिशिरकुमार घोष या प्रसंगाला पुरून उरले. एका रात्रींत सर्व परिवर्तन होऊन कायद्याचा अंमल होणार त्या तारखेला सकाळीं लोकांच्या हातांत पत्रिका रोजच्याप्रमाणेंच

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

पडली. पण आज तीत बंगाली असर्गद नव्हतें. सर्व पत्रच इंग्रजी झालें व अशा युक्तीनें त्यांनीं आपलें संकट टाळलें. तेव्हांपासून पत्रिका इंग्रजींत निघूं लागली ती कायमचीच.

बंकिमचंद्र चतर्जी यांचें नामांकित बंगदर्शन याच वेळीं अवतीर्ण झालें. मासिकाच्या राज्यांत यामुळें क्रांतिच झाली म्हटलें तरी चालेल. यांचे अगोदर विद्या कल्पद्रुम, विविधार्थसंग्रह, महर्षि देवेंद्रनाथ टागोर यांचें तत्त्वबोधिनी पत्रिका अशीं अनेक मासिकें बंगालींत निघत. आजवर मासिकांमधून तत्वज्ञानासारखे रुक्ष विषय यावयाचे असे ठरलेलें. घटपटादिवादाला अनुरूप अशी त्यांची क्लिष्ट भाषा असावयाची. पण बंगदर्शनानें ही स्थिति पार पालटली त्यांत आधुनिक शास्त्रें, नीति, राष्ट्रांचे इतिहास, निरनिराळ्या मनुष्य व प्राणी वंशांची. माहिती इत्यादींवर सुंदर व सोप्या भाषेंत लेख येऊं लागले. शिवाय मुळांतच बंकिमचंद्रांची भाषा जोरदार होती. पण बंगदर्शनानें याहूनहि निराळेंच काम केलें. आतांपर्यंत कादंबरी म्हणजे इंग्रजीच असावयाची. फार तर तिचें भाषांतर देशी भाषांतून वाचावें एवढेंच लोकांना माहीत. बंगाली भाषेंत स्वतंत्र कादंबरी लिहितां येईल आणि ती एखादा बंगाली लिहील हें कोणास स्वप्नांतहि वाटत नसे. तेव्हां बंगदर्शनाच्या पहिल्याच अंकांत "विष-वृक्षा"चीं कांहीं पानें पाहून लोकांना निराळ्या अर्थानें "चटका" लागला. पहिल्या अंकानें लोक वेडे होऊन गेले. बंकिमचंद्र कलकत्ता विश्वविद्यालयाचे पहिले ग्रॅज्युएट. आंग्लेग्रंथसंग्रह त्यांनीं पाहिला होता. त्याचा पुरेपूर उपयोग त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून व इतर लेखांतून केला. संस्कृतप्रचुर लालित्य-पूर्ण अशी त्यांची भाषा वाचून लोक हुरळून गेले. करमणूक म्हणून मासिकें वाचण्याची गोडी बंकिमबाबूंनी लोकांना लावली. त्यांच्या अंकाची लोक उत्सुकतेनें वाट पहात. क्रमाक्रमानें त्यांतच दुर्गेशनंदिनी, कपालकुंडला याहि नवलकथा आल्यामुळें लोकांना फार कौतुक वाटलें. कांहीं मतभेद झाल्यामुळें बंगदर्शन १८७५मध्यें बंद पडलें तें पुनः १८७७ मध्यें सुरू झालें. आतां तें त्यांचे बंधु चालवीत. १८८२ सालीं पुनः तें विराम पावलें. पुढें १९१३ मध्यें रवींद्रनाथ ठाकूर यांनीं त्याला पुनरुज्जीवित केलें. पण त्याचाहि उपयोग झाला नाहीं.

ब्राह्मोसमाजानें हिंदुसमाज रक्षणाच्या उद्देशानें संजीवनी पत्र काढण्यांत आलें. १८९० मध्यें हितवादीचा उदय झाला. हें पत्र रवींद्रनाथ ठाकूर यांनीं स्थापन केलें. तेंहि तत्काल लोकप्रिय झालें. याच पत्राचे संपादक होण्याचा मान श्री. देऊसकर या महाराष्ट्रीय गृहस्थांना लाभला होता.

आणखी अलीकडच्या काळांत आल्यावर "नायक, मुमति व बंगाली" या त्रयींनें चुनाळूक माजविलेला दिसून येतो. बंगाली नांवाचाच बंगाली. तो इंग्रजींत निघतो. हा सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं काढलेला सर्वांना माहीत आहेच. आतां तर बंगालीचें संपादकत्वहि मद्रासी इसमाकडे आहे! फॉरवर्ड, ऑनवर्ड, अॅडव्हान्स, लिबर्टी यांविषयीं येथें लिहिण्याचें कारण नाहीं. साप्ताहिकांत बंगवासी, संजीवनी, हितवादी, वसुमति, समय यांची नांवाजण्यासारखी कामगिरी झाली आहे. मासिकांत भारतवर्ष प्रवासी, मानसी मर्मवाणी व भारती यांचा नामनिर्देश करणें जरूर आहे. प्रवासीमध्यें निर्भीडपणें प्रकाशित प्रभावी टीका येते.

हल्लीं खुद्द कलकत्त्यांत सर्वप्रकार मिळून दैनिकें, साप्ताहिकें, मासिकें व इतर सुमारें १०० वर पत्रकें आहेत. तीं लोक शिक्षणाचें, लोक जागृतीचें आणि वाङ्मय सेवेचें कार्य आपापल्यापरीनें करीत आहेत. वाङ्मयाला वाहिलेल्या मंडळींत हल्लीं दोन तट झाले आहेत. लेखनामध्यें भाषा वापरावयाची ती बोलण्याच्या व्यवहारांतील कीं आजवरच्याप्रमाणें तिचें प्रौढ स्वरूप कायम ठेवावयाचें, हा अलीकडे इकडे वादाचा प्रश्न झाला आहे. रवीन्द्रनाथ ठाकूरआदि लेखकांचें म्हणणें जसें बोलणें तसें लिहिणें हें योग्य; आणि त्यांचें अलीकडचें बहुतेक सर्व लेखन या तऱ्हेचें असतें. दुसरी बाजू श्री. पी. चौधरी यांची. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें लिहिण्याची भाषा ही अगदीं बोलण्यानुसारिणी राहणें इष्ट नाहीं. रवींद्रबाबूंनीं आपल्या मतप्रसारासाठीं 'सबूजपत्र' नांवाचें मासिक काढलें. त्याला तोंड देण्यासाठीं देशबंधुदास, बिपिनचंद्रपाल, हरप्रसाद शास्त्री इत्यादि विद्वानांनीं 'नारायण' नांवाचें मासिक काढलें. या वादाचा निकाल कधीं तरी लागेल कीं नाहीं याची शंकाच आहे!

बंगालप्रांतीय वृत्तपत्रांच्या इतिहासाचें गाडें येथवर आणून सोडलें. अगदीं आजच्या दिवसांत चालू असलेल्या वर्तमानपत्रांविषयीं नामनिर्देशापलीकडे कांहीं लिहिणें इष्ट नाहीं. पण एवढें नमूद करण्यास हरकत नाहीं कीं आजकाल वृत्तपत्रांना जें Fourth Estate म्हणण्यांत येतें त्या पदवीला अनुरूप असें बंगाली वृत्तपत्रांनीं कार्य चालविलें आहे. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या न्यायानें सर्व प्रकारचीं मतें यांतून प्रतिपादन केलेलीं दिसून येतील. पण एकंदरींत धोरण पाहिलें तर तें लोकमतानुवर्ती (Democratic) होत चाललें असल्याचेंच दिसून येईल.

मद्रासचें पुढारी वर्तमानपत्र

मद्रास इलाख्यांत प्रथमपासून देशी भाषेची आवड व अभ्यास कमी. भाषेच्या दृष्टीनें मद्रास इलाखा हा महाराष्ट्रापेक्षां पुष्कळच अधिक, पण बंगल्याहूनहि अधिक आंग्लमय किंवा इंग्रजाळलेला झाला होता. यामुळें तिकडे म्हणजे तामीळ नाडूमध्यें पूर्वीं किंवा आजहि देशी भाषांतील वर्तमानपत्रांचें तेज इंग्रजी भाषेंतील वर्तमानपत्रांपुढें पडलें नाहीं. 'स्वदेश मित्रम्' व 'हिंदू' हीं दोन्हीपत्रें एकाच हातानें निघालेलीं व प्रथम कांहीं दिवस लिहिलेलीं. परंतु इंग्रजी 'हिंदू' पत्राची सर तामील 'स्वदेश मित्रम्ला' आलेली नाहीं. या दृष्टीनें पाहतां महाराष्ट्र व मद्रास यांचा स्वभाव परस्पर विरुद्ध दिसतो. म्हणजे महाराष्ट्रांत मराठीचा उत्कर्ष व त्या मानानें इंग्रजीचा अनादर; आणि मद्रासेंत इंग्रजीचा उत्कर्ष व त्या मानानें देशी भाषेचा अनादर!

सन १८५०–६०च्या सुमारास मद्रासेस कांहीं देशाभिमानी तरुणांनीं एक संस्था काढली. तिचे पुढारी श्री. लक्ष्मीनरसु चेटिआर हे होते. तिला 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन' असें म्हणत. तिचें काम पुणें येथील सार्वजनिक सभेसारखें होतें. म्हणजे युक्तिवाद करणारे माहितीनें भरलेले टीका–निबंधात्मक अर्ज सरकाराकडे करून, ही संस्था लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घ्यावयाचा प्रयत्न करी. या संस्थेची जागा पुढें मद्रास 'महाजन सभे'नें घेतली. असो, 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन्'चें एक मुखपत्र 'दी क्रेसंट' या नांवाचें इंग्रजी भाषेंत निघे. पण ही संस्था व हें पत्र यांची इतिश्री लवकरच झाली. त्यानंतर राजा सर टी माधवराव, दिवाण बहादुर रघुनाथराव, रंगानंद मुदलियार वगैरे गृहस्थांनीं 'नेटिव्ह पब्लिक ओपीनियन्' या नांवाचें एक इंग्रजी पत्र काढलें. पण तेंहि फार दिवस चाललें नाहीं. ए. रामचंद्र अय्यर यांनीं 'दी मद्रासी' नांवाचें तसेंच एक इंग्रजीपत्र काढलें त्यांत हें पहिलें सामील होऊन गेलें. सन १८७७ च्या सुमारास सर टी. मुतुस्वामी अय्यर यांचा मद्रास हायकोर्टांत न्यायाधीश म्हणून नेमणूक होण्याला या पत्रानें कांहीं अंतस्थ कारणामुळें विरोध केला. त्यामुळें तें लोकांना अप्रिय होऊन जे एकदां ढासळलें तें कायमचें ढासळलें. ए. रामचंद्र अय्यर हेहि पुढें म्हैसुरास जाऊन तेथें हायकोर्टाचे सर न्यायाधीश झाले.

सन १८७८ च्या सुमारास लिटन शाहीनें पुष्कळ खळबळ उडवून सोडली व चांगल्या वर्तमान पत्रांची उणीव सर्वांना भासूं लागली. याच सुमारास कॉलेज सोडून एल. एल. बी.चा अभ्यास करणारे, किंवा मास्तरकीचा धंदा करणारे, कांहीं तरुण विद्यार्थी मद्रास येथें ट्रिप्लिकेनच्या पेठेंत 'वाङ्मय मंडळ' नांवाची संस्था काढून, तेथें अनेक प्रकारची चर्चा करीत असत. त्यांत सुब्रह्मण्य अय्यर, टी. रंगाचारियर, पी. रंगाचारिअर, केशवराव पंत, एन. सुब्बराव व वीरराघव चारियर हे प्रमुख होते. त्यांनीं 'हिंदू' नांवाचें वर्तमानपत्र काढावयाचें ठरविलें. या कामाला लागणारा पैसा त्यांच्या जवळ नव्हता. पण तरुणपणाची हौस व उमेद भरपूर होती. मात्र वरील सहा तरुणांपैकीं सुब्रह्मण्य आय्यर व वीरराघवाचारियर हे शाळा मास्तरकीच्या धंद्यांत शिरलेले म्हणून त्यांना पगार मिळत असे. लॉ कॉलेजांतील विद्यार्थ्यांना तोहि नव्हता. म्हणून पैशाची जबाबदारी पहिल्या दोघांनींच आपल्या अंगावर घेतली. अशा रीतीनें ता. २० सप्टेंबर १८७८ रोजीं 'हिंदू' नांवाचें इंग्रजी वर्तमानपत्र सुरू झालें. तें प्रथम साप्ताहिकच होतें. श्रीनिधी छापखान्यांत तें छापलें जाई. पुष्कळ लोकांनीं या तरुणांना "या धंद्याच्या भानगडींत तुम्ही व्यर्थ पडला" असा उपदेश चालविला. यांत फार बुडं येईल असेंहि सांगितलें. पूर्वी बुडालेलें 'नेटिव्ह पब्लिक ओपीनियन' व 'मद्रासी' या वर्तमानपत्रांचा दाखलाहि दिला. परंतु त्या सर्वांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सुब्रह्मण्य अय्यर यांच्या मदतीला करुणाकर मेनन, के. सुब्बराव. व के. नटराजन हे होते. ते सुब्रह्मण्य अय्यर यांच्याहून बरेच लहान. पण त्यांनाहि लिहिण्यावाचण्याची फार हौस. (यांपैकीं मि. नटराजन हे पुढें मुंबईस आले व हल्लीं ते 'इंडियन सोशल रिफॉर्मर', 'इंडियन् डेली मेल,' वगैरे पत्रांचे संपादक असून, इंग्रजी लेखनकलेंत फार प्रवीण असल्यानें प्रसिद्धच आहे.) पण याशिवाय आश्चर्याची गोष्ट ही कीं या नवीन वर्तमानपत्रांचें कौतुक वाटून एक इंग्रज अधिकारीहि त्याच्या चालकांच्या मदतीला सरसावला. सर्जन मेजर निकलसन यांनीं हिंदूचा पहिला अंक पाहातांच तें पत्र कोण चालवितो याची मुद्दाम चौकशी केली, व त्यांना घरीं बोलावून घेऊन अनेक विषयां-संबंधीं धोरण कसें राहावें याविषयीं सल्ला दिला. इतकेंच नव्हे तर मेजर निकलसन् व हिंदूपत्राचे चालक यांच्या दर आठवड्याला नियमानें भेटी होत; व पुढें पुढें तर मेजर निकलसन हे स्वतः हिंदू पत्रांत लेखहि लिहूं लागले. परंतु नेहमीं घडतें त्याप्रमाणें मूळच्या संस्थापकांची जूट राहिली नाहीं. दोघे रंगाचारी हे मुनसफीच्या जागा पत्करून निघून गेले! मग ते त्यांत लेख कसे लिहिणार? एन. सुब्बराव हे परीक्षा पास होऊन राजमहेंद्री येथें वकिली करण्यास निघून गेले. आणि केशवराव पंत यांनीं मधून मधून लेख लिहिण्याचें काम चालू ठेविलें असलें तरी, वर्तमानपत्राच्या कारभाराची जबाबदारी झेपत नाहीं म्हणून त्यांनीं आपला संबंध रीतसर सोडून दिला. अशा रीतीनें शेवटीं जाग्यावर दोघेच शाळामास्तर राहिले. ते म्हणजे सुब्रह्मण्य अय्यर व वीर राघवाचारियर. यांची जोडी बरेच दिवस टिकली. सुब्रह्मण्य अय्यर हे संपादकीय लेख लिहीत; व वीर राघवाचारियर हे इतर सर्व व्यवस्था पहात. परंतु पत्र वजनदार असलें तरी खप बेताचा. जाहिरातींचें उत्पन्न बेताचें. यामुळें पत्राची सांपत्तिक स्थिति हळुहळुं खालावत जात होती. पुढें या दोघांचेंहि पटेनासें झालें. सुब्रह्मण्य अय्यर यांना दुर्धर रोग जडला. म्हणून त्यांनीं हिंदूचें संपादकत्व सोडून दिलें. व चरितार्थाला कांहीं साधन पाहिजे म्हणून 'स्वदेश मित्रम्' हें देशी भाषेंतील पत्र हातीं घतलें. पण अगदीं एकटे राहिल्यावर वीर राघवाचारियर यांच्यानेंलहि दोष उघडकीस येऊं लागले. अखेर पत्राला पाउण लाख रुपये कर्ज झालें, व कांहीं प्रमुख लोकांनीं पांचपांच हजार रुपये भरून हें पत्र चालविण्याकरितां एक सिंडिकेट काढण्याचें ठरविलें. पण या सुमारास कै. कस्तूरीरंग अय्यंगार हे पुढें झाले. व त्यांनीं हिंदू पत्र चालविण्याचें आपल्या शिरावर घेतलें. व त्याबरोबर सर्व कर्जेहि घेतलें, आणि चमत्कार असा झाला कीं, त्यांच्या हातीं जातांच पत्राची स्थिति एकदम सुधारली. कै. कस्तूरीरंग अय्यंगार हे सव्यसाची होते, म्हणजे ते चांगले लेखक असून शिवाय अंतर्गत व्यवस्थेंतहि ते निष्णात होते. त्यांनीं लौकरच पत्राचा इतका जम बसविला कीं, पत्राचा खप व महत्त्व हीं तर वाढलींच, पण उत्पन्नहि वाढून सालोना हजारों रुपयांचा नफा उरूं लागला. त्यांनीं सर्व कर्ज तर फेडलेंच; पण छापखाना, इमारत, फौंड्री, चित्रसाहित्य इ० सर्व गोष्टी यथास्थित करून हिंदू पत्राला आज विलायतेंतल्या लंडन टाइम्सची योग्यता जवळजवळ प्राप्त करून

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

दिली आहे. लंडन टाइम्सप्रमाणें आपलें धोरण ठेविलेलें आहे. म्हणजे देशांतील सर्वांत पुढें गेलेल्या राष्ट्रीय पक्षाशीं सहानुभूति ठेवावयाची, पण सर्वस्वी एककल्ली कोणचेंहि धोरण स्वीकारावयाचें नाहीं, व भडकून जावयाचें नाहीं.

'हिंदू' व 'केसरी' यांच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दींत पाहिलें असतां त्या दोहोंत कित्येक बाबतींत साम्य कसें घडत आलें हें सूक्ष्म दृष्टीनें पाहाणाराला तेव्हांच कळेल; तें कळेलहि असो. पण १९२८ सालीं हिंदू पत्राची ज्युबिली झाली, व आज 'केसरीची' ती होत आहे, हें पाहून हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत या राष्ट्रीय वृत्तीच्या वर्तमानपत्रांनी सुवर्ण ज्युबिली करण्याइतकें, म्हणजे अर्धे शतकाचें, आयुष्य लाभून त्यांना स्थैर्यहि आलें आहे हा विचार समाधानकारक असून मनाला खात्री आणणाराहि आहे. एखाद्या प्रचंड आवारभर पसरलेल्या कारखान्यांत चौंदिशांना रात्रीं पाहारा करण्याकरितां रखवालदार नेमतात, व ते मधूनमधून हुषार सावध असें म्हणून एकमेकांना जागृत ठेऊन धीर देत असतात. हिंदूच्या ज्युबिलीचें वर्तमान ऐकून केसरीला हीच भावना झाली. व आज केसरीची ज्युबिली झाल्याचें वर्तमान ऐकून मद्रासच्या हिंदूलाहि तीच भावना होईल यांत शंका नाहीं.

वर्तमानपत्रें व देशी–विदेशी भाषा

समुद्रास भरती येऊ लागली म्हणजे ती समुद्राला येऊन मिळणाऱ्या नद्या व खाड्या, तसेंच जमिनीच्या कोन्याकोपऱ्यांत शिरलेले समुद्राचे भाग, या सर्वांतून एक सारखीच भरत असते. हिंदी जनता हा समुद्र व नवें शिक्षण हा चंद्र हें रूपक केलें असतां असें आढळून येईल कीं, हिंदुस्थानांतील ज्या प्रांतांतून हें नवें शिक्षण मिळण्याला सुरुवात झाली होती त्यांतच इतरांच्यापेक्षां आधीं राष्ट्रीय भावनेची भरती भरत गेली. आणि मुंबई, मद्रास, बंगाल या तीन प्रांतांत नवीन शिक्षणाचा उदय सुमारें एकाच वेळीं झाला असल्यामुळें, त्यांत राष्ट्रीय भावनेच्या वर्तमानपत्रांचा उदयहि जवळ जवळ एकाच वेळीं झाला. कलकत्याचा 'बंगाली' मद्रासचा 'हिंदू' व पुण्याचा 'केसरी' ही नांवें घेण्यासारखीं, म्हणजे निश्चित राष्ट्रीय वृत्तीचीं वर्तमानपत्रें, फार थोड्या वर्षांच्या फरकानें सुरू झालीं किंवा नामांकित संपादकांच्या हातीं गेलीं.

केसरी १८८१ सालांत सुरू झाला. तत्पूर्वी त्याचें काम मुंबईचें 'इंदु प्रकाश' हें वर्तमानपत्र चांगल्या रीतीनें करीत होतें. पण तें पत्र अर्धे इंग्रजी व अर्धे मराठी असें होतें. असलें पत्र दोन भाषांत निघणें हें लेखकांच्या हौसेच्या दृष्टीनें सोयीचें वाटलें तरी तें वाचकांच्या गैरसोयीचेंच असे. इसापनीतींतील दोन बायकांच्या दादल्यासारखी त्यांची गोष्ट होते. तरुण बायकोनें नवऱ्याच्या डोक्यांतले पांढरे केस आवडत नाहींत म्हणून काढून टाकावे, वृद्ध बायकोनें काळे केस आवडत नाहींत म्हणून काढून टाकावे, व अशा रीतीनें दोनहि प्रकारचे केस जाऊन नवऱ्याच्या डोक्याला टक्कल पडावें, त्याप्रमाणें 'इंदु प्रकाशाची' गोष्ट होत असे. निव्वळ मराठी वाचकाला इंग्रजी मजकूर वाचतां येत नाहीं म्हणून 'आपली इतकी जागा गेली' या हिशेबानें तो नाखूष; आणि पहिल्या पिढीच्या शिकलेल्या लोकांना इंग्रजीचें कौतुक अधिक म्हणून मराठी लेखांकडे ते नाखूष होऊनच पाहात. पुण्याच्या 'ज्ञानप्रकाशा'चीहि मध्यंतरीं कांहीं दिवस अशीच स्थिति झाली होती. 'सुधारक' पत्रांतहि प्रथम कांहीं दिवस इंग्रजी व मराठी दोनहि भाषांत लेख येत. पण ही गोष्ट फायद्याची नाहीं असें पाहून 'ज्ञानप्रकाशा'नें पुढें इंग्रजी लेख टाकून दिले; व आतां आर्यभूषण छाप-खान्याचें किंवा सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचें 'सर्व्हंट ऑफ इंडिया' नांवाचें सर्वस्वी इंग्रजी असें स्वतंत्र पत्र निघूं लागलें आहे. दोन भाषांच्या संमिश्र वर्तमान-पत्रांची अडचण लक्षांत येऊन, कै. चिपळूणकर, आगरकर, टिळक यांनीं प्रारंभापासूनच 'केसरी' हें पूर्ण मराठी व 'मराठा' हें पूर्ण इंग्रजी अशीं दोन स्वतंत्र पत्रें काढण्याचें ठरविलें. दोघांची मालकी व धोरण एकच, पण प्रत्येकाची भाषा मराठी किंवा इंग्रजी म्हणजे एक जिनसी. बंगाल्यांत संमिश्र भाषांच्या वर्तमानपत्रांचा प्रयोग फारसा झाला नसावा असें वाटतें. देशी भाषेंतून लेख–म्हणजे वर्तमानपत्री व ललित वाङ्मय विषयक लेख–लिहिण्याची लज्जत व आवड बंगाली लोकांना पुष्कळ; आणि इंग्रजी 'अमृत बझार पत्रिका', 'हिंदू पेट्रियट', 'बंगाली', 'वंदेमातरम्' या इंग्रजी वर्तमान-पत्रांनीं जशी कीर्ति मिळविली तशीच 'आनंद बझार पत्रिका' वगैरे बंगाली भाषेंतील पत्रांनींहि मिळविली होती. महाराष्ट्राप्रमाणें बंगाल्यांतहि बंगाली व इंग्रजी अशा एक जिनसी भाषेंतील वर्तमानपत्रांनीं वेगवेगळ्या रीतीनें आपलें कार्य केलें. एकमेकांच्या पायांत पाय घातले नाहींत. बंगाल्यांत निवळ कित्येक बंगाली भाषेंतील वर्तमान-पत्रें खूप लोकप्रिय असून त्यांच्या वर्गणीदारांची संख्या २०-२५ हजारांपर्यंत गेली होती किंवा हल्लीं असेलहि. पण अलीकडे राजकीय चळवळींत सर्व हिंदुस्थान हा एक-जीव झाल्या कारणानें, इंग्रजी भाषेंत चाललेल्या बंगाली वर्तमानपत्रांनीं जसें चांगलें नांव कमावलें, तसें निव्वळ बंगाली भाषेंतील पत्रांनीं मिळविलें नाहीं. जमीनदारांच्या पद्धतीनें चाललेला व युक्तिवादशूर असा ख्रिस्तोदास पाल यांचा 'हिंदु पेट्रियट', त्यानंतरचा विचारांनीं नेमस्त पण राष्ट्रीय भावनेच्या तीव्र भाषेचें तीक्ष्ण पाणी दिलेला सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा 'बंगाली,' व त्या मागून ज्वलज्जहाल स्वरूपाचा आणि काव्य व तत्वज्ञान यांच्या भाषा–सरणीनें पूर्ण नटलेला अरविंद घोष यांचा 'वंदे मातरम्' ही बंगाल्यांतील इंग्रजी वर्तमानपत्रांची चढती भांजणी होय. त्यानंतर अली-कडे 'फॉरवर्ड' वगैरे पत्रें राष्ट्रीय चळवळीला वाहिलेलीं अशीं निघालीं. परंतु त्यांना 'वंदेमातरम्' पत्राची सर आली नाहीं. बंगाली भाषेंतील वर्तमानपत्रांत राष्ट्रीय भावना होती. पण 'बंगाली' 'वंदेमातरम्' अशा पत्रांत जी सभ्यता व जे उच्च वातावरण आढळून येई तें या देशी भाषेंतील पत्रांतून येत नसे. कदाचित परक्या भाषेंत लिहूं म्हटलें तरी ग्राम्य लिहितां येत नाहीं हेंहि कारण असेल, पण बंगाली भाषेंतील पत्रांत कुत्सितपणा, कुचाळक्या, व्यक्तिनिंदा, उखाळ्यापाखाळ्या या गोष्टी विशेष असत.

इकडील वर्तमानपत्रें

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील कांहीं महत्त्वाच्या पत्रांचा उल्लेख मागें केलाच आहे. वर्तमानपत्राचें महत्व लक्षांत घेतल्यावर त्यांचा व्याप व विस्तार निर-निराळ्या अंगांनीं कसा होतो हें लक्षांत येतें. अलीकडे वेगवेगळ्या धंद्यासाठीं व विवक्षित समाजाच्या उन्नतीसाठीं अशींहि कांहीं साप्ताहिकें, पाक्षिकें, मासिकें निघालीं आहेत. अशा प्रकारचीं नियतकालिकें म्हणजे सहकारी वृत्त, किर्लोस्कर खबर, उद्यम, दूत, कीर्तन मासिक, रामदास-रामदासी वगैरे. वृत्तपत्रांत राजकीय, सामाजिक, धार्मिक, व्यायामविषयक, शैक्षणिक असेहि पोटभेद पडतात.

वर्तमानपत्राचें मुख्य कार्य म्हणजे लोकपक्षाची वकिली कुशलतेनें करून समाजाचा उत्कर्ष जेणेंकरून होईल असें शिक्षण आपल्या पत्रद्वारें लोकांस देणें. जिल्हा-निहाय प्रसिद्ध होत असलेल्या वर्तमानपत्रांचें कार्य मर्यादित असतें व त्यांना एक प्रकारचें स्थानिक महत्वच अधिक प्राप्त होत असतें. महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत या तीन मराठी प्रांतांत जिल्हानिहाय दोनतीन साप्ताहिकें आतां प्रसिद्ध होऊं लागलीं आहेत. या पत्रांत जिल्ह्याचें राजकारण व स्थानिक महत्वाच्या बाबींचाच उल्लेख अधिक असतो. अशा साप्ताहिकांपैकीं महत्वाचीं साप्ताहिकें म्हणजे सोलापूरचा कर्मयोगी, धुळ्याचा प्रबोध, जळगांवचा प्रागतिक, पुण्याचा भाला, नाशिकचें स्वातंत्र्य व लोकसत्ता, ठाण्याचा प्रतियोगी, रत्नागिरीचा बलवंत, गोव्याचा हिंदु व भारत, कुलाब्याचा कुलाबासमाचार, सावंतवाडीचा वैनतेय, साताऱ्याचा प्रकाश, समर्थ व ऐक्य; यवत-माळचें लोकमत, अकोल्याचा प्रजापक्ष, उमरावतीचा उदय, व स्वतंत्र हिंदुस्थान इत्यादि. तसेंच विजयी मराठा, दीनमित्र, सुबोध पत्रिका, टणत्कार, तरुण भारत, वीरशैव केसरी यांचाहि उल्लेख केला पाहिजे. नागपुरास रा. गोपाळराव ओगले यांनीं चालविलेल्या 'महाराष्ट्रा'चें महत्व प्रांतिक तर आहेच आहे. पण देशी भाषांतून चालविलेल्या वर्तमानपत्रांत त्याचा नंबर फारच वरचा लागेल यांत शंका नाहीं. वऱ्हाड-मध्यप्रांताकडील राष्ट्रीय पक्षाचें तें मुखपत्र होय.

मुंबई–पुण्याकडील साप्ताहिकें म्हटलीं कीं, त्यांचें महत्व संपादकीय विचारांवरच असतें. मुंबईतील श्रद्धानंद, प्रताप, प्रगति या साप्ताहिकांचें वैशिष्ट्य वेगवेगळें असल्या-मुळेंच त्यांचा प्रसार होऊन तीं लोकप्रिय ठरलीं. भाषाशुद्धि, हिंदुसभेच्या कार्याचा प्रचार, शुद्धि–संघटन यांच्यावर श्रद्धानंदाचा भर असे. रा. नवरे यांनीं चालविलेल्या (प्रेस ऑर्डिनन्समुळें बंद पडलें) प्रताप पत्राचें वैशिष्ट्य म्हणजे क्रांतिकारकांचे खटले व त्यांचीं चरित्रें देणें व हिंदुसभेचा प्रचार करणें हें होय. 'प्रगति'पत्राचा हेतु प्रचलित विषयांवर भारदस्त व वरच्या वर्गाच्या सुशिक्षित वाचकवर्गास रुचतील व पटतील अशा विचारांचे लेख प्रसिद्ध करणें हा दिसतो. याशिवाय मौज, विविधवृत्त, सिनेमा समाचार, वगैरे निरनिराळ्या समाजांत खपणारीं साप्ताहिकें आहेतच.

उदय, बलवंत, कर्मयोगी यांना जिल्ह्यापलीकडे महाराष्ट्रांतहि महत्व प्राप्त झालें आहे. सोलापूरच्या कर्मयोगीनें गेल्या मे महिन्यांत सोलापुरास घडलेल्या लष्करी व पोलिसांच्या अत्याचाराची खात्रीलायक माहिती महाराष्ट्राला देण्याचें श्रेय आपल्या पदरीं जोडलें यांत शंका नाहीं. कर्मयोगीचे संपादक रा० रामभाऊ राजवाडे यांनीं धैर्यानें ही हकीकत प्रसिद्ध केली याबद्दल त्यांच्यावर लष्करी अंमलदारांचा रोष होऊन त्यांना लष्करी कायद्याखालीं ७ वर्षांची शिक्षाहि झाली! तसेंच हल्लींच्या सत्याग्रहाचे चळवळींत 'उदय' चे संपादक रा० नारायणराव वामणगांवकर व 'बलवंत'चे संपादक रा० ग. वि. पटवर्धन, 'कुलाबा समाचार'चे संपादक रामभाऊ मंडलीक, 'नौबत'चे संपादक रा. लालजी पेंडसे, यांनीं प्रत्यक्ष भाग घेऊन देहदंडहि दिला. हिंदुधर्माची कड घेऊन भांडणारें 'संग्राम' नांवाचें पत्र पुण्यास निघत असे. त्याचे संपादक श्री. ग. म. नळावडे यांनीं हिंदू हितरक्षणार्थ कारागृहवासहि सोसला.

संस्थानांतील नियतकालिकांत सावंतवाडीचा वैनतेय, कोल्हापूरचा विद्याविलास, हैद्राबादचा(दक्षिण) नागरिक व निजाम विजय यांचा निर्देश व्हावयास पाहिजे. सांगलीसहि दोन नवीन साप्ताहिकें अलीकडे सुरू झालीं आहेत. पण संस्थानी प्रजेचें हित पाहणारें व संस्थानाच्या प्रगतीकडे लक्ष देणारें पत्र म्हणजे पुण्यास निघणारें "संस्थानी स्वराज्य". फक्त संस्थानी विषयाला वाहून घेतलेलें असें हें एकच पत्र.

मराठी दैनिकांचें चलन कांहीं वर्षें अगदीं लहान होतें. मुंबईस कांहीं वर्षें इंदुप्रकाश, राष्ट्रमत, संदेश, लोकमान्य, राष्ट्रसेवक हीं पत्रें चालू होतीं. संदेशचें महत्व होम-रूल लीगच्या चळवळीचे वेळीं विशेष होतें. असहकारितेच्या वेळीं लोकमान्य पत्राचा जन्म झाला. पण चळवळीची लाट ओसरली व एकाच शहरांत 'नवाकाळ' व 'लोकमान्य' हीं दोन मराठी दैनिकें प्रसिद्ध होऊं लागलीं. लोकमान्य हें कंपनीचे ताब्यांत असल्यामुळें लवकरच बंद करणें भाग पडलें. पण अलीकडे 'नवाकाळ', 'लोकहित' यांशिवाय ज्ञानप्रकाश (सकाळचा व संध्याकाळचा), प्रभात, श्रीलोकमान्य, ताजी बातमी, वगैरे नवीन नवीन दैनिक सुरू झालीं आहेत. ताजी बातमी वाचण्याची लोकांत उत्पन्न झालेली आवड हीच या दैनिकांची जन्मदात्री समजावी लागेल. पुण्यांतील दैनिकें म्हणजे ज्ञानप्रकाश, लोकसंग्रह, व पुणें समाचार. 'ज्ञानप्रकाश' हें प्रागतिकांचें मुखपत्र. 'लोकसंग्रह' हें पत्र १९१८ सालीं निघालें. सुमारें तीन वर्षें तें चाललें. त्याचें संपादकत्व पंतपराडकर, ल. ब. भोपटकर,

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

शंकर गणेश लवाटे यांचेकडे कांहीं दिवस होतें. सुमारें चार वर्षांपूर्वी डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीं 'पुणें समाचार' हें दैनिक सुरु केलें. ज्ञानकोश कचेरींतील मंडळीच हें पत्र चालवीत. पण थोड्या दिवसांत हें पत्र बंद पडलें. जगांतील तात्पुरत्या महत्त्वाच्या व विस्मयपूर्ण घडामोडी, कौतुकास्पद बातम्या व चित्तवृत्ति थरारून जाईल अशीं वर्णनें यांनाच अशा दैनिक वृत्तपत्रांत प्राधान्य दिलें जातें.

पण अलीकडे मुंबईच्या मजूरवर्गांच्या हिताकडे लक्ष देणारींहि कांहीं वृत्तपत्रें निघालीं आहेत. तीं म्हणजे धूमधडाका, मजूर, लालबावटा, क्रांति हीं होत. क्रांति हें पत्र हल्लीं मिरत खटल्यांत सांपडलेले रा. डांगे यांनीं चालविलें होतें. हेच त्या पत्राचे जनक व या पत्रांत जगांतील मजूरवर्गांच्या चळवळी, बोल्शेव्हिझम, कम्युनिझम या विषयांवर अभ्यास करुन लिहिलेले लेख येत असत.

याशिवाय अलीकडे सरकारच्या दडपशाहीमुळें व मुद्रणस्वातंत्र्यावर सरकारनें ऑर्डिनन्स काढून चढविलेल्या हल्ल्यामुळें, सत्याग्रह पत्रिका, कांग्रेस पत्रिका, कांग्रेस बुलेटिन्स यासारखीं बातम्या पुरविणारीं बुलेटिन्स लोकप्रिय झालीं आहेत. सरकारनें बुलेटिन्सवरहि गदा आणली व लोकांना बातमी देणेंच कठीण झालें तेव्हां रस्तोरस्तीं भुईपत्रिकाहि निघूं लागल्या ! हा एक वृत्तपत्राचा गमतीचा नवीन प्रकार निघाला.

दैनिकांच्या व साप्ताहिकांचा प्रांत सोडून दिला तर पाक्षिकें व मासिकें यांत अधिकच विविधता आढळते. सर्वसाधारणपणें मनाचें रंजन करणारें मनोरंजन, मॉडर्न-रिव्ह्यूच्या धर्तीवर निघालेलें रत्नाकर, विविधज्ञानविस्तार, यशवंत,पुरुषार्थ, मधुकर, स्फूर्ति, चित्रमय जगत्, लोकशिक्षण हीं मासिकें प्रमुखपणें डोळ्यापुढें दिसतात. याशिवाय व्यायामाची काळजी घेणारें व्यायाम, लहान मुलांना आनंद देणारा 'आनंद' व मुलांचा खेळगडी, महिलांच्या सुखसोयींकडे व स्त्रीशिक्षणाकडे लक्ष देणारीं स्त्री मनोरमा, गृहलक्ष्मी; सर्व लोकांचा स्नेही असें लोकमित्र हीं मासिकें प्रमुख होत. उद्यम, प्राविण्य, दर, किर्लोस्करखबर हीं विशेषेंकरून व्यापारी विषयाला वाहून घेतलेलीं मासिकें होत. याशिवाय मुमुक्षु, स्वाध्याय, वैदिक कर्मयोग, काव्यरत्नावली, समाजस्वास्थ्य, गोरक्षण, रामदास–रामदासी हीं विवक्षित कार्याकरितां वाहून घेतलेलीं मासिकें आहेत. दैवज्ञ मासिक, तेलगुसमाचार, भंडारीविजय, ब्राह्मण पत्रिका, यंग मुस्लिम(साप्ताहिक) यांसारखीं समाज व ज्ञातिविशिष्ट नियतकालिकेंहि पुष्कळ आहेत.

मुंबई इलाख्यांतील इतर वर्तमानपत्रें पाहिलीं तर सर फेरोझ–शाहा मेथा यांनीं स्थापन केलेला क्रॉनिकल, मरहूम बाच्छा गांधी यांचें सांजवर्तमान, बॉबेसमाचार, मुंबईचे नव शेरीफ मर्झवान यांचा जामेजमशेत, फ्री प्रेस जर्नल या मुंबईच्या पत्रांना अग्रेसरत्व द्यावें लागतें. मुंबईसमाचार, गुजराथी समाचार, सांजवर्तमान, जामेजमशेत हीं गुजराथींत निघतात. फ्री प्रेस जर्नल अगदीं अलीकडलें म्हणजे ४–६ महिन्यांतलेंच आहे. पण त्या पत्रानें अग्रलेख, स्फुटें न लिहितांहि हल्लींच्या चळवळींत प्रचाराचें कार्य बरेंच केलें आहे. युद्धपूर्वकालांत जर्मनांत कांहीं पत्रें असेंच करीत. छोट्या छोट्या बातम्यांचे छेदक देऊन त्यांतच टीकात्मक मेख असावयाची. तेंच धोरण फ्री प्रेस जर्नलनें ठेवलें आहे. अहमदाबादचीं पत्रेंहि बरींच लोकप्रिय आहेत. त्यांपैकीं प्रजाबंधु, गुजराथी पंच यांखेरीज म. गांधींचीं यंग इंडिया, गुजराथी व हिंदी नवजीवन हीं विशेष महत्त्वाचीं होत. कर्नाटकांत कन्नडिग, जयकर्नाटक, कर्मवीर, कर्नाटकवैभव, धारवाडवार्ता, राजहंस इत्यादिकांचीं नांवें प्रसिद्ध आहेत.

याप्रसंगानें पूर्वी चालत असलेल्या पण हल्लीं बंद पडलेल्या केसरीच्या कांहीं व्यवसाय बंधूंचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

मोदवृत्त–वाई; धर्म–वाई; स्वराज्य–सोलापूर; विहारी–मुंबई; हरिकिशोर–यवतमाळ; देशसेवक–नागपूर; जगद्धितेच्छु, राष्ट्रहितेषि, काळ व स्वराज्य–पुणें हीं पत्रें बंद झालीं याबद्दल आम्हांला फार वाईट वाटतें.

अखिल हिंदुस्थानांत वर्तमानपत्र हा स्वतःचा धंदा करून किंवा मतप्रसाराच्या हौसेनें ज्यांनीं आजवर वर्तमानपत्रांत लेख लिहून, आपल्या बुद्धीचा किंवा भावनेचा फायदा राष्ट्राला दिला अशांपैकीं कांहीं प्रमुख लोकांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

(१) राजा राममोहनरॉय (२) हरिश्चंद्र मुखर्जी (३) ख्रिस्तोदास पाल (४) राजकुमार सर्वाधिकारी, (५) कृष्णकमल भट्टाचार्य (६) शंभुचंद्र मुखर्जी (७) शिशीर कुमार घोष (८) मोतीलाल घोष (९) पादशाहा (१०) नरेंद्रनाथ घोष (११) सुरेंद्रनाथ बानर्जी (१२) अरविंद घोष (१३) शामसुंदर चक्रवर्ती (१४) रामानंद चतर्जी (१५) जी. सुब्रह्मण्य अय्यर (१६) वीर राघवाचारीयर (१७) शंकरन नायर (१८) के. नटराजन करुणाकर मेनन (१९) परमेश्वरंपिल्ले (२०) ए.रंगस्वामी अयंगार (२१) पट्टाभी सीताराम अय्यर (२२) राजगोपाळचारी (२३) जी.ए नटेसन (२४) श्रीनिवासशास्त्री (२५) श्रीनिवासन (२६) गुप्त, (२७) बिशन नारायण धार (२८) गंगाप्रसाद वर्मा (२९) सी.वाय्. चिंतामणी (३०) सच्चिदानंद सिंह (३१) सी. रंगा अय्यर (३२) पं. जगत नारायणलाल (३३) कृष्णकांत मालवीय (३४) गणेश शंकर विद्यार्थी (३५) पराडकर, (३६) गणेश सखाराम देऊसकर (३७) दुर्वेकर (३८) महाणी (३९) पं. जयरामदास दौलतराम (४०) डॉ. चोइतराम (४१) के. के. आठवले (४२) लाला लजपतराय (४३) पंडित (नागपूर) (४४) दादाभाई नौरोजी (४५) महादेव गोविंद रानडे (४६) विश्वनाथ नारायण मंडलीक (४७) जनार्दन सखाराम गाडगीळ (४८) परमानंद (४९) मलबारी (५०) नारायणराव चंदावरकर (५१) दिनशा वाच्छा (५२) भाटवडेकर, (५३) दाजी आबाजी खरे (५४) नारायण विष्णु गोखले (५५) दामोदर गणेश पाध्ये (५६) नारायणराव समर्थ (५७) देसाई, (५८) चिं. ग. भानु (५९) कृष्णशास्त्री चिपळूणकर (६०) गोपाळराव गोखले (६१) सिताराम हरी चिपळूणकर (६२) अच्युत बळवंत कोल्हटकर (६३) वीर वामनराव जोशी (६४) भोपटकर बंधु, (६५) नारायण लक्ष्मण फडके.

प्रेस ॲक्टाची कामगिरी !

प्रेस ॲक्टाचा जन्म १९१० सालीं झाला. त्या वेळच्या चळवळींत बहुतेक सर्व राष्ट्रीय पत्रांना प्रेस ॲक्टाचा फटका बसला होता. पुढें १९२१ सालीं सरकारानेंच एक कमिटी नेमली होती. तिच्या शिफारसीवरून तो रद्द करण्यांत आला होता. पण गेल्या एप्रिलांतच पुनः ऑर्डिनन्सनें प्रेस ॲक्टाचें मढें वर उकरून काढलें ! व हिंदुस्थानांतील सुमारें २०० पत्रांना त्याची भूतबाधा लागली. सर्व प्रांतापेक्षां पंजाब व मुंबई प्रांतांतच या प्रेस ॲक्टाला वर्तमानपत्रें अधिक बळी पडलीं. व सरकारनें जामिनकीच्या रूपानें सुमारें २–२॥ लाख रुपये वसूल केले. प्रांतवार सर्वच पत्रांचीं नांवें देत बसल्यास विस्तार फार होईल. याकरितां प्रत्येक प्रांतांतून किती जामिनकी भरली गेली व किती महत्वाचीं पत्रें बंद पडलीं याची माहिती अदमासानें खालीं दिली आहे.

प्रांत	मागितलेली जामिनकीची रक्कम	वृत्तपत्रें बंद झालीं	जामिनकीची रक्कम भरुन चालू राहिलीं
मद्रास	२५,००० रु.	१२	३ (स्वदेशमित्रन्, तामिल-नायडू, आंध्रपत्रिका)
मुंबई	६०,००० रु.	१५	५ (नवाकाळ, केसरी, मराठा, फ्री प्रेस जर्नल, हिंदुस्थान, प्रजामित्र, धि वीक, सिंध न्यूजपेपर
यु. पी.	२४,००० रु.	१२	२ (शक्ति, प्रताप)
पंजाब	६०,००० रु.	२०	४ (जमीनदार, वंदेमातरम्, वीरभारत, मिलाप)
बर्मा	९,००० रु.	५	...
बिहार–ओरिसा	५,००० रु.	२	...
वऱ्हाड–मध्यप्रांत	१,५०० रु.	२	...
आसाम	५,५०० रु.	४	...
वायव्य प्रांत	६,००० रु.	३	...
दिल्ली	५५,००० रु.	४	३ (शुद्धि समाचार, रियासत, हिंदुस्थान टाईम्स)

ज्यांनीं प्रेस ॲक्टाखालीं काढलेली जामिनकीची नोटीस मानली नाहीं अशीं वृत्तपत्रें म्हणजे मुंबईचे 'डेली हिलाल', 'वर्कर्स विकली', महात्मा गांधींचें 'नवजीवन', 'यंग इंडिया' मावळणकर यांचें 'शक्ति' कानपूरचें 'वर्तमान' हीं होत. यांपैकीं नवजीवन व शक्ति या पत्रांचा छापखानाहि सरकारनें जप्त केला !

वर्तमानपत्रांना स्वतंत्र राष्ट्रांत जें स्थान व महत्व असतें तें आपल्या इकडील वृत्तपत्रांना नाहीं हें खरें. तथापि परकी सरकार वर्तमानपत्रांवर वरवंटा फिरवीत असतां वर्तमानपत्रें वाढत आहेत हें पाहून समाधान मानण्यास थोडीशी जागा आहे. हल्लींच्या चळवळींत बुलेटिन्सना आलेलें महत्त्व लक्षांत घेतां वर्तमानपत्रें स्वतंत्र देशांत काय कार्य करूं शकतात याची कल्पना येते.

हिंदी वर्तमानपत्रें व टपालखातें

हिंदुस्थानांत विलायतेप्रमाणें वर्तमानपत्रांवर स्टँप ड्यूटी नव्हती, किंवा कागदांच्या कारखान्यांवर जकात नव्हती. पण प्रथम बरींच वर्षे टपाल हंशील फार असल्यामुळें वर्गणीचें दर फार ठेवावे लागत, यामुळें वर्तमानपत्रांचा खप कमी होण्याचें तें एक कारण असे. पण अलीकडे हें हंशील बरेंच कमी झालें असून पोष्टखातें इतर रीतींनींहि वर्तमानपत्रांची सोय पहात असतें. वेळोवेळीं टपाल हंशिलाचें दर कसे होते या संबंधाची विश्वसनीय एकत्रित केलेली माहिती आम्हाला पोष्ट खात्यानें कृपाकरून दिली ती खालीं देत आहों.

इ. सन १८८१ सालापासूनच वर्तमानपत्रें व नियतकालिकें यांना सवलतीच्या दराचा फायदा मिळूं लागला. व सरकारी ठरावानें अधिकृत पत्रकांचे (Privileged Publications) टपाल हंशिलाचे दर खालीलप्रमाणें ठरविण्यांत आले.

एका प्रतीला (३ तोळे वजन) पाव आणा
" " (३ तोळे ते १० तोळे) अर्धा आणा
१० तोळ्यावर प्रत्येक १० तोळ्यास अगर
त्यापेक्षां कांहीं कमी वजनास "

पोस्टामार्फत एजंटाकडे अंक विक्रीकरितां पाठविल्यास पोस्टाच्या आकाराच्या निंमा आकार भरावा लागत असे. व वर्तमानपत्रांच्या परतभेटीच्या अंकाला टपाल हंशील माफ असे. मात्र वर्गणीदारांच्या अंकांचा हिशेब करून टपाल हंशील तीन महिने आगाऊ भरावें लागत असे. १८८२ सालीं टपाल हंशिलाची आकारणी एक महिना आगाऊ होऊं लागली. पण या सवलतीच्या दराचा फायदा परदेशी जाणाऱ्या टपालाला मिळत नसे.

१८९८ सालीं पोस्टाचा स्वतंत्र ॲक्ट करण्यांत आला व या कायद्यानें छापील मजकुराच्या १० तोळे वजनास अर्धा आणा टपाल हंशील पडूं लागलें. तसेंच पोस्टखात्याकडे नोंदलेल्या वर्तमानपत्रांचे टपालाचे दर खालीलप्रमाणें ठरविण्यांत आले.

२० तोळ्याचे आंतील वजनास अर्धा आणा
२० तोळ्यावर प्रत्येक २० तोळ्यास
अगर त्यापेक्षां कांहीं कमी वजनास "

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

वर्तमानपत्राची नोंद वर्षांचे वर्षांस करावी व टपाल हंशील आगाऊ न भरतां, पोस्टल स्टँप लावण्याची पद्धति सुरू झाली.

१८९९ सालीं रजिस्टर्ड वर्तमानपत्रांचे दर उतरविण्यांत आले व खालीलप्रमाणें आकारणी होऊं लागली.

४ तोळे वजनास	पाव आणा
४ ते २० तोळे वजनास	अर्धा "
२० तोळ्यावर प्रत्येक २० तोळे वजनास अगर त्यापेक्षां कांहीं कमी वजनास	" "

१९०३ सालीं यांपेक्षां थोडी सुधारणा झाली. म्हणजे पूर्वी पाव आण्यांत ४ तोळे वजन जात असे तेथें आतां ६ तोळे वजन जाऊं लागलें. व १९०८ सालीं पाव आण्यांत ८ तोळे वजन पाठविण्याची सवलत देण्यांत आली. व अर्ध्या आण्यांत २० तोळ्याऐवजीं ४० तोळे वजन जाऊं लागलें.

१९१० सालीं पोस्टानें असा नियम केला कीं, वर्तमानपत्र नोंदतांना १९१० च्या प्रेस ॲक्टान्वयें सिक्युरिटी भरल्याचें अगर सिक्युरिटीची माफी दिल्याचें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट अगर प्रे० मॅजिस्ट्रेटचें सर्टिफिकेट अर्जासोबत पाठविण्यांत यावें.

१९२१ सालीं सरकारी खजिन्यांत तूट पडूं लागल्यामुळें टपाल-हंशिलाचे दरहि वाढविण्यांत आले! त्या वेळीं वर्तमानपत्रांच्या टपालाचे दर खालीलप्रमाणें ठरविण्यांत आले.

८ तोळे वजनास	पाव आणा
८ ते २० तोळे वजनास	अर्धा आणा
२० तोळ्यावर प्रत्येक २० तोळ्यास अगर त्यापेक्षां कमी वजनास	" "

आज तागायत टपालहंशिलाचे हेच दर चालू आहेत. मात्र १९२२ च्या पोस्टखात्याच्या ठरावाप्रमाणें वर्तमानपत्र संस्थानी हद्दींत प्रसिद्ध होत असल्यास पोस्टखात्यांत वर्तमानपत्रांची नोंद करितांना पोलिटिकल ऑफिसरचें सर्टिफिकेट पाठविण्याचें बंधन घालण्यांत येऊं लागलें. तसेंच रजिस्ट्रेशन दरवर्षी करून घेण्याची अटहि काढून टाकण्यांत आली. वर्तमानपत्रांना ज्ञान प्रसृत करण्याची साधनें म्हणून पोस्टल खात्याकडून किती सवलत दिली जाते हें खालील तुलनात्मक कोष्टकावरून दिसून येईल.

वस्तुची वर्गवारी	वजन	टपाल हंशील
पोस्ट-कार्ड	...	अर्धा आणा
पत्रें अगर पाकिटें	२½ तोळे	एक आणा
छापील मजकूर पुस्तकें वगैरे	५ "	अर्धा आणा
रजिस्टर्ड वर्तमानपत्रें व नियतकालिकें	८ तोळे	पाव आणा
	८ ते २० तोळे	अर्धा आणा
	२० तोळ्यावर प्रत्येक २० तोळ्यास अगर त्यापेक्षां कमी	" "

चित्रमाला परिचय

गेल्या पन्नास वर्षांत केसरी-मराठ्याशीं ज्यांचा संबंध आला त्यांच्यापैकीं अनेक गृहस्थांचीं चित्रें या अंकांत दिलीं आहेत. त्यांपैकीं मुख्यतः लेखक म्हणून ज्यांचा संबंध आला त्यांच्या चरित्रांचा अल्पसा परिचय या खालीं दिला आहे.

हल्लीं केसरीमराठ्यांशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या गृहस्थांचीं चित्रें या चित्रमालेंत दिलीं आहेत. ती मंडळी घरचीच असल्यामुळें, त्यांची चरित्रविषयक माहिती इतर लोकांप्रमाणें दिली नाहीं. तथापि अशा गृहस्थांचीं नांवें एकत्र कळावी म्हणून तीं खालीं दिलीं आहेत.

केसरी मराठा पत्रांचें संपादक—उपसंपादक मंडळ

१ नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एलूएल्. बी.
२ ज. स. करंदीकर बी. ए. एलूएल्. बी.
३ दा. वि. गोखले बी. ए. एलूएल्. बी.
४ दि. वा. दिवेकर एम्. ए.
५ ग. वि. केतकर बी. ए. एलूएल्. बी
६ वा. कृ. भावे बी. ए.
७ रा. गो. भिडे
८ शं. न. आगाशे वाङ्मय विशारद
९ आ. रा. भट एम्. कॉम.
१० दा. न. शिखरे एम्. ए.
११ रा. शि. सहस्रबुद्धे.
१२ मा. प. सोमण बी. ए.

केसरीचें व्यवस्थापक मंडळ

१ धोंडो वासुदेव विद्वांस व्यवस्थापक
२ गोपाळ हरी धारप दुय्यम व्यवस्थापक
३ यशवंत गणेश कुळकर्णी हिशेबनीस व खजिनदार
४ परशुराम विठ्ठल महाजन मुख्य एजंट
५ चंद्रभान गेनू मोंगळ, मशीन डिपार्टमेंट
६ महादेव गणू मांडवकर, फाउण्ड्री.
७ ग्यानबा नथूजी चांदगुडे, केसरी कंपोझिंग डिपार्टमेंट
८ विष्णू बळवंत जोग, मराठा " "

(१–२) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचीं चरित्रें सुप्रसिद्धच असल्यामुळें येथें त्यांचेसंबंधीं माहिती देण्याचें कारण नाहीं.

(३) कै. गोपाळ गणेश आगरकर एम्. ए.—लोकमान्यांचे सहाध्यायी, समवयस्क स्नेही. १८५६ मधील जन्म. गरिबींतून वाढलेले. न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज या शिक्षणसंस्था आणि केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें यांच्या आद्यकार्यकर्त्यांपैकीं एक. केसरीचें संपादकत्व आगरकरांकडेच प्रथमपासून होतें. कसल्याहि स्वार्थत्यागास त्यांची तयारी. लिहिण्याची व एकंदरीनें सार्वजनिक कामें करण्याची आगरकरांची हौस दांडगी. उत्साहहि जबर. इतिहास हा आवडीचा विषय. सामाजिक सुधारणेचें कंकणच त्यांनीं बांधलें होते. १८८७ पर्यंत ते केसरीस चिकटून होते. नंतर समाजांत टिळकपक्ष व आगरकरपक्ष असे दोन तट निर्माण झाल्यानें आगरकरांनीं 'केसरी' सोडून 'सुधारक' काढला. सामाजिक सुधारणांचें महत्व राजकारणापेक्षां अधिक मानावें कीं काय हाच वादाचा मुद्दा होता. आगरकरांचा परिचय महाराष्ट्रीयांस 'केसरी' वाचूनच झाला, तो कोल्हापूर-प्रकरणानें अधिक दृढ झाला. कोणताहि हातीं घेतलेला विषय मार्मिक व जोमदार रीतीनें प्रतिपादन करण्याची आगरकरांची कला मराठी वाचकांस पूर्णपणें ठाऊक झाली आहे. देशी वर्तमानपत्रांस जें महत्व प्राप्त झालें आहे त्याचें कांहीं श्रेय आगरकरांच्या लेखांसच दिलें पाहिजे.

(४) कै. वामन शिवराम आपटे एम्. ए.—केसरीच्या मूळ संस्थापकांपैकीं एक. यांची सविस्तर माहिती केळकर कृत टिळक चरित्र खंड १ यामध्यें पाहावयास मिळेल.

(५) कै. महादेव बल्लाळ नामजोशी—केसरी-मराठा वर्तमानपत्रांच्या संस्थापकांपैकीं एक. लोकमान्यांचे समवयस्क सहकारी, न्यू. इं. स्कुलांतील विद्यार्थीप्रिय शिक्षक. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे "फॉरेन सेक्रेटरी." निरलसपणें नियोजित काम तडीला नेणारे खंबीर मनाचे व दांडगे मेहनती. अध्यापन व वर्तमानपत्री चळवळ यांखेरीज प्रत्यक्ष उद्योगधंदे काढण्याकडेहि त्यांनीं लक्ष दिलें होतें. किरण, डेक्कन स्टार, शिल्पकलाविज्ञान, इंडस्ट्रियल रिव्ह्यू हीं नियतकालिकें नामजोशी यांनींच काढलीं. केसरी–मराठ्यासाठीं 'आर्यभूषण' छापखाना मिळविण्यास त्यांचें बरेंच साहाय्य झालें होतें. १८८० सालीं ज्या पांच–सात मंडळींनीं लोकसेवा करण्याचें काम पतकरलें त्यांच्यांत नामजोशी नसते तर, त्यांचीं कामें इतक्या लौकर खाचित भरभराटीस आलीं नसतीं.

(६) कै. डॉ. ग. कृ. गर्दे—पुण्याचे रहिवासी. जन्मभर डॉक्टरीचा धंदा करून त्यांनीं बराच नांवलौकिक मिळविला. त्यांची वुद्धि अत्यंत चिकित्सक असल्यामुळें वैद्यकविषयाप्रमाणें अवांतर शास्त्रीय, आणि संस्कृत ग्रंथसंशोधन कालनिर्णय अशा विषयांतहि ते लक्ष घालीत. शास्त्रीय चर्चा करण्याचे कामांत टिळकांच्या स्नेह्यांतील ते एक ठराविक गण असत. केसरी–पत्राचें जें उद्देशपत्रक प्रथम प्रसिद्ध झालें त्यावर त्यांचें नांव संपादकमंडळांत समाविष्ट होतें. त्यांनीं अवांतर विषयांवर संपादकीय लेख कांहीं लिहिले नाहींत. परंतु आयुर्वेदादि शास्त्रीय विषयांवर त्यांचे अनेक लेख केसरींत प्रसिद्ध झाले आहेत.

(७) कै. प्रो० वासुदेव बाळकृष्ण केळकर—हे केसरीचे जाहीर संपादक केव्हांहि नव्हते. तरी १८८७ व १८९१ या दरम्यानच्या काळांत केसरीचें संपादकत्व त्यांच्याकडेच होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे कल्याणचे रहिवासी. बी.ए.ची पदवी घेतल्यावर ते डे.ए.सोसायटीला येऊन मिळाले. इंग्रजी भाषा व अर्थशास्त्र विषयांत ते प्रवीण होते, व फर्ग्यूसन कॉ. निघालें तेव्हां या विषयांतील मुख्य प्रोफेसराचें काम कांहीं दिवस स्वतंत्रपणें व कांहीं दिवस प्रो. गोखले यांच्या जोडीनें त्यांचेकडे होतें. त्यांच्या हातून ग्रंथनिर्मिति अशी विशेष झाली नाहीं. परंतु नाट्य विषयाची त्यांना फार आवड असल्यानें 'नाट्यकथार्णव' मासिक त्यांनीं चालविलें होतें. केसरींतील त्यांचे लेख अमुकच म्हणून आम्हांस सांगतां येत नाहींत. तथापि सुलभ व समर्पक रीतीनें प्रसादयुक्त भाषेंत विषय प्रतिपादन करणें व मधून मधून विनोद करणें, या त्यांच्या गुणांवरून केसरीचे १८८७–९१ या सालांतील अंक चाळणाराला प्रो० केळकरांचे लेख कोणते असावेत याची कल्पना करतां येते. प्रो० केळकरांचीं मतें कांहींशीं सुधारणावादी होतीं. तथापि सुधारकांवर टीका केलेले असेहि कांहीं लेख त्यांनीं केसरींत लिहिले आहेत.

(८) कै. महादेव शिवराम गोळे एम्. ए.—फर्ग्यूसन कॉलेजांतील शास्त्र विषयाचे प्रोफेसर. ब्राह्मण व त्यांची विद्या आणि हिंदुधर्म व सुधारणा हे त्यांचे दोन ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. १८८५ ते ९१ या दरम्यान केसरींत त्यांनीं अनेक लेख लिहिले आहेत. त्यांच्या लेखांत सूक्ष्म विनोद बराच असे. कुंटे यांचे चन्हाट व मल्हारी शेट यांच्या संबंधानें विनोदी संभाषणें हीं त्यांनीं लिहिलीं असें म्हणतात.

(९) कै. चिंतामण गंगाधर भानू—फर्ग्यूसन कॉलेजांतील इतिहासाचे प्रोफेसर. यांनीं 'नाना व महादजी' या विषयांवर केसरींत अग्रलेख माला लिहिली [illegible] प्रसिद्ध आहे. या शिवाय ऐतिहासीक विषयांवर इतरहि कांहीं लेख त्यांनीं लिहिले आहेत. गीता उपनिषदें वगैरे तात्त्विक विषयांवर त्यांनीं ग्रंथ लिहिले आहेत.

(१०) महादेव राजाराम बोडस एम्. ए. एलूएल्. बी.—जन्म ता. १५ मार्च १८६८. हे क्षेत्र काशी येथील रहिवासी. यांचे वडील राजारामशास्त्री बोडस अत्यंत थोर विद्वान् असून त्यांना सरकारकडून महामहोपाध्याय ही पदवी मिळाली होती. पुष्कळ दिवस ते एल्फिन्स्टन कॉलेजांत युरोपियन प्रो.च्या बरोबर शास्त्री या नात्यानें शिक्षकाचें काम करीत. १८९२–३ या सालांतील कांहीं भागांत माधवराव बोडस यांच्याकडे केसरींत व मराठ्यांत मजकूर लिहिण्याचें काम होतें. १९०४ सालीं आशिया व युरोप या विषयावर त्यांची अग्र लेखमाला आली ती वाचनीय आहे. यांची स्वतंत्र ग्रंथ निर्मिति फारशी नाहीं. ग्रामसंस्था या विषयावरील इंग्रजी

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

ग्रंथाचें भाषांतर व मुंबई सीरिजपैकीं तर्कसंग्रह हीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत. वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें यांतून ते लेख लिहितात.

(१२) कृ. प्र. खाडिलकर—जन्म सन १८७२. बी. ए. ची पदवी घेतल्यावर त्यांनीं एलएल. बी.च्या टर्म्स भरून अभ्यास केला. परंतु अखेर ती परीक्षा दिली नाहीं. दरम्यान वर्तमानपत्रांतील लेखक व नाटककार या व्यवसायांची त्यांची गोडी बळावून त्यांनीं त्याचच कायमचें वाहून घेतलें. ते १८९६ अखेर केसरी कचेरीला येऊन मिळाले. तेव्हां ते एलएल. बीच्या परीक्षेस बसण्याच्या विचारांत होते. पुढें तो बेत त्यांनीं सोडून दिला, व केसरीच्या उपसंपादकाची जागा त्यांनीं कायमची स्वीकारली. पुढें लवकरच लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला, व दीड वर्षांची शिक्षा झाली. तेव्हां खाडिलकरांकडे संपादकीय काम आलें. केसरीचे जबाबदार संपादक म्हणून डिक्लेरेशन केळकर यांचें होतें, व ते मधून मधून केसरींत लिहितहि. परंतु मराठ्याच्या जबाबदार संपादकाचें काम केळकरांकडे असल्यामुळें केसरीच्या लेखांची सर्व व्यवस्था खाडिलकर हेच करीत असत. टिळकांच्या या गैरहजेरीच्या एका वर्षांत खाडिलकरांच्या लेखनकलेचा परिचय महाराष्ट्राला चांगला झाला व लो. टिळक यांनीं फिरून केसरी हातीं घेतला, तेव्हां आपल्या गैरहजेरींत केसरीचा व वाचकांच्या भावनेचा सांधा बेमालूम जोडल्याबद्दल टिळकांनीं खाडिलकर यांचा योग्य शब्दांनीं गौरव केला.

यानंतर खाडिलकरांना परराष्ट्रीय राजकारणाची आवड विशेष आहे असें पाहून टिळकांनीं त्यांना नेपाळ वगैरे सरहद्दीच्या देशांत वास्तव्य करून, स्थानिक राजकारणाचा अभ्यास व्यापक दृष्टीनें करण्यास पाठविलें होतें. तिकडून परत आल्यावर ताईमहाराज केस चालू असतां केसरींत लेख लिहिण्याचें काम पुष्कळसें खाडिलकरांवरच पडे; व वंगभंगाच्या चळवळीच्या प्रारंभापासून खाडिलकरांच्या लेखनकलेला विशेष अवसर सांपडला. १९०८ सालीं लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला होऊन त्यांना सहा वर्षे हद्दपारीची शिक्षा झाली. तेव्हां टिळकांचे जागीं खाडिलकर यांनींच केसरीचें संपादक म्हणून डिक्लेरेशन केलें तें १९१० च्या फेब्रुवारीपर्यंत राहिलें. तेथून पुढें केळकर हे केसरीचे संपादक झाले.

लो० टिळक परत आल्यानंतर फिरून कांहीं दिवसांनीं खाडिलकर केसरीसंस्थेस येऊन मिळाले. आणि लोकमान्य टिळक हे प्रथम विलायतेस निघाले, तेव्हां त्यांज-बरोबर केळकरहि जावयाचे असल्याकारणानें, केळकरांच्या जागीं खाडिलकर यांनीं केसरीचे संपादक म्हणून डिक्लेरेशन केलें. तें १९२० च्या जूनपर्यंत होतें. त्यानंतर त्यांनीं केसरी कचेरीची रजा घेतली. नंतर लवकरच मुंबईस 'लोकमान्य' नांवाचें दैनिक राष्ट्रीय पक्षानें काढलें. याचें संपादकत्व खाडिलकर यांजकडे देण्यांत आलें, व तें काम त्यांनीं १-१॥ वर्षे केल्यावर 'नवाकाळ' नांवाचें स्वतःच्या मालकीचें दैनिक वर्तमानपत्र त्यांनीं मुंबईसच सुरू केलें.

(१३) कै. दत्तात्रय गोपाळ लिमये—हे सातारा जिल्ह्यांतील रहिवासी. त्यांनीं बी. ए. ची पदवी घेतल्यानंतर पुढील अभ्यास सोडला. व कै० शि. म. परांजपे यांच्या काळपत्रांत प्रथम कांहीं थोडे दिवस उपसंपादक म्हणून काम केल्यावर ते केसरी कचेरीला येऊन मिळाले. ताईमहाराज खटल्यामुळें टिळकांना केसरीकडे विशेष लक्ष देण्यास फुरसत नसे, व याच सुमारास केसरीचीं पानें पूर्वी चार होतीं तीं आठ करण्यांत आलीं. व वर्तमानसार, पांच अभिप्राय वगैरे अवांतर मजकूर नियमितपणें चालण्यांत येऊं लागला. त्यामुळें टिळकांना उपसंपादकांची अवश्यकता भासू लागली. व लिमये यांना कायम करण्यांत आलें. कांहीं दिवस खाडिलकरांच्या जोडीला राहून व कांहीं दिवस एकट्यानें त्यांनीं उपसंपादकांचें काम केलें. अग्रलेख लिहिण्याचें काम त्यांचे-कडे फारसें येत नसे. तथापि अवांतर सर्व मजकुराची व्यवस्था करण्याची जबाबदारी त्यांचेवर असे. व ते ती इतक्या उत्कृष्ट तऱ्हेनें पार पाडीत कीं लोकमान्य टिळकांना लिमये हे केसरीच्या वाङ्मयांतील एक आधारस्तंभ असे वाटत. वक्तशीरपणा, समर्पकपणा विनतक्रारपणा हे जसे लिमये यांचे व्यवस्थेंतील गुण त्याचप्रमाणें मार्मिकपणा व चटक-दारपणा हे त्यांचे लेखनांतील विशेष गुण होत. त्यांची भाषा सोपी व सुबोध असून जुन्या संस्कृत वाङ्मयांतील दाखले त्यांना चांगले सुचत. महाभारतादि पुराणांचा त्यांचा अभ्यास पुष्कळ होता. भारतीययुद्ध हें त्यांनीं तरुण पिढीकरितां लिहिलें व तें फार लोकप्रिय झालें. रा. लिमये हे दुर्दैवानें अल्पायुषी ठरून १९१५ च्या एप्रिल महिन्यांत वारले. यामुळें केसरीची मोठीच हानी झाली.

(१४) कै. सदाशिव हरि भावे—हे नागपुरचे रहिवासी. यांना लिहिण्या-वाचण्याचा लहानपणापासून नाद असून, नागपूरच्या महाराष्ट्रीय मंडळाच्या शिफारसीनें टिळकांनीं यांना लेखक व रिपोर्टर म्हणून केसरीकडे घेतलें. ते स्वतः लघु लेखकाची विद्या शिकलेले नसतांहि व्याख्यानांचे रिपोर्ट वाखाणण्यासारखे तयार करून देत. लो. टिळकांच्या व्याख्यानांचीं त्यांनीं तयार केलेलीं दोन पुस्तकें सरकारजमा झालेलीं आहेत. 'भोंदू गुरूंची गाथ' या व इतर कांहीं विषयांवर समाजक्षोभक असे कांहीं लेख त्यांनीं केसरींत लिहिले होते.

(१७) रामचंद्र कृष्ण जोशी—कोंकणचे रहिवासी. एम्. ए. ची पदवी घेतल्यानंतर त्यांनीं १९१०–११ एक दोन वर्षे न. चिं. केळकर यांचे हाताखालीं 'मराठा' पत्राचे उपसंपादक म्हणून काम केलें.

(१८) डॉ० विष्णु महादेव भट बी. ए., एम्. बी. बी. एस.—जन्म २० जून १८८५. कोंकणचे रहिवासी व लो० टिळकांचे दूरचे आप्त. बी. ए. ची पदवी घेतल्यानंतर मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें अभ्यास करीत असतां १९०८ च्या राष्ट्रीय चळवळींत सांपडून नाशिक येथील खुनाच्या कटाच्या खटल्यांत त्यांना पांच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. ती भोगून आल्यावर त्यांना उरलेला मेडिकल कॉलेजांतील अभ्यास पुरा करण्याची परवानगी मोठ्या कष्टानें मिळाली. तिचा फायदा घेऊन ते एम. बी. बी. एस. ची परीक्षा पास झाले. त्यानंतर त्यांनीं येवलें येथील दानशूर धनिक शे० वल्लभदास यांनीं काढलेल्या संयुक्त आर्यांग्ल रुग्णालयांत मुख्याधिकारी म्हणून जागा स्वीकारली. तेथपासून आतांपर्यंत ते डॉक्टरांचें काम व आर्य वैद्यकाचें संशोधन करीत असतात. तुरुंगांतून परत आल्यावर व फिरून मेडिकल कॉलेजांत प्रवेश होण्यापूर्वीच्या दरम्यानच्या काळांत केसरी–मराठ्याकडे ते उपसंपादक होते. व तेथूनच त्यांना लो० टिळकांनीं उरलेला अभ्यासक्रम पुरा करण्यास पाठविलें.

(२०) वामन मल्हार जोशी, एम्. ए.—हल्लीं प्रोफेसर हिंगणें येथील भारत महिला विद्यापीठ. जुन्या समर्थ विद्यालयांतील शिक्षक असतां हे विश्ववृत्त मासिकाचे संपादक होते. व त्यांतील एका लेखाबद्दल त्यांना तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. तेथून सुटून आल्यावर ते कांहीं दिवस मराठ्याचे संपादक होते. केसरींत त्यांनीं तात्त्विक विषयांवर लेख लिहिले आहेत.

(२१) पांडुरंग महादेव बापट—यांनीं बी. ए. ची डिग्री घेतल्यावर ते पं. श्यामजी कृष्णवर्मा यांची शिष्यवृत्ति घेऊन विलायतेंत गेले. पण तेथील शिक्षण पुरें न करतां ते राष्ट्रीय चळवळींत पडले. हिंदुस्थानांत परत आल्यावरहि त्यांनीं संसाराकरितां असा कोणताच धंदा केला नाहीं. ते केसरी–मराठा संस्थेकडे सुमारें अडीचतीन वर्षे होते. त्यांस नेमून दिलेलें काम मराठ्याच्या उपसंपादकाचें होतें. तथापि मतप्रसाराच्या हौसेमुळें ते केसरींतहि मधून मधून लेख लिहीत. कांहीं दिवस ते राष्ट्रीय चळवळीला उद्देशून नवीन अभंग बनवून केसरींत देत असत. त्यांचे लेख मोठ्या धडाडीचे व स्वर्गोक्तिपूर्ण असून त्यांतल्या त्यांत समाजांतील कनिष्ठ वर्गा-विषयींचें प्रेम प्रकट करितात. मुळशी पेट्यांतील धरणाच्या चळवळींत त्यांना ७ वर्षांची शिक्षा झाली असून ते हल्लीं तुरुंगांत आहेत.

(३०) रावजीपंत वाळणकर—हे केसरीच्या सुरवातीचे मुंबईचे एजंट. ते टाइम्स ऑफ इंडियामध्यें नोकर असत. तथापि केसरी वाटण्याची व्यवस्था करणें व मुंबईची माहिती पाठविणें वगैरे गोष्टी आस्थेवाईकपणानें ते करीत.

(३२) कै. अनंत नीलकंठ पिटकर—हे मुंबईस अकौंट ऑफिसांत होते. गजानन भास्कर वैद्य यांचे हे परम स्नेही असून, त्यांच्या सहकारितेनें ते मुंबईहून केसरीला बातमीपत्रें पाठवीत.

(३३) कै. गजानन भास्कर वैद्य बी. ए.—हे कुलाबा जिल्ह्यांतले रहिवासी बी. ए. झाल्यावर त्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या विषयांत विशेष लक्ष घातलें. तसेंच हिंदुधर्मासंबंधानें पतितपरावर्तन व शुद्धिकार्य यांची मुहूर्त मेढ मुंबईस मूळ त्यांनींच रोवली असें म्हणण्यास हरकत नाहीं. ते सुधारक वर्गांत मोडत असतांहि त्यांनीं लो० टिळकांविषयीं जन्मभर अभिमान बाळगून अनेक प्रकारें त्यांचें कार्य केलें. १०–१२ वर्षांपूर्वी म्हणजे १९१३ पर्यंत केसरींत प्रसिद्ध होणारीं मुंबईचीं बातमीपत्रें कै. रा. पिटकर यांच्या सहकारितेनें वैद्य हे लिहीत. हें काम ते इतक्या तत्परतेनें व आस्थेनें करीत कीं त्यांचें हें ऋण टिळक नेहमीं कृतज्ञतापूर्वक स्मरत. केसरींत अॅनी बेझंट, मॅ. ब्लॉव्हॅट्स्की, कॅ. अल्कॉट व एकंदरीनें थिऑसफी ह्या विषयांवर जे स्वतंत्र किंवा पत्रव्यवहाररूप पुष्कळ लेख आले त्यांतील बहुतेक लेख वैद्य यांच्या लेखणींतून उतरलेले आहेत. विशेषतः वैद्य यांचें नांव केसरीच्या मुखपृष्ठावरील सिंहाच्या चित्राशीं कायमचें निगडित झालेलें आहे. वैद्य यांच्या कारखान्यांत कोरीव चित्रांचें काम होत असल्यामुळें सिंहाच्या चित्रांचा व इतर कांहीं चित्रांचा साचा तेच नेहमीं करून पाठवीत. बंगाल फाळणीच्या चळवळींत कांहीं दिवस मराठा पत्रांत वैद्यांनीं कार्टून्स किंवा विनोदी चित्रेंहि प्रसिद्ध केलीं होतीं. रा. वैद्य यांच्या भाषेंत अंतर्बाह्य सात्त्विक प्रेमाचा व विश्वबंधुत्वाच्या भावनेचा ओलावा आढळून येई; व त्यांचे लेख वाचतांना आपण एका उच्च वातावरणांत आहों असें वाटे.

(३४) सुंदरराव भास्कर वैद्य—यांना लहानपणापासून चित्रकलेचा अति नाद आहे. मुंबई येथील चित्रशाळेंत सर्व चित्रकलेचा अभ्यास केला. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें इंग्रजी पांचवी इयत्ता शिकत असतां कोठेंहि न शिकतां साधे खिळे घांसून लांकडावर चित्रें कोरण्यास त्यांनीं सुरुवात केली. (केसरीच्या हेडिंगावर सिंह घालण्याचें ठरलें तेव्हां मात्र सिंह दाखविण्यास लोकमान्यांनीं त्यांनां मुंबईत प्रो० छत्रे यांच्या सर्कशींत स्वतःबरोबर नेलें होतें.) हल्लीं हे सर्व प्रकारचीं चित्रें काढणें व कोरणें यांचा धंदा करितात. चित्रकलेंत यांची हल्लीं इतकी प्रगति झाली आहे कीं, कोणाचेंहि चित्र पेन्सिलीनें ओळखूं येईल असें ८" × १०" इतक्या आकाराचें दहा मिनिटांत काढूं शकतात. एका तांदळाच्या दाण्यावर कोणत्याहि फोटोवरून ओळख येईल असें रंगीत बारीक चित्र त्यांना काढतां येतें. फक्त अठ्ठेचाळिस टाइपांत मराठी छापतां येईल असे टाईप त्यांनीं तयार केले आहेत. मुंबईत मुलींच्या शाळांत चित्रकला फुकट शिकविण्याचें काम आज २१ वर्षे ते करीत आहेत. हिंदु मिशनरी सोसायटी, थिऑसफी वगैरेंचींहि कामें ते करीत असतात. हल्लीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे ते एक सेक्रेटरी आहेत. गेलीं सात वर्षे ताजीबातमी हें दैनिक ते चालवीत आहेत.

(३५) त्रिविक्रमपंत पित्रे—बी. ए. एल. एल. बी. हल्लीं धारवाड येथील एक पुढारी वकील. सुमारें तीस वर्षांपूर्वी ते केसरीला फार चांगलीं नमुनेदार बातमीपत्रें लिहीत असत.

(३६) भुजंगराव रामचंद्र मानकर—जन्म ता. ७ जानेवारी सन १८६४. सुप्रसिद्ध शॉर्टहँड रायटर व रिपोर्टर. यांचा केसरी–मराठ्यांशीं संबंध सन १८९५ पासून म्हणजे पुणें येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनापासून आला. मुंबईचे केसरीचे बातमी-दार रा. पागे व रा. मुकुंदराव गुर्जर यांच्या सहकारितेनें त्यांनीं केसरीकडे रिपोर्टर म्हणून बातमीपत्रें वगैरे पाठविण्याचे कामीं साहाय्य केलें. केसरींत प्रसिद्ध झालेल्या कित्येक परिषदांचे व व्याख्यानांचे रिपोर्ट तयार करण्याकरितां लो. टिळकांचेकडून त्यांना विनंति करण्यांत येत असे. व तें काम त्यांनीं नेहमीं उत्तम प्रकारें केलें. सन १८९७

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

च्या केसरीवरील खटल्याच्यासंबंधीं शॉर्टहँडमध्यें टिपणें घेऊन रिपोर्ट त्यांनींच पुरवले इतर अनेक खटल्यांतील हकीकत पाठविण्यांतहि त्यांची केसरी–मराठा संस्थेला मदत झालेली आहे. रा. मानकर यांनीं स्वतःची एक लघुलेखनपद्धति बसविलेली असून त्यांच्या पद्धतीनें अनेक विद्यार्थी ही कला शिकत असतात.

(३७) केशव महादेव बाळ—जन्म ता. १५ डिसेंबर सन १८६७. हल्लीं मॅनेजर आर्यभूषण व ज्ञानप्रकाश छापखाना. सन १८८८ सालीं ते केसरी कचेरींत काम करूं लागले. १८९७ सालीं केसरीवर खटला झाला त्या वेळीं ते आर्यभूषण छापखान्याचे मॅनेजर होते, म्हणून त्यांचेवरहि खटला झाला; व ते डोंगरीच्या तुरुंगांत १८ दिवस कच्च्या कैदेंत होते. नंतर जामिनकीवर सुटून अखेर ते दोषमुक्त झाले. केसरीपत्र आर्यभूषण छापखान्यांत निघत होतें तोंपर्यंत व्यवस्थापक या नात्यानें त्यांनीं केसरीची सतत सेवा केली. त्यांचा उद्योगीपणा, विश्वासूपणा या गुणांमुळें लो. टिळकांच्या विश्वासांतल्या लोकांपैकीं ते एक होते.

(४२) अप्पाजी विष्णु कुलकर्णी—जन्म सन १८६९. हे पुण्यास येण्यापूर्वी चिकोडी येथें ‘शिक्षक’ नांवाचें साप्ताहिक व ‘ग्रंथरत्नाकर’ नांवाचें मासिक पुस्तक काढीत होते. पुण्यास आल्यावर १९०० ते १९०८ पर्यंत केसरी कचेरींत टिळकांचे लेखक म्हणून होते. व किरकोळ मजकूर केसरींत केव्हां केव्हां लिहीत. जगद्धितेच्छु व व्यापारी या पत्रांचें चालकत्व त्यांजकडे कांहीं वर्षे होतें. राष्ट्रमताचे उपसंपादक म्हणन त्यांनीं एक वर्ष काम केलें. मराठी रंगभमि व लो. टिळक यांचीं गेलीं आठ वर्षे हीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत.

(४४) नारायण जगन्नाथ दातार—जन्म ता. १८ जुलै १८६४. हे पूर्वी सरकारी नोकर व हल्लीं केसरीचे पेन्शनर एजंट. त्यांचा केसरीशीं संबंध १८८३ सालीं कै० हरि नारायण गोखले यांच्या द्वारें आला तो अद्यापपर्यंत कायम आहे. मुंबईस सरकारी नोकर असतां केसरीचे एजंट म्हणून काम करीत असल्याबद्दल त्यांना सरकारी नोकरींतून काढून टाकण्यांत आलें. ३५ वर्षांपूर्वी ते केसरीकडे बातमीपत्रें व इतर माहिती पाठवीत. नोकरींतून निघाल्यावर त्यांना कायमचे केसरीचे एजंट नेमण्यांत आलें व लो. टिळकांनीं त्यांचा संसार अशा रीतीनें आजवर चालविला. त्यांनींहि दक्षतापूर्वक मुंबईतील केसरीचें हरएक प्रकारचें कार्य केलें.

(४६) गणेश लक्ष्मण पागे—हे व कै. मुकुंदराव गुर्जर यांनीं सर्वांचे आधीं केसरीला बातमी व बातमीपत्रें पाठविण्यास सुरवात केली होती. तसेंच अनेक सभा व परिषदा यांच्या हकिकती केसरीकडे ते मोठ्या आस्थेनें तयार करून पाठवीत.

(४७ ते ५४) केसरी मराठ्याचे हल्लींचे किंवा अलीकडील बातमीदार नारायण रामलिंग कामणगांवकर, दाजीशास्त्री चांदेकर, दत्तात्रय गणेश सावरकर, श्री. रा. टिकेकर, डॉ. नारायणराव परुळेकर, पुरुषोत्तम दिनकर जोशी, महादेवराव मोडक, लक्ष्मण नारायण साने, नारायण बाळकृष्ण केळकर.

(५६) कै. कृष्णाजी आबाजी गुरुजी—हे पब्लिक वर्क्स खात्यांत नोकर असतां, भवानी तलवार या पुस्तकाच्या संबंधानें त्यांचेवर खटला होऊन त्यांची नोकरी गेली. त्यांनीं प्लेगच्या दिवसांत इनॉक्युलेशनसंबंधानें व प्लेगव्यवस्थेच्या जुलमासंबंधानें बरेच लेख लिहिले. १८९९ चे सुमारास काशी येथें जाऊन ‘कालीदास’ या नांवाचें वर्तमानपत्र त्यांनीं काढलें. त्या पत्रावरहि खटला झाला. नंतर इकडे येऊन त्यांनीं बार्शी, बागलकोट वगैरे ठिकाणीं गोशाळा स्थापून वैद्यवैद्यक, गोरक्षण वगैरे विषयांवर लेख व पुस्तकें लिहिलीं. लो. टिळकांचें चरित्र त्यांनींच प्रथम सविस्तर लिहिलें. ते जुन्या पिढीचे एक अत्यंत करारी देशभक्त व स्वदेशीचे प्रेमी होते.

(५७) कै० पारखीशास्त्री—हे जुन्या पिढीचे कवि व कादंबरीकार. पुष्कळ वर्षे हे दर संक्रांतीला नवीन कविता करून केसरीकडे पाठवीत. तसेंच कित्येक उत्सवानिमित्तहि केलेल्या कविता केसरींत आल्या आहेत.

(५८) नारायण भवानराव पावगी बी. ए.—जन्म फाल्गुन शु॥९ शके१७७६. हे सरकारी रेव्हिन्यूखात्यांत मामलेदारीच्या हुद्यापर्यंत चढले. नोकरींत असतानाच भारतीय साम्राज्य या विषयावरील आपले ग्रंथ प्रसिद्ध करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. त्या पुस्तकाची लोकांनीं जितकी वाहवा केली तितकेंच सरकारालाहि त्याचें वैषम्य वाटलें. कारण त्यामध्यें भरतभूमीच्या प्राचीन वैभवावर अधिष्ठित झालेले राष्ट्रीय भावनेचे विचार ओतप्रोत भरले होते. यामुळें त्यांच्या पेन्शनला बराच धक्का बसला. परंतु त्यास न जुमानतां त्यांनीं आपला लेखनव्यवसाय तसाच चालू ठेवला. यांची शास्त्र व संशोधन या विषयावर इंग्रजींत ९-१० पुस्तकें, मराठींत भारतीयसाम्राज्य ग्रंथमालेचीं ११ पुस्तकें व शिवाय भाषाशास्त्र, नाट्यशास्त्र, आर्यांचें वसतीस्थान, भूगर्भशास्त्र वगैरे अनेक विषयांवर यांचे दहा–पांच ग्रंथ प्रसिद्ध आहेत. कांहीं कविताहि यांनीं लिहिली आहे. केसरींत अनेक विषयांवर निरनिराळ्यावेळीं लेख लिहिले असून केसरीशीं त्यांनीं अखंड ऋणानुबंध ठेवला आहे.

(५९) कै० रावजी भवानराव पावगी बी. ए.—जन्म शके १७७८. यांना तरुणपणींच विलायतच्या प्रवासाची संधि मिळाली, व तेव्हां त्यांनीं विलायतच्या प्रवास, वर्णनावर अनेक लेख केसरींत लिहिले. ते वाचनीय आहेत. संस्कृत भाषेचा अतिशय उपयोग केल्यामुळें त्यांचे हे लेख त्या काळच्या नवीन लेखकांचा नमुना म्हणून प्रसिद्ध आहेत. तथापि त्यांतील वर्णनें निःसंशय वाचनीय होतीं.

(६०) रामजी लक्ष्मण घरत—जन्म ता.७जून १८५५.१९२३ सालीं अलीबागेजवळील कनकेश्वराचें वर्णन केसरीकडे पाठविलें तेव्हांपासून ऋणानुबंध सुरु झाला. १८९४,१८९७व १९२५ व इतर निरनिराळ्या सालीं अलीबागेंतील शेतकऱ्यासंबंधानें केसरींत अनेक लेख लिहिले. याच विषयांचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास करून शेतकऱ्यांचें गाऱ्हाणें टाइम्स ऑफ इंडिया पत्रांतूनहि त्यांनीं सतत पुढें मांडलें आहे. तसेंच लेग व्यवस्था वगैरे जुलमासंबंधीं त्यांनीं निर्भिडपणें लेख लिहिले आहेत. भर्तृहरीचें शतकत्रय, वामनाचे श्लोक, विवेकचूडामणीचें भाषांतर, स्वराज्यसिद्धि, भवसमुद्र, क्षात्रवृत्त वगैरे विषयांवर त्यांनीं लेख लिहिले, संशोधन केलें व भाषांतरात्मक ग्रंथ लिहिले आहेत.

(६१) कृष्णाजी लक्ष्मण सोमण—हे पुण्याचे रहिवासी. सरकारी १–२ खात्यांत नोकरी केल्यावर पेन्शन घेऊन हल्लीं ते बेळगांवीं राहातात. त्यांना नाट्यविषयाची विशेष गोडी असून स्वतः त्यांनीं १०-१२ नाटकें लिहिली आहेत. कै० प्रो. वासुदेवराव केळकर हे त्यांचे स्नेही असल्यामुळें त्यांनीं केसरींत कांहीं स्फुट लेख व विचारतरंगाच्या रूपाचे लेख लिहिले आहेत. रामभाऊ टिकेकर यांनीं घेतलेलें धनुर्धारी हें नांव व तुटक व ठसठशीत विचारतरंग लिहिण्याची पद्धति यांचें अनुकरण ‘किरात’ या सहीनें श्री. सोमण यांनीं कांहीं दिवस केलें तें वाचकांना बरेच आवडलें. हल्लीं ते स्फूर्ति मासिकाचे संपादक आहेत.

(६२) कृष्णाजी परशराम गाडगीळ, बी. ए.—केसरीच्या पहिल्या संपादक पिढीचे ऋणानुबंधी प्रथम मास्तर व नंतर मुनसब अशी नोकरी केल्यावर पेन्शन घेऊन पुण्यास येऊन राहिले असतां, टिळकांना प्रसंग विशेषीं साहाय्य करण्याकरितां केसरी मराठ्यांत लेख लिहून देत.

(६३) कै० वि. गो. विजापूरकर—हे कोल्हापूरचे रहिवासी. तेथें व पुण्यास शिक्षणक्रम संपविल्यावर ते प्रथम राजाराम हायस्कुलांत शिक्षक व नंतर राजाराम कॉलेजांत संस्कृतचे प्रोफेसर झाले. त्या जागेवर असतां स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांवरील त्यांच्या धैर्यशील प्रेमामुळें कोल्हापूर दरबारची त्यांचेवर इतराजी झाली. नोकरी सोडल्यावर प्रथम कोल्हापुरास व नंतर तळेगांव येथें श्रीसमर्थ विद्यालय स्थापन करून त्याचें काम अनेक स्थित्यंतरांतून निभावून त्यांनीं जन्मभर चालविलें. ग्रंथमाला व विश्ववृत्त नांवाचीं सुप्रसिद्ध मासिकें त्यांनीं अनेक वर्षे चालविलीं होतीं. त्यांतील कांहीं लेखावरून त्यांना तुरुंगवासहि भोगावा लागला. केसरींत राष्ट्रीयशिक्षण व स्वदेशी यावर त्यांनीं निरनिराळ्या वेळीं स्वतंत्र किंवा पत्रव्यवहारात्मक लेख लिहिले आहेत. अंतःकरणाची तळमळ व स्पष्टोक्ति हे त्यांच्या लेखांचे मुख्य गुण असत.

(६५) कै० रामचंद्र विनायक टिकेकर—जन्म सन १८६२. हे त्यांच्या पिढींत उत्तम मराठी लेखक म्हणून नांवाजले गेले होते. केसरींत वाग्बाण, गप्पासप्पा इत्यादि मथळ्याखालीं व ‘ धनुर्धारी ’ या सहीवर ते त्रोटक स्वरूपाचे सुटसुटीत पण चुरचुरीत लेख लिहीत. शेत–शेतकी–शेतकरी या विषयावर १९०१ सालीं, हिंदुस्थानचें नाणें व विलायती हुंडी या विषयांवर १८९८ सालीं, विण-कामाच्या धंद्यावर १९०३ सालीं त्यांचे केसरींत लिहिलेले लेख वाचनीय आहेत. त्यांचे तंट्या भिल्लाच्या चरित्राचे कांहीं हप्ते केसरींत आलेले होते. शिवाय वांईकर भटजी, व्यापारी भूगोल, पिराजी पाटील, मराठ्यांची मर्दुमकी, जवानमर्द ब्राह्मणभाई, मराठ्यांचा पत्रबद्ध इतिहास, दंदूर प्रकरणाची दुसरी बाजू, व्यापारी वाचनपाठ वगैरे इतर ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत.

(६७) ल. रा. पांगारकर—जन्म तारीख ३१ जुलै १८७२. हे फर्ग्युसन. कॉलेजांतील शिष्य व टिळकांचे परम चहाते. बी. ए.ची पदवी घेतल्यानंतर त्यांनीं ग्रंथकर्तृत्वाचाच व्यवसाय स्वीकारला व त्यांतूनहि संतचरित्र संशोधन व लेखन यावरच विशेष भर दिला. केसरींत त्यांनीं वेळोवेळीं कवि मोरोपंत यांच्या चरित्रासंबंधानें चर्चात्मक असे पुष्कळ लेख लिहिले व वादहि केले. इतर कांहीं महाराष्ट्र कवि व संतसाधु यांच्या चरित्र संशोधनासंबंधींहि मधून मधून ते केसरींत लिहीत. त्यांच्या भाषेचे मुख्य गुण प्रेमळपणा, रसिकपणा हे असून त्यांचे लेख भाविक सज्जनांना फार मानवत असत. राजा शहाजी, प्रल्हादपंत बडवे, क्षत्रिय मराठी कवी, तुकारामबोवांचा कालनिर्णय, संताजी जगनाडे, परशुराम शाहीर, महदाख्यायिका, बाळकृष्णपंत हंस, एकनाथाचा निर्णयकाल वगैरे विषयांवर त्यांनीं लेख लिहिले आहेत. त्यांनीं अनेक वर्षे ‘मुमुक्षु’ पत्राचें संपादन चालविलें आहे.

(६८) श्रीपाद दामोदर सातवळेकर—जन्म भाद्रपद वद्य ६ शके १७९३ हल्लीं मुक्काम औंध. वेदाचे भाषांतर व धार्मिकलेखन लेखक या नात्यानें त्यांचा केसरीशीं संबंध आला. त्यांनीं केसरींत ऐतरेय उपनिषद (१८९८) आगाखानी सांप्रदाय (१९१३), वेदांतील प्रातिनिधिक संस्था इ. विषयांवर लेख लिहिलेले आहेत. वैदिक धर्मस्वरूप, राष्ट्रगीत, पुरुषसूक्त, राष्ट्रसूक्त, भगवतद्गीता, सत्यार्थप्रकाश, स्पर्शास्पर्शविचार, ब्रह्मचर्य, ग्रहस्थाश्रम इ० अनेक विषयांवर त्यांनीं लिहिलेले ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांचे हिंदी भाषेचें ज्ञान चांगलें असून त्यांनीं वेद व महाभारत यासंबंधानें अनेक पुस्तकें त्या भाषेंत लिहिलीं आहेत. प्रो. विजापूरकर यांच्या विश्ववृत्त मासिकांतील एका लेखावरून त्यांच्यावर वीस–बावीस वर्षांपूर्वी खटला झाला व त्यांत त्यांनीं तुरुंगवास भोगला. रा. सातवळेकर हे चांगले चित्रकारहि आहेत.

(६९) गीतावाचस्पति भिडे—हे मूळ तासगांवचे रहिवासी. जन्म मार्गशीर्ष शु॥ ४ शके १७९८. बालपणींच त्यांचे नेत्र गेले. तथापि त्यांनीं प्रथम इकडे व नंतर काशीला जाऊन संस्कृत भाषेचें व शास्त्राचें अध्ययन केलें. मुंबईंत हरीकिर्तनोत्तेजक संस्थेंत ते एक प्रमुख शिक्षक होते. लो०टिळकांच्या गीतारहस्यांतील सिद्धांत त्यांना सर्वस्वी मान्य असल्यानें लो० स्मारक म्हणून गीतेंतील उपनिषदांतील व एकंदरीनें वैदिक वाङ्मयांतील कर्मयोगाचा प्रचार या व इतर प्रांतांत करण्याचें त्यांनीं अंगिकारलें. हल्लीं ते गीता-धर्म-मंडळाचे चालक व आधारस्तंभ आहेत. या त्यांच्या मुख्य विषयावर व इतर कित्येक विषयावर त्यांनीं लेख व कांहीं प्रवचनांचे अनुवाद दिलेले आहेत. व अनेक ग्रंथांचें परीक्षण केसरींत केलें आहे त्यांच्या लिखाणांत विद्वत्ता असून त्यांचें विवेचन फार समर्पक असतें.

(७०) कै० नारायण कृष्ण आगाशे, बी. ए. एल. एल. बी. जन्म ज्येष्ठ शु० १२ शके १७८८ सातारा येथील जुने वकील. यांनीं केसरींत इजिप्तचें राजकारण, डॅनियल ओकानेलचें चरित्र, इंग्लंडांतील प्रधान मंडळ, राजकीय दृष्ट्या इतिहासाचें

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

महत्व इत्यादि विषयांवर लेख लिहिले होते. तसेंच निरनिराळ्या मासिकांतूनहि ते लेख लिहित.

(७२) प्रो. धोंडो केशव कर्वे— जन्म ता. १८ माहे एप्रिल सन १८५८. महाराष्ट्रांतील स्त्री-शिक्षणासंबंधानें व विधवादुःखनिवारणसंबंधानें त्यांनीं सतत ३० वर्षे केलेले प्रयत्न जगन्मान्य असून त्यांच्यासंबंधानें माहिती देणें हेंच कदाचित अप्रस्तुत होईल. त्यांचे केसरींत विशेष लेख आलेले नाहींत; तथापि सन १८९३ सालीं पुनर्विवाहाच्या संबंधानें त्यांना टीकेला केसरींत उत्तर दिलें होतें. अनाथ बालिकाश्रमासंबंधीं माहिती त्यांनीं केसरीकरितां लिहिली ती केसरीचा पुरवणी म्हणून वांटण्यांत आली होती. पंडिता रमाबाई यांच्यासंबंधीं त्यांनीं सुमारें २० वर्षांपूर्वी एक लेख केसरींत लिहिलेला होता. त्यांचें आत्मवृत्त १९१५ सालीं प्रसिद्ध झालें तें वाचकांस परिचित आहेच. मराठी भाषेच्या द्वारें शिक्षण देण्यासंबंधानें त्यांचा विशेष कटाक्ष असून त्यांनीं स्थापिलेल्या महिला विद्यापीठाचा गुण सांगण्यासारखा विशेष आहे.

(७४) कै. रामचंद्र मोरेश्वर साने, वकील, बार्शी—केसरीच्या पहिल्या अमदानींत यांचा संबंध केसरीचे प्रतिपक्षी या नात्यानें होता. तथापि पुणें सोडून ते बार्शीस गेल्यानंतर केसरीसंबंधानें त्यांची सहानुभूति प्रकट होऊं लागली. पुण्यांतील उभय पक्षांचे मित्र व मध्यस्त या नात्यानें ते राजकारणाच्या विषयांत मधून मधून लिहीत. पुढें सहकारी कायदा होऊन पतपेढ्यांची चळवळ सुरू झाली तेव्हां साने यांना सरकारनें वरच्या प्रतीचे ऑर्गनायझर नेमलें. तेव्हांपासून शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें ते या चळवळीवर मधून मधून लेख लिहीत. त्यांनीं ज्ञानप्रकाशपत्राच्या संपादकाचें काम वकील होण्यापूर्वी बरेच दिवस केलें होतें त्यामुळें त्यांना लिहिण्याचा सराव चांगला असे. त्यांच्या लेखांतील मुख्य गुण असा कीं, ते कोणत्याही विषयांतील साधक-बाधक प्रमाणें पाहून पारखून अनुभवसिद्ध गोष्टी लिहून कायदेकानूंत सुधारणा सुचवून सहकारी चळवळ व शेतकी खातें रयतेला फलद्रूप कशी होईल याची चर्चा ते मोठ्या कळकळीनें करीत.

(७५) वे. शा. सं. आत्मारामशास्त्री ओडलमने—हल्लीं संस्कृत अध्यापक सेंट्रल हायस्कूल, मरकारा, (कुर्ग प्रांत). यांनीं रचलेल्या कित्येक कविता केसरींत प्रसिद्ध झाल्या आहेत. कर्नाटक, कुर्ग या भागांतील केसरीच्या परंपरेचे ते एक अभिमानी गृहस्थ असून इकडील मोदवृत्त, विश्ववृत्त, जगद्धितेच्छु, लोकशिक्षण वगैरे पत्रांतून त्यांचे लेख, धर्म, वेदांत वगैरे विषयावर प्रसिद्ध झालेले आहेत.

(७६) कृष्णशास्त्री नारायण कवडे बी. ए.—जन्म भाद्रपद व. २ शके १८०५. हल्लीं व्यवसाय वैद्यकीचा. स्वदेशी चळवळ, राष्ट्रीयसभा, गणेशोत्सव, पैसाफंड इ. चळवळीशीं यांचा संबंध असून त्या विषयांवर त्यांनीं व्याख्यानाचे सारांश व लेख केसरींत लिहिले असून, अनेक वैद्यक ग्रंथांचें परीक्षण केसरींतून केलें आहे. १९०८ सालच्या टिळक व परांजपे यांच्या खटल्याचीं पुस्तकें त्यांनीं प्रसिद्ध केलीं.

(७७) सदाशिव विनायक बापट—जन्म ता. १२ मे सन १८८७. हल्लीं व्यवसाय चिटणीस, पुणें सार्वजनिक सभा व दुय्यम चिटणीस टिळक स्मारक ट्रस्ट. सन १९०६ व सन १९१० ते १९१६ पर्यंत त्यांनीं मुख्य संपादकाचे हाताखालीं तोंडी सांगितलेला मजकूर लिहिण्याचें व होमरूल लीगच्या हिशेबनिसाचें काम केलें. लो. टिळकांच्या आठवणी व आख्यायिका, सूक्तिसंग्रह वगैरे त्यांचे ग्रंथ प्रसिद्धच आहेत. सार्वजनिक सभा व टिळक स्मारक ट्रस्ट यांचे ते प्रवासी प्रचारक असून त्यांनीं लिहिलेले वृत्तांत मार्मिक व अनुभविक आहेत. त्यांतील भाग वेळोवेळीं केसरींत प्रसिद्ध झालेले आहेत.

(७८) प्रो. शं. दा. पेंडसे एम. ए.—हल्लीं प्रोफेसर नागपूर. हे एक चांगले वक्ते व लेखक असून, धर्म वाङ्मय या विषयांवर केसरींत लेख लिहित असतात.

(७९) महादेव गोविंद अभ्यंकर—जन्म आश्विन शुद्ध १ शके १७९०. यांचा केसरीशीं अनेक प्रकारें संबंध आला. परंतु मुख्यतः रामायण, भारत या संबंधीं संशोधनात्मक पुष्कळ लेख त्यांनीं केसरींत वेळोवेळीं लिहिलेले आहेत. वेंटले आणि रामायण, दिवाणी कोर्टे, पोलीस लेगव्यवस्था, इन्कम् टॅक्सचा आजचा अन्याय, हिंदु व मांजरप्राणी, ज्ञानेश्वर एक कीं दोन, येऊरची यात्रा, गुरुचरित्रांतील आरती इ. निरनिराळ्या विषयांवर त्यांनीं लेख लिहिले आहेत.

(८०) गर्गे मास्तर (दिवाकर) यांनीं नाट्यछटा नांवाचा वाङ्मय लेखनाचा एक अगदीं नवा प्रकार केसरींत सुमारें वीस वर्षांपूर्वी सुरू केला. कित्येकांना नाट्य विषयाचें वावडें असल्यामुळें प्रथम तो अप्रिय वाटला. पण आतां त्याचा सर्रास उपयोग होऊं लागला आहे.

(८१) श्री. म. माटे—साताऱ्याचे रहिवासी. एम. ए.ची पदवी घेण्याच्या आधीं व नंतरहि पुणें येथील शिक्षणसंस्थांतून शिक्षकाचें काम करीत आले आहेत. तथापि सामाजिक विषयांची त्यांना विशेष आवड असल्यामुळें त्या विषयांचा व त्यांतल्या त्यांत अस्पृश्योद्धार, हीन जातींची उन्नति या विषयांवर त्यांनीं फार सूक्ष्म व खोल अभ्यास केला आहे. गेल्या आठ-दहा वर्षांत त्यांनीं केसरींत पुष्कळच लेख लिहिले आहेत. त्यांची भाषा चटकदार असून त्यांत शब्दांचें नाविन्य पुष्कळच आढळतें. तसेंच त्यांची विवेचनपद्धति साधार व मुद्देसूद असून अस्पृश्य वर्गासंबंधीं जितकी सहानुभूति तितकाच या वर्गाचा हितशत्रूंना सडतर विरोध त्यांच्या लेखांत दिसून येतो.

(८३) बॅ. वि. दा. सावरकर—यांचें नांव व चरित्र प्रसिद्धच आहे. स्वदेशी चळवळींत ते बहिष्कार वादी व राष्ट्रीय चळवळींत पूर्ण स्वातंत्र्यवादी असल्यामुळें त्यांचा ओढा केसरीपेक्षां काळ पत्राकडे अधिक होता. जॅकसनच्या खुनाच्या प्रकरणीं त्यांना काळेपाण्याची शिक्षा झाली. ती कांहीं वर्षे भोगून परत हिंदुस्थानांत नजर कैदेंत राहिल्यावर त्यांनीं अंदमान बेटांतील आपले अनुभव केसरींत अनेक लेखांतून लिहिले होते. हिंदुसंघटन, शुद्धीकरण व अस्पृश्यता निवारण हे त्यांचे आवडते विषय असून त्यांची भाषा अत्यंत स्फूर्तिजनक, ओजस्वी, व चटकदार असून कोणतीहि कल्पना व्यक्त करण्याला योग्य असे शब्द निर्माण करण्याची त्यांची हातोटी प्रसिद्ध आहे.

(८४) श्री. रामचंद्र नारायण मंडलीक, बी. ए., जन्म—ता. १ जुलई सन १८८१. यांचा व केसरीचा ऋणानुबंध वडलोपार्जित आहे. राजकारणासंबंधीं कांहीं कांहीं यांविषयांवर त्यांनीं केसरींत लेख लिहिले आहेत. व 'कुलाबा समाचार' हें पत्र त्यांचें घरचें स्वतःचें असल्यामुळें त्यांच्या पत्रांच्या द्वारें केसरीच्या मतांचा प्रसार त्यांजकडून होतो. त्यांनीं विवेकानंदाच्या लेखांचें व व्याख्यानांचें मराठी रूपांतर केलेलें आहे.

(८५) श्री. गोपाळ अनंत ओगले—संपादक, 'महाराष्ट्र' नागपूर. स्वदेशी चळवळीचे वेळीं हे पुण्यांत होते. त्या वेळीं त्यांनीं केसरीची थोडीबहुत सेवा केली. पुढें लवकरच ते नागपुराकडे जाऊन त्यांनीं महाराष्ट्र हें सुप्रसिद्ध वर्तमानपत्र काढलें. अलीकडे श्री. ओगले यांचे लेख कधीं केसरींत आलेले नाहींत; तरी केसरी महाराष्ट्राला आपला धाकटा भाऊ व महाराष्ट्र केसरीला वडील भाऊ असें प्रेमानें व अभिमानानें मानतात.

(८६) रामकृष्ण दत्तात्रय पराडकर हल्लीं वसती किन्हई (सं. औंध). यांनीं सन १९०५-६ मध्यें व सन १९१०-११ मध्यें केसरींत कांहीं लेख लिहिले. त्यांचे विषय मुख्यतः मोरोपंत व त्यांची कविता व इतिहास संशोधन व औद्योगिक प्रगति हे होते. पुणें येथील मराठी ग्रंथालय त्यांनीं मूळ काढलें व लोकसंग्रह छापखाना बरेच दिवस चालविला.

(८७) श्री. गजानन त्रिंबक माडखोलकर—जन्म ता. २८ डिसेंबर सन१९००. हल्लीं उपसंपादक, महाराष्ट्र, नागपूर. यांनीं प्रथम १९२० सालीं आयर्लंडांतील सिनफेन चळवळीला उद्देशून केसरींत लेख लिहिले. पुढील वर्षी ते पुण्यास असतां त्यांनीं परीक्षणात्मक असे कित्येक लेख केसरींत लिहिले आहेत. शिवाय एरवींहि कांहीं त्रुटित मजकूर लिहिलेला आहे. आधुनिक कवी पंचक, श्री. विष्णु कृष्ण चिपळुणकर, व विलापिका हीं त्यांची तीन वाङ्मयावरील पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

(८८) गोविंद कृष्ण टिळक—जन्म ता. २३ एप्रिल सन १८६६. हल्लीं वकील बार्शी हे राष्ट्रीय पक्षाचे पुरे अभिमानी, व केसरीचे चहाते असून सामाजिक स्थिति, कै. रा. रानडे यांचे बुद्धिवैभव इत्यादि लेख त्यांनी केसरींत लिहिले. वैद्य बापूसाहेब मेहेंदळे, महाराज प्रतापसिंह वगैरे विषयांवर त्यांनीं लहानसे ग्रंथ लिहिलेले आहेत.

(८९) कै. नारायण चिंतामण केळकर बी. ए.—हे मूळ कोंकणचे रहिवासी. बी.ए. झाल्यावर त्यांनीं सरकारी शाळाखात्यांत नोकरी धरली. १९०२-४ या सालीं ते मुंबई येथें निघणाऱ्या निर्णयसागर प्रेसच्या 'काव्यसंग्रह' मासिक पुस्तकाचे संपादक होते. त्यांनीं मराठी कविचरित्रें व महाभारतांतील कांहीं पर्वांवरील मराठी कवितांच्या संशोधनासंबंधानें केसरींत लेख लिहिले होते.

(९२) विठ्ठल रामजी शिंदे बी. ए.—जन्म ता. २३ एप्रिल १८७३. यांचें समग्र चरित्र नुकतेंच प्रसिद्ध झालें असून, ता.१ नोव्हेंबर१९३० च्या केसरीचे अंकांत त्यांचे परीक्षण आलें होतें. विलायतेस जाऊन धर्मशिक्षण तुलनात्मक दृष्टीनें शिकून परत आल्यावर त्यांनीं पुष्कळ वर्षेपर्यंत अस्पृश्योद्धाराचें कार्य परिश्रमपूर्वक केलें. हल्लीं ते हेंच कार्य स्वतंत्र रीतीनें करीत असतात. शेतकऱ्यांच्या चळवळींतहि त्यांनीं अलीकडे २-३ वर्षे पुढारीपणानें भाग घेतला असून, जंगल-सत्याग्रहाच्या चळवळींत त्यांना तुरुंगवास प्राप्त झाला होता. धर्मपर लेख व व्याख्यानें, बहिष्कृत भारतावरील लेख, भागवत धर्माचा विकास, अस्पृश्यता निवारणाचा इतिहास, राधामाधव विलासचंपूसंबंधानें राजवाड्यांच्या लेखावर व यदुनाथ सरकार यांच्या मराठ्यांच्या इतिहासावर टीका, ब्रह्मदेशांतील अस्पृश्य वर्गासंबंधीं संशोधनात्मक लेख, कानडी मराठीचा संबंध, महाराष्ट्र विद्यापीठ, कोंकणी मराठीचा संबंध, मद्यपान, गुन्हेगार जाती, मुरळ्या, सक्तीचें शिक्षण, शिमग्यांतील अनिष्ट प्रकार, शब्दव्युत्पत्ति, मानवजातीशास्त्र इ० विषयांवर त्यांचे ग्रंथ व लेख अनेक पत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत. व यापैकीं कित्येक लेख केसरींत छापलेले आहेत. हे केसरीच्या राष्ट्रीय वृत्तीचे चहाते व हितचिंतक व विद्यार्थीदशेपासून वाचक आहेत. त्यांना हल्लींच्या चळवळींत ६ महिने तुरुंगवास प्राप्त झाला होता.

(९३) महादेव मल्हार जोशी—हे कोंकणचे रहिवासी. एम्. ए. ची पदवी घेतल्यावर ते जुनागड येथें संस्कृत शिक्षकाचे काम करूं लागले व त्या जागेवर असतांना ते मरण पावले. जोशी हे अत्यंत बहुश्रुत व मार्मिक असे वक्ते व लेखक असत. केसरींत त्यांनीं तत्त्वज्ञान विषयावर लहानच पण चटकदार लेखमाला लिहिली होती. नवी संस्कृति लाभली असतांहि जुन्याचा अभिमान ठेऊन उभय संस्कृतींचा मेळ चटकदार भाषेनें घालण्याची त्यांची हातोटी या लेखमालेंत चांगली दिसून आली.

(९४) मुकुंद शास्त्री मिरजकर—जन्म ता. ४ एप्रिल सन १८८२. हल्लीं शिक्षक नूतन मराठी विद्यालय, पुणें. सन १९११ पासून संस्कृत व मराठी भाषेंतील त्यांच्या लहान लहान कविता केसरींतून येत असतात. श्रीमत् भागवत, कर्मयोग, मानवधर्मसार सुभाषित वगैरे विषयांवर त्यांनीं ग्रंथ लिहिले आहेत.

(९५) महादेवशास्त्री दिवेकर—जन्म माघ शु० ५ शके १८५० समर्थ विद्यालय व प्राज्ञ पाठशाळा येथील पूर्वीचे शिक्षक. हल्लीं प्रचारक व हिंदुसभा प्रवचनकार. यांनीं केसरींत हिंदु धर्मशास्त्र, समाजशास्त्र, पोटजातींचें संघटन, धर्म भ्रष्टांचें शुद्धिकरण, त्रैवर्णिकांचें आस्तित्व, अस्पृश्योद्धार, विधवा धर्म, आर्य संस्कृति या विषयांवर लेख लिहिले आहेत. व यापैकीं दोन तीन विषयांवर स्वतंत्र ग्रंथहि लिहिले आहेत.

(९६) नाना नागपूरकर—कोल्हापूरचे रहिवासी. ते शेतकी कॉलेजाचे उच्च पदवीधर आहेत. १९०८ च्या चळवळींत त्यांना तुरुंगवास सोसावा लागला होता. तरी पुढें डॉ. मॅन यांच्या कृपेनें त्यांचा अभ्यासक्रम पुरा झाला. हल्लीं युनियन एजन्सीकडे

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

परदेशी खतांच्या प्रसाराचें काम ते करीत असतात. शेत, शेतकी व शेतकरी यांची स्थिति सुधारणें, व विशेषतः ती ग्रामसुधारणेच्या द्वारें सुधारणें, हा त्यांचा आवडता अभ्यासाचा व अनुभवाचा विषय असल्यानें स्वतःच्या नांवानें किंवा नांव न घालतां त्यांनीं अनेक लेख लिहिले आहेत. त्यांच्या लेखांत जशी उत्कृष्ट भावना दिसते तशाच प्रत्यक्ष विधायक सूचनाहि पुष्कळ असतात.

(९७) जगन्नाथ रघुनाथ अजगांवकर—जन्म सन १८७९, १९०० ते १९१२ या दरम्यान त्यांचे केसरींत १०।१५ लेख प्रसिद्ध झाले. त्यांपैकीं 'ज्ञानेश्वरीचा कर्ता व आळंदीचा ज्ञानदेव हे एकच कीं दोन, या विषयावरील त्यांचे लेख, तसेंच मुक्तेश्वर कालनिर्णय ज्ञानेश्वरी व भागवत, जुने मराठी संत कवि व त्यांच्या अप्रसिद्ध कविता वगैरे विषयांवरील केसरींतील त्यांचे लेख वाचनीय होते.

(१००) गणेश सदाशिव भराठे, एम्. ए. ॲक्चुअरी—जन्म ता. १ ऑगस्ट १८८२. ॲक्चुअरी या नात्यानें हिंदुस्थानातील अनेक विमा कंपन्यांचे सल्लामसलतीचे काम हे करतात. राष्ट्रीयपक्षाच्या राजकारणाची आवड, राष्ट्रीय शाळा काढण्याचे प्रयत्न, मद्यपान निषेधाची चळवळ इ. गोष्टींत व्यक्तिशः टिळकांशीं व लेखक म्हणून केसरी पत्राशीं यांचा संबंध १९०६ सालापासून आला. केसरींत १९११ सालीं कविता, १९१२।१३ सालीं विलायतविहार या विषयांवर विलायतेहून लिहिलेलीं वर्णनात्मक पत्रें, १९२८ सालीं व त्यानंतर विमा कंपन्यांचे एजंट, लोकांस कर्ज देणाऱ्या कित्येक संस्था, सोडतीच्या कंपन्या, थिऑसफी वगैरे विषयांवर त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

(१०१ ते १०९) कै. वि. का. राजवाडे, कै. वासुदेवशास्त्री खरे, कै. का. ना. साने, कै. दि. ब. मावे, कै. द. ब. पारसनीस, गो. स. सरदेसाई, द. वि. आपटे, गो. का. चांदोरकर, कै. पा. न. पटवर्धन, ही सर्व मंडळी इतिहास संशोधक म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. यांनीं केसरींत मधून मधून ऐतिहासिक विषयांवर लेख व टिपणें लिहिलीं आहेत.

(१०७) दत्तात्रय विष्णू आपटे बी. ए. जन्म—ता. १३ मार्च सन १८८१. हल्लीं व्यवसाय व्यवस्थापक आनंदाश्रम. हे पहिल्या स्वदेशी चळवळीचे वेळीं वऱ्हाडांत होते. तेव्हां केसरीच्या द्वारें प्रगट होणाऱ्या मतांचा प्रसार त्यांनीं खेड्यांतून केसरी वाचून दाखवून मोठ्या उत्साहानें केला. कांहीं दिवस राष्ट्रमताच्या संपादक मंडळांत ते होते. तसेंच गोवें प्रांतांत फोंडा येथें 'अलमेद' कॉलेजमध्यें शिक्षक म्हणून त्यांनीं काम केलें. हे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक असून इतिहास मंजरी, श्रीरंग पट्टणची मोहीम वगैरे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. कित्येक प्रास्ताविक विषय, विशेषतः शिवजन्म तिथीचा निर्णयासंबंधीं त्यांचे लेख केसरींत प्रसिद्ध झाले व राजकीय विषयावर हल्लीं होत आहेत.

(११०) चिंतामण विनायक वैद्य, एम.ए., एल.एल. बी.—जन्म १८ आक्टोबर १८६१. ग्वालेरीस चीफ जजाचें काम सोडल्यावर सन १९०५ सालीं महाराष्ट्रांत वास्तव्य करण्यास ते आले. तेव्हांपासून आजवर वाङ्मयसेवा अखंड सुरू आहे. इतकी ग्रंथ-निर्मिति केलेला व अखंड व्यासंगी, विद्वान महाराष्ट्रांत हा एकच होय. यांचे ग्रंथ महाभारत, रामायण, संस्कृत वाङ्मय, मध्ययुगीन इतिहास, तात्पर्य बहुतेक वाङ्मयशाखांवर असून मुख्य भर संशोधन व इतिहास यांजवर आहे. केसरींत रा० वैद्य यांनीं अलीकडे अनेक विषयांवर प्रेषित व कांहीं विषयांवर (व्याकरण, जमिनीची मालकी, दरबारच्या देणग्या इ०) अग्रलेख लिहिलेले आहेत. पण केसरीच्या अगदीं पहिल्या अमदानींत व यांनीं लिहिलेली 'अवलोन्नति' ही सुप्रसिद्ध लेखमाला आली होती.

(१११) यादव माधव काळे बी. ए., एलएल. बी.—वऱ्हाडांतील वकील, नागपूर कायदेकौन्सिलचे एक वेळचे सभासद व अध्यक्ष. यांनीं वऱ्हाडचा इतिहास हा ग्रंथ व ऐतिहासिक विषयांवर टिपणें व लेख लिहिले आहेत.

(११२) दत्तो वामन पोतदार—जन्म श्रावण वद्य ५ शके १८१२. हल्लीं प्रोफेसर सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें. प्रथम १९०६–७ सालीं स्वदेशी मिठाईचीं दुकानें या विषयांवर त्यांनीं केसरींत पत्र लिहिलें. पुढें ग्रंथ हेच गुरु (१९१६), गरीब मराठी कवी (१९१२), कै. राजवाडे यांचें चरित्र, सरदेसाई, पोतदार प्रकरण, अंधळें गारूड, मोडी लिपी, नंदभाषा, आवटे यांची गाथा इ. विषयांवर त्यांनीं केसरींत वेळोवेळीं लेख लिहिले आहेत. मराठी गद्याचा इतिहास, श्री. केळकराच्या मराठे व इंग्रज या पुस्तकाचें परिक्षण, विद्यार्थ्यांना बोध वगैरे पुस्तकें लिहिलीं असून, कित्येक परिक्षणात्मक व इतर लेख मासिक पुस्तकांतून त्यांनीं लिहिले आहेत.

(११३) दाजी नागेश आपटे—बी. ए. एल.एल. बी. जन्म मार्च सन १८८८. हल्लीं हायकोर्ट वकील बडोदें. त्यांनीं १९०५ सालापासून केसरींत मधून मधून लेख लिहिले. त्यांत महाराष्ट्रधर्म, शिवाजीचा जन्मकाळ व चिंतामणराव वैद्यकृत संस्कृत वाङ्मयाचा इतिहास याचें परीक्षण, हे लेखमालेच्या स्वरूपाचें होते. त्यांनीं निरनिराळ्या मासिक पुस्तकांतून अनेक लेख व निबंध लिहिले असून, सुधारणा व प्रगति, हिंदू सुमेरी संस्कृति, इंद्रधनुष्य, मीराबाई, पार्लमेंटची घटना, तत्त्वज्ञांतील गूढ प्रश्न वगैरे निबंध किंवा पुस्तकें लिहिलीं आहेत.

(११६) दिनकर विनायक काळे, एम्. ए.—जन्म ता. २२ आक्टोबर १८९७. यांनीं प्रथम नवीन समर्थ विद्यालय तळेगांव येथें शिक्षकाचें काम केलें. हल्लीं शिवचरित्र कार्यालय, भारत इ. सं. मंडळ, रायगड स्मारक मंडळ व टि. म. विद्यालय इ. संस्थांत ते काम करीत असतात. त्यांनीं शिवभारताची महाराष्ट्रांत उपलब्धि, महाराजांचा राज्याभिषेक व शिवचरित्र कार्यालय इ. ऐतिहासिक विषयांवर केसरींत लेख लिहिले आहेत.

(११७) भास्कर विश्वनाथ घारपुरे—जन्म ता. १५ माहे ऑक्टोबर सन १८९३. हल्लीं क्युरेटर, रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें व सेक्रेटरी औद्योगिक प्रदर्शन पुणें. यांनीं देशी मालाच्या प्रदर्शनाचें काम अनेक वर्षें करून अनुभव घेतला आहे. व उद्योगधंदे, प्रदर्शनें, वस्तु संग्रहालयें वगैरे विषयांवर त्यांनीं केसरींत गेल्या चार-पांच वर्षांत अनेक लेख लिहिले आहेत. व लाहोर एक्झिबिशन् गाइड नावांचें पुस्तक त्यांनीं तयार केलें आहे.

(११८) रामचंद्र जनार्दन गोखले बी. ए.—जन्म ता. २१ डिसेंबर १८७५. हल्लीं शाळाखात्याचे पेन्शनर. यांनीं केसरींत पुरुषार्थांचें मूळ, फल ज्योतिष, युक्ताहार इत्यादि विषयांवर लेख लिहिले आहेत. तसेंच व्यायाम शास्त्र, आरोग्यदीप, भूगोल वर्णन, शिक्षण सुधारणा इ. विषयांवर त्यांनीं शालोपयोगी व समाजोपयोगी पुस्तकें लिहिलीं आहेत.

(११९ ते १२४) व्यं. बा. केतकर, रामचंद्र पांडुरंगशास्त्री मोघे, प्रि. गोविंद सदाशिव आपटे, मं. नाईक, के. एल. दप्तरी, रामचंद्र विनायक पटवर्धन, ही सर्व मंडळी ज्योतिषी असून फक्त रा. व्यंकटेश बापूजी केतकर यांच्याखेरीज बाकी सर्व नव्या पंचांगाचे प्रवर्तक व अभिमानी आहेत. रा० केतकर हे या पंचांगापुरते प्रतिपक्षी असले तरी त्यांना जुन्या पंचांगांतील दोष मान्य असून ते काढून टाकून त्यांच्या पध्दतीचे शुध्द पंचांग हवेंच आहे. पंचांग हा हिंदुधर्म शास्त्राच्या आचरणाचा पाया असून लो० टिळकांनीं केसरीद्वारें पंचांग शुद्धीला मदत केली हें प्रसिद्धच आहे.

(१२५ ते १३३) दादासाहेब करंदीकर, दाजीसाहेब खरे, गोपाळराव पटवर्धन, राघवय्या सॉलिसिटर, एस. एस. सेटलूर, बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा, सदाशिव रामचंद्र वखले, ल. ब. भोपटकर, केशवराव केळकर ही सर्व बॅरिस्टर, वकील मंडळी व्यक्तिशः लो० टिळक, केसरी–मराठा पत्रें व केसरी–मराठा संस्था यांच्या संबंधीं निरनिराळ्या वेळीं झालेल्या दिवाणी व फौजदारी खटल्यांत अत्यंत उपयोगी पडली. यांतील बहुतेकांनीं मदत केली ती पुष्कळशी निःस्वार्थी केली. म्हणून या ज्युबिली प्रसंगीं त्यांचें स्मरण ठेवणें अगत्याचें म्हणून त्यांचीं छायाचित्रें दिलीं आहेत.

(१३५) लक्ष्मण गणेशशास्त्री लेले—जन्म ता. १ नोव्हेंबर सन १८७२. हल्लीं प्रोफेसर सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें. कै. प्रो. वासुदेवराव केळकर हे केसरीचे संपादक असतां, त्यांचा कवितांच्या द्वारें केसरींत प्रथम प्रवेश झाला. पुढें पुण्यांतील कांहीं व्याख्यानांचे सारांश त्यांनीं केसरीकडे लिहून पाठविले. संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन या केसरींतील लेखमालेंत पुरवणीदाखल एक लेख त्यांनीं लिहिला आहे. वेदांतशास्त्र सभा, वैद्यकीय परीक्षा वगैरे विषयांवर त्यांनीं केसरींत लेख लिहिले आहेत. लो० टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ लिहिलेला एक श्लोक हा विशेष समर्पक वाटल्यावरून केसरीच्या मुखपृष्ठावर तो देण्यांत येत असतो. त्यांनीं वाङ्मय, काव्य इ. विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले ते प्रसिद्धच आहेत.

(१३७) गणेश रघुनाथ अभ्यंकर बी. ए. एल. एल. बी.—हल्लीं वकील सांगली व पुणें लॉ. कॉलेजमधील प्रोफेसर. हिंदी संस्थानचें राजकारण यां त्यांच्या आवडत्या विषयावर त्यांनीं आज पंचवीस वर्षें परिश्रम केले असून केसरी–मराठा या दोन्ही पत्रांत त्यांना या विषयांच्या अनेक अंगांसंबंधीं फार समर्पक लेख लिहिले आहेत.

(१३९) कै. अनंत वामन बर्वे—हे बिनधंदेवाईक नात्यानें नाट्यकलेचे अभिमानी असून त्यांनीं कित्येक नाटकें लिहिलीं आहेत. व केव्हां केव्हां यांनीं या विषयासंबंधीं केसरीशीं पत्रव्यवहारहि केला आहे.

(१४०) मोहनीराज शंकर मुळे एम्. ए. सी. बी एस.—जन्म ता. ६ जून सन १८९० हल्लीं औंध येथें प्रमुख रासायनिक संशोधक त्यांनीं अनेक प्रकारचे शास्त्रीय संशोधन केलेलें असून ते कित्येक औद्योगिक संस्थाचे सल्लागार आहेत. तसेच अनेक व्यापार विषयक स्वदेशी वस्तू त्यांनीं स्वतःच्या संशोधनानें बनविल्या आहेत. गूळ व साखर, जर्मनीचे रसायनिक धंदे, नैसर्गिक रंग व रंगकला, आगपेट्यांची कृति, हिंदी उद्योगधंद्यांची प्रगति, टोळ संहारक औषधें वगैरे विषयांवर त्यांनीं केसरींत निरनिराळे लेख लिहिले आहेत. या शिवाय अनेक मासिक पुस्तकांतून ते आपल्या आवडत्या विषयावर लेख लिहीत असतात.

(१४१) टी. रघुनाथ—हल्लीं वसती सांगली. यांना संशोधनाची हौस असून त्यांनीं केसरींत दोन तीन विषयांवर लेख लिहिले आहेत.

(१५२) कै. सरदार बाळासाहेब नातू—यांना सन १८९७–९८ सालीं तुरुंगवास प्राप्त झाला होता. ते स्वतः सरदार आहेत तरी मुलकी खात्यांत सरकारचे प्रतिपक्षी होते. राजकारणांत ते केसरीचे अनुयायी असून धर्मकारणांत ते प्रतिपक्षी होते.

(१५३) कै. शिवराम महादेव परांजपे—यांचें चरित्र सुप्रसिद्धच आहे. हे शिष्यावस्थेंत व पुढील सार्वजनिक आयुष्यांत लो० टिळकांचे शिष्य या नात्यानें वागत. जरी केसरीशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध फारसा आलेला नसला तरी पण १९१०–१२ च्या सुमारास त्यांनीं परिक्षणात्मक एक लेख केसरींत लिहिला होता.

(१५५) कै. ग. व्यं. जोशी—मिरजेकडील रहिवासी. बी. ए. झाल्यावर सरकारी शाळाखात्यांत ते शिरले, व पुण्यास हायस्कूलचे हे. मा. असतां त्यांनीं पेन्शन घेतलें. नोकरींत असतांहि व अर्थात् त्यानंतर सर्व जन्मभर त्यांनीं विद्या व्यासंग ठेवला. अर्थशास्त्रांतर्गत अनेक विषय त्यांना करतलामलकवत् असत. पुण्यास कायमचे राहिल्यावर ते मराठा पत्रांत मधून मधून लेख लिहीत. ते आंकडेशास्त्रांत प्रवीण असून सरकारी रिपोर्टांतली माहिती आधारास्तव घेऊनच ते सरकावर बाजू बेमालूम परतवीत.

(१६०) डॉ. नरहर शिवराम परांजपे— जन्म ता. २१ फेब्रुवारी सन १८७४. हल्लीं हिंदी ग्रामपंचायत वर्धनाचे मुख्य प्रचारक हे तपस्वी वृत्तीचे राष्ट्रीय पक्षाचे वऱ्हाडांतील एक नामांकित पुढारी असून त्यांचा ऋणानुबंध केसरीशीं सन १९०७ मधील सुरतेच्या राष्ट्रीय संमेलनापासून झाला. सर्वस्वीं स्वार्थत्याग करून राष्ट्रीयचळवळीकरितां बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांचें एक उदाहरण म्हणजे श्री.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

बाबासाहेब परांजपे हे होत. त्यांनीं मद्रास, कलकत्ता, नागपूर वगैरे ठिकाणीं परिश्रमपूर्वक ग्रामपंचायतीचा प्रसार केला. त्यांनीं केसरींत प्रत्यक्ष लेख असे फारसे लिहिलेले नसले तरी केसरींत ग्रामसंघटनेच्या विषयावरील लेखांतील कांहीं कल्पना व थोडी बहुत स्फूर्ति यांचें श्रेय त्यांनाच दिलें पाहिजे.

(१६५) गोपाळ रावजी गोगटे—बी. ए. एल. एल. बी. जन्म ता. २१ फेब्रुवारी १८७२. हल्लीं वकील भुसावळ हे लो. टिळकांचे हाताखालीं कांहीं दिवस केसरी व मराठ्याकरितां लेखकाचें काम निरपेक्ष बुद्धीनें करीत असत. पुढें १८९७ पासून खानदेशाकडील वातमीपत्रें केसरीकडे मधून मधून पाठवीत.

(१६८) विनायक वळवंत चौकर जन्म—ता. २५ ऑगस्ट सन १८५५ हल्लीं मुक्काम. जुने वकील, अहमदनगर. लो० टिळक, कै. वामन शिवराम आपटे यांचे सहाध्यायी व केसरीचे जुन्या पिढींतील ऋणानुबंधी.

(१७१) डॉ० काशिनाथ वापूजी पाठक बी. ए.—जन्म आश्विन शु. ८ शके १७७२. हल्लीं पेन्शनर. सन १८७७ सालीं हे व लो० टिळक डेक्कन कॉलेजांत बी. ए. मध्यें एकाच वर्गांत होते. सन १८९३ सालीं यांनीं केसरीमध्यें 'श्रीमत शंकराचार्यांचा काल निर्णय' या विषयांवर अग्रलेख लिहिले आहेत. त्याचप्रमाणें यांनीं मराठ्यांतहि निरनिराळ्या विषयांवर लेख लिहिलेले असून निरनिराळ्या इंग्रजी व मराठी मासिकांतूनहि त्यांचे पुष्कळ लेख प्रसिद्ध झाले आहेत. हे केसरीचे प्रथमपासून वाचक असून यांचा व लो० टिळकांचा शेवटपर्यंत अत्यंत स्नेह होता.

(१७५) कै० श्रीपती रघुनाथ भिंगारकर—यांचे चरित्र केळकरकृत टिळक चरित्र खंड २, यांत वाचावयास मिळेल. त्यांनीं ज्ञानेश्वर 'एक कीं दोन' या विषयांवर संशोधनात्मक असे सुंदर लेख लिहिले आहेत.

(१७७) विनायक पांडुरंग करमरकर—जन्म भाद्रपद वद्य आमावास्या शके १८१३. सुप्रसिद्ध शिल्पकार व मूर्तिकार यांचें नांव आतां महाराष्ट्रांत प्रसिद्धच आहे. त्यांनीं आधुनिक चित्रकलेवर केसरींत कांहीं लेख १९२५ सालीं लिहिले आहेत. शिवाय इतर एक-दोन मासिकांतहि त्यांनीं चित्रकार, स्मारकें व स्मारक कमिट्या, जुन्या नव्या चित्रकलेतील फरक इत्यादि विषयांवर लेख लिहिले आहेत.

(१७८) दत्तात्रय केशव केळकर, बी. ए.—जन्म तारीख ४–३–१८९५. धंदा शिक्षक, मुक्काम पांचगणी. केसरींतील लेख—'शिक्षणाचा राष्ट्रीय दृष्ट्या विचार' ही लेखमाला—१९२४, 'महाराष्ट्रकाव्य व ज्ञानकोश'–१९२५, 'मराठीचा सासुरवास' आणि 'अनुच्चारित अनुस्वारांची अडगळ'—१९२६, 'धर्मरहस्यविचार' लेखमाला—१९२७, 'रसतत्व व भक्तिरस' लेखमाला—१९३०. ग्रंथ—'काव्यालोचन' नांवाचा काव्यशास्त्रविषयक ग्रंथ छापून तयार असून लवकरच प्रसिद्ध होईल.

(१८०) प्रो. पांडुरंग सदाशिव खानखोजे जन्मः— ता. २७ डिसेंबर सन १८८४. हे नागपूर प्रांताचे रहिवासी परदेशांत जाऊन विद्यासंपादन करण्याची अत्यंत हौस असल्यामुळें ते अमेरिकेस गेले. व स्वावलंबनाच्या तत्त्वावर तेथें त्यांनीं विद्यार्जन केलें. व १९११ सालीं त्यांनीं बी. एस्. सी. ची पदवी घेतली. शास्त्रीय विषयाबरोबरच त्यांनीं शेतकीच्या विषयांचेंहि अध्ययन केलें. व १९१३ सालीं वॉशिंग्टन युनिव्हर्सिटींत त्यांनीं एम. एस. सी. ची पदवी घेतली. त्यांनीं कांहीं लष्करी शिक्षणहि संपादन केलें. अमेरिकेंत इंडिया असोसिएशन स्थापण्याचें कामीं त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले. महायुद्धाचें काळीं त्यांना इकडे येण्यास बंदी करण्यांत आली. हल्लीं ते मेक्सिको येथील राष्ट्रीय कृषी महाविद्यालयांत प्रोफेसर आहेत. त्यांना इकडे हद्दपारी असल्यामुळें त्यांच्या ज्ञानाचा फायदा दुर्दैवानें हिंदुस्थानाला मिळूं शकत नाहीं. केसरींतील त्यांच्या लेखावरून किसेक विद्यार्थ्यांना अमेरिकेंत जाण्याची स्फूर्ति झाली आहे.

(१८६) विष्णुबोवा गुंडरे—हे आर्यभूषण छापखान्यांत 'केसरी' निघत असल्यावेळीं फार वर्षें मुख्य मराठी कंपॉझिटरचें काम करीत होते.

(१८७) दत्तोपंत खडसरे—हे आर्यभूषण छापखान्यांत मराठा निघत असल्यावेळीं फार वर्षें मुख्य इंग्रजी कंपॉझिटरचें काम करीत होते.

(१८८) विठ्ठल बाबुराव वागवे—यांच्याकडे हल्लीं मुंबईस व आसपास केसरी वाटण्याची एजन्सी दिली आहे. त्यांच्याकडे इतकीं वर्तमानपत्रें वाटण्याचें काम आहे कीं, त्यांना 'एजंट जनरल' म्हणण्यास हरकत नाहीं.

याशिवाय इतर गृहस्थांचा संबंध केसरीशीं लेखक या नात्यानें आलेला नसला तरी ते केसरीचे परम ऋणानुबंधी होत. अशा ऋणानुबंधी लोकांची सहानुभूति व कार्य प्रसंगानें त्यांजकडून होणारें साहाय्य हा केसरीनें आपला एक आधार मानलेला आहे.

श्रीशिवचरित्र- **स्वीयग्रंथमाला** कार्यालय, पुणें

१ व २ शिवकालीन–पत्रसार–संग्रह खं. १ व २ (कापडी) किं. ७ रु.
३ शिवचरित्र निबंधावली (साधी) ३॥ रु. (कापडी) ३॥। रु.
४ व ५ शिवाजी निबंधावली, खं. १ व २ (साधी) ७ रु. (कापडी) ७॥ रु.

—पुढें प्रसिद्ध होणार—

६ English Records on Shivaji (६ मार्च १९३१)
७ शिवकालीन वृत्त–सारसंग्रह

शिवचरित्र साहित्य, पत्र, फारसी संग्रह (यथामूल व मराठी सारांश)
आगाऊ ग्राहकांस शेंकडा १६ टक्के सवलत.

३१२, सदाशिव, पुणें २. | चिटणीस.

केसरी संबंधीं कांहीं आठवणी

प्रस्तुतच्या ज्युबिली अंकांत आम्ही बाहेरून कोणाचे लेख किंवा संदेश मागितले नाहींत. जागा थोडी व ती घरच्या घरींच भरून जाईल असा अदमास होता आणि तसेंच घडलेंहि. शिवाय बाहेरील मजकुराकरितां किती थांबावें लागतें याचा नियम नसतो, व आपल्या सोयीकरितां लोकांस तगादा करणें बरें वाटत नाहीं. जितक्या व्यापक क्षेत्रांतून मजकूर यावासा वाटतो तितका वेळेवर न आल्यास मजकुराची प्रमाणबद्धता राहात नाहीं. तथापि रा. बापट यांनीं लोकमान्यांच्या आठवणींचे जे खंड प्रसिद्ध केले, त्यांत केवळ केसरी–मराठा पत्रासंबंधाच्या अशा कांहीं आठवणी आहेत. त्यापैकीं कांहीं या अंकाला उपयोगी म्हणून निवडून घेतल्या आहेत. रा. बापट यांनीं या खंडांचें साहित्य जुळविण्याचें कामी कमींत कमी चारपांच वर्षें किती अविश्रांत श्रम केले याची आम्हांला प्रत्यक्ष माहिती आहे, व या ग्रंथांच्या प्रस्तावनांतून रा. बापट यांनीं त्याची सविस्तर माहिती दिली आहे तिजवरून पाहतां टिळकांच्या संबंधाच्या त्यांतूनहि केसरी–मराठा संबंधाच्या आठवणी, हल्लींसारख्या विशेष महत्त्वाच्या प्रसंगींहि, आम्हीं जाहीर रीतीनें किंवा खाजगी पत्रें लिहून मागितल्या असत्या तरी, तो प्रयत्न विशेष फलद्रूप झाला असता असें वाटत नाहीं. तथापि ज्युबिली अंक ही केसरी–मराठा संस्थेसंबंधींच्या माहितीची एक प्रकारची झोळी असें समजून, तींत रा. बापट यांच्या ग्रंथांतील केसरीसंबंधीं ज्या आठवणी दिसल्या त्यांतल्या कांहीं येथें दिल्या आहेत. बापटांच्या परिश्रम मंथनानें निघालेल्या या लोण्याचा, त्यांच्या परवानगीनें, आयताच घास घ्यावयास मिळाला याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहों. या पुस्तकांत नव्हत्या अशाहि ज्या दोन तीन आठवणी घातल्या आहेत त्या आमचेकडे आलेल्या पत्रांतून घेतल्या आहेत.

केसरीचा पहिला अंक

(१) केसरीच्या जन्माचे पूर्वी टिळक–पंचायतनाशीं परिचित असलेले रा. वळवंत गणेश दाभोळकर यांजकडे मी परवां गेलों असतां त्यांनीं सांगितलेल्या कांहीं गोष्टी पुढें देत आहे—रा. दाभोळकर हे केसरी निघण्याचे आधीं कै. विष्णुशास्त्री यांचेकडे नोकर या नात्यानें असून, ते त्यांची प्रुफें वगैरे पाहण्याचें काम करीत असत. पुढें केसरी-मराठा काढण्याचें ठरल्यावर त्यांची त्या कामाकडे योजना करण्यांत आली. रा. दाभोळकर सांगतात.(१) केसरीचा व मराठ्याचा पहिला अंक पुण्यांतील लोक निजून उठण्याचे आंत वर्गणीदारांचे घरीं जाऊन पडला पाहिजे म्हणून, माधवराव नामजोशी, गणेश मोरेश्वर सोहोनी (मॅनेजर), त्र्यंबकराव कुळकर्णी (न्यू स्कूलचे पहिले कारकून) मी व स्वतः टिळक यांनीं मोठ्या पहाटे उठून, अंकांचें ओझें वागवून, कोणाच्या खिडकींतून तर कोणाचे दरवाज्याच्या फटींतून तो आंत टाकून, सर्व अंक वांटलेले आहेत! (२) पहिल्यापासूनच टिळकांची गति सर्व विषयांत चाले. केसरी प्रथम दोनतीन वर्षें घुबडी प्रेसवर (त्या हँडप्रेसवर घुबडाचें चित्र असल्यामुळें त्यास घुबडी प्रेस असें नांव पडलें होतें) काढून, पुढें वर्गणीदार एकसारखे जोरानें वाढत चालल्यामुळें त्या करितां विलायतेहून एक नवीन यंत्र आणिलें. पण पुण्यांत तें बसविणार कोण! अखेर टिळकांनींच तें बसविलें! यामुळें त्यांचे हात, पाय, सर्व आंग व कपडे सदैव काळे झालेले असत. म्हणून त्यांचे सहकारी त्यांस थट्टेनें "हे आमचे प्रेसमन आहेत" असें म्हणत! (३) शास्त्रीबुवा जो मजकूर लिहून छापण्यास देत तो वेलांटी, काना, मात्रा, अनुस्वार, विरामचिन्ह यांतहि बिलकुल खोडाखोड न करतां–अगदीं छापील अक्षराप्रमाणें नेहमीं लिहून देत. ही त्यांची शक्ति अगदीं अपूर्व असे. अगदीं याचे उलट आगरकरांची 'कॉपी' आली म्हणजे त्यांत ब्रह्मांड सांडलेलें व सर्व गिचमीड झालेलें असावयाचें. शास्त्रीबुवा व आगरकर या दोन टोकांचा मध्यबिंदु म्हणजे टिळकांच्या लिहिण्याचा मासला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

केसरीकरितां सक्तमजूरी

(२) वसंतऋतु येतांच वृक्ष जसे नवपल्लवित होतात किंवा मृग नक्षत्र सुरू होतांच पर्जन्याची जशी झोड उठते, तद्वत् लोकमान्य मंडालेहून सुटून येतांच केसरी सुरू करण्याबद्दल रोजचे रोज केसरी कचेरींत पत्रांचा पाऊस पडूं लागला. मॅनेजर बाबासाहेब विद्वांस यांस इतके सर्व पत्ते लिहून केसरी तातडतोब विनचूक रवाना करण्याची मोठी पंचाईत पडूं लागली. म्हणून त्यांनीं निव्वळ या कामाकरितां एकदोन माणसें मुद्दाम नेमून त्यांजकडून सायक्लोस्टाइलवरून पत्ते लिहून घेण्याचें ठरविलें. पहिले दिवशीं सदर मंडळींस सायक्लोस्टाईलवरील लिहिणें जमेना. ते लिहिण्याचे त्यांचे कसे तरी प्रयत्न चालले असतां लोकमान्य तेथें सहज आले. अज्ञानानें ती मंडळी तें लिहिण्याचा कांहीं तरी उद्योग करीत आहेत हें पाहून लोकमान्य हंसत त्यांस 'साधी गोष्ट, पण ती माहीत नाहीं म्हणून किल्लीवांचून जसें कुलुप उघडणें, त्याप्रमाणेंच हे तुमचे उद्योग होत', असें म्हणत त्यांनीं तेथेंच बैठक मारून त्या कारकून मंडळींस समजावून देण्याकरितां, वॅक्सपेपरवर पराणीप्रमाणें असलेल्या लोखंडी लेखणीनें एक शीट पत्ते त्यांनीं लिहून काढले, व म्हणाले 'हे एवढेसे पत्तेच काय पण केसरीच्या सुरुवातीस कारकुनाचें व छापखान्याबद्दलचेंहि काम आम्हीच करीत होतों. एका बैठकीस हजार हजार पत्ते मीं लिहिले आहेत!'

ज्ञानप्रकाशचे लेखक टिळक!

(३) एकदां दैनिक ज्ञानप्रकाशाचे अगदीं आरंभीं असा एक प्रसंग आला कीं, कांहीं आपत्तीमुळें जागेवर एकहि संपादक उभा नसल्यानें, व मॅनेजर हरिपंत गोखले व लोकमान्य यांचा जुना संबंध असल्यामुळें, ते लोकमान्यांकडे येऊन त्यांस सर्व हकीकत सांगून मजकूर मागूं लागले. योगायोग असा कीं, त्याच वेळीं केसरी–ज्ञानप्रकाशाचा कांहीं एका बाबतींत जोराचा वाद चालू होता. पण

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

अशा वेळीं लोकमान्यांनीं एक पळाचाहि विचार न करतां, व पूर्वी अशाच एका अत्यंत विकट प्रसंगीं ऐनखिंडींत हरिपंतांनीं लोकमान्यांस दगा दिला असतांहि हें सर्व विसरून, 'लेख लिहून देतों,' असें त्यांस सांगितलें, व सर्वांत मोठी मौज ही कीं, प्रत्यक्ष त्या चालू वादावरच व केसरीवरहि हल्ला करून, खुद्द ज्ञानप्रकाशचा एडिटरहि लिहूं शकणार नाहीं असा त्यांच्या बाजूनें त्यांनीं एक उत्कृष्ट लेख त्यांस लिहून दिला!

टपाल व्यवस्था

(४) १८८४ सालापर्यंत केसरीच्या परगांवच्या वर्गणीदारांचे पत्ते फारसे छापलेले नसत. त्यामुळें दर आठवड्यास कागदांच्या स्लिपा काढून त्यांवर पत्ते लिहिण्याचा एक मोठा कारखानाच झाला होता. हे पत्ते टिळक, वासुदेवराव केळकर, व मी मिळून लिहीत असूं. पत्ते लिहिण्याची रोजची संथा असल्यामुळें केसरीच्या परगांवच्या वर्गणीदारांचे पत्ते मला बहुतेक तोंडपाठच झाले होते. ह्या वेळीं सहजच एक सुधारणा घडून आली. पोस्टाच्या सॉर्टिंगला त्रास पडूं लागल्यामुळें, पोस्टखात्यानें आपला एक अधिकारी पाठवून असुक गांवचे अंक, अमुक लाइनीनें पाठवावयाचे ह्याची माहिती दिली. व निरनिराळ्या लाइनींचे पत्ते निरनिराळ्या रंगाचे कागदांवर छापवून घेतले. उदाहरणार्थ हिरवा रंग बडोदा लाईन; पिवळा रंग सोलापूर—मोंगलाई; ब्राऊन पेपर सातारा लाईन; इ० इ० दुसरी एक बारीकशी सुधारणा म्हणजे केसरीच्या गळ्यांत दोऱ्याचें जानवें अडकवून, त्यांवर पत्त्याची छापील चिठ्ठी मारण्याची ही युक्ति ग. मो. सोवनी म्यानेजर ह्यांची. वरील दोन्ही सुधारणामुळें केसरीच्या टपालाचें काम फार सुखकर झालें.

शाळा मास्तरानें केसरी वाचावा

(५) गीतारहस्याची किंमत किती ठेवावी या संबंधानें महर्षि आण्णासाहेब पटवर्धन व लो. टिळक यांचेमध्यें वादविवाद चालू असतां, केसरी सुरू झाला त्या वेळीं केसरीची किंमत किती ठेवावी या संबंधानें कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर व टिळक यांचेमध्यें झालेला संवाद सांगण्यांत आला तो खालीं दिला आहे.—

लो. टि.:—अण्णासाहेब! या सर्व गोष्टींचा मी विचार केला आहे. तरी पण आपल्या प्रेमळ सूचनेबद्दल मी आपला फार आभारी आहे. या वेळीं मला एका प्रसंगाची आठवण होते. तो प्रसंग म्हणजे १८८० सालीं केसरी सुरू करण्याचे वेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे घरीं आम्ही बसलों असतां केसरीची वर्गणी काय ठेवावी हा वाद निघाला! शास्त्रीबुवा व मी एका मताचे होतों. त्या वेळीं वर्तमान-पत्राचे धंद्यांत क्रांति होण्यासारखी आम्ही केसरीची वर्गणी एक रुपया ठेवावी असें ठरविलें. खेडेगांवच्या शाळेंतील पंतोजीलाहि आमचें पत्र घेतां यावें ही जशी त्या वेळची इच्छा, तशीच अगदीं साधारण प्रतीच्या मनुष्यालाही आमचा 'गीता-ग्रंथ' वाचावयास मिळावा अशीच इच्छा हल्लींहि आहे. —स. वि. बापट

गरजेला धावून आलेला मित्र

(६) इ. सन १८८९ सालीं केसरीपत्राशीं माझा नोकर (कंपॉझिटर) नात्यानें संबंध जडला. त्या वेळीं आर्यभूषण छापखान्याची मालकी कै. वासुदेव बाळकृष्ण केळकर यांजकडे व केसरीपत्राची मालकी कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांजकडे होती. परंतु पुढें ऐन प्लेगच्या कहरांत केसरीच्या लेखावरून लो. टिळक यांजवर सरकारी तोहमत आली तेव्हां ऐनप्रसंगीं व्यवस्थापक हरि नारायण गोखले यांनीं केसरी छापून देण्याचें नाकारलें. तेव्हां मी माझ्या कारखान्यांतील कामदारासह शक्य ती खटपट करून रातोरात मेहनत घेऊन मंगळवारीं सकाळीं केसरी प्रसिद्ध केला. त्याचप्रमाणें संबंध प्लेगांत वेळेवेळीं केसरी वेळेवर काढण्यांत येत असे.

(७) लो० टिळक यांजवर क्रि. प्रो. कोड कलम १०८ प्रमाणें सरकारी खटला झाला. त्यांत दहा दहा हजारांचे दोन जामीन व वीस हजारांचा जात-मुचलका घ्यावा असा निकाल होणार हें भविष्य त्यांनीं आगाऊच केलें होतें. लोकमान्यांनीं मला कलेक्टर कचेरींत हजर रहा असा निरोप पाठविला. त्याप्रमाणें मी गेलों. एक वाजतां कलेक्टरसाहेब आले. लागलाच निकाल दिला. कोण-जामीन म्हणून लोकमान्यास विचारलें. त्यांनीं माझें नांव सांगितलें कलेक्टरांनीं जामीनकीच्या इंग्रजी फार्मवर सही करण्यास सांगितलें. मी सही केली. तो फार्म लोकमान्यांनीं हातांत घेऊन पाहिला, आणि कलेक्टरास म्हणाले, "त्यांना इंग्रजी येत नाहीं, करितां मराठी फार्म आणा, आणि त्यावर त्याची सही घ्या" ह्याप्रमाणें मराठी फार्म शिपायाकडून शोधून आणविला. त्यावर मी सही केली. हायकोर्टांत निकाल लागून माझा जामीनकतबा रद्द करण्यांत आला. —त्र्यंबक हरि आवटे

रांधनाना चाखू नये

(८) केसरीकरतां मजकूर ती० दादा नेहमीं सोमवारीं दुपारीं मोठ्यानें सांगत व कोणीतरी कारकून लिहीत असे. एखादे वेळेस आम्ही जवळच्या खोलींत ऐकत बसत असूं. त्या वेळेस ती. दादा आम्हाला थट्टेनें म्हणत 'स्वयंपाक करतां करतां त्याची चव घ्यायची नसते. केसरी छापून आल्यावर वाचा.' —सौ. पार्वतीबाई केतकर, नाशिक

विकार मीमांसा

(९) ग्लासगोहून परत येतांना स्वतःच्या केसरींतील लेखासंबंधानें ते म्हणाले, "केसरींतील लेख लिहित असतांना भाषासौंदर्याकडे मी फारसें लक्ष देत नाहीं. माझ्या अंतःकरणांत असलेले विचार जितक्या सोप्या भाषेंत कळवितां येतील तितके कळवि-ण्याचा मी प्रयत्न करीत असतों. अंतःकरणांत घोळत असलेले विचार सहज बाहेर पडलेल्या भाषेनें लोकांच्या समोर ठेवल्यानें त्यांच्या मनावर तात्काळ परिणाम होत असतो. मी जेव्हां कडक टीका करितों, तेव्हां खरोखरीच माझ्यामध्यें रागाचा आवेश आलेला असतो. अशा रीतीनें विषयाशीं तादात्म्य पावल्यानें माझ्या लेखांगमध्यें भाषासौष्ठव वगैरे नसतांनाहि माझ्या साध्या भाषेचा परिणाम लोकांवर जास्त होतो."—डॉ.बेळकर

दैनिक-केसरी

(१०) राष्ट्रीय सभाविषयक यच्चयावत् सर्व ताजी वार्ता मराठी वाचकांस दररोज कळावी म्हणून, टिळक हे वासुदेवराव केळकरादि सर्व संपादक व आर्यभूषण छापखान्याचे व्यवस्थापक हरि नारायण गोखले वगैरे मंडळींस घेऊन मुंबईस गणपत कृष्णाजीचे छापखान्यांत दैनिक 'केसरी' काढण्याकरितां आले होते. सदरील सर्व छाप-खाना मालकांनीं ह्या पुणेंकर पाहुणे मंडळींच्या हवालीं केला होता. येथें किती दिवस 'केसरी' निघाला, हें आतां बरोबर स्मरत नाहीं. तरी पण १०–१२ अंक निघाले असावेत, असें वाटतें. या सर्व साहसाचें आदिकारण लोकमान्यच होत.

—रा. सिताराम बाबाजी गुर्जर

केसरीचें ध्येय व संपादक वर्गांतील मंडळींचें कार्य

(११) केसरी कचेरींतील संपादक वर्गांतील गृहस्थानें काम कसें केलें पाहिजे यासंबंधानें, रा. भट यांना संपादक शाखेकडे घेतलें त्या वेळीं त्यांना लो. टिळकांनीं संपादकत्वाचें जें सारसर्वस्व सांगितलें त्याचा भावार्थः.

"माझा वचक सर्व माणसांवर आहे. तुम्ही नवीन माणसें आतां गोळा होत आहांत, तुम्हालाहि खुर्च्या, टेबलें, ऑफिस वगैरे थाट आयता मिळतो. मला ह्यांपैकीं एकहि गोष्ट नव्हती. वळकटीवर पाट टाकला कीं, माझें टेबलाचें काम भागे. आतां ऑफिसची सुस्थिति आहे म्हणून तुम्हांलाहि मी माझ्याप्रमाणें दिवस काढा असें म्हणत नाहीं. पण जर तुम्हांस आपल्या कारखान्याचा, पत्राचा व त्याच्या यच्चयावत् व्यव-स्थेचा जिव्हाळा असेल, तर तुम्हांस मी सांगितलेलीं व स्वतः केलेलीं, सर्व कामें शिकून घेतलीं पाहिजेत. ह्यासाठीं तुम्हीहि यंत्रांची, टाइप फौंड्रीची वगैरे सर्व माहिती मिळविली पाहिजे. तुम्ही हवें तेव्हां, हवें तसें, हवें इतकें लिहूं शकाल. पण ही अवांतर माहिती तुम्हांला अपरिचित असल्यानें शिकाल तरच मिळेल." नंतर 'केसरी'च्या धोरणाबद्दल मला त्यांनीं बऱ्याच गोष्टी सांगितल्या. त्यांतील सार हें कीं, 'केसरी' हा महाराष्ट्रांत वृत्तपत्रांच्या शिरोभागींच चमकला पाहिजे. लोकांना स्वदेशाभिमानाचें, स्वार्थत्यागाचें, स्वातंत्र्याचें शिक्षण देऊन त्यांना ह्या पारतंत्र्यांतून वर निघण्याकरितां परिस्थित्यनुसार जे जे मार्ग आढळतील, किंवा इतिहासाला ज्ञात असतील, ते ते सर्व मार्ग चोखाळण्याला लोकांना 'केसरी'नें तयार केलें पाहिजे. लोकांना ह्या गोष्टींचें ज्ञान नसतें. इतकेंच नव्हे तर बहुजनसमाज ह्या बाबतींत विचार करून योग्य उपाय शोधून काढण्यास अपात्र असतो. तो ह्या असल्या पुढारी वृत्तपत्रांकडे किंवा पुढाऱ्यांकडेच मार्गदर्शित्वाबद्दल पहात असतो. म्हणून 'केसरी'नें हें मार्गदर्शित्व पत्करिलें आहे. आणि तें संपादकांनीं सांभाळलें पाहिजे. देशांत निरनिराळे पक्ष असावयाचेच. नसले तरी सरकार ते उत्पन्न करूं शकतें. ह्यामुळें 'मतामतांचा गलबला' होतो. अशा स्थितींत सामान्य जनता गोंधळून जाते. कोणतें खरें, कोणतें खोटें, कोणतें देशहितसाधक आणि कोणतें देशहितनाशक, हें ह्या भांबावलेल्या जनतेला समजत नाहीं. म्हणून 'केसरी'नें अगदीं स्वच्छपणें, लोकांना कळेल अशा सोप्या शब्दांत, पण ठांमून 'हा अमकाच मार्ग खरा' असें निर्भीडपणें, निर्भयपणें व निःशंकपणें सांगितलें पाहिजे. त्यांत वेळ-प्रसंगीं कित्येकांचीं मनें दुखवावीं लागतील, सरकारचा रोष होईल, ज्यांचें हित बिघडतें अशांचें वैर साधावें लागेल. पण हें सर्व अंगिकारलेंच पाहिजे. आपणांस देश तयार करावयाचा आहे. आपण दृष्टोत्पत्तीस आल्याशिवाय लोकांनाहि स्वार्थत्यागाचें वळण लागत नाहीं. म्हणून लोकांना पचेल व रुचेल अशा रीतीनें, पण शक्य नितकें करून कायद्याच्या मर्यादेंत राहून, लोकांना स्वातंत्र्यप्रीतीचें, देशाभिमानाचें व प्राणत्यागापर्यंत स्वार्थत्यागाचें वळण लाविलें पाहिजे. वेळ प्रसंगीं जरूर पडल्यास कायद्याचीहि फारशी मातब्बरी ठेवून चालत नाहीं. त्यावेळीं तो मोडूनहि लोककार्य पुढें ढकललें पाहिजे; त्याचप्रमाणें अगदीं ध्येयवादीहि व्यवहारी मनुष्याला राहून चालत नाहीं. लोकांना झेपेल असेंच धोरण ठेवावें लागतें." श्रीसमर्थांच्या 'मुलांच्या चालीनें चालावें' वगैरे शिकवणीची मला त्यावेळीं आठवण झाली.

लोकपक्षाची वकिली

(१२) आमच्या नाशिकच्या कटाच्या खटल्याचा इतिहास त्यांना अवगत असल्या-मुळें ते पुन्हां मला चटकन म्हणाले कीं, "जीं मतें तुम्हांला 'केसरी'तून प्रतिपादितां येणार नाहींत, तीं कोणत्याहि इतर वर्तमानपत्रांतून प्रतिपादितां येणार नाहींत. त्यांना व्यवहाराची गवसणी मलाहि घालावी लागली आहे, व ती तुम्हांलाहि घालावी लागणारच. कांहीं वृत्तपत्रांनीं तसा यत्न केला तर तीं पत्रें क्षणभंगुर राहणार. अशींहि पत्रें हवींत. पण वाच्यार्थानें ह्या गोष्टी सुचविण्यापेक्षां व्यंगार्थानें जर त्याच सुचवितां येतात व कायद्याचे आड राहून दीर्घकालपर्यंत इष्टकार्य करितां येतें तर तें कां करूं नये! 'केसरी'नें हाच मार्ग स्वीकारिला आहे, व तोच चालविला पाहिजे. त्याखेरीज आणखी एक गोष्ट तुम्ही ध्यानांत ठेवा. वर्तमानपत्रकार हा एक लोकपक्षाचा कुशल, धीट, विचारी व तडफदार असा वकील असावा, असें माझें मत आहे. सरकारचा पक्षहि वकिली बाण्यानेंच तुमच्याशीं वागतो. तुम्हीहि तसेंच तोंडीला तोंड वागलें पाहिजे. सरकार जशी आपली व्यंगें उघडीं करीत नाहीं तशीं तुम्हीहि लोकपक्षाचीं व्यंगें चव्हाट्यावर मांडतां कामा नयेत. प्रत्येक पक्षांत कांहीं तरी खरकटें असावयाचेंच. पण तेंच जर आपण मांडीत बसलों तर लोकांना आत्मविश्वास राहात नाहीं. लोकांमध्ये गुणांचा महति, पूर्वजांचा सादर स्मृति, ध्येयाची शक्यता याबरच जास्त भर याचा म्हणजे आत्मविश्वास वाढतो. वेळ प्रसंगीं दोषदर्शनहि करावें लागतें व तें करावेंहि. पण शक्य तोंवर आपली मांडी उघडी करूं नये. उत्कृष्ट वकील या धोरणानेंच काम करतो. आणि हेंच वृत्तपत्रांनीं करावें. साधक-बाधक गोष्टींचा विचार करून, न्याय निवडण्याचें काम वर्तमानपत्रकारांचें नाहीं. कारण त्यांना दोन्ही बाजू कळणेंच शक्य नसतें. तेव्हां नेहमीं अपुऱ्या माहितीनें न्यायाचे तारे तोडण्यापेक्षां लोकपक्षाची कुशल व तडफदार वकिली करणेंच जास्त हितावह आहे."

—डॉ. वि. म. भट,

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरी महाराष्ट्राचा आहे !

(१३) १९१५ सालीं केसरीच्या आपल्या मागूनच्या व्यवस्थेबद्दल लोकमान्य बोलत असतांना म्हणाले, "मी मंडालेस असतांना केसरी ××× कसा काय चालला हें तुम्हां सर्वांना माहीत आहे" मी उत्तर म्हणून 'छान चालला' असें म्हणालों. ते पुढें म्हणाले, "केसरी महाराष्ट्राचा आहे. मी आगळाहि नाहीं व घेऊनहि जाणार नाहीं. ज्यांचें अंतःकरण स्वदेशावर जळत असेल अशा सर्व राष्ट्रभक्तांनीं तो चालविला पाहिजे. आज जे केसरीचे वर्गणीदार व साहाय्यक आहेत त्यांच्या विचाराबाहेर केसरीनें जावयाचें नाहीं. ते सर्व राखलेच पाहिजेत. येथें कोणाहि योग्य पुरुषास कर्तबगारी दाखविण्यास वाव आहे. माझ्या तुरुंगवासाच्या वेळांतली कामगिरी लक्षांत घेऊन केसरी ट्रस्टचे पहिले कायम मेंबर ××× यांस केलें व सर्वांच्या विचारांनीं पुढील योजना आंखली आहे."

—श्रीधर गोविंद काळे

केसरीची जाहीरात टिळकांनीं वाटली !

(१४) सुमारें १८८० सालांत अण्णा किर्लोस्करांचें नाटक कंपनी मुंबईंत आली होती. त्या वेळेस कंपनींत दक्षिण भागच्या कमिशनरच्या ऑफिसमधील कारकून वगैरे मंडळी होती. त्या वेळेस 'केसरी'च्या जाहिराती नाटक सुरू होण्याच्या पूर्वी स्वतः टिळकांनीं वाटल्या.

—रा. बंडोपंत भाजेकर

घरचा मजूर

(१५) १९१४ सालीं लो. टिळक सुटून आल्यानंतर 'लोकसेवक' पत्रातर्फे पान सुपारी झाली. त्या वेळीं लळीत यांनीं आपल्या अडचणी सांगितल्या. त्या वेळीं टिळकांनीं आपला केसरी संबंधीं अनुभव सांगितला तो असा—

"तुम्हां तरुण मंडळींना निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं. आम्हांस यापेक्षांहि मोठमोठ्या अडचणींतून जावें लागलें आहे." असें म्हणून स्वतःच्या तरुणपणाची हकीकत सांगितली कीं, "मला स्वतःला डोक्यावरून केसरी वाहून नेण्याचे प्रसंग आलेले आहेत. दिवसा तसें केल्यास लोक हंसतील म्हणून रात्री काळोख पडेतों थांबून मग वाहून नेत होतों इतकेंच !"

—सि. वि. लळीत

टिळकांचें गैरहजेरींतील 'केसरी'

(१६) लोकमान्य १९१४ सालीं सुटून आल्यावर १०–१२ दिवसांनीं एकदां वर्तमानपत्रांचे खोलींत ते उभे होते. साताऱ्याचे एक दोन गृहस्थ त्यांचेपाशीं बोलत होते. बोलतां बोलतां पूर्वीच्या ४-६ वर्षांतील दडपशाहीचा विषय निघाला. तेव्हां लोकमान्य म्हणाले, "मी बाहेर असतां तरी मलाहि 'केसरी' टिकवणें अशक्यच झालें असतें. ××× यांचा गोड्या स्वभाव अशा वेळीं राष्ट्राचे व 'केसरी'चे उपयोगी पडला. व म्हणूनच आज आपणास येथें उभे राहावयास जागा राहिली आहे." या वेळीं लोकमान्य गहिंवरून आलेले दिसले.

—दिनकरशास्त्री कानडे

'केसरी' करितां माणसांचा शोध

(१७) सर्व्हंट ऑफ इं. सो. प्रमाणें संस्था काढावी असें विचारलें त्या वेळीं टिळक म्हणाले—"माझ्या आयुष्यांत मी एक मोठी संस्था काढली. ती 'केसरी' ही संस्था होय. तिच्याकरितां माणसें मिळविण्यासाठीं केलेल्या प्रयत्नाचें त्यांनीं विवेचन केलें. त्यांत त्यांनीं सांगितलें, "मीं 'केसरी' करितां उत्तम उत्तम माणसें मिळविण्यासाठीं पुष्कळ खटपट केली. दरसाल युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांपैकीं पुष्कळांस विचारिलें आणि पगारहि चांगला देऊं केला तरी आपल्याला माणसें मिळालीं नाहींत. पण एक जण शब्द टाकल्याबरोबर आपणांस येऊन मिळाले." याबद्दल मात्र त्यांस अभिमान वाटला.

—दत्तात्रय र. देव

एकोदेवः केशवः

(१८) न्यू इंग्लिश स्कूल सोडल्यानंतर आपण काय करणार यासंबंधानें टिळक म्हणाले—"'मराठा' व 'केसरी' यांस टाकून मला कोठेंहि जावयाचें नाहीं."

—शं. ग. देशपांडे

'केसरी'चे नवें मशीन

(१९) १९१९ सालीं टिळक विलायतेला गेले होते. तेव्हां ते 'डेली हेरल्ड' छापला जात असे तो प्रेस पाहण्याकरितां दोनचार वेळां ते गेले होते. याच वेळीं त्यांना पुण्याहून दाजी विद्वांस यांचेकडून नवा प्रेस घेण्याबद्दलचीं पत्रें येत असत. व चांगला प्रेस मिळविण्याच्या खटपटींतहि पण दादा होतेच. घरीं कधीं कधीं कोणत्या प्रकारचा प्रेस घ्यावा यासंबंधीं वादविवाद चाले. अशा वेळीं दादांचें सर्व लक्ष जेणें करून पुणें येथें आपल्या छापखान्यांत टाईपाच्या कामाला लोक कमी लागतील अशा प्रकारचें मशीन घ्यावें, इकडे विशेष असे. मशिनरीची किंमत भलतीच वाढलेली असल्यामुळें व शिवाय नवीन मशीन तातडतोब मिळण्यासारखें नसल्यामुळें संपूर्ण दुरुस्त केलेलें मशीनच घ्यावयाचें असा त्यांचा नक्की बेत झाला होता. अशा तऱ्हेचें मशीन दिसल्याबरोबर विशेष हुज्जत घालीत न बसतां त्यांनीं घेण्याचें ठरवून टाकलें. पण अशातूनच त्यामध्यें एवढी सोय मात्र दादांनीं अवश्य पाहिली होती कीं, वर्तमानपत्र रोज काढतां यावें, कागद लावण्यापासून त्याची घडी पडेपर्यंत मध्यें कांहीं पाहावयास लागूं नये; कागद दुहेरी छापावयास न लागतां एकाच वेळीं दोन्ही बाजू छापून निघाव्या व लागेल तेव्हां लागेल तो अंक नंबरला असतांना विशेष श्रम न पडतां आणखी हव्या तितक्या प्रति काढतां याव्या. याच वेळेस इंजिनसंबंधीं व विजेच्या दिव्यासंबंधीं दादांनीं सर्व सूचना ऐकून घेतल्या, व आपला कारखाना पूर्णत्वास आणण्याकरितां त्यांना जीं जीं साधनें जरूर वाटलीं तीं तीं त्यांनीं खरेदी केलीं.

—ग. म. नामजोशी

प्लेगचे दिवसांतील केसरी

(२०) सन १९०२ सालीं प्लेगच्या कहरांत लोकमान्यांचे थोरले चिरंजीव विश्वनाथपंत वारले. त्याच्या तिसरे दिवशीं श्रीयुत बाबा विद्वांस यांचे बंधु रा० नारायणराव प्लेगनें वारल्यामुळें बाबा कोंकणांत गेले. स्वतः लोकमान्यांच्या गुडघ्यास जबर जखम झालेली होती. गांवांत प्लेगनें मान जास्तच वाढूं लागल्यामुळें आर्यभूषण छापखान्यांतील बरेच कंपॉझिटर गैरहजर असत. त्यामुळें कै० हरिपंत गोखले, आर्यभूषणचे मालक, हे सोमवारीं सकाळचे नऊ वाजतां लोकमान्यांच्या झोपडीवर आले, (झोपडी हल्लींच्या सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या जागीं होती) व लोकमान्यांस म्हणाले, 'आज बरेच कंपॉझिटर कमी आहेत; तेव्हां कंपोजचें काम आटोपण्यास बराच उशीर होईल व त्यामुळें 'केसरी' छापण्यास बराच वेळ लागेल. सबब उद्यांचा अंक गांवांत वाटण्यापुरता रात्रीं छापून काढतों. व बाहेरगांवीं जाणारा 'केसरी' उद्यां छापून परवां टपाल करीन. त्यावर लोकमान्य रागावून म्हणाले कीं, "तुमचे छापखान्यांतील कंपॉझिटर नाहींत तर दुसरे छापखान्यांतील बोलवा. तुम्ही आर्यभूषणचे मालक व मी 'केसरी'चा एडिटर दोघेहि वारलों तरी, आमच्या चौदा दिवसांपर्यंत केसरी मंगळवारचा मंगळवारींच पोष्टांत पडला पाहिजे ! तुम्हांस कंपॉझिटर मिळत नसतील तर मी आणून देतों." त्यावर रा० गोखले म्हणाले, 'मी तपास केला, परंतु मला मिळत नाहींत.' त्यावर त्यांना "तुम्हीं जा, मी कंपॉझिटर आणून देतों." असें सांगून मला बोलावून सांगितलें कीं, "मजबरोबर आतांचे आतां गांवांत चला. आज कंपॉझिटर गोळा करून आणावयाचे आहेत." मी गांवांत जाऊन टांगा घेऊन येतों म्हणून सांगितलें. त्यावर ते म्हणाले, "आतां दहा वाजण्यास आले आहेत. तुम्ही गांवांत जाऊन टांगा आणून आपण जाईपर्यंत वेळ होणार. छापखान्याच्या मालकांनीं एकदां आपले कंपॉझिटर लोकांना काम नेमून दिलें म्हणजे मग आपणास माणसें मिळणें कठीण पडेल. तेव्हां जेथें टांगा मिळेल तेथें करूं. तेथपर्यंत पायींच जाऊं" असें म्हणून आम्ही निघालों. त्या दिवशीं बुधवार चौकापर्यंत टांगा मिळाला नाहीं. तेथपर्यंत लंगडत लंगडत ते आले ! तेथें टांगा करून आम्ही ४।५ छापखान्यांत जाऊन प्रत्येक ठिकाणाहून एकदोन अशीं माणसें मागून त्या सर्वांस बारा वाजण्यापूर्वी हरिपंताकडे नेऊन कामास लावलें. व त्या दिवशींचा 'केसरी' वेळेवर काढला, इतकेंच नव्हे, तर मुंबईचें पार्सल सोमवारीं रात्रीं मद्रास मेलनें पाठवून पुण्यास व मुंबईस मंगळवारीं सकाळीं 'केसरी' लोकांस मिळाला.

—य. ग. कुळकर्णी

लेखनाला अंतःकरणाची तळमळ पाहिजे.

(२१) एका बी. ए. झालेल्या उमरावतीचे शिक्षकानें स्वदेशसेवा कशी करावी यासंबंधानें प्रश्न केला त्या वेळीं लो. टिळक त्यांना म्हणाले:—

"मी आणि गोपाळराव आगरकर शास्त्रीबुवांच्या भेटीस गेलों त्या वेळीं त्यांनीं 'केसरींत व मराठ्यांत लिहीत चला' असें शास्त्रीबुवांनीं आम्हाला सुचविलें. तेव्हां 'आम्हाला लिहितां येत नाहीं' असें आम्ही त्यांना म्हणालों. त्याबरोबर ताडक्यासरशीं 'तुमचें अंतःकरण देशाकरितां जळतें आहेना !' असा त्यांनीं आम्हाला सवाल केला व आम्हीं 'होय' म्हणतांच, तर मग तुम्हाला लिहितां आलेंच पाहिजे. तळमळींतून शब्द जन्मास येतात. शब्दांपासून तळमळ उत्पन्न होत नाहीं. तुमच्या अंतःकरणांत जर तळमळ आहे तर तुम्हाला वाचा फुटलीच पाहिजे' असें शास्त्रीबुवांनीं मोठ्या आवेशानें आम्हाला सांगितलें आणि तेंच मी तुम्हाला सांगतों."

—वामनराव जोशी

केसरीचे मदतनीस

(२२) सन १८७४ मध्यें निबंधमाला निघाली. हिचा मुळापासून मी वर्गणीदार असून तिचा फार चाहता व अनन्यभक्त होतों. १८८० च्या अखेर मी कांहीं कामानिमित्त पुण्यास आलों असतां, डोलकरआळींत शास्त्रीबोवांचे घरीं त्यांचे भेटीस गेलों. त्या वेळीं "केसरी" निघण्याचे संबंधानें नुकतेंच निघालेलें योजनापत्रक त्यांनीं माझ्या हातीं दिलें. तें दोनहि अंगांस छापलेलें असून त्यावर सहा सह्या होत्या.

सदरील पत्रक माझें वाचून होत आहे न होत आहे तोंच शास्त्रीबोवांनीं मला विचारलें, "कांहो ! हें वर्तमानपत्र चालेल का ?" मी लगेच त्यांना म्हटलें, "आपल्यासारखे विद्वान, अनुभवी, कसलेले, लोकप्रिय व अप्रतिम लेखक व इतर विद्वान आपल्यास साहाय्यक असतां हें चालेल का हा प्रश्न कां ?"

मुंबईंत "हिंदु यूनियन क्लब" नांवाची एक संस्था गिरगांवांत पालव रस्त्यावर सुंदरराव संजगिरी यांचे सुंदर इमारतींत होती. तेथें हिंदु लोकांचा हा पहिलाच क्लब होता. यांत काशिनाथ त्र्यंबक तेलंगप्रभृति अनेक विद्वान व इतर सुशिक्षित सभासद होते. ह्या संस्थेच्या आश्रयाखालीं वरील स्थळीं हेमंत ऋतूंत दरशनिवारीं अनेकांचीं विविध विषयांवर व्याख्यानें होत असत. केसरी–मराठ्याचे हितार्थ कायावाचामनधनानें झटणारे त्या वेळीं कोणीएक मुंबईमध्यें रघुनाथ मोरेश्वर वांकणकर "टाईम्स ऑफ इंडिया" मध्यें कारभारी होते. ते हीं व्याख्यानें केसरीसाठीं मजकडून लिहवून घेऊन पुढें पुण्यास वेळेवर पाठविण्याचें काम फार आस्थेनें करीत असत. केसरी-मराठ्याचे त्या वेळींहि त्या शहरांत पुष्कळ हितेच्छु होते. हेमंत व्याख्यानमालेंतील सर्व पुष्पें मी वांकणकराचे परडींत घालीत असे. ह्याशिवाय इतर व्याख्यानें व मुंबईंतील प्रासंगिक समारंभवृत्तें यातम्या केसरींत देत असें.

—सीताराम बाबाजी गुर्जर

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

उपसंहार व आभारप्रदर्शन

प्रथम एका विशेष महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे. ती म्हणजे केसरी-मराठा ट्रस्टसंबंधानें नुकताच झालेला हायकोर्टाचा निकाल. याच अंकांत पृष्ठ १८ वर ट्रस्टसंबंधीं चाललेल्या दाव्याचा व हायकोर्टापुढें असलेल्या अपीलाचा उल्लेख केलेला वाचकांच्या नजरेखालीं आलाच असेल. पण सांगण्यास आनंद वाटतो कीं, तें पान लिहून छापून झाल्यानंतर ता. २८ नोव्हेंबर १९३० रोजीं या अपीलाचा निकाल लागला, व त्यामुळें ट्रस्टींच्या हक्कांचें पूर्णपणें संरक्षण व समर्थन होऊन ट्रस्टवरचें एक मोठेंच गंडांतर टळलें. नुकतेंच १३ डिसेंबरच्या केसरींत, अपीलाच्या कामीं हायकोर्टच्या उभय न्यायमूर्तींनीं म्हणजे जस्टिस पाटकर व ब्रूमफील्ड यांनीं दिलेल्या सविस्तर निकालाचा सारांश आम्ही दिलाच आहे. म्हणून तो सर्व येथें पुन्हां देत नाहीं. तथापि निकालांतील महत्त्वाचे मुद्दे पुन्हां एकवार थोडक्यांत या ज्युबिली अंकांत देणें अवश्य वाटल्यावरून ते खालीं देत आहों.

१ लो. टिळकांच्या मृत्यु पत्राला अनुसरून रामभाऊ व श्रीधरपंत टिळक यांनीं लिहून दिलेलें केसरी–मराठा संस्थेचें ट्रस्टडीड खरें आहे व तें कायदेशीर व बंधनकारक आहे.

२ तें फसवून करून घेतलें ही तक्रार साफ खोटी आहे.

३ तसेंच ट्रस्टींनीं गायकवाडवाड्याच्या निम्या भागाची भाडेचिठ्ठी टिळकांच्य चिरंजिवांना करून दिली ती कायदेशीर आहे.

४ हें ट्रस्टडीड व ही भाडेचिठ्ठी या दस्तऐवजांवरून ट्रस्टींना येणारे हक्क कायदेशीर व अबाधित आहेत.

५ ट्रस्टींनीं कोर्टांत पुढें होऊन पुरावा दिला तो सर्वस्वी विश्वसनीय आहे. उलट टिळकांचे चिरंजिवांनीं कोणताच पुरावा दिला नाहीं.

६ टिळकांच्या चिरंजिवांनीं ट्रस्टींचा पध्दतशीर छळणूक चालविली म्हणून व ट्रस्टींना फिर्याद करून कोर्टाकडून संरक्षण मागावें लागलें. व तें देणें योग्य आहे म्हणून कोर्टानें तें दिलें.

अशा रीतीनें ट्रस्टींविरुद्ध आज पांच वर्षें उठलेलें नसतें काहूर या निकालानें आतां शमलें असें समजण्यास हरकत नाहीं. व लो० टिळकांच्या इच्छेप्रमाणें केसरी-मराठा संस्थेचें सार्वजनिक स्वरूप आतां खुद्द हायकोर्टांत तावून सुलाखून निघालें याबद्दल केसरीच्या वाचकांना व ऋणानुबंधी लोकांना व हितचिंतकांना आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं. या ज्युबिलीच्या प्रसंगीं आम्हास जर कोणत्या एका गोष्टीचा खरा आनंद वाटत असेल तर योग्य वेळीं लाभलेल्या या यशाचा होय. त्यानें ही ज्युबिली सार्थ झाली असें आम्ही मानतों.

ज्युबिली अंक काढण्याचें ठरवून त्यासंबंधानें हितचिंतकांनीं व वाचकांनीं सूचना पाठविण्याविषयीं आम्ही केसरींतून विनंति केली होती. तिला अनुसरून ज्यांनीं ज्यांनीं सूचना पाठविल्या त्या सर्वांचे आम्ही आभारी आहों. समक्ष भेटींत पुष्कळांनीं तोंडीं सूचना केल्या. तथापि समक्ष भेटीचा योग नसतां ज्यांनीं मुद्दाम पत्रद्वारें सूचना पाठविल्या त्यांचीं नांवें या खालीं दिलीं आहेत—

(१) रा. अनंत बाळाजी ओक, वकील, जळगांव. (२) वे. शा. सं. आत्माराम शास्त्री ओडल्मने, मरकारा. (३) रा. आनंदराव जोशी, नागपूर. (४) रा. विष्णू रामचंद्र देशपांडे, चाकळ. (५) रा. एन्. बी. नवरे, मुंबई. (६) रा. मल्लिकार्जुन आप्पाराव पाटील, सोलापूर. (७) रा. वामन विष्णू गुळवणी, कोळे. (जि. सातारा) (८) रा. केशव बळवंत जोशी, मुंबई. (९) रा. ज. वि. पटवर्धन, पुणें (१०) रा. गणेश सदाशिव जोशी, अलिबाग. (११) रा. रामकृष्ण एस्. नाईक, वेंगुर्लें. (तां. देवगड) (१२) रा. नारायण गणेश बापट, बोर्ली (जंजिरा). (१३) रा. गणेश दिनकर गद्रे, केसपुरी. (जि. रत्नागिरी) (१४) रा. धोंडो महादेव पंडित, पुणें. (१५) गं. व्यं. देशपांडे नागपूर. (१६) गणेश वामन खुंडे, (शिरोडें). (१७) डॉ० वा० त्रिं साठे, निमच. (१७) गोविंद नारायण गोळे, सातारा.

याशिवाय केसरीच्या अगदीं पहिल्या वर्षी जे केसरीचे वर्गणीदार होते अशांचीं नांवें स्वतः त्यांनीं किंवा इतरांनीं कळविण्याविषयींहि आम्ही जाहीर विनंति केली होती. त्याप्रमाणें आमच्याकडे स्वतः अशा वर्गणीदारांकडून किंवा इतरांकडून नांवें कळलीं तीं खालीं दिलीं आहेत—(१) रा. कृष्णाजी बल्लाळ देवल, सांगली. (२) रा. गडबोले, इचलकरंजी. (३) रा. शंकर बापूजी मुजुमदार, पुणें. (४) रा. प्रभाकर बाळाजी ओगले, ओगलेवाडी. (५) रा. कृष्णाजी रघुनाथ भावे, परिंचें. (जि. सातारा) (६) रा. एन्. पी. नागपेशव, नागपूर. (७) रा. गणेश दिनकर गद्रे, केसपुरी. (८) रा. गणेश सदाशिव जोशी, अलिबाग (९) रा बी. एल्. उचगांवकर, म्हैसूर (१०) रा. आप्पासाहेब वारद, सोलापूर. (११) रा. एन् बी. भावे. (१२) रा. वासुदेव बाळाजी पिंपळीकर, मलकापूर. (१३) कृष्णराव लक्ष्मण बापट, धारवाड. (१४) परशुराम आत्माराम आठल्ये, बार्शी. (१५) गोविंद हरी पानवेलकर, बुलढाणा. (१६) रामचंद्र काशिनाथ किर्लोस्कर, औंध. (१७) गोपाळ कृष्ण भिडे, वाई.

हितचिंतकांनीं व वाचकांनीं पाठविलेल्या सूचनांचा शक्य तेवढा उपयोग आम्ही केला आहे. याहून अधिक सूचना अमलांत आणतां आल्या असत्या तर आम्हाला आनंदच वाटला असता. परंतु सूचना सुचतात त्या सर्व अमलांत येण्याला अनेक अडचणी असतात. म्हणून ज्या सूचना अमलांत आल्या नाहींत त्या करणारे गृहस्थ कोणत्याहि प्रकारें गैरसमज करून घेणार नाहींत अशी आशा आहे.

पूर्वी प्रसिद्ध केल्या प्रमाणें या ज्युबिली अंकांत केसरी–मराठा संस्थेच्या ऋणानुबंधी व्यक्तींचा शक्य तितका उल्लेख केला आहे. मग त्यांचा संबंध संपादक, उपसंपादक, लेखक, वार्ताहर, मदतनीस, आश्रयदाते, सक्रिय हितचिंतक इ. पैकीं कोणच्याहि प्रकारें आलेला असो. या बाबतींत कोणीहि वगळला जाऊं नये अशाविषयीं आम्ही शक्य तितकी खबरदारी घेतली आहे. तथापि पन्नास वर्षांच्या या समालोचनांत मुळींच चुका न होणें अशक्य आहे. म्हणून स्मृतिदोषामुळें, वेळेच्या अभावामुळें व स्थलसंकोचामुळें किंवा इतर एखाद्या कारणानें ज्यांचा उल्लेख करावयाचा राहिला असेल ते किंवा तत्संबंधीं गृहस्थ आम्हास क्षमाच करतील, गैरसमज करून घेणार नाहींत अशी आशा आहे.

प्रस्तुत ज्युबिली अंक शक्य तर सर्वच्या सर्व स्वदेशी कागदावरच काढावा अशी आमची मूळ योजना होती. व त्याप्रमाणें आम्ही पुणें येथील डेक्कन पेपरमिल कं. कडून त्या वेळीं जरूर तेवढा देशी कागद मुद्दाम काढवून आणला. तथापि मजकुराची व जाहिरातींचीं पानें पहिल्या अंदाजाहून वाढलीं. तसेंच सर्व मजकूर चित्रें वगैरेंची जुळणी करून अंकाच्या ३५ हजार प्रती केसरी छापखान्याच्या बाहेरील कोणत्याहि यंत्रावर थोड्या मुदतींत काढणें अशक्य वाटलें, म्हणून हा अंकहि नेहमीप्रमाणें मजकुराचे स्टिरिओ करून केसरीच्या रोटरी यंत्रावरच छापून घेतला. अर्थात् त्या यंत्रावर रीम्सचा कागद चालत नाहीं. मोठमोठीं भेंडोळींच वापरावी लागतात व तीं परदेशी कागदाची आहेत. मात्र विलायती कागदाचीं नाहींत.*

या ज्युबिली अंकांत केसरी–मराठा संस्थेसंबंधाची माहिती देण्यासारखी वाटली ती उपलब्ध साधनांवरून आमची आम्हीच जशी सुचली तशी तयार करून दिली आहे. तथापि दोनतीन गोष्टीसंबंधानें आम्हांला इतरांनीं मदत केली नसती तर हा ज्युबिली अंक अनेक दृष्टींनी अपुरा होण्याऐवजीं अपुर्ण राहिला असता. पहिली बाब चित्रांची. केसरी–पत्र चित्रांचे दृष्टीनें महत्त्वाचे नव्हतें व नाहीं. तथापि केसरी–मराठा संस्थेशीं ज्यांचा निरनिराळ्या रीतीनें निकट संबंध आला त्यांची तोंड ओळख वाचकांना करून देणें, तसेंच संस्थेच्या निरनिराळ्या कारखान्यांचीहि तोंडओळख करून देणें, ही गोष्ट या ज्युबिली अंकांत करणें अवश्य होतें. फोटो नवीन काढून देणें, किंवा आपल्या संग्रहांतील जुने उपयोगाकरितां देणें या कामीं मुख्यतः येथील फोटोग्राफर रा. गुणे, चित्रशाळा, व मुंबईचे फोटोग्राफर रा. वीरकर यांनीं आम्हांला मनोभावानें सहाय्य केलें. आमच्या संग्रहीं नसलेल्या अशा फोटोग्राफ करितां निरनिराळ्या गृहस्थांना आम्ही विनंति केल्यावरून आपल्याजवळ असलेले फोटो कित्येकांनीं दिले, व नव्हते त्यांनीं मुद्दाम काढविण्याची तसदी घेऊन पाठविले म्हणूनच इतकीं चित्रें या अंकांत देतां आलीं. चित्रें हातीं आल्यानंतर त्यांचे ब्लॉक्स तयार करण्यासंबंधानें पुणें येथील चित्रशाळा, बालोद्यान प्रेस, कोहिनूर फोटो झिंको, आणि मुंबई येथील मि. नेरॉय व रा. पोंक्षे या कारखानदारांनीं तत्परतेनें सहाय्य केलें. तसेंच चित्रशाळेचे मालक रा. वासूकाका जोशी, विजयप्रेसचे मालक रा. गोखले, साहित्यसेवक छापखान्याचे मालक रा. गणेश महादेव वीरकर, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, आठवणी आख्यायिकांचे कर्ते रा. सदाशिवराव बापट इ. गृहस्थांनीं त्यांच्याजवळ तयार असलेले ब्लॉक्सच छापण्याकरितां देऊन सहाय्य केलें हें विशेष होय. यांचा आम्हांला फारच उपयोग झाला. यानंतर चित्रें छापविण्याच्या कामींहि आम्हांला अशाच रीतीनें अनेक कारखानदारांचें सहाय्य घ्यावें लागलें. कारण ज्युबिली अंकाच्या प्रती

---

*तळटीप—जगांत हल्लीं वर्तमानपत्रांना उपयोगी असा कागद एकंदर सुमारें ६५ लक्ष टन तयार होतो. त्यांपैकीं निम्याहून अधिक अमेरिका व कॅनडा या देशांत होतो, व त्यांत त्यांत्यांत एकट्या कॅनडांत ⅓ होतो. साधारणपणें निरनिराळ्या देशांत अशा प्रकारचा म्हणजे वर्तमानपत्रोपयोगी कागद किती तयार होतो याचे आंकडे खालीं दिले आहेत:

कॅनडा	२३	लक्ष	टन	बेल्जम	५०	हजार	टन
अमेरिका	१५	”	”	ऑस्ट्रिया	५५	”	”
इंग्लंड	७	”	”	स्लोव्हेकिया	४५	”	”
जर्मनी	५॥	”	”	इटाली	४२	”	”
स्वीडन	२।	”	”	स्पेन	२५	”	”
न्यू फौंडलंड	२	”	”	एस्टोनिया	२१	”	”
फिनलंड	२	”	”	डेन्मार्क	१६	”	”
नॉर्वे	२	”	”	पोलंड	१७	”	”
फ्रान्स	१।	”	”	मेक्सिको	१५	”	”
				लटेव्हिया	३	”	”

हिंदुस्थानांत वर्तमानपत्रोपयोगी असा कागद मुळींच तयार होत नाहीं. पूर्वी जुन्नरी एरंडोली वगैरे प्रकारचा हातकागद तयार होत असे. पण तो इतका कीं, दुकानी हिशेबाच्या लांबलचक वह्या घालण्यालाच तो उपयोगी. त्यावर साधें पत्र लिहिलें तरी तें दुप्पट हंशील खाऊन जावयाचें. अर्थात हा कागद वर्तमानपत्रांना निरुपयोगी. तसेच हिंदुस्थानांतील पांच–चार मोठ्या कागदांच्या गिरण्यांत कागद तयार होतो. पण तो चिंध्यांचा. यामुळें तो पुस्तकांच्या उपयोगीच असतो. अर्थात् पांढरा व सफाईदार परंतु किंमतीला महाग. वर्तमानपत्री कागदाच्या निदान दुपटीनें त्याची किंमत असते. म्हणून तो कोणी वापरूं शकत नाहीं. वर्तमानपत्रांना उपयोगी पडणारा कागद मुख्यतः गवतापासून होतो. किंवा बांबू अथवा इतर लाकडाच्या सालीचा पातळ भुस्सा कुटून त्यापासून तो तयार करतात. पण ती विद्या अद्यापि हिंदुस्थानांत साधलेली नाहीं. पुणें पेपर मिलच्या चालकांनीं मुद्दाम विशिष्ट प्रकारचें गवत लावून पाहिलें, पण जमलें नाहीं. यावरून हें दिसून येईल कीं, वर्तमानपत्राला कागद देशी वापरावा अशी कोणाची इच्छा असली तरी भारी किंमतीमुळें ती सफळ होत नाहीं. देशीच कागद वापरावयाचा म्हटला तर तो किंमतीनें परवडणार नाहीं, व हवा तितका मिळणारहि नाहीं. ज्याचा खप कमी अशा वर्तमानपत्रांनाच देशी कागद वापरणें शक्य असतें, व मराठा पत्राला पुण्याच्या पेपर मिलचाच कागद वापरण्यांत येतो. पण केसरीला तो वापरणें शक्य नाहीं. कारण तो हवा तितका हुकमी मिळणार नाहीं, वर्गणी दुप्पट करावी लागेल, व ती वाचकांना परवडणार नाहीं.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

इतक्या काढावयाच्या होत्या, व चित्रांची पानेंहि इतकी पुष्कळ भरलीं कीं, ठराविक थोड्या मुदतींत कोणत्याहि एका कारखान्याला आपलें काम संभाळून आमचें काम करून देता आलें नसतें. याकरितां चित्रें निरनिराळ्या छापखान्यांतून एकाच वेळीं छापून घ्यावीं लागलीं. व पुणें येथील चित्रशाळा, गणेश महादेव वीरकर कंपनीचा छापखाना, राजगुरु यांचा प्रेस, गणेश प्रिंटिंग प्रेस यांनीं आपलीं कामें बाजूस सारून मित्रभावानें आमचें काम आधीं करून दिलें. या अंकांतील मुखपृष्ठावरचें दर्शनी चित्र बालोद्यान प्रेसनें व त्याच्या लगत असलेलें आंतील तीनरंगी चित्र ग. म. वीरकर कंपनीच्या छापखान्यानें छापून दिलें आहे. चित्रांचीं सर्व कामें चांगलीं सुबक झालीं असून वाचकांना तीं पसंत पडतील अशी आशा आहे.

हा ज्युबिली अंक शनिवार ता. ३ जानेवारी रोजचाच केसरीचा अंक खरा. तथापि नेहमींच्या अंकाच्या आकारांत फरक करावा लागला, व टपाल खात्याच्या नियमाचें उल्लंघन होऊं नये म्हणून या बदललेल्या स्वरूपांत हा अंक टपालानें पाठविण्याकरतां त्या खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यांची परवानगी आम्हीं मागितली, ती त्यांनीं दिली. तसेंच नेहमींप्रमाणें घडी घालून, दुमडून, दोरा घालून हा अंक पाठविण्यानें अंकाची, व विशेषतः आंतील चित्रांची, खराबी होणारी असल्यामुळें हा अंक नेहमींप्रमाणें न पाठवितां तो मुद्दाम चिवट कागदाच्या पिशवींत घालून पाठविला आहे. या पिशवीची कल्पना बालोद्यान प्रेसचे मालक रा. सहस्रबुद्धे यांनीं सुचविली व त्यांनींच ती प्रत्यक्ष अमलांतहि आणून दिली.

शेवटीं एक गोष्ट सांगावयाची राहिली. ती ही कीं, ज्यांचीं चित्रें या अंकांत दिलीं व ज्यांचीं चित्रें वेळेवर न मिळाल्यामुळें देतां आलीं नाहींत अशाहि अनेक ऋणानुबंधी गृहस्थांसंबंधीं व्यक्तिशः माहिती या अंकांत मुद्दाम दिली आहे. या माहितीपैकीं कांहीं माहिती आम्हांला अर्थात् होतीच. तथापि ती पूर्ण व्हावी व तींत विशेष कांहीं चुका राहूं नयेत याकरितां त्या त्या गृहस्थाकडे मुद्दाम पत्रें पाठवून माहिती मागविली, व ज्यांचेकडे ती मागितली त्यांपैकीं बहुतेकांनीं ती स्नेहभावानें लेखी पाठविण्याची तसदी घेतली. ही माहिती या अंकाच्या दृष्टीनें तर उपयुक्त आहेच. परंतु मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीनेंहि ती उपयुक्त आहे असेंच आढळून येईल. अशी माहिती कांहीं निमित्तानेंच जुळविण्याचा प्रसंग येतो. त्याप्रमाणें आम्हीं मुद्दाम ती मागविली व लोकांनीं ती दिली. तात्पर्य, अशाप्रकारें अनेकांचें अनेक प्रकारें साहाय्य झालें त्याबद्दल हे सर्व कारखानदार, छापखानेवाले व इतर सद्‌गृहस्थ या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

असो; दीर्घायुष्य हा शब्द अर्थानें सापेक्ष आहे. म्हणून केसरीला पन्नास वर्षे आयुष्य लाभणें हें इकडच्या मानानें बरेंच असलें तरी त्याहीपेक्षां अधिक आयुष्य लाभलेलीं कित्येक वर्तमानपत्रें हिंदुस्थानांत किंबहुना महाराष्ट्रांतहि आहेत. उदाहरणार्थ, ज्ञानोदयाचें वय ८९ वर्षांचें आहे. पुण्याच्या ज्ञानप्रकाशाचें वय हल्लीं ८१ आहे. सातारचा शुभसूचक ७२ वर्षांचा आहे. त्याचप्रमाणें वेळगांवसमाचार ६७, कल्पतरु-आनंदवृत्त (सोलापूर) ६३, सत्यशोधक (रत्नागिरी) ६३, खानदेशवैभव (धुळें) ६३, ज्ञानसागर (कोल्हापूर) ६१, सुबोधपत्रिका (मुंबई) ५८, सुबोधसिंधु (खांडवा) ५०, प्रबोधचंद्रिका (जळगांव) ५०, इतकीं जुनीं इतर वर्तमानपत्रें महाराष्ट्रांत आहेत. पण विलायतेंत हें आयुष्यमान फारच अधिक आहे. विलायतेंतल्या संस्थांमध्यें टिकाऊपणा विलक्षण प्रकारचा आढळतो. ऑक्सफर्ड केंब्रिज विद्यापीठांतील कांहीं कॉलेजें सहासातशें वर्षांचीं आहेत. बँक ऑफ इंग्लंड १६९४ मध्यें निघाली ती अजून अखंड चालू आहे. त्याचप्रमाणें कित्येक चिकाटीच्या वर्तमानपत्रांत खळ म्हणून कधीं न पडतां तीं आज शेंकडों वर्षें अव्याहत चालू आहेत. या चिवट वर्तमानपत्रांचा पराक्रम खालील यादीवरून कळून येईल. वुरस्टर जर्नल (मूळ सुरू झाल्याचें वर्ष) १६९०, स्टँफर्डमर्क्युरी १६९५, न्यूकॅसल कोरंट १७११, ब्रिस्टल टाइम्स व मिरर १७१३, हरफर्ड जर्नल १७१३, नॉरविच जर्नल १७१४, केंब्रिज गॅझेट १७१७, लीडस मर्क्युरी १७१८, नॉर्थम्टन मर्क्युरी १७२०, ग्लॉस्टर जर्नल १८२२, विंचेस्टर जर्नल १७२९, चेस्टर कोरंट १७३०, डार्बी मर्क्युरी १७३२, वेस्टर्न गॅझेट १७३७, बेलफास्ट न्यूज लेटर १७३७, बर्मिंगहॅम गॅझेट १७४१, कॉव्हेनट्री स्टँडर्ड १७४१, बाथ जर्नल, १७४२, केंब्रिज क्रॉनिकल १७४४, अवर्डीन जर्नल १७४८, लीस्टर जर्नल १७५३, ऑक्सफर्ड जर्नल १७५३, यॉर्कशायर पोस्ट १७५४, बाथ क्रॉनिकल १७५५, नॉरफक क्रॉनिकल १७६१, फ्रीमन्स जर्नल १७६३, न्यूकॅसल १७६४, एडिनबरा क्रॉनि० १७६४, लिमरिक क्रॉ० १७६४, मॉर्निंग पोस्ट १७७२, डॅरी जर्नल १७७२, यॉर्कशायर गॅझेट १७७२, हॅम्पशायर क्रॉ० १७७२, कंबरलंड पॅकेट १७७४, आणि लंडन टाइम्स १७८५.

यावरून १८५ पासून २४० वर्षांइतकीं व सतत चालू राहिलेलीं वर्तमानपत्रें इंग्लंडांत आज आहेत हें पाहून कोणाला कौतुक वाटणार नाहीं! नॉर्थम्टन मर्क्युरी पत्राचीं १७२० सालापासूनचीं बांधलेलीं सगळीं फाईलस (बुकें) जमीनच्या नशी आज या वर्तमानपत्राच्या कचेरींत शाबूद आहेत म्हणतात!

विलायतेंतील वरील पत्रांइतकें दीर्घायुष्य आमच्या इकडील पत्रांना लाभलें म्हणण्याला अजून १४०-१५० वर्षें अवकाश आहे. तथापि आज लाभलें इतक्याचाहि आनंद मानणें अनुचित होणार नाहीं. पण तो आनंद व्यक्त करण्याबरोबर आम्ही ईश्वराला अशी प्रार्थना करितों कीं, केसरी व मराठा पत्रें व त्यांचे संस्थापक व उपरिनिर्दिष्ट त्यांचे वडील बांधव या सर्वांना दीर्घायुष्य लाभावें, किंबहुना तीं चिरंजीवहि व्हावीं!

परीक्षा पास होण्यास युक्ति! ज्यांत सर्व अंकगणिताचें सार आलें आहे. खुबिदार चित्र देऊन विषय सोपा केला आहे व मराठी व मॅट्रिकचे ताजे १६ वर्षांचे पेपर सोडविले आहेत असें 'परीक्षेची तयारी' हें १८० पृ. चं ट. सह ८१२ आण्यांचें पुस्तक घ्या. दोन महिन्यांत तयारी! पटवर्धन मंडळी, रत्नागिरी.

वर्ष ५१ वें] तारीख ३ जानेवारी १९३१ [अंक १ ला

अनुक्रमणिका

केसरीचा एकावन्नावा वाढदिवस १
केसरी-मराठा यांची उत्पत्ति व वाढ ३
केसरीचें पहिलें प्रसिद्धीपत्रक ४
केसरींतील मजकुराची मांडणी ९
केसरी—मराठ्यावरील आपत्तींचे प्रसंग १०
मराठा पत्राची हकीकत १२
केसरी टाईप फाउण्डरी १४
टिळक टाइपाच्या वर्णमालेचे नमुने १५
केसरी ट्रस्टसंबंधीं कांहीं कागदपत्र १७
लो. टिळकांचें पहिलें मृत्युपत्र (१९०९) १८
लो. टिळकांचें दुसरें व अखेरचें मृत्युपत्र (१९१८) १९
केसरी—मराठा संस्थेचें ट्रस्टडीड २०
लवादनामा नं. १ ... ... २१
रिलीज डीड किंवा वेदाशापत्र २२
भाडेचिठी नं. १ व २ ... ... २३
पावती नं, १,२,३,४ ... ... २४
लवादनामा नं. २... ... ... २४
रामभाऊ टिळकांचा कोर्टास अर्ज (दाव्याचें काम न चालविण्याबाबत) ... २५
पुणें कोर्टाचा हुकूमनामा २५
केसरी ट्रस्टच्या दाव्यांतील 'जजमेंट' (निकालाचीं कारणें) २६
केसरीची तीन लक्ष रुपयांची देणगी २७
केसरी—संस्थेची सांपत्तिक स्थिति २९
मतप्रसार, धर्मादाय, देणगी वगैरेंची यादी ३०
लो० टिळकांच्या वारसांची सांपत्तिक स्थिति ३१
केसरी—मराठा संस्थेचा निर्वाहभाग ३१
केसरी—मराठा संस्थेचे नियम... ... ... ३३
एजन्सी खातें ३३
केसरी—संस्थेचे अवांतर उद्योग ३४
गुजराथी केसरी ३४
केसरीची मालकी व संपादकीय धोरण ३५
केसरीचा व तुरुंगाचा ऋणानुबंध ३७
संपादकीय शिक्षण ३७
वर्तमानपत्र मीमांसा ३८
विलायती वर्तमानपत्रांचा इतिहास ४०
हिंदी वर्तमानपत्रांचा इतिहास ४१
हिंदी अखबारांचे नमुने ४२
हिंदुस्थानांतील छापखाने व वर्तमानपत्रें ४५
महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें ४८
जुना ज्ञानप्रकाश ४९
बंगाल्यांतील वर्तमानपत्रें ५१
मद्रासचें पुढारी पत्र ५२
वर्तमानपत्रें व देशी—विदेशी भाषा ५३
इकडील वर्तमानपत्रें ५३
प्रेस ॲक्टाची कामगिरी ५४
हिंदी वर्तमानपत्रें व टपालखातें ५४
चित्रमाला परिचय ५५
केसरीसंबंधीं कांहीं आठवणी ६०
उपसंहार व आभारप्रदर्शन ६३

The Poona School of Commerce guarantees your success in Accountancy, Banking, Shorthand and other Commercial subjects. 80% results of the last year. Insure your success immediately. Prospectus free. Apply to S. R. KETKAR, F. C. R. A., Secretary, at Budhawar Chauk, Poona City.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरी-मराठा व्यवस्थापक मंडळ.

(३७) केशवराव वाळ.

(३८) धों. वा. विध्वंस.

(३९) गो. ह. घारप.

(४०) य. ग. कुळकर्णी.

(४१) अ. वा. फडर्णास.

(४२) आ. वि. कुळकर्णी.



(४३) बळवंतराव दाभोळकर.

(४४) ना. ज. दातार.

(४५) प. वि. महाजन.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरीचा वातमीदार वर्ग.

(४६) गणेश लक्ष्मण पागे.

(४७) नारायण रामलिंग वामणगांवकर.

(४८) दाजीशास्त्री चांदेकर.

(४९) दत्तात्रय गणेश सावरकर.

(५०) श्री. रा. टिकेकर.

(५१) डॉ. नारायणराव परुळेकर.

(५२) पुरुषोत्तम दिनकर जोशी.

(५३) महादेवराव मोडक. लंडन.

(५४) लक्ष्मण नारायण साने.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

केसरीचा ऋणानुबंधी वर्ग.

(५५) कै० शंकर मोरो रानडे.

(५६) कै० कृष्णाजी आबाजी गुरुजी.

(५७) कै० पारखी शास्त्री.



नाना पावगी.

(५८)

(५९) कै० रावजी भवानराव पावगी.

(६०) रामजी लक्ष्मण घरत.

(६१) कृष्णाजी लक्ष्मण सोमण.



(६२) कै० कृष्णाजी परशराम गाडगीळ.



(६३) कै० प्रो० आण्णासाहेब विजापुरकर.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(६४) श्री शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी)

(६५) कै० रामभाऊ टिकेकर (धनुर्धारी)

(६६) महादेव हरि मोडक.

(६७) लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

(६८) श्रीपाद दामोदर सातवळेकर.

(६९) सदाशिव शास्त्री भिडे.

(७०) कै० नारायण कृष्ण आगाशे, वकील.

७१ कै० भाऊशास्त्री लेले.

(७२) प्रो. धोंडो केशव कर्वे.

(७३) प्रो. रानडे. आर. डी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(७४) कै० रामचंद्र मोरेश्वर साने, वकील.

(७५) आत्माराम शास्त्री ओडलमने.

(७६) कृष्णशास्त्री कवडे.

(७७) सदाशिवराव वापट.

(७८) प्रो० शं. दा. पँडशे.

(७९) म. गो. अभ्यंकर.

(८०) गर्गे (दिवाकर).



(८१) श्रीपाद महादेव माटे.

(८२) महादेव धोंडो विध्वंस.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(८३) बॅ. विनायकराव सावरकर.



(८४) रामभाऊ मंडलीक.

(८५) गोपाळराव ओगले.



(८६) रा. द. पराडकर.

(८७) ग. त्रिं. माडखोलकर.

(८८) गोविंद कृष्ण टिळक वकील.

(८९) कै० ना. चिं. केळकर.

(९०) कै० हरी रघुनाथ भागवत.

(९१) शंकर श्रीपाद नवरे.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(९२) विठ्ठल रामजी शिंदे.

(९३) कै० प्रो० मा. म. जोशी.

(९४) मुकुंदशास्त्री मिरजकर.

(९५) महादेवशास्त्री दिवेकर.



(९६) नाना नागपूरकर.

(९७) जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर

(९८) कै० भास्कर विष्णु फडके (विहारीकर्ते)

(९९) कै० गो. म. चिपळूणकर.

(१००) ग. स. मराठे.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



(१०१) कै० वि. का. राजवाडे.

(१०२) कै० वासुदेव शास्त्री खरे

(१०३) कै० का. ना. साने.

(१०४) कै० वि. ल. भावे.

(१०५) कै० द. ब. पारसनिस.

(१०६) गो. स. सरदेसाई.

(१०७) द. वि. आपटे.

(१०८) कै० गो. का. चांदोरकर.

(१०९) कै० पां. न. पटवर्धन.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(११०) चिंतामण विनायक वैद्य.

(१११) यादव माधव काळे.

(११२) दत्तो वामन पोतदार.



(११३) दाजी नागेश आपटे.



(११४) वि. स. वाकसकर.



(११५) आबा चांदोरकर.

(११६) दि. वि. काळे.



(११७) भा. वि. घारपुरे.

(११८) रामचंद्र जनार्दन गोखले.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



(११९) त्र्यं. वा. केतकर.

(१२०) रामचंद्र पांडुरंग शास्त्री मोघे.

(१२१) प्रि० गोविंद सदाशिव आपटे.

(१२२) प्रो० नाईक.



(१२३) के. एल्. दप्तरी.

(१२४) रामचंद्र विनायक पटवर्धन.



ज्योतिषसंमेलन.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१२५) दादासाहेब करंदीकर.

(१२६) दाजीसाहेब खरे.

(१२७) गोपाळराव पटवर्धन.



(१२८) राघवय्या सॉलिसिटर.



(१२९) एस्. एस्. सेटलूर.

(१३०) बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा.

(१३१) सदाशिव रामचंद्र बखले.

(१३२) ल. ब. भोपटकर.

(१३३) केशवराव केळकर.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१३४) श्रीधरशास्त्री पाठक.



(१३५) लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

(१३६) केशव लक्ष्मण ओगले.

(१३७) गणपतराव अभ्यंकर.

(१३८) रामचंद्र शंकर राजवाडे.



(१३९) अनंत वामन बर्वे.

(१४०) मो. शं. मुळवे.

(१४१) टी. रघुनाथ (सांगली).

(१४२) मो. वा. करमरकर.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१४३). श्री. बाळासाहेब मिरजकर



(१४४) श्री. बाबासाहेब इचलकरंजीकर.

(१४५) सरदार बाळासाहेब विंचुरकर.

(१४६) सरदार पंडित जगन्नाथमहाराज.

(१४७) नामदार दादासाहेब खापर्डे.



(१४८) कै. वासुदेव सदाशिव बापट.



(१४९) कै. प्रो. भय्यासाहेब जिनसिवाले.

(१५०) कै. हुकुमचंद ईश्वरदास.

(१५१) वासुकाका जोशी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१५२) कै. बाळासाहेब नातू.

(१५३) कै. शि. म. परांजपे.

(१५४) कै. अण्णासाहेब पटवर्धन.

(१५५) कै. गणेश व्यंकटेश जोशी.



(१५६) कै. अण्णासाहेब नेने.

(१५७) कै. नानासाहेब देशमुख.

(१५८) माधवरावजी अणे.

(१५९) डॉ. बा. शि. मुंजे.



(१६०) तपस्वी बाबासाहेब परांजपे.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



(१६१) गंगाधरराव देशपांडे.

(१६२) द. व्यं. बेळवी.

(१६३) कै. विसुभाऊ साळवेकर.

(१६४) वामनशास्त्री किंजवडेकर.

(१६५) गोपाळ रावजी गोगटे.

(१६६) त्र्यंबक हरी आवटे.

(१६७) शंभूराव गोडबोले.

(१६८) भाऊसाहेब चौकर.

(१६९) गणेश महादव नामजोशी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१७०) रघुनाथ कृष्ण पाटणकर.

(१७१) डॉ. का. बा. पाठक.

(१७२) रघुनाथशास्त्री पटवर्धन.

(१७३) कै. भिकाजीपंत हर्डीकर.

(१७४) कै. शंकरराव गोडबोले.

(१७५) कै. भिंगारकरबुवा.

(१७६) कै. दिनकरपंत तात्या चक्रदेव.



(१७७) विनायकराव करमरकर.

(१७८) दत्तात्रय केशव केळकर.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१७९) त्र्यंबकराव खरे ऑडिटर.

(१८०) प्रो. खानखोजे.

(१८१) प्रो. एन्. एन्. गोडबोले.

(१८२) न. चिं. केळकर.

(१८३) वि. गं. केतकर.

(१८४) डॉ. श्री. मो. साने.



(१८५) मा. पं. सोमण.

(१८६) विष्णुबोवा गुंडरे.



(१८७) दत्तोपंत बडसरे.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

(१८८) घों. वा. विद्वांस



(१८९) रा. ब. टिळक

(१९०) कै० श्री. ब. टिळक.

(१९१) ना. वा. केळकर.



(१९२) ग. वि. देवधर.



(१९३) प्रो. ना. सि. फडके.

(१९४) वि. वा. बागवे.



(१९५) सहदेव बावाजी.



(१९६) सीताराम मोरे.

[चित्रशाळा प्रेस, पुणें.]

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative



केसरी–मराठा संपादक उपसंपादक मंडळ.

(रा. ग. वि. केतकर हे तुरुंगांत असल्यामुळें यावेळीं ते पुण्यास नव्हते.)



केसरी-मराठा संस्थेतील संपादक, व्यवस्थापक व इतर कामगार मंडळी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

परिशिष्ट नं. १.

केसरी ट्रस्टच्या दाव्यासंबंधीं मुंबई हायकोर्टाचा निवाडा।

न्या: ब्रूमफील्ड म्हणतातः—"प्रतिवादींचें (रामभाऊ टिळक) म्हणणें असें कीं, वादी ट्रस्टी यांनीं उगाच कांहीं चिल्लर आगळिकी म्हणून सांगून ताकीद मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. पण सर्व दाखल झालेला पुरावा पाहातां माझी अशी पक्की खात्री झाली आहे कीं, प्रतिवादी नं १ रामभाऊ टिळक यांनीं वरचेवर जाणूनबुजूनच अन्यायानें ट्रस्टडीड व भाडेचिठी यांच्या कामांत अडथळा व हरकती केल्या. त्यांचा हेतुहि उघड होता. छापखान्याच्या व्यवस्थेंत आपला हात शिरकूं देत नाहींत म्हणून जाणूनबुजून त्यांनीं ट्रस्टींना उपद्रव देण्याला सुरुवात केली, आणि तीहि पध्दतशीर व मनांत एक प्रकारचा निश्चित हेतु धरून ठेवूनच केली. प्रतिवादी नं. २ श्रीधर बळवंत टिळक यांचा स्वभाव मोठा चमत्कारिक होता (has a peculiar mentality) ही गोष्ट कबूल करण्यांत आलेलीच आहे; व माझी अशी पक्की खात्री होऊन चुकली आहे कीं, वादी ट्रस्टी यांना कोर्टांत येऊन दावा मांडणें ही गोष्ट अपरिहार्य होण्याइतका प्रतिवादींनीं त्यांस त्रास दिला. (They made themselves a nuisance) एरवीं वादी ट्रस्टी यांना हा दावा करण्याचें काय कारण? टिळकांसारख्यांच्या मुलांविरुध्द भलत्यासलत्या चिल्लर व निष्कारण कागाळ्या ते करतील असें म्हणण्यास मुळींच आधार किंवा कारण नाहीं. अर्थात् वादी ट्रस्टी हे ज्या प्रकारचें संरक्षण मागतात तें त्यांना दिलेंच पाहिजे. ट्रस्टडीड व भाडेचिट्टी हे कागद फसवून करून घेतले ही तकार शाबीत होईल असा कोणताहि पुरावा पुढें आणण्याचा नुसता प्रयत्नहि प्रतिवादी रामभाऊ टिळक यांनीं केलेला नाहीं. उलट दाखल झालेल्या पुराव्यावरून प्रतिवादींची ही तकार सर्वस्वीं खोटी ठरते. व त्यांच्या वकिलानें या अपिलाच्या कामांत जवळ जवळ ती सोडून दिली (Practically dropped it) व अपील-यादींत उल्लेख न केलेली अशी भाडेचिठ्ठीसंबंधानें भलतीच एक तकार उपस्थित केली."

न्या. पाटकर म्हणतातः—"प्रतिवादींची अशी तकार आहे कीं, वादी ट्रस्टी यांनीं आपल्याला भलत्या गोष्टी सांगून आपल्या वजनाचा दुरुपयोग करून हें ट्रस्टडीड वगैरे कागद करून घेतले. परंतु पुराव्यावरून असें शाबीत होतें कीं, ट्रस्टडीड करतांना ते करणारे प्रतिवादी यांचेवर कोणत्याहि तऱ्हेचें वजन टाकण्यांत आलें नव्हतें. किंवा त्यांची गैर समजूतहि कोणी केली नव्हती. या बाबतींत वादीतर्फे आलेला पुरावा खोडून काढण्यांत आलेला नाहीं, किंवा उलटतपासणी करून तो खोटा असल्याचा बहाणाहि करण्यांत आलेला नाहीं. म्हणून ट्रस्टडीड हें बेकायदेशीर नाहीं. तें आम्ही कायम करतों."

Bharat Industries. Perfectly Indian—Marvellously Cheap. (1) Newspaper and Job Printing Ink. (2) Envelopes and Notepapers. (3) Indian Gloy Paste. (4) Cock brand Boot polish. (5) Writing fluid-Blue-Black and Red. (6) Almond Oil—pure.
Write to :—Bharat Industries, Bombay 4.

General Assurance Society Ltd. Ajmer. Low rates of Premia and High rates of Bonus to Policy-holders. Good Facilities and Tempting Commission to Field Workers. Apply to S. R. SARDESAI & Co., Chief Agents for Bombay, Berar & C. P., Girgaon Road, Bombay 4.

नवयुग धर्मकर्ते सदाशिव कृष्ण फडके (पनवेल) यांचीं पुस्तकें. श्रीदत्तोपासना, श्रीदत्तसुक्तमाला, श्रीदत्तपंचामृत प्रत्येकी कि. सहा आणे. नवयुगधर्म खंड पहिला, ब्राह्मसमाजाचा विवेचक इतिहास कि. रु. ४. श्रीमद्दयानंदचरित्र कि. रु. १॥,. नमुना अंक कि. रु. १ नवयुगधर्ममाला.

देशी भांडवलावर देशी तज्ज्ञांचे सल्ल्यानें आधुनिक यांत्रिक व शास्त्रीय पध्दतीवर बनविलेले अंगास लावण्याचें उत्तम प्रकारचे सुवासिक "बैलछाप" साबणाकरितां ह्याच अंकांतील आमची दुसरी मोठी जाहिरात पाहा. कारखाना—मॉडेल सोप कंपनी कलकत्ता. मॅनेजमेंटः सिकी कं., ५५।८ कॅनिंग स्ट्रीट, कलकत्ता.

अखिल-भारत देशांत नाणावलेलें व वाखाणलेले, देशी-विदेशी पध्दतीचा सांगड घालून बनविलेलें, केसांचा नैसर्गिक मृदुपणा व काळेभोरपणा कायम ठेवून मेंदूस थंडावा देऊन चित्तवृत्ति सदोदित उल्हासित ठेवणारें 'भूतनाथ' हेअर ऑईल एकवार वापरून अनुभव पाहा. बाटली कि. ८१२. ट. ख. नि. मुंबईस घाऊक व्यापाऱ्यांकडे मिळतें.
किशोरीलाल चौधरी, १५१ मॅचुआबझार, कलकत्ता.

आपलीं मुलें सुशिक्षित व राष्ट्राचीं आधारस्तंभ व्हावींत असें कोणास वाटत नाहीं! त्यांना हंसतखेळत ज्ञान मिळावें व तीं मोठीं कर्तृत्ववान व्हावीं यासाठीं त्यांना शालेय पुस्तकांशिवाय वाचनास देण्यास 'खेळगडी' मासिक उच्च दर्जाचें आहे असें आम्हींच म्हणत नसून, प्रमुख वृत्तपत्रांनीं व थोर विद्वानांनीं म्हटलें आहे. ८३ तिकिटें पाठवून नमुना मागवा अगर आजच मुलाच्या नांवें मागवा. 'दिवाळी अंक' मिळेल. वा. व. २।रु. खेळगडी कार्यालय, गिरगांव-मुंबई.

बहिरेपणा व कानाचे सर्व रोगांवर रामबाण औषध किंमत २८६. पानथरी व यकृत या रोगांवर ७ दिवसांत गुण देणारीं औषधें कि. व्ही. पी. सह पानथरी रु. २८१२, लिव्हर रु. ३८१२. पत्ताः—डॉ. डब्ल्यू. एन्. दीक्षित, पुणें शहर.

बाळंतरोग-व क्षयरोग यांवर वृद्धपरंपरागत औषधी.
सौ. आनंदीबाई जोगळेकर,
मुधोळकर पेठ उमरावती ... ...वऱ्हाड.

लग्नकार्यास आवश्यक अशा सर्व माहितीसह जन्मकुंडलीसाठीं फक्त ८॥ चीं तिकिटें पाठवा. ज्योतिषाचीं लहान मोठीं सर्व कामें काळजीपूर्वक केलीं जातात. जन्मवेळ कळवा. अनंतकार्यालय, पो. आजगांव (सावंतवाडी).

सर्व प्रकारचे विमे—आमचेकडे आगीचे, आयुष्याचे मजूर नुकसानभरपाईचे व मोटारींचे विमे सर्व सवलती देऊन उतरले जातात.
गाडगीळ आणि कंपनी. ... ... जळगांव (पूर्वखानदेश).

साखर खात्रीची स्वदेशी पवित्र लोकमान्यांच्या शिफारसीनें सर्व कारखाने प्रत्यक्ष पाहून वगभंगाच्या वेळीं सुरू केलेलें व गेलीं २५ वर्षे अव्याहत चाललेलें खात्रीचें एकच दुकान. मे. रघुनाथ नारायण सन्स, ठाकुरद्वार मुं. २.

२०० रुपये दरमहा मिळविण्यायोग्य नाटक, सर्कस सिनेमापेक्षां स्वतंत्र धंदा, एक आण्याचें पोस्टाचें तिकीट पाठविल्यास लिस्ट पाठवूं.
एन्. एफ्. पटेल आणि कंपनी ... ... जमखंडी.

सुरेल व सुंदर, अशा वाजाच्या पेटया आमच्या कारखान्यांत तयार होतात. कामाच्या चोखपणाचे प्रो. गोविंद सदाशिव टेंभे यांचें सर्टिफिकेट मिळालें आहे. लक्ष्मण आणि कं., हार्मोनियम मेकर खडेबाजार, बेळगांव.

किंमती स्वस्त असून मागणीकडे त्वरित लक्ष दिलें जातें. कोणतेंहि पुस्तक पाहिजे असेल तेव्हां खालील पत्त्यावर लिहा.
श्री बॅंत्रे बुकडेपो ... ... गिरगांव मुंबई.

विश्वनाथ व किशोरमालती हेअर ऑइल्स. कलकत्त्याचीं प्रख्यात व सुप्रसिध्द अशीं देशी पध्दतीवर बनविलेलीं मोहक सुवासिक. किंमत अनुक्रमें बाटलीस १ रु. व १२ आणे. ट. ख. निराळा. मुंबईस घाऊक व्यापाऱ्यांकडे मिळतात.
किशोरीलाल खत्री, ८९ बीडन स्ट्रीट ... ...कलकत्ता.

मनोहर देशी बांगडी—चार सुवर्ण व रौप्य पदकें मिळालेली दर हजारीं रु. १०. गांवोगांव एजंट्स पाहिजेत. ब्रोमाईड एन्लार्जमेंट—फोटो बरहुकूम नसल्यास पैसे परत. १५,१२, साईझ कि. रु. ३॥; २०,१६, रु. ५; २३,१७,रु. ६॥.
ना. ग. वर्दे ... ... वसई, जि. ठाणा.

केसरी ता. ९-८-३० च्या अंकांतील अभिप्रायानें 'वंदे मातरम्' शाली ५०० वर खपल्या. ही शाल प्रत्येक घरीं हवीच. लांबी ३ वार, रुंदी ४५ इंच, विणकर जाड. किंमत २ रुपये. व्ही. पी. नें २। रु. नारायण दासो कर्डी, स्वदेशी शहापुरी खण-लुगड्याचे कारखानदार, ... गिरगांव मुंबई नं. ४.

चमन (वनस्पतिजन्य, रजिस्टर्ड) कफ, खोकला, अजीर्ण, पोटदुखी, थंडी, पित्त, कंठसफाई आणि मुखशुध्दीकरितां "चमन" हमेश वापरा. ८॥ आण्यांची तिकिटें पाठवून १ बाटली मागवून प्रचीति तरी पाहा.
स्टार आणि कंपनी (k) ... ... बेळगांव.

६

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

हिंदुस्थानांतच
सर्व तऱ्हेच्या मोटार बॉडीज बांधणारी प्रमुख कंपनी

सर्व्हिसकरितां
पसेंजर बॉडीज्
टूरिंग बॉडीज्
डिलिव्हरी बॉडीज्



म्युनिसिपा-
लिटयांकरितां
टिपिंग बॉडीज्
रोडवॉटरिंग टॅंक्स
प्लॅटफॉर्म बॉडीज्

मोटार-बॉडी बिल्डर्स इंडिया लिमिटेड

आर्थर रोड मुंबई नं. ११.

टेलिफोन नं. ४०५०९ तारेचा पत्ता—" रिपेअर वर्क "

आम्हीं बांधलेल्या हजारों गाड्या सर्व हिंदुस्थानभर नव्या डौलानें फिरत आहेत.

किर्लोस्कर नांगर

सर्वांत श्रेष्ठ
पण
किंमतींत फार स्वस्त

आपली नांगरटीची सर्व भिस्त
नेहमीं यांवरच टाका !
नांगरांचा व आउतांचा
कॅटलॉग मागवा !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी.

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

डॉ. गोपाळ भास्कर गणपुले यांचा सायको-थिरपीहॉल ६६५ शुक्रवार पेठ पुणें नं. २

अनेक प्रकारचे शारीरिक व मानसिक रोग व भूतबाधा, हिस्टेरिया, फेपरें, भ्रमिष्टपणा, वेड, वेड्या समजुती आणि अनेक प्रकारची व्यसनें घालविण्यासाठीं इतर उपाय करून हताश झालेल्यांनीं डॉ. गणपुले यांजकडून

मानसोपचार

करून घेऊन व्याधींपासून मुक्तता करून घ्यावी

श्रीमंत औंध सरकारकडून सुवर्ण-पदक मिळालेला व मुंबई सरकारनें रजिस्टर केलेला डॉ. गणपुले यांचा

सायकोबाम

सर्व प्रकारच्या शारीरिक वेदनांवर अप्रतिम व हटकून गणकारी वाटली किं. ८ आणे ट. ख. नि.

डॉ. गणपुलेकृत खालील दोन्ही ग्रंथ जानेवारी १९३१ अखेरपर्यंत फक्त रु. ५स मिळतील

कोणत्याहि औषधावांचून केवळ निसर्ग-नियम पाळण्यास शिकवून प्रत्येकास हवा, पाणी आणि अन्न यांचे साहाय्यानेंच रोग निवारण करण्यास शिकविणारी

" मानसोपचार-शास्त्र व पद्धति "

द्वितीयावृत्ति, कापडी बांधणी, सोनेरी नांव, १६ चित्रें ६२० पृष्ठें किंमत रुपये चार. टपाल खर्च वेगळा

हिप्नॉटिझम् व मॅग्नेटिझम् यांतील फरक दाखवून दोन्हींचे प्रयोग करण्यास शिकविणारा

" मानसोन्नति "

ग्रंथ घेऊन सामर्थ्यवान वना का. बा. सो. नांव ३८४ पृष्ठें किंमत रुपये २॥ ट. खर्च वेगळा.

अमृतांजन (रजिस्टर्ड)

हें सर्व शारीरिक वेदना निर्मूल बऱ्या करतें. म्हणून याची वाखाणणी फार झाली व लोकांस पसंत पडून खप झपाट्यानें होऊं लागला. हें पाहून लोक याची नक्कल करून त्याला 'अमृतांजन'च्या पहिल्या व शेवटच्या अक्षरांचे नांव देऊन व्यापारी व गिऱ्हाईक यांची दिशाभूल करूं लागले आहेत. तरी प्रत्येकानें विकत घेते वेळीं तें "अमृतांजन"च असल्याबद्दल खात्री करून घेणें.

सर्व ठिकाणीं मिळतें. किंमत १ बा. ०८ आणे

अमृतांजन डेपो,

मुंबई व मद्रास

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

भट आणि कंपनी, सांगली यांचे प्रख्यात व यशस्वी जिन्नस

आमचें जवाहीर

ब्राम्ही तेल म्हणजे एक अजब चीज आहे. ह्यांत ब्राम्हीचा अर्क जास्त प्रमाणांत असून केस जोमानें वाढविण्यांत व मेंदूला थंडावा आणण्यांत ह्या तोडीचें तेल त्रिभुवनांतहि नाहीं. ही दहा तोळ्यांची मोठी बाटली असते. दुसरें

हिरवा चाफा

बहादुर सेंट म्हणजे मोहक वासाचा धुमधडाकाच. एकानें लावावें व त्याच्या मोहक वासांत हजारों लोकांनीं दंग व्हावें. ही चवलीभार बाटली असते. वरील दोनहि बाटल्या एका सुंदर पेटींत असून या जोड बाटल्यांची किंमत अवघी आठ आणे.

जंगी धाडस

धातुपौष्टिक—महाप्रतापी

बलवंत पाक

ह्याच्या तोडीचें धातुपौष्टिक, मर्द करणारें औषध दुसरें कोणतेंच नाहीं. ह्याचा अमूल्य गुण सर्वत्रांस कळावा म्हणून भयंकर नुकसान सोसून हा पांच रुपयांचा स्पेशल डबा थोडी मुदत अवघ्या सवा रु.त देऊं. पूर्ण शरीरशुद्धीला तीन डबे वापरा. तीन डब्यांस सर्व खर्च माफ. ह्याचे अद्भुत गुण पाहून प्रत्येक स्त्री-पुरुष आश्चर्यानें थक्क होईल.

जगप्रसिद्ध

भट यांचें ब्रेन–टॉनिक

लंडनचें शिफारसपत्र

स्थलसंकोचास्तव पत्राचा थोडा सारांश — २१ कॉर्नवॉल रोड लंडन S. W. 7

"आपल्या ब्रेन–टॉनिकमध्यें जादूच असावी. येथें "आल्यानंतर माझी स्मरणशक्ति एकाएकीं खालावत "चालली. पण भट ब्रेन–टॉनिकचा उपयोग करतांच "गेलेली स्मरणशक्ति मोठ्या अजब रीतीनें परत आली "व परीक्षेंत फर्स्ट क्लास मिळाला."

महेश्वर वि. बर्वे.

हें पत्र ता. २१-३-३० च्या केसरींत समग्र प्रसिद्ध झालें आहे.

कॉलेज व स्कूल स्टूडंटस् ह्यांना अत्यंत प्रिय

पास झालों—यंदाहि होणारच

जादूप्रमाणें स्मरणशक्तीची विलक्षण वाढ होते. मेंदूची पूर्ण शुद्धि होऊन केलेला अभ्यास पूर्ण लक्षांत रहातो. परीक्षेंत अपयश येण्याची धास्तीच नको. हें पोटांत घेणेचें आहे. मेंदूची पूर्ण शुद्धि तीन बाटल्यांत होते. बाटली किं. दोन रु. शि. ट. तीन बाटल्यांस सर्व खर्च माफ.

ब्राम्ही बर्फ

म्हणजेच ब्राम्ही ज्यूस. क्रीम बर्फाप्रमाणें थंड गारेगार. तेलाचा ओषटपणा हाताला, कपड्याला लागत नाहीं. ह्याच्याबद्दल एवढेंच सांगणें कीं, फक्त हें एकदांच वापरा कीं त्यानें तुम्हाला कायमचें आपलें केलेंच म्हणून समजा. सुवास बहारीचा. ज्ञानतंतूना मजबूत करणारें स्टूडंस् प्रिय.

बाटली किंमत ८ आणे.

वसंत वडी

झटपट पित्त नाश करणारी अजब चीज. जुनाट खोकलाहि नाहींसा होतो. रुचकर, स्वादिष्ट, फॅन्सी पॅकेट. किंमत १ आणा.

स्वतंत्र धंदा

ह्याची जोमानें विक्री सिनेमा, नाटक, फिरण्याच्या जागा, हॉटेल वगैरे ठिकाणीं फिरती करून विका. शेंदोनशें पॅकेट सहज भजेनें मिळवा.

दोनशें पॅकेट—बोर्डासह दहा रुपये.

महिना पन्नास रुपये

भट आणि कंपनीचा झपाट्यानें खपणारा पंधरा-वीस प्रकारचा माल आहे. न खपणारा माल विनतक्रार परत घेऊन, त्याऐवजीं दुसरा खपणारा पाठविला जातो. व्यापाऱ्यांचें बिलकुल नुकसान नाहीं. कित्येक प्रसिद्ध व्यापारी ह्याचा फायदा घेत आहेत. आमच्या व्यवहाराबद्दल अत्यंत खूष आहेत. तुम्हींहि अनुभव घ्या.

वय मोठें बुद्धि मंद अशा मुलांना भट ब्रेन–टॉनिक जरूर द्या

मेंदूचे विकार, भ्रम, चक्कर, वेड, बालग्रह, विस्मरण ह्यांवर भट ब्रेन–टॉनिकसारखें जगांत दुसरें टॉनिक नाहीं. हजारों प्रशंसापत्रें कॉलेज व स्कूल स्टूडंटस, वकील, डॉक्टर्स, मुलांचे पालक ह्यांनीं अनुभव घेऊन भट ब्रेन–टॉनिकला दिलेले अभिप्राय लवकरच पुस्तकरूपानें प्रसिद्ध होतील.

केमिस्ट व स्टोअर्स

ज्यांनीं भट आणि कंपनीचा सर्व माल दुकानीं ठेवला आहे, त्यांना इतर कोणत्याहि मालापेक्षां आमच्या मालापासून जास्त फायदा होत आहे. कंपनीच्या खर्चानें तुमच्या गांवीं प्रसिद्धि केली जाते. न खपणारा माल बिनतक्रार परत घेऊन, त्याऐवजीं दुसरा खपणारा पाठविला जातो. पत्रव्यवहार करा. व्यापाऱ्यांस भाव व अटी कळवूं. फिरती करून जे माल खपवितात त्यांना शंभरसवाशें रुपये महिन्याचे सहज पण खात्रीनें मिळतात. मग नोकरीच्या मागें कां लागतां ?

आमचा माल ठेवणारे कांहीं प्रसिद्ध व्यापारी— मुंबई:गिरगांव–माधव एजन्सी, आगाशे ब्रदर्स. पुणें:बुधवार पेठ–महादेव आणि कंपनी, साइनाथ कं., जोशी ब्रदर्स. कोल्हापूर:सरनाईक, आरवाडे केमिस्ट. धुळें:आडेकर सन्स. सोलापूर:डी. आर. राजे, जुनी गिरणी चाळ. बडोदा:दामले ब्रदर्स–इंदोर:मोतीलाल कं. नाशीक:टापर कं. सातारा, डिंगणकर स्टोअर्स. नागपूर:जोशी ब्रदर्स, चिटणीसपुरा दाजीबा चाळ. मोहवा:कडूसकर ब्रदर्स इत्यादि. आमचे फिरते एजंट श्री. विश्वनाथ हरि आठवले हे सँपल्स दाखवतील. आश्रय द्यावा.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 2455

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative

CC-0. Jangamwadi Math Collection, Varanasi. An eGangotri Initiative